लीलावती.

एक सामाजिक कादंबरी.

श्रीयुत श्रीकिशोरीलाल गोस्वामी.

यांच्या मूळहिंदी पुस्तकावरून.

लेखक.

दामोदर.

यांनीं.

मराठींत भाषांतर केलें,

तें.

वाई येथें.

मोदवृत्त. छा. छा.

सन १९०८

प्रकाशकाचे दोन शब्द.

प्रस्तुत पुस्तक हे प्रसिद्ध हिंदी कादंबरीकार श्रीयुत श्रीकिशोरीलाल गोस्वामी यांच्या ' लीलावती ' कादंबरीचें भाषांतर आहे. भाषांतर करतांना आपल्या समाजरचनेस साजेशी जुळवाजुळव केली आहे. तरी ती कितपत साधली आहे हें पहाणें वाचकवर्गाचें आहे.

ही कादंबरी छापतांना त्यांमध्यें खिळेवजा ठोकळ चुका झाल्या आहेत त्याबद्दल वाचकवर्ग क्षमा करतील.

प्रकाशक.

लीलावती.

सामाजिक कादंबरी.

प्रकरण १ लें.

निर्धनतेचा प्रभाव !

पितृपंधरवडा संपला. आश्विनमासास सुरवात झाली. सरकारी कचेऱ्यांना एक महिन्याची सुट्टी मिळाली. बनारस शहरांतील धनवान मध्यम स्थितींतले लोक परगांवीं जाण्याची तयारी करूं लागले. कोणी विंध्याचलाला तर कोणी मथुवृंदावनास जाऊं लागले. अशा वेळेस प्रमोदकुमार नांवाचा एक तरुण गृहस्थ मनामध्यें कांहीं विचार करीत चांदणीचौकांतून हिंडत होता. हाही बनारसमधील एका धनवान् गृहस्थाचा मुलगा आहे. आज जरी याला दारिद्र्यानें ग्रासलें होतें तरी कांहीं दिवसांपूर्वी याचें नांव काशींतील धनाढ्य लोकांत निघत होतें.

आतां त्याचा काळ फिरला होता. एक कवडीलाही तो महाग झाला होता. त्याचे भाऊबंद मात्र अद्यापही श्रीमान् होते. केवळ पैसा नसल्यामुळें बिचाऱ्या प्रमोदकुमारास या ऋतूंतही काशींसच रखडणें भाग पडलें. याबद्दल परगांवीं जाण्याच्या तयारींत असणारे लोक त्याला अनेक रीतींनीं लावून बोलत होते. त्या बिचाऱ्यास हीं सर्व बोलणीं निमुटपणें ऐकून घ्यावीं लागत असत. आपले आप्तइष्ट, सखेसोयरे बाहेर जाण्याच्या तयारींत आहेत आणि आपणास मात्र येथेंच तोंड चुकवीत रहावें लागणार हा विचार त्याच्या मनांत आला ह्मणजे त्यास पराकाष्ठेचें दुःख होई. आपल्या अंतरींची व्यथा त्याला दुसऱ्या कोणाला सांगतांही येईना.

प्रमोदकुमार ज्यावेळेस चांदणीचौकांत हिंडत होता त्या वेळेस त्याच्या खिशांत एक शंभर रुपयांची नोट व दहाबारा पैसे होते. हीच त्याची सारी पुंजी होती. त्याची मूळची श्रीमंती जाऊन त्यास ही कुदशा कशी आली याबद्दलची हकीकत वाचकांना पुढें समजेल.

प्रकरण दुसरें.

एक पैही राहिली नाहीं.

प्रमोदकुमाराच्या बापाचें नांव विनोदकुमार. विनोदकुमार परलोकवासी झाल्यास आज दोन वर्षें होऊन गेलीं. बापाच्या मरणानंतर बापाचीं दोन-तीन मोठालीं घरें, एक बाग व नक्त दोन लक्ष रुपये इतकी जिनगी प्रमोद-कुमारास मिळाली होती. वाईट संगत व दुर्व्यसन यादुकलींनें प्रमोदकुमा-रांची संपत्ति अल्प काळांतच लयास गेली. त्याच्या संपत्तीनें विशेष घाईनें स्थानत्याग केला त्याचें कारण जुगारहें होय. इतक्या अल्प अवधींत कंगा-ल स्थिति आल्याबद्दल प्रमोदकुमाराच्या मनाची काय स्थिति झाली असेल याचें वर्णन करणेंही कठिण आहे. त्याच्या अंतःकरणांत एकसारखी आग पेटून राहिली होती. त्याच्या मर्मस्थानीं जणूं हजारों वृश्चिकांचे दंश होत होते. तो गैरशुद्धींत असल्यासारखा चांदणीचौकांत शून्य दृष्टीनें इकडे तिकडे पहात होता.

हळूं हळूं सूर्यास्त झाला. रस्त्यावर कंदील लागले. तरीहि प्रमोदकुमार भाना-वर आला नाहीं. तो हळूं हळूं राजाच्या दरवाजाजवळ येऊन थडकला. तो रस्ता ह्मणजे विश्वयोषितांचें आश्रयस्थानच होता. ज्याच्याजवळ पैशाची रेलचेल आहे, ज्याला डोळे असून दिसत नाहीं, ज्याची बुद्धि भ्रष्ट होऊन गेली आहे, ज्याची विवेकशक्ति नष्ट होऊन गेली आहे, जो केवळ उल्लू बनून गेला आहे अशा बदमाष माणसांचीच या वेळीं या रस्त्यावर गर्दी असाव-याची. प्रमोदकुमारास आतां यांपैकीं कोणतीच गोष्ट लागूं नव्हती. पैसा गेल्याबरोबर त्याचे डोळे उघडले! परंतु डोळे उघडून उपयोग काय? कोणत्या मार्गानें जावें याबद्दल त्याच्या मनाचा कांहींच निश्चय होईना. या रस्त्यांत राहणाऱ्या कुलटा त्याच्यावर आपले नेत्रकटाक्ष फेंकीत होत्या. परंतु निर्धन व ह्मणूनच निर्विकार झालेल्या प्रमोदकुमाराच्या शून्य हृदयावर त्यांचा बिलकुल परिणाम झाला नाहीं.

इतक्यांत त्याची दृष्टि एका सुंदर स्त्रीवर गेली. ही स्त्री कुलीन घराण्यांतली असावी असें तिच्या चालचलणुकीवरून दिसत होतें. तिची चालरीत अगदीं

साधी असून तिच्या चेहऱ्यावर भारदस्तपणाचीं स्पष्ट चिन्हें दिसत होतीं. ही स्त्री रस्त्याच्या एका बाजूनें खालीं पहात चालली होती. दुराचारी लोकांची नजर आपल्यावर जाऊं नये म्हणून ती फारच जपत होती; प्रमोदकुमार या स्त्रीकडे एकसारखा टक लावून पहात होता; तिचे डोळे रडून रडून लाल झाले आहेत असें त्याच्या दृष्टीस पडलें; डोळे पुसून पुसून तिच्या लुगडयाचा पदर भिंजून चिंब झाला होता; तिचा चेहरा उतरून गेला असून त्यावर उदासीनता दिसत होती; या स्त्रीवर कांहींतरी अनर्थकारक प्रसंग गुदरला असावा अशी प्रमोदकुमाराची अटकळ झाली.

कालाचा महिमा मोठा विपरीत आहे. ज्या प्रमोदकुमाराचें आजपर्यंत सर्व आयुष्य कुसंगतींत व दुर्वर्तनांत गेलें, ज्याचें हृदय वज्राप्रमाणें कठोर होतें, दुसऱ्यावर दया करणें म्हणजे नामर्दपणाचें कृत्य आहे असें ज्यास वाटत होतें, ज्यानें आजपर्यंत कोणावर कार्डीचाहीं उपकार केला नव्हता त्या प्रमोदकुमाराचें मन त्या कुलीन स्त्रीची कुदशा पाहून अत्यंत द्रवून गेलें. तो चटकन् त्या स्त्रीच्या जवळ जाऊन म्हणाला—“ आपण कोण आहां. ? अशा भलत्या वेळेस घराबाहेर पडण्यासारखें असें आपल्यावर कोणतें दुःख आलें आहे ? आपण कृपा करून मला आपली हकीकत सांगा. आपला माझा परिचय नाहीं तरी त्याबद्दल आपण संकोच मानूं नका. आपलें दुःख दुसऱ्यास सांगितल्याशिवाय आपल्याला सहाय्य तरी कसें मिळणार ? ”

इतक्या कनवाळूपणाचें भाषण त्या स्त्रीच्या कानावर आज प्रथमच पडलें. ह्या रस्त्यावर आपल्यावर दया करणारा कोणी भेटेल हें तिच्या स्वप्नींही नव्हतें. प्रमोदकुमाराचें वरील भाषण ऐकून तिनें आपले डोळे पुसले व डोक्यावर पदर घेऊन ती मुळूंमुळूं रडूं लागली. तिची अशी दशा पाहून प्रमोदकुमारानें खिशांतून पैशाचें पाकीट काढलें. पाकीटांत फक्त शंभर रुपयांची एक नोट व दहाबारा पैसे इतकीच आपली ऐहिक जिनगी पाहून प्रमोदकुमारास फार वाईट वाटलें. या स्त्रीस नोट द्यावी तर आपलें सर्वस्व जाणार. बरें दहाबारा पैसे द्यावेत तर तेवढयानें तिला काय होणार ? असें प्रमोदकुमारास मोठें कोडें पडलें. हमरस्त्यावर एका स्त्रीजवळ फार वेळ उभें राहणेंही चांगलें नाहीं असा विचार करून त्यानें त्या स्त्रीच्या हातांत अखेर नोटच दिली ! व तो तडक पुढें चालूं लागला. नोट पाहून ती स्त्री आश्चर्यानें थक्क होऊन गेली.

तिनें पाय उचलून तात्काल प्रमोदकुमारास गाठलें. व त्याच्या धोतराचा पदर धरून त्यास ह्मटलें—" बाबूसाहेब, माझी आपली बिलकुल ओळख नसतां माझ्यावर आज आपण जो येवढा उपकार केला त्याबद्दल मी आपली कधींही उतराई होणार नाहीं. जर आपण माझ्यावर ही दया केली नसती तर माझ्यावर एक भयंकर अनर्थ कोसळला असता. माझें सतीत्व भ्रष्ट होऊन माझ्या निर्मल कुलाला कलंक लागला असता. माझ्यानें आतां अधिक बोलवत नाहीं. आपण जो माझ्यावर उपकार केला त्याबद्दल नारायण तुमचें उदंड कल्याण करो. मी आपल्याला पवित्र दैवत समजतें. आपलें पवित्र नांव मला समजलें ह्मणजे मी त्या नांवाची एखाद्या जाज्वल्य दैवताप्रमाणें आराधना करीत राहीन. "

हें तिचें भाषण ऐकून प्रमोदकुमाराचे डोळे पाण्यानें भरून आले. तो तिला ह्मणाला " भगिनि, माझें नाव प्रमोदकुमार ". हें ऐकून त्या स्त्रीनें प्रमोदकुमाराची नखशिखान्त मूर्ति श्रद्धायुक्त अंतःकरणानें अवलोकन केली व ती आल्या रस्त्यानें चालती झाली. स्त्रीबद्दल विचार करण्याच्या आवेशांत आपल्याजवळ होता नव्हता तो सर्व पैसा नाहींसा झाला या गोष्टीचें बिचाऱ्या प्रमोदकुमारास भानही राहिलें नाहीं !

प्रकरण ३ रें.

गृहदशेनें उलट खाल्ली !

एका दुःखी स्त्रीस आपल्या हातून सहाय्य मिळून तिची संकटांतून मुक्तता झाली या विचारानें प्रमोदकुमाराचें चित्त क्षणभर आनंदानें उचंबळून गेलें. परंतु ही आनंदाची भरती निघून गेल्यानंतर आपला खिसा पार मोकळा होऊन गेला, आतां आपल्यापाशीं एक पैही उरली नाहीं या गोष्टीची त्याच्या मनांत अकस्मात् जागृति उत्पन्न होऊन त्याच्या मनाची स्थिति फारच चमत्कारिक होऊन गेली. तरी एका कुलीन स्त्रीचें संकट निवारण करण्याकरितां आपण आपलें सर्वस्व गमावलें याबद्दल त्याला एकदां सुद्धां पश्चात्ताप झाला नाहीं. तो आपल्याशींच ह्मणूं लागला ' बेहेत्तर आहे सर्व पुंजी गेली

तरी ! पण आपल्या हांतून आज एक मोठें 'पुण्यकृत्य झालें. माझी नोट सत्कर्मी लागली. ती माझ्याजवळ असती तर ती माझ्या कांहीं जन्माला पुरली नसती. दोन फार तर चार दिवसांत खलास झाली असती. असो. अशा द्रव्यहीन कंगाल स्थितींत बनारस शहरीं रहाणें ठीक नव्हे ' न बंधुमध्ये धनहीनजीवितम् ' या उक्तीप्रमाणें आतां आपण होइल तितकें लवकर बनारस सोडून जाणेंच चांगलें ' या विचाराचा त्याच्या मनावर इतका पगडा बसला कीं त्यानें हा विचार तात्काल अमलांतही आणला.

बनारस सोडून जाण्याचा प्रमोदकुमाराचा विचार मुक्रर ठरला. त्या वेळेस रात्रींचे साडे आठबाजून गेले होते, शहर सोडून जाण्याच्या विचारानें तो झट झट पावलें उचलूं लागला. व थोड्याच वेळांत सारनाथाच्या टेकडीवर येऊन पोहोंचला. यावेळेस रात्रीचे साडे-अकरा वाजले होते. दोनचार इसम सोबतीला असते तरी प्रमोदकुमार इतक्या रात्रीं अशा ओसाड प्रदेशांत कधींही आला नसता. मग एकटा येण्याचें दूरच राहिलें. पण आज त्याच्या मनाची अशी विलक्षण स्थिति होऊन गेली होती कीं आज शहरच त्याला अरण्याप्रमाणें ओसाड दिसूं लागलें होतें. व निर्जन प्रदेशच त्याच्या मनास पसंत वाटत होता ! सारनाथाच्या टेकडीजवळ येऊन पोहोंचतांच त्याचे तोंडून खालील उद्गार निघाले— " कालाची गति किती विचित्र आहे ! ती कोणालाही आकलन करतां येणार नाहीं ! "

अशा निर्भय व निर्धास्त रीतीनें या भयानक प्रदेशांत प्रमोदकुमार एकटाच जात असतां त्याच्या पुढें थोड्या अंतरावर त्यास प्रकाश दिसला. त्याबरो-बर तो किंचित् दचकला. परंतु पुनः धीर धरून तो त्या प्रकाशाकडे जाऊं लागला. प्रकाशाजवळ जातो तों एका समाधीवर एक दिवा जळत आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. इतक्यांत एक मनुष्य समाधीच्या आंतून बाहेर येतांना त्यास दिसला. दुसऱ्या एखाद्या वेळेस असा प्रकार घडला असता तर प्रमोद कुमार बेशुद्ध होऊन खालीं जमीनीवरच पडला असता, परंतु आज त्याच्या अंगीं इतकें धैर्य आलें होतें कीं साक्षात् यमाशीं जरी मुलाखत झाली असती तरी तो यत्किंचित्हि डगमगला नसता ! त्यानें मोठ्या धीटपणानें जाऊन समाधींतून बाहेर आलेल्या मनुष्याचा हात धरला. व त्यास म्हटलें " का बाबू विपिनविहारी ! आज या समाधींत इतक्या रात्रीं वकिली करण्याकरितां गेला होता कीं काय ? "

आकाशांतून आपल्या अंगावर एकाएकीं वज्र कोसळून पडल्याप्रमाणें विपिनविहारी घाबरून गेला. त्याच्या डोळ्यापुढें एकदम अंधेरी आली. विपिनविहारी हा बनारस येथील एक प्रसिद्ध वकील होता. त्याची व प्रमोदकुमाराची चांगली जानपछान होती. इतक्या रात्रीं सारनाथाच्या टेकडीवर आपल्याला कोणी ओळखीचा मनुष्य भेटेल अशी त्याला कल्पनाही नव्हती. प्रमोदकुमारास पाहतांच आपण घाबरून गेलों ही गोष्ट छपविण्याचा प्रयत्न करून त्यानें प्रमोदकुमाराचा हात धरून ह्मटलें—" बाबू प्रमोदकुमार, एक मोठी थोरली इस्टेट सरकारखातीं अनामत जमा आहे वगैरे मजकूर आपल्याला माहीत आहेच. या इस्टेटीचा हक्कदार कोण आहे याचा तपास लावण्यासाठीं मी येथें आलों होतों. आतां रात्र फार झाली. या गोष्टीबद्दल आपण आणखी एखादे वेळीं बोलूं. उद्यां सकाळीं ११ वाजतां आपण माझी अवश्य गाठ घ्यावी. मी आपल्याला एक चांगली बातमी सांगेन. आजकाल आपली खर्चाची तंगाईच आहे असें मला माहीत आहे. या करितां येवढे पैसे आपण घ्या. तूर्त आपलें येवढ्यावर भागेल. उद्यां आपण माझ्याकडे आलांत तर मी तुह्मांस आणखीहीं पैसे देईन.

असें ह्मणून विपिनविहारीनें प्रमोदकुमाराच्या हातावर दहा मोहरा ठेवल्या व तो पुनः ह्मणाला " आपल्याला बनारसला यावयाचें आहे ? माझ्या बरोबर येत असाल तर माझी गाडी येथून अर्ध्या मैलावर माझ्या बागेंत उभी आहे. " प्रमोदकुमार यास कांहींही उत्तर न देतां विपिनविहारीच्या मागोमाग चालूं लागला. दोघेही गाडींत बसून शहरांत येऊन दाखल झाले. वाटेंत दोघांचें कांहींही भाषण झालें नाहीं. गाडींतून उतरून दोघेही आपापल्या घरीं चालते झाले.

प्रमोदकुमाराच्या मनाची आज कांहीं विलक्षण स्थिति होऊन गेली होती. विपिनविहारीचें व त्याचें जें भाषण झालें त्यामुळें त्यास झोंपही येईना. रात्र संपून दोन प्रहरचे ११ केव्हां वाजतात असें त्यास होऊन गेलें होतें. " आजपासून २९ वर्षांचे आंत माझ्या वंशांतला कोणीही मनुष्य हक्क सांगण्यास येईल त्यास सरकारांत ही अनामत ठेवलेली जिनगी द्यावी. इतक्या अवधींत माझ्या वंशाचा लोप होईल व जिनगीवर हक्क सांगण्यास कोणीही येणार नाहीं तर माझ्या जातबं-

धूंच्या कल्याणाच्या अशा कोणत्याही सार्वजनिक गोष्टीकडे या पैशाचा व्यय व्हावा ' अशा शर्तीवर कोणी गृहस्थानें सरकारांत कांहीं अनामत पैसे ठेवले होते ही गोष्ट प्रमोदकुमारास माहीत होती. परंतु, त्य माणसाचा वारस कोण होता हें मात्र माहीत नव्हतें.

' जो कोणी या इस्टेटीचा खरा वारस असेल त्यानें २५ वर्षांच्या मुदतींत आपला इस्टेटीवरील हक्क शाबीत करावा. ज्याचा हक्क पुराव्यानें शाबीत ठरेल त्यास ही जिनगी दिली जाईल. ही जिनगी ज्या गृहस्थानें सरकारांत ठेविली आहे त्यानें एका ताम्रपत्रावर आपलें नांव वगैरे संक्षिप्त हकीकत लिहिलेली आहे. या ताम्रपत्राची नक्कल सरकारी दप्तरीं दाखल करण्यांत आली आहे. हें ताम्रपत्र हाच या प्रकरणीं मुख्य पुरावा होय. हा पुरावा वरील मुदतींत जर कोणाकडून हजर करण्यांत येणार नाहीं तर सरकारांत अनामत जमा असलेल्या या रकमेचा विनियोग रक्कम अनामत ठेवणाऱ्या गृहस्थाच्या इच्छेनुसार सार्वजनिक कामाकडे केला जाईल ' असें या रकमेसंबंधानें पुस्तपास्त करणारास सरकारांतून उत्तर मिळे.

विपिनविहारींच्या तोंडचे शब्द ऐकून ' आपणच या इस्टेटीचे अधिकारी आहों ' असें प्रमोदकुमाराचें मन त्यास सांगूं लागलें होतें. यामुळेंच रात्र उजाडल्यापासून तो एकसारखा घड्याळाकडे टक लावून बसला होता. ११ चा ठोका पडतांच तो तडक विपिनविहारीच्या घराकडे गेला. विपिनविहारीनें त्याचें मोठ्या आदरानें स्वागत केलें. " सरकारांत अनामत असलेल्या रकमेसंबंधाचा मजकूर आपणास माहीत असेलच " असा विपिनविहारीनें त्यास प्रश्न विचारला. त्यानें त्याचें होय म्हणून उत्तर दिलें. विपिनविहारी म्हणाला " यासंबंधानें थोडासा मजकूर मला तुम्हांस सांगितला पाहिजे. या रकमेचा कोण वारस असावा यासंबंधानें आज कित्येक वर्षें मीं तपास चालविला आहे. आपणच या रकमेचे हक्कदार आहां असा मला आजच शोध लागला. "

हें ऐकून प्रमोदकुमाराच्या मनांत आनंदाच्या लहरी उठूं लागल्या. विपिनविहारीच्या गळ्याला मिठी मारावी असेंही त्याच्या मनांत आलें ! त्यानें मोठ्या आतुरतेनें विपिनविहारीस विचारलें " ज्या योगानें या इस्टेटीस आपण मला हक्कदार समजतां असा आपल्याजवळ कोणता पुरावा आहे ?

विपिनविहारीनें उत्तर केलें "यासंबंधांत आजच मला कांहीं निश्चित सांगतां येणार नाहीं. कारण सर्व बाजूंनीं नीट व्यवस्था लागल्याशिवाय कोणत्याही कामाचा वाच्यांश करणें माझ्या स्वभावास खपत नाहीं. परंतु, आज मी आपल्याला इतकेंच सांगतों कीं या इस्टेटीचे हक्कदार आपण असून पुढें मागें ही दौलत आपल्यालाच मिळणार आहे.

कंगाल दशेस पोहोंचलेल्या प्रमोदकुमारास ही सुवार्ता ऐकून केवढा आनंद झाला असेल याची वाचकहो, तुम्हीच कल्पना करा. तो या आनंदाच्या भरांत उठून नाचूंसुद्धां लागला असता ! परंतु, त्यानें मोठ्या कष्टानें स्वतःस आवरून धरलें. तो विपिनविहारीस म्हणाला—" बाबू, जर आपल्या कृपेनें मला ही इस्टेट मिळाली तर आपले उपकार मी जन्मभर विसरणार नाहीं. " यावर कांहीं एक उत्तर न देतां विपिनविहारी आपल्या कारकुनास म्हणाले—- " एक हजार रुपयांची हुंडी तयार करा. " याप्रमाणें कारकुनानें हुंडी लिहून विपिनविहारीच्या हातांत दिली. ती प्रमोदकुमारास देऊन विपिनविहारी म्हणाले " आजकाल पैशाचे बाबतींत आपली जरा तंगाई दिसते. मला आपली सर्व हकीकत माहीत आहे. आपल्याला रुपयांची जरूर आहे. याकरितां आज मी ही आपल्याला हजार रुपयाची हुंडी देतों. जेव्हां सरकारांतून आपल्याला ही रक्कम मिळेल तेव्हां मी आपले पैसे वळते करून घेईन. आपल्याला इस्टेट मिळवून दिल्याबद्दल मला कमिशन मात्र दिलें पाहिजे ! " विपिनविहारीचें सर्व बोलणें मान्य करून प्रमोदकुमारानें ती हुंडी घेतली व तेथून सरळ बँकेचा रस्ता धरला.

प्रकरण ४ थें.

शरीरसंबंध व वकिलीस उतरती कळा.

विपिनविहारीचीं गाठ पडल्यापासून प्रमोदकुमारास पैशाची कधींही कमतरता पडली नाहीं. प्रमोदकुमार मागेल तितके रुपये विपिनविहारी देत असे. कधीं कधीं अधिकही देत असे. दिवसेंदिवस

त्यांचा परिचय वृद्धिंगत होऊन प्रमोदकुमाराचें विपिनविहारीच्या येथें विशेष जाणें येणें होऊं लागलें. विपिनविहारी त्याचें कोठेंही कमी पडूं देत नसे. रोजरोज येण्यानें विपिनविहारीच्या घरांतील बायका-मुलांशींही प्रमोदकुमाराचा निकट परिचय झाला. घरांत त्याला कोठेंही आडकाठी नव्हती.

विपिनविहारीस एक सुमारें १४।१५ वर्षांची मुलगी होती. तिचें नांव कालिंदी होतें. रोजच्या परिचयानें प्रमोदकुमार व कालिंदी यांमध्यें प्रेमभाव उत्पन्न झाला. ही गोष्ट विपिनविहारी व त्याची पत्नी श्यामा या दोघांच्याही लक्ष्यांत आली. तरी त्यांनीं त्यांच्या वृद्धिंगत होत चाललेल्या प्रेमास प्रतिबंध करण्याचा कधींही प्रयत्न केला नाहीं. उलट त्यांकडून प्रेमवृद्धीस प्रोत्साहन मिळत होतें. प्रमोदकुमार व कालिंदी हीं एकमेकांच्या संगतींत दिवसांतून तासचे तास घालवीत असत. परस्परांस परस्परांशिवाय एक क्षणभरही गमेना. श्यामा तर प्रमोदकुमारास आपला जावई समजूं लागली होती. विपिनविहारीसही ही गोष्ट इष्टच होती. 'प्रमोदकुमाराशीं शरीरसंबंध झाल्यास आपल्या हातीं एक मोठी रक्कम लागेल' असेंही त्याचें मनोराज्य सुरू झालें होतें.

प्रमोदकुमारास जवळ बोलावून एके दिवशीं विपिनविहारी ह्मणाला "माझें बोलणें ऐकून त्यास जर आपण रुकार द्याल तर आजपर्यंतच्या माझ्या श्रमांचें सार्थक झालें असें मी समजेन. इस्टेटीवर हक्क शाबीत करण्यास जितका पुरावा पाहिजे तितका सर्व मला मिळाला आहे. सरकारांत दरखास्त देण्याचा अवकाश आहे कीं इस्टेट आपल्याला मिळालीच ह्मणून समजा. पण आपण हें विसरूं नका कीं मी या कामीं आज दहा वर्षें सारखी खटपट करीत आहें. मी आपल्या मेहनतीबद्दल सर्व इस्टेटीचा चवथा हिस्सा घेईन. जर आपल्याला ही शर्त कबूल असेल तर या कागदावर सही करा."

विपिनविहारीचें हें आपमतलबीपणाचें बोलणें प्रमोदकुमाराच्या लक्ष्यांत आलें नाहीं असें नाहीं. परंतु त्यानें विचार केला कीं ह्याला कांहीं दिल्या-शिवाय माझ्या हातीं एक कवडीही लागणार नाहीं. याचें ह्मणणें कबूल करण्याशिवाय गत्यंतरच नाहीं. कालिन्दीशिवाय ह्याला दुसरें मूल नाहीं. कालिन्दीचा व माझा विवाह झाला ह्मणजे पुढें मागें ह्याच्या दौलतीचा मी एकटाच मालक होणार! असा विचार करून प्रमोदकुमारानें कागदावर सही केली व त्यांच्या मधील ठराव पक्का

झाला. ही सर्व व्यवस्था ठीक झाल्यानंतर विपिनविहारीनें सरकारांत दरखास्त दिली. व प्रमुख प्रमुख वर्तमानपत्रांतूनही ही बातमी प्रसिद्ध केली. " सरकारांत अनामत जमा असलेल्या रकमेवर राय विनोदकुमार यांचे चिरंजीव राय प्रमोदकुमार यांनीं आपला हक्क सांगून मजबूत पुराव्यानिशीं दरखास्त दिली आहे. आतां ही इस्टेट सरकारांतून मशारनिल्हे राय प्रमोदकुमार यांना मिळण्याविषयीं बिलकुल संशय उरला नाहीं. यांच्या हातीं इस्टेट आल्यावर हे " राजा प्रमोदकुमार राय होणार ! " अशा आशयाचा मजकूर वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाला.

आपल्यासंबंधानें वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेला हा मजकूर वाचून प्रमोदकुमारास जो आनंद झाला तो सांगून पुरवणार नाहीं. पैसा हातीं आल्यावर काय काय करावयाचें हें ठरविण्यासही त्यानें आतांपासून सुरुवात केली. थोड्याच दिवसांत प्रमोदकुमाराचें कालिंदीशीं मोठ्या थाटानें लग्न झालें. कालिंदीचा गृहप्रवेशही झाला. प्रमोदकुमाराच्या घरीं कोणीही माणूस नव्हतें. त्याचे आईबाप यापूर्वीच परलोकवासी झाले होते. यामुळें अलीकडे त्याचे घरांत त्याची मानकुमारी नांवांची मावशी रहात असे. हीच कालिंदीस सासूच्या जागीं होती. विपिनविहारीची कन्या व प्रमोदकुमार यांच्या विवाहाची खबरही वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाली. ज्यांचें प्रमोदकुमारानें पूर्वी कधीं नांवही ऐकलें नव्हतें असे लोक प्रमोदकुमाराशीं कोरकोरून नातीं काढून त्याचे घरीं येऊन राहूं लागले.

कालिन्दी व प्रमोदकुमार यांचें परस्परांवर विलक्षण प्रकारचें प्रेम होतें, एक क्षणाचाही वियोग एकमेकांस सहन होत नसे. याप्रमाणें दोन वर्षें गेलीं. कालिन्दीस एक कन्या झाली. ती आतां ११ महिन्यांची झाली होती. तिचें नांव लीलावती असून तीच या कादंबरीची नायिका होय. सरकारांत कोणतेंही काम घाईनें होत नसतें. त्यांतून ही इस्टेट २९ लाखांची होती. येवढी थोरली रक्कम पुरती चवकशी केल्याशिवाय कोणास देण्याचें सरकार कसें ठरवणार ? आज दोन वर्षें ही रक्कम मिळण्याविषयीं विपिनविहारीची खटपट चालूं होती. परंतु अद्यापपर्यंत प्रमोदकुमराच्या हातीं एक पैही लागली नव्हती. तरी पण त्याला पैशाची मुळींच कमतरता नव्हती. त्याला जेव्हां खर्चास पैसे लागत तेव्हां ते त्याला त्याच्या सासऱ्यापासून बिनबोभाट

मिळत. सारांश, पैसे मिळाले काय किंवा न मिळाले काय, प्रमोदकुमाराच्या स्थितींत कोणत्याही प्रकारचा फरक नव्हता. त्याची अमीरउमरावाप्रमाणें चैन चालू होती. परंतु चमत्कार हा कीं विपिनविहाराशीं परिचय झाल्या-पासून व विशेषेंकरून कालिन्दीशीं विवाह झाल्यापासून प्रमोदकुमाराचे पूर्वीचे सर्व चाळे पार निवून गेले. हल्लीं त्याचें वर्तन फारच प्रशंसनीय व सुशील गृहस्थास साजेलसें होतें. तरी त्याचें हें सुख संपण्याचा काळ अगदीं समीप आला होता. हें सर्व औटघटकेचें राज्य विलयाच्या मार्गास लागलें होतें. अद्यापपर्यंत प्रमोदकुमार मात्र निश्चिस्त होता.

एके दिवशीं प्रमोदकुमार विपिनविहारीच्या येथें त्यास भेटण्यास गेला होता. त्या वेळेस रात्रीचे नऊ वाजले होते. प्रमोदकुमार दाराशीं जाऊन पोहोंचतो तों दोन माणसांत बाचाबाच चालली आहे असें त्याच्या कानीं पडलें. तो तेथेंच उभा राहून ऐकूं लागला तों विपिनविहारी व त्याचे मदतनीस जवाहीर-लाल यांमध्यें कज्जा सुरू आहे असें त्यास समजलें. हें त्यांचें भांडण अनामत रकमेसंबंधानेंच होतें. हें समजतांच प्रमोदकुमाराच्या डोक्यांत सुंद झालें. व तो जागच्या जागीं तटस्थ उभा राहिला.

जवाहीरलाल:—मला पक्कें माहीत आहे कीं तुमच्यासारख्या नीच लोकांचा कामापुरता राम हाच न्याय असतो. हें पहा, विपिनविहारी, उगीच बाचाबाच करण्यांत काय अर्थ आहे ? अनामत रकमेवर माझे शेंकडा दहा कमिशन आपण कबूल केलें आहे. त्याचा हिशोब करून तितक्या रकमेबद्दल मला दस्तऐवज लिहून द्या ह्मणजे झालें. प्रमोदकु-मारापासून तुह्मी आपल्या चौथाईबद्दल जर कागद करून घेतला आहे तर माझ्या पैशाबद्दल मला कागद करून देण्यास तुह्माला कां हरकत वाटावी ? करार करायच्या वेळीं कांहीं वाटत नाहीं. परंतु काम झाल्यावर करारप्रमाणें वागण्यास जीवावर येतें ! तुह्मी पक्कें लक्ष्यांत ठेवा कीं मी एकदां तुमच्याशीं बिघडलों ह्मणजे तुह्मांस दे माय धरणी ठाय असें होऊन जाईल. सारनाथाच्या टेंकडीवरील कबरेसंबंधानें सर्व मजकूर आतां मी न्यायाधीशांना जाऊन सांगतों. आपलीं कृष्ण कारस्थानें त्यांना समजलीं ह्मणजे तुह्मी दोघेही सासरेजावई काळ्या पाण्याची हवा खाण्यास जाल हाचें तुह्मांस स्मरण नाहीं वाटतें ?

विपिन०—(शांतपणानें) जवाहीरलाल ! आज तुह्माला इतकें एकेरीवर

यावयास काय झालें ! मीं कराराप्रमाणें वागणार नाहीं असें कधीं तुह्माला ह्मटलें आहे काय ? मग तुह्मी असा हा तंटा कां करतां ! असें घाबरूं नकां. सगळी रक्कम तर आपल्या ताब्यांत येऊं द्यां. मग तुह्मास जी रक्कम कबूल केली आहे ती ताबडतोब देण्यांत येईल.

जवाहीरलाल— वः खूप सोय काढली ! असल्या थापावर फसणारा मी कांहीं कोणी पोरसोर नाहीं हें पक्कें लक्ष्यांत ठेवा. आज शंभर रुपये तुह्माला मागितले ते देण्याचेंही तुमच्या जीवावर आलें मग सर्व रक्कम तुह्मी मला काय देणार हें दिसतेंच आहे. पोटच्या पोरीचे पैसे उडविण्यास ज्याला शरम वाटत नाहीं तो परक्या माणसाची काय पर्वा बाळगणार ? असो. माझें येवढेंच ह्मणणें आहे कीं तुह्मीं गुण्यागोविंदानें माझ्या कमिशनबद्दल मला दस्तऐवज लिहून द्यावा.

विपिन०:— बरें, सध्यां ही शंभर रुपयांची नोट तर घ्या; असें संतापूं नका.

जवाहीरलाल— चोख करारमदार झाल्याशिवाय आतां मी एक कवडीही घेणार नाहीं. कागद जर तुह्मी करून देणार नाहीं तर उद्यांच्या उद्यां मी न्यायाधीशाकडे जाऊन तुमचें सर्व कारस्थान फोडतों. ही विपिनविहारीची सर्व लबाडी व फसवाफसवी आहे असें मी त्यांना स्पष्ट सांगतों.

असें बोलून जवाहीरलाल मोठया रागानें घरांतून निघून गेला.त्याला थांबवून धरण्याविषयीं विपिनविहारीनें हरप्रयत्न केले. परंतु, तो कांहीं केल्या थांबेना. जवाहीरलाल निघून गेला असें पाहून विपिनविहारी एकदम बेशुद्ध होऊन तेथेंच धाडकन् जमिनीवर पडला ! हा सर्व प्रकार पाहून प्रमोदकुमारानें तडक आपल्या घरचा रस्ता सुधारला. त्याचें डोकेंही भानावर नव्हतें. घरीं पोहोंचल्यानंतर कित्येक वेळपर्यंत तोही बेशुद्ध असल्यासारखाच होता.

प्रमोदकुमार घरीं पोहोंचला त्यावेळेस मध्यान्हींची वेळ होती. त्याच्या मनोराज्याचा सर्व ग्रंथ आटपल्यासारखाच झाला होता. संपत्ति हातीं येण्याची त्याला बिलकुल आशा उरली नाहीं. यापुढें या गांवांत रहाणें मूर्खपणाचें व दुष्कीर्तीचें आहे असा विचार करून तो अकस्मात् घर सोडून चालता झाला. उजाडल्यानंतर सर्वजण प्रमोदकुमाराचा शोध करूं लागले. विपिनविहारीनें सर्व बनारस शहर धुंडाळून पाहिलें

परंतु प्रमोदकुमाराचा कोठेंही पत्ता लागला नाहीं. तेव्हा त्यानें कलकत्ता, दिल्ली, लखनौ, मुंबई वगैरे शहरीं प्रमोदकुमाराच्या शोधाकरितां माणसें पाठविलीं. प्रमोदकुमाराचा जो कोणी पत्ता लावून देईल त्यास ५००० रुपये इनाम दिलें जाईल अशी त्यानें प्रमुख वृत्तपत्रांतून जाहिरातही दिली.

ज्या रात्रीं बिपिनविहारी व जवाहीरलाल यांचा झगडा झाला त्याच रात्रीं प्रमोदकुमार आपल्या येथें आला होता ही बातमी विपिनविहारीस आपल्या नोकराकडून समजली. तेव्हां त्यास खास असें वाटलें कीं, जवाहीरलालनें न्यायाधीशास सर्व मजकूर कळविण्याची दहशत घातली त्यामुळेंच प्रमोदकुमार घाबरून येथून नाहींसा झाला असावा. शिवाय प्रमोदकुमाराच्या घरीं एक मोहरबंद केलेला लखोटा विपिनविहारीचे हातीं लागला. त्या लखोट्यांतील मजकूर वाचून तर विपिनविहारी फारच घाबरून गेला. त्यानें प्रमोदकुमाराचा तपास जो इतक्या आस्थेनें व काळजीनें चालविला होता त्याचें कारण हेंच होय. तपास सुरू केल्यास आज दोन महिने झाले परंतु, अद्यापपर्यंत प्रमोदकुमाराचा यत्किंचितही मागमूस समजला नाहीं.

कलिन्दीचें प्रमोदकुमारावर अगदीं जीव कीं प्राण प्रेम होतें. आपल्याला कांहींही विचारल्यासवरल्याशिवाय प्रमोदकुमार निघून गेला हें पाहून तिच्या मनाला फारच दुःख झालें. व तीन महिन्यांतच तिनें परलोकचा रस्ता धरला! प्रमोदकुमाराच्या हातचें पत्र विपिनविहारीस सांपडलें होतें ह्मणून जें वर सांगितलें तें पत्र तिलाही वाचावयास मिळालें होतें. तें पत्र पाहून तिच्या मनाला भयंकर धक्का बसला. व बिचारीचें त्यांतच देहावसान झालें! तिच्या मागें तिच्या मुलीचें संगोपन व पालनपोषण करण्याचा बोजा तिची मावशी मानकुमारी इच्यावर पडला.

मानकुमारीची एक दीडवर्षाची कलावती नांवाची मुलगी होती. या मुली बरोबरच कालिन्दीची मुलगी लीलावती इचें पालनपोषण झालें. कालिन्दीची आई श्यामा इला जावई नाहींसा झाल्यामुळें आधींच पराकाष्ठेचें दुःख झालें होतें. त्यांत मुलीच्या मरणाच्या दुःखाची भर पडल्यामुळें मुलीच्या मरणानंतर अवघ्या तीनच दिवसांत बिचारीनें हाय हाय करून प्राण सोडला! असा सगळीकडून अनर्थ कोसळल्यामुळें विपिनविहारीनें आपली सर्व दौलत लीलावतीच्या नांवानें करून ठेवली. प्रमोदकुमाराची अवशिष्ट राहिलेली

स्थावर मिळकतही विपिनविहारीनें चोख कागदपत्राची वगैरे तजवीज करून लीलावतीचे नांवानें व्यवस्थापत्र करून टाकलें. ह्या दोन्ही इस्टेटी पंचांचे हवालीं करून लीलावती वयात आल्यावर त्या तिच्या तिला मिळाव्यात अशी-ही विपिनविहारीनें योग्य व्यवस्था केली. ही सर्व व्यवस्था झाल्यावर विपिनविहारीनें एके दिवशीं स्वतःस गोळी घालून घेऊन वैतागानें आत्म-हत्या केली ! याप्रमाणें पहातां पहातां दोन कुलीन घरांचा समूळ उच्छेद झाला !

मरण्यापूर्वीं विपिनविहारीनें एक मोहरबंद केलेली पेटी मानकुमारीच्या ताब्यांत देऊन तिला सांगितलें कीं " लीलावती वयांत येईल त्या वेळेस ही पेटी तिच्या स्वाधीन कर. ' ' लीलावती, तूं सोळा वर्षांची झालीस म्हणजे ही पेटी उघड व या पेटींत काय आहे तें पाहून नंतर आपल्या विवाहाचा बेत ठरीव. ' असा मजकूर त्या पेटीवर लिहिला होता. विपिनविहारीच्या मरणानंतर जवाहीरलालाच्या मनास थोडा पश्चात्ताप झाला परंतु तो फार वेळ टिकला नाहीं. जवाहीरलाल हा चांगला कसलेला पाजी होता. हाच हलकट मनुष्य या सर्व अनर्थांच्या मूळाशीं कसा होता हें वाचकांना पुढें समजेल.

हा विपिनविहारीच्या जागीं वकिली करूं लागला व उत्तरोत्तर वकी-लीच्या धंद्यांत त्याची चांगली भरभराट होऊं लागली. अनामत असलेल्या रकमेसंबंधाचा मजकूर न्यायाधीशास कळवून विपिन-विहारीस पेचांत आणण्याची त्यानें जी धमकी घातली ती तशीच मनांतल्या मनांत राहून केवळ बोलाचालीवरून दोन कुलीन घराण्यांचा मात्र नाहक नायनाट झाला ! अनामत रकमेचें घोंगडें पुनः पूर्वींप्रमाणेंच भिजत पडलें.

प्रकरण ५ वें.

मोठ्या शर्तीनें बचाव झाला !

गेल्या प्रकरणांत सांगितलेली अनर्थांची मालिका घडून आल्यास आज पंधरा वर्षें होऊन गेलीं. लीलावती व कलावती या दोघी आतां नेणत्या

मुली राहिल्या नाहींत. त्यांचा तारुण्यावस्थेंत प्रवेश होत चालला होता. लीलावती पंधरा वर्षांची व कलावती १७ वर्षांची झाली होती. त्यांचा रागरंग व स्वरूप एकमेकींवर ताण करण्यासारखें होतें. परंतु दोघींचें सौंदर्य वेगवेगळ्या प्रकारचें होतें. कलावतीचें वजन, पाहणारावर एकदम पडे. लीलावतीचें वजन पडण्यास जरी अवधि लागे तरी तें एकदां पडलें ह्मणजे कायमचें असे. लीलावती आपल्या घराची मालकीण होती व कलावती वास्तविक पहातां तिची आश्रित होती. परंतु, लीलावती कलावतीस इतक्या प्रेमानें व ममतेनें वागवी कीं, कलावतीच मुख्य व लीलावती दुय्यम आहे असें वाटे. लीलावती तिला आपल्या थोरल्या बहिणीप्रमाणें वागवीत असे. यामुळें दोघींचेंही एकमेकींवर पराकाष्ठेचें प्रेम असे. त्यांतल्या त्यांत लीलावतीचें प्रेम निर्मळ व निष्कपट असे. उलटपक्षीं कृत्रिमपणा हा कलावतीचा स्वभावच होऊन बसला होता. त्या दोघीं मुलींकडे पाहून शेजाऱ्यापाजाऱ्यांस मोठें कौतुक वाटत असे. एकाच सुंदर फुलाच्या दोन पाकळ्यांप्रमाणें त्या मुली एकमेकींशीं प्रेमानें संलग्न झालेल्या दिसत. त्यांचे देह दिसण्यांत मात्र दोन होते. परंतु, मनानें त्या दोघी एकच होत्या; असें जरी सकृद्दर्शनीं वाटे तरी दोघींच्या स्वभावांत जमीनअस्मानाचें अंतर होतें.

कलावतीचा स्वभाव चंचल असून तिला नटणेंमुरडणें फार आवडत असे. तिला भपकेदार कपड्यांचा व डागदागिन्यांचा फार शोक असे. चेष्टामस्करी करून किंवा नाटकें, कादंबऱ्या इत्यादि मनोरंजनाचीं पुस्तकें वाचण्यांत ती आपला काळ घालवीत असे. शृंगारांचीं पुस्तकें तर तिला अगदीं जीवकीप्राण असत. शेजाऱ्यापाजाऱ्यांची उठाठेव करण्यांत तिला मौज वाटत असे. गाणें-बजावणें हें तिच्या स्वभावास आवडत असे. परंतु, लीलावतीचा स्वभाव याहून अगदीं वेगळा होता. नटण्यामुरडण्याचा किंवा आपल्या रूपाचा गर्व मिरविण्याचा तिला अगदीं कंटाळा असे. मूर्ख बायकांचे संगतींत बसणें तिला कधींही आवडत नसे. नाटकें किंवा कादंबऱ्या यांना ती कधीं शिवतही नसे. ती धर्मपर किंवा नीतिपर पुस्तकें वाचीत असे. इतकेंही असून कलावतीच्या चैनींत ती कधींही व्यत्यय आणीत नसे. कलावती कधीं कधीं हिच्या साधेभोळेपणाबद्दल हिचा उपहासही करीत असे. परंतु तो ती निमुट-

पणें ऐकून घेत असे. हिची विनयी चालचलणूक पाहून लोक हिला लज्जेची लता ह्मणत असत.

कलावतीची आई मानकुमारी ही परलोकवासी झाल्यास आज दोन वर्षें झालीं. घरांत आतां कोणी वडील माणूस राहिलें नाहीं. दोन्ही मुली आपल्या मनाच्या मुखत्यार झाल्या. लीलावतीस वडील माणसाच्या धाकाची कांहीं आवश्य-कताच नव्हती. कलावतीची वागणूक जरी अल्लडपणाची होती तरी अद्या-पपर्यंत तिची नीतिमत्ता निष्कलंक होती. वरुणानदीच्या काठीं लीलावतीचा एक सुंदर बाग होता. या दोघी बहिणी कधीं कधीं आठचार दिवस बागेंत रहावयास जात असत.

बरसातीस नुकताच प्रारंभ झाला होता. सायंकाळ होण्यास एक घट-केची अवधि होती. दोघी बहिणी बागेच्या बाहेरील सडकेच्याकडेस वनश्री अवलोकन करीत उभ्या होत्या. इतक्यांत एक भरज्वानींत असलेला पुरुष आपला घोडा भरधाव फेकीत नेमका त्याच स्थानावरून जात होता. त्याचा घोडा या दोघी बहिणींना तुडवून जाण्याच्या बेतांत होता इतक्यांत त्याच वाटेनें जात असलेल्या दुसऱ्या एका तरुण गृहस्थानें अकस्मात् येऊन घोड्याचा लगाम धरून घोडा जागच्या जागीं उभा केला ! या तरुण गृहस्थानें मोठी शिताफी व धाडस करून घोडा थबकविला नसता तर या दोन्ही युवतींचा आज कपाळमोक्षच झाला असता !

अशा रीतीनें तरुण गृहस्थानें घोड्यास रोखून धरतांच घोड्यावर स्वार असलेल्या गृहस्थानें खालीं उडी टाकली. इतक्यांत त्याचा नोकर तेथें आला. त्यानें नोकराच्या स्वाधीन घोडा करून त्यास तो घरीं घेऊन जाण्यास हुकूम दिला. इतकें होत आहे तों या दोघी बहिणी बागेंत जाऊं लागल्या. परंतु घोड्यावरून खालीं उतरलेल्या गृहस्थानें त्यांना मध्येंच गांठून त्यांची क्षमा मागितली. तो त्यांना ह्मणाला— ‘ आपल्याला कांहीं दुखापत तर झाली नाहींना ? ’ यास कांहींच उत्तर न करतां लीलावती दुसऱ्या तरुण गृह-स्थाकडे एकसारखी पाहूं लागली. परंतु, कलावतीनें धिटाईनें पुढें होऊन उत्तर केलें. “ नाहीं आह्मांला कांहीं दुखापत झाली नाहीं. मात्र आमचा मोठ्या मिनतवारीनें बचाव झाला. या गृहस्थांनीं आज आह्मांस जीवदान दिलें. आह्मी त्यांचे अत्यंत ऋणी आहोंत. आमचे हातून त्यांचे कधींहि

उपकार फिटणार नाहींत. लीलावतीनेंही त्या गृहस्थाचे आभार मानले. " या गृहस्थाचे तुमच्यावर फार उपकार झाले " असें घोड्याच्या धन्यानेंही उद्गार काढले. यावर तो गृहस्थ नम्रपणानें ह्मणाला–' आपण याबद्दल ईश्वरास धन्यवाद द्या. माणसाच्या हातून कांहीं होत नाहीं. मी याच वेळीं येथें आलों ही ईश्वराचीच कृपा नव्हे काय ? ' या गृहस्थास उद्देशून कलावती ह्मणाली ' आपलें नाव काय ? आपण धंदा काय करीत असतां ? ' यावर त्या गृहस्थानें उत्तर केलें ' माझें नांव ललित किशोर. मी येथें न्यायाधीशांच्या कचेरींत शिरस्तेदार आहें. '

ही हकीकत ऐकुन लीलावतीस मोठा आनंद झाला. परंतु तो तिनें बाहेर कोणास दिसूं दिला नाहीं. घोड्याच्या मालकाकडे वळून कलावतीनें विचारलें ' आपलें नाव काय ? आपण कोठें असतां ? ' त्या गृहस्थानें मोठ्या ऐटींत उत्तर दिलें ' मी राजा विजय कृष्ण यांचा मुलगा. माझें नांव नामदार बाळकृष्ण. आपलीं नांवें काय ? ' कलावतीनें दोघांचीं नांवें सांगितलीं. व आपलें जन्मवृत्तही थोडक्यांत सांगितलें. " आपण अलीकडे बागेंतच रहातां ? " असें त्या गृहस्थानें विचारलें. कलावतीनें " होय " ह्मणून सांगितलें. बाळकृष्ण ह्मणाला " आपली पुनः भेट होईल काय ? " लीलावतीनें संकेत करून कलावतीस या प्रश्नाचें उत्तर देण्यास प्रतिबंध केला. परंतु असल्या संकेतास ती काय जुमानते ? तिनें झटदिशीं उत्तर केलें " उद्यां दोनप्रहरीं आपण या. " हें ऐकून बाळकृष्ण त्या दोघींकडे विलक्षण नजरेनें पाहूं लागला. हा प्रकार पाहून लीलावतीस फारच आश्चर्य वाटलें. उद्यां यांची भेट घेण्याविषयीं आपणही विचारावें असें ललित किशोरच्याही मनांत आलें; परंतु त्याचें धाडस होईना ! शेवटीं तो घरीं जावयास निघत असतां " आपणही उद्यां दुपारीं याल का ? " असा त्यास लीलावतीनें नम्रपणानें प्रश्न केला. " आपल्यासारख्यांची भेट होणें हा मी एक मोठा अनुग्रहच समजतों. मी मोठ्या खुषीनें आपल्या इच्छेप्रमाणें करीन " लीलावती व ललितकिशोर यांच्या एकमेकांकडे पाहण्यावरून त्या दोघांतही एकमेकांबद्दल प्रेमभाव उत्पन्न झाला होता असें स्पष्ट दिसत होतें. असो. ते दोघेही जण चालूं लागल्यावर त्या दोघी बहिणी बागेंत शिरल्या.

कलावती व बाळकृष्ण यांच्या लगटीच्या वर्तनावरून त्यांचा परिचय

पूर्वीचाच होता असें कोणास वाटण्याचा संभव आहे. परंतु तशी कांहीं गोष्ट नसून तो त्या दोघांच्याही स्वभावांतील दोष होय. बाळकृष्ण व कलावती यांच्यामध्यें नेत्रसंकेत किंवा बोलणें चालणें काय झालें याकडे लीलावती किंवा ललित किशोर यांपैकीं कोणाचेंच लक्ष्य नव्हतें.

प्रकरण सहावें.

दोघांचें जीवनवृत्त.

ललित किशोरला आईशिवाय दुसरें कोणीही मायेचें माणूस नव्हतें. आपल्या बापासंबंधानें त्याला बिलकुल माहिती नव्हती. लीलावतीच्या घराच्या पिछाडीसच ललितकिशोराचें घर होतें. ललितकिशोराची प्राप्ति जरी बरी होती तरी त्याचें वर्तन साधें असून प्रतिष्ठित होतें. त्याच्या चांगुलपणाबद्दल गांवांत त्याचा मोठा लौकिक असे. घरांतील कामकाज करण्याकरितां त्याच्या येथें एक मोलकरीण व एक नोकर अशीं दोन माणसें असत. तरी पण आपलें काम स्वतःच करण्यास त्यास कमीपणा वाटत नसे. नोकरचाकर असल्यावर एक काडीही इकडची तिकडे करणें मोठें पाप आहे असें समजणारांपैकीं तो नव्हता. त्याच्या आईचाही असाच स्वभाव होता. तीं दोघेंही नोकरचाकरांना चांगल्या रीतीनें वागवीत असत. यामुळें नोकरचाकरांचेंही स्वाभाविकपणेंच त्यांच्यावर चांगलें प्रेम असे.

आपल्या मुलाचा विवाह होऊन घरांत सून यावी अशी ललित किशोराच्या आईची फार इच्छा असे; परंतु चार पैसे जमून स्थिरस्थावर होईतोंपर्यंत लग्नाची घाई करूं नये अशी तो आपल्या आईची समजूत करीत असे. आज न कळत आपल्या आयुष्यक्रमांत एकाएकीं केवढा फरक झाला याची त्याला अद्यापपर्यंत कल्पना नव्हती. लीलावती व कलावती यांच्या संबधानें आजचा सर्व वृत्तान्त ललित किशोरनें आपल्या आईजवळ सांगितला. बाळकृष्णाच्या उद्दाम वर्तनासंबंधानेंही सर्व हकीकत त्यानें आपल्या आईला सांगितली. त्यावर त्याची आई त्याला ह्मणाली— " बेटा ललित किशोर, बाळकृष्ण हा थोरामोठ्याचा मुलगा आहे. तो फार

उरमट व नीच आहे. तूं संभाळून ऐस. त्याच्याशीं जितका कमी संबंध येईल तितका चांगला."

ललित—आई, तूं सांगतेस तसेंच मी त्याच्याशीं वर्तन ठेवीन. पण मला हें सांग कीं राजा विजयकृष्णाचाही असाच स्वभाव आहे काय? लोक तर त्यांची फार भलाई गातात.

आई—(दीर्घ निश्वास टाकून)—बाळा, त्यांच्यासंबंधानें मला कांहीं माहीत नाहीं; परंतु, बाळकृष्णास मात्र मी पूर्णपणें जाणतें. त्याच्या वाटेस तूं कधीं-ही जाऊं नको.

ललित—आई, तुला विजयकृष्णाचा स्वभाव कदाचित् चांगला माहीत नसेल; परंतु, मोठी आश्चर्याची गोष्ट ही कीं कोणी न सांगतां न सवरतां त्यांनींच मला नोकरी लावून दिली. आजपर्यंत मी त्यांच्यापुढेंही कधीं गेलों नाहीं. त्यांची भेट होण्याकरितां मी आजपर्यंत अनेक वेळां प्रयत्न केला; परंतु, ते भेटीचा प्रसंग कां टाळतात हें मला समजत नाहीं.

आई—बरें, आतां फार उशीर झाला. आतां जेवायला ऊठ.

ललित—आई, काय ग आपल्या पिछाडीस लीलावती राहते. इतक्याजवळ ती आहे तरी तिला काल्च मीं पाहिलें. पूर्वी कधींही पाहिलें नाहीं. कला-वतीस मात्र झोकांत जातां येताना पाहिलें आहे व मोठमोठ्यानें बोलतांना अनेक वेळां ऐकलें आहे. आतांशा त्या दोघी वरुणा नदीच्या काठीं असले-ल्या बागेंत रहावयास गेल्या आहेत. त्यांनीं उद्यां मला व बाळकृष्णास बागेंत येण्याविषयीं आमंत्रण दिलें आहे. आई, मी जाऊं का ग?

आई—(जरा विचार करून) हो. खुशाल जा. जाण्यास कांहीं हरकत नाहीं. लीलावती फार सुशील मुलगी आहे. तिचें रूप जसें सुंदर आहे तसा तिचा स्वभावही कुलीन आहे. कलावती मात्र जरा उलु आहे. उद्यां तूं जा. जायला काय हरकत आहे? परंतु, ध्यानांत ठेव. तेथें बाळकृष्णही येणार आहे. त्याच्याशीं अधिक प्रसंग कधींही करूं नकोस.

लीलावतीच्या घरीं जाण्यास आईची परवानगी मिळाली यामुळें ललित-किशोरच्या मनास अतिशय आनंद झाला. लीलावतीची भेट केव्हां होते असें त्यास होऊन गेलें होतें, कसें बसें जेवण आवरून तो सकाळ उजाडण्याची वाट पहात पलंगावर पडला.

प्रकरण सातवें.

ही ब्याद येथून जाते कशी एकदांची ?

दुसरे दिवशीं दोनप्रहरीं ठरल्याप्रमाणें बाळकृष्ण व ललितकिशोर हे दोघेही लीलावतींचे घरीं आले. त्या दोन्ही पाहुण्यांचा दोन्ही बहिणींनीं चांगला आदरसत्कार केला. घरांत दोघीजणीच. आज आपल्या घरीं परके पुरुष पाहुणे येणार अशा वेळीं आपण जर दुसरें कोणी वडील माणूस बोलावलें नाहीं तर तें वाईट दिसेल असा विचार करून लीलावतीनें आपल्या नात्यागोत्यांतल्या चार प्रौढ स्त्रिया मुद्दाम बोलावल्या होत्या. लीलावतीचा स्वभाव फार नम्र व संकोची होता. पुरुषांशींच काय पण स्त्रियांशींही अघळपघळ बोलणें तिला आवडत नसे. आज तिच्या घरीं हे दोन पाहुणे आले होते. वास्तविक पाहतां घराची मालकीण या नात्यानें तिनेंच पुढें पुढें करावयास पाहिजे होतें. परंतु, तें तिच्या कुलीन स्वभावास सर्वस्वीं अप्रिय होतें.

लाज, लज्जा, विनय, भीड, मर्यादा यांचा कलावतीस मात्र गंधही नव्हता. एखादा भला गृहस्थ तिची धिटाई पाहून तिच्यापुढें जाण्यासही कचरेल ! हा तिचा दुर्गुण सर्वांना माहीत होता; परंतु लीलावतीचें तिच्यावर प्रेम असल्यामुळें तिला त्या दुर्गुणाबद्दल बोलण्यास कोणसही धजवत नव्हतें. या दिवशीं तर तिच्या धीटपणाची कमाल झाली. लीलावतीस तर ती एक अक्षरही बोलूं देईना. तिच्या चंचल व दांडग्या स्वभावाचें तिला पुढें कसें प्रायश्चित्त भोगावें लागलें हें वाचकांना समजून येईलच.

बाळकृष्ण व ललितकिशोर हे जणू काय आपले कोणी नातलगच आहेत अशा रीतीनें त्या दोन्ही बहिणींनीं त्यांचा आदरसत्कार केला. कलावतीनें ललितकिशोरास हजारों प्रश्न विचारले. त्याला त्यांचीं उत्तरें देतां देतां पुरेवाट झाली. ही आपल्याशीं कमी बोलेल तर बरें असेंही त्यास वाटूं लागलें. बाळकृष्णाची मात्र तशी स्थिति झाली.नाहीं. जणु काय हा कोणी घरांतलाच माणूस होता अशा मोकळेपणानें तो कलावतीशीं एकसारखा बोलत होता. लीलावती मात्र बसल्या जागेवरून उठलीही नाहीं व विशेष

बोललीही नाहीं. लीलावतीशीं बोलतांना बाळकृष्ण असे कांहीं विलक्षण चाळे करूं लागला कीं त्या योगानें लीलावतीस त्याचा अगदीं वीट येऊन गेला. ही ब्याद आपल्या घरांतून जाते कशी असें तिला होऊन गेलें. ललितकिशोर व इतर आलेल्या बायका आपापल्या घरीं जाऊन बाळकृष्णाशीं आपणास मन मोकळें करून बोलतां येईल तर बरें असें कलावतीस वाटूं लागलें !

बाळकृष्णाच्या थापा ऐकून व त्याचें वैभव पाहून कलावतीचे डोळे दिपून गेले होत. ती अगदीं बेफाम होऊन गेली होती. बाळकृष्णाशीं ती एकसारखी मोठमोठ्यानें बोलत होती; तें पाहून परक्या स्त्रियाही थक्क होऊन गेल्या. कुलीन स्त्रियांच्या इभ्रतीस लाज आणणारें असेंच त्यांचें संभाषण चाललें होतें. असें न करण्याविषयीं लीलावतीनें तिला अनेक वेळ खुणावून सांगितलें. परंतु त्याकडे तिनें बिलकूल लक्ष्य दिलें नाहीं. दीड तास होऊन गेला तरी बाळकृष्ण व कलावती यांचें बोलणें ह्मणून संपेना ! जसजसा अधिक वेळ होऊं लागला तसतसा त्यांच्या बोलण्यास अधिकच बहर येऊं लागला ! अखेर लीलावतीच्यानें स्वस्थ बसवेना. तिनें कलावतीचा हात धरून तिला सांगितलें " आतां उशीर झाला आहे. या भल्या गृहस्थांनाही काम असेल; त्यांना आतां घरीं जाऊं दे. "

बाळकृष्ण व कलावती यांच्या बोलण्याचा लीलावतीप्रमाणें ललितकिशोरासही तिटकारा येऊन गेला होता. हा पाजी माणूस घरांतन बाहेर कसा जातो असें त्यास होऊन गेलें होतें. ह्मणूनच लीलावतीचें वरील बोलणें ऐकतांच तो एकदम उठून उभा राहिला. त्याबरोबर बालकृष्णही उठला. व दोघेही जावयास निघाले. जातेवेळेस बाळकृष्णानें लीलावतीस विचारलें " आतां किती दिवसांनीं भेट होणार ? "

यावर लीलावती " नाहीं " येवढेंच ह्मणाली व कलावतीचा हात धरून तिनें दरवाज्याच्या आंत पाऊल ठेवलें. तोंडांत बसल्यासारखा चेहरा करून बाळकृष्णानेंही आपल्या घराचा रस्ता धरला. आपल्या गाडींतून येण्याविषयीं त्यानें ललितकिशोरास विनंति केली. परंतु त्यानें ती मान्य केली नाहीं. तो पायींच आपल्या घराकडे चालता झाला.

———

प्रकरण आठवें.

दोघीही त्रासून आपापल्या खोलींत गेल्या !

कलावती—एखादें माणूस आपल्या घरीं आलें ह्मणजे त्याच्याशीं असें तुसडेपणानें वागावें काय ? माणसें घरांत होतीं तोंपर्यंत उठायची अशी गर्दी करून दिली होती कीं, कांहीं बोलून सोय नाहीं.

लीलावती—(रागावून) हें पहा ताई; उगीच बोलण्यांत काय तात्पर्य आहे ? अशा माणसास मला ह्मणावयाचें मग हलकट कोण राहिला ? मला तर असें वाटलें कीं, धक्के मारून बाहेर घालवून द्यावें. आतां पुनः तर त्याला माझ्या घरांत पाऊल घालूं देकीं तसेंच करीन.

कलावती—अहो, इतकी तूं कोणावर रागावली आहेस ?

लीलावती—अग, एवढं नाहींका ओळखत ? त्या मेल्या बाळकृष्णावर.

कलावती—(आश्चर्यानें) त्यानें असें तुझें केलें तरी काय ?

लीलावती—(लाल होऊन) त्यानें काय नाहीं केलें ! हें पहा ताई, आजपर्यंत तुला कोणत्याही बाबतींत मी बोललें नाहीं. परंतु आतां मात्र तुला हात जोडून येवढी विनंति करतें कीं, त्या चांडाळाचें नांवही कधीं तोंडावाटें काढूं नकोस. आपल्याघरीं येण्याबद्दल प्रथम जेव्हां त्यानें विचारलें तेव्हांच मीं तुला खुणावलें. परंतु तूं त्याकडे बिलकुल लक्ष्य न देतां व विचार न करतां त्याला आपल्या घरीं येण्याबद्दल निमंत्रण दिलेंस. असो. झालें तें झालें. पण पुनः मात्र असें कधीं करूं नकोस. असल्या गैर चालीच्या मनुष्यास मी आपल्या येथें पुनः कधीं येऊं देणार नाहीं.

कलावती—(फारच रागानें) मला काय जरूर पडली कोणाला येथें बोलावून आणण्याची ! माझा कोण तो आहे ? चांगला असो किंवा वाईट असो. पण कायग, ललितकिशोर मात्र चांगला आहेना ?

असें बोलत बोलत कलावती मोठ्या झणकाऱ्यानें आपल्या खोलीकडे निघून गेली. हा प्रकार पाहून लीलावतीच्या मनास फारच दुःख झालें. ती आपल्याशींच ह्मणाली " ललितकिशोरच्या खेटराची तरी सर आहे कां ? " ती आपल्या पलंगावर पांघरूण घेऊन पडली. तिच्या डोळ्यांतून एकसारखा

अश्रुप्रवाह चालला होता. इकडे कलावतीचीही तीच स्थिति चालली होती. तिनें मनांतल्या मनांत लीलावतीस हजार शिव्या मोजल्या ! या दोघी बहिणींना बाळकृष्णाचा पायगुण भोंवला. कलावती लीलावतीवर जरी इतकी रागावली होती तरी लिलावतीचें मन अगदीं शुद्ध होतें. लीलावती सारख्या शुद्ध मनाच्या स्त्रीशीं हेवा केल्यामुळें कलावतीवर पुढें केवढा अनर्थ ओढवला हें पुढें समजेलच.

लीलावती व कलावती यांच्यामध्यें जो कलह झाला त्याची घरांतल्या नोकरचाकरांस किंवा शेजारणीपाजारणीस बिलकुल खबर नव्हती. कलावती व लीलावतीशिवाय फक्त दोघांनांच या गोष्टीची माहिती होती. त्यांपैकीं एक कलावतीच्या प्रेमांतली दासी कलूटी होय. या कलूटीच्या नादानेंच कलावतीवर पुढें अनर्थकारक प्रसंग ओढवले.

प्रकरण नववें.

मंडळी जाततोंपर्यंत मी वरच बसलें होतें.

थोडक्या वेळानें अंथरुणावरून उठून लीलावती कलावतीच्या कोठडीकडे गेली. परंतु, तिच्या खोलीच्या दारास आंतून कडी होती. अशा वेळीं तिला हाका मारणें बरें नव्हे असा विचार करून ती आपल्या खोलींत परत गेली. तिच्या घरीं आज ज्या बायका बोलावल्या होत्या त्या सर्वजणी खालीं बागेंत बाळकृष्ण व कलावती यासंबंधानें बोलत खालीं उभ्या होत्या. त्या लीलावतीस निरोप विचारूं लागल्या. निरोप देतांना लीलावतीनें आपल्या मनांतले विचार त्यांना बिलकुल कळूं दिले नाहींत. तिनें गाडी जोडण्यास हुकुम दिला. गाडी तयार होतांच तींत बसून सर्व बायका घरोघर निघून गेल्या, अगदीं निघण्याच्या वेळेस लीलावतीनें सर्व बायकांशीं अशा तऱ्हेनें संभाषण केलें कीं त्यांत गर्क होऊन त्यांना कलावती आपल्याला पोहोंचविण्यास आली नाहीं या गोष्टीचें स्मरणही राहिलें नाहीं !

बायका गेल्यानंतर लीलावती पुनः कलावतीच्या खोलीशीं गेली. परंतु पहिल्याप्रमाणेंच खोलीस आंतून कडी होती. तिनें दरवाज्याशीं कान लावून

पाहिलें तों कलावतीशीं आंत कोणी बोलत आहे असें तिला समजलें. आंतील बोलणें इतकें हळूं चाललें होतें कीं लीलावतीस दाराबाहेरून त्याचा कांहींच बोध होईना. अखेर लीलावती आपल्या खोलींत जाऊन अंथरुणावर पडली. तिला पडून फार वेळ झाला नाहीं तोंच तिच्या पांघरुणास हिसका बसला. ज्या मुलीनें तिचें पांघरूण ओढलें ती तिला ह्मणाली— " लीले, आज काय अगदीं दिवसभर गर्दी होतीना ?. अग पण हें काय ? तुझे डोळे रडल्यासारखे लाल काय झालेत ? "

अंथरुणावर उठून बसून लीलावतीनें तिच्या गळ्यास मिठी मारून उत्तर केलें " सखे लाडली, आज सबंद महिन्यानें तुझें दर्शन होत आहे ! असो तुझी मर्जी. पण आज तूं या वेळेस अचानक इकडे कशी आलीस ? "

लाडली—मला समजलें कीं, आज तुझ्या येथें कांहीं बडीं माणसें यावयाचीं आहेत. आपणही ह्मटलें आगांतुकी करावी. पण येथें आलें आणि पहातें तों कोण गर्दी चालली होती ! मग ह्मटलं आपण कशाला पुढें जा. आपली गरीबाची काय डाळ शिजते ? असा विचार करून मंडळी आपापल्या घरोघर जात तोंपर्यंत मी वरच बसलें होतें.

लीलावती—तरी ह्मटलं स्वारी अशी लपत कां आली ? कायग पण हें आज असें सोंग तूं काय घेतलें आहेस ? हें लुगडें काय ? वेणीही नीट घातलेली नाहीं.

लाडली—हें पहा हें भांडणाचें सोंग आहे. आतां येथें जें सवतीचें भांडण झालें तस भांडण मला पुनः करावयाचें आहे.

लीलावती—अग पण तूं आज अशी उद्विग्न कां दिसतेस ?.

लाडली—अग उद्विग्न कसली आलें आहे. पण तुला येवढें मात्र निक्षून सांगतें कीं नीट हुशारीनें वाग.

लीलावती—ह्मणजे याचा अर्थ तरी काय ? इश्श मला नाहीं बाई असलें पडद्याचें बोलणें समजत. उघड सांगायला ग काय झालें ?

लाडली—हें पहा आपण दोघी खालच्या खोलींत जाऊन बसूं ह्मणजे तेथें आपल्याला निवस्त बोलायला सांपडेल.

यानंतर दोघीही खालीं गेल्या. खोलीचें दार बंद केल्यानंतर त्यांचें खालीं लिहिल्याप्रमाणें संभाषण झालें.

लाडली—बाळकृष्ण आणि कलावती यांचें भाषण अगदीं रंगांत आलें होतें त्यावेळेस मी येथें आलें. त्या बदमाषाच्या पुढें जाणें मला उचित् न वाटल्यामुळें मी तशीच गपचीप माडीवर आलें व झरोक्यांतून सर्व तमाशा पहात येथेंच बसून राहिलें. माडीवर जातांना फक्त मला बत-सियानें पाहिलें होतें. परंतु मी आल्याची बातमी कोणास सांगं नकोस ह्मणून त्यास बजावून मी माडीवर दार लावून बसलें. सर्व मंडळी घरांतून जात तोंपर्यंत मी त्याच जागीं अगदीं मुकाट्यानें बसलें होतें. मंडळी निघून गेल्यानंतर तुझें व कलावतीचें जें भाषण झालें तेंही मी भिंतीआड उभें राहून ऐकलें. बाळकृष्ण आज येथें येणार हें मला मुळींच माहींत नव्हतें. नाहीं तर मी ग कशाला येथें झक मारायला आलें असतें?

लीलावती—आपली लबाडी आतां माझ्या सर्व ध्यानांत आली. काय ग पण बाळकृष्णाला तूं इतकी काय ह्मणून भितेस? त्याच्यापुढें तूं आली असतीस तर त्यानें तुझें काय केलें असतें?

लाडली—बरें विचारलेंस, सांगतें ऐक. तो मोठा नीच माणूस आहे. दोन महिन्यांपूर्वी तो माझ्या आईकडे येऊन तो किती तरी वेळ खलबत करीत बसे. एके दिवशीं प्रसंग साधून खोलीबाहेर उभें राहून मीं त्यांचें बोलणें ऐकलें. माझी आई माझा विवाह त्याच्याबरोबर लावणार हें त्या बोल-ण्यावरून मला समजलें. तुझ्यावर व कलावतीवर बाळकृष्णाची खोटी नजर आहे हेंही मला त्याच प्रसंगीं समजलें. ही बातमी समजल्यापासून माझ्या मनाची स्थिति अगदीं चमत्कारिक होऊन गेली. तुझ्याकडे येऊन तुला मी ही बातमी कधीं सांगेन असें मला झालें होतें. या करितांच आज मी तुझ्याकडे इतक्या तांतडीनें आलें. आणि तीही एका तासाच्या मुदतीनेंच आलें आहे. असो. तुला सांगायचें येवढेंच कीं तूं जपून रहा. माझें जर ऐकशील तर तूं आतां शहरांत रहावयास जावें हेंच मला चांगलें वाटतें. अशा वेळीं बागेंत रहाणें सुरक्षित नाहीं.

लीलावती—तुझें बोलणें अगदीं बरोबर आहे. बाळकृष्णास प्रथम जेव्हां पाहिलें तेव्हांपासूनच मी त्याला पक्की ओळखून आहें. तो लुच्चा आणि ...ी माणूस आहे यांत शंकाच नाहीं. परंतु आज तुझें बोलणें ऐकून व ...तीची हालचाल पाहून माझ्या मनांत भलभलत्याच शंका येत ...ली.

आहेत. मला आतां असेंही वाटूं लागलें आहे कीं, बाळकृष्णाचा आणि कलावतीचा आधींचाच परिचय असावा.

लाडली—यांत कांहीं संशय आहे काय ? त्यांच्या गुप्त भेटीही झाल्या आहेत व या सर्व कारस्थानाच्या मुळाशीं आमच्या मातुश्री व कलावतीची दासी कलूटी या आहेत !

लीलावती—(आश्चर्यानें) काय म्हणतेस ! त्यांचे गुप्त बेतही झाले ! आणि मला त्यांचा कानास कोनहीं समजूं दिला नाहीं !

लाडली— यासंबंधांत आणखीही तुला किती तरी गमती सांगावयाच्या आहेत. पण आतां वेळ नाहीं. आतां मध्यान्हरात्रीं बोलूं. न जाणो, दाराशीं कोणी कान देऊन ऐकतही असेल ! जर कां कोणी तिसऱ्यानें आपलें बोलणें चोरून ऐकलें असलें तर मात्र मोठी फजीती आहे. लीलावती व लाडली यांचें रात्रीचे आठ वाजेपर्यंत बोलणें झालें. यावेळेस कलावती ही लीलावतीच्या खोलीच्या दाराशीं येऊन बसली होती. परंतु तिनें लाडलीला पाहिल्याबरोबर ती आपल्या खोलींत निघून गेली. ती जाते असें पाहून लाडली तिला म्हणाली “ अशी तोंड कां लपवतेस ? जरा इकडे तर येशील ! ” परंतु या बोलण्याकडे मुळींच लक्ष्य न देतां कलावती आपल्या खोलींत गेली.

लाडली— काय दिमाख आला आहे पहा !

लीलावती— राहूं देग. नाहीं येत तर न येऊं दे. तुझें तरी काय इतकें अडलें ! आईशीं एक तासाची बोली करून लाडली घराबाहेर पडली होती. परंतु चमत्कार हा कीं, लीलावतीही तिला जाऊं देईना व तिला स्वतःलाही जावेंसें वाटेना. लाडली ही कोण, कुठें रहात होती, तिचा लीलावतीशीं काय संबंध होता इत्यादि सर्व हकीकत वाचकांना लवकरच समजेल. येथें इतकेंच सांगतों कीं, त्या दोघींची बाळपणापासूनच पराकाष्ठेची मैत्री होती. लाडलीचें हल्लीं १३।१४ वर्षांचें वय होतें. रूपानें तिच्यासारखी सुंदर मुलगी हजारांतही सांपडणार नाहीं. ती चांगली सुशिक्षित असून सद्वर्तनीही होती. सावत्र आईशिवाय तिला या जगांत दुसरें कोणीही नात्याचें नव्हतें. तिचा बाप चांगला जहागीरदार होता. अद्याप तिच्या घरांत पुष्कळ दौलत होती. परंतु सावत्र आई असल्यामुळें तिला अशा कंगाल स्थितींत वागावें लागत असे.

———

प्रकरण दहावें.

इला पुनः कधीं उंबरा चढूं देऊं नका !

लाडली बाईवाईनें उठून गाडींत बसून घरीं गेली. तिला पोहोंचवून लीलावती परत येतांना तिची नज़र कलावतीच्या खोलीकडे गेली. ती तशींच कलावतीच्या खोलीकडे चालूं लागली तों कलावती अर्ध्या वाटेंतच तिला भेटली. कलावती ह्मणाली "लाडली गेली कां ?" लीलावतीनें उत्तर दिलें "हो, आतांच गेली. सबंद रात्र गेल्यानंतर आतां आपण शुद्धीवर आलां वाटतें ! ताई, जरा बसशील तर खरी. मला तुझ्याशीं कांहीं बोलायचें आहे." हें ऐकून कलावती खालीं बसली. चाकरास हाक मारून लीलावतीनें सांगितलें 'मीं हांक मारल्याशिवाय खोलींत कोणासही येऊं देऊं नको.'

लीलावती—ताई, कालपासून तूं माझ्यावर जी इतकी रागावलीस ती काय ह्मणून ? मीं तुझा असा काय अपराध केला आहे ? यदां कदाचित् केलाच असला तर मला त्याबद्दल माफी कर. कालच्या पूर्वीं तुझ्यांत व माझ्यांत अगदीं चुकून सुद्धां भांडण झालें नाहीं. पण काल मात्र अशी एक गोष्ट घडून आली कीं, तिच्यामुळें तूं माझ्यावर नाराज झालीस. तुला जसें वाटेल तसें तूं आपल्या मनांत समज. परंतु, मी मात्र तुला खरोखर सांगतें कीं, माझें मात्र तुझ्यावर अगदीं पहिल्याप्रमाणें प्रेम आहे. या साठींच माझे तुला ऐवढें सांगणें आहे कीं, आतां जें मी तुला सांगणार आहें तें नीट ऐकून घेऊन त्याबद्दल विचार कर. जें मी तुला सांगेन त्यामुळें तुझ्या मनांतला सर्व किंतु निघून जाईल.

कलावती—(मानेला हिसका देऊन) काय सांगतेस तरी काय, तूं मला !

लीलावती—येवढेंच सांगावयाचें कीं, आईबाप आपल्या मुलींचा लहानपणीं ज्याच्याशीं विवाह लावून देतात त्याबरोबर त्या आपलें आयुष्य बालवितात. पण तुझी माझी तशी गोष्ट नाहीं. आपण आतां प्रौढ झालों. आपण फार विचारानें व जपून वागलें पाहिजे. एखाद्यावर प्रेम ठेवण्यापूर्वीं पुढें आपल्याला पश्चात्ताप होईल किंवा आपल्यावर अनर्थ ओढवेल कीं काय याबद्दल नीट विचार केला पाहिजे. आपल्याला आतां बरें वाईट सर्व समजूं लागलें आहे. ज्याच्याशीं आपली जन्माची गांठ पडणार त्याचा स्वभाव कसा

आहे, त्याची चालरीत काय आहे वगैरे सर्व गोष्टींची आपण नीट पारख केली पाहिजे. कलावती ! तूं माझी थोरली बहिण आहेस. माझ्या हातून जर कांहीं चुकी झाली तर माझा कान धरून मला तूं ताळ्यावर आणिलें पाहिजेस. उलटपक्षीं मी तुझी धाकटी बहिण आहें. तुला उपदेश करण्याचा किंवा धाक दाखविण्याचा मला अधिकार नाहीं. तरी तूं गैरमार्गानें जातेस असें मला दिसलें तर मी तुझी विनवणी करून तुला सन्मार्ग दाखविला पाहिजे !

कलावती–(बराच वेळ थांबून) या सर्व व्याख्यानाचा मतलब काय आहे हें समजत नाहीं.

लीलावती—मतलब इतकाच कीं बाळकृष्णावर जर तुझें निःसीम प्रेम असेल तर मी त्याच्याशीं तुझा विवाह लावून देईन. माझी इच्छा येवढीच आहे कीं, तूं माझी वडील बहिण असल्यामुळें माझ्या आधीं तुझा विवाह झाला पाहिजे. ह्मणूनच तुझ्या मनांत काय असेल तें खरें सांग. अगदीं लपवून ठेवूं नकोस. विवाह होण्याचे पूर्वीं पुरुषाशीं लगटीनें वागणें हें कुलीन स्त्रियास शोभत नाहीं. अशानें लोक नांवें ठेवतात.

कलावती—मग ! मीं त्यांच्याशीं काय लगट केली ? मी तुझें अन्न खातें ह्मणूनच तूं मला जाबजबाब विचारतेस कीं नाहीं ? तुझ्यासारखी जर मी आपल्या मनाची मुकत्यारीण असतें तर माझा कोणीं असा धिक्कार केला असता काय ?

लीलावती—हाय हाय ! हें तुझें बोलणें ऐकून माझ्या काळजास अगदीं घरे पडले. माझ्या बोलण्याचा तूं फार चांगला परिणाम केलास ! हें पहा मी कांहीं वेडी नाहीं, मला सर्व समजतें हो ! बाळकृष्णाचें आणि तुझें रहस्य मला खडानुखडा समजलें आहे. आणि या सर्व कारस्थानाच्या मूळाशीं कलूटी व आणखीही एक स्त्री आहे हेंही पण मला समजलें आहे. इतकेंच नव्हे तर बाळकृष्ण हा किती पाजी माणूस आहे याबद्दलची मला इत्थंभूत हकीकत कळली आहे. मी आतांच्या आतां कलूटीस बाहेर घालवून देणार. तुला आपलें बरें वाईट सर्व समजतें आहे. तुझ्या इच्छेस येईल तशी तूं वाग. मला तुला अखेरचें येवढेंच सांगणें आहे कीं बाळकृष्णाशीं विवाह करणेंच तुला इष्ट वाटत असेल तर सहा महिनेपर्यंत त्याच्याशीं बिलकुल

परिचय न ठेवतां त्याची चालचलणूक कशी आहे तें नीट पहा आणि मग तुझी खात्री होईल त्याप्रमाणें खुशाल वाग.

कलावती–(एकदम उठून) लाडली येथें आलेली पाहिली तेव्हांच मला वाटलें कीं कांहीं तरी आख्यान होणार. माझें भविष्य अगदीं खरें ठरलें.

कलावतीचें हें बोलणें ऐकून लीलावतीस फारच दुःख झालें. " इचें कर्म कांहीं धड दिसत नाहीं " असेही तिनें उद्गार काढले !

लीलावतीनें कलूटीस एकदम घराच्या बाहेर काढून लावलें व आपल्या नोकरचाकरांना ताकीद देऊन ठेवली कीं या हरामखोरणीला पुनः उंबऱ्यांत पाऊल ठेवूं देऊं नका !

प्रकरण अकरावें.

अखेरपर्यंत वाचल्याशिवाय समजणार नाहीं.

दोन कुलीन घराण्यांवर भयंकर अनर्थ ओढवले याचें कारण दुसरें कोणी नसून पाजी जवाहीरलालच होता असें मागें आह्मी चवथ्या प्रकरणांत ह्मटलें आहे. विपिनविहारी व जवाहीरलाल यांच्या संबंधानें आह्मीं जी हकीकत लिहिली आहे त्यावरून या संसारांतील उन्नतिअवनतीच्या घडामोडीसंबंधानें कित्येक वाचकांच्या मनांत असा विचार येईल कीं जवाहीरलालसारख्या नीच मनुष्याची भरभराट होत चालली आणि बिचाऱ्या विपिनविहारीचा नायनाट झाला ! अर्थात् वकील व त्याचा मदतनीस यांचा जो येथें वृत्तान्त दिला आहे तो वस्तुस्थितीशीं सर्वांशीं असंगत आहे. कारण, मदतनीसाच्या पुढें वकीलाचें कांहीं चालूं नये, इतकें च नव्हे तर मदतनीसानें वकीलाची इतकी तारंबळ उडवून दिली कीं, अखेर गोळी घालून घेऊन त्यास आत्महत्या करावी लागली ! वकीलानें सरकारांत दरखास्त दिली होती; सर्व पुरावा गोळा केला होता. रकम मिळण्यास जी कांहीं तयारी होणें अवश्य होतें ती त्यानें सर्व सायसगीन करून ठेवली होती. मग त्याला जवाहीरलालाची येवढी भीति बाळगण्याचें काय कारण होतें ? जवाहीरलालाच्या असें काय हातांत होतें कीं, ज्याचा उपयोग झाला असतां विपिनविहारीचा समूळ नाश होईल ! बरें विपिनविहारीशीं जवाहीर-

लालानें निमकहरामी केली असें मानावें तर जवाहीरलालाचाच उत्कर्ष होत चालला ! या सर्व प्रकाराची संगति कशी लावावयाची याबद्दल कित्येक वाचकांना मोठें कोडें पडेल. परंतु त्याचें समाधान करण्याचें हें योग्य स्थळ नव्हे. कादंबरीच्या कथानकास जसजसें परिणत स्वरूप येत जाईल तसतसा या गोष्टीचा आपोआपच उलगडा होईल.

आज पंधरासोळा वर्षें जवाहीरलालाचा धंदा फारच उत्तम रीतीनें चालला होती. त्याची बायको मरून आज पांचसहा वर्षें होऊन गेलीं होती. आतां त्याला एक फक्त मुलगी होती. तीही विधवा होती. ती बहुधा आपल्या सासरींच रहात असे. आपली मुलाची हौस पुरवून घेण्याकरितां जवाहीरलालानें एक मुलगा दत्तक घेतला होता. तो या वेळेस वीसबावीस वर्षांचा होता. मुलगा असा पंचकल्याणी होता कीं जवाहीरलालाच्या इस्टेटी- पैकीं एक कवडीही शिलक राहूं देईल कीं नाहीं याची शंकाच होती !

जवाहीरलालाच्या विधवा मुलीचें नांव वसंती होतें. त्यांचे दत्तक पुत्र निकालचंद्र या नांवानें प्रसिद्ध असत. जवाहीरलालाच्या पापसंचयामुळें या दोघांचेंही जीवनचरित्र कसें विपरीत झालें हें वाचकांना पुढें समजून येईल.

प्रकरण बारावें.

तूं कोणावर हात टाकलास याची तुला शुद्धि आहे कां ?

दिवसाचे तीन वाजून गेलें होतें. लीलावतीचें चित्त उदास झालें होतें. बागेंतील इमारतीच्या पिछाडीस सज्जांत बसून ती दिक्प्रांताकडे शून्य दृष्टीनें पहात होती. तिच्या चेहऱ्यावरील भावना वरचेवर बदलत असत. कधीं गालावर हात टेकून ती विचार करीत असल्यासारखी दिसत होती. कधीं दीर्घ निश्वास टाकून आपल्या मनांतील दुःख व्यक्त करीत होती. इची आज अशी स्थिति होण्याचें कारण सकाळीं तिचें कलावतीशीं जें भाषण झालें त्या योगानें कलावती अगदीं फुगून गेली होती. आपलें तोंड आपल्या हातांनीं झांकून घेऊन ती अंथरुणावर स्वस्थ पडली होती. ती

कांहीं बोलेना, चालेना व जेवावयसही उठेना! तिची समजूत करण्यास लीलावतीनें हरतऱ्हा करून पाहिल्या परंतु त्या सर्व निष्फळ झाल्या. लीलावतीनेंही आज सबंद दिवसांत तोंडांत पाणीही घातलें नाहीं.

लीलावती वर सांगितल्याप्रमाणें बागेच्या पिछाडीस एकटीच बसली आततां तिच्यापुढें अकस्मात् बाळकृष्ण येऊन उभा राहिला. त्यास पाहतांच तिचें सर्वांग क्रोधानें थरथर कांपूं लागलें. रागानें लाल होऊन ती त्याला ह्मणाली " आपण येथें कोणाच्या हुकुमानें आलां! आपण आलां तसेंच चालते व्हां. यांतच शोभा आहे. "

बाळकृष्ण—(हसून व जरा जवळ जाऊन) या क्रोधानें आपल्या सौंदर्यांत अधिकच भर घातली! येवढें सौंदर्य देऊन आपल्या हृदयांत प्रेमाचें व प्रणयाचें बीजारोपण केलें नाहीं हा बिधात्याचा मूर्खपणाच समजला पाहिजे.

लीलावती—(झिडकारून) मी आपल्याला ऐवढेंच सांगतें कीं तुह्मी माझ्या समोरून चालते व्हा.

बाळकृष्ण—(तिच्या बोलण्याकडे लक्ष्य न देऊन) प्रिये, प्रेम हें दोन्ही बाजूंस एकाच वेळीं उत्पन्न झालें पाहिजे. शरीराच्या कोणत्याही भागावर जखम झाली तरी त्याच्या वेदना सर्व शरीरभर पसरतात अशीच प्रेमाची गोष्ट आहे, असें जें एका कवीनें ह्मटलें आहे त्यास हरताळ लावण्याचा तुझा विचार दिसतो! मी तुझ्या प्रेमानें विव्हळ होऊन गेलों आहें आणि तूं तर मला अशी झिडकारतेस!

लीलावती—(क्रोधानें) आपण इतके नीच व निर्लज्ज असाल अशी माझी कल्पनाही नव्हती. आपली शोभा करून घ्यावयाची नसली तर आपण येथून बऱ्या बोलानें निघून जावें हें चांगलें. तसें जर न होईल तर चाकराला बोलावून त्याकडून तुमची संभावना करविणें मला भाग पडेल.

बाळकृष्ण—(मोठ्या शेखीनें) या रागानें आमच्यावर अनुग्रहच केला.

हें ऐकून तर लीलावतीचा क्रोध अनावर झाला. ती मोठ्या त्वरेनें आपल्या खोलींत जावयास निघाली. इतक्यांत बाळकृष्णानें तिचा हात धरला व ती ओरडेल या भीतीनें तिचें तोंड गच्च आवळून धरलें. त्याच्या हातून सुटण्याकरितां लीलावतीनें बरीच झटपट केली. पण तो कांहीं केल्या तिला

सोडीना ! इतक्यांत एका गृहस्थानें तेथें बाळकृष्णास दाणादिशी जमीनीवर आपटून लीलावतीची मुक्तता केली.

गृहस्थ—(लीलावतीस उद्देशून) आपण भिऊं नये. मी येथें उभा आहें तोंपर्यंत आपल्याकडे वर डोळे करून पाहण्याचीही कोणाची छाती नाहीं.

हा गृहस्थ अगदीं ऐनवेळीं या ठिकाणीं प्राप्त झाला हें पाहून बाळकृष्ण व लीलावती या दोघांनाही पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें. हा महात्मा दुसरा कोणी नसून आपला परिचित ललितकिशोरच होय हें आमच्या चाणाक्ष वाचकांनीं ओळखलेंच असेल.

ललितकिशोरच्या हांतून आपली अशी अवहेलना झाली हें पाहून बाळकृष्ण मनांतल्या मनांत चूर होऊन गेला.

बाळकृष्ण—आज तूं कोणावर हात चालविलास याची तुला शुद्धि आहे कां ?

ललितकिशोर—हो, हो. नाहीं असें कसें होईल ? राजा विनयकृष्ण यांचे कुलकलंक चिरंजीव बाळकृष्ण याची आह्मीं आज कणीक मऊ केली ! एका कुलीन अबलेवर बलात्कार करणाऱ्या ज्या कुलांगार पशूस तिलमात्रही शंका वाटली नाहीं त्यास आह्मीं आज शासन केलें.

बाळकृष्ण—इतका माजलास अं ?

ललितकिशोर—अशा दबकावण्याला कोण भीक घालतो ? इतकेंच नव्हे, परंतु आपण यापुढें येथें जर एक क्षणभरही उभें रहाल तर आपली धडगत लागणार नाहीं.

बाळकृष्ण —तर मग काय होईल ?

ललितकिशोरनें आपल्या खिशांतला पिस्तुल काढून त्यास दाखविला व उत्तर केलें "हें पाहिलेंत कां ? आपला मृत्यु जवळ आल्यासारखा दिसतो. अद्यापही येथून आपलें तोंड काळें करीत नाहींस तेव्हां तुला आपल्या जीवाचा कंटाळा आला असें दिसतें !"

ललितकिशोरच्या हातांत पिस्तुल पाहतांच बाळकृष्णानें तेथून पोबारा केला !

बाळकृष्ण व ललितकिशोर यांची वर लिहिल्याप्रमाणें बाचाबाची चालू

असतां लीलावती मोठ्या सावधगिरीनें एका बाजूस उभी होती. ललितकिशोराच्या हातून आपल्याला संकटसमयीं सहाय्य मिळालें हें पाहून लीलावतीस जो आनंद झाला तो सांगतां पुरवत नाहीं. बाळकृष्ण गेल्यानंतर लीलावती व ललितकिशोर यांचा खालीं लिहिल्याप्रमाणें संवाद झाला.

लीलावती — महाशय, आपण दुष्कीर्तीपासून माझें रक्षण केलें, याबद्दल मी आपली कशी उतराई होऊं ? खरोखर आपले उपकार माझ्या हातून जन्मोजन्म फिटणार नाहींत.

ललितकिशोर–(विनोदानें) आपण कांहीं बुवा मारवाडी नाहीं. आपल्यासाठीं आह्मीं आपली तिजोरी मोकळी केली नाहीं; किंवा आपल्याला आह्मीं कर्जही दिलें नाहीं. आपण इतकें घाबरण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं.

लीलावती–(लाजेनें) आपण जर या वेळेस येथें आलां नसतां तर माझी काय दशा झाली असती ! ह्मणूनच मी—

ललितकिशोर—(तिचें बोलणें संपण्यापूर्वींच) आपण या सर्व प्रकरणाबद्दल जगदीशाचे आभार मानावे. त्याच्याच अगाध करणीमुळें मी या वेळीं अचानक येथें आलों. मी येथें आलों त्यालाही एक गुप्त कारण झालें.

लीलावती—तें समजलें तर मला फार आनंद होईल.

यावर ललितकिशोरनें ' ही घे. ' असें ह्मणून तिच्यापुढें एक चिट्ठी टाकिली. ती चिट्ठी ती मोठ्या आतुरतेनें वाचूं लागली.—

' ललितकिशोरः—

एका म्यानांत दोन तरवारी राहूं शकत नाहींत हें तूं जाणत आहेस. त्याप्रमाणेंच लीलावतीवर दोन पुरुष आसक्त असूं शकणार नाहींत. ' माझा व लीलावतीचा कांहीं संबंध नाहीं ' असें जर तूं मला सांगशील तर तुझ्या हातून एक मोठी अपूर्व कामगिरी होईल. तुला या जगांत कांहीं दिवस रहावयाचें असेल तर तूं या पोक्त सल्ल्याचा अवश्य विचार करशीलच. तुझ्या शक्तीची तुला घमेंड असेल तर तुझ्याशीं दोन हात करण्यासही माझी तयारी आहे. पाहिजे तर उद्यां सायंकाळीं वरुणानदीचे काठच्या वाळवंटावर तुझ्याशीं झुंजण्यास मी तयार आहें. या कुस्तींत जो हार जाईल त्यानें लीलावतीचें

नांव सोडावें ही मात्र कबुली पाहिजे. कबूल असेल तर सांगितल्या दिवशीं ठरल्या जागीं हजर रहा."

'तुझा कट्टा शत्रु.'

वरील आशयाची ती चिट्ठी वाचून लीलावतीस फार आश्चर्य वाटलें. तिचे डोळे अश्रूंनीं भरून गेले. पत्र वाचून इची अशी स्थिति कां झाली हें ललितकिशोराच्याही ध्यानांत येईना.

ललितकिशोर— मी यावेळीं येथें कसा आलों याबद्दलची हकीकत तुम्हाला या चिट्ठीवरून समजलीच. आतां लपत छपत कां आलों याबद्दलचा मजकूर सांगतों. मला ही चिट्ठी मिळतांच मी घराचा बंदोबस्त करून आपल्याला या नीच मनुष्यासंबंधानें वृत्तान्त सांगावा या हेतूनें ताबडतोब इकडे येण्यास निघालों. बागेंत हळूंच येऊन कोणास समजूं न देतां आपल्याशीं चार शब्द बोलून परत जावें. आपली गांठ नच पडली तर आपल्याला सांगावयाचा मजकूर चिट्ठींत लिहून ती चिट्ठी येथें कोणा तरी चाकराच्या हवालीं करून परत जावें असा माझा उद्देश होता; परंतु धन्य आहे ईश्वराची कीं मी येथें यावयास व हा प्रकार येथें चालण्यास एकच गांठ पडली. मला आपल्याला एकदोन गोष्टींसंबंधानें हकीकत विचारावयाची आहे. हरकत नसेल तर विचारतों.

लीलावती— (मानेनें खुणावून) खुशाल विचारावी.

ललिताकिशोर— असा कोणता भाग्यवान् पुरुष आहे कीं ज्याच्यावर आपलें प्रेम आहे.

लीलावती— कुलयुवतीस अशा प्रकारचा एकदम प्रश्न विचारणें फारच चमत्कारिक आहे.

ललितकिशोर— (खिन्न मुद्रेनें) माझी आपल्याला दुसरी विनंति इतकीच आहे कीं, या चिट्ठीचें अक्षर कोणाचें आहे येवढें आपण मला सांगावें. कारण, या चिट्ठीवर सही मुळींच नाहीं.

लीलावती— या चिट्ठीचें अक्षर माझ्या खरोखरच माहितीचें नाहीं व चिट्ठींत लिहिलेल्या मजकुराप्रमाणें कोणत्याही प्रकारें माझ्या मनाची स्थिति नाहीं.

हें ऐकून ललितकिशोर अगदीं चकित होऊन गेला. लीलावतीचा मनोगत भाव आपल्याला कसा समजेल हें त्याला मोठें कोडें पडलें. तो लीलावतीस

ह्मणाला ' बरें आहे; मी आतां जातों, तसदीची माफी असावी. पुनः आपली गांठ पडण्यास पंचाईत पडेल ह्मणून हा सर्व मजकूर एकदमच सर्व सांगून टाकला. '

तीं दोघेंही एकमेकांकडे निश्चल दृष्टीनें पाहूं लागलीं. आपल्याप्रमाणेंच लीलावतीच्या मनाचीहि व्याकुळ स्थिति झाली आहे असें पाहून ललितकिशोर ह्मणाला " माझ्या बोलण्यांत आपल्या मनाला लागण्यासारखें जर कांहीं आलें असेल तर त्याबद्दल क्षमा करावी. मी आतां आपली कायमची रजा घेतों " असें ह्मणून तो चालूं लागला.

लीलावतीनें डोळ्यांत आसवें आणून उत्तर केलें " परमेश्वर आपलें कल्याण करो. ! "

लीलावतीची ही अवस्था पाहून ललितकिशोराचें मन अंतर्यामीं अत्यंत प्रसन्न झालें. तो कांहींच उत्तर न करतां पुनः ' जातों ' ह्मणून निघन गेला. लीलावतीचें प्रेम कोणावर आहे याचा खुलासा व्हावा, याबद्दल त्याची जी खटपट होती ती अखेर जात्री तशी सिद्धीस गेलीच नाहीं. इच्या डोळ्यांत आसवें आलीं तीं केवळ उपकर्ती व उपकृत या संबंधामुळें आलीं. त्यांशीं प्रेमाचा कांहीं संबंध नाहीं असेंच त्यास अद्यापही वाटत होतें. हा सर्व घोटाळा त्या पत्रानें माजविला होता. ' एका म्यानांत दोन तरवारी ' पैकीं दुसरी तरवार कोणती ? हा प्रश्न अद्याप जशाचा तसाच राहिला.

आपलें भाषण तिसऱ्या कोणाहि माणसानें ऐकलें नाहीं असें लीलावती व ललितकिशोर यांस वाटत होतें. परंतु हा त्यांचा केवळ भ्रम होय. ललितकिशोर बागेचें दार ओढून घेऊन बाहेर पडला त्या वेळेस एक इसमही त्याचे मागोमाग बाहेर गेला. ललितकिशोरास हाक मारून त्याच्याशीं तो काय बोलला कोण जाणें. परंतु, त्यामुळें त्याचा चेहरा पूर्वीपेक्षां जरा उमदा दिसूं लागला. त्यानें आपल्या खिशांतून दोन मोहोरा काढून त्या दुसऱ्या इसमाच्या हातांत देतांना तो त्यास ह्मणाला— ' छेः, इतका उल्लू असेल अशी माझी तर कल्पनाही नव्हती ! असो. आतां प्रत्यक्ष यम आला तरी मी भिणार नाहीं. त्याच्या पाजीपणाबद्दल त्याचें पारिपत्य हें करणारच ! '

असें ह्मणून ललितकिशोर झपाझप पावलें टाकीत पुढें चालता झाला; व तो दुसरा इसम पुन: बागेंत परत गेला. त्यानें एकदा आपली दृष्टि आपल्या सभोंवार फेंकली व तो लीलावती ज्या दिवाणखान्यांत होती तिकडे गेला.

हा इसम कोण होता, याचें ललितकिशोरशीं गुप्त भाषण काय झालें, याला ललितकिशोरानें दोन मोहोरा इनाम काय ह्मणून दिल्या, हें आतां समजण्यास कांहीं मार्ग नाहीं. तें पुढें प्रसंगानुसार समजत जाईल.

प्रकरण १३ वें.

माझ्यावर विपत्तीचा डोंगर कोसळला !

लीलावती आपल्या खोलींत जाऊन पलंगावर स्वस्थ पडली होती. आज जे प्रकार घडून आले त्या योगानें तिचें मन इतकें व्यग्र होऊन गेलें होतें कीं तिला कलावतीचेंही स्मरण झालें नाहीं ! एक तर आज ती सर्व दिवसभर अगदीं उपाशी होती. दुसरें, बाळकृष्णानें तिच्यावर अनर्थकारक प्रसंग आणण्याचा प्रयत्न केला त्यामुळें तिचें मन अगदीं जर्जर होऊन गेलें होतें. आतां तिच्या मनांत ललितकिशोराविषयीं विचार चालू होता. याबेळेस तिला खाणें, पिणें किंवा दुसरें कांहींही सुचेना. वरचेवर ती दीर्घ श्वास सोडीत होती. तिचे डोळे वरचेवर पाण्यानें भरून येत. " हाय, हाय, आतां माझी काय अवस्था होणार ? " असे उद्गार वरचेवर तिच्या तोंडून निघत. तिची या अवस्थेंतून सुटका करण्याकरितां एक दुसरीच गोष्ट घडून आली नसती तर परिणाम काय झाला असता याची कल्पना करतां येणेंही कठिण आहे.

लीलावतीस आपल्या पलंगावर पडून एक घटका होते न होते तोंच तिची दासी बतसिया हातांत एक चिट्ठी घेऊन तिजकडे आली. ती लीलावतीस ह्मणाली ' एक लाल पगडीचा शिपाई आला होता तो बहुधा पोलिसांतला असावा असें वाटतें. त्या शिपायानें माझ्या हातांत ही चिट्ठी दिली. आणि पहातां पहातां तो निघून गेला. '

चिट्ठीवर लाडलीचें हस्ताक्षर पाहून लीलावती पलंगावर उठून बसली. बतसियास दिवा घेऊन येण्यास तिनें सांगितलें. दिवाणखान्यांत दिवा

आणतांच ती चिट्टी वाचूं लागली. ती चिट्टी वाचतांच 'हाय, माझी लाडली!' असें ह्मणून लीलावती धाडदिशीं पलंगावर पडली. आपल्या धनिणीची अशी दशा झालेली पाहून बतसियानें दुसऱ्या नोकरचाकरांना दिवाणखान्यांत बोलावलें. अंगावर गुलाबपाणी शिंपडून, पंख्यानें वारा घालून, डोळ्याला पाणी लावून तिला शुद्धीवर आणण्याचे त्या सर्वांनीं उपाय केले. ती शुद्धीवर आली तरी 'लाडली! लाडली!' असें ह्मणून ती एकसारखी रडत होती. अर्धा तास झाला तरी तिचें रडणें थांबेना! चिट्टींत असें लिहिलें आहे तरी काय? लाडली मरण पावली कीं काय? असे विचार नोकरांच्या मनांत येऊं लागले. लीलावती पूर्ण सावध झाली. बतसियाशिवाय बाकीच्या सर्व नोकरांना तिनें खालीं जाण्यास सांगितलें. दरवाजा बंद करून घेऊन ती बतसियाशीं बोलूं लागली.

लीलावतीचें बतसियावर फारच प्रेम असे. ती जरी यःकश्चित् कुळंबीण होती तरी तिला लिहितां वाचतां चांगलें येत असे. ती मोठी चतुर व चाणाक्ष होती. ह्मणूनच लीलावतीचें तिच्यावर पाहिल्यापासूनच अतिशय प्रेम बसलें. एखाद्या महत्त्वाच्या कामांत ती तिची सल्लामसलतही घेत असे. असें होतें तरी बतसिया आपल्या पायरीनें वागत असे. धनिणीचें आपल्यावर प्रेम ह्मणून इतर दासदासींशीं किंवा कोणाशींही ती कधीं उरमटपणानें वागली नाहीं. तिचें वय यावेळेस केवळ अठरा वर्षांचें होतें. तिचा नवरा मेला होता. परंतु तिची चालरीत इतकी उत्तम असे कीं कित्येक कुलीन ह्मणविणाऱ्या स्त्रियांनींही तिच्या वर्तनापासून कित्ता घ्यावा! कलावतीच्या येथें येऊन तिला तीन वर्षें झालीं, लीलावतीप्रमाणें कलावतीसही ती मालकिणीप्रमाणें समजत असे. असो. लीलावती व बतसिया यांच्यामध्यें आज घडून आलेल्या प्रकारासंबंधानें बराच वेळ संभाषण झालें.

लीलावती—आज माझ्यावर केवढीं संकटें आलीं याची तुला कल्पना तरी आहे कां?

बतसिया—कांहीं थोडें थोडें माहीत आहे; परंतु प्रथम माझें आपल्याला येवढें हात जोडून सांगणें आहे कीं आपण आधीं थोडेंसें कांहीं तरी खावें.

लीलावती—मला आतां मुळींच भूक नाहीं. हें पहा, मला खाण्यापिण्याचें स्मरणही नव्हतें. सर्व नोकरचाकरांचें जेवण झालें ना?

बतसिया–होय. केवळ कलावती, आपण व मी येवढ्यांनाच आतांपर्यंत निर्जळी घडली आहे.

लीलावती–कां बरें ? तूं कां कांहीं खाल्लें नाहींस ?

बतसिया–माझ्या पोटांत आज जरा स्वस्थ नाहीं.

लीलावती–अग, आमच्यासाठीं तूं कां आपलीं हाडें वाळवितेस ? हें पहा, तूं असें जर करशील तर तें नाहीं माझ्या कामास यावयाचें !

बतसिया—(लीलावतीचे पाय धरून) आपण आधीं उठावें. मी थोरल्या बाईसाहेबांनाही घेऊन येतें. आपण आधीं थोडेंसें कांहीं खाऊं आणि नंतर खुशाल बोलत बसूं.

लीलावती— मी उठतें; पण कलावतीस तूं आणशील कां ?

बतसिया— होय. तें काम माझ्याकडे लागलें. माझ्याजवळ एक तसाच कांहीं मंत्र आहे.

लीलावती—(साश्चर्य) काय ह्मणतेस ? मंत्र !

बतसियानें लीलावतीच्या कानांत कांहीं मंत्र सांगितला.

लीलावती— तूं फारच वस्ताद आहेस. तुझ्या अंगांत किती तरी कसबें भरलीं आहेत ! बरें, कायग ! तूं ही चिट्टी वाचलीस कां ?

बतसिया—आपली परवानगी झाल्याशिवाय मी कशी वाचणार !

लीलावती—बरें तर, ही घे आणि वाच. मीही ऐकतें.

" भगिनी,

माझ्यावर विपत्तींचा पहाड कोसळून पडला आहे. जी गोष्ट माझ्या कधीं स्वप्नांतही येणार नाहीं ती आज माझ्या पुढें दत्त ह्मणून उभी आहे. मी आज सकाळीं तुझ्याकडून घरीं परत आलें तेव्हां माझ्या दृष्टीस पडलें कीं माझ्या घराला कुलुप लागलें आहे. माझी आई कोठें बरें गेली असावी असा मी क्षणभर विचार करीत उभी राहिलें. इतक्यांत माझी ह्मातारी दाई घाबऱ्या घाबऱ्या मजकडे आली. मला तेथें पाहून ती तर अधिकच घाबरून गेली ! घाईघाईनें दाराचें कुलूप काढून ती घरांत शिरली व मागोमाग मलाही घरांत येण्याविषयीं खुणावलें. घरांत गेल्याबरोबर थोरल्या दारास आंतून कडी लावून घेऊन ती चौकांत जाऊन पोहोंचली. तिची अशी चलबिचल पाहून मीं तिला विचारलें ' आज तुला झालें आहे तरी काय ?

तूं इतकी घाबरलीस का? काय आहे तें मला लवकर सांग.' यावर विशेष कांहीं न बोलतां 'वर माडीवर जाऊन पहा' येवढेंच तिनें मला सांगितलें. मीही घाबऱ्या घाबऱ्या ताबडतोब माडीवर गेलें. माझी आई पांचव्या मजल्यावर निजत असे. ती तेथेंच आजही असेल अशा समजावर मी तिला खालून मोठमोठ्यानें हाका मारूं लागलें. हाका मारीत मारीत मी खुद्द तिच्या माडींत जाऊन पोहोंचलें. तेथील देखावा पाहून मी जागच्या जागींच गारठून गेलें! जरा धीर धरून नीट डोळे उघडून पहातें तों माझी आई मरून तेथें पलंगाच्याखालीं पडली आहे असें मला दिसलें. तिचें डोकें खालीं तुटून पडलें होतें व धड पलंगावरच होतें. त्या माडींतील कपड्यावर वगैरे जिकडे तिकडे रक्त दिसत होतें.

त्यावेळेस माझी काय अवस्था झाली ती एका देवालाच माहीत! माझ्यानें तेथें फार वेळ उभें रहावेना! थोड्याच वेळानें मी खालीं आलें. तेथें जाऊन पहातें तों माझ्या अंथरुणाच्या पलंगपोसासही रक्ताचे डाग पडले आहेत! रक्तानें भरलेली एक सुरीही माझ्या खाटेखालीं पडलेली होती! हा प्रकार काय आहे याबद्दल विचार करण्यासहीं मला फुरसत मिळाली नाहीं तोंच दहाबारा पोलीसच्या शिपायांनीं आंत येऊन माझ्या भोंवतीं गराडा घातला!

यापुढें काय प्रकार घडून आला त्याची हकीकत येथें देण्याची कांहीं जरूर नाहीं. ती सर्व तुझ्या कानीं आपोआप येईलच. माझ्या सावत्र आईचा मींच खून केला व तिच्या पैशाची पेटीही मींच लांबविली असा माझ्यावर आरोप आहे. आतां मी ठाण्यावर जाणार व तेथें माझ्यावरील खटल्यास सुरुवात होणार!

असा आरोप माझ्यावर ठेवून मला ठाण्यावर घेऊन जात आहेत याबद्दल मला बिलकुल दुःख होत नाहीं. माझ्या सावत्र आईचा बाप जवाहीरलाल व भाऊ निहालचंद हे मला गैरचालीची ह्मणत आहेत व वसंतबिबीचा मींच खून केला व तिची इस्टेटही मीं लांबविली असें ह्मणत आहेत हें पाहून मात्र मला अतिशय दुःख होत आहे. परमेश्वराच्या घरीं न्याय आहे असा माझा दृढ विश्वास आहे. ह्मणूनच माझें काय होईल याबद्दल मुळींसुद्धां मला भय वाटत नाहीं.

माझें दैवच जर फिरलें असेल व माझ्यावर हा आरोप नाहक शाबीत होईल तर तुझी माझी भेट होणार नाहीं . म्हणूनच आतांपर्यंत मीं एक गोष्ट तुझ्यापासून लपवून ठेवली ती तुला सांगतें.

‘ प्रिय भगिनी, या विपत्तींत ईश्वराशिवाय सहाय्य करणारीं अशीं दोन माणसें आहेत. त्यांपैकीं एक तूं व दुसरा एक तरुण, सुंदर व कुलीन पुरुष आहे. सहा महिन्यांपूर्वी आपण पंचक्रोशींत फिरावयास गेलों होतों त्यावेळेस प्रथम या गृहस्थाची व माझी दृष्टादृष्ट झाली. त्याच्या दृष्टींत अशी कांहीं अद्वितीय जादू भरलेली आहे कीं मीं त्याला पाहिल्यापासून त्याची सुंदर मूर्ति माझ्या हृदयांतून एक क्षणभर सुद्धां जात नाहीं. तेव्हांपासून त्याची व माझी अनेक वेळां गांठ पडली. त्याचेंही माझ्यावर प्रेम असावें असें त्याच्या चालचलणूकीवरून दिसतें. त्याचें माझें प्रत्यक्ष भाषण असें कधींहि झालें नाहीं. हा गृहस्थ कोण आहे, कोठें राहतो, त्याची जात कोण वगैरेसंबंधानें मला कांहींच माहीत नाहीं. तो धनाढ्य आहे किंवा कंगाल आहे; विवाहित आहे किंवा अविवाहित आहे हेंही मला ठाऊक नाहीं. माझ्याशीं विवाह करण्यास तो तयार होईल किंवा नाहीं हेंही मला सांगवत नाहीं. तरी पण, माझें मात्र त्याच्यावर अस्खलित प्रेम आहे. फार तर काय, हा आरोप शाबीत होऊन जर माझ्यावर अकालींच इहलोक सोडून जाण्याची पाळी आली तर मरतेवेळीं मला त्याचेंच स्मरण होईल. या वेळीं तूं घाबरूं नकोस. हा तरुण गृहस्थ या प्रसंगीं तुला मदत करील. तुझ्यावर जें किव्हाळ आलें आहे तें त्याच्याच मदतीनें दूर होईल, असें माझें हृदय मला बजावून सांगत आहे. भगिनी, आतां मीं जातें. माझें स्मरण ठेव येवढीच माझी तुला विनंति आहे.

तुझी प्रिय भगिनी–
लाडली. ”

प्रकरण १४ वें.

तूं इतकी खोल असशील हें मला माहीत नव्हतें !

लीलावती– (पत्र ऐकल्यावर) हाय, हाय ! आतां पुढें काय होणार ?

बतसिया–घाबरण्याचें कांहीं कारण नाहीं. लाडली बिबी खास सुटून जाणार !

लीलावती–(घाईनें) हें तूं कशावरून ह्मणतेस ? तिचा मामा व आजा जर तिच्या जीवावर उठले आहेत ! आणि त्यांतून जवाहीरलाल तर वकील आहे !

बतसिया–तें खरें, परंतु लाडलीचा मदतगार त्यांना भीक घालणारा नाहीं. ह्मणूनच ती सुटेल असें मी ह्मणतें.

लीलावती–तो मदतगार कोण ?

बतसिया—ज्याचा उल्लेख या पत्रांत केला आहे तो !

लीलावती—काय ! हा मदतगार तुला माहीत आहे ?

बतसिया—होय.

लीलावती—मग त्याचें नांव सांग पाहू ?

यावर बतसियानें एका गृहस्थाचें नांव सांगितलें. तें ऐकून लीलावतीस फारच आश्चर्य वाटलें.

लीलावती—अगदीं, माझ्या गळ्याची शपथ !

बतसिया— मी सरकारशीं कधीं खोटें बोलेन काय ?

लीलावती—मग कांहीं हरकत नाहीं. तूं सांगतेस हें जर खरें असेल तर डोक्यावरचें एक मोठें ओझेंच कमी झालें ह्मणावयाचें ! खरोखर लाडली मोठी भाग्यवान् आहे. या गृहस्थाकडून तिची खास सुटका होणार याबद्दल मलाही आतां संशय वाटत नाहीं. माझी सारी जिनगी खर्च झाली तरी बेहत्तर; परंतु लाडलीची सुटका करण्याचें कामीं मी यत्किंचित्‌ही कसूर करणार नाहीं. पण, काय ग बतसिया, तुला ही बातमी कोठून समजली ?

बतसिया— एका इसमाकडून. त्याच्या सांगण्यावर माझा पूर्ण भरंवसा आहे.

लीलावती — तो कोण मनुष्य ?

बतसिया— (हात जोडून) सरकार, येवढी गोष्ट मात्र आपण विचारूं नये.

लीलावतीनें हा मजकूर काय असावा हें अंदाजानें बरोबर तांडलें.

लीलावती— तुझ्या वस्तादपणाची कमाल झाली ! तूं इतकी खोल असशील असें मला कधींही वाटलें नाहीं.

बतसिया— (प्रसन्न मुद्रेनें) बरें; पण आतां आपण उठा. हें पाहिलेंत कां घड्याळाकडे ! कांटा दहावर आला !

घड्याळाचें नांव काढतांच लीलावती दचकून उठली व इकडे तिकडे पाहूं लागली. लीलावतीची चलबिचल पाहून बतसिया ह्मणाली– ' सरकार, आपली अशी स्थिति कशानें झाली ? '

लीलावती— कांहीं नाहीं. बतसिया, आजपर्यंत मीं आपल्या मनांतली गोष्ट जी मीं आपल्या मैत्रिणीलाही सांगितली नाहीं ती तुला समजली- खरोखरच तुझ्या शहाणपणाची जितकी तारीफ करावी तितकी थोडीच आहे, लाडलीसंबंधानें आतां मी बहुधा निर्धास्त झालें; परंतु आणखीही एक गोष्ट अशी आहे कीं........

बतसिया–आपण काय सांगणार तें माझ्या ध्यानांत आलें. जर आपण रागावणार नाहीं तर यासंबंधाचीही आपली भीति मी नाहींशी करतें.

लीलावती–तुझ्याजवळ कांहीं जादु आहे कीं काय ? लोकाच्या मनांत काय चाललें आहे हें तुला कसें ओळखतां येईल ?

यावर खोलीबाहेर जाऊन बतसियानें दोन मोहोरा आणून त्या लीलावतीच्या पुढें ठेवल्या व तिच्या कानांत कांहीं मजकूर सांगितला. तो मजकूर ऐकून लीलावतीला फारच आश्चर्य व कौतुक वाटलें.

लीलावती–नीच कुलांत जन्मास आली आहेस खरी: पण तुझी योग्यता फार मोठी आहे ! खरोखरच दासी असावी तर ती तुझ्यासारखी असावी.

बतसिया–(लीलावतीचे पाय धरून-) सरकार ! मीं मागल्या जन्मीं फार मोठी तपश्चर्या केली होती ह्मणून या जन्मीं या पायाची माझ्या हातून सेवा घडत आहे. जोंपर्यंत कुडींत प्राण आहे तोंपर्यंत या चरणाची चाकरी घडावी येवढेंच मागणें देवाजवळ आहे. आतां आपण उठावें व थोडेंसें कांहीं खावें. घड्याळाकडे पाहिलें का ? अकरा वाजले !

लीलावती–मी येतें. पण थोरल्या ताईसाहेबांना घेऊन येतेसना ? घेऊन येईन ह्मणून मला तूं हमी दिली आहेस.

बतसिया–होय. आपण तर आधीं उठा; मी त्यांना घेऊन येतें.

बतसिया खोलीच्या बाहेर गेली. व लाडलीची चिट्टी पेटींत ठेवून पेटी बंद करून लीलावतीही तिच्या मागोमाग खोलीच्या बाहेर आली.

प्रकरण १५ वें.

तिच्या कर्मांत काय लिहिलें आहे कोणास कळे !

बतसिया—हाय, हाय ! मोठा गहजब गुजरला ! थोरल्या ताईसाहेब खोलींतून नाहींशा झाल्या !

लीलावती—अग असें कसें होईल ? तिथेंच कोठें असेल; नीट बघ.

बतसिया—नाहीं हो. मीं सारें घर धुंडाळून पाहिलें. एक जागा सुद्धां शिलक ठेवली नाहीं. त्या अगदीं कुठें नाहींत !

एक नोकर—आह्मी सर्वजण त्यांचा शोध करीत आहोंत; पण त्यांचा कोठेंही पत्ता लागत नाहीं !

लीलावती—(घाबरून) अरे जा. नीट बघा. ती येथेंच कोठें तरी असेल; जाते कोठें !

ती बतसियास घेऊन कलावतीच्या खोलींत गेली. इकडे तिकडे नीट बारकाईनें पाहून ती बतसियास ह्मणाली—" शंभुसिंगाला जाऊन सांग कीं शहरांत जा आणि ती घरीं गेली आहे का काय पाहून ये. कदाचित् रागावून ती घरींही चालती झाली असेल !

बतसिया लगेच तेथून उठली व तिनें शंभुसिंगास तातडतोब शहरांत रवाना केलें व आपण पुनः खोलींत येऊन लीलावतीजवळ बसली. जसा कांहीं सुईदोराच शोधावयाचा इतक्या बारकाईनें त्या दोघीजणी खोलींत इकडे तिकडे पाहूं लागल्या. खोलींत ज्या कांहीं चीजवस्तु पडल्या होत्या त्या सर्व त्यांनीं उलटपलट करून पाहिल्या. इतक्यांत तेथें तक्क्याखालीं एक चिट्ठी पडलेली लीलावतीच्या दृष्टीस पडली. ती उचलून लीलावती वाचूं लागली. या पत्रांत खालील आशयाचा मजकूर होता.

' लीलावती—

मी तुझ्या अन्नावर वाढलें ही गोष्ट खरी आहे. आणि ह्मणूनच

तूं माझ्यावर मुखत्यारी गाजवूं लागलीस. असो. पण मला अशी गुलामागिरी खपणार नाहीं. मी भीक मागून आपलें पोट भरीन. आतां माझें ओझें तुझ्यावर नाहीं. आतां आपल्या पैशावर खुशाल एकटी चैन मार. पुनः तुला मी आपलें तोंड दाखवून तुझ्या सुखांत कधींहि व्यत्यय आणणार नाहीं.

तुझ्या डोळ्यांतला कांटा—
कलावती.'

हें पत्र वाचून लीलावतीच्या मनाची काय अवस्था झाली त्याचें वर्णन करण्यास आमची लेखणी असमर्थ आहे. ती कांहीं वेळ अगदीं तटस्थ बसली. बतसियानें समजूत केल्यानंतर बऱ्याच वेळानें ती उठली व दोघीही जणी खोलींत आणखी कांहीं सांपडतें कीं काय हें पाहूं लागल्या. कलावतीचे उंची उंची कपडे सुमारें पांच हजार रुपये किमतीचे होते ते खोलींत कोठेंही दिसेनात !

लीलावती आपल्या बरोबरीनें किंबहुना आपल्याहून अधिक मौल्यवान् कपडे कलावतीस करून देत असे; परंतु आज ते सर्व कपडे खोलींत दिसेनात. बाकीचे किरकोळ कपडे इकडे तिकडे अस्ताव्यस्त पडलेले दिसत होते. लीलावती दुःखाचा सुस्कारा टाकून बतसियास ह्मणाली " हाय, कलावतीच्या कर्मांत काय काय लिहिलें आहे तें सांगवत नाहीं. अद्याप सुद्धां जर मला तिचा पत्ता लागेल तर तिला मी चार समजुतीच्या गोष्टी सांगून परत घरीं आणीन अशी मला खात्री आहे ! " कलावतीचें वर दिलेलें पत्र व लीलावतीचे हे उद्गार यांवरून या दोघींच्या स्वभावांत केवढें अंतर होतें हें चाणाक्ष वाचकांच्या ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं.

नंतर लीलावती केराची टोपली चाळून पाहूं लागली तों तिच्या हातीं आणखीही कित्येक महत्त्वाचीं पत्रें लागलीं.

पत्र पहिलें.

" प्रिया—

आपली मोहक मूर्ति पाहून माझ्या अंतःकरणाची काय स्थिति झाली आहे ती माझी मलाच ठाऊक ! आपलें दर्शन कसें होईल असें मला होऊन गेलें आहे ! आपलें भाषण ह्मणजे जणु अमृताचा वर्षावच ! बागेंत येऊन आज महिना होऊन गेला. परंतु, आपल्या दर्शनास

मी इतकी आतुर झालें आहे कीं, मला शहरांत जाण्याची आठवण सुद्धां होत नाहीं. आपल्याला माझें कशानें स्मरण होणार ? ईश्वरसाक्ष माझी आपल्याला येवढीच विनंति आहे कीं, ही हकीकत आपण तिसऱ्या कोणासही सांगूं नये; व माझ्या हांतून आपली सेवा घडण्यासारखें कांहीं कामकाज असल्यास मला अवश्य कळवावें.

आपली प्रेमाकांक्षिणी
कलावती. "

पत्र दुसरें.

" प्रिये—

माझी काय अवस्था झाली हें तूं मला काय विचारतेस ? तुझें प्रेम जर माझ्यावर अस्खलित आहे तर त्याची तुला बरोबर कल्पना करतां येईल. तूं आपल्या जाळ्यांत मला इतकें गुंतविलें आहेस कीं त्यांतून एक क्षणभरही सुटका करून घेण्याचें सामर्थ्य माझ्या अंगीं राहिलें नाहीं ! तुझ्या शिवाय एक एक पळ मला युगाप्रमाणें वाटूं लागलें आहे. मला दर्शन देण्याचें लांबवून तूं आपलें पूर्वजन्मींचें वैरच साधीत आहेस असें मला वाटतें. मी तुझ्या नांवाचा एकसारखा जप करीत आहें. अशा रीतीनें जीव टांगण्यापेक्षां मरण आलेलें बरें ! एकदा चटका लावून पुनः गांठ नाहीं हा कोणत्या प्रेमाचा मासला ! तूं पुनः एकदा बागेंत मला दर्शन द्यावें. असें जर न करशील तर माझी तुझी पुनः भेट होण्याची आशाच नाहीं. कारण, मी आतां लवकर कोठें तरी आपलें तोंड काळें करून निघून जाईन !

तुझ्या प्रेमपाशांत सांपडलेला—
बाळकृष्ण. "

पत्र तिसरें.

" प्रिया—

आपलें पत्र वाचलें. आपलें दर्शन केव्हां होईल असें मला झालें. आपल्याला कोठेंही जावयाचें असलें तरी एकवार माझी भेट घेऊन जावें. हें पत्र वाचून मी आपल्याला कोठें व कोणत्या वेळीं भेटूं हें उत्तरीं कळवावें. मी नेमल्या वेळीं त्याठिकाणीं जरूर येईन. मी

सर्व पत्रें आपल्याकडे पाहण्याकरितां पाठविलीं आहेत. कलावतीची सुटका करण्यास काय उपाय करावा ह्याबद्दल जर आपण मला कांहीं मसलत सांगाल तर आपले माझ्यावर मोठे उपकार होतील. बाळकृष्णाच्या हातून माझी जशी सुटका केली तशीच कलावतीचीही करावी अशी माझी आपणांस आग्रहाची विनंति आहे.

आपली—
लीलावती. ”

पत्र पोहोंचवून उत्तर लवकर घेतां यावें याकरितां लीलावतीनें बतासियास गाडींत पाठविलें.

प्रकरण १७ वें.

लाडलीस घेऊन गेले तेव्हां दुपारचे ११ वाजले होते !

लाडली ‘ आई, आई ’ करीत माडीवर जाऊन पोहोंचते न पोहोंचते तोंच जवाहीरलाल व निहालचंद हे दारावर धक्के मारूं लागले. पार्वतीनें त्यांना कडी काढली. दार उघडतांच हे दोघेजण व दहाबारा पोलीसचे शिपाई घरांत घुसले. प्रथम त्यांनीं पार्वतीस हातकड्या घालून पकडून ठेवलें. पुढें माडीवर जाऊन त्यांनीं लाडलीच्या भोंवतीं गराडा घातला !

लाडलीस पहातांच निहालचंद मोठ्यानें ओरडून ह्मणाला ‘ या हरामजादीस पकडून कैद करा. इनेंच माझ्या बहिणीस ठार मारून तिची मालमत्ता........ ’

इतक्यांत कोतवाल त्याला झिडकारून ह्मणाले— ‘ गप्प बसा. इनें जर खराच अपराध केला असेल तर त्याबद्दल तिला शिक्षा होईल. फाजील भाषण करण्याची काय जरूर आहे ! ’

अशी समज मिळतांच निहालचंद चप बसला. पार्वती व लाडली यांना चार पोलीस शिपायांच्या पहाऱ्यांत बसवून बाकी सर्वजण घरांत बारकाईनें पाहूं लागले. लाडली जमीनीवर पडून एकसारखी रडत होती. पार्वतीच्या डोळ्यांतलेंही पाणी खळेना ! परंतु, निहालचंदानें या सर्वांवरही ताण करून

सोडली ! सख्ख्या आई करितां किंवा सख्ख्या बहिणीकरितां कोणी इतकें रडणार नाहीं इतका त्यानें आकांत करून सोडला ! जवाहीरलालचे डोळे रडून रडून लाल होऊन गेले. तो लाडलीकडे क्रोधाविष्ट मुद्रेनें एकसारखा टक लावून पहात होता.

सर्व घरांतल्या खाणाखुणा पाहून झाल्यानंतर कोतवाल आपल्या हाताखालच्या पोलीसांस ह्मणाला. " मी आतां या लोकांना सवाल विचारतों; तुह्मी यांची जबानी टिपून घ्या. "

जवाहीरलालनें आपल्या जबानींत सांगितलें—

' हें प्रेत माझ्या मुलीचें आहे. माझ्या मुलीचें नांव वसंती होतें. तिची उमर २१।२२ वर्षांची होती. ती चवदा पंधरा वर्षांची असतांना मी तिचें गोपीचंदाशीं लग्न लावून दिलें. लाडलीचें वय तेव्हां सात आठ वर्षांचें होतें. माझी बहीण इला जीवकींप्राण करीत असे. पोटच्या पोरीप्रमाणें तिनें इचें पालनपोषण केलें. लग्न झाल्यानंतर एकदोन वर्षांतच वसंती विधवा झाली. तेव्हांपासून ती कधीं आपल्या घरीं व कधीं माझ्या घरीं अशी रहात असे. माझा मुलगा निहालचंद हाच इच्या घरची व्यवस्था पहात असे. आमच्या जावयांचें कापडाचें दुकान होतें; परंतु मरतेसमयीं त्यांची इस्टेट ४० हजार रोख व दहाबारा हजारांचे दागिने इतकी होती. त्यांच्या मरणानंतर मी रोख रक्कम सर्व बँकेंत ठेवली व दागदागिने सर्व माझ्या मुलीजवळच होते. परंतु आज माझी मुलगी जिवानिशीं जाऊन दागदागिनेही नाहींसे झाले अशी स्थिति झाली. हें काम या थेरडीच्या मदतीनें या पोरीनेंच केलें ! कारण इचें सावत्र आईशीं बरें नव्हतें. तिचा इचा नेहमीं तंटा होत असे. शिवाय इच्या चालचलणुकीसंबंधानेंही माझ्या कानावर आजपर्यंत बऱ्याच कागाळ्या आल्या आहेत. या कारणामुळें माझा इच्यावर पक्का वहीम आहे. इनेंच संधि साधून आपल्या सावत्र आईचा खून केला व तो पचविण्याकरितां आपणच ओरडा करून या थेरडीला ही बातमी देण्यास माझ्याकडे पाठविलें. याप्रकरणाशीं या ह्मातारीचाही निकट संबंध असला पाहिजे. कारण इनेंच या पोरीला लहानाची मोठी केली; यामुळें ह्मातारीचें तिच्यावर अत्यंत प्रेम आहे. माझ्या मुलीचाही ही ह्मातारी हेवा करीत होती. "

जवाहीरलालच्या जबानीनंतर दोन तिऱ्हाईत माणसांचीही जबानी घेण्यांत आली. लाडली आपल्या सावत्र आईला पाण्यांत पहात होती व लाडली गैर चालीची आहे या दोन गोष्टी त्यांनीं आपल्या जबानींत ठासून सांगितल्या. रात्रीं घरांत गडबड वगैरे आह्मीं कांहीं ऐकली नाहीं; परंतु लाडली घरांत होती येवढें आह्मास खास माहीत आहे; असें या साक्षीदारांनीं सांगितलें. या दोन साक्षीदारांपैकीं एकाचें नांव बाबू दलाल असें होतें व दुसऱ्याचें नांव परशुराम सराफ असें होतें. यांची जबानी चालू असतां पार्वती मध्यें बोलण्याचा प्रयत्न करीत होती; परंतु पोलिस अधिकाऱ्यांनीं तिला बोलून दिलें नाहीं.

यानंतर निहालचंदाची जबानी झाली—

" बसंती माझी बहिण होती. तिचें माझ्यावर मनस्वी प्रेम होतें. मी तिच्याकडे मधून मधून जात असे. लाडलीचें व तिचें नेहमीं भांडण होत असें. मी तिची समजूत करण्याचा प्रयत्न केला तर लाडली मला हजारो शिव्या मोजीत असे. असा मासला उडाला ह्मणजे आठ आठ दिवससुद्धां मी आपल्या बहिणीच्या घरीं जात नसे. आज सकाळीं मी आपल्या बापाजवळ बसलों होतों. इतक्यांत पार्वतीनें आमच्या घरीं येऊन आह्माला खुनाची बातमी दिली. ही बातमी समजतांच मी कोतवालाकडे जाऊन त्यांना तिकडे घेऊन गेलों. येवढेंच मला माहीत आहे. "

कोतवालानें पार्वतीस विचारलें—

' तुला या खुनाच्या बाबतींत काय माहीत आहे ? खरें सांग, खोटें बोलशील तर आपला विचार बघ ! '

पार्वती रडत रडत ह्मणाली–" मीं फार दुःखी आहे. माझा नवरा मरून आज तीस वर्षें होऊन गेलीं. मला एक मुलगा होता तोही नवऱ्याच्या हयातींतच मरून गेला.

कोतवाल— मी तुला तुझ्या जन्माची कहाणी विचारतों आहे कीं काय ? या खुनासंबंधीं तुला काय माहीत असेल तेवढेंच सांग. उगीच पाल्हाळ लावूं नकोस.

पार्वती–ज्या दिवशीं मी या शहरांत आलें तेव्हांपासून मी यांच्या येथेंच नोकरीस आहे. लाडलीचा जन्महो मी आल्यानंतरच झाला. मीच तिला

लहानाची मोठी केली. इच्यासारखी मुलगी व्हायची नाहीं. आणि हे लोक इच्यावर नानातऱ्हेचीं कुभाडें घेण्यास तयार झाले आहेत! खरोखर या दुनियेंत धर्म राहिला नाहीं. इच्या आईनें स्वर्गवास पत्करल्यापासून मी इचें पोटच्या पोरीप्रमाणें लालनपालन केलें.

कोतवाल—इला सरळ जबाब विचारल्याशिवाय इची ही भाकड कथा संपणार नाहीं. कायग ए तुझें नांव काय ?

पार्वती—माझें नांव पार्वती.

कोतवाल—तुझी जात काय ?

पार्वती— मी कुणबीण आहे.

कोतवाल—येथें तूं किती दिवस रहातेस ?

पार्वती—ते कांहीं मला बरोबर सांगतां येणार नाहीं. पण मी या गांवांत आल्यापासून घरींच सारखी आहे. माझ्या मालकीणीनें माझ्या हवालीं जी कोठडी केली होती त्याच कोठडींत मी रहातें. मला कोणी नाहीं. मला या घरीं राहून ४।५ वर्षें झाल्यानंतर लाडलीचा जन्म झाला.

कोतवाल—तुझें वय काय आहे ?

पार्वती—चाळीसापेक्षां कांहीं कमजास्त.

कोतवाल—लाडलीच्या बापाचें नांव काय होतें ?

पार्वती—त्यांचें नांव गोपीचंद; व तिच्या आईचें नांव ललिता. ही आग्र्याची रहाणारी होती. ती मेल्यावर गोपीचंदानें जवाहीरलालची मुलगी वसंती इच्याबरोबर लग्न केलें.

कोतवाल—वसंतीबाईची चालचलणूक कशी होती ? तिच्याकडे कोणी पुरुष माणूस येत होतें काय ?

पार्वती—ज्यांचें मीं अन्न खालें त्यांचा मी दुर्लौकिक कसा करूं. आपण विचारतां या गोष्टी मला कांहीं माहीत नाहींत.

कोतवाल—नाहीं नाहीं. तसें येथें चालणार नाहीं. तुला जें काय माहीत असेल तें येथें खरें सांगितलें पाहिजे.

पार्वती—सरकार! गोपीचंद मेल्यानंतर निहालचंद वसंतबिबीकडे नेहमी येत असे. तो सकाळ संध्याकाळ एकसारखा येत असे. अलीकडे सहा महिने झाले आणखीही एक मनुष्य वसंतीकडे येत जात असे. तो कोण

होता हें मला माहीत नाहीं. परंतु हा आपला नातेवाईक आहे असें वसंती ह्मणत असे.

कोतवाल—ठीक आहे. कालरात्रीं घरीं कोण कोण होतें ?

पार्वती—काल दोन प्रहर पासून लाडली जी लीलावतीच्या येथें गेली ती आज सकाळीं परत आली. ती गेल्यावर निहालचंद येऊन माडीवर गेला; परंतु तो पुन: परत जातांना मला दिसला नाहीं.

निहालचंद—(मोठा आक्रोश करून) मी काल आलों होतों ? अगदीं निखालस खोटें बोलते आहे ही.

कोतवाल—(दटावून) खबरदार, विचारल्याशिवाय बोलशील तर. कायग पार्वती, काल रात्रीं तू घराचा दरवाजा केव्हां लावून घेतलास ? तूं कोठें निजली होतीस ? व हा खून झालेला तुला केव्हां समजला ?

पार्वती—लाडली गेल्यानंतर निहालचंद घरांत आले. पण पुन: परत जातांना मी त्यांना पाहिलें नाहीं. हे वरती गेल्यापासून वसंतीबाई आपल्या खोलीच्या बाहेर मुळींच आल्या नाहींत. सुमारें चारपांच वाजतां ती एकदां खालीं आली होती. पानसुपारी आणण्यासाठीं माझ्यापाशीं पैसे देऊन ती पुन: वर गेली. मी पानसुपारी घेऊन परत आलें त्यावेळेस ती खालीं चौकांत उभी होती. ती मला ह्मणाली—" हे पहा, आतां संध्याकाळ झाली आहे. लाडली अद्याप आली नाहीं. तिची कांहींवेळ वाट पाहून तूं थोरला दरवाजा बंद करून टाक. माझें थोडें डोकें दुखत आहे. मी आतां वर जाऊन निजतें. मला उठवूं नकोस. " असें सांगून तिनें मला थोडें खावयास दिलें व जरा इकडे तिकडे करून ती वर निघून गेली. वर जातांना तिला मीं विचारलें निहालचंद अतां परत घरीं जाणार आहेत काय ? " तिनें उत्तर केलें " ते मघांशींच गेले; तूं दरवाजा बंद करून घे. " हें ऐकून मीं तात्काळ दरवाजा बंद करून घेतला व आपला कामधंदा करूं लागले. मी माडीवर दिवा लावण्याकरितां जाऊन पहातें तों माडीच्या दारास आंतून कडी होती असें दृष्टीं पडलें. मी हांक मारण्याच्या बेतांत होतें. इतक्यांत माझ्या धनिणीनें मला सांगितलें—" पार्वती तूं खालीं आपल्या कामाला जा. मीं दिवा लावला आहे. तूं आपला कामधंदा आटपून खालीं नीज. " याप्रमाणें मी खालीं जाऊन आपला कामधंदा आट-

पून मी आपल्या खोलींत जाऊन निजलें. यानंतर काय झालें याची मला खबर नाहीं.

कोतवाल—सकाळीं तूं जेव्हां उठलीस तेव्हां तुझ्या काय दृष्टीं पडलें ?

पार्वती—मी नेहमींप्रमाणें पहाटे पांच वाजतां उठून काम करूं लागलें. झाडलोट करतां करतांच फटफटित उजाडलें. केर टाकण्यास मी दाराबाहेर जाऊं लागलें तेव्हां दाराची कडी निघालेली मला दिसली. तें पाहून मला फारच आश्चर्य वाटलें. निजते वेळेस मी खुद्द आपल्या हातानें कडी लावली होती. दररोज दारास कडी लावली आहे किंवा नाहीं हें नीट पाहून मी निजतें.

कोतवाल—ठीक आहे; मग तूं पुढे काय केलेस ?

पार्वती— दरवाजा उघडा आहे हें दृष्टीं पडतांच मी माझ्या धनिणीला हका मारूं लागलें. मीं दहावीस हाका मारल्या पण कोणी ओ देईना असें पाहून मी मालकीण ज्या माडीवर निजली होती तेथें गेलें. परंतु, हाय, हाय, तेथें माझ्या काय दृष्टीं पडलें ? माझ्या मालकीणीच्या दिवाणखान्याचीं दोन्ही दारें मोकळीं असून ती दिवाणखान्यांत मरून पडली आहे ! तिचें धड पलंगावर होतें ! व डोकें खालीं तुटून पडलें होतें ! मी ऊर बडवीत व मोठयानें रडत तिच्या बापाकडे गेलें. व त्याला ही सर्व हकीकत सांगितली. ती हकीकत ऐकून "कांहीं एक बोभाट न करितां तूं आपल्या घरीं जा" असें त्यानें मला सांगितलें. मी घरीं परत आलें तेव्हां लाडली दरवाज्याशीं उभी होती. तिच्या अंगाचा भयानें अगदीं थरकाप होऊन गेला होता. तिला मी माडीवर जाऊन तेथील प्रकार पाहण्यास सांगितलें. ती माडीवर जाऊन पोहोंचते न पोहोंचते तोंच दाराशीं जवाहीरलाल व निहालचंद हाक मारूं लागले. मी त्यांना दार उघडल्यानंतर ते घरांत आले. यापेक्षां यासंबंधांत मला कांहींही ठाऊक नाहीं. मा काशीविश्वेश्वराची शपथ घेऊन सांगतें. वसंतबिबीला कोणी दुष्टानें ठार मारलें याबद्दल मला बिलकुल माहीत नाहीं. लाडलीवर ज्यांनीं हें भलतेंच कुभांड रचलं आहे त्यांना देव पाहून घेईल. माझी लाडकी लाडली गंगाजलाप्रमाणें शुद्ध आहे. कोणाला तरी बळी द्यावयाचें तर मला फाशी द्या. पण तिला बिचारीला त्रास देऊं नका.

कोतवाल—लाडली ! तुला या बाबतींत काय माहीत आहे ?

लाडली—(खालीं मान घालून) मला कांहीं माहीत नाहीं.

कोतवाल—ह्मणजे तुझ्यावर ठेवलेला आरोप तुला कबूल आहे !

लाडली— मुळींच नाहीं.

कोतवाल—मग तुला सांगावयाचें असेल तें सांगत कां नाहीं ?

लाडली—मला जें काय सांगावयाचें तें मी न्यायाधीशापुढें सांगेन.

जवाहीरलाल—(त्वेषानें) ऐकलेंत ना ? पहा कार्टी कशी वस्ताद आहे ती ? मीं पहिल्यानेंच सांगितलें नव्हतें ? तिच्यांत नखशिखांत लबाडी भरली आहे ! सावत्र आईस ठार तर केलींच ! आणि वर तिची इस्टेट लांबविली !

कोतवालांनीं जवाहीरलालांस गप्प बसावयास सांगितलें. इतक्यांत बाहेरून तेथें एक गृहस्थ आला. त्याला पहातांच जवाहीरलाल ह्मणाला " तुह्मी कोण आहां ? "

नवीन गृहस्थ— आपल्या सारखाच मी आहें. तुह्मांला दिसत नाहीं कां ?

निहालचंद—(मोठ्या गुर्मीनें) तुह्मी येथें काय ह्मणून आलांत ? तुह्मांला कोणीं बोलावणें पाठविलें होतें काय ? आतांच्या आतां येथून चालते व्हा.

गृहस्थ—तोंड आवरून बोला मेहेरबान ! मी येथें असलों तर आपलें कांहीं नुकसान होईल अशी भीति बाळगूं नका.

जवाहीरलाल—(पोलिसास) या गाढवाला येथून धक्के मारून घालवून द्या !

कोतवाल—(नवीन गृहस्थास) विश्वनाथ बाबू, या लोकांच्या बोलण्याकडे आपण लक्ष देऊं नका. त्यांनीं आपल्याला ओळखलें नाहीं. एखादे वेळेस आपण आह्मालाही ओळखूं येत नाहीं मग या बिचाऱ्यांची काय कथा !

कोतवालाचें हें भाषण ऐकून जवाहीरलाल व निहालचंद घाबरून गप्प बसले. विश्वनाथ बाबूपुढें जाऊन ते दोघेही त्यांची क्षमा मागूं लागले.

विश्वनाथ बाबू हे गुप्त पोलिसांतील अधिकारी होत. बनारस मधील

मोठमोठ्या मी मी ह्मणणाऱ्या चोरांचीही त्यांचें नांव ऐकतांच तारंबळ उडून जाई !

कोतवाल— आपण इकडे येण्याची तसदी कां घेतली ?

विश्वनाथ— दोन तास झाले. मला या खुनाची बातमी समजली. मी आपली चौकशी करण्याकरितां येथें आलों.

कोतवाल— काय ह्मणता ? या खुनाची बातमी आपल्याला समजून दोन तास झाले ?

विश्वनाथ—महाराज, ह्मणूनच आह्मांला गुप्त पोलीस ह्मणतात. घरच्या मालकास एकवेळ मागून बातमी समजेल; पण आह्माला ती ताबडतोब कळलीच पाहिजे.

विश्वनाथ—(जवाहीरलालास) माझी चौकशी पुरी होईतोंपर्यंत हें घर माझें आहे असें समजा. मी येथून जाईतोंपर्यंत तुह्मालाा येथेंच असलें पाहिजे.

कोतवाल—माझें काम पुरें झालें. आतां मला येथून गेलें पाहिजे.

विश्वनाथ— आपण खुशाल जा. हें प्रेतही आपण आपल्या ताब्यांत घ्या.

असें सांगून विश्वनाथानें प्रेताकडे न्याहाळून पाहिलें व आपल्या स्मरणवहींत कांहीं मजकूर टिपून घेतला. रक्तानें भरलेली चादर व सुरी लाडलीच्या खोलींत सांपडली होती तीही त्यानें आपल्या ताब्यांत घेतली. परीक्षा होण्याकरितां प्रेत इस्पितळांत पाठविण्यांत आलें. व कोतवालही जाण्याच्या तयारीला लागलं. इतक्यांत लाडलीनें कोतवालास विनयपूर्वक विनंति केली ‘ मला येथून डोलींत घेऊन जावें. ’ हें ऐकतांच कोतवालानें शिपायास डोली आणण्यास सांगितलें, व लाडलीस विचारलें ‘ आणखी तुह्मांला कांहीं सांगावयाचें आहे काय ?

लाडली—माझी मैत्रीण लीलावती इजकडे मला एक चिट्ठी पाठवावयाची आहे. त्या चिट्ठींतील मजकूर आपणाशिवाय कोणासही समजूं नये अशी माझी इच्छा आहे.

हें ऐकतांच जवाहीरलालाच्या अंगाचा तिळपापड झाला. परंतु, कोतवालानें लाडलीच्या याही ह्मणण्यास रुकार दिला. लाडलीचें पत्र लिहून झाल्यानंतर कोतवालानें तें वाचून पाहिलें व पाकीटांत घालून पाकीट बंद करून

त्यांनीं तें पत्त्यांत लिहिलेल्या ठिकाणीं पोहोंचविण्यासाठीं आपला एक शिपाई पाठविला. इतकें झाल्यानंतर कोतवाल ठाण्याकडे जावयास निघाले. लाडली व पार्वती याही त्यांच्याबरोबरच गेल्या.

प्रकरण १८ वें.

पोलिसची चौकशी.

घरांतून सर्व मंडळी जात चालली असें पाहून इकडे विश्वनाथानें एक मनुष्य निहालचंदावर नजर ठेवण्यास व दुसरा भंगी घेऊन येण्यास पाठविला. घरांत कोणी नाहीं असें पाहून त्यानें दरवाजा आंतून बंद करून घेतला. विश्वनाथाची ही जबरदस्तीची वागणूक पाहून जवाहीरलालास बराच राग आला पण त्याचा कांहीं उपाय चालेना. विश्वनाथानें प्रथम पार्वतीची खोली तपासून पाहिली; परंतु त्या खोलींत त्याला ह्मणण्यासारखा पुरावा सांपडला नाहीं. याप्रमाणें त्यानें सर्व घराचा तळमजला बारकाईनें पाहिला. दुसरा मजला व तिसरा मजला यांची त्याचप्रमाणें झडती घेतली; परंतु सुगावा लागण्यासारखें कांहींच हातीं लागलें नाहीं. चवथ्या मजल्यावर लाडलीची खोलीही त्यानें तपासली. परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. तिच्या खोलींत जागोजाग रक्ताचे थेंब पडलेले मात्र दिसत होते. परंतु याशिवाय विशेष पुरावा कांहीं दिसला नाहीं. सर्व घर धुंडाळून पाहिलें. परंतु मुद्देमाल कांहीं सांपडत नाहीं असें पाहून विश्वनाथानें घराच्या सर्वांत वरच्या ह्मणजे पांचव्या मजल्याचा रस्ता धरला. आतांपर्यंत जवाहीरलालाच्या तोंडास अगदीं कुलूप होतें. परंतु आतां मात्र त्याच्यान गप्प बसवेना. “ कुलीन स्त्रीच्या निजावयाच्या खोलींत परक्यानें जाणें चांगलें नाहीं. ” वगैरे सबबी सांगून विश्वनाथानें पांचव्या मजल्यावर चढून जाऊं नये ह्मणून त्यानें हरतऱ्हा केल्या; परंतु त्या सर्व निष्फळ झाल्या. विश्वनाथ पांचव्या मजल्यावर जाऊन पोहोंचतो तोंच दारांत एक शीट वाजलेली ऐकूं आली. त्याबरोबर खालीं येऊन विश्वनाथानें दरवाज्याची कडी काढली. तों विश्वनाथानें पाठविलेला मनुष्य

भंगी घेऊन आला होता तो आंत आला. त्याच्या बरोबर भंगी आला होता त्याचे कडून त्यानें घरांतील मोरी चक्क झाडविली. मोरींत सांपडलेला एक कागदाचा तुकडा त्यानें भंग्याकडून चांगला स्वच्छ धुवविला व तो चांगला साफसूफ करून विश्वनाथानें आपल्या खिशांत टाकला. आपला नोकर व भंगी या दोघांनांही खालीं बसावयास सांगून तो पुनः वर गेला.

वर जाऊन वसंती ज्या खोलींत निजत होती त्या खोलीची बारकाईनें झडती घेण्यास सुरुवात केली. त्या खोलींत बऱ्याच बीभत्स तसबिरी वगैरे ज्या नानाप्रकारच्या वस्तु त्याच्या दृष्टीस पडल्या त्यांवरून या खोलींत निजणारी स्त्री चांगल्या चालीची खास नसली पाहिजे असा त्याचा ठाम ग्रह झाला. हा सर्व प्रकार त्यानें आपल्या रोजनिशींत टिपून ठेवला. त्या खोलींत पलंगावर, व पलंगाखालीं बरेंच रक्त पडलेलें दिसत होतें. अंथरूण उलथें पालथें करून पाहतां पाहतां उशाशीं असलेल्या पिगदाणीवर विश्वनाथाची नजर गेली. त्या पिगदाणीकडे थोडा वेळ पाहून त्यानें भंग्यास खालून वरती येण्याकरितां हाक मारली. भंग्याकडून त्यानें पिगदाणींत दिसत असलेला एक कागदाचा तुकडा बाहेर काढविला. तो भंग्याकडून नीट स्वच्छ करवून तोही आपल्या खिशांत टाकला. व खोलींतील राहिलेल्या सामानाची पहाणी सुरू केली. थोडावेळ गेल्यानंतर जवाहीरलाल त्याला ह्मणाला– ' आपण आतांपर्यंत जे दोन कागद खिशांत घातले त्यांत काय लिहिलें आहे ! ' विश्वनाथानें हें ऐकलें न ऐकलेंसें करून कलमदानांतून आणखी दोन चिठ्ठया बाहेर काढल्या. या वांचून तो जवाहीरलालास ह्मणाला–आपल्या मुलीला लिहितांवाचतां तर अवश्य येतच असेल.

जवाहीरलाल—होय. येत होतें.

विश्वनाथ—मग तिचें अक्षर आपल्या ओळखीचें असेलच.

जवाहीरलाल—होय. पण खात्रीनें कांहीं सांगतां येणार नाहीं.

विश्वनाथ— हा कागद पहा. हा आपल्या मुलीनेंच लिहिला आहे काय ?

जवाहीरलाल—(थोडासा विचार करून) हें कांहीं माझ्या मुलीचें अक्षर दिसत नाहीं.

विश्वनाथ—आपण खरी गोष्ट छपवीत आहां. परंतु, हें अक्षर आपल्या

मुलींचेंच आहे अशाबद्दल मजजवळ भरपूर पुरावा आहे. असें ह्मणून विश्वनाथानें एक रोजकिर्दीची वही काढून ती जवाहीरलालास दाखविली.

विश्वनाथ—ही वही कोणी दुसऱ्यानें लिहिली आहे काय ?

जवाहीरलाल—ही लाडलीनें लिहिली असावी.

विश्वनाथ—छे, मुळींच नाहीं. लाडलीनें आतांच जी लीलावतीस चिठ्ठी पाठविली आहे, त्या चिठ्ठींतील अक्षर माझ्या पूर्ण स्मरणांत आहे. त्या चिठ्ठीचें अक्षर या अक्षराशीं जमत नाहीं.

यावर जवाहीरलालानें कांहींच उत्तर केलें नाहीं. झडती पुरी करून जाण्याची तयारी झाल्यानंतर विश्वनाथ जवाहीरलालास ह्मणाला— मी आतां जातों. माझा तपास आतां बहुधा संपलाच आहे. कदाचित् जरूर लागल्यास मी पुनःही येईन. 'माझ्या देखत यानें सर्व घराची झडती घेतली. यानें आपल्याबरोबर चार दोन चिठ्ठयाच कायत्या नेल्या. त्याशिवाय दुसरी कोणतीही वस्तु नेली नाहीं' असा स्वदस्तुरचा एक कागद मला लिहून द्या.

यावर जवाहीरलालानें विश्वनाथास कागद लिहून दिला. तो घेऊन विश्वनाथ घराच्या बाहेर आला व ह्मणाला— या मुकद्दम्याचा निकाल होईपर्यंत या घराला एक माझें व एक तुमचें अशीं दोन कुलपें लावावीं लागतील.

याप्रमाणें घराच्या दारास दोन कुलपें लावण्यांत येऊन दारावर पोलीसचा पहाराही बसविण्यांत आला.

प्रकरण १९ वें.

राजेसाहेब कोतवालास भेटतात.

लाडली व पार्वती या कोतवालाबरोबर ठाण्यास पोहोंचून फार वेळ झाला नाहीं तोंच ठाण्याच्या फाटकाशीं एक फैटण येऊन दाखल झाली. फैटण येऊन उभी राहतांच एका शिपायानें फैटणीच्या मालकास सलाम केला. यावर मालक शिपायास ह्मणाला " कोतवाल आंत आहेत कां ? " शिपायानें उत्तर केलें " होय, आतांच एका खुनाच्या खटल्याचा तपास करून आले

आहेत. " असें समजतांच गाडींतून आलेल्या गृहस्थानें आपल्या सहीचा कागद शिपायाच्या हातांत देऊन तो कोतवालास देण्यास सांगितलें. कागद पहातांच कोतवाल फाटकाजवळ आला व गाडींत बसून आलेल्या गृहस्थास त्यानें हातास धरून बहुमानानें आंत नेलें. आंत गेल्यानंतर एकमेकांचे कुशल प्रश्न झाल्यानतर कोतवाल ह्मणाला–राजेसाहेब, इतक्या उन्हांत भरदोनप्रहरीं आपण आलां यावरून आपलें कांहींतरी जरूरीचें काम असावेंसें दिसतें.

राजा—आपण बरोबर ओळखलेंत; मी आपल्याला थोडीशी तसदी देण्याकरितां आलों आहें.

कोतवाल—सांगावें आपलें काम काय आहे तें.

राजा—आज लाडली या नांवाची एक मुलगी आपण पकडून आणली आहे.

कोतवाल—तिला घेऊन आतांच मी आलों.

राजा—त्या मुलीसंबंधानेंच कांहीं बोलण्याकरितां मी आलों आहे. आपण कबूल कराल तर सांगतों.

कोतवाल—आपण खुशाल बोला. आपलें काम करण्यास कायद्याशिवाय कशाचीही हरकत आली तरी त्यास मी बिलकुल जुमानणार नाहीं.

राजा—आपण लक्ष्यांत ठेवा कीं आपणास बेकायदेशीर गोष्ट करण्यास मी कधीं सांगणार नाहीं.

कोतवाल—मग आपण निःशंक सांगावें.

राजा—ऐका. ज्याकरितां या मुलीस पकडण्यांत आलें आहे तो गुन्हा तिच्या हातून झालाच असेल तर तिला शिक्षाही झाली पाहिजे. उलटपक्षीं ही निरपराधी असेल व नीच लोकांनीं हे तिच्यावर बालट रचलें असेल तर न्यायाच्या समतोल ताजव्यांत ती आपोआपच दोषमुक्त ठरेल.

कोतवाल—यांत काय संशय. आपण मला कांहीं विशेष सांगणार आहां असें मला वाटलें होतें. परंतु आपल्या या बोलण्यानें माझी अगदीं निराशा झाली. येवढेंच सांगण्याकरितां आपण अवेळीं हा हेलपाटा घेतलात!

राजा—हो. येवढच सांगण्याकरितां मी येथें आलो. माझ्या सांगण्यांत आपण समजतां त्यापेक्षां अधिक मतलब आहे. ही एका कुलीन घराण्यां-

तील मुलगी आहे. म्हणून तिची व्यर्थ बेअब्रू होऊं नये येवढीच माझी मनापासून इच्छा आहे. या कामीं आपण फार काळजीपूर्वक व दक्षतेनें तल्लास करावा.

कोतवाल—फक्त येवढेंच सांगण्याकरितां आपण इतके लांब आलांत हें काम तर एक चिट्ठी पाठवूनही झालें असतें. हें पहा इतर लोकांत ज्याप्रमाणें थोर व नीच लोक असतात त्याप्रमाणेंच पोलिसखात्यांतही असतात. ज्या लोकांनीं आपल्या हलकट वर्तनानें पोलिसखात्याचें बदनाम केलें आहे त्यापैकीं मी नाहीं असें माझें आपणास नम्रपूर्वक सांगणें आहे. मी आपल्या कामांत हयगय कधींही होऊं देत नाहीं. कोणी स्त्री कुलीन असो; किंवा कशीही असो ती माझ्या ताब्यांत आल्यानंतर तिला मी मुलीभहिणीप्रमाणें मानून तिची योग्य व्यवस्था ठेवतों. त्याप्रमाणेंच निरपराधी माणसास व्यर्थ शासन होऊं नये याबद्दलही शक्य तितकी सावधगिरी मी बाळगतों.

राजा—खरोखर आपलें हें बोलणें ऐकून मला फार आनंद होतो. आपल्यासारखेच अधिकारी पोलिसखात्यांत असावे अशी माझी ईश्वरापाशीं प्रार्थना आहे. आपलें अनुकरण करण्याची पोलिसखात्यांतील लोकांना इच्छा होईल तो मी सुदिन समजेन. आपल्यावर माझा पूर्ण भरंवसा आहे. आतां लाडलीबद्दल मला बिलकुल काळजी राहिली नाहीं.

याप्रमाणें बोलणें झाल्यानंतर राजेसाहेबांनीं कोतवालाचा निरोप घेतला.

हेच राजेसाहेब लाडलीचे मदतगार होत. लाडलीनें लीलावतीस जें पत्र लिहिलें होतें त्यांत या राजेसाहेबांचा उल्लेख केला होता. बतसियानेंही लीलावतीस यांच्यासंबंधानें हकीकत सांगितली होती. लीलावतीनें यांप्रकरणासंबंधानें ललितकिशोरास जी चिट्ठी पाठविली होती त्या चिट्ठींत' राजेसाहेबासंबंधानें मजकूर लिहिला होता. हे राजेसाहेब कोण याबद्दलची वाचकांना माहिती सांगून आह्मी या प्रकरणाची रजा घेतों.

हे गृहस्थ बनारस येथील एक जहागीरदार सरकारच्या अत्यंत कृपेंतले होते. यांचा जमीनजुमला फार मोठा होता. हे मोठे विद्वान्, व्यवहारचतुर, स्वरूपानें सुंदर व आपल्या घरचे मुखत्यार होते. यांची उमर वीस बावीस वर्षांची असून यांचें नांव राजा गोविन्दचंद्र असें होतें. हे जहागीरदारांच्या कुळांतले असूनही अद्याप अविवाहितच होते.

याचें कारण यांच्या लहानपणींच यांचें वडील निवर्तले. यांचें वय बारा तेरा वर्षांचें असतांच यांची माताही परलोकवासी झाली. यांच्या घरीं यांचा वृद्ध मुनीम येवढेंच काय तें वडील माणूस राहिलें होतें.

या मुनिमाचें नांव मोतीलाल होतें. हे फार इमानी व विश्वासु गृहस्थ असत. यांनी गोविंदचंद्रास चांगलें शिक्षण वगैरे दिलें होतें. गोविंदचंद्राची हल्लीं जी मानमान्यता होत होती तिचें श्रेय यांनांच दिलें पाहिजे. राजेसाहेबही गोविंदचंद्राचे उपकार स्मरत असत. ते त्यांना आपल्या बापाप्रमाणें मान देत. त्यांच्या सल्ल्याशिवाय हे कोणतीहि गोष्ट करीत नसत. मुनिमांची फार इच्छा होती कीं, राजेसाहेबांचें लहानपणींच लग्न व्हावें. परंतु राजेसाहेबांनीं या बाबतींत मात्र त्यांचें ऐकिलें नाहीं. राजेसाहेबांनीं मोतीलालाचें जर कधीं मन मोडलें असेल तर तें याचसंबंधानें होय. आतां मोतीलालास घरीं बसल्या पंचवीस रुपये दरमहा मिळत होता. त्यांचा मुलगा लालचंद हा मुनिमाचें काम पहात होता. तरी मोतीलाल रोज एकदोन वेळां येऊन कामावर नजर ठेवीत असे.

प्रकरण २० वें.

इत्थंभूत वृत्तांत समजला.

प्रहर दीड प्रहर दिवस आला तेव्हां बतसिया परत आली. तोंपर्यंत लीलावती आपल्या खोलींत पडून होती. बतसियानें लीलावतीस उठविलें व तिच्या पुढें दोन चिठ्ठ्या टाकल्या. रडून रडून लीलावतीचा चेहरा अगदीं सुकून गेला होता. शिवाय आदल्या दिवशींचा तिला खडखडीत उपास झाला होता. तिनें उठून मुखमार्जन करून नंतर चिठ्ठ्या वाचण्यास प्रारंभ केला. तिनें प्रथम ललितकिशोराकडून आलेलें पत्र वाचलें. व मग राजेसाहेबांची चिठ्ठी वाचली. या दोन्ही चिठ्ठ्यांत जो काय मजकूर होता त्याचा आशय खालीं दिला आहे.

‘ श्रीमती—

आपलें पत्र येण्यापूर्वीच लाडलीचें वर्तमान मला समजलें होतें. तिच्यासंबंधानें

आपल्याला बिलकुल काळजी नको. राजा गोविंदचंद्र यांच्या खटपटीनें सर्व व्यवस्था सोळा आणे झाली आहे. खटल्याच्या कामीं वकीलांच्या वगैरे मदतीचीही त्यांनीं चांगली तजवीज केली आहे. लाडली खरोखरच गुन्हेगार असती तरीही ती सहज सुटली असती इतकी त्यांनीं चोख व्यवस्था ठेवली आहे. मग आतां तर ती काय बोलूनचालून निरपराधी आहे. असो. कलावती आपला नाश इतका लवकर करून घेईल असें मला वाटलें नव्हतें. तिच्याही हालचालीवरून हा दिवस तिच्यावर आज नाहीं उद्यां येणार येवढें मात्र आधींच मी भविष्य केलें होतें. दुर्मार्गापासून तिचा आतां बचाव करतां येईल असें मला वाटत नाहीं. आपण तिचें आतां नांवही सोडलें पाहिजे. ती केल्याकर्माचें प्रायःश्चित्त खुशाल भोगो. आतां तिचा शोध लागला तरी त्यापासून कांहीं निष्पन्न होणार नाहीं. तरीपण मी तिचा शोध करीत आहे. सुदैवानें जर ती सुरक्षित हातीं लागली तर कामच झालें; परंतु तशी आशा फार कमी आहे. कलावतीचा नाद सोडून देणें हेंच आतां चांगलें आहे. व्यर्थ चिंता करून फळादेश तर कांहीं होणार नाहींच; पण उलट चित्तास त्रास मात्र होईल. आपल्या पत्राचें हें बयादवार उत्तर दिलेंच आहे. आतां शेवटीं मला येवढेंच लिहावयाचें कीं लाडलीसंबंधानें आपण यत्किंचित्‌ही काळजी करूं नये. त्या दिवशीं बागेंत मी जें आपल्याला पत्र दिलें होतें त्याची मला फार जरूर आहे. लाडलीच्या कामांत त्याचा फार उपयोग होणार आहे. तरी तें पत्र पाठविण्याची तजवीज व्हावी.

आपला.

ललितकिशोर.'

लीलावती—त्यांनीं तुला तोंडीं कांहीं निरोप सांगितला कां ?

बतसिया—ते माझ्याशीं कांहीं बोलले. परंतु त्याचा मतलब चिठ्ठींत लिहिलेल्या मजकुराशिवाय वेगळा नाहीं.

दुसरें पत्र—

" पूजनीय—

" मला पत्र लिहिण्यास आपल्याला संकोच वाटतो असें आपल्या पत्रावरून दिसतें. परंतु असा संकोच करूं नये. मला भावाप्रमाणें लेखून माझ्याशीं मन मोकळें करून वर्तन ठेवावें अशी माझी विनंति आहे. लाडली

संबंधानें आपण जो मजकूर लिहिला आहे त्यावरून लाडलीची आपली फारच निकट मैत्री आहे हें व्यक्त होतें. तिचें कसें होईल याबद्दल आपण बिलकुल चिंता करूं नये. ईश्वरकृपेनें निर्दोषी ठरून तिची मुक्तता होईल. तिला या आपत्तींतून मुक्त करण्याकरितां मी आपल्या प्रयत्नाची अगदीं पराकाष्ठा करीन. याशिवाय विशेष मजकूर आपल्या दासीकडून आपणास समजेल. इतकी चाणाक्ष व सद्वर्तनी दासी माझ्या पूर्वी कधींही पाहण्यांत आली नव्हती. माझ्या जवळही एक चांगला नोकर आहे त्याचा व इचा जोडा चांगला जमेल. असो; मला आपला बंधु गणून कांहीं कामकाज लागल्यास निःशंकपणें कळवावें.

गोविंदचंद्र "

बतसियास गोविंदचंद्राची माहिती पूर्वींच कशी होती हें चाणाक्ष वाचकांच्या ध्यानांत आलें असेलच. गोविंदचंद्राचा एक प्रेमांतला नोकर व बतसिया यांच्यामध्यें विलक्षण प्रकारचें प्रेम जमलें होतें. लीलावतीनें बतसियास विचारलें—" गोविंचंद्रांनीं आणखी काय सांगितलें ? "

बतसिया—त्यांनीं सांगितलें कीं लाडलीसंबंधानें आपण कांहीं काळजी करूं नये. वसन्तीचा खून कोणी केला हें माझ्या ध्यानांत आलें आहे. तो हरामखोर लवकरच धरला जाईल. ही बातमी पत्रांत लिहिण्यासारखी नाहीं. तूं माझ्या बहिणीची विश्वासू दासी ह्मणून मीं तुला हा मजकूर सांगितला. त्यांनीं आणखीहि मला कांहीं विश्वासाच्या गोष्टी सांगित्या. ते ह्मणाले " लाडलीवर ज्या दिवशीं माझें प्रेम बसलें त्या दिवसापासून मी छायेप्रमाणें एकसारखा तिच्या बरोबर असतों. तिच्यावर एखादें अकल्पित संकट आल्यास तिचें रक्षण होण्यास सहाय्य व्हावें या उद्देशानें मी आपल्या जंगीं नांवाच्या एका विश्वासू रखवालदारास तिच्या घराच्या पिछाडीस एक जागा घेऊन देऊन तेथें ठेवलें आहे. यामुळें लाडलीसंबंधानें मला नेहमी बरोबर बिनचुक माहिती मिळते. कालपासून तिच्या घरीं काय प्रकार घडून आला, वसंतीची चालचलणूक कशी होती, तिच्याकडे कोण लोक येत जात होते, शेवटीं तिला कोणाच्या हातून मरण आलें या सर्व गोष्टी मला पूर्ण माहीत आहेत. परंतु कायदेशीर पुरावा जमे तोंपर्यंत मला कोणावरही खटला करतां येत नाहीं. वसंतीबद्दलची माहीती मला काल ४॥ वाजतां समजली.

त्यानंतर गुप्त पोलीसच्या अधिकाऱ्यांना मी चिट्ठी पाठवून या खटल्याची पुरी शहानिशा करा अशी विनंति केली. खऱ्या आरोपीस शासन होऊन लाडली दोषमुक्त होऊन सुटेल अशी मला खात्री वाटत आहे.

इतकें सांगून त्यांनीं मला परत पाठविलें. परत येतांना त्यांनीं माझ्या हातावर पांच रुपये इनाम ठेवलें. मी पुष्कळ वेळां नको नको ह्मटलें परंतु, अखेर त्यांनीं माझें ऐकलें नाहीं.

लीलावती—एकूण तुर्त तुला अकरावा गुरूच आला आहे ह्मणावयाचें.

बतसिया—कालचा सबंद दिवसाचा आपल्याला उपास आहे. आजही दोन प्रहर उलटून गेले. आतां जेवावयास चलावें हें मला बरें दिसतें.

भोजनोत्तर पुनः इकडच्यातिकडच्या गोष्टी सांगतां सांगतां बतसिया ह्मणाली—गुप्तपोलीसचा एक नोकर आला आहे. तो ह्मणातो कीं, आपल्याला आलेलीं सर्व पत्रें व त्या दिवशीं आपल्याला बागेंत मिळालेलें पत्र हीं सर्व माझ्याजवळ द्यावीत. खटल्यांत त्यांचा फार उपयोग होईलसें वाटतें. मी या सर्व कागदपत्रांचा राजेसाहेबांच्या सल्यानेंच उपयोग करणार आहे.

हें ऐकून लीलावती ह्मणाली, ठीक आहे मी तीं सर्व पत्रें एका पाकीटांत बंद करून शंभूसिंहबरोबर ललितकिशोरकडे पाठवितें. आलेल्या मनुष्यास सांग कीं, तुला त्यांपैकीं जीं काय पाहिजे असतील तीं त्यांचेकडून घेऊन जा.

प्रकरण २१ वें.

ललिताकिशोरची बदली झाली.

ललितकिशोर व राजा गोविंदचंद्र यांचेकडून लीलावतीस लाडलीबद्दल बरोबर बातमी मिळत असे. कोतवालांचे ताब्यांतून लाडलीस ज्या दिवशीं अटकेंत ठेवण्यांत आलें त्याच दिवशीं राजा गोविंदचंद्र यांनीं जेलरला भेटून लाडलीस चांगल्यारीतीनें वागविण्यास सांगितलें होतें. तिला आपल्या मुलीप्रमाणें वागवीन असें जेलरनीं राजेसाहेबांना आश्वासनही दिलें होतें. वसंतीचा खून करणाऱ्याची व कलावतीस पळवून नेणाराची ज्यारीनें चौकशी

चालूं होती. या कामावर प्रख्यात गुप्त पोलिस विश्वनाथ याची नेमणूक झाली होती व राजेसाहेबांकडूनही त्यास चांगली मदत होत होती. या प्रकरणाचा कांहीं थोडथोडा तलासही लागत आला होता.

दिवसाचे दोन तीन वाजण्याचे सुमारास लीलावती आपल्या दिवाणखान्यांत पलंगावर पुस्तक वाचीत पडली होती. बतसिया तिच्या पायथ्याशींच बसली होती. लीलावती पुस्तक वाचतां वाचतां बतसियास ह्मणाली— आज गोविंदचंद्राकडून लाडलीची कांहीं खबर अद्यापपर्यंत समजली नाहीं.

बतसिया—आतां तीन वाजले आहेत. कचेरी बरखास्त झाल्यानंतर त्यांच्याकडून कोणी तरी माणूस येईल. कदाचित् बातमी पाठविण्यासारखें कचेरींत आज कांहीं होणारही नसेल.

लीलावती—नाहींतर तूंच एकदां हेलपाटा घेऊन येईनास!

बतसिया—ठीक आहे. यापुढें बतसिया कांहीं बोलणार होती इतक्यांत एक मोलकरीण येऊन सांगूं लागली कीं, हा लखोटा घेऊन आलेला मनुष्य दारांत उत्तराची वाट पहात उभा आहे.

त्याला ह्मणावें कांहीं वेळ थांब. मी उत्तर देतें, असें मोलकरणीस सांगून लीलावती लखोटा फोडून वाचूं लागली. तिनें लखोटा पुन: वाचला व अखेर तो आणखी एकवार वाचून घेण्यासाठीं बतसियाच्या हवालीं केला. हा लखोटा ललितकिशोरकडून आलेला होता. त्यामध्यें खालीं लिहिलेल्या आशयाचा मजकूर होता.

'लाडलीच्या खटल्यासंबंधानें व कलावतीच्या शोधासंबंधानें आपल्या हातून होईल तितका प्रयत्न करावयाचा असा माझा संकल्प ठरला होता. परंतु मनांत असतें एक आणि होतें दुसरेंच, असेंही केव्हां केव्हां घडून येतें. लाडलीचा खटला चालूं असतां मी येथें असणें जरूर होतें. परंतु आजच माझी बदली अलाहाबाद येथें झाल्याचा मला हुकूम आला आहे त्याप्रमाणें मला गेलें पाहिजे. तेथें माझी बढतीवर बदली झाली आहे. अशारीतीनें एकाएकीं माझी बदली होण्याचें कारण काय याबद्दलची गुप्तरीतीनें मला हकीकत समजली आहे. याचें कारण दुष्ट बाळकृष्णच होय हें मला खात्रीलायक समजलें आहे. एके दिवशीं मी तुला बाळकृष्णाच्या हातून सोडविली व त्याला धक्केमारून घराबाहेर घालवून दिलें वगैरे हकीकत तुझ्या

स्मरणांत असेलच. त्यानंतर त्यानें मला एक चिठ्ठी लिहिली होती, तीहि मीं तुला दाखविली होती. त्या चिठ्ठींत आव्हान केल्याप्रमाणें मी नेमल्यावेळीं ठरल्याजागेवर जाऊन हजर झालों. माझ्या पूर्वीच तेथें बाळकृष्णही येऊन बसला होता. मी त्याला सामोपचाराच्या बऱ्याच गोष्टी सांगून पाहिल्या; परंतु तो शिवीशिवाय एक अक्षरही काढीना. तेव्हां त्याची आमची कुस्ती जुंपली. मी त्याला चार पांचवेळ चीत केलें. आपट्याही पुष्कळ बसल्या-मुळें त्याच्या शरीरावर कित्येक ठिकाणीं भयंकर चाटी लागल्या. व तो कण्हत कुंथत जमीनीवर विव्हळ होऊन पडला. त्याची तशी स्थिति पाहून माझें अंतःकरण दयेनें द्रवून गेलें. मी त्याच्या मस्तकावर शिंपडण्यास पाणी आणण्याकरितां जाऊं लागलों तों इतक्यांत तेथें एक गृहस्थ आला व " शाबास, ललितकिशोर शाबास " असें मला उद्देशून ह्मणूं लागला. ज्याच्या तोंडून हे उद्गार निघाले तो साक्षात विजयकृष्ण बहादुरच होय. आजपर्यंत त्यांचें नांव मीं अनेकवेळां ऐकलें होतें. परंतु त्यांची माझी प्रत्यक्ष भेट ही पहिलीच होय. त्यांच्याकडे पहातांच मी जरा चपापल्यासारखा झालों. परंतु त्यांनीं मला धीर दिला. माझ्या पाठी-वरून मोठ्या प्रेमानें हात फिरवून ते ह्मणाले-' ललितकिशोर, मी तुझा लौकिक आज कित्येक दिवसपर्यंत ऐकत आहे. ईश्वर तुला उदंड आयुष्य देवो.'

मी त्यांना ह्मणालों-आपण यावेळेस इकडे कोणीकडे ? त्यावर राजेसा-हेबांनीं उत्तर केलें-कुलांगार बाळकृष्णानें मला दमवून सोडलें आहे. हा माझी अब्रु रुफई धुळीस मिळविणार. याच्यामुळें एक दिवस तोंड काळें करून जाण्याची माझ्यावर पाळी येणार अशी मला भीति वाटूं लागली आहे. असल्या कुसंतानापेक्षां निसंतान पुरवलें ! मला त्याच्यावर रात्रंदिवस पाळत ठेवावी लागते. लीलावतीवर जुलूम करण्याचा यानें प्रयत्न केला, परंतु तूं वेळींच येऊन तिची सुटका केलीस. त्यानंतर यानें तुला चिट्ठी लिहिली व तदनुसारच तुह्मी येथें आलात वगैरे सर्व साद्यंत हकीकत मला माहीत आहे. तुला मदत करण्यासाठीं ह्मणून मी या झाडींत लपून बसलों होतों, परंतु तशी वेळच आली नाहीं. पंचवीस बाळकृष्णास तूं एकटा भारी आहेस अशी आतां माझी खात्री झाली. या झटापटींत बाळकृष्ण जीवानिशींही जाता तर त्याबद्दल मला यत्किंचितही वाईट वाटलें नसतें.

राजेसाहेबांचें असें भाषण ऐकतांच मी त्यांचे पाय धरले व ह्मणालों-बाळकृष्णाची कशी काय तब्येत आहे तें पाहिलें पाहिजे. असें ह्मणून जवळच्या नदींत मी आपल्या धोतराचा पदर भिजविला व बाळकृष्णाजवळ गेलों. डोळे झांकून बाळकृष्ण अगदीं निपचित पडला होता. त्याला लागलेल्या चाटींतून थोडथोडें रक्तही बाहेर येत होतें. येवढ्याशा चाटीनें हा इतका बेशुद्ध कसा झाला याबद्दल मला फारच आश्चर्य वाटूं लागलें. ह्मणून मी राजेसाहेबांना ह्मणालों—याला चाट तर ह्मणण्यासारखी लागली नाहीं आणि हा असा बेशुद्ध कां पडला आहे ? राजेसाहेब ह्मणाले—तुला त्याचें लक्षण माहीत नाहीं. तो अशीं हजारों सोंगें करील. तूं आतां घरीं जा. याप्रकाराबद्दल बाहेर चकार शब्दही काढूं नकोस.

इतक्यांत राजेसाहेबांचे सेवकही तेथें येऊन हजर झाले व ते बाळकृष्णास मेण्यांत घालून घेऊन गेले. रस्त्यानें जातांजातां राजेसाहेब मला ह्मणाले - " तुला जर जखम वगैरे झाली असती तर मी तुलाही आपल्या घरीं घेऊन गेलों असतों. परंतु, सुदैवानें तशी वेळ आली नाहीं याबद्दल ईश्वराचे आभारच मानले पाहिजेत. " त्यांचा शिपाई घोडा घेऊन आला होता त्यावर ते स्वार होऊन आपल्या घराकडे गेले. व मी मागून पायींपायींच चालूं लागलों.

अलाहाबाद येथें बढतीच्या जागेवर जी माझी बदली झाली आहे, ती राजेसाहेबांच्या शिफारशीनेंच होय. याशिवाय येवढें हुद्देदारीचें काम मला इतक्या जलद मिळालें नसतें. झालें हें ठीक झालें. परंतु, हें पत्र तुला लिहिण्याचा माझा उद्देश वेगळाच आहे. या जगांत तुझ्याशिवाय दुसरी मला कोणतीही प्रिय वस्तु नाहीं. माझ्याबद्दल तुझ्या मनाची काय भावना आहे हें समजण्यास मी अत्यंत आतुर झालों आहे.

प्रकरण २२ वें.

माझ्या वर्तनाबद्दल तूं बिलकुल शंका बाळगूं नकोस.

राजा विजयकृष्ण हे मोठे कुलीन घराण्यातले असून चांगले धनाढ्य

होते. सरकारांतही यांचा चांगला मानमरातब असे. ते फार दयाळु व थोर मनाचे असल्यामुळें सर्व वर्गाच्या लोकांचें त्यांच्यावर प्रेम असे. यांचे एकुलते एक चिरंजीव बाळकृष्ण हे किती किंमतीचे होते याचा वाचकांना थोडासा मासला पहावयास मिळाला आहेच. बाळकृष्णास साधारण इंग्रजी येत होतें. उर्दू भाषाही त्यास थोडी अवगत होती. येवढ्या ज्ञानानेंच त्याला आपण सर्वज्ञ आहों अशी आढ्यता वाटत असे. आपण अमीराचे मुलगे आहों, या जगांत आपल्यापेक्षां श्रेष्ठ दुसरें कोणीही नाहीं असा त्यास अहंकार झाला होता. याची पुरी गध्धेपंचविशीही उलटली नव्हती, तरी वृद्ध, तरुण, राव रंकवगैरे सर्वांनीं आपल्यापुढें नमून असावें असें त्यास वाटे. तो नेहमीं वाईट लोकांच्या संगतींत वागत असे व आपल्या बापाचा पैसा कुकर्मांत व बदफैलीपणांत खर्च करीत असे.

ललितकिशोर किती सालस संभावित गृहस्थ होता याबद्दल आतां सविस्तर सांगण्याचें कारण नाहीं. राजा विजयकृष्ण यांच्या शिफारशीनेंच ललितकिशोरास नोकरी लागली. हल्लींही त्यास जी बढती मिळाली, तिचें कारण राजेसाहेबच होत. राजेसाहेब आपल्याबद्दल इतकी आस्था कां बाळगतात. हें ललितकिशोरासही मोठें कोडेंच होतें. गेल्या परिच्छेदांत त्या दोघांची अकस्मात् कारणामुळें भेट झाली ह्मणून सांगितलें आहे त्यापूर्वी ललित किशोराचें राजेसाहेबांशीं कधीं भाषणही झालें नव्हतें. कांहींएक संबंध नसतां राजेसाहेब आपल्या कल्याणाकरितां इतकी काळजी कां वहातात या बद्दल ललितकिशोरास अतोनात आश्चर्य वाटे.

ललितकिशोरास एका आईशिवाय दुसरें ममतेचें माणूस कोणीहि नव्हतें हें पूर्वी सांगितलेंच आहे. त्याच्या आईची रहाणी मोठी चमत्कारिक होती. ती सौभाग्यवती आहे किंवा गतभर्तृका आहे याचाही तिच्या चरित्रावरून उलगडा पडण्यासारखा नव्हता. बनारस हें मोठ्या तीर्थाचें स्थान; परंतु ती स्नानाला किंवा देवाधर्माला जाण्यास कधीं घराच्या बाहेरही पडत नसे.

ललितकिशोरनें आपला बाप कांहीं पाहिला नव्हता. आपल्या बापासंबंधानें तो आपल्या आईस एखादेवेळीं प्रश्न करी तेव्हां ती लांब सुस्कारा टाकून ह्मणे–तुझा बाप अद्याप हयात आहे. परतु तो कोठें आहे, धंदा काय करीत असतो, तो तुझ्या दृष्टीस केव्हां पडेल वगैरे मला कांहींही सांगतां

येत नाहीं. आईचे हे उद्गार ऐकून ललितकिशोरच्या मनांत नानाप्रकारचे विचार तरंग येत. आपल्या बापासंबंधानें आपल्याला कोठेंही माहिती लागत नाहीं. हें पाहून त्याला अत्यंत दुःख वाटत असे. तरी पण आपल्या आईच्या चालचलणूकीबद्दल त्याच्या मनांत कधींही संशय येत नसे. माझी आई महासाध्वी आहे. बापाबद्दल तिला सर्व हकीकत माहीत आहे. परंतु ती मला सांगण्यासारखी नसेल ह्मणूनच ती सांगत नाहीं; अशी त्याच्या मनाची पूर्ण खात्री होती. ललितकिशोरचा चेहरा उदास पाहून एके दिवशीं त्याची आई त्याला ह्मणाली—"बाळ, तूं घाबरूं नकोस. माझ्या चालचलणूकीबद्दल तूं यत्किंचितही शंका धरूं नकोस व यासंबंधानें मला तूं कांहीं विचारूं नकोस. मी तुला देवाची शपथ वाहून सांगते कीं मरण्यापूर्वी मी तुला या सर्व गोष्टींचा सविस्तर खुलासा कळवीन. तुला सर्व हकीकत समजली ह्मणजे तुझा संशय आपोआपच दूर होईल.' आपल्या आईचे हे शब्द ऐकून ललितकिशोरच्या मनास बरीच स्वस्थता आली; व यानंतर आपल्या बापासंबंधाची त्यानें आपल्या आईजवळ पुनः कधींही गोष्ट काढली नाहीं.

प्रकरण २३ वें.

उत्तराची निराशा.

एकवीसाव्या प्रकरणांत दिलेलें पत्र वाचून झाल्यानंतर बतसिया ह्मणाली—याचें उत्तर जरूर दिलें पाहिजे.

लीलावती—(थट्टेनें) तूं सल्ला दिलास ह्मणून बरें झालें. नाहींतर माझ्या कांहीं हें लक्ष्यांत आलें नसतें !

यास कांहींएक उत्तर न देतां बतसियानें कलमदान, कागद वगैरे लिहिण्याचें सामान लीलावतीपुढें आणून ठेविलें. लीलावतीनेंही थोडा वेळ विचार करून पत्राचा जबाब लिहिण्यास प्रारंभ केला. उत्तर लिहून झाल्यानंतर तें तिनें बतसियाजवळ देऊन तिला ललितकिशोराकडे रवाना केलें.

" बाळकृष्णाशीं झालेल्या झगड्यांत आपल्याला यश आलें हें ऐकून आनंद झाला. लाडलीच्या खटल्याचे वेळीं आपण येथें असणें अवश्य होतें. परंतु, होणाऱ्या गोष्टीस उपाय नाहीं. या संसारांत कोणी कोणाच्या सुखदुःखाचें वाटेकरी नसतें. आपल्या बऱ्या वाईट आयुष्यक्रमाबद्दल जो तो स्वतःच जबाबदार असतो. या गोष्टी मी आपल्याला सांगितल्या पाहिजेत असें नाहीं. असो. येथून गेल्यानंतर दर पंधराव्या दिवशीं तरी निदान खुशालीचें पत्र पाठवावें. "

अशा आशयाचें तें उत्तर होतें. लालावतीकडून आपल्याला अमुक प्रकारचें उत्तर येईल अशी जी ललितकिशोरची अटकळ होती ती या मजकुरानें समूळ नाहींशीं झाली. हें उत्तर वाचून त्यास फार वाईट वाटलें. आपण खुल्या दिलानें ज्या पत्रांत आपल्या प्रेमाचें आविष्करण केलें होतें त्या पत्राचें असें रूक्ष उत्तर येईल असें त्याच्या कधीं स्वप्नींहि आलें नव्हतें. ही स्वतः बोलेतोंपर्यंत आपल्या प्रेमासंबंधानें इच्या जवळ कधीं अवाक्षरही काढावयाचा नाहीं अशी त्यानें आपल्या मनाशीं पक्की गांठ बांधून ठेवली.

प्रकरण २४ वें.

सुगावा लागला.

रात्रींचे आठ वाजून गेले आहेत. दाट काळोख पडला आहे. जोराचा पाऊस पडून रस्ते पाण्यानें अगदीं थबथबून गेले आहेत. अशा वेळेस एका अरुंद गल्लींत असलेल्या एका घराच्या दारास एका इसमानें तीन वेळां धक्का दिला. त्याबरोबर आंतील एका इसमानें दरवाजा उघडला. घरांत जाणारानें दरवाजा उघडणारास विचारलें—सर्व लोक आले का? त्यास दुसऱ्यानें होय ह्मणून उत्तर देतांच दोघेही वर गेले. वरांत दुसरे आणखी तीन इसम होते त्यांना हा नवीन आलेला गृहस्थ ह्मणाला—" तोही आलाका? " त्यास एकानें उत्तर केलें—मी त्याची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला परंतु तो माझें कांहीं केल्या ऐकेना तेव्हां मी एकाटाच निघून आलों. यावर हा नवीन आलेला गृहस्थ सर्व जणांना आपल्याबरोबर

घेऊन घराच्या तिसऱ्या मजल्यावर गेला. तेथें दोन स्त्रिया बसल्या होत्या. त्यांना आपल्याबरोबर घेऊन घराच्या मागला भाग पहाण्यास गेला. परंतु अंधारामुळें त्याला तेथें कांहींच दिसेना. तेव्हां त्यानें आपल्याबरोबर आलेल्या इसमांना संकेत केला व तो शिडी लावून परसांतल्या घरांत उतरला. तेथून दुसऱ्या मजल्यावर चढून तो अंधारांत एका कोपऱ्यांत लपून बसला. समोरच्या माडीवर काय चाललें होतें हें तेथून त्याला सर्व दिसे.

हें घर लहान परंतु चांगलें मजबूत होतें. हा नवीन इसम माडींत चढला व त्यानें त्या माडीच्या सर्व दारांना कुलपें लावलीं. फक्त ज्या दारांतून त्याला पहावयाचें होतें तेवढें मात्र त्यानें मोकळें ठेवलें. ज्या दिवाणखान्यांतील प्रकार त्याला पहावयाचा होता त्या दिवाणखान्याचीं आजूबाजूंची सर्व दारें लावून घेतलीं होतीं. फक्त एक दार उघडें होतें त्यांतूनच त्याला आंतील देखावा दिसत होता. या दिवाणखान्यांत एक उत्तम पलंग टाकलेला होता; व त्या पलंगावर एक खुपसुरत तरुण स्त्री आरामांत पडली होती. तिच्या शेजारीं एक तरुण पुरुषही बसला होता. पलंगावर पडलेली स्त्री दुसरी कोणी नसून कलावती होय. व जवळ बसलेला तरुण मनुष्य बाळकृष्णच होता.

दिवाणखान्यांतील हा देखावा दृष्टीं पडतांच त्या मनुष्यानें आपल्या सोबत्याला खूण केली व संकेत समजतांच त्यानें सर्व मंडळी तेथें आणली. ते सर्वजण अंधारांत उभे होते. यामुळें दिवाणखान्यांतला सर्व देखावा त्यांच्या दृष्टीं पडे. इतकेंच नव्हे परंतु कलावती व बाळकृष्ण यांचा संवादही त्यांना ऐकूं येत होता. बाळकृष्ण व कलावती ह्यांना मात्र ह्यापैकीं कोणी माणूस दिसत नव्हतें. बाळकृष्ण व कलावती यांच्यामध्यें खालीं दिल्याप्रमाणें संवाद सुरू होता.

कलावती—प्राणप्रिया ! मी घरावर तुळशीपत्र ठेवून आपल्याबरोबर येथपर्यंत तर आले. आपली माझ्यावर आतां जी प्रीति आहे तीच निरंतर कायम राहील कशावरून ? तुह्मी जर मला मध्यंतरींच सोडून दिलें तर माझी अवस्था काय होईल ? मग मी कोठें जाऊं ? व कोणाशी लग्न लावूं ?

बाळकृष्ण—अद्याप सुद्धां तुला माझ्या प्रेमाबद्दल विश्वास वाटत नाहींना ? तुझी मूर्ति माझ्या हृत्पटलावरून कधींहि दूर होत नाहीं. या

जीवाची तूंच सर्वस्त्री मालकीण आहेस. मी तुझा बंदा गुलाम झालों आहे. जीवांत जीव आहे तोंपर्यंत तुला मी कधींहि अंतर देणार नाहीं. तूंच जर मला सोडून दिलेंस तर आत्महत्या करण्यापेक्षां मला दुसरा मार्गच उरला नाहीं.

कलावती—असें आपण कधींही समजूं नये. जीवांत जीव आहे तोंपर्यंत मी आपल्याला कधींहि अंतर देणार नाहीं. तुमचा माझा शास्त्रोक्त विवाह झाला नाहीं तरी बेहेत्तर; एकमेकांचा दिल एकमेकावर असला म्हणजे लग्नांतच काय अधिक आहे ?

बाळकृष्ण—तो नीच ललितकिशोर लवकरच येथून तोंड काळें करून जाणार.

कलावती—त्या मेल्याचें नांवही तोंडावाटे काढूं नका. त्या मेल्याचा मला असा राग आला आहे कीं, कधीं दृष्टीं पडला तर त्याचें शिर उडवून द्यावें असें मला वाटतें.

बाळकृष्ण—तो पापी तर येथून नाहींसा झाला. परंतु, तुझ्या शोधासाठीं लीलावतीच्या सांगण्यावरून गुप्त पोलीस प्रयत्न करीत आहेत असें ऐकतों.

कलावती—लीलावतीचें मी काय तीन चव्वल लागतें आहे ? ती माझा का पिच्छा पुरवीत आहे ?

बाळकृष्ण—गुप्त पोलिसला आपला पत्ता लागून त्यांनीं आपणां दोघांसही पकडलें तर मग काय होईल ?

कलावती—मग काय होणार आहे ? आपल्या केसासही धक्का लावण्याची त्यांची छाती नाहीं. मी कांहीं नेणती पोर नाहीं कीं कोणाच्या दबकावणीस भिऊन जाईन. तुमची आमची जर खुषी आहे तर आपल्याला कोण काय करणार आहे. '

बाळकृष्ण—शाबास, प्रिये, शाबास. तुझा हा खंबीरपणा असाच शेवटपर्यंत कायम राहील तर आपलें कोणाच्या हातूनही वांकडें होणार नाहीं. स्त्री जर राजीखुषीनें एखाद्या बरोबर राहण्यास तयार असेल तर कायद्यानें सुद्धां तिला प्रतिबंध करतां येत नाहीं. त्याप्रमाणेंच तिच्या संगतींत राहणाऱ्या पुरुषासही कायद्यांत कांहीं शासन सांगितलें नाहीं.

कलावती---मला कायदाबियदा कांहीं माहीत नाहीं. मला येवढें माहीत आहे आणि ते मी हजारजणासमोर सांगेन कीं मी तुमच्यावर आपक आहे. माझी तुमच्यावर प्रीति आहे. तुमच्या बरोबर मी खुषीनें घराबाहेर पडलें आहे. व तुमच्याबरोबर चैनींत आयुष्य घालविण्याचा माझा निश्चय झाला आहे.

बाळकृष्ण—(मोठया आनंदानें) आतां मला कशाचीही भीति उरली नाहीं. माझ्या हृदयावरचें मोठें ओझें हलकें झाल्यासारखें मला वाटत आहे.

" तुमच्या दोघांच्याही डोक्यावर पाय देणारा एक जबरदस्त इसम आहे हें तुह्मी पक्कें ध्यानांत ठेवा " असा बाहेरून एक आवाज आला.

प्रकरण २५ वें.

बापलेकांची गांठ.

हा आवाज ऐकतांच बाळकृष्ण व कलावती हीं दोघेही दचकलीं व जरा सावरून बसलीं. कलावती पलंगावरून खालीं उतरली व एका हातांत कंदील व एका हातांत पिस्तुल घेऊन बाळकृष्ण तडक दिवाणखान्याच्या बाहेर आला. बाहेर येऊन तो ह्मणाला— " तूं कोण आहेस ? कोणाच्या हुकुमानें तूं आंत आलास ? तुला दार कोणीं उघडलें ? " हे प्रश्न बाळकृष्णानें घाईघाईनें विचारलें. परंतु बाहेर असलेल्या इसमानें त्याचें उत्तरही दिलें नाहीं व तो जाग्यावरूनही हालला नाहीं. थोड्यावेळानें त्यान बाळकृष्णास उत्तर केलें. " तुझे डोळे गेले आहेत का ? मी कोण आहे हें तुला दिसत नाहीं काय ? मी तुझा समाचार घेण्याकरितां आलों आहे. कलावतीस तूं पळवून नेलीस या करितां मी तुला पकडणार आहे. " हें ऐकून बाळकृष्ण आपल्या नोकरास हाका मारूं लागला. परंतु नोकरास वर येतांच येणार नाहीं; कारण सर्व दारांना आतून कुलपें ठोकली आहेत असें या इसमानें बाळकृष्णाला सांगितलें. बाळकृष्णानें आपल्या हातचा कंदील खालीं ठेवला. पिस्तुल नीट संभाळून धरून तो त्या मनुष्यास ह्मणाला " तूं

पोलीस आहेस काय ?" त्या मनुष्यानें उत्तर दिलें–" आतां तुझे डोळे उघडले. मी पोलीस नाहीं. पण गुप्तपोलीस आहे. माझें नांव विश्वनाथ."

बाळकृष्ण—(धीटाईनें) आतां आपल्याला मी ओळखलें. आपल्याला घरांत यावयाचें होतें तर खालून मला हाका मारावयाची होती. परंतु तसें न करितां दुसऱ्या घराच्या कुसवावरून तुह्मी माझ्या घरांत शिरला हें तुह्मीं चोराप्रमाणें काम केलें. कायद्यानें आपण गुन्हा केला नाहीं का ?

विश्वनाथ—त्याबद्दल आपण माझ्यावर पाहिजे तर फिर्याद लावावी. परंतु, एका कुलीन स्त्रीस तुह्मी घरांतून काढून आणलीत याचा जबाब आपण काय देतां ?

बाळकृष्ण—मी तिला मुळींच काढून आणली नाहीं ती आपण होऊन घरांतून निघाली.

विश्वनाथ—असल्या लपंडावीनें आपली कधींहि सुटका होणार नाहीं.

बाळकृष्ण—मी तिला काढून आणली असा आपल्या जवळ तरी काय पुरावा आहे ?

विश्वनाथ—आमचा पुरावा ह्मणजे हें पत्र. हें पत्र आपण कलावतीला लिहिलें होतें.

हें ऐकून बाळकृष्ण मनांत जरा चपापला. " माझीं सर्व पत्रें कलावती फाडून जाळून टाकीत होती अशी माझी खात्री होती. आणि हेंच पत्र याच्या हातीं कसें लागलें ?" असें तो आपल्या मनाशीं पुटपुटला. " ही चिट्ठी माझ्या हलगर्जीनें कोठें तरी पडली असावी असें वाटतें " असें कलावतीनें आंतून उत्तर दिलें.

कलावती—एक सोडून हजार का पत्रें तुमच्याजवळ असेनात ! परंतु मी कांहीं कोणाच्या फुसलावणीनें घरांतून बाहेर निघाले नाहीं. माझी अब्रू खराब करण्याचाही कोणी प्रयत्न केला नाहीं. ज्याच्या बरोबर मी आपल्या खुषीनें आले त्याच्याबरोबरच मला जर विवाह लावायचा असला तर माझा कोण हात धरणार आहे ?

बाळकृष्ण (मोठ्या उमेदीनें) ऐकलें ना आपण ही काय ह्मणते तें ? यावर आपलें कांहीं ह्मणणें आहे का ? चला झटपट विचारा आणि आल्या रस्त्यानें चालते व्हा.

विश्वनाथ—मला पुष्कळ विचारावयाचें आहे. कलावती आपल्या मनाची मुखत्यार आहे का?

कलावती—मी कोणाची ताबेदारीण नाहीं. माझी मी मालकीण आहे. कायद्यानें सुद्धां मला मुखत्यारीचा अधिकार आला आहे. माझें वयही अठरा वर्षांच्या वर आहे.

विश्वनाथ—लीलावतीच्या येथील मौल्यवान् कपडेही आपण घेऊन आलांत!

कलावती—कोण ह्मणतो कीं हे कपडे लीलावतीचे आहेत ह्मणून? ते तिचे आहेत असें जर सिद्ध झालें तर मी ते तिचे तिला परत करीन. मी घरांतून पळून आलें असें जर आपण ह्मणत असाल तर तें साफ खोटें आहे. मी आपल्या राजीखुषीनें घर सोडलें; माझें कोण काय करणार आहे?

विश्वनाथ—आतां तर मी तुह्माला दोघांनाही पकडून कोतवालाच्या स्वाधीन करतों; मग पुढें काय होईल तें पाहतां येईल.

कलावती—कांहीं हरकत नाहीं. मी निर्दोषी ठरून आपल्या प्रियकरासह सुटून येईन अशी मला खात्री वाटते.

बाळकृष्ण—मला पकडण्याबद्दलचें तुह्मी जोंपर्यंत वारंट दाखविणार नाहीं तोंपर्यंत माझ्या अंगाला बोटही लावण्याची तुमची प्राज्ञा नाहीं.

यानंतर बाळकृष्णानें आपल्या नोकरास हाक मारून त्यास पोलीसला आणण्यास हुकूम केला. परंतु नोकर काय करतो बिचारा! थोरल्यादारासही आंतून कुलूप ठोकलें होतें.

विश्वनाथाबरोबर आणखीही दुसरीं कित्येक माणसें घरांत शिरलीं होतीं. तीं आंतील खोलींत छपून बसलीं होतीं. त्यांपैकीं एक गृहस्थ बाहेर येऊन बाळकृष्णापुढें उभा राहिला. त्याला पहातांच बाळकृष्णाचा चेहरा एकदम उतरला. तो मुकाट्यानें खालीं मान घालून उभा होता. हा नवीन आलेला गृहस्थ बाळकृष्णाचा बाप विजयकृष्णच होय.

विजयकृष्ण—(मोठ्यानें ओरडून) बेशरम. तूं माझी कवडीचीहि किंमत राखली नाहींस. या दुनियेंतून मी उठून जावें असें तूं मला केलेंस! असला कारटा मेलेलाही पुरवला! या स्त्रीस तूं आतां सोडून दे. असल्या बदफैलीनादांत पुनः कधींहि पडूं नकोस. नाहींतर माझ्या दौलतीवरचा

तुझा वारसा मी सपशेल नाहींसा करीन. भुकेनें व्याकूळ होऊन तुझे हाल हाल होऊन तुझे प्राण जाण्याची वेळ आली तरी मी तुला कवडीही देणार नाहीं हें खूप लक्ष्यांत ठेव. एखाद्या तिऱ्हाइतालाच मी सर्व इस्टेट देऊन टाकीन.

बाळकृष्ण—ठीक आहे. आपल्याला काय करावयाचें असेल तें करा. असल्या धमक्यांना हा मुलगा कधींही भीक घालणार नाहीं हें पक्कें लक्ष्यांत ठेवा. आपली दौलत मी कस्पटासमान लेखतों.

मुलाच्या तोंडचे हे शब्द ऐकून राजेसाहेबांचें अंग क्रोधानें लटलट कापूं लागलें. त्यांनीं क्रोधानें एकदा बाळकृष्णाकडे पाहिलें व तडक आपल्या घराचा रस्ता धरला. राजेसाहेब जावयास निघतांच विश्वनाथानें सर्व दारांचीं कुलुपें उघडलीं त्याबरोबर बाळकृष्णाचा नोकर महादेव व कलावतीची दासी हीं दोघेंही वर आलीं. दासी तहत कलावतीजवळ जाऊन बसली. महादेवास बाळकृष्णानें खालींच उभें राहाण्यास हुकूम केल्यामळें तो पुनः खालीं गेला.

विश्वनाथ येवढा मी मी ह्मणणारा; अशा प्रकारचे अनेक खटले त्याच्या हातून गेलेले पण त्याला सुद्धा बाळकृष्णाचा उद्धटपणा व कलावतीचा हलकटपणा पाहून अत्यंत आश्चर्य वाटलें. एका यःकश्चित स्त्रीच्या नादीं लागून बाळकृष्ण आपल्या बापाच्या दौलतीवर लाथ मारील असें विश्वनाथास कधींहि वाटलें नव्हतें. बाळकृष्णाशीं आणखी कांहीं बोलण्याचा विश्वनाथाचा विचार होता; परंतु इतक्यांत आंतल्या खोलींतून तोंडावर बुरखा घेऊन एक इसम बाहेर आला व त्यानें विश्वनाथास कानांत कांहीं सांगून आत नेलें.

हा प्रकार पाहून बाळकृष्णाच्या ध्यानांत आलें कीं विश्वनाथ येथें कांहीं एकटा नाहीं. खोलींत आणखीही कांहीं माणसें आहेत. तरी पण तो घाबरला नाहीं व आपल्या खोलींत जाऊन कलावतीस धीर देऊं लागला. कलावतीनें त्यास उत्तर केलें–प्रिया, आपण यत्किंचितही घाबरूं नये. सारी दुनिया एकीकडे व आपण एकीकडे असें मला वाटत आहे. माझ्याकरितां आपण आपल्या बापाच्या दौलतीवर लाथ मारली. त्याअर्थीं मी आपल्याकरितां काय करण्यास तयार होणार नाहीं ? ” कलावतीच्या तोंडचें हें भाषण ऐकताच बाळकृष्ण मिशीवर ताव देत बाहेर आला; व ज्या खोलींत विश्वनाथ गेला होता त्या खोलींत तो डोकावूं लागला.

———————

प्रकरण २६ वें.

थोर ते थोरच.

बाळकृष्णानें कलावतीस जें पत्र पाठविलें होतें तें ललितकिशोराजवळून घेऊन गोविंदचंद्रानें विश्वनाथास दिलें होतें. तेव्हांपासून विश्वनाथ एक-सारखा बाळकृष्णाच्या शोधांत होता. राजा गोविंदचंद्राचा खवास जंगी यानें, गेल्या प्रकरणांत ज्या घरांत बाळकृष्ण रहात होता ह्मणून सांगितलें त्या घरच्या पिछाडीसच बिऱ्हाड घेतलें होतें. त्याजकडून बाळकृष्ण व कलावती यांची सर्व हकीकत गोविंदचंद्रास समजे. जंगी यानें एकेदिवशीं खुद्द गोविंदचंद्रासही तेथील सर्व प्रकार दाखविला. त्यानें हा सर्व वृत्तांत राजा विजयकृष्णाच्या कानावर घालविला.

बाळकृष्ण व कलावती यांना खटल्याच्या पेंचांत आणण्याची कोणाचीही इच्छा नव्हती. कलावतीवर कसलाही आरोप आणण्याची लीलावतीची इच्छा नव्हती. समोपचारानें कलावती अद्यापही ताळ्यावर येईल तर तिला घरीं घेऊन जावें व मग पाहिजे तर तिचा बाळकृष्णाशीं यथाशास्त्र विवाह लावून द्यावा अशीच लीलावतीची इच्छा होती. परंतु त्या दोघांमधील नुकताच अश्लील संवाद जो तिनें एकिला त्यावरून कलावतीचें आतां नांवच सोडून देणें चांगलें असें तिला वाटूं लागलें.

विश्वनाथाच्या कानीं लागून ज्या गृहस्थानें त्याला आंत नेलें तो राजा गोविंदचंद्रच होय. लीलावती, तिची दासी बतसिया, राजा गोविंदचंद्र व त्याचा खवास जंगी इतकीं माणसें आतां त्या खोलींत होतीं. खोलींत गेल्याबरोबर राजा गोविंदचंद्र ह्मणाला, बाळकृष्णाचा त्याग करून राजा विजयकृष्ण येथून क्रोधानें व संतापानें निघून गेले. त्यांनीं आमचें बिलकुल एकलें नाहीं. एकंदरीनें ही फार वाईट गोष्ट झाली. राजा विजयकृष्ण यांचा स्वभाव मोठा करारी आहे. इकडचा सूर्य इकडे उगवेल; परंतु, त्यांचा निश्चय कदापि ढळणार नाहीं. आपली सर्व दौलत एखाद्या वाटेच्या चोराला ते नेऊन देतील; परंतु, बाळकृष्णास आतां कवडीही देणार नाहींत. बाळकृष्णाचें येवढें नुकसान झालें हें फार वाईट झालें.

विश्वनाथ—बाळकृष्णाकरितां अद्यापही तुह्माला व लीलावतीस इतकें वाईट वाटत आहे हें पाहून मला खरोखर फार आश्चर्य वाटत आहे. असो. यापुढें आतां काय करावयाचें ?

गोविंदचन्द्र—लीलावतीचें असें मत आहे कीं आतां कलावतीच्या वाटे जाऊं नये; तिच्या नशीबांत काय असेल तें होईल.

विश्वनाथ—(आश्चर्यानें) लीलावतीची ही मोठी चूक होत आहे. दुष्ट माणसास दंड हा देवविलाच पाहिजे.

लीलावती—बाळकृष्णास त्याच्या बापानें जो दंड केला आहे तसा दंड त्यास कोर्टाच्यानेंही देतां आला नसता. कलावतीसही कचेरींत नेण्याची माझी इच्छा नाहीं. कारण त्यापासून अधिक दुर्लौकिक व बदनामी याशिवाय कोणताही फायदा होणार नाहीं. कलावतीस आतां मला घरांतही घेतां येत नाहीं; व तिला आतां कुलीन स्त्रीप्रमाणें प्रतिष्ठेनें राहतांही येणार नाहीं. यापेक्षां तिला आणखी अधिक शासन तें काय व्हावयाचें.

विश्वनाथ—(कौतुकानें) आणि मी आतांच बाळकृष्ण व कलावती यांना कैद केलें तर !

लीलावती—त्यापासून कांहींही निष्पन्न होणार नाहीं. माझे कपडे गेल्या-बद्दल मी कलावतीवर कधींही फिर्याद लावणार नाहीं. किंवा बाळकृष्णास पंचांत आणण्यासाठीं त्यानेंच कलावतीस काढून नेलें असें जबानींत कधींही सांगणार नाहीं.

विश्वनाथ—मग आपण काय सांगाल ?

लीलावती—मी सांगेन कीं, हे कपडे तिचेच होते आणि ते तिनें मला विचारून नेले.

विश्वनाथ—गुन्हेगाराचा अशा रीतीनें बचाव केल्याबद्दल पातक लागेल. शिवाय कोर्टांत आपलें हें ह्मणणें चालणार नाहीं. कारण बाळकृ-ष्णाच्या हातची चिट्ठी माझ्याजवळ आहे.

लीलावती—सारा पुरावा आपल्याजवळ जय्यद असेल. परंतु आपण पाणी घालून वाढविलेल्या वृक्षाचा–मग तो विषवृक्ष का असेना उच्छेद करणें उचित नव्हे. ह्मणूनच सरकारदरबारांत जाणें मला योग्य वाटत नाहीं. सरकारदरबार करून ती जर सुखरूप हातीं लागती तर तेंही केलें असतें.

परंतु आतां तीही आशा नाहीं. तिनें आपल्या हातानेंच आपला सत्यनाश करून घेतला आहे. मेलेल्याला मारण्यांत काय थोरपणा आहे.

लीलावतीच्या मनाचा हा थोरपणा पाहून गोविंदचंद्र व विश्वनाथ या दोघांनाही मोठें कौतुक वाटलें. यांचें हें भाषण इतकें मोठ्यानें झालें कीं बाळकृष्ण व कलावती या दोघांनाही तें चांगलें ऐकूं गेलें. परंतु, त्यांना हें बोलणें त्यांच्या हिताचें असतांही कडू लागलें.

लीलावती ही घरांत आली आहे असें कलावतीस समजतांच ती बाळकृष्णास ह्मणाली–" पाहिलेंत ना ! तिला माझ्यापुढें प्रत्यक्ष येण्याचें धाडस होत नाहीं. " बाळकृष्णानें याला " यांत काय संशय! " येवढेंच उत्तर दिलें.

विश्वनाथ—ऐकलेंतना ती काय ह्मणते ती !

लीलावती—हो ऐकलें तर ! परंतु कांहीं हरकत नाहीं. ती वयानें माझ्यापेक्षां वडील आहे. तिला काय हवें तें बोलण्याचा अधिकार आहे.

यानंतर लीलावतीनें तेथच्या तेथेंच एक पत्र लिहून तें पाकीटांत बंद करून कलावतीस देण्यासाठीं विश्वनाथास विनंति केली. विश्वनाथानें तें पत्र आपल्या खिशांत ठेवलें, व एकदा शिटी वाजविली; त्या बरोबर " सर्व ठीक आहे " असा जबाब आला. तो ऐकतांच विश्वनाथ ह्मणाला—आतां आपण येथून जाण्यास कांहीं हरकत नाहीं.

प्रकरण २७ वें.

कोण हा नीचपणा.

सर्व लोक तेथून गेल्यावर बाळकृष्णानें महादेवास दरवाज्यास कडी लावण्यास सांगितलें व कलूटीस खालीं पाठवून तो कलावतीस ह्मणाला— प्रिये–पाहिलीस ना ? तिनें आज कशी वेळ आणली होती ती !

कलावती—नशीब समजा कीं येवढ्यावरच भागलें. लीलावतीनें माझ्यावर तोंडसुख घेण्यास कधींहि कमी केलें नसतें; पण तिला खात्री होती कीं आपण जास्त कमी बोललों तर आपलें व ललितकिशोर यांचेंही प्रकरण चव्हाट्यावर येईल. ती गप्प बसली ती उगीच नाहीं बसली. हजार रुपये किमतीच्या कपड्यावर उगीच नाहीं कोणी तुळशीपत्र ठेवणार !

कोण हा नीचपणा! वाचकहो, असा नीचपणाचा मासला तुम्हाला क्वचितच पहावयास सांपडेल.

बाळकृष्ण—या पत्रांत काय लिहिलें आहे हें तर पहाशील ?

कलावती—आपणच पहा. असल्या पत्रांना मी खेटराची सुद्धां किंमत देत नाहीं.

शेवटीं बाळकृष्णानेंच तें पत्र वाचून दाखविलें. त्यांतील आशय खालीं लिहिल्याप्रमाणें होता.

"हें प्रकरण इतक्या थरावर आलें ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट झाली. तरी पण प्रसंगवशात् तूं कोणत्याही अडचणींत पडलीस तर त्या वेळेस मला बेलाशक कळवीत जा. तुझ्या उपयोगी पडण्यांत माझी सदैव तत्परता राहील."

गाढवाला गुळाची चव किंवा कोंबड्यास रत्नाची परीक्षा काय असणार! इतक्या थोरपणानें लिहिलेल्या पत्राकडे कलावतीनें उगीच ढुंकूनसुद्धां पाहिलें नाहीं! या उद्दामपणाचें कलावतीस कसें प्रायश्चित्त भोगावें लागलें हें वाचकांना पुढें समजेलच.

प्रकरण २८ वें.

अंधारी रात्र पडली आहे अशा वेळेस एका तीन मजली घरांत काय प्रकार चालला होता तो पाहूं. या घराच्या पहिल्या मजल्यावर जिकडे तिकडे अगदीं शुक होतें. दुसऱ्या मजल्यावर फक्त एक दिवा मिण मिण जळत होता; व त्याठिकाणीं दोनतीन स्त्रिया निजलेल्या होत्या. तिसऱ्या मजल्यावर एका कोठडींत तीन चार इसम आपल्या तरवारी, सुरे वगैरे हत्यारें साफ करीत व आपापसांत कांहीं मसलतें करीत बसले होते. या इसमांच्या शेजारीं कित्येक पेले दारूनें भरलेले होते. त्याप्रमाणें हुक्क्याचीही रेलचेल चालू होती. वाचकांना आतां जो चमत्कार दाखवावयाचा आहे त्याकरितां या घराचे चौथ्या मजल्यावर गेलें पाहिजे तेथील प्रकार पहाणारास आपल्यावर असा प्रसंग पुन्हा जन्मांत येऊं नये असेंच वाटेल! चौथ्या मजल्यावरील दिवाणखान्यांत एक तरुण व सुंदर विश्वयोषिता हुक्का पीत

बसली होती. तिची उमर सुमारें २०।२२ वर्षांची असावी. तिच्या शेजारीं एक तरुण मनुष्य आपले डोळे पुशीत बसला होता. तो तिला ह्मणाला, ' गुलशन ! मनुष्यानें प्रेमाकरितां काय काय ह्मणून करावयाचें ? त्याला तरी कांहीं हद्द आहे. तूंच विचार कर कीं केवळ तुझ्यासाठीं किती तरी सायास केले. बापाची दौलत सर्व तुझ्या पायावर घातली. बहिणीची सर्व दौलत तुझ्याच घरांत भरली. तिला तुझ्याकरितांच दुनियेंतून नाहींशी केली. इतकें करूनही तूं आपल्या वचनाला जागत नाहींस ! तूं आपल्या खुदाची शपथ वाहून प्रथम जो माझ्याशीं करार केलास तो जरा तरी लक्षांत आण. मी हिंदु असूनही केवळ तुझ्यासाठीं आपल्या जातीचीही फिकीर बाळगिली नाहीं. त्याचा परिणाम शेवटीं असा व्हावा काय ! '

गुलशन—बस्स कर. आपलें चऱ्हाट आटप. तुला कांहीं अक्कल आहे काय ? आजपर्यंत कोणाही विश्वयोषितेनें आपलें इमान पाळलें आहे काय ? विश्वयोषिता, या शब्दावर विश्वास ठेवून वागतात ते पशूच समजले पाहिजेत. चल, चालता हो माझ्या घरांतून ! आपलें काळें तोंड मला पुन्हां कधींहि दाखवूं नकोस.

तरुण—कुलटे, बाहेरून इतकी सुंदर असून अंतर्यामीं तुझ्या हृदयांत इतकें कालकूट भरलेलें असेल अशी माझी कल्पनाहि झाली नव्हती. खरोखर दुनियेच्या रहाटीचा विचार न करितां मी तुझा भरंवसा धरला त्याचेंच मला आज प्रायश्चित्त मिळत आहे. बस्स बस्स. व्हायचें तें झालें. आतां येवढें तरी कर कीं, माझा दागिन्याचा डबा व माझी शिश्वीची पेटी एवढी माझ्या हवाली कर. माझ्या अंगांत पैसे मिळविण्याची जोंपर्यंत ताकद आहे तोंपर्यंत तुझ्यासारख्या अशा हजार बाजारबसव्या मी नोकरीस ठेवीन.

गुलशन—मला वाटलें होतें कीं, तुला थोडी तरी अक्कल आहे. बऱ्या बोलानें येथून चालता हो. नाहींतर पोलिसला बोलावून बसंतीचा खून करणारा तूंच आहेस असें मी त्यांना सांगेन. समजलास ?

तरुण—हरामखोर, तूं काय करणार नाहींस ! पण एवढें पक्कें समज कीं माझ्या गळयास जर फास लागला तर मीं तुला मोकळी सोडावयाचा नाहीं ? " बहिणीचा खून करून तिची सर्व दौलत मला द्याल तर तुमचें

माझ्यावर खरें प्रेम आहे असें मी समजेन " असें तुझ्या हातचें पत्र मजजवळ आहे हें तूं विसरलीस काय ?

हे तरुण गृहस्थ श्रीमान् बाबू जवाहिरलाल यांचे पुत्र व वसंतीचे बंधू निहालचंदच होत हें आमच्या वाचकांनीं जाणलेंच असेल.

निहालचंदाचें शेवटचें भाषण ऐकून गुलशन ह्मणाली "हें पहा आतां झालें तें झालें. आतां खुदाची शपथ घेऊन मी तुला खरोखर सांगतें कीं तेवढें माझ्या हातचें पत्र जर मला देशील तर मी तुला आमरणांत कधींहि अंतर देणार नाहीं.

निहालचंद—तुझ्या शपथेची किती किंमत आहे हें मला अद्यापहि समजलें नाहीं काय ? बाजारबसवीच्या शब्दावर किती विश्वास ठेवावा हें तूं मला आतांच शिकविलेस नां ?

गुलशन—(संतापानें) असें आहे तर तुला एक कवडीहि मिळत नाहीं. जा, काय हवें तें कर.

निहालचंद—तूं कोणत्या घमेंडींत आहेस ? वसंतीची जी वाट लावली तीच तुझी लावल्यावांचून मी येथून हलणार नाहीं, समजलीस !

हें एकतांच ' दगा, दगा, धांवा धांवा ' असा गुलशननें एकच ओरडा केला. तोंच कित्येक इसम ' धरा, पकडा ' करीत दिवाणखान्यांत धांवत आले. हे सर्वजण गुप्त पोलिसांतले लोक होते. त्यामध्यें आमच्या वाचकांचा परिचित विश्वनाथहि होता. या घरांत जितके पुरुष व स्त्रिया होत्या त्या सर्वांना त्यानें हातकड्या घातल्या. निहालचंद व गुलशन यांचीहि त्यांनीं हीच अवस्था केली. या सर्वांना चौकशीकरितां पोलिसठाण्यावर रवाना करण्यांत आलें. सर्व घर खुलें झाल्यानंतर विश्वनाथानें घराची झडती घेतली; व घरास कुलूप ठोकून व घरावर पहारा ठेऊन तो ठाण्याकडे चालता झाला.

प्रकरण २९ वें.

लाडली दोषमुक्त झाली.

लाडलीच्या मुकदम्यास सुरवात होऊन आज अकरा बारा दिवस झाले होते. आज त्या मुकदम्याचा निकाल होणार होता. जवाहीरलाल, निहालचंद, बाबू दलाल व परशुराम सराफ यांच्या माजिस्ट्रेटपुढें साक्षी झाल्या. कोतवालापुढें त्यांना जो मजकूर सांगितला होता तोच त्यांनीं माजिस्ट्रेटपुढेंहि सांगितला. पार्वतीनेंहि आपल्या साक्षींत पहिल्याप्रमाणेंच मजकूर सांगितला. ' माझ्या आईला कोणी ठार मारली व तिचे दागिने कोणी चोरून नेले. यासंबंधानें मला बिलकुल माहिती नाहीं. तिची चालचलणूक कशीहि असली तरी ती माझी आई होती, तेव्हां त्यासंबंधानेंहि मला कांहीं सांगावयाचें नाहीं. ' असें लाडलीनें साफ सांगितलें. लीलावतीचीहि कमिशननें साक्ष झाली. ' ज्या दिवशीं वसंतीचा खून झाला त्या दिवशीं लाडली माझ्या येथें होती, मीच तिला ठेवून घेतली होती. ' असें लीलावतीनें आपल्या जबानींत सांगितलें.

लाडलीवर मुकदमा सुरू झाल्यादिवसापासून राजा गोविंदचंद्र यांची एकसारखी खटपट चालूं होती. तिच्या तर्फे वकील बारिस्टर वगैरेहि त्यांनींच दिले होते. परंतु ही सर्व तजवीज लीलावतीच करीत आहे, अशी लाडलीची समजूत होती. खटल्यासंबंधानें मदत मिळण्यांत लाडलीच्या हितचिंतकांकडून यत्किंचितहि कसूर झाली नाहीं. न्यायाधीश, ज्यूरीच्या विचारानें आज खटल्याचा निकाल सांगणार म्हणून कोर्टांत लोक अगदीं आतुरतेनें वाट पहात बसले होते. राजा गोविंदचंद्र हेही कोर्टामध्यें हजर होते. लाडली सुटावी अशी कोर्टांत जमलेल्या सर्व मंडळींची मनापासून इच्छा होती. लाडलीच्या वतीनें वकीलांचें भाषण झालें. त्यानंतर न्यायाधिशानें ज्यूरीस खटला समजावून सांगितला, ज्यूरींतील गृहस्थ खटल्याचा निकाल काय द्यावा याचा विचार करण्याकरितां जवळच्या दिवाणखान्यांत गेले. एक तासानें ज्यूरींतील लोक परत येऊन न्यायाधिशास सांगूं लागले कीं ' अद्याप आमची एकवाक्यता होत नाहीं. "

यानंतर न्यायाधिशाच्या परवानगीनें आणखी दीड तासपर्यंत विचार करून ' लाडली निर्दोषी आहे ' असा सर्वांनीं आपला अभिप्राय दिला. हें एकताच कोर्टांत सगळीकडून आनंदाच्या गर्जना ऐकूं येऊं लागल्या. ज्यूरीचा हा निकाल न्यायाधिशानें जाहीर करून, त्यांनीं लाडलीस निर्दोषी ठरवून सोडून दिलें. त्यावर लाडली कचेरीच्या बाहेर आली. बाहेर एका चौचाकी गाडींत लीलावती बसली होती. लीलावतीनें खालीं उतरून लाडलीस आलिंगन दिलें व तिला आपल्या गाडींत घेतली. लाडली व लीलावती दोघीहि आनंदानें अगदीं वेडावून गेल्या. लीलावती लाडलीस आपल्याच घरीं घेऊन गेली.

प्रकरण ३० वें.

खरा खुनी सांपडला.

रात्रीचें आठ वाजून गेले होते. कचेरींत सगळीकडे दिवे लावले होते. लाडलीला दोषमुक्त ठरविल्याबद्दल न्यायाधिशास जो तो धन्यवाद देत होता. लाडलीच्या मुक्ततेनें लोकांस जो आनंद झाला त्याची कल्पना इतरास होणें अशक्य आहे. सुमारें एक तास झाल्यानंतर न्यायाधिशांनीं जवाहिरलालाला विचारलें " लाडली तर दोषमुक्त ठरली; आता वसंतीचा खून करणाराचा काय पत्ता ? " या प्रश्नाचें उत्तर जवाहीरलाल देणार इतक्यांत एक तरुण स्त्री व एक तरुण पुरुष यांना घेऊन पोलिसलोक न्यायाधिशासमोर आले, व विश्वनाथ न्यायाधिशांना एकदम ह्मणाला ' वसंतीचा खून करणारा निहालचंद आहे; त्यास आपणापुढें पकडून आणलें आहे. विश्वनाथाच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच जवाहिरलाल एकदम मूर्च्छा येऊन जमीनीवर धाडादिशी पडला ! त्याला शुद्धीवर आणण्याकरितां बरेंच प्रयत्न करून पाहिले. परंतु त्यांचा कांहीं उपयोग न होतां अखेर जवाहिरलालास इस्पितळांत पाठवावें लागलें..हा प्रकार होत आहे तों रात्रीचे दहा वाजून गेले. निहालचंद व ती तरुण स्त्री यांस अटकेंत ठेवण्याचा हुकूम करून न्यायाधिशांनीं कचेरी बरखास्त केली.

प्रकरण ३१ वे.

लाडली लीलावतीच्या येथें राहिली.

लीलावती लाडलीला आपल्या घरीं घेऊन आली. इकडच्या तिकडच्या सुखासमाधानाच्या गोष्टी बोलण्यांत त्यांनीं सर्व रात्र घालविली. लाडली दोषमुक्त होऊन सुटली याबद्दल लीलावतीनें आपलें घरीं त्या दिवशीं मोठा उत्सव केला. गोरगरिबांना अन्नदान केलें, विद्वान ब्राह्मणांना दक्षिणा वाटली; रात्रीं सुंदर दीपोत्सव केला. लीलावतीच्या सर्व आयुष्यांत तो दिवस अत्यंत आनंदाचा गेला. त्या रात्रीं लीलावतीकडून लाडलीस राजा गोविंदचंद्रासंबंधानें सर्व हकीकत समजली. निहालचंदाच्या कचार्टीतून आपली सुखरूप सुटका झाली यास कारण राजेसाहेबांची मदतच होय, हेंहि तिला आतां समजलें. गोविंदचंद्रासंबंधानें लाडलीच्या मनास काय वाटलें असेल याची कल्पना कोणासही होण्यासारखी आहे.

लीलावती व लाडली यांच्यामध्यें गोविंदचंद्रासंबंधानें बराच वेळपर्यंत विनोदपर संवाद झाला. त्यानंतर गोविंदचंद्राला घेऊन येण्यास लीलावतीनें आपल्या दासीस रवाना केलें. थोड्याच वेळांत गोविंदचंद्र तेथें येऊन दाखल झाले.

गोविंदचंद्र—कां आज मला इतक्या तातडीनें बोलावणें पाठविलें ?

लीलावती—दिवसा आपण उद्योगांत असतां; तेव्हां बोलण्यास निर्बंध वेळ सांपडत नाहीं. ह्मणून आपणांस आतांच बोलावून आणावें, असा लाडलीचा फारच आग्रह पडला ह्मणूनच आपणास बोलावणें पाठविलें.

लीलावतीचें हें भाषण ऐकून लाडली फारच लाजून गेली. यानंतर त्यांचें बराचवेळपर्यंत संभाषण व थट्टामस्करी होऊन गोविंदचंद्र परत गेले.

लाडली व गोविंदचंद्र यांचा लौकर विवाह व्हावा अशी लीलावतीची इच्छा होती. परंतु निहालचंदाच्या खटल्याचा निकाल होईतोंपर्यंत विवाहाची गोष्ट बोलूं नये असें तिला गोविंदचंद्रानें सांगितलें होतें. खटल्यांतून सुटल्यापासून लाडली लीलावतीच्या येथेंच रहात असे. कारण खुनाचा निकाल लागेतोंपर्यंत तिच्या घरावर पोलिसचा पहारा कायम होता.

प्रकरण ३२ वें.

खुनाचा मुकद्दमा

आज न्यायासनापुढें निहालचंदाच्या मुकद्दम्याची सुनावणी सुरू होणार सुनावणीच्या आरंभीं खालीं दिल्याप्रमाणें विश्वनाथाची जबानी झाली.

'माझें नांव विश्वनाथ. मी आज वीस वर्षें गुप्तपोलिसमध्यें नोकरी करीत आहे. ज्या दिवशीं वसंतीचा खून झाला त्या दिवशीं माझ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं मला बोलावून नेऊन खुनाची सर्व हकीगत सांगितली; व त्याची चौकशी करण्याचें काम माझेकडे दिलें. तेव्हांपासून वसंतीच्या घरीं जाऊन मी या मुकद्दम्याची चौकशी सुरू केली. माझ्या चौकशींत जवाहिरलाल व निहालचंद यांनीं व्यत्यय आणण्याचा बहुत प्रयत्न केला—तरी पण अखेर या खुनाचा पुरा तल्लास लागून मला अखेर यश आलें हें सांगण्यास समाधान वाटतें. वसंतीच्या प्रेताची मी तपासणी केली. त्यावरून ती बदचालीची असावी असा माझ्या मनाचा निश्चय झाला. तिचा खून लाडलीसारख्या अल्लड मुलीच्या हांतून झाला नसून कोण्यातरी पुरुषाच्या हांतून ती मारली गेली असावी असेंहि मला खास वाटूं लागलें. कुलीन स्त्रीच्या घरांत न शोभणाऱ्या अशा कित्येक वस्तू व बीभत्सप्रकारच्या तसबिरा माझ्या दृष्टीस पडल्या. ज्या इसमानें इचा खून करून इची जिनगी लांबविली त्या इसमाच्या हांतून तेथें एक सुरी विसरली होती ती सुरी रक्तानें भरली असून ती लाडलीच्या खोलींत अशी सफाईनें फेंकून दिली होती कीं हा गुन्हा लाडलीवर शहाजोग शाबूद व्हावा. वसंतीला मारणारा निहालचंदच असावा असें प्रथमपासूनच माझी मनोदेवता मला सांगूं लागली. निहालचंदाची हालचाल पाहण्यासाठीं मीं एका इसमाची मुद्दाम योजना केली होती. वसंतीच्या घराची झडती घेत असतां तिच्या पिकदाणींत मला एक पत्र सांपडलें, तें मी साफ धुवून काढून सूक्ष्मदर्शक यंत्रानें वाचलें. त्या पत्रावरून ती स्त्री खराब चालीची असावी असें पक्कें शाबूत झालें.

वसंतीस मारणारा व तिची जिनगी लांबविणारा तिचा भाऊ निहालचंदच असून त्यानें ती जिनगी गुलशन नांवाच्या रंडीस नेऊन दिली असा पक्का शोध

लागल्यावरून याला व बाकीच्या सर्व मंडळीस पकडून कोर्टापुढें हजर केलें आहे. येथें हेंहि सांगितलें पाहिजे कीं, त्यावेळेस आह्मी निहालचंदाला पकडलें नसतें तर तो गुलशनच्या माणसांकडून मारला गेला असतां. गुलशनच्या घरीं हत्यारेंहि होतीं. हीं हत्यारें बिगरपरवाना वापरण्यांत येत असत हेंहि उघडकीस आलें. यापेक्षां याप्रकरणीं मला अधिक कांहीं सांगावयाचें नाहीं.'

या नंतर निहालचंदाची जबानी झाली. तो ह्मणाला माझें नांव निहालचंद माझा जन्म आग्र्यास झाला. माझ्या लहानपणींच माझें आईबाप मरण पावलें. माझ्या काकानें लहानपणीं माझें पालणपोषण केलें. मी नऊं दहा वर्षांचा झालों तेव्हां त्यानें मला काशीस आणलें. त्यानंतर माझा काका कोठें गेला याजबद्दल मला बिलकूल माहिती नाहीं. तेव्हांपासून जवाहिरलालानें आपल्या अपत्याप्रमाणें माझा प्रतिपाळ केला. वाईट मुलांच्या संगतींत काळ घालविल्यामुळें माझें लिहिणें वाचणें वगैरे कांहींएक झालें नाहीं. जसजसा मी वयानें वाढत चाललों तसतसा मी अधिकच दुर्वृत होऊं लागलों. बहिणभावाची सुद्धां मला ओळख राहिली नाहीं. माझी बहीण वसंती इच्याशीं माझा वाईट प्रकारचा संबंध होता. माझा मेहुणा गोपीचंद यासहि विषप्रयोग करून मींच ठार मारलें. परंतु तें प्रकरण आजपर्यंत तसेंच दबून राहिलें. माझें लग्नहि झालें होतें; परंतु वसंतीच्या नादीं लागून मी आपल्या बायकोलाही परलोकीं पाठविलें. पुढें माझ्या दुर्दैवानें ओढ घेऊन गुलशनचा व माझा परिचय झाला. माझी आई यापूर्वींच मरण पावली होती. बापाची दौलत, बहिणीची दौलत या दोहोंचाहि मींच मालक असल्यामुळें मला पैशाची बिलकुल कमतरता नव्हती. गुलशनच्या मनास वाटेल ती वस्तु मजकडून तिला मिळूं लागली. बहिणीला मीं ठार मारावी ह्मणून गुलशन मला मसलत देऊं लागली व गुलशनचा नाद मी सोडून द्यावा ह्मणून वसंतीचें माझ्यामागें टुमणें लागलें. परंतु अखेर गुलशनचाच माझ्यावर अधिक पगडा बसून माझ्या हातून वसंती मारली गेली. वसंतीकडे आणखीहि कित्येक पुरुषांचें येणें जाणें असें. वसंती अलीकडे माझ्याशीं जरा दूरदूरच वागे. वसंतीकडे राजा विजयकृष्णाचा मुलगा बाळकृष्ण हाही येत असे. बाळकृष्णाच्या मोहांत ती पूर्णपणें सांपडून आपली कन्या लाडली इचा विवाह बाळकृष्णाशीं करण्याचेंहि तिनें ठरविलें. बाळकृष्ण हा पक्का बदमाष मनुष्य

आहे. त्यानें लीलावतीची बहीण कलावती इजवर नजर ठेविली. वसंतीची दुष्ट दासी कलुटी इला त्यानें कलावतीजवळ नोकरीस ठेवण्याचा घाट साधला. एके दिवशीं रात्रीं मध्यान्हीस मी लाडली घरीं नाहीं असें पाहून वसंतीचा खून केला व तिच्या रक्तानें भरलेली सुरी लीलावतीच्या खोलींत टाकून दिली. तिचा सर्व ऐवज मी गुलशनला नेऊन दिला. सकाळीं मी आपल्या बापाशीं गप्पागोष्टी बोलत असतां वसंती मारली गेल्याची बातमी पार्वती येऊन सांगूं लागली. ही बातमी ऐकून माझा बाप घाबरून गेला. बाबू दलाल व परशुराम सराफ यांनां दोनदोनशें रुपये देऊन लाडलीच्या विरुद्ध साक्षी देण्यास तयार केलें. लाडलीवर मीं सर्व खोटा खटला उभा केला. लाडली ही फार प्रामाणिक व सुशील मुलगी आहे. मी आपल्या बापाचे व वसंतीचे बँकेमध्यें असलेले रुपये खोटे चेक तयार करून लांबविले. गुलशनला जो मी ऐवज नेऊन दिला तो अद्याप जशाचा तसाच आहे. त्यांतली एक पैहि खर्च झाली नाही. ”

निहालचंदानें हा जो कबूलजबाब दिला याचें श्रेय विश्वनाथास आहे. त्यानें हें सर्व प्रकरण असें शहाजोग पकडलें कीं निहालचंदास खरा प्रकार सांगितल्यावांचून सुटकाच राहिली नाहीं ! त्यानें केवळ आपलाच गुन्हा कबूल केला असें नसून त्यास सामील असणाऱ्या दुसऱ्याही गुन्हेगारांची पटापट नांवें सांगितलीं.

जवाहिरलाल अद्याप इस्पितळामध्यें पडून असल्यामुळें त्याची जबानी झाली नाहीं. यानंतर गुलशनची साक्ष झाली. तिनें सर्व मजकूर निहालचंदाप्रमाणेंच सांगितला. फक्त निहालचंदास ठार करण्याचा आपला बेत होता हें लपवून ठेवण्याचा बराच वेळ तिनें प्रयत्न केला, परंतु अखेर तेंहि तिच्या तोंडून निघालें ! गुलशनच्या येथील दुसरे जे इसम व दोन स्त्रिया धरून आणल्या होत्या, त्यांनींहि भराभर खरा प्रकार सांगितला.

आरोपितांचे कबूलजबाब मिळाल्यामुळें खटल्याचा ताबडतोब निकाल लागला. निहालचंद यास काळ्या पाण्याची शिक्षा झाली. व बाकीच्या सर्व जणासही अशाच कडक शिक्षा सुनावण्यांत आल्या. दहा हजारांच्या नोटा

असलेली शिश्वीची पेटी व दागिन्यांचा डबा हीं लाडलीस मिळून लाडलीच्या घरावरचा पोलिसचा पहारा उठला. जवाहिरलालास वेड लागून तो रस्त्यानें उवडानागडा हिंडूं लागला. परंतु लाडलीनें त्यास आपल्या घरीं आणून त्याची अन्नपाण्याची चांगली तरतूद ठेविली. लाडलीच्या घरावरील पोलिसचा पहारा उठला, तरी ती अद्याप लीलावतीचें घरींच रहात होती.

आतां आपण बनारसचें वातावरण सोडून अलाहाबादेस ललितकिशोरास भेटावयास जाऊं.

प्रकरण ३३ वें.

गोपन स्फोट.

अलाहाबाद हायकोर्टांत पेषकारीचें कामावर ललितकिशोरची बदली झाली हें मागें सांगितलेंच आहे. अलाहाबाद येथील एका प्रसिद्ध महाल्ल्यांत एक छानदार घर घेऊन ललितकिशोर आपल्या आईसह तेथें राहूं लागला. ललितकिशोराच्या घरीं आणखीहि दोन माणसें होतीं. त्याच्या घराच्या पूर्व पश्चिम बाजूस दोन दालनें होतीं. त्या दालनांत व या घरांत वागण्याचे दोन्ही बाजूस समाईक दरवाजे होते. पश्चिम बाजूच्या दालनांत एक प्रवाशी अलिकडेच येऊन राहिला होता. याची व ललितकिशोराची एकदोनदां मुलाखत झाली होती. परंतु विशेष बोलणें चालणें कांहीं झालें नव्हतें. अर्थात् त्यांचे एकमेकांकडे जाणें येणेंहि बेताबाताचेंच असे. ललित किशोरच्या आईचें वय या वेळेस केवळ ३५।३६ वर्षांचें होतें. परंतु हृद्रोगामुळें ती ४९ वर्षांची असावी असें पहाणारास वाटे. तिचें स्वरूप मूळचें फार सुंदर असे. परंतु जरेनें तिच्यावर अकालीं घाला घातल्यामुळें, तें पार बदलून गेलें होतें.

ललित किशोराचें वय यावेळीं २०।२२ वर्षांचें होतें. परंतु लीलावतीमुळें त्याच्या मनास तळमळ लागून राहिल्याकारणामुळें त्याच्या चेहऱ्यावरची तारुण्याची झांक जाऊन तोहि मलूल दिसूं लागला होता. याप्रमाणें ललितकिशोर व त्याची आई यांचा आह्मी वृत्तांत सांगितला. आतां ललित-

किशोरच्या जवळ राहणारे दोन प्रवासी कोण होते त्यांची हकीकत थोडक्यांत सांगूं. यांच्यापैकीं एक जणाची नुकतींच चाळिशी उलटली होती. परंतु काळजीमुळें त्याच्या तोंडावर साठीची कळा आली होती. दुसऱ्याची अवस्था फार चमत्कारिक होती. त्याची गणना तरुणांत करावी, किंवा मध्यम वयस्कांत करावी, किंवा अगदीं ह्मताऱ्यांतहि त्याची गणना करावी ! त्याचे केस सगळें पिकून गेले होते; तरी त्याची ताकद एखाद्या मी मी ह्मणणाऱ्या तरण्या बांडास देखील मागें सारील अशी होती ! यांची खरीं नांवें अद्याप आह्मास समजलीं नाहींत तरी आपण त्यांना वसंत व मदन या दोन नांवांनीच ओळखूं.

तिसराप्रहर झाला होता. रविवारचा दिवस असल्यामुळें ललितकिशोर कचेरीस गेला नव्हता. तो आपल्या सज्यांत कांहीं लिहीत बसला होता. त्याची आई तेथें जवळच बसली होती ! ती त्याच्याशीं मधून मधून बोलत असें व तोहि तिच्या बोलण्यास उत्तरें देत असे. त्याची आई ह्मणाली—"लाडली सुटल्याची बातमी ऐकून माझा जीव खालीं पडला. धन्य त्या गोविंदचंद्राची. त्यानें तिच्यासाठीं आठ दहा हजार रुपयांची रक्कम खर्च केली.

ललित०—आई, राजा गोविंदचंद्रासारखा सज्जन माणूस या दुनियेंत क्वचितच् सांपडेल !

आई—कित्येक महिने झाले, तूं येथें आल्यापासून लीलावतीकडील खबर कांहींच समजली नाहीं. तिला एखादें पत्र तरी पाठीव.

ललित०—आई, तुला वेड तर नाहीं लागलें ? विशेष घरोबा असल्याशिवाय एखाद्यास पत्र पाठविणें उचित आहे काय ?

ललितकिशोरानें असें उत्तर कां केलें हें आमच्या वाचकांना सांगायला नकोच.

आई—घरोबा ह्मणण्यासारखा नाहीं. परंतु चारदोन वेळां तिची माझी गांठ पडली. तेवढयानेंच माझें तिच्यावर प्रेम बसलें आहे. नारायण करो आणि ती बिचारी खुशाल असो.

लीलावतीच्या बद्दल आईच्या तोंडून हे उद्गार ऐकून ललितकिशोराची स्थिती फारच चमत्कारिक झाली. हिला आतां उत्तर काय द्यावें याचा तो विचार करूं लागला. परंतु इतक्यांत दुसरेंच एक प्रकरण उपस्थित झालें.

ललितकिशोरच्या घराजवळ जे दोन गृहस्थ रहात होतें ह्मणून वर सांगितलें त्यांपैकीं एकानें समोरचा दरवाजा उघडला. त्याची व ललितकिशोरच्या आईची दृष्टादृष्ट होतांच दोघेहि आपापल्या मनांत चपापल्यासारखे झाले. आपण इकडे कोणीकडे असा दोघांनींहि एकमेकांस घाबऱ्या घाबऱ्या प्रश्न विचारला. हा गृहस्थ वसंत होय. या परक्या माणसाशीं आपल्या आईची ओळख कुठली? याबद्दल ललितकिशोरला फारच आश्चर्य वाटलें.

ललित—आई, हे गृहस्थ कोण आहेत?

आई—बाळा, मी एका भयंकर संकटांत असतां ज्यांनीं मला अमूल्य सहाय्य केलें तेच हें भले गृहस्थ होत. ते मला सख्याभावाप्रमाणें आहेत. (वसंताकडे पाहून) बाबू प्रमोद कुमार, त्यादिवशीं संध्याकाळीं मी विवश होत्साती रस्त्यांतून चालले होते, त्यावेळेस आपण मला सहाय्य केलेंत त्याची आपणास आठवण आहे काय? त्या गोष्टीस आज वीस वर्षे लोटलीं! तरी तेव्हांपासून आपल्या नांवाचा मी एकसारखा जप करीत आहे.

आईच्या तोंडचें हें विचित्र भाषण ऐकून ललितकिशोर अगदीं घाबरून गेला. तो आपल्या आईकडे व प्रमोदकुमाराकडे एकसारखा टक लावून पाहूं लागला.

वसंत हा दुसरा कोणी नसून लीलावतीचा बाप प्रमोदकुमारच होय. याची आपली आज सोळा सतरा वर्षांनीं गाठ पडत आहे. हें आमच्या वाचकांनीं ओळखलेंच असेल.

ललितं०—आई, हे गृहस्थ कोण आहेत, तुझी यांची गाठ कशी व कोठें पडली हा सर्व मजकूर मला सांगण्यासारखा आहे काय?

आई—होय, बाळा, आज मी आपलें सर्व जीवनचरित्र तुला साद्यंत सांगणार आहे. आजपर्यंत ज्या गोष्टी तुला माहीत नव्हत्या त्या आतां सर्व कळणार आहेत. (प्रमोदकुमारास उद्देशून) महाराज, आपण जरा वर याल काय? आज मी आपल्यासमक्ष माझ्या मुलाला मी आपली सर्व हकीगत सांगणार आहे.

प्रमोदकुमार—बाई, मी आपल्या आजोबासमवेत वर येतो. थोडा वेळ दम धरा.

प्रमोदकुमाराचा हा आजा कोण होता या बद्दलची हकीकत वाचकांना पुढें समजेल.

आई—ते जर आपलें आजोबा असतील तर ते माझेहि आजोबाच लागतात. त्यांच्या समोर बोलण्यास मला काय हरकत आहे ?

हें बोलणें झाल्यानंतर प्रमोदकुमार आपल्या आजोबास घेऊन ललितकिशोरच्या खोलींत आला व ललितकिशोरची आई आपला जीवनवृत्तांत सांगण्यास प्रारंभ करणार तोंच ललितकिशोर आहेत काय ? असे ह्मणून एकानें दारावर थाप मारली. ललितकिशोरनें 'आहे' ह्मणून सांगतांच आपल्या नांवची एक तार आहे असें त्या इसमानें सांगितलें. खालीं धावत येऊन ललितकिशोरनें तार घेतली. वर येऊन तो ह्मणाला, 'आई, ही तार बनारसहून राजा विजयकृष्णाकडून आली आहे. परंतु या तारेंतील संदर्भ माझ्या ध्यानांत येत नाहीं ! '

आई—तारेंत काय लिहिलें आहे ?

ललित०—'माझी जगण्याची आशा नाहीं. याकरितां तार पोहचतांच आपण ताबडतोब निघून यावें. आपल्या आईलाही बरोबर घेऊन येण्यास अनमान करूं नये. विशेष मजकूर येथें आल्यावर समजेल ! ' ऐकलेस कां ? राजेसाहेब मला बोलावताहेत आणि तुलाहि बरोबर घेऊन येण्याकरितां लिहितात; हें काय ?

आई—(डोळ्यांत आंसवें आणून) बाळा, हे माझे पती व तुझे बाप होत.

ललितकिशोर आश्चर्यानें अगदीं वेडावून गेला. हें पाहतांच त्याची आई ह्मणाली 'बाळा असा घाबरूं नकोस. तुझी आई कांहीं कुलटा नाहीं हें मी तुला पहिल्यापासूनच बजावून सांगितलें होतें. आतां विलंब लावूं नकोस. बनारसला चलण्याची जलदी कर. मरतेसमयीं तरी त्यांची माझी भेट होऊं दे. त्यांच्या समोरच मी आपली तुला कहाणी सांगेन.

हें प्रकरण मध्येंच उपस्थित झाल्यामुळें ललितकिशोराची आई प्रमोदकुमारासमक्ष जो आपला वृत्तांत सांगणार होती तो तसाच राहून गेला. बनारसला जाण्याची सर्व बांधाबांध करण्यास नोकरास सांगून ललितकिशोर वरिष्ठ अधिकाऱ्याची रजा मागण्याकरितां तडक चालता

झाला. अर्ध्या तासांतच परत येऊन ललितकिशोर सांगूं लागला, ' आई, मला रजा मिळेना. ह्मणून मी आपल्या नोकरीचा तत्काल राजीनामा दिला. आतां आपण बनारसला जाऊं; पुढें काय व्हावयाचें असेल तें होईल.

तार आल्यापासून आईचा जीव बनारसकडे गुंतला होता. मुलानें नोकरीचा राजीनामा दिला याबद्दल तिला यावेळीं कांहींच वाटलें नाहीं. बनारसला निघावयाचें हें ऐकतांच ती उठून एकदम चालावयास लागली. प्रमोदकुमार ललितकिशोरास ह्मणाला ' आह्मासहि बनारसेसच यावयाचें आहे. तर आपण सर्व बरोबरच जाऊं.

प्रकरण ३४ वें.

विलक्षण दिवस.

आह्मीं मागें सांगितलेंच आहे कीं मरण्यापूर्वी विपिनबिहारीनें एक मोहरबंद पेटी मानकुमारीस देऊन तिला सांगितलें होतें कीं जेव्हां लीलावती वयांत येईल तेव्हां तिला ही पेटी द्यावी. पेटीवरही लीलावतीस उद्देशून असें लिहिलें होतें कीं ' ज्या दिवशीं तुझें सोळावें वर्ष पुरें होईल त्या दिवशीं ही पेटी उघड—व त्या पेटींत काय आहे हें पाहून मग आपला विवाह कर ' आज लीलावती पुरी सोळा वर्षांची झाली. आजच लाडली आपलें घर पहावयास गेली. हा अवसर पाहून लीलावतीनें आपल्या खोलीचा दरवाजा बंद करून घेतला, व आपल्या बापाची पेटी उघडली.

या पेटींत दोन चित्रें व दोन चिठ्ठया होत्या. चित्रें कोणाचीं होतीं हें पुढें समजेल. प्रमोदकुमार ज्यावेळेस गांव सोडून गेला त्यावेळेस त्यानें विपिनबिहारीला एक चिठ्ठी लिहिली होती व दुसरी लिलावतीकरतां विपिनबिहारीनें लिहून ठेवली होती. या दोन्ही चिठ्या लीलावतीनें फोडून वाचल्या. प्रमोदकुमारानें विपिनबिहारीस जी चिठ्ठी लिहिली होती त्या चिठ्ठींतील मजकूर येथें सांगण्याची अवश्यकता नाहीं. विपिनबिहारीनें लीलावतीस उद्देशून लिहिलेल्या चिठ्ठींत खालील प्रमाणें मजकूर होता.—

" मी मोठा पापी आहे. माझें जीवनचरित्र जर तुला सर्व समजेल तर तूं माझ्या नांवाचा कधीं उच्चारही करणार नाहींस. मीं आपलें कृष्णमुख तुला दाखवावें अशी माझी योग्यता नाहीं, ह्मणूनच मी या जगांतून आपलें बिऱ्हाड हालवितों. बनारस येथील एका विख्यात जोतिष्यांकडून भविष्य कालसंबंधानें मला कांहीं गोष्टी समजल्या आहेत. तुझा बाप प्रमोदकुमार व त्याचा आजा सुजनकुमार यांची तुझी याच दिवशीं गांठ पडेल. तुझा बाप व पणजा यांचे तोंडून तुला माझें चरित्र समजेल. मी आपलें संक्षिप्त चरित्र एका कागदावर लिहून तो एका पितळ्याच्या डब्यांत बंद करून ठेवला आहे व तो डबा तूं बसतेस त्या खोलींतच पुरून ठेवला आहे. तुझा बाप व पणजा हे जेव्हां आपला वृत्तांत सांगूं लागतील तेव्हां हा डबा बाहेर काढ. कारण यांत तुला पुष्कळ गुप्त गोष्टी पहावयास सांपडतील. तुझा विवाह एका राजाबरोबर होऊन तूं मोठ्या आनंदानें संसार करशील कलावतीचें दैव मात्र फारच खडतर आहे. माझ्या पापाचें मूळ बेइमान जवाहिरलाल. यासहि आपल्या पापाचें पुरें प्रायश्चित मिळेल."

ही चिठ्ठी वाचून लीलावतीला फारच आचंबा वाटला! एक घंटाभर ती एकटी विचार करीत बसली. परंतु, चिठ्ठींतील मजकुरासंबंधानें तिला कांहींच थांग लागेना! माझें तर प्रेम ललितकिशोरावर आहे आणि माझा विवाह एका राजाशीं होणार आहे असें चिठ्ठींत ह्मटलें आहे या दोन्ही गोष्टींचा मेळ लागावा कसा? याचाच ती विचार करूं लागली. इतक्यांत बतसियानें येऊन दारावर धक्का दिला नसता तर ती याच विचारांत आणखी किती वेळ गुंग झाली असती हें कांहीं सांगवत नाहीं.

लीलावती—काय काम आहे गं?

बतसिया—अलाहाबादेहून कोणी स्त्री आली आहे तिला पुढच्या दिवाणखान्यांत बसविले आहे.

लीलावती—(आश्चर्यानें) प्रयागाहून कोण आलें असावें बरें? त्यांची आई तर नसेल ना?

बतसिया—त्यांची आई नव्हे. ती स्त्री सुमारें पंधरा सोळा वर्षांची आहे. ती कोणी जहागिरदारीण दिसते. तिच्याबरोबर आठचार संगिनवाले असून पांचचार दासीहि आहेत!

बतासियाची हकीगत ऐकून लीलावतीनें गर्दीनें साडी वगैरे बदलून वेणी साफसूफ केली.

प्रकरण ३५ वें.

लीलावतीची परीक्षा.

लीलावती—आपण प्रयागला राहतां ?

नवीन स्त्री—होय, माझें सासर तेथें आहे. येथें माझें माहेर आहे.

लीलावती—आपलें माहेर येथें कोठें आहे ?

न० स्त्री—शेट माणिकचंदाच्या येथें ? ते माझे चुलते आहेत. मला आईबाप नाहींत. शेट माणिकचंदांचें नांव लीलावतीनें या पूर्वी कधींहि ऐकलें नव्हतें. जहागिरदार लोकांत त्यांचें नांव कधींही ऐकण्यांत आलें नाहीं, कदाचित् तो एखादा सामान्य माणूस असेल-परंतु ही तर श्रीमंताच्या मुलीसारखी दिसते. असें विचार लीलावतीच्या मनांत घोळूं लागले.

लीलावती—आपलें नांव काय ?

न० स्त्री—माझें नांव विलासदेवी.

लीलावती—आपण माझ्या येथें आला हा माझ्यावर मोठा प्रसाद झाला असें मी समजतें.

विलासदेवी—कांहीं जरूरीच्या कामासंबंधानें मी आपणास तसदी देण्यास आलें आहे. मी विचारतें ती जर माहिती आपण मला द्याल तर आपले मजवर फार उपकार होतील.

लीलावती—(आश्चर्यानें) माझ्यापाशीं आपलें असें कोणतें काम आहे ? आपण खुशाल सांगावें. माझ्या हातून होण्यासारखें असेल तर अवश्य करीन.

वि० दे०—माझी बारा तेरा वर्षांची एक नणंद आहे.

लीलावती-मग ?

वि० दे०—तिचा विवाह अलाहाबादचे ललितकिशोर यांच्याशीं अगदीं ठरल्याप्रमाणें आहे.

हें ऐकतांच लीलावतीच्या अंगाचा थरकांप झाला. हें पाहून विलास

देवी ह्मणाली ' कां, हो, ललित किशोरचें नांव ऐकल्याबरोबर तुह्मी अशा घाबरलांत का ? त्याची चालचलणूक वाईट आहे असें जें आह्मी ऐकतों तें खरेंच आहे कीं काय ? '

हा प्रश्न ऐकून तर लीलावतीची अगदींच तारांबळ उडाली. तिनें मोठ्या कष्टानें उत्तर केलं ' छे तसें कांहीं नाहीं. आतांशा माझी जरा प्रकृति बिघडली आहे. '

वि. दे—माझ्या सासूनें मला तुमचेकडे पाठविलें आहे. माझी नणंद व ललितकिशोर यांचा विवाह व्हावा अशी माझ्या सासूची किंवा ललितकिशोरच्या आईची—दोघींचीहि इच्छा नाहीं. ललितकिशोरच्या संबंधानें नानाप्रकारचे लोकापवाद आहेत. आपल्यावरहि कांहीं दिवस त्याचें प्रेम होतें असें ऐकिवांत आहे. ललितकिशोरच्या कोणत्या गुणावर लुब्ध होऊन कोण जाणें; आपली मुलगी त्यालाच द्यावी अशी माझ्या सासऱ्याची फार इच्छा आहे. ललितकिशोर व माझी नणंद यांचें एकमेकांवर अत्यंत प्रेम जडलें आहे. तेव्हां माझ्या नणंदेस दोन गोष्टी सांगून तिला ताळ्यावर आणण्यासाठीं आपण जर घरीं याल तर फार बरें होईल.

लीलावतीच्या डोळ्यांतून एकसारखें अश्रु पडू लागलें. इतक्यांत आपला विवाह एका राजाशीं होणार असें जें आपल्या आजाच्या पत्रांत लिहिलें होतें त्याचें तिला स्मरण होऊन ललितकिशोराची व आपली कायम ताटातूट होणार असें तिला खास वाटूं लागलें.

वि० दे०—आपली विकृति तर अधिकच होत चालली. आतां आपली प्रकृति नीट नाहीं तेव्हां मला घरीं जाण्यास परवानगी द्यावी. आणखी एखादे वेळेस मी आपली गाठ घेईन.

लीलावती—आपल्याला वरचेवर तखलीफ कशाला पाहिजे ? आपल्याला जें काय सांगायचें असेल तें आतांच सांगा.

वि० दे०—मग आपलें मत काय आहे ? माझी नणंद व ललितकिशोर यांचा विवाह व्हावा कां ?

लीलावती०—वा: ! या गोष्टींत मत देण्याचा माझा काय संबंध ?

वि० दे०—एवढाच कीं आपला त्यांचा परिचय असल्यामुळें त्यांची चालचलणूक कशाप्रकारची आहे हें आपणास माहीत असलें पाहिजे.

लीलावती—त्यांचें वर्तन अगदीं निर्दोष आहे. त्यांच्या संबंधानें जे अपवाद तुमच्या कानीं आले असतील ते निखालस खोटे आहेत.

वि. दे०—हें आपण कांहीं तरी सांगतां. एकदां एका स्त्रीवर प्रेम व दुसऱ्यांदा दुसरीवर असें वर्तन ठेवणारा मनुष्य नीच नव्हे तर दुसरा कोण?

लीलावती—आपल्या नणंदेवर त्यांचें प्रेम जडण्यापूर्वी त्यांचें लक्ष दुसऱ्या कोणा स्त्रीवर होतें काय?

वि. दे.—होय, ह्मणूनच हा विवाह होऊं नये अशी आमची इच्छा आहे.

लीलावती—त्यांचें दुसऱ्या कोण्या स्त्रीवर प्रेम होतें याबद्दल आपले जवळ कांहीं पुरावा आहे काय?

वि. दे.—पुरावा भक्कम आहे. तो पुरावा ह्मटला ह्मणजे आपण स्वतःच!

लीलावती—मग आपले ह्मणणें काय?

वि दे.—हें जर खरेंच असेल तर माझ्या नणदेचा ललितकिशोराशीं विवाह लावून आपल्याला कष्टी करणें चांगले नाहीं.

लीलावती—त्याबद्दल आपण बिलकूल फिकीर बाळगूं नका. आपण खुशाल विवाह लावून टका.

यावर ललित किशोर अलाहाबादेस जातेवेळीं लीलावतीनें त्यास जें पत्र लिहिलें होतें तें पत्र लीलावतीपुढें टाकून विलासदेवी ह्मणाली. 'यावर आपलें काय ह्मणणें आहे?' पत्र पाहून लीलावती गप्प बसली, असें पाहून विलासदेवी ह्मणाली 'ज्याकरितां मी आलें तें माझें काम झालें. आतां आपण सांगा कीं माझ्या नणंदेचा व ललितकिशोराचा विवाह व्हावा किंवा न व्हावा?' (लीलावती कांहीं उत्तर देत नाहीं असें पाहून) आपण अशा स्वस्थ बसाल तर विवाहास आपली संमति आहे असें मी समजेन.

लीलावती—आतां चोरून कशाला ठेऊं? मला कांहीं ती गोष्ट संमत होणार नाहीं.

प्रकरण ३६ वें.

समवयस्कांचा विनोद.

इतकें बोलून लीलावती तेथून तडक जावयास निघाली. तो तिला अडवून विलासदेवी ह्मणाली ' आतां थोडेसें काम उरलें आहे. जायची अशी गर्दी करूं नकां ' असें ह्मणून विलासदेवी मोठ्यानें ओरडून ह्मणाली ' कां आतां तरी मनाचें समाधान झालें नां ? कां आणखी कांहीं बाकी राहिली आहे ? ' हें ऐकतांच ' माझ्या मनाची पूर्ण खातरी झाली ' असें खोलींत डोकावून ललित किशोरनें सांगितलें.

इतक्यांत लीलावती ओरडून ह्मणाली ' लाडली, तूं आपला वेष जसा बेमालुम पालटलास तसा तूं आपला स्वरहि पार बदलून टाकलास. वस्तादगिरीची शिकस्त झाली. ?

आपण बनारसला आल्याची खबर ललितकिशोरनें राजा गोविंदचंद्र यास कळविली होती. व तेथूनच ती लाडलीस कळली. तिनें यासंबंधानें लीलावतीस कांहींच कळूं नये अशी तजवीज ठेविली होती. लीलावतीची दासी बतसिया इला हा सर्व मजकूर माहीत होता. परंतु, घटकाभर गंमत होईल. या हेतूनें लाडलीच्या सांगण्यावरून तिनें ही बातमी अगदीं गुप्त ठेवली होती.

लाडली—(लीलावतीस) जरा थांब ह्मणजे मी तुझ्या प्रश्नाचा जबाब देतें, बाहेर जाऊन तिनें आपला सर्व पोषाख उतरला व आपली नेहमींची साडी नेसून ती आंत आली. तिला पाहतांच लीलावती ह्मणाली " ' इतका व्यूह रचण्याचें तुला काय कारण पडलें होतें बरें ?

लाडली—घटकाभर मौज तर झाली ?

यांचा हा विनोद अशाप्रकारें चालूं असतां आपले वडील व पणजे खालीं आले आहेत. असा बतासियानें लीलावतीस निरोप सांगितला.

प्रकरण ३७ वें.

ललितकिशोर बनारसचे स्टेशनावर गेतांच त्यास उतरून घेण्यास गोविंदचंद्र व विजयकृष्णाचे कित्येक सेवक आले होते. तो चौघाकींत बसून राजा विजयकृष्ण यांचे येथें गेला व प्रमोदकुमार व त्याचा आजा हे गोविंदचंद्र यांचे बरोबर गेले.

हे मायलेक घरीं जाऊन पोहोंचतात तों राजा विजयकृष्णाची भेट घेण्यास दोघेहि त्यांच्या खोलींत गेलीं. त्यांच्या दोघांच्याही डोळ्यांतून अश्रु वाहत होते. राजा विजयकृष्ण यांनीं मोठ्या कष्टानें उठून त्यांचे डोळे पुसले व पुन्हां ग्लानि आल्यामुळें ते बिछान्यावर पडले. आपल्या मुलास त्यांनीं जवळ बोलावून आपल्या खजिन्याची किल्ली त्याचे हवाली केली. आपले खरें मालक व मालकीण आज घरांत आलीं ही बातमी सर्व नोकरचाकरांस समजली.

राजा विजयकृष्ण यांची प्रकृति इतकी जरी बिघडली होती, तरी त्यांचें औषधपाण्याकडे बिलकूल लक्ष नव्हतें. या प्रपंच्याच्या त्रिविध तापांतून आपण सुटलों कसें, असें त्यांना होऊन गेलें होतें. ललितकिशोरनें बनारस येथील नामांकित डाक्तर आणून आपल्या बापास औषधपाणी सुरू केलें. व दोघेजण राजेसाहेबाजवळ जाऊन बसले. आपल्या पत्नीचा हात आपले हातांत घेऊन राजेसाहेब ह्मणाले—' हाय, हाय प्रियचंद्रकळे, मी राहू बनून तुझा व्यर्थ छळ केला त्याचेंच मी प्रायश्चित्त भोगीत आहें ' चंद्रकलेनें आपल्या पतीचे डोळे पुसले. व डोळ्यांत आंसवें आणून ती ह्मणाली ' झालेल्या गोष्टी आतां आपण विसरून जाव्या. पूर्वसंचितानुरूप मला जें दुःख भोगावयाचें होतें तें मला भोगावें लागलें. यांत आपला कांहीं दोष नाहीं. ! '

राजा विजयकृष्ण—तुझ्या सारख्या पतिव्रतेचा छळ केला याकरतां वैवस्वतानें माझ्यासाठीं कोणता नर्क राखून ठेवला असेल बरें ?

चंद्रकला—आपण नाहक दुःखी होऊं नये सत्य, सद्गुण व पातिव्रत्य हीं ईश्वराच्या दरबारांत रुजूं असतील, तर तुमच्या संगतींत माझा स्वर्गलोकीं अक्षय्य वास होईल असा मला पूर्ण भरंवसा आहे.

विजयकृष्ण—ललितकिशोर हाच अधम माणूस तुझा बाप होय. तूं मात्र सुपुत्र आहेस. आणि ह्मणूनच आपल्या राक्षसी पित्यास क्षमा करशील अशी मला आशा आहे.

असें ह्मणून राजेसाहेब एकाद्या लहान मुलाप्रमाणें मोठ्यानें रडूं लागले !

ललितकिशोर —बाबा, आपण आपल्या तोंडांतून पुन्हां अशीं अक्षरें काढूं नका. इतक्या दिवसपर्यंत आपल्या जनकाची सेवा करण्याचा योग मला आला नाहीं; तेव्हां मलाच पापी ह्मटलें पाहिजे.

चंद्रकला—मुलगा असावा तर असाच असावा. आपला बाप कोण, याबद्दल बिलकुल माहिती नसतांहि माझ्या मुलानें माझ्या वर्तनाबद्दल कधींहि संशय घेतला नाहीं. किंवा बापासंबंधानें कधीं उठाठेव केली नाहीं.

राजा—आज मीं आपल्या अंतःकरणांतल्या सर्व गोष्टी तुह्मांस उघड करून सांगतों.

चंद्रकला—बोलण्यानें आपणांला शीण होत आहे. तेव्हां आपण जरा स्वस्थ पडावें.

राजा—माझी पत्नी व माझा मुलगा यांची आज भेट झाली आहे तेव्हां आजचा दिवस अत्यंत आनंदाचा आहे असें मी समजतों. ललितकिशोर ! माझ्या पहिल्या स्त्रीस बाळकृष्ण झाला, तेव्हां माझा बाप राजा रामकृष्ण हा हयात होता. एके दिवशीं चार लोकांदेखत माझा बाप मला अधिकउणें बोलला व 'घरांतून चालता हो' ह्मणूनहि त्यानें मला सांगितलें. या गोष्टीनें मला फार दुःख झालें. मी त्याच्या तोंडावर कांहींही बोललों नाहीं. घरांत एक चिठ्ठी लिहून ठेवून घरांत जेवढी पुंजी सांपडली तेवढी घेऊन मी निघून गेलों. माझ्या बापाप्रमाणें माझ्या स्त्रीनें ह्मणजे बाळकृष्णाच्या आईनेंहि माझी अशीच निर्भर्त्सना केली. बापाचें बोलणें एकवेळ कोणी ऐकून घेईल परंतु बायकोचें बोलणें कोणास सहन होईल ? सारांश संतापानें मी घर सोडून निघून गेलों. आमचे आजे गोपाळचंद्र यांना रामकृष्ण व गोपीकृष्ण असे दोन मुलगे होते. रामकृष्ण हेच आमचे वडील होत. आजोबाच्या मृत्यूनंतर गोपीकृष्णास हिस्सा वगैरे न देतां वाटेला लावण्याचा आमच्या वडिलांचा विचार होता. परंतु त्यानें सरकार दरबारांत फिर्याद लावून आमच्या वडिलांपासून आपली वाटणी चोपून घेतली. आमचे

चुलते गोपीकृष्ण हे वेगळे राहिले. तेव्हां माझें वय ८।९ वर्षांचें असून त्यांचा मुलगा आनंदचंद्र ७ वर्षांचा होता. आनंदचंद्र व मी यांचें एकमेकांवर असें प्रेम होतें कीं परस्परांच्या संगतीशिवाय आमच्या पैकीं कोणासहि एक क्षणभरही गमेना. आमच्या काकाकाकींचेंहि माझ्यावर इतकें प्रेम होतें कीं एक दिवस त्यांच्या घरीं मीं गेलों नाहीं कीं लगेंच पंचवीस बोलवणीं यायचीं! आमचे वडील जरा विचित्र स्वभावाचे होते. माझें चुलत्याचे येथें वरचेवर जाणें त्यांना खपत नसे. तिकडे जाण्यास ते मला मनाई करूं लागले; तसा मी काकांच्या इकडे चोरून जायला लागलों. आमचे चुलते निवर्तले, त्यावेळेस आमचे इकडले कोणीहि माणूस त्यांचेकडे गेले नाहीं हें पाहून मला मला फार दुःख झालें.

"मी आनंदचंद्राकडे चोरून जात असे शाळेमध्येंहि त्याची माझी गट्टी असे. याबद्दल वडिलांनीं माझी अनेकवेळां खरडपट्टी काढली, तरी आनंदचंद्राची मैत्री कधींहि सोडली नाहीं. जेव्हां माझा मुलगा बाळकृष्ण हा जन्मास आला तेव्हां आनंदचंद्रासही गोविंदचंद्र या नांवाचा मुलगा झाला. इतका सुशील मुलगा क्वचित्च सांपडेल. त्याचा बाप निवर्तल्यावर तो माझ्याशींही मोठ्या प्रेमानें वागे; परंतु बाळकृष्णाचें मनांत त्याचे विषयीं निष्कारण वैर उत्पन्न झाल्याकारणामुळें मी त्याला आपल्या घरीं विशेष बोलावीनासा झालों. काम पडलें तर मीच त्याच्याकडे जात असे. आतां बाळकृष्णाची आटकहि नाहींशी झाली, तेव्हां तूं गोविंदचंद्राशीं प्रेमानें वागशील अशी मला उमेद आहे'

ललितकिशोर—गोविंदचंद्र माझा चुलत भाऊ आहे हें मला माहीत नसतांहि त्याची आमची फारच निकट मैत्री जमली आहे. आतां हे नवीन नातें समजलें. या योगानें तर दुधांत साखर पडल्यासारखें झालें आहे.

राजा—मी आपला वृत्तांत आतां थोडक्यांत आटोपतों. मी एकटाच लखनौ येथें गेलों; व तेथें एक मोठें घर घेऊन राहिलों. त्या घरांतच तुझी आईहि राहत होती. त्यावेळीं तिचें वय १३।१४ वर्षांचें होतें. ह्यावेळेस तिला आईबाप कोणीही नव्हते. तिची एक चुलती होती, ती तिला संरक्षण करी; दोन दोन दिवस उपास घाली व अनेकप्रकारें तिला छळीत असे. अशा सुंदर मुलीचे असें हाल व्हावें हें पाहून, माझें हृदय तिळतिळ तुटूं लागलें.

त्यानंतर महिना दोन महिन्यांनींच तिच्या चुलतीला कांहीं ऐवज देऊन मी इच्याशीं विवाह लावला. एक स्त्री हयात असतां, दुसऱ्या स्त्रीशीं जो विवाह लावतो त्यास आमच्या जातींतून बहिष्कृत करतात हें मला त्यावेळेस माहित नव्हतें. विवाह होऊन सहा महिन्यांच्या आंतच इची चुलती मरून गेली. इला माझ्याशिवाय दुसरें कोणीही राहिलें नाहीं. तेथेंच मी एक घर घेऊन राहिलों. तेथें सुमारें दीडवर्ष मी मोठ्या चैनींत घालविलें. इतक्या काळांत मला आपल्या बापाची किंवा स्त्रीपुत्रांची बिलकुल आठवण झाली नाहीं. परंतु, माझ्या जवळची सर्व पुंजी संपून गेली त्यावेळेस मातें डोळे उघडले. यावेळेस चंद्रकला ही गरोदर होती त्यामुळें तर मला विशेष पंचाईत येऊन पडली.

एके दिवशीं मी एका स्नेह्याचे येथें घटकाभर बसावयास गेलों. तेथें एक वर्तमानपत्र पडलें होतें. मनाची घटकाभर करमणूक करण्याकरितां तें घेऊन मी वाचूं लागलों. 'तों बनारस येथील राजा रामकृष्ण हे बरेच दिवसांच्या आजारानें असन्न मरण झाले आहेत ' असा मजकूर माझ्या दृष्टीस पडला. यापुढें माझ्यानें तेथें बसवेना. मी आपल्या स्नेह्याला न विचारतां न पुसतांच तडक घरीं आलों. दोनचार दिवसांनीं मी परत येतों अशी थाप देऊन व जवळ जो कांहीं ऐवज शिलक उरला होता, तो तिच्या स्वाधीन करून मी बनारसला निघून गेलों. हे चंद्रकले, मी खरोखर किती कठोर व पातकी प्राणी आहे. त्या दिवसापासून मी तुझा कधींही समाचार घेतला नाहीं! तुझ्यासारख्या पतिव्रतेशीं मी केवढी दगलबाजी केली! असो! ज्या दिवशीं मी बनारसला घरीं जाऊन पोहोंचलों त्या दिवसाची मला आठवण झाली ह्मणजे माझ्या काळजाचे तुकडे तुकडे होऊन जातात! मी घरीं जाण्यापूर्वींच वडिलांचें शव नदीवर गेलें होतें! मोठ्या गर्दीनें मी घाटावर गेलों व मोठ्या मिनतवारीनें माझ्या हातून वडिलांची अंत्येष्टि झाली. त्यानंतर तीनचार दिवस-पर्यंत माझें मन जाग्यावर नव्हतें. चंद्रकलेस कांहीं खर्चावयास पाठवावें असा सातवे दिवशीं माझ्या मनांत विचार आला. ह्या विचाराप्रमाणें माझ्या हातून वर्तन होणार तोंच मला दोषी ज्वर येऊन मी दहा अकरा दिवस अंथरुणाशीं खिळून गेलों. रुपये पाठविण्याची दुखण्यांतहि मला मधून मधून आठवण होई. परंतु कोणी विश्वासू माणूसच मिळेना. अशा-

रीतीनें एक महिना लोटला. मला जरा बरें वाटूं लागल्यावर मी आपला विश्वासू नोकर रुपये देऊन कानपूर येथें रवाना केला. परंतु मोठ्या दुःखाची गोष्ट ही कीं ' सांगितल्या ठिकाणीं कानपूर येथें चंद्रकला नांवाची कोणीच स्त्री सांपडे ना ! असें सांगत माझा नोकर चौथ्याच दिवशीं परत आला. ही खबर ऐकून मला जें दुःख झालं त्याची कल्पना एका ईश्वराबांचून दुसऱ्या कोणासहि होणार नाहीं. या दुःखानें माझें दुखणें उलटून मला चार महिने अंथरुण धरावें लागलें ! माझी प्रकृति बरी झाल्यावर इचा शोध करण्यास मी स्वतः कानपुरास गेलों. परंतु, मलाही तिचा कोठें शोध लागेना. अर्थात् घरीं मला विन्मुख परत यावें लागलें. तेव्हांपासून मी बाळकृष्णाच्या आईशीं कधींहि भाषण केलें नाहीं. कारण, हा सर्व बखेडा होण्यास तीच दुष्ट कारण झाली या विचारानें माझें मन पक्कें ग्रासून टाकलें होतें " यानंतर राजा विजयकृष्ण यांना थकवा येऊन ते अंथरुणावर स्वस्थ पडून राहिले.

चंद्रकला ह्मणाली " आपण कानपूर सोडून गेल्यानंतर मला जीं संकटें भोगावीं लागलीं तीं यापूर्वी मी आपल्याला एकदां सांगितलींच आहेत. परंतु, ललितकिशोरला तीं समजावींत ह्मणून सर्व वृत्तांत पुन्हां एकवार सांगतें. आपण निघून आल्यानंतर तेथील घरवाल्यानें माझ्यावर खोटी नजर ठेवली. मला फसविण्याचे त्याचे प्रयत्न चालू झाले. अखेर माझ्याजवळ जें कांहीं होतें नव्हतें ते सर्व हिरावून घेऊन त्यानें मला घरांतून घालवून दिलें. जवळ एक कवडीहि नाहीं, अंगावरच्या लुगड्याशिवाय वस्त्र नाहीं व या विस्तीर्ण पृथ्वीतलावर माझ्या मालकीची अशी एक अंगुलीभरहि जागा नाहीं. आतां करावें काय, जावें कोठें, इभ्रतीनें आपला निर्वाह कसा चालवावा, आपल्या अब्रूचें आतां कसें रक्षण होणार असे विचार माझ्या मनांत येऊं लागले. अखेर गंगेंत उडी घालून आपल्या दुःखाचा शेवट करावा असा माझा निश्चय ठरला. उद्वेगाच्या भरांत उदरांत असलेल्या गर्भाचेंहि मला विस्मरण झालें. मी गंगेंत शिरलें व गळ्या इतक्या पाण्यांत जावें तों एक जटाधारी गोसावी तेथें आला. माझा हात धरून व मला पाण्याबाहेर काढून तो ह्मणाला —" माझ्या मागोमाग चल. आत्महत्याकरणें हे महापाप आहे " मी निमुटपणें बोवाजीबरोबर त्यांच्या मठांत गेलें. व जी एकदां तेथें खाटे-वर जाऊन पडलें तीं पुन्हां दीड महिना खालीं उत्तरलें नाहीं. बोवाजींनें

जशी माझी सेवा चाकरी केली तशी कोणी आईबापहि करणार नाहींत ! बोवाजींचें माझ्यावर उपकार पाहून मी त्यांना सर्व हकीगत सांगितली. त्यांनीं मला अनेकप्रकारें समजावलें व धीर दिला.

बोवांजीच्या मठांत दुसरी एक स्त्री होती व आणखी कित्येक त्यांचे चेले होते. मठांतच राहून मी आपली कालक्रमणा करूं लागले. कारण मी जाणार तरी कोठें ? माझें दैव असें चमत्कारिक कीं, त्यानें तेथेंहि मला सुखानें राहूं दिलं नाहीं. आपण आल्यानंतर सहा महिन्यांनीं मला बोवाजींच्या मठांतच ललितकिशोर झाला. बोवाजींच्या सांगण्यावरून मी याचें नांव ललितकिशोर असें ठेवलें. बोवाजी मला ह्मणाले ' मुली, मी तुला खास सांगतों, कीं तुझा मुलगा एके दिवशीं राजा होणार. माझी विपन्न स्थिति पाहून माझा बोवाजींच्या शब्दावर विश्वास बसेना. ज्याच्या आईची अशी दुर्दशा तो मुलगा राजा कोठून होणार असें मला वाटूं लागलें.

बोवाजींच्या मठींत राहिल्यामुळें माझ्यासबंधानें लोक बोवाजीस भलतींच दूषणें लावूं लागले. हें त्यांच्या कानावर गेल्यानंतर एके दिवशीं बोवाजी मला ह्मणाले ' मुली, हें जग फार विलक्षण आहे. येथें पाहणारे थोडे व ऐकणारे फार. वास्तविक पाहतां तू मला मुलीप्रमाणें आहेस. परंतु यापुढें तुला येथें राहणें चांगलें नाहीं. मी तुला काशीस पाठवून देतों. मीहि प्रथम गृहस्थाश्रमीच होतों. पुढें विरक्त झालों. काशीस माझी मुलगी आहे. ती आपल्या घरची मालकीण आहे. तूं तेथें जाऊन रहा. ती बिचारी विधवा असून तिला मुलबाळ कोणी नाहीं. तिच्या घरीं खायलाप्यायला कांहीं कमी नाहीं. तेथें तुला कोणत्याहि प्रकारची कमतरता पडणार नाहीं. ' माझ्या बरोबर बोवाजीनें आपला एक चेला देऊन माझी रवानगी काशीस करून दिली. तेथें माझें आयुष्य सुखांत जाऊं लागलें. पण मी अशी दुर्दैवी कीं मी घरांत शिरल्यावर दोन महिन्याच्या आंतच बोवाजींची मुलगी इहलोक सोडून गेली ! तिच्या मृत्यूनंतर मी भिकारी बनलें; मुलाला खाकेंत घेऊन गांवभर हिंडू लागलें. तिसऱ्या दिवशीं एका बाईजवळून एक कोठडी भाड्यानें घेऊन तेथें कशिदा वगैरेचें काम करून चरितार्थ चालवूं लागले. अशाप्रकारचें तीन महिने गेले. माझा व माझ्या मुलाचा कसाबसा चरितार्थ चालूं लागला. परंतु, घराचें भाडें कांहीं माझ्यानें देववेना तेव्हां

माझें मूल मजजवळून हिसकावून घेऊन घराची मालकीण मला ह्मणाली गांवांत भीक मागून माझ्या भाड्याची फेड कर. तोंपर्यंत मी तुझें मूल तुला देणार नाहीं. माझ्यावर मोठा अनर्थ कोसळला पुढें काय करावें आणि काय न करावें हें मला कांहींच सुचेना. परंतु, नारायण हा अनाथांचा वाली आहे. त्याला माझी करुणा आली. त्याच दिवशीं संध्याकाळीं मी रस्त्यांतून हिंडत असतां लीलावतीचा बाप प्रमोदकुमार याची माझी गांठ पडून त्यानें मला शंभर रुपयांची एक नोट धर्म केली. संकटसमयीं माझ्यावर दया करणारा लीलावतीचा बापच होय हें मला काल समजलें.

ती नोट घेऊन मी घरीं परत आलें व घराचें भाडें चुकतें करून मी आपलें बालक परत घेतलें. तेथेंच रात्र कशीबशी काढली व दुसरे दिवशीं एक घर भाड्यानें घेऊन मी तेथें राहूं लागलें. रामदेवी नांवाच्या माझ्या जातीच्याच एका विधवा स्त्रीचें तें घर होतें. हळूं हळूं तिचें माझ्यावर प्रेम बसत चाललें. ती बिचारी फार नेकीची होती. तिला मूलबाळ नसल्यामुळें ती माझ्या मुलास अगदीं पोटच्या पोराप्रमाणें जीव कीं प्राण करी.

सात वर्षें झालीं. कार्तिक महिन्यांत एके दिवशीं मी आपल्याला घाटावर पाहिलें त्यावेळेस मी एकदम बेशुद्ध होऊन खालीं पडलें. मी किती वेळ बेशुद्ध होतें हें माझें मला सुद्धां माहीत नाहीं. शुद्धीवर येऊन पाहतें तों मी आपल्या घरीं खाटेवर पडलेली आहें. व बिचारी रामदेवी ललितकिशोरास कडेवर घेऊन तेथेंच जवळ डोळे पुशीत बसली आहे असें माझ्या दृष्टीस पडलें ! '

ललितकिशोर-- (डोळे पुसून) आई ! मला त्या दिवसाची अद्यापहि आठवण आहे.

चंद्रकला.-- रामदेवीनें मला अतिशय आग्रह केल्यावरून मी तिला आपल्या कर्माची सर्व कहाणी सांगितली. व आपलें दर्शन पुन्हां होण्यासाठीं त्या दिवसापासून रोज नियमानें गंगास्नान धरलें. दैवयोगानें आपण पुन्हां एकदां माझ्या दृष्टीस पडला. त्याबरोबर आपल्याकडे बोट दाखवून मी रामदेवीस ह्मटलें ' पाहिलेत कां हेंच ते ' आपणास पाहतांच रामदेवीनें आपणास ओळखिलें; व घरीं जातांच तिनें आपला सर्व ठावठिकाण मला सांगितला. व त्याच दिवशीं मीं आपल्याला एक चिट्ठी लिहिली.

राजा विजयकृष्ण—तुझ्या आईची चिट्ठी एखाद्या पवित्र वस्तूप्रमाणें मीं अद्यापहि जपून ठेवली आहे. ती चिट्ठी पाहून माझ्या मनाची जी अवस्था झाली तिचें वर्णन करणेंहि अशक्य होय. मीं लगेंच तिची गांठ घेतली व तिजपासून तिचा सर्व वृत्तांत ऐकून घेतला. त्यावेळेस बरीच रात्र झाली होती. तूं झोपीं गेला होतास तरी तुझें चुंबन घेतलें. तुला जागें करून पोटाशीं धरावें असेंहि माझें मनांत आलें. परंतु तुझी आई मला तसें करूं देईना. ती ह्मणाली 'ज्या दिवशीं मी तुमच्या घरीं राहावयास येईन त्यादिवशीं तो तुमच्या मांडीवर बसेल.' हा तिचा निग्रह पाहून मला स्वस्थ बसावें लागलें.

चंद्रकला—आपला पत्ता मला समजतांच चोवार्जींच्या शब्दांची मला आठवण होऊन त्यांचे ते शब्द खरे ठरणार अशी मला खात्री वाटूं लागली. एके दिवशीं आपण येऊन मला व आपल्या मुलाला घेऊन जाल असें मला निःसंशय वाटूं लागलें.

राजा विजयकृष्ण—मीं इची समजूत घालण्याचा पुष्कळ वेळां प्रयत्न केला पण ही माझ्यापासून एका कवडीचीही मदत घेईना. 'धर्मपत्नी असें समजून माझें आपण ग्रहण करीतोंपर्यंत मी आपलें सांगणें लवलेशही मानणार नाहीं' असें तिनें साफ उत्तर दिलें. बाळकृष्णाची आई अद्याप जिवंत होती. तेव्हां मला तिच्या ह्मणण्याप्रमाणें तजवीज करतां येईना, असा चोहोंकडून माझा निरुपाय झाला. अखेर बराच आग्रह केल्यानंतर तुझा शिकण्यासवरण्याचा खर्च करण्यास मला इनें परवानगी दिली. परंतु इनें स्वतःच्या खर्चास माझ्यापासून एक पैहि घेतली नाहीं ! मी तुझ्या शिक्षणाची चांगली तरतूद ठेवली होती. जेव्हां तूं शहाणा झालास तेव्हां तुला नोकरीहि मीच लावून दिली. तुझी बदलीहि माझ्याच शिफारशीनें झाली. पुढें बाळकृष्णाची आई निवर्तल्यावर इला घरीं येऊन राहण्यास मी पुष्कळ आग्रह केला; परंतु 'आतांच काय घाई आहे, पुढें पाहूं?' असें ह्मणून ती तें वरचेवर लांबणीवर टाकूं लागली. आतां तर बाळकृष्णही नाहीं.

दोघेहीजण—काय ? बाळकृष्णाला काय झालें ? यावर राजेसाहेबांनीं एक लांब सुस्कारा टाकून गादी खालून एक कागद काढून तो ललितकिशोरच्या अंगावर फेंकला.

———

प्रकरण ३८ वें.

बापाची भेट.

आपला बाप व आपला पणजा आल्याची खबर ऐकून लीलावतीस अत्यानंद झाला. तिनें त्या दोघांच्याहि तसबिरी नुकत्याच पाहिल्या असल्यामुळें त्यांना ओळखण्यास तिला मुळींच अडचण पडली नाहीं. तिनें दोघांनाहि नमस्कार केला. ती सर्व जण सुमारें एक अर्धीघटकापर्यंत एकमेकांकडे नुसती पाहूं लागलीं. कोणाच्याच तोंडून कांहीं शब्द निघेना! अखेर प्रमोदकुमार ह्मणाला ' लीलावती, इतक्या वर्षांनीं तुझी माझी भेट होईल असें मला कधींहि वाटलें नव्हतें. ईश्वराचा संकल्प खरोखर अतर्क्य आहे. ' यानंतर चंद्रकला ललितकिशोर व राजा विजयकृष्ण, त्याचप्रमाणें राजा गोविंदचंद्र यांचा सर्व वृत्तांत लीलावतीस समजला. आपण एका राजाची बायको होणार असें जें ज्योतिष्याचें भविष्य पत्रांत लिहिलें होतें त्याचा लीलावतीला आतां उलगडा पडला. प्रमोदकुमार ह्मणाला ' बाळे, तुझें ललित किशोरावरील व लाडलीचें गोविंदचंद्रावरील प्रेम ऐकून माझ्या मनाला फारच संतोष वाटला. तुह्मी दोघीही लहानपणाच्या मैत्रिणी, हें पाहून मला खरोखरच फार कौतुक वाटत आहे. त्या दोन घराण्यांतील आज फार दिवस असलेलें वैर तुमच्या श्लाघ्य संबंधानें समूळ नाहींसें होणार ही खरोखरच अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. '

पणजोबा — ठीक आहे त्या दोघांनाहि आज येथें बोलवा व आजच आपण विवाहसंबंधीं सर्व गोष्टी ठरवून टाकूं.

आजोबांचें हें भाषण ऐकून प्रमोदकुमारानें ललितकिशोर व गोविंदचंद्र यास तातडतीनें बोलावणें पाठविलें. बतसिया थोड्याच वेळानें ललितकिशोर व गोविंदचंद्र यांना घेऊन आली. ते येऊन बसल्यानंतर प्रमोदकुमाराच्या आज्यानीं आपला वृत्तांत निवेदन करण्यास सुरवात केली.

— — — —

प्रकरण ३९ वें.

सुजनकुमाराचें इतिवृत्त.

"आग्रा शहर ही आमच्या पूर्वजांची जन्मभूमी होय. तेथें परशुराम कुमार या नांवाचे आमचे प्रपितामह सामान्य व्यापारदेपार करून आपला निर्वाह करीत असत. बलरामकुमार व घनःशामकुमार हे त्यांचे दोन पुत्र होत. पित्याच्या मरणोत्तर बलरामकुमार आपल्या भावापासून वेगळे झाले व आपल्या पत्नी समवेत दिल्ली येथें राहूं लागले. तेथें औरंगजेब बादशहाच्या अमदानींत मोदीखान्यावरील मुनशीची जागा त्यांना मिळून त्यांचा भाग्योदय चांगला वृद्धिंगत झाला. घरांत लक्ष्मीची समृद्धि झाली. आपले बंधु घनःशामकुमार यांना सर्व मंडळीसह दिल्लीस निघून येण्याविषयीं त्यांनीं अनेक वेळां लिहिलें. तरी त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं परंतु बलरामकुमाराकडून आपल्या कनिष्ठ बंधूस वारंवार द्रव्य सहाय्य होत असे.

बलरामकुमारास शिवरामकुमार व घनःशामकुमारास हरीरामकुमार असें दोघांना दोन मुलगे झाले. बलरामकुमाराच्या सहाय्यानें घनःशामकुमाराच्या प्रपंचाचीहि चांगली बरकत होऊं लागली. इतक्यांत हे दोघेहि बधू एका वर्षाच्या अवधींत परलोकवासी झाले !

बलरामकुमार परलोकवासी झाल्यानंतर मुनशीगिरीची जागा गेली. तरीपण शिवरामकुमार १०।२० माणसें आश्रयास ठेवून एखाद्या जाहागिरदारासारखा मोठ्या थाटानें राहूं लागला. शिवरामकुमारकडून हरिराम कुमारास कोणत्याहिप्रकारचें सहाय्य न मिळाल्यामुळें त्याची स्थिति मात्र दिवसेंदिवस खालावत चालली. या स्थितींत त्यास धनकुमार, सुजनकुमार व विजनकुमार असे तीन मुलगे झाले. परंतु, चमत्कार हा कीं शिवरामकुमाराच्या येथें सर्व गोष्टींची समृद्धि होती तरी त्याला कांहीं मूलबाळ झालें नाहीं. अखेर त्याची स्त्रीहि निवर्तली. आग्र्यास येऊन हरीरामास त्यानें एक हजार रुपये भांडवल दिलें व त्याचेकडून सराफीचें एक दुकान काढविलें. यानंतर हरीरामाचा मधला मुलगा सुजनकुमार यास आपल्या मांडीवर दत्तक घेऊन शिवरामकुमार दिल्लीस परत आले. तोंच

अभागी सुजनकुमार मी होय. त्यावेळेस माझें वय नऊ वर्षांचें होतें. मी मधला मुलगा असल्यामुळें आईबापांचें माझ्यावर विशेषसें लक्ष नसें. उनाड-पणांतच मीं आपलें बाळपण घालविलें. दिल्लीस आल्यानंतर बरेंच दिवस माझा असाच क्रम चालूं होता. तेथें माझ्या नूतन पित्यांनीं माझ्या शिक्षणाचा चांगला बंदोबस्त ठेवून मला संस्कृत व फारशी या दोन भाषा पढविण्यास सुरवात केली.

तीन वर्षेंपर्यंत दिल्ली येथें माझें आयुष्य मोठ्या सुखांत गेलें. व संस्कृत व फारशी या दोन भाषा मला चांगल्या अवगत झाल्या. मी चांगला बुद्धिवान् होतों. त्यामुळें आमच्या घरीं येणाऱ्या जाणाऱ्या गृहस्थांची माझ्यावर मोठी मर्जी असे. माझा स्वभाव फार हट्टी व तामसी असे. शिवरामकुमार हे माझे फार लाड करीत असल्यामुळें ते माझा हरतऱ्हेचा हट्ट पुरवीत असत. माझ्या मनाला वाटेल तें मी करीत असें. होतां होतां माझा छांदिष्ट स्वभाव इतका वाढत गेला कीं त्यामुळें माझ्या नूतन पित्यास अतिशय त्रास होऊं लागला.

या अवधींत माझी आई व माझा बाप हीं सहा सहा महिन्यांच्या अंतरानें निजधामास गेलीं. ही वार्ता ऐकून मी आपल्या चुलत्याबरोबर आग्र्यास गेलों. मातापितरांच्या मरणानें मला फार दुःख झालें. घर सोडल्यापासून पुन्हां त्यांची व माझी एकदांहि भेट झाली नाहीं.

मी दिल्लीस गेल्यानंतर माझा थोरला भाऊ धनकुमार याचें लग्न झालें. मी जेव्हां दिल्लीहून परत आलों तेव्हां त्याच्या बायकोच्या कडेवर दीड वर्षांचें मूल होतें. माझा चुलता ह्मणजे माझा दत्तकबाप दहा पंधरा दिवस दिल्लीस राहून आग्र्यास गेला. मला बरोबर नेण्यास त्यानें हरतऱ्हा करून पाहिल्या, परंतु माझ्या हट्टीस्वभावापुढें त्याचें कांहींएक न चालून अखेर त्यास एकटें दिल्लीस जावें लागलें. त्यानें माझ्यासाठीं तेथें पांचचार नोकरहि ठवले होते. जेव्हां जेव्हां मी दुःखानें उदास होई, तेव्हां तेव्हां माझी भाव-जय माझें समाधान करण्यास आपली पराकाष्ठा करी. या माझ्या सुशील भावजईचा व माझा वियोग होण्याची वेळ अगदीं जवळ आली.

आग्र्यास माझा पुरता दोन महिनेहि मुक्काम झाला नाहीं. दर आठवे दिवशीं मला दिल्लीस नेण्यास माझ्या चुलत्याकडून मनुष्य येई इतका माझा चुलता माझ्यासाठीं अधीर झाला होता! माझा

थोरला भाऊहि आग्र्यास राहण्यास अगदीं कंटाळून गेला. दुसरीकडे कोठें तरी जाऊन राहण्याचा त्याच्या मनाचा पक्का निश्चय ठरला. माझ्या बरोबर दिल्लीस येण्याविषयीं मी त्याला फार आग्रह केला, परंतु त्याचा कांहीं उपयोग न होतां तो आपली बायको घेऊन अखेर बनारस येथें गेला. माझ्या भावजयीस माझा वियोग फारच दुःसह वाटूं लागला. अशी सुशील स्त्री दुसरीकडे क्वचितच् पहावयास सापडेल !

जहागिरदाराच्या मांडीवर जाऊनहि माझा अद्याप विवाह कां झाला नाहीं याबद्दल अचंबा वाटूं देऊं नका. बालविवाह करणें माझ्या दत्तक बापास अगदीं नापसंत होतें. मला पुष्कळ मुली आल्या; परंतु त्यांनीं सर्व ठिकाणीं असें सांगितलें कीं सुजनकुमार शिकून सवरून चांगला शहाणा झाल्याशिवाय त्याचा विवाह करावयाचा नाहीं. दुष्ट सुजनकुमार एका भलत्याच नादीं लागून आपल्या जन्माचें वाटोळें करून घेत होता, या गोष्टीची बिचाऱ्या माझ्या बापास कल्पनाही नव्हती ! मंडळी चुलती मेल्यानंतर माझ्या चुलत्यानें आपल्या घरीं स्वयंपाक वगैरे कामकाज करण्यास एक विधवाबाई ठेविली होती. तिचें नांव चंद्रा असें होतें. त्या वेळेस तिची उमर २३।२४ वर्षांची होती. चमेली नांवाची तिला एक मुलगी होती.

मी दिल्लीस रहावयास गेलों त्यावेळेस ती सुमारें ११।१२ वर्षांची असेल. माझ्या चुलत्याचा व या चंद्राचा कांहीं गुप्तसंबंध असावा असा संशय येण्यास मला बरेंच कारण होतें. चमेलीच्या संगतींत दिवस रात्र असल्यामुळें तिचा माझा फार स्नेह जमला व अखेर हळूं हळूं त्या स्नेहास प्रीतीचें स्वरूप येऊं लागलें. ती व मी गप्पागोष्टी करीत पुष्कळवेळ बसत असूं. ही गोष्ट माझ्या चुलत्यास बिलकूल माहीत नव्हती. शेवटीं माझ्या चुलत्यानें मला एका जहागिरदाराची मुलगी मुकर केली. चमेलीशिवाय मी कोणाशींहि विवाह करणार नाहीं असें मी आपल्या चुलत्यांच्या कांहीं स्नेह्यांजवळ स्पष्ट सांगितलें. त्या लोकांनीं माझें मन वळविण्याचा बराच प्रयत्न केला परंतु, तो सर्व व्यर्थ गेला. विवाह पांच चार दिवसावर आला. त्यावेळेस माझ्या चमेलीवर असलेल्या प्रेमसंबंधानें सर्व वर्तमान माझ्या चुलत्याच्या कानीं गेलें. त्यावर त्यानें मला आपल्यापुढें बोलावून माझी बरीच निर्भत्सना केली. शेवटीं मी मोठ्या उर्मटपणानें उत्तर केलें कीं ‘ आपल्या जिनगीच्या जोरावर आपण

माझ्यावर असा अंमल चालवीत असाल तर मला त्या जिनगीची बिलकूल जरूर नाहीं ! हा पहा मी चाललों.' असें ह्मणून मी जाऊं लागलों तों माझ्या चुलत्याच्या हुकमानें नोकरचाकरांनीं मला पकडून खोलींत कोंडलें. कोठडीमध्यें रात्रीचे बारा वाजेपर्यंत सरासरी मी बेशुद्धच पडलों होतों. शेवटीं एका मोलकरणीनें मला कडी काढली. मी तसाच तडक खोलींतून निघून घराबाहेर चालतां झालों. जातें वेळीं माझ्याबरोबर चमेलीची एक तसबीर व तिचें एक स्वदस्तुरचें पत्र एवढेंच होतें. हें पत्रहि माझ्या चुलत्याच्या हातांत गेलें होतें. परंतु या चाणाक्ष मोलकरणीनेंच तें मोठ्या चतुराईनें मिळवून मला परत आणून दिलें.

घर सोडल्यानंतर माझें असें मला कोणीच राहिलें नाहीं. येवढी विस्तीर्ण पृथ्वी, पण तिच्यामध्यें आसरा करण्यास मला कोठेंहि स्थान राहिलें नाहीं ! भटकत भटकत मी योगमायेच्या देवालयापर्यंत गेलों. तेथील उपाध्ये व पुजारी लोकहि माझ्या ओळखीचे होते. त्यांनीं माझा चेहरा कांवरा बावरा पाहून मला पुष्कळ प्रश्न केले. मी त्यांना कांहीं थांग लागून दिला नाहीं. आपण येथें आल्याचें कदाचित् आपल्या चुलत्याला जाऊन सांगतील या धास्तीनें मी तेथून दुसरे दिवशींच पोबारा केला. यानंतर मी कसें दिवस घालविले त्याचें वर्णनच न करणें बरें. पोटासाठीं मला कित्येक वेळां भीक मागण्याचीही पाळी आली, परंतु ईश्वराला मी एवढाच धन्यवाद देतों कीं, असल्याहि प्रसंगीं त्यानें माझ्या हातून कोणत्याहि प्रकारचें वद काम होऊं दिलें नाहीं. चमेलीचें पत्र व तिची तसबीर यावरच मी प्राण धारण करून होतों. 'माझ्यासारख्या भिकार पोरीच्या नादीं लागून आपण आपल्या जन्माचें नुकसान करून घेऊं नये. मी जोगीण बनून ईश्वरसेवेंत आपला सर्व जन्म काढीन ! माझी आपण बिलकूल काळजी करूं नये. परंतु माझ्या-मुळें आपण आपल्या जिनगीस ह्मणजेच सर्व ऐहिक सुखास मुकून विपत्तींत पडाल तर मात्र माझें सर्व आयुष्य कष्टमय होईल' असा चमेलीच्या पत्राचा आशय होता. ती तसबीर व तें पत्र आतां मजजवळ नाहीं. त्याचें काय झालें हें मी पुढें सांगेन. परंतु, तिचें तें हृदयद्रावक पत्र वाचून मी अशी प्रतिज्ञा केली कीं 'लग्न लावीन तर चमेलीशींच लावीन. दुसऱ्या कोणाशींहि लावणार नाहीं.' धन्य आहे त्या परमेश्वराची. अखेरीस त्यानें

माझी ही प्रतिज्ञा शेवटास नेली व आजपर्यंत इतर स्त्रीकडे वर डोळा करून पाहण्याची मला कधीं इच्छाहि झाली नाहीं. मी हिंदुस्थानामध्यें सात वर्षें यात्रा करीत हिंडलों. तेव्हां काशीसही माझें येणें झालें होतें. परंतु, धनकुमार किंवा विजयकुमार यांपैकीं कोणाचीहि मी कधीं भेट घेतली नाहीं. यात्रा करीत असतां चमेलीचा मी पुष्कळ शोध केला. परंतु, तिचा कोठेंहि ठावठिकाण लागला नाहीं.

एके दिवशीं वृंदावनास असतां यमुनेच्या काठीं चमेलीची तसवीर काढून मी दुःखकरीत बसलों होतों. इतक्यांत एक इसम माझ्या पायावर लोटांगण घालून मोठ्यानें रडूं लागला. प्रथम मी बराच घाबरून गेलों. परंतु त्यास उठवून त्याच्या तोंडाकडे पाहतों तों हा आपल्या चुलत्याचा रामजीवन नांवाचा जुना नोकर आहे असें मीं ओळखिलें. माझ्या शोधासाठीं माझ्या चुलत्यानें हजारों रुपये खर्च केले. शेकडों माणसें देशोदेशीं रवाना केलीं. परंतु अखेर पत्ता लागत नाहीं असें आढळून आल्यावर त्यानें सर्व जिनगी माझ्या नांवानें करून ठेवली; व आपलें अवशिष्ट आयुष्य दुःखमय स्थितींत तो घालवूं लागला. अशीकडे वर्ष दोनवर्षें तर तो आजारीच आहे. त्यानें मला आपल्या शोधार्थ पाठविल्यास आज आकरा महिने झालें, तेव्हांपासून मी आपला एकसारखा शोध करीत आहे असें रामजीवननें मला सांगितलें.

चुलत्याकडील हें वर्तमान ऐकून मला फारच दुःख झालें, व रामजीवन बरोबरच मी दिल्लीस गेलों, दिल्लीस पोहोंचावयास आम्हांस सहा दिवस लागले. तितक्या दिवसांत माझ्या डोळ्याचें पाणी खळलें नाहीं. ज्यावेळेला मी घरीं पोहोंचलों त्यावेळेस माझ्या चुलत्याची इहलोकची यात्रा संपण्याचा अगदीं बेत आला होता. त्यावेळचें माझें दुःख काय विचारावें! माझ्या चुलत्याची वाचा बसली होती. पण त्याच्या डोळ्यांतून मात्र एकसारख्या अश्रुधारा चालल्या होत्या. त्यानें रामजीवनास कांहीं खूण केली. तिचा अर्थ मला कळला नाहीं. पण रामजीवनास मात्र समजला. त्यानें बिछान्याखालची एक किल्ली काढून माझ्या तात्काळ हवाली केली.

चुलत्याच्या निधनानंतर मी त्याचा और्ध्वदेहिक विधी यथासांग केला व एक महिन्यानंतर रामजीवननें दिलेल्या किल्लीनें खजिन्याची खोली उघडली. तेथें सुमारें सहा लक्षांचा ऐवज मला सांपडला. शिवाय माझ्या चुलत्याचें

राहतें घर त्याच्या मालकीची एक बाग व सालीना दहा हजार रुपयांचा एक गांव हीं सर्व त्यानें माझ्या नांवानें करून ठेवलीं होतीं. ती सर्व दौलत पाहून मला चमेलीचें स्मरण झालें. तिच्याशिवाय हीं सर्व संपत्ति मला असून नसल्यासारखीच होती. दोनतीन महिने मीं तसेंच कंठले. व अखेर जिवास चैन पडेना ह्मणून रामजीवनच्या स्वाधीन दौलतीची सर्व व्यवस्था करून मी पुन्हां प्रवासास निघालों. आतां पहिल्यासारखा मी कफल्लक नव्हतों. आतां माझ्या गाठीस भरपूर पैसा होता.

प्रकरण ४० वें.

मागील प्रकरणांतील वृत्तांत पुढें चालू.

घरांतून निघालों तो तहत मी काशीस आलों. आपली सर्व जिनगी आपल्या भावांना वाटून देऊन आपण विरक्त होऊन रहावें असा माझा इरादा होता. काशीस येऊन मी धनकुमाराच्या येथें उतरलों. परंतु माझी सुशील भावजय परलोकवासी झाली असून माझ्या भावानें दुसरेंहि लग्न केलें. द्वितीय संबंधापासून त्याला दोन मुलेंहि पण झालीं. मिळून तेथील सृष्टि पार बदलून गेलेली मला दिसली. दोघेहि भाऊ विभक्त रहात होते. त्यांचा दोघांचाहि रोजगारधंदा चांगला चालला होता त्यांच्यामध्यें तेढ येण्याचें काय कारण झालें कोण जाणें, पण त्यांनीं एकमेकांचें नांव सोडून दिलें होतें. हें मला अगोदरच कळतें तर मी आपला स्वतंत्र बिऱ्हाड करूनच राहिलों असतों. त्यांचें दोघांचें पराकाष्टेच वैमनस्य पडल्यामुळें मला कोणाशींहि प्रेमानें वागण्याची पंचाईत पडूं लागली. माझ्या चुलतीच्या मरणाची वार्ता मी आपल्या भावांना कळविली. परंतु माझें जीवनवृत्त किंवा चमेलीचा वृत्तांत हीं त्यांना मीं मुळींच सांगितली नाहींत. दौलतीचा वांटा करण्याकरतां मी येथें आलों आहे असें जर मी त्यांना प्रथमच सांगितलें असतें तर तें दोघेहि माझ्या तंत्रान वागते!

एके दिवशीं आमचे ज्येष्ठबंधू आह्मास रागानें ह्मणाले कीं ‘ तुह्माला धाकट्या बंधूंच्या येथें इतका संबंध ठेवावयाचा असेल, तर येथून आपण

आपणें बिन्हाड हलवावें हें चांगलें.' बंधूंची अशी आज्ञा होतांच आम्हीं आपलें बिन्हाड ताबडतोब हलविलें व थोरल्या बंधूशीं संबंध सोडून धाकट्या बंधूशींच सलगीनें वागूं लागलों. आमच्या धाकट्या भावास विनोदकुमार नांवाचा मुलगा होता. प्रमोदकुमार हें या मुलाचेंच चिरंजीव होत. विनोदकुमार त्या वेळेस ५|६ वर्षांचा होता. माझें त्यावर फारच प्रेम असे. त्यालाही माझी फार संवय लागली. व माझें बिन्हाडीं वरचेवर येऊन गेल्याशिवाय त्याला करमेनासें झालें. त्याला आपल्या आईचाहि इतका लळा नव्हता. एके दिवशीं तिसरेप्रहरीं मी विनोदला पोहों-चविण्यास घरीं गेलों त्या वेळेस विजनकुमार घरीं नव्हता. मुलास चौकांत सोडून मी परत जाऊं लागलों तों विजनकुमाराची स्त्री माझ्या पायावर पडून ढळढळां रडूं लागली. 'अहो, हें काय, हें काय' असें मी आश्चर्यानें विचारूं लागलों. त्या स्त्रीकडे पाहतांच जणूं काय आकाशींची वीज माझ्या डोक्यावर कडाडून पडावी अशी माझी स्थिती होऊन गेली. ती स्त्री दुसरी कोणी नसून माझ्या हृदयाचें अराध्य दैवत साक्षात् चमेलीच होय ! मला एकदम चक्कर येऊन मी जमिनीवर पडलों. त्यावेळेस घरांत माझा भाऊ किंवा त्याचे नोकरचाकर कोणीहि नव्हते. 'तूं येथें कोठून आलीस ?' असें मीं तिला विचारलें. माझ्या हातांत एक चिट्टी देऊन ती मला ह्मणाली 'आपण आतांच्या आतां येथून निघून जावें. नाहींतर माझी स्थिति फार विलक्षण होऊन जाईल' यावर ती विनोदला कडेवर घेऊन चटकन् घरांत निघून गेली.

'तेथून बिन्हाडीं आल्यावर चमेलीनें दिलेली चिट्टी मी ताबडतोब वाचूं लागलों. त्यांतील मजकुराचा आशय सांगतों.

आतां आपण मला पित्यासमान आहांत. आपली दृष्टादृष्ट झाल्यापासून माझ्या मनाची चलबिचल उडून गेलेली आहे. तेव्हां आपण पुन्हां माझ्या दृष्टीं पडूं नये एवढीच माझी इच्छा आहे ! आपण दिल्लीहून निघून गेल्यानं-तर मी आपल्या आईबरोबर बनारस येथें आलें व आपल्या आईबरोबर एका बिन्हाडीं राहूं लागलें. तें बिन्हाड आपल्या कनिष्ठ बंधूच्या घराच्या पिछाडीस होतें. येथें आल्यानंतर एक वर्षानें माझा विवाह झाला. ज्यांनीं माझें पाणिग्रहण केलें ते आपलें कनिष्ठ बंधु होत हें विवाह झाल्यानंतर मला

समजलें. नवऱ्यापासून कोणतीहि गोष्ट चोरून ठेवूं नये; याविचारानें मी आपला कुमारी अवस्थेतला सर्व वृत्तांत त्यास निवेदन केला. विवाह झाल्यानंतर दोन तीन वर्षांनीं माझी आई वारली. त्यानंतर मला मूलबाळ होऊन माझा प्रपंच यथास्थित चालला. वास्तविक आपण मला पित्यासमान आहां. तरी आपली मूर्ति माझ्या हृदयांतून कांहीं केल्या जाईना. हीही गोष्ट मी आपल्या पतीपासून लपवून ठेवली नाहीं. जेव्हां जेव्हां मी त्यांना अशा गोष्टी सांगें, तेव्हां तेव्हां ते फक्त किंचित् हास्यवदन करीत व दुसरें कांहींहि बोलत नसत. आज आपल्याला जी चिठ्ठी दिलेली आहे तीहि त्यांना दाखवून मी ह्मणालें. 'आज मी आपल्या ज्येष्ठ बंधूंना ही चिठ्ठी प्रत्यक्ष त्यांचे जवळ जाऊन देणार ? आपण पोर पोहोंचविण्यास घरीं येणार त्यावेळेस माझी आपली गांठ पडावी ह्मणून ते मुद्दाम बाहेर निघून गेले. माझ्या प्रेमानें आपण फशीं पडून प्रपंचसुखास सर्वस्वीं आंचवला, मी मात्र खुशाल संसार करूं लागलें असा विचार माझें मनांत आला ह्मणजे माझें हृदय फाटून जातें ! मी आपल्यासारखी अविवाहित राहून आपला विवाह दुसऱ्या कुमारीशीं झाल्यानें जें मला दुःख झालें असतें तेंच दुःख तुह्मांला देण्यास मी कारण झालें याबद्दल मला जें दुःख वाटत आहे त्याची कल्पनाहि होणें मुष्किलीचें आहे.'

'चमेलीचें हें पत्र वाचून माझ्या अंतःकरणाची काय अवस्था झाली याची कल्पना कोणास होणार ? तें पत्र वांचून ' अनुज वधू भगिनी सुत नारी। सुनुसठ यह कन्या समचारी ॥ ' या तुळशीदासाच्या दोहऱ्याची आठवण झाली. थोडा वेळ झाल्यानंतर मी चमेलीची तसवीर चटदिशीं आपल्या गळ्यांतून काढली व तिची दोन्हीहि पत्रें अग्निदेवतेस अर्पण केलीं. इतकें केलें तरी माझ्या चित्तास शांति ह्मणून येईना ! अद्यापहि चमेलीची मूर्ति माझ्या डोळ्यासमोर मूर्तिमंत उभी आहे. तिच्या पत्रांतलें प्रत्येक अक्षर अद्यांपहि मला स्पष्टपणें दिसत आहे त्याला माझा तरी काय उपाय ? स्मृतीवर आजपर्यंत कोणाचा ताबा चालला आहे. तरी पण चमेलीस मी आपल्या कन्येसमच लेखीत आहे. संसारांत आतां आपल्याला कोणत्याहि प्रकारचें बंधन राहिलें नाहीं. तेव्हां संन्यासी होऊन कोठें तरी वास करावा असा माझा निश्चय झाला. तों सायंकाळचे वेळीं माझा कनिष्ठ बंधु विजनकुमार हा माझे भेटीस आला. मी त्याला सर्व वृत्तांत सांगितला. तरी त्याला

त्याचें कांहींच वाटलें नाहीं. त्याच्या उल्लसित वृत्तीचा व हास्य वदनाचा यत्किंचितही भंग झाला नाहीं. इतका सुशील बंधु दुसरा कोठें पहावयास सांपडेल काय? आपल्या स्त्रीच्या तोंडून अशी वार्ता दुसऱ्या कोणी जर ऐकिली असती तर त्यानें तिचें नांव अमरणांत टाकून दिलें असतें. परंतु विजनकुमार हा केवळ शांतीचा पुतळा व सहनशीलतेची प्रतिमाच होता. अविश्वास, संशय, किंवा दुर्भावना या चिजा काय आहेत, याची त्याला वार्ताहि नव्हती.

' मीं आपला संन्यास घेण्याचा निश्चय विजनकुमारास सांगितला. तेव्हां तो हसूं लागला. ' ' ही थट्टा नाहीं, माझा खराच निश्चय झाला आहे ' असें मी त्याला निक्षून सांगितल्यावर त्याला परमावधीचें दुःख झालें. आमच्या दोघांच्याहि डोळ्यांतून एकसारखा आश्रुप्रवाह चालूं लागला. असा कांहीं वेळ गेल्यानंतर शेवटीं तो ह्मणाला ' तुह्मांला संन्यासच जर घ्यावयाचा आहे, तर निदान काशीस तरी रहावें ह्मणजे आह्मांला आपलें वरचेवर दर्शन घडेल. ' काशीस रहाण्याचें कबूल केल्यास चमेलीचे जीवास फार कष्ट होतील? असा विचार करून मी ह्मणलों ' पुढें काय होईल तें होवो. परंतु, सध्यां तर मी तीर्थयात्रा करीत हिंडणार. संन्याशाला धनदौलत काय करावयाची आहे? माझ्या जवळ जी काय स्थावरजंगम जिनगी आहे ती सर्व तुझ्या नांवानें करून टाकून मी संन्यास घेणार. यावर तो ह्मणाला ' याचा जबाब मी तुह्मांला उदईक सांगेन. ' दुसरे दिवशीं येऊन त्यानें साफ सांगितलें कीं ' आपल्या दौलतींतली एक कवडीहि घ्यावयाची नाहीं ' असें माझ्या बायकोनें मला निक्षून सांगितलें आहे. ' मी आपली सर्व इस्टेट विनोदाच्या नांवानें करून देतों. ' असें मी ह्मणालों. या ह्मणण्यासहि चमेलीचा रुकार मिळेना. जेव्हां कांहींच चालेना तेव्हां एके दिवशीं कांहीं कामचा बहाणाकरून मी विजनकुमारास रामनगरास पाठविलें. व एका ह्मातान्याचा वेष घेऊन चमेलीकडे गेलों. व तिची परीक्षा पाहूं लागलों. परंतु ती कांहीं केल्या दौलत घेण्यास आपली संमति देईना. तिच्यासारखी पतिव्रता स्त्री या जगांत फारच विरळा सांपडेल! तिच्या आईचें चरित्र आठवलें ह्मणजे भांगेच्या पोटीं ही तुळस

कशी आली याबद्दल आश्चर्य वाटूं लागतें. आपले सर्व प्रयत्न निष्फळ झालें असें पाहून मी तडक दिल्लीचा रस्ता धरला.

प्रकरण ४१ वें.

मागील प्रकरणावरून पुढें चालूं.

" आतां मी तुह्माला बिपिनबिहारी व जवाहिरलाल, यांच्या कृष्णकृत्यांची कहाणी सांगतों. परंतु, हा वृत्तांत लीलावती व लाडली यांचे कानावर न पडेल तर बरें असें मला वाटतें. "

" छे, छे, तसे कधींही होणार नाहीं. आह्मी तो वृत्तांत तर ऐकणारच. तो वृत्तांत ऐकून आह्मांला कदाचित् दुःख होईल. परंतु, आह्मांला तो माहित असलाच पाहिजे " असें त्या दोघीजणी एकदम ह्मणाल्या. यानंतर आपल्या आजानें दिलेली पेटी, तीं दोन पत्रें व बंद केलेला पितळेचा डबा या सर्व वस्तु घरांतून आणून लीलावतीनें सुजनकुमाराच्या पुढें ठेवल्या. त्या डब्यांत एक खत व एक ताम्रपत्रहि होतें. सुजनकुमारनें ती सर्व पत्रें वांचून आपली कहाणी सांगण्यास प्रारंभ केला.

' ठीक आहे तर ऐका आतां. मी हा वृत्तांत आतां थोडक्यांतच संपवितों. दिल्लीला जाऊन मी आपली सर्व स्थावरजंगम इस्टेट् बेचून टाकून सर्व जिनगीचे रोख पैसे केले. त्यावेळेस कंपनी सरकारचे बडे लॉटसाहेब दिल्लीस होते. त्यांची मीं मुलाखत घेतली. आमच्या आजोबास मिळालेली बादशाई सनद त्यांनीं मला दाखविली. त्यावर मी आपला मानस त्यांना कळविला. प्रथम त्यांनीं मला विवाह करण्याबद्दल पुष्कळ सांगून पाहिलें. परंतु त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं असें पाहून अखेर त्यांना माझ्या तजविजीसच रुकार दिला. त्यावर मी दोन ताम्रपत्रें तयार केलीं. तीं दोन्हींहि अगदीं हुबेहुब सारखीं होतीं. त्यांतील एक सरकारांत ठेवलें व दुसरें मीं आपल्या जवळ ठेवलें तें आतांहि मजजवळ आहे. त्यांतील मजकूर मी तुह्माला वांचून दाखवितों.

ताम्रपत्रांतील मजकूर.

' माझें नांव सुजनकुमार. माझ्या बापाचें नांव हरीरामकुमार. माझा पिता परलोकवासी झाला. आम्ही तिघेजण भाऊ. पैकीं थोरल्याचें नांव धनकुमार, मधल्याचें नांव सुजनकुमार व धाकट्याचें त्रिजनकुमार. मी आपल्या चुलत्याच्या मांडीवर दत्तक गेलों. व त्याच्या सर्व स्थावर जंगम जिनगीचा मालक झालों. कांहीं कारणामुळें मी आपला सारा जन्म अविवाहित स्थितींतच घालविला. व मी आपली सारी स्थावर जंगम संपत्ति विकून एक कोट रुपये नगद जमविले. ते मी कंपनीसरकारच्या ताब्यांत दिले आहेत. ही रक्कम अनामत ठेवल्यापासून पंचवीस वर्षांचे आंत खुणेचें ताम्रपत्र दाखवून आपला हक्क सांगण्यास माझे नातेवाइकांपैकीं जो कोणी येईल त्यास ही रक्कम द्यावी. तसें न झाल्यास या रकमेचा विनियोग एखाद्या लोकहिताचे कामीं करावा.

ताम्रपत्र वाचून झाल्यावर सुजनकुमारानें तें सर्वांस दाखविलें. हें ताम्रपत्र सरकारास जो दाखवील त्यास ही रक्कम मिळून ' राजा ' अशी पदवीहि मिळणार. हक्कदार स्त्री असेल तर तिला ' राणी ' असा किताब मिळणार. हा सर्व मजकूर असलेली एक सरकारी सनदहि सुजनकुमारास मिळाली होती. तीहि त्यानें सर्व मंडळीस दाखविली. ही प्रमोदकुमाराचे हातांत देण्याकरितां त्यानें पुढें केली; परंतु, प्रमोदकुमार ह्मणाला. ' इच्याकरतां मला मोठमोठ्या विपत्ति भोगाव्या लागल्या, याकरितां मी तिला स्पर्शीहि करणार नाहीं. ह्मणून सुजनकुमारानें ती लीलावतीचे हातांत दिली.

प्रकरण ४२ वें.

मागील प्रकरणावरून पुढें चालूं.

सुजनकुमार नंतर ह्मणाले " सर्व संसाराचा त्याग करून नुसतें बाह्यात्कारींच नव्हे, तर अंतर्यामींहि मी सन्यासवृत्ति धारण करून भिक्षावृत्तीनें चरितार्थ चालवीत देशोदेशीं तीर्थयात्रा करूं लागलों हें ताम्रपत्र व ही सनद मात्र मी अगदीं प्राणापलीकडे जपून ठेवली होती. तीस वर्षांनंतर मी बनारसला परत आलों, तों तेथील मन्वंतर पार बदलून गेलें होतें. माझे दोन्ही भाऊ व विजनकुमाराची पत्नी चमेली हीं सर्व मरून गेली होती. माझ्या वडील भावाचें दोन तीन मुलगे एकमेकांपासून विभक्त रहात होतें. तरी पण तीं सर्व खाऊन पिऊन चार पैसे बाळगून होतीं, हें पाहून माझ्या जीवास संतोष वाटला. माझ्या धाकट्या भावाचा मुलगा विनोदकुमार हाहि आतां चांगला मोठा झाला होता. त्याला कांहीं मुलेंही होऊन गेली होतीं. फक्त आतां त्याला प्रमोदकुमार येवढाच आठ नऊ वर्षांचा मुलगा होता. अशी सर्व स्थिती पाहून मी कोणाचें येथें न राहतां वेगळाच राहिलों.

एके दिवशीं संध्याकाळीं मी गंगातीरावर बसलों होतों. त्या अशुभ वेळीं दोन माणसें माझ्याजवळ येऊन बसलीं. तींच जवाहिरलाल व विपिन विहारी हीं होत; इकडल्या तिकडल्या गोष्टी बोलतां बोलतां गैरसावधगिरीनें मीं आपलें. सर्व चरित्र त्यांना सांगितलें. त्यानंतर ते दोघेहीजण माझ्याकडे रोज येऊं लागले. व तासतास बोलत बसूं लागले. याप्रमाणें एक महिना गेला. त्यांचा माझा बराच परिचय झाल्यामुळें मी त्यांच्यापासून आपली कोणतीहि गोष्ट लपवून ठेवली नाहीं. हे दोन्हीहि इसम ' मनमलीन तन सुंदर कैसे । विषरस भरा कनकरस जैसे ॥ ' या तुळशीदासाच्या उक्तींत सांगितल्याप्रमाणें मूर्तिमंत पुतळे आहेत, हें माझ्या तेव्हां लक्षांत आलें नाहीं. अर्थात् त्यावेळीं त्यांना मी ही सनद व हें ताम्रपत्र हीं दाखविलें. ही सर्व जिनगी विनोदकुमार व त्याचा मुलगा प्रमोदकुमार यांच्या नांवानें केली असल्याचेंहि मी त्यांना सांगितलें. ही वार्ता ऐकून ते दोघेहिजण

तें ताम्रपत्र व ती सनद हीं दोन्हींहि पाहण्याची इच्छा वरचेवर प्रकट करूं लागले. व मीहि त्यांना निष्कपटपणानें तीं दाखवूं लागलों. पुढें त्यांची इच्छा जसजशी अधिक वाढूं लागली तसतसा त्यांचेबद्दल मला संशय येऊं लागला. शेवटीं तीं दोन्हींही मी एका डब्यांत घालून तो डबा बंद करून जमिनींत पुरून ठेवला. ती जागा या पवित्र शेतांत एका प्रसिद्ध तीर्थाचे ठिकाणीं आहे. ही जागा मला एका संतानें दाखविली होती. ही जागा कोठें आहे हें आपल्याला कळावें ह्मणून बिपिनबिहारी व जवाहिरलाल यांनीं हरतऱ्हा करून पाहिल्या. परंतु मी त्यांना त्याचा पत्ता लागूं दिला नाहीं !

हें ऐकून गोविंदचंद्र ह्मणाले ' ही गुप्त जागा कोठें आहे हें आपण आह्मांला सांगाल किंवा दाखवाल काय ? '

यावर सुजनकुमार ह्मणाला ' नाहीं, ज्यावेळेस त्या महात्म्यानें मला ही गुप्त जागा सांगितली त्यावेळेस ही गुप्त गोष्ट मी कोणाजवळ सांगणार नाहीं अशी मी त्याजवळ शपथ वाहिली आहे. बिपिनबिहारी व जवाहिरलाल यांनीं पुढें माझ्यावर भयानक प्रसंग आणलें. किंबहुना माझा जीव घेण्याचाही त्यांनीं प्रयत्न केला. तरीपण मी त्यांना या जागेचा थांग लागूं दिला नाहीं. परंतु धन्य आहे त्या ईश्वराची कीं त्यानें ती सनद व तें ताम्रपत्र हीं त्या जागीं नेऊन ठेवण्याची या पूर्वीच मला बुद्धी दिली. ज्या दिवशीं मी त्या जागीं या वस्तू ठेऊन आलों त्याचरात्रीं मध्यान्हीस मी आपल्या खाटेवर निजलों असतां बिपिनबिहारी जबरदस्तीनें माझ्या छातीवर बसला व जवाहिरलालानें माझ्या नाकाम कांहीं औषध लावलें त्याबरोबर मी बेशुद्ध झालों. जागा होऊन पाहतों तों जवाहिरलाल व बिपिनबिहारी माझ्या भोंवतीं नंग्या तरवारी घेऊन उभे आहेत असें माझ्या दृष्टीस पडलें. मी त्यांना ह्मटलें ' भल्या माणसांनों मी तुमचें काय केलें आहे ह्मणून तुह्मी माझा असा पिच्छा पुरवीत आहांत ? ' त्यावर ते दोघेहि ह्मणाले ' ताम्रपत्र व सनद हीं दोन्हींहि मुकाट्यानं आमच्या हवालीं कर, नाहींतर आह्मी तुझे बोटा बोटाएवढे तुकडे करूं. परंत मी तें कांहीं केल्या कबूल केलें नाहीं. तेव्हां त्यांनीं तो नाद सोडून दिला. परतु मी त्यांच्या अटकेंत होतोंच. तेथेंच मी आपल्या आयुष्याचे दिवस मोजीत पडलों होतों. याप्रकारें आठ नऊं वर्षेपर्यंत

त्यांनीं माझा छळ केला. मला असें कष्ट सोसावे लागतील हें एका महात्म्यानें मला पूर्वींच सांगून ठेवलें होतें. त्यांतून मी सुटणार असाहि त्यानें मला भरंवसा दिला होता.'

प्रकरण ४३ वें.

मागील प्रकरणावरून समाप्त.

इतका वृत्तांत सांगून झाल्यानंतर सुजनकुमारानें अंमळ विसावा घेतला. आपणहि आतां लीलावतीच्या जवळील पत्रांत काय होतें तें पाहूं "सुजनकुमाराची भेट झाल्यानंतर जवाहिरलालनें बिपिनबिहारीस असा सल्ला दिला होता कीं या घेरड्यापासून ताम्रपत्र व सनद ही लुंगवून त्यास ठार करून टाकावें. परंतु यावस्तू जेव्हां त्यांच्या हातीं लागेनात तेव्हां त्यांनीं दुसरें एक खोटें ताम्रपत्र व बनावट सनद ही तयार केली व ती जुनी दिसण्यासाठीं कांहीं दिवस त्यांनीं जमीनींत पुरून ठेविलीं. पुढें जवाहिरलाला शेंकडा दहा कमिशन ठरवून बिपिनविहारीनें प्रमोदकुमारास आपल्या हातीं धरलें व आपल्या खटपटीबद्दल सर्व दौलतीचा चौथा हिस्सा मेहनताना ह्मणून देण्याचें त्यानें प्रमोदकुमाराजवळून कबूलहि करून घेतलें. यानंतर पुढें जी हकीकत घडली ती वाचकांना माहीतच आहे. प्रमोदकुमारानें जाते समयीं बिपिनबिहारीच्या नांवानें एक पत्र लिहिलें होतें तें आह्मी वर सांगितलेंच आहे. प्रमोदकुमार जों तडक निघाला तों ज्या ठिकाणीं त्यानें आपल्या सासऱ्यास वरचेवर जातां येतां पाहिलें होतें, त्या ठिकाणीं ह्मणजे सारनाथाचे टेंकडीवर तो गेला. तेथें त्यानें आपल्या खिशांतला कंदील लावला. त्यानें प्रथम कबरीवरचा दगड बाजूला सारला. चारी बाजूस बघून कोणी नाहीं अशी खात्री झाल्यावर त्यानें पुन्हां दिवा लावला व कबरीचबुतऱ्यांत तो उतरला. कबरींत उतरल्यानंतर बऱ्याच मेटाकुटीनें या खोलींतून त्या खोलींत व त्या खोलींतून या खोलींत अशा रीतीनें तो कबरीच्या खालीं असलेल्या भुयारांत फिरत होता. इतक्यांत एका संगमरवरील दगडाच्या कोठडींत एक जटाधारी वृद्ध योगी पद्मासन

घालून परमेश्वराचें ध्यान करीत बसला आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. त्यांच्याजवळ एक भला मोठा लांबलचक सर्प वेटोळें घालून बसला होता. खोलींतहि सूर्यप्रकाशाप्रमाणें जिकडे तिकडे लख उजेड पडला होता. हा सर्व प्रकार पाहून प्रमोदकुमार दारांतल्या दारांतच दचकून उभा राहिला. त्याच्या पावलांची चाहूल एकून म्हातारा आंतून ओरडला— ‘ कां बिपिनविहारी आज इतक्या रात्रीं आपण येथें काय योजून आलांत ? ’ हें ऐकून प्रमोदकुमारानें बाहेरूनच उत्तर केलें ‘ महाराज; मी बिपिनविहारी नाहीं, त्यांचा जामात प्रमोदकुमार आहे. ’

म्हातारा—काय ? प्रमोदकुमार ?

असें म्हणून, प्रमोदकुमाराकडे निरखून पाहून म्हाताऱ्यानें त्यास पोटाशीं धरलें.

म्हातारा—प्रमोदकुमार, खरंच कां तूं आहेस. कां मी हें स्वप्न पहात आहे ?

प्रमोद०—नाहीं महाराज. आपण पाहतां तेंच खरें आहे.

म्हातारा— काय म्हणालास ? बिपिनविहारी तुझा सासरा आहे ?

प्रमोद०—होय.

म्हातारा— तूं येथें कसा आलास बरें ?

प्रमोद०—प्रथम मला आपण हें सांगा कीं आपण कोण, व आपण येथें कां रहात असतां ?

म्हातारा—बाळा, मी तुझा दुर्दैवी आजा सुजनकुमार असून बिपिनविहारी व जवाहिरलाल यांच्या जाळ्यांत सांपडलों आहे.

प्रमोद०—आपण माझे आजे म्हणजे दिल्लीस राहणारे सुजनकुमारच काय ? माझ्या आजीनें मला मरतेसमयीं ज्याचा वृत्तांत सांगितला होता तें आपणच काय ? सरकारचे स्वाधीन मोठी थोरली रक्कम अनामत ठेवलेले तुम्हींच काय ?

म्हातारा—होय तोच मी.

प्रमोद०—माझ्या आजींची कांहीं हकीकत आपणाला सांगतां येईल काय ? ती जर आपणास सांगतां आली तर आपल्या खरेपणाबद्दल मला संशय राहणार नाहीं.

म्हातारा—तुझ्या आजीचे नांव चमेली. लहानपणापासून माझें तिच्यावर प्रेम होतें

प्रमोद०—(मध्येंच) बस, बस. आतां माझा संशय फिटला.

म्हातारा—मुला, तूं मला ओळखीत नाहींस हें बरोबरच आहे. मी तुला दहा वर्षांचा असताना पाहिलेलें आहे.

प्रमोद०—ठीक आहे. आतां येथें पळभरही राहणें चांगलें नाहीं. आपण प्रथम बाहेर जाऊं आणि मग आपणाला जें बोलावयाचें तें निवांत-पणें बोलूं.

म्हातारा—ठीक आहे पण जरा तूं थोडी विश्रांती घे.

असें ह्मणून तो म्हातारा सापाच्या जवळ जाऊन बसला. कोठडींत पाऊल ठेवतांच प्रमोदकुमार बेशुद्ध होऊन धरणीवर पडला. हें पाहतांच म्हाताऱ्यानें आपल्या हातांतली आंगठी काढून त्याच्या अंगावरून फिरविली त्याबरोबर तो सावध झाला व म्हाताऱ्या शेजारीं जाऊन बसला. परंतु सापा-कडे पाहून त्याला अद्यापही भीति वाटत होती. तें पाहून म्हातारा ह्मणाला ' बाळा, असा भिऊं नकोस. हा साप खरा नसून निखालस नकली आहे. प्रमोद (आश्चर्यानें) काय ह्मणतां हा नकली आहे ? बरं मग खोलींत पाय टाकतांच मी बेशुद्ध कां बरं झालों.

म्हातारा—ऐक तर. याची हकीकत फार विलक्षण आहे. तूं बेशुद्ध झालास ही माझीच चूक आहे. हें कसें तें मी आतां तुला सांगतों. जेव्हां या भयारांत मला आटकेंत ठवलें तेव्हां ही कोठडी बंद होती इतकेंच नव्हे तर येथें कोठडी आहे असेंहि समजत नसे. या कोठडीला लागून दुसरी एक गुहा आहे. त्या गुहेंत एक मोठी विहीर आहे. जवाहिरलाल व विपिन-विहारी यांच्या जाचांतून मी आतां जिवंत सुटत नाहीं असी माझी निराशा झाल्यावरून मी आत्महत्या करण्याच्या हेतूनें या बावडींत उडी टाकली. पाण्यामध्यें दोन तीन पुरुष मी खालीं गेलों. तों माझ्या हातीं एक वाटोळा डबा लागला. डब्यांत काय आहे हें पाहण्याचे इच्छेनें मी उसळी मारून पाण्याच्यावर आलों. डब्यावर एक चिठ्ठी चिकटविली होती. त्या चिठ्ठीवर या खोलीचा ठावठिकाण लिहिला असून ती कोणत्या युक्तीनें उघडावयाची वगैरे संबंधानेंहि सायंत हकीगत लिहिली होती. या डब्यांत एक आंगठी व एक

प्रमोद०—नक्षत्र कांहीं मला माहीत नाहीं. बाकीचा तपशील मात्र बरोबर जमला.

म्हातारा—हें या छताचें खोदींव काम पहा. ह्या छतास एक खगोल चक्र लावलें आहे. त्या चक्रावरून चंद्र सूर्यग्रहणें, त्यांचा स्पर्शकाल, मोक्ष काल, त्याप्रमाणेंच ग्रहाच्या गती बरोबर समजतात. यांहीपेक्षां येथें कित्येक अपूर्व चमत्कार आहेत. परंतु ते सर्व दाखविण्यास आतां वेळ नाहीं. भगवंताच्या कृपेनें आपलें पुन्हां कधीं काळीं येथें येणें होईल तर मी तुला सर्व चमत्कार दाखवीन. हें पाहिलेंस कां घटिकायंत्राकडे? आतां पहाटेचे पांच वाजण्यास बिलकूल अवधि उरला नाहीं. यानंतर ते दोघेहि बाहेर यावयास निघाले. आंत जाते वेळीं प्रवेश निर्गमाच्या खाणाखुणा प्रमोदकुमारानें नीट लक्षांत ठेवल्यामुळें त्यांना बाहेर येण्यास फारशी अडचण पडली नाहीं. ते बाहेर येऊन पाहतात तों प्रभात झाली होती. सुदैवानें भुयारांतून बाहेर पडतांना त्यांना कोणीहि पाहिलें नाहीं.

प्रकरण ४४ वें.

बनारस सोडून निघून गेलें

बनारस येथील सर्व गल्लीकूचा सुजनकुमारास पूर्णपणें माहीत होत्या. यामुळें प्रमोदकुमारास घेऊन तो एका आड जागेंत गेला. व त्या दिवशीं त्यांनीं तेथेंच मुक्काम केला. बिपिनविहारी व जवाहिरलाल त्यांची भीति बाळगण्यास वास्तविक त्यांस आतां कारण उरलें नव्हतें. इतकेंच नव्हे तर बिपिनविहारी व जवाहिरलाल यांना पोलिसाच्या ताब्यांतहि त्यांस देतां आलें असतें. परंतु, प्रमोदकुमार व बिपिनविहारी यांचें जवळचें नातें असल्याकारणानें त्याला तसें करतां येईना. सारांश बिपिनविहारीमुळें जवाहिरलालाचाहि आयतांच बचाव झाला. त्या दिवसभर दोघांनींही विश्रांति घेतली. रात्रीं अंधार पडल्यानंतर दोघेहि बनारस सोडून गेले. बनारसेस आपल्या घरीं जाऊन राहण्याबद्दल सुजनकुमारानें प्रमोदकुमारास पुष्कळ आग्रह केला. परंतु बनारस येथें राहण्यास तो अगदीं नाराज होता. यामुळें त्यासहि तो आपल्याबरोबर घेऊन

गेला. प्रमोदकुमारानें लिहिलेलें पत्र वाचून व सुजनकुमार कैदखान्यांतून फरारी झालेला पाहून बिपिनविहारी इकडे फारच घाबरून गेला. ही सर्व हकीगत एकून राजा गोविंदचंद्र व ललितकिशोर यांना ते यंत्रागार पाहण्याची फारच उत्कंटा झाली.

प्रमोदकुमाराचें पत्र वाचून त्याची पत्नी कालिंदी व त्याची माता श्यामा यांचा अंत होऊन दुष्ट बिपिनविहारीनें आत्महत्या केली हें मागें सांगितलेंच आहे.

प्रकरण ४५ वें.

प्रमोदकुमाराचा वृत्तांत.

आजोबाबरोबर मी बनारसेहून रात्रीं निघालों. तेव्हां एक तासानें मी परत येतों असें मला सांगून आजोबा कोठे कामाला निघून गेलें. माझ्या मनांत नानातऱ्हेच्या शंका येऊं लागल्या. यांना पकडून कोणी कैद-खान्यांत ठेवील काय ? किंवा मला येथें एकटें टाकून हे निघून गेलें नसतील कशावरून ? अशा माझ्या मनांत नानाप्रकारच्या शंका येऊं लागल्या. परंतु, अखेर सांगितल्याप्रमाणें ते एक तासानें परत आलें. आजोबा कोणत्या कामाला गेले होतें हें मला अद्यापहि माहीत नाहीं.

सुजनकुमार—ज्या ठिकाणीं महात्म्याच्या सांगण्यावरून मी ताम्रपत्र व सनद यांच्या नकला ठेवल्या होत्या त्या जागीं जशाच्यातशाच आहेत किंवा नाहींत हें मी पाहून आलों. ह्या त्यावेळेस बरोबर घेण्याचें कांहीं कारण नव्हतें. पुढें पुन्हां जेव्हां मी काशीस आलों, तेव्हां त्या मी तेथून घेतल्या त्या तुह्मां सर्वांना मी दाखवून लीलावतीला दिल्या.

प्रमोद०—यानंतर एक सालभर मी आजोबाबरोबर तीर्थयात्रा करीत फिरलों. एक वर्ष झाल्यानंतर आजोबांनीं मला पराकाष्ठेचा आग्रह केल्याव-रून मी परत घरीं आलों. परंतु येथेंहि बाहेर राहूनच माझ्या घराची जी अवस्था मला समजली, ती ऐकून माझें काळीज फाटून गेलें. माझ्या विरहानें माझी सुशील स्त्री परलोकवासी झाली, त्यामुळें मला इतकें दुःख झालें कीं, हे

लीलावती तुझ्या पालनपोषणाची योग्य तजवीज, झालेली पाहून मी जिकडे वाट सांपडेल तिकडे निघून गेलों. आजोबांचा मी बहुत शोध केला. परंतु माझे सर्व श्रम व्यर्थ गेले. शेवटीं मी नेपाळांत गेलों. तेथें राजदरबारांत मला एक चांगलें काम मिळाल्यामुळें मी तेथेंच नांव बदलून राहूं लागलों. आठ नऊ वर्षे झालीं. त्या नंतर त्या ठिकाणीं आजोबांची माझी पुन्हां गांठ पडली. तेव्हांपासून मी त्यांना तेथेंच ठेऊन घेतले. एका जागीं राहिल्यामुळें त्यांना कंटाळा येऊन ते पुन्हां तीर्थयात्रेस जाण्याची इच्छा दर्शवूं लागले. मलाही आजपर्यंत एकलाख रुपयांची कमाई झाली होती. ह्मणून आजोबांच्या बरोबरच असावयाचे असा मनाचा निग्रह झाल्यामुळें मी आपल्या नोकरीस रामराम ठोंकला व मी आजोबाबरोबर हिंडू लागलों.

" लीलावती, दोन वर्षांपूर्वी आजोबाबरोबर मी येथें आलों होतों. परंतु यावेळींही आजोबा येथें राहण्याचें कबूल करीनात. ते मला मात्र घरीं जाऊन राहण्याविषयीं फार आग्रह करूं लागले. आपल्याशिवाय मी एकटा घरीं कधींहि जाणार नाहीं असें त्यांना मी निश्चयपूर्वक सांगितलें, व त्यांच्याबरोबरच पुन्हां हिंडूं लागलों. या खेपेस आमचा मुक्काम येथें एक महिनाभर होता. गुप्त रीतीनें आह्मी घरचाहि शोध घेत होतों. घरची सर्व हालहवाल ठीक आहे, असें पाहून आह्मी वृंदावनाला गेलों. वृंदावनास कांहीं दिवस मुक्काम करून आह्मी प्रयागाला आलों. यानंतर प्रयाग येथें ललितकिशोराची गांठ पडून आह्मी बनारसला कसें आलों याबद्दलची सर्व हकीकत तुह्मांला समजलीच आहे. "

यावर बराच वेळपर्यंत सर्वजण स्तब्ध बसले. त्यानंतर लीलावतीनें बाळकृष्णाची हकीगत विचारली. बाळकृष्णानें राजा विजयकृष्ण यांस एक पत्र पाठविलें होतें. तें तिच्या अंगावर टाकून प्रमोदकुमार ह्मणाला " आतां मध्यान्ह होऊन गेली आहे. आतां आह्मी बिऱ्हाडीं जातों. " त्यांना घरीं चलण्याविषयीं लीलावतीनें आग्रहपूर्वक विनंति केली. तेव्हां दोघेहि घरींच राहिले व ललितकिशोर व गोविंदचंद्र हे निघून गेले.

प्रकरण ४६ वें.

दुसरे दिवशीं सकाळीं उठून नित्यनैमित्तिक आटपून लीलावतीनें बाळकृष्णाचें पत्र वाचण्याकरितां काढलें पत्र वाचतां वाचतां तिचे डोळे पाण्यानें भरून आले. पत्रांतील आशय खालीं लिहिल्याप्रमाणें.

' आपण माझ्याशीं संबंध तोडून टाकला हें फार चांगलें केलें. जिच्याकरतां मी लोकलज्जेवर, अब्रूवर व आपल्या स्वाभिमानावर तिलांजली देऊन दैवता समान जे आपण माझे पिते त्यांचाहि अनादर केला, जिच्या नादीं लागून मी आपल्या सर्व संपत्तीला लाथ मारली, जिच्यामुळें मी आपल्या धर्माला मुकलों, ती कलावती मला सोडून दुसऱ्या एकाचा हात धरून निघून गेली. आपला अनादर केल्याचें मला पूर्णपणें प्रायश्चित्त मिळालें. आतां हें पत्र आपणाकडे रवाना करून मी आत्महत्या करून घेणार. मरण्यापूर्वी मी आपल्या चरित्राचा थोडासा वृत्तांत आपल्याला सांगणार आहे. '

" एके दिवशीं कार्तिकाच्या महिन्यांत मी निहालचंदाची बहिण वसंति इला पहिलें तेव्हांपासून तिच्या येथें माझें जाणें येणें दररोज होऊं लागलें. अखेर तिच्या जवळच मी एक घर भाड्यानें घेतलें व दिवसाचे दिवस तिच्या संगतींत घालवूं लागलों. तिची मोलकरीण पार्वती व तिची सावत्र मुलगी लाडली या दोघींना चोरून मी तिच्या संगतींत पुष्कळ दिवसपर्यंत चैन उडविली. तिच्या घरीं निहालचंद वगैरे गृहस्थांचें जाणें येणें होतें असें माझ्या नजरेस येऊं लागलें. तेव्हां तिला ठार मारण्याचा माझा संकेत ठरला. हें त्या बदमाष बाईनें तेव्हांच जाणलें व तिनें आपल्या मुलीशीं विवाह लावण्याचा मला नाद लावला. तिची मुलगी लाडली ही नाकाडोळ्यानें खूप सुरत होती. एके दिवशीं मी तिला म्हटलें ' तुझी मुलगी सुंदर आहे, तरी पण ती तुझी मुलगी असल्यामुळें तिची चालचलणूक तुझ्या सारखीच होणार. तेव्हां तिच्याशीं मी विवाह करणें मला चांगलें वाटत नाहीं. तुला जर माझें कांहीं काम करावयाचें असेल, तर लीलावती माझ्या हस्तगत करून दे. "

यावर तिनें उत्तर दिलें ' हें काम कांहीं माझ्या हातून होणार नाहीं, कारण लीलावती फार सुशील मुलगी आहे. पाहिजे तर कलावतीचें बस्तान मात्र जमवून देतें. ' यानंतरची सर्व हकीकत आपल्याला माहीत आहेच. शेवटीं माझ्या अपराधाबद्दल मला क्षमा करावी येवढेंच माझें ह्मणणें आहे. '

बाळकृष्णाचें हें पत्र वाचून लीलावती व लाडली यांना अत्यंत खेद झाला तर राजा विजय कृष्णाची काय अवस्था झाली असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. हें पत्र पाहतांच राजा विजयकृष्णानें बाळकृष्णाच्या शोधार्थ माणूस पाठविला. बाळकृष्णानें आपणास गोळी घालून घेतली असा या इसमानें शोध लावला. बाळकृष्णास मरून आज एक महिना झाला. त्याच्या शोकानें राजा विजयकृष्ण हेहि अंथरुण धरून होते. ह्मणूनच त्यांनीं ललितकिशोर व त्याची आई यांना तार करून मुद्दाम बोलावलें.

लीलावती व लाडली यांच्या बाळकृष्णासंबंधानें व कलावतीसंबंधानें गोष्टी चालल्या असतां बतसियानें येऊन सांगितलें कीं लाडलीच्या आजोबासंबंधानें कांहीं वाईट वार्ता सांगण्याकरितां खालीं कोणी आलें आहे. लाडली व लीवलाती दोघीहि घाबऱ्या घाबऱ्या खालीं आल्या. ' तों दारांत मेणा आहे, त्यांत बसून तुह्मी दोघीहि आतां जवाहिरलालाच्या घरीं जा, ' असें प्रमोदकुमारानें सांगितलें. जवाहिरलाल आटपलें हें यावरून वाचकांना समजलेंच असेल. त्यांचें क्रियाकर्मांतर लाडलीनेंच केलें जवाहिरलालाच्या मागें त्याची इस्टेट वगैरे कांहीं एक उरली नव्हती.

———

प्रकरण ४७ वें.

आनंदपर्यवसान.

लाडली पुन्हां लीलावतीचे येथें येऊन राहूं लागली. त्या दोघीहि एकमेकींच्या संगतींत फारच सुखानें काळ घालवूं लागल्या.

प्रमोदकुमारानें नेपाळास जी दौलत मिळविली होती, त्यापैकीं निम्मे भाग त्यानें लीलावती व लाडली यांस समसमान दिला. बाकी राहिलेले रुपये धर्मकृत्याकडे खर्च व्हावे अशी त्यानें तजवीज करून ठेवली.

सुजनकुमारानेंहि सरकारांतून आपली दौलत मिळण्याविषयीं अर्ज केला. सुजनकुमाराच्या सांगण्यावरून ती सर्व जिनगी लीलावतीस मिळाली. लीलावतीच्या स्त्रीपुरुषवंशजानें आपल्या नांवामागें अनुक्रमे 'राणी व राजा' ही उपपदें लावावीत अशीहि सनद लीलावतीस मिळाली.

हा सर्व प्रकार होण्यास सहा महिने लागले. ही व्यवस्था जिकडल्या तिकडे झाल्यानंतर ललितकिशोर व लीलावती, व गोविंदचंद्र व लाडली यांचा मोठ्या थाटानें विवाह झाला.

समाप्त

मकरंद मासिक पुस्तकांतून प्रसिद्ध

झालेली कादंबरी.

रंक आणि राव.

लेखक

दामोदर.

प्रमीला, निसर्गप्रभाव, मनोरमामायाविनी

वगैरे कादंबऱ्यांचा कर्ता.

वाई येथें ' मोदवृत्त ' छापखान्यांत छापलें.

सन १९०८

किंमत १ रु.

प्रस्तावना.

'रंक आणि राव' हे शब्द उच्चारले ह्मणजे अत्यंत नीच व अत्यंत उच्च अशा दोन स्थितींतील व्यक्तींचें चित्र डोळ्यापुढें उभे राहतें. तरी पण या दोन्ही व्यक्तींत अशाप्रकारचें स्थितिभिन्नत्व येण्यास निसर्गसिद्ध कारणांपेक्षां बाह्य कारणेंच विशेष साधनीभूत होतात हें या पुस्तकाच्या परिशीलनावरून लक्ष्यांत येण्यासारखें आहे. उपाधिभेदामुळेंच मनुष्यास उच्चनीच भाव प्राप्त होतो. न्यायाधीश न्यायासनावर बसले व त्यांच्यासमोर हातकड्या घातलेला दरवडेखोर गुन्हेगार उभा असला ह्मणजे आपल्याला असें वाटतें कीं, ह्या दोन्ही व्यक्तींच्या रचनेंत स्वभावतःच फरक आहे. परंतु, न्यायाधिशास पूर्ववयांत झालेला शिक्षणसंस्कार काढून घेतला, अन्नाची व त्याची गांठ पडूं देणें मुष्किलीचें करून टाकलें, त्याच्या अंगावरचा स्वच्छ पोषाख उतरून त्या ऐवजीं घामट व लकतान्या झालेला पोषाख चढविला, सदां सर्वदां दुष्ट लोकांच्या संगतींतच त्यास ठेवण्याची तजवीज केली, उलटपक्षीं कांहीं अमानुष कृतीनें दरवडेखोराच्या मनावर शिक्षणसंस्कार करून त्यास ज्ञानी बनवलें, दरमहा शेंकडों रुपयांचा तनखा त्यास सुरू केला, सद्दोदित त्यास सत्संगति घडेल अशी जर तरतूद ठेवतां आली तर आज न्यायाधीश व दरवडेखोर हे जे आपल्यापुढें दिसतात, त्यांत उलटापालट होण्यास विशेषशी अडचण पडेल असें समण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. मनुष्यास उच्चनीच स्थिती प्राप्त होण्यास कधींकधीं प्रकृतिस्वभावहि कांहीं अंशांनीं कारणीभूत होतो, नाहीं असें नाहीं, परंतु या स्थितिभिन्नत्वास विशेषतः उपाधिवैचित्र्य हेंच कारण होय असें सूक्ष्म विचाराअंतीं ध्यानांत येईल. एकच फत्तर, परंतु तो ताजमहालासारख्या इमारतीस लागला किंवा एखाद्या कुशल कारागिराकडून त्याची सुबक व सुंदर मूर्ति घडवून तिची एखाद्या मंदिरांत स्थापना केली, किंवा तोच एखाद्या पायखान्यास लावला, अथवा मोरींतलें सांडपाणी आपल्या शिरावरून वाहून नेण्याचा कार्यभाग त्याचे कडून घेतला तर पहिल्या दोन ठिकाणीं त्यास जें महत्त्व किंवा सर्वमान्यता प्राप्त होईल तीच दुसऱ्या दोन ठिकाणीं नाहींशीं होऊन तोच फत्तर तिरस्कारणीय ठरेल. संगमरवरी दगड ही सर्वांची जात एकच. परंतु, उपाधिभिन्नत्वामुळें त्यास उच्चनीचभाव प्राप्त होतो. प्रस्तुत पुस्तकांत हेंच तत्त्व प्रतिपादलें आहे.

तानू हा एक सामान्य कामाठ्याचा मुलगा होता. कांहीं गफलतीनें त्याला, थोडे दिवस कां होईना, राज्यपद लाभलें होतें. आरंभीं त्याचा

थोडासा गोंधळ उडाला; परंतु पुढें त्यानें हा जबाबदारीचा अधिकार इतक्या उत्कृष्ट रीतीनें बजावण्यास प्रारंभ केला कीं, मोठमोठ्या अनुभवी व दूरदर्शी मुत्सद्यांनाहि त्याच्या राजत्वाबद्दल यत्किंचितहि शंका आली नाहीं. प्रसंग आला ह्मणजे मनुष्याच्या हातून हवी ती कामगिरी बिनबोभाट रीतीनें होऊं शकते. विशिष्ट माणसें अमुक एक प्रकारच्या जबाबदारीस कायमचे नालायख आहेत असें जर कोणाचें ह्मणणें असेल तर तें खरें नसून लबाडीचें आहे असेंच समजलें पाहिजे.

प्रस्तुत पुस्तकांत दुसरीहि एक महत्वाची गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे, ती ही कीं, राजेलोकांना किंवा सत्ताधाऱ्यांना प्रजेच्या स्थितीचा अपरोक्ष अनुभव घ्यावयास सांपडेल तर त्यांचें प्रजेच्या गाऱ्हाण्यांकडे कधींहि दुर्लक्ष्य होणार नाहीं. सुशील कुमारास आपल्या प्रजेची स्थिति प्रत्यक्ष अवलोकन करण्याचा प्रसंग आला, त्यामुळें त्यास केवढा मोठा फायदा झाला ! प्रजेंत शिक्षणाचा प्रसार होऊन प्रामाणिक उद्योगधंदा चालवून चरितार्थ चालविण्याची कोणासहि अडचण पडणार नाहीं अशी तजवीज केल्यास गुन्हेगारांची व उपद्व्यापी लोकांची संख्या आपोआप कमी होत जाऊन मानवी सुखांत भर पडेल हें तत्व यायोगानेंच त्याचे मनांत पूर्णपणें बिंबलें. तुरुंगांत गुन्हेगारांचा योगक्षेम चालवण्याची प्रामाणिक माणसांवरच जबाबदारी येऊन पडते; कारण त्यांनीं दिलेल्या करांतूनच तुरुंगाचा बराच खर्च चालविण्यांत येतो. प्रामाणिकपणाबद्दल हा जो त्यांना भुर्दंड भोगावा लागतो तो विपरीत नाहीं असें कोण ह्मणेल ! त्यांच्या या पैशाचा विनियोग इतर सत्कार्यांत झाल्यास कित्येक परिहार्य आपत्ति दूर होऊन राष्ट्राची प्रगति होईल, हेंहि तत्त्व लोकांची स्थिती प्रत्यक्ष पाहिल्यानें सुशील कुमाराच्या ध्यानांत आलें. राज्यव्यवस्था सुव्यवस्थित चालण्यास राज्यकर्त्यांना प्रजेच्या स्थितीचें प्रत्यक्ष ज्ञान असणें अत्यंत अवश्यक असतें. प्रत्येक राजकर्त्यास असें ज्ञान प्रत्यक्ष मिळवण्याचा प्रसंग येणें जवळ जवळ अशक्यच आहे. ह्मणूनच हल्लींच्या प्रगतीच्या काळांत लोकमतात्मक राज्यपद्धति अस्तित्वांत आणण्याकरितां चोहोंकडे चळवळ चालू असलेली दिसते.

प्रस्तुत पुस्तक हें प्रसिद्ध अमेरिकन विनोदी ग्रंथकार मार्कट्वेन यांच्या ' दि प्रिन्स अँड दि पॉपर ' या पुस्तकाच्या आधारें रचलें आहे. मूळ पुस्तकाच्या कथानकांत आपल्या समाजपद्धतीस अनुरूप असे कित्येक ठिकाणीं किरकोळ फरक करावे लागले. परंतु, आधारभूत ग्रंथाचा मुख्य भाग या पुस्तकांत समग्रशः ग्रथित झालेला आहे.

पुस्तककर्ता.

रंक आणि राव.

प्रकरण १ लें.

कुमारसंभव.

एके दिवशीं कांतिपूर शहरीं एका कामाठ्याच्या कुटुंबांत एक पोर जन्मास आलें. त्या कुटुंबाची स्थिति अत्यंत निर्धन असल्यामुळें दुष्काळांत हा तेरावा महिना कोठून प्राप्त झाला असेंच विचार कुटुंबांतील माणसांच्या मनांत येऊं लागले. त्याच दिवशीं राजघराण्यांतही एका मुलाचा जन्म झाला. राज्याला वारस झाल्यामुळें शुभधाम देशांतील यच्चयावत् सर्व मनुष्यांना अत्यानंद होऊन गेला. विजयध्वज महाराजांच्या मागें राज्य चालविण्यास त्यांना पुत्रप्राप्ति केव्हां होते याची देशांतील लोक अत्यंत उत्कंठेनें वाट पहात होते. राज्याला धनी झाल्याची बातमी हां हां ह्मणतां सर्व देशभर पसरली. शुभधाम हें देशाचें नांव आज अन्वर्थक झालें, त्याचप्रमाणें कांतिपूर नगराची कांतिमत्ता आजच प्रस्थापित झाली असें उद्गार ज्याच्या त्याच्या तोंडून निघूं लागले. ज्यांची यापूर्वी केवळ नमस्कारा पुरतीच ओळख ते एकमेकांस आनंदानें कवटाळूं लागले. उच्च, नीच, सधन, निर्धन, तरुण, वृद्ध वगैरे सर्व प्रकारचे लोक आनंदोत्सवांत मग्न होऊन गेले. मेजवान्या, नृत्य, गायन यांची जिकडे तिकडे गर्दी उडून गेली. हें आनंदप्रदर्शन कित्येक दिवसपर्यंत एकसारखें चालूं होतें. दिवसा, रात्रीं, केव्हांहि त्यास खंड नसे. घरोघरीं गुड्या उभारण्यांत आल्या. गांवांत जागोजाग चित्रविचित्र रंगांचीं निशाणें फडकूं लागलीं. रात्रीं चोहोंकडे दीपोत्सव सुरू होऊन सर्व शहर देदीप्यमान दिसूं लागलें. कानाकोपऱ्यास कोठेंहि गेलें तरी जिकडे तिकडे आनंदीआनंद दिसूं लागला; सर्व देशांत सुशीलकुमाराशिवाय दुसरी गोष्टहि कोणी बोलेना. राजकुमार रेशमाच्या कपड्यांत व मखमलीच्या गालिच्यावर लोळूं लागला. सर्व सरदार व सरदारणी त्याच्या भोंवतीं जमून त्याचें कौतुक करूं लागल्या. इतके लोक

आपल्या भोंवती जमून आपल्याला हातावर झेलीत आहेत याची त्या बिचाऱ्यास कल्पनाहि नव्हती ! इकडे या कामाठ्याच्या पोराची कोणाला वार्ताहि नव्हती. त्या बिचाऱ्यास चिंध्यांत गुंडाळलेलें होतें. ' याच्यावाचून कांहीं अडलें होतें काय ' अशा प्रकारच्या उद्गारांनीं त्याचें आईबाप व इतर आप्तेष्ट त्याची संभावना करूं लागले.

प्रकरण २ रें.

तानूची बाल्यावस्था.

गेल्या प्रकरणांत जी हकीगत सांगितली ती अडीचशें वर्षांपूर्वींची होय. कांतिपूर हें शहर राजधानीचें असल्यामुळें त्याची त्या काळींहि एक लक्ष लोकवस्ती होती. आरोग्यरक्षण व शहरसुधराई याबद्दल त्यावेळच्या लोकांना बेताचेंच ज्ञान असल्यामुळें शहरचें रस्ते अरुंद, वेडेवांकडे, व घामट असेंच होते. तानु कामाठी हा ज्या महल्यांत जन्मास आला त्या महाल्याचें नांव कंगालपुरा असें होतें. या महाल्यास कंगालपुरा हें नांव इतकें यथार्थ होतें कीं तो अगदीं त्रयस्थ माणसासहि सांगितल्याशिवाय कळावा ! तेथील दुर्गंधियुक्त वातावरण, चंद्रमोळीं घरें, मार्गावर घूं घूं करणारे मच्छर वगैरे त्या महाल्याच्या कंगालपणाची पूर्ण साक्ष पटवीत. तानूचा बाप ज्या घरांत रहात होता, तें तर अगदींच अकुंचित व मोडकळीला आलेलें असें होतें. याच मासल्याचीं तेथें एकाच ठिकाणीं दहापांच घरें एकमेकांचा आश्रय करून राहिलीं होतीं. या घरांत दरिद्री लोक खेंचून भरलेले असत. दरिद्र्याच्या घरीं संततीचा सुकाळ असतो, या नियमाची सत्यता त्या घरांकडे पाहतांच कोणाच्याहि ध्यानांत येई. तानूच्या बापाच्या घरांत एकंदर तीन खण जागा होती. त्यांत एक खणांत त्याच्या आईची व बापाची अशा दोन खाटा ठेवलेल्या होत्या. बाकीच्या दोन खणांत तानू, त्याची आजी व त्याच्या दोन धाकट्या बहिणी इतकीं माणसें धरित्रीवर निष्प्रतिबंध रीतीनें लोळत असत. झोंप आली कीं जमिनीवर पडावयाचें, येवढीच कायती त्यांना दगदग करावी लागत असे. थंडीचें निवारण करण्याचीं साधनेंहि अगदीं आटोपसर होतीं. जुन्या

घोंगड्यांच्या जमविलेल्या चिंध्या तीं आपल्या अंगावर घेत. या चिंध्यांना हात लावण्याचा प्रसंग कायतो रात्रीं यावयाचा. कारण सकाळीं उठल्यानंतर या चिंध्या कोपऱ्यांत झुगारून देण्याचें काम बहुधा पायच करीत !

तानूच्या आंवळ्याजांवळ्या बहिणी यावेळेस पंधरा वर्षांच्या होत्या. त्यांच्या अंगावर घामट चिंध्या असत. त्यांचा स्वभाव जितका चांगला होता तितकेंच त्यांचें अज्ञानहि अगाध होतें. त्यांची आई अगदीं त्यांच्या सारखीच होती. त्यांचा बाप व आजी हीं तर प्रति राक्षसच होतीं. तीं दोघेहिजण यथास्थित दारू पिऊन एकमेकांशीं किंवा दुसरें कोणी सापडल्यास त्याच्याशीं एकसारखी बाचाबाच करीत असत. तीं दारूनें झिंगलेलीं असोत किंवा शुद्धीवर असोत, त्यांच्या तोंडून शिवी शिवाय कचितच शब्द निघत असे. जानू कामाठी हा भामटेगिरीचा धंदा करी व त्याची आई भीक मागत असे. मुलांना आजीचें वळण घ्यावें लागलें, परंतु बापाचा धंदा करण्यास मात्र त्यांची पात्रता नव्हती. यांच्या लगतच्या घरांत यांच्याच जातीचा एक भला गृहस्थ रहात असे. यानें कित्येक वर्षेंपर्यंत राजाची इमानेंइतबारें नोकरी केली असल्यामुळें त्यास हल्लीं राजाकडून घरीं बसल्या पोटापुरतें वेतन मिळत असें. तो या मुलांना एका बाजूस नेऊन त्यांस सद्बोधाच्या चार गोष्टी सांगे. धोंडीनें तानूस थोडें लिहावाचावयासहि शिकविलें होतें.

त्या महाल्यांतील सर्व कुटुंबें तानूच्या मासल्याचींच होतीं. तेथें प्रत्येक रात्रीं दारू पिऊन धिंगामस्ती व बाचाबाची चालत असे. एकमेकांचीं डोकीं फोडणें हें तर तेथें अगदीं सर्वांच्या अभ्यासांतलेंच असे. आपल्या भोंवतीं काय चाललें आहे याची तानूला अल्पवयांत कल्पना नसल्यामुळें त्याचें त्यावेळचें आयुष्य त्याला विशेष कष्टमय झालें नाहीं. थोर झालें म्हणजे माणसानें असें करावेंच लागतें अशीच रोज रोज तेच तेच प्रकार पाहून त्याची भावना झाली असल्यामुळें त्यास या हाणामारींत कांहीं विलक्षण वाटत नसे. रात्रीं आपण हात हालवीत घरीं गेलों म्हणजे आपला बाप आपणाला झोडपणार व त्याची पाळी झाल्यानंतर आपली आजीहि आपल्यावर तोच प्रयोग पुन्हां एकदां करणार ही गोष्ट त्याला पक्की माहित झाली होती. कालावधीनें हे संस्कार त्याच्या अंगवळणी पडत गेल्यामुळें त्यांतला

भयंकरपण, स्वभावतः पुष्कळ कमी झाला. उपासमार हा त्याच्या आईच्या तर पांचवीलाच पुजला होता. तरी एवढातेवढा भाकरीचा तुकडा चोरून ठेवून तो ती माउली आपल्या मुलाला देतच असे. हें तिचें कृत्य एकादेवेळेस जानूच्या नजरेस आलें तर त्याबद्दल तिला खरपूस चोपहि खावा लागे. तरी पण तिनें आपला क्रम यत्किंचित्‌हि ढळू दिला नाहीं.

विशेषतः उन्हाळ्यामध्यें तानूचें आयुष्य सामान्यतः सुखांत जात असे. कांतिपूर शहरांत भिक्षा मागण्यास कायद्यानें प्रतिबंध असे. बहुतेक भिकारी कायद्यांत न सापडतांच भिक्षा मागत. त्यांची ही हातोटी इतकी विलक्षण होती कीं हा कायदा होऊन वीस वर्षें लोटलीं तरी एकाहि भिकाऱ्यावर भिक्षा मागितल्याबद्दल कधींहि खटला झाला नाहीं ! भिकाऱ्याचा कायदा झाल्यापासून बहुतेक भिकारी बहुधां चोरीवरच चरितार्थ चालवूं लागले ! तानू हा घरंदाज भिकारी असल्यामुळें कायद्यास भीक न घालणारी भिक्षा मागण्याची हातोटी त्यास जन्मसिद्धच होती. केवळ जगण्यास अवश्यक एवढीच तो भिक्षा मागे व राहिलेला वेळ आपला शेजारी भला गृहस्थ धोंडी याच्या संगतींत घालवी. तो त्याला राक्षसांच्या, यक्षकिन्नरांच्या, राजाराणीच्या वगैरे मनोरंजक व बोधक गोष्टी सांगत असे. या विस्मयकर गोष्टींचा त्याच्या मनावर इतका पगडा बसला कीं, त्यांचें चिंतन करतां करतां त्या खरोखरच प्रत्यक्ष घडून येत आहेत कीं काय असा त्यास भास होई ! ह्या गोष्टींच्या भरांत त्याला आपल्या क्षुधेची, तृषेची व अठराविश्वे दारिद्र्याचीहि घटकाभर विस्मृति पडत असे. एकदम यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणें त्याच्या चंद्रमोळी घरास राजवाड्याचें स्वरूप प्राप्त होई. वस्तूचें नांव तोंडांतून निघावयाचा अवकाश कीं ती प्राप्त झालीच, अशा रीतीनें आपलें लालन होत आहे अशी त्याच्या मनाची भावना होऊं लागली. अशा तऱ्हेच्या कल्पना त्याच्या मनांत नेहमीं प्रबल असल्यामुळें खऱ्या राजपुत्राचें आपणास एकदां प्रत्यक्ष दर्शन व्हावें अशी इच्छा त्याच्या मनांत उत्पन्न होऊन ती दिवसेंदिवस वृद्धिंगत होत चालली. ही इच्छा त्यानें आपल्या खेळगड्याजवळही एकदां प्रदर्शित केली. परंतु त्यांनीं त्याची इतकी टर उडवून दिली कीं त्यानें ही गोष्ट आपल्या तोंडावाटें पुन्हां कधींहि काढली नाहीं.

त्याच्या जातींत थोंडी हा एकच काय तो शिकला सवरलेला असे. तो त्याचेजवळचे अनेक ग्रंथ वाचूं लागला. त्याचें ग्रंथावलोकन जसजसें विस्तार पावत चाललें तसतशी त्याची मनोमयसृष्टि अधिकच देदीप्यमान होऊं लागली. आपला पोषाख चांगला असावा, चैनीच्या व सुखाच्या वस्तूंची आपल्याला समृद्धि असावी; अशी त्याला उत्कट इच्छा होऊं लागली. कल्पनासृष्टींतील नयनमनोहर व्यक्तींचें सौंदर्य पाहून त्याला आपल्या कुदशेबद्दल परमावधीचें दुःख होऊं लागलें.

तानूचें घर शहरच्या किल्ल्याजवळच असल्यामुळें एखादा सरदार किंवा नामांकित मनुष्य यास किल्ल्यांत कैद करण्यास नेत असतां त्याचे बरोबर जाणारी पलटण त्याला अनेकदां पहावयास सांपडे. त्याकडे तो मोठ्या आतुरतेनें पाहत असे. अशा एक कीं दोन अनेक गोष्टींच्या प्रत्यक्ष दर्शनानें व पुस्तकांतील अलौकिक गोष्टींच्या हृदयंगम वर्णनानें त्याच्या मनाची इतकी विलक्षण स्थिती होऊन गेली कीं खऱ्या राजपुत्रांत आणि आपणांत असलेंच तर फारच थोडें अंतर आहे; असें त्यास खास वाटूं लागलें. त्याची सर्व चालचलणूक खऱ्याखुऱ्या राजपुत्राप्रमाणें होऊं लागली. त्याचें भाषण व एकंदर वर्तनक्रमावर युवराजत्वाचा कायमचा ठसा बसला. यामुळें त्याच्या समवयस्क सोबत्यांना फारच गंमत वाटूं लागली. प्रथम प्रथम ते त्याची चेष्टा करीत होते, परंतु कालावधीनें तो राजपुत्राची भूमिका जशी हुबेहुब उठवूं लागला तसतसा त्यांच्या मनांत तानूबद्दल एकप्रकारचा दरारा उत्पन्न होऊन तो खरोखरच असामान्य पुरुष होणार अशी त्यांच्याहि मनाची भावना झाली. तो ज्या शहाणपणाच्या गोष्टी बोले व राजास शोभणाऱ्या अशा कितीतरी गोष्टी करी तेव्हांतर त्यांचें मन आश्चर्यानें थक्क होऊन जाई. त्या महाल्यांतील सर्व अबालवृद्धांचा तानूस हा एक मोठा चर्चेचा विषय झाला. मोठमोठीं वयांतील माणसेंसुद्धां आपल्याला न समजणाऱ्या गोष्टी तानूस विचारीत असत. त्या गोष्टींचा यथार्थ निर्णय दिलेला पाहून त्यांना फारच आश्चर्य व कौतुक वाटे. सारांश त्याच्या कुटुंबांतील माणसांशिवाय तो इतर सर्वांना असाधारण मनुष्य वाटूं लागला.

खेळांतसुद्धां तो राजा व राजदरबार यांचा खेळ खेळत असे. तो स्वतः युवराज होई व त्याचे खेळगडी– कोणी त्याचे रखवालदार कोणी खिसमतगार,

कोणी प्रधान, कोणी सरदार होत– ते सर्व त्याला अत्यंत आदरशीलतेनें वागवीत. खऱ्या दरबारांत जे संस्कार किंवा शिष्टाचार व्हावयाचे त्यांची तालीम हा आपल्या सवंगड्यापासून तंतोतंत करून घेत असे. तो आपल्या कल्पनानिर्मित राज्यांत प्रत्यहीं सहस्रावधि कारस्थानें करीत असे. मोठमोठाल्या राजकारणांची तो प्रधानमंडळांत चर्चा करीत असे. व आपल्या लष्करास, आरमारास व अधिकाऱ्यांस राजशासन देत असे. हा राज्यकारभार आटपला ह्मणजे आपल्या अंगावरील चिंध्या सांवरून तो भिक्षेचा रस्ता सुधारीत असे ! भीक मागून जी काय वाळलीकोळली भाकर मिळे तीवर निर्वाह करून तो आपल्या तीर्थरूपांचे शिव्याशाप व देहदंड सहन करून आपल्या तृणमय शय्येवर निद्रादेवीची उपासना करी. तेथेंहि मधून मधून स्वप्नमयसृष्टींत संचार करून राजलक्ष्मीचा उपभोग घेण्यास यत्किंचत्‌हि कसूर करीत नसे. खऱ्या राजपुत्राची एकदां आपली भेट कशी होईल या त्याच्या उत्कट इच्छेपुढें इतर सर्व मनोरथ गतप्राण झाले ह्मटलें तरी चालेल. एके दिवशीं मार्गशीर्षाच्या महिन्यांत तो आपल्या भिक्षेच्या मोहिमेवर निघाला. तो महिना लग्न कार्यांचा असल्यामुळें अनेकप्रकारच्या पक्वान्नांचा वास त्याच्या घ्राणेंद्रियांत प्रवेश करूं लागला. यामुळें त्याची पावलें जागोजाग अडखळूं लागलीं. एखाद्या घरांत आपल्याला प्रवेश करतां येऊन षड्रसयुक्त अन्नाचा आपल्याला यथेच्छ आस्वाद घेतां येईल तर मोठी मौज होईल; असें त्यास क्षणोक्षणीं वाटूं लागलें. परंतु त्या बिचाऱ्याची ही सर्व आशा अखेर निष्फळ होऊन गेली. रात्र पडली, तरी त्याच्या पोटांत अन्नाचा एक घासहि पुरता गेला नाहीं. तो तसाच रिक्तोदर आपल्या घराकडे निघाला. त्याची तशी ती केविलवाणी व हृदयद्रावक स्थिती पाहून त्याच्या कनवाळू बापाचें अंतःकरण द्रवल्यावांचून कसें राहील बरें ? त्यानें त्यास ताबडतोब यथास्थित ठोक देऊन त्यास शयन स्थानाकडे रवाना केलें ! बराचवेळपर्यंत निद्रादेवीसहि त्याची कांहीं दया येईना. परंतु अखेर आपल्या निर्माणकुशल कल्पनेच्या प्रभावानें त्याठिकाणीं नंदनवन निर्माण करून तेथें तो एका रत्नखचित सुवर्णमय सिंहासनावर निद्रावश झाला. मधून मधून अनेक ठिकाणचे सरदार त्यास मुजरा करण्यास येत असत. त्यांना तो राजकरणपटु मोठमोठाले हुकुमहि करीत असे.

सर्व रात्रभर राजलक्ष्मीचें वैभव याप्रमाणें अनिरुद्धरीतीनें त्याचें आसमंतात् भागीं यथेच्छ विहार करीत होतें. जिकडे पहावें तिकडे सरदार व दरकदार आमच्या युवरायांची आज्ञा शिरसा ग्रहण करण्यास तत्पर होते. जिकडे तिकडे दिव्यांचा लखलखाट दिसत होता. नानातऱ्हेच्या अत्तरांनीं व सुवासिक द्रव्यांनीं दशदिशा भरून गेल्या होत्या. गायन वादनाचा कर्णमधुर ध्वनि श्रवणरंध्रास आदार देत होता. लक्षावधि लोकांच्या जमावांतून आमचे राजाधिराज धीरोद्धत गतीनें संचार करीत असतां सर्व लोक दुतर्फा उभे राहून त्यांना जाण्यास मार्ग मोकळा करीत होते. कोणाकडे नुसतीच मान हलवून, तर कोणाकडे थोडेंसें स्मित करून स्वारी मोठ्या थाटानें जनसमूहांतून चालली होती.

आमचे राजाधिराज सकाळीं जागे होऊन पहातात तों जिकडे तिकडे कंगालपणाचा उत्कर्ष ! स्वप्नमय सृष्टींत आतांपर्यंत उपभोगिलेल्या सुखानें त्यांना आपली स्थिती होती त्यापेक्षां सहस्त्रपट कष्टमय वाटूं लागली. प्रखर उन्हांतून एकदम सावलींत आलें ह्मणजे क्षणैक ज्याप्रमाणें जिकडे तिकडे अमावास्या भासूं लागते तद्वतच तानू कामाट्याची अवस्था झाली.

प्रकरण ३ रें.

तानूची राजकुमाराशीं मुलाखत.

तानू सकाळीं जागा झाला. त्याच्या पोटांत क्षुधाहि जागृत होती. तो तसाच भुकेलेला बाहेर निघाला. त्याच्या स्वप्नमय सृष्टीची झांपड अद्याप त्याच्या चित्तवृत्तींवर होतीच. तो शहरांत इकडे तिकडे भटकूं लागला. आपण कोठें जात आहोंत व आपल्या भोंवतीं काय चाललें आहे याचें त्याला भानहि नव्हतें. रस्त्यांतून जाणारे येणारे त्याला धक्के देत होते; किंवा कोणी शिव्याहि देत होते; तरी त्याला त्याचें यत्किंचित्‌हि गुमान नव्हतें. अखेर तो मुक्तेश्वराच्या देवालयापर्यंत येऊन पोहोंचला. येथपर्यंत तो यापूर्वी कधींहि आला नव्हता. तेथें तो थांबून क्षणभर विचार करूं लागला. परंतु पुन्हां लगेंच तो आपल्या मनोराज्यांत गर्क होऊन गेला. अखेर जातां

जातां तो शहरची अखेरची वेसही ओलांडून गेला. शहराबाहेर मोठमोठ्या सरदार लोकांचे कांहीं प्रासाद होते. परंतु साधारणतः त्यांची गणना शहरच्या हद्दींत होत नसेच ह्मटलें तरी चालेल.

तानू या भागांत हिंडतां हिंडतां एका चौथऱ्यावर विश्रांतीकरितां बसला. हा चौथरा एका प्राचीन राजानें पांथस्थांना बसण्याकरितांच बांधलेला होता. तेथून उठून तो तसाच रेंगाळत रेंगाळत कालीदेवीच्या प्रचंड मंदिराजवळ गेला. त्या मंदिराचें आगडबंब काम पाहून त्याचें चित्त आश्चर्यचकित होऊन गेलें. त्याचा विस्तीर्ण सभामंडप अक्राळविक्राळ बुरूज, प्रचंड दरवाजा, त्याचें गगनचुंबित शिखर वगैरे पाहून त्याचें मन थक्क होऊन गेलें. त्याचे समोरच राजवाडा होता. त्याजकडे वळून तानू मनामध्यें विचार करूं लागला कीं आज राजकुमाराची जर भेट होईल तर माझी फार दिवसाची इच्छा सफल होऊन मला खरोखर आनंद होईल !

राजवाड्याच्या दिल्लीदरवाज्याच्या दोन्ही बाजूंस लोहकवचांनीं सर्वांग आच्छादित असलेले असे दोन पहारेकरी उभे होते. आपल्या कर्तव्याच्या ठिकाणीं त्यांची विलक्षण एकाग्रता झाल्यामुळें ते इतके निश्चल होते कीं जणूं काय दोन्ही बाजूस दगडाचे पुतळेच उभे केले आहेत कीं काय असा पाहणारास भास होई. पहारेकऱ्यापासून थोड्या अंतरावर शहरांतून व आसपासच्या कित्येक खेड्यांतून आलेले लोक उभे होते. कोणीकडून तरी आपल्याला राजदर्शन व्हावें अशी त्यांची फार उत्कट इच्छा होती. मोठमोठाल्या सुंदर गाड्या राजवाड्याच्या निरनिराळया द्वारांतून निष्प्रतिबंध प्रवेश करीत होत्या व कांहीं आंतूनहि बाहेर येत होत्या. फाटक्या चिंध्या अंगावर घातलेला गरीब बिचारा तानू हळूंच पाय न वाजवितां पहारेकऱ्यांच्या अंगावरून आंत गेला. राजदर्शनाची आशा वृद्धिंगत होत जाऊन त्याचें अंतःकरण आनंदानें नाचूं लागलें. इतक्यांत सुवर्णमय वातायनांतून त्याला एक मूर्ति दिसली. त्याबरोबर त्यानें आनंदाच्या भरांत एक मोठी आरोळी मारली ! वातायनाच्या आंत एक सुंदर मुलगा होता. त्याचें शरीर व्यायामानें व मर्दानी खेळानें चांगलें पिळदार दिसत होतें. त्याच्या अंगावर रेशमी व मखमलीचा पोषाख असून त्याला हिरे लावलेले होते. त्याचप्रमाणें त्याच्या कंबरेस एक रत्नखचित तरवार लटकत होती. त्याच्या पायांत मौल्यवान पादत्राण होतें. त्याच्या

मस्तकावर एक रत्नखचित शिरस्त्राण होतें. त्याच्या भोंवतीं सुंदर पोषाख केलेले असें कित्येक गृहस्थ उभे होते. हा राजकुमार होता—निःसंशय राजकुमारच होता ! भिकाऱ्याच्या पोराचे मनोरथ शेवटीं सफल झाले.

आनंदातिशयामुळें तानूचा श्वास जोरानें चालूं लागला. व आनंद आणि विस्मय यांनीं त्याचे नेत्र विस्तीर्ण झालेले दिसले. आज आपल्या जन्माचें सार्थक झालें, इहलोकीं आतां आपल्याला कशाचीहि आशा उरली नाहीं, असें त्याच्या मनास वाटूं लागलें. आनंदाच्या भरांत न कळत तो थेट राजाच्या दिवाणखान्यापर्यंत जाऊन पोहोंचला. इतक्यांत शिपायांनीं येऊन त्याला गचांडया मारीत मारीत उद्दामपणानें राजवाडयांतून रस्त्यावर घालवून दिलें. शिपाई ह्मणाला– " भिकारडया, तुझी किंमत तुला समजत नाहीं ! " सर्व लोक त्याची टर उडवूं लागले. परंतु राजकुमारानें हें सर्व कृत्य आंतून पाहिलें. क्रोधातिरेकानें त्याचे नेत्र आरक्त होऊन गेले. तो मोठ्यानें ओरडून ह्मणाला–" हा मुलगा कितीहि नीच झाला किंवा कितीहि कंगाल असला तरी तो माझ्या बापाची रयत आहे. त्याच्याशीं असें उर्मटपणाचें वर्तन करण्यास तुह्माला शरम नाहीं कां वाटत ? "

युवराजांचा आवाज ऐकतांच सर्वांनीं आपल्या पगडया सांवरल्या व सर्वजण ' युवराज चिरायुषी होवोत ' असें ओरडले, शिपायांनीं आपल्या बंदुकी वर करून त्यांना नम्रपणानें मुजरा केला, व या कंगाल पोरास आंत सोडलें. त्यास पोटाशीं धरून युवराज ह्मणाले ' तूं अगदीं थकलेला व क्षुधित दिसतोस, लोकांनीं तुझी फार छळणूक केली ? '

युवराजाच्या तोंडून हे शब्द निघतांच पांचसहा खिसमतगार लुडबुड करीत पुढें आले. परंतु युवराजानें त्यांना झिडकारतांच ते जागच्या जागींच अचेतन वस्तूप्रमाणें निश्चल राहिले. सुशीलकुमारानें तानूस आपल्या खासदिवाणखान्यांत नेलें. दिवाणखान्यांत पोहोंचतांच युवराजांनीं भोजनाची तयारी करण्यास हुकूम केला. दिवाणखान्यांत अन्नांचीं ताटें तात्काल भरून आलीं. आपल्या नोकर चाकरां देखत भोजन करण्यास तानूला संकोच वाटेल ह्मणून युवराजांनीं त्या सर्वांना घालवून दिलें. त्यानंतर ते तानूस ह्मणाले—

" मुला तुझें नांव काय ?"

" माझें नांव तानू "

" तुझें नांव तर मोठें विलक्षण आहे ! बरें तूं राहतोस कोठें ? "

" मी शहरांत राहतों, महाराज. माझें घर कंगालपुऱ्यांत आहे. "

' कंगालपुरा ! वा ! हें त्याहीपेक्षां विचित्र नांव आहे. तुला आईबाप आहेत काय ? '

" होय, महाराज. मला आईबाप आहेत, व मला एक आजीहि आहे. पण त्यांची माझ्यावर विशेषशी ममता नाहीं. मला दोन आवळ्याजावळ्या बहिणीहि आहेत. "

" मग एकूण तुझी आजी तुला निष्ठुरपणानें वागविते ! "

" मलाच काय, ती सर्वांनाच तशी वागविते. "

" ती तुला चोप देते काय ? "

" झोंपेंत असली किंवा दारूनें झिंगून पडलेली असली म्हणजे तेवढा खंड पडतो. पुन्हां शुद्धींत आली म्हणजे ती ही बाकी सव्याज भरून काढते. '

हें ऐकतांच राजकुमाराच्या अंगावर शहारे आले. ' काय ती तुला मार देते ? '

' होय, महाराज. खरोखर ती मला सारखी ठोकीत असते. '

" तुझ्यासारख्या नाजुक आणि सुंदर पोराला ठोक देते काय ? ठीक आहे. आज सायंकाळच्या पूर्वी तिला किल्ल्यांत कैद करून टाकितों ! '

' किल्ल्यांत ! किल्ला हा मोठ्या लोकांकरितां आहे, महाराज. '

" खरेंच कीं, मी ही गोष्ट विसरलों होतों. असो; तिला शिक्षा मी देणारच. कायरे, पण तुझा बाप तुझ्याशीं नीट वागतो कां ?

' महाराज त्याचाहि नमुना आजीप्रमाणेंच आहे. '

' बाप हे सगळीकडे सारखेंच दिसतात. आमचे वडीलहि असेंच तामसी आहेत. एवढेंच कीं ते आह्माला मारीत नाहींत, तोंडानें बोलतात. कायरे, तुझी आई तुझ्याशीं कशी वागते ? '

'ती मात्र फार मायाळु आहे. माझ्या बहिणीहि माझ्या आईसारख्या आहेत.'

'त्यांचें वय काय आहे ?'

'त्यांचें वय पंधरा वर्षांचें आहे, महाराज.'

'माझी बहीण इंदुमती चवदा वर्षांची आहे. माझी चुलत बहीण इंदिरा हीहि माझ्याच वयाची आहे. कायरे, आपल्या देखत नोकर चाकर हसले तर तुझ्या बहिणींना खपतें काय ?'

'कोणाला ? त्यांच्यापाशीं नोकर चाकर आहेत अशी तुमची समजूत आहे काय ?'

'कां बरें, त्यांच्यापाशीं नोकरचाकर नसायला काय झालें ? त्यांची वेणीफणी कोण करतो किंवा त्यांना लागणारी चीजवस्त त्यांना वेळेवर कोण आणून देतो ?'

'कोणी नाहीं, महाराज. त्यांची सर्व चीजवस्त त्यांच्या अंगावरूच असते.'

'काय ? त्यांचा पोषाख सुद्धां एकच आहे.'

'महाराज, अनेक पोषाखांची त्यांना काय जरूर आहे. त्यांना देह अनेक आहेत काय ?'

'वाहवा ! येथें तर तूं अगदीं बहारच केलीस. असो. पण यापुढें मात्र तुझ्या बहिणींची सेवा करण्यास दासदासी तत्पर राहतील. मी आपल्या जामदाराला आतां हुकूम करतों. असा ओशाळा होऊं नकोस. यांत कांहीं मी तुझ्यावर मोठे उपकार करीत नाहीं. कायरे तू शिकलेला आहेस काय ?'

'तें कांहीं मला निश्चित सांगतां येत नाहीं, महाराज. माझ्या शेजारीं माझ्या जातीचा एक भला गृहस्थ राहतो. त्यानें मला कांहीं थोडें शिकविलें आहे.'

'तुला अरबी भाषा येते काय ?'

'त्याच्याच संगतीनें साधारण येत, महाराज.'

' मुला, ती भाषा तूं अवश्य शीक. आरंभींच ती थोडीशीं कठीण वाटते. पारशी भाषा याही पेक्षां कठीण आहे. परंतु माझ्या बहिणींना या दोन्हींहि अवगत आहेत. त्यांना त्या भाषा बोलतांना तूं ऐकिलेंस तर तूं सुद्धां आश्चर्यानें थक्क होऊन जाशील. कायरे, कंगालपुऱ्यांत तुमचें आयुष्य सुखानें जातें काय ? '

' होय महाराज. आह्मी भुकेलेले नसतों; अशीवेळ क्वचितच येते, आणि जेव्हां आह्मी क्षुधित नसतों तेव्हां आह्मी सुखांत असतों. आमच्या येथें माकडांचे खेळ नेहमीं होत असतात. तो खेळ फारच मौजेचा असतो. तो पाहण्यास फक्त एक पैसा द्यावा लागतो. बाकी पैसाहि आमच्या दृष्टीं पडणें फार मुष्किलीचें असतें ! '

' तुझ्या तेथील आणखी हकीगत सांग. '

' कंगालपुऱ्यांतलीं पोरें एकमेकांशीं काठ्यांनीं मारामारी करतात. पुढें आईबापांचा मार खावा लागेल याकरितांच ती लहानपणीं उमेदवारी करतात ह्मटलें तरी चालेल. '

' तुझ्या कंगालपुऱ्यांतल्या एकेक गमती ऐकण्यासारख्याच आहेत; आणखी सांग पाहूं. '

' आह्मी तेथें धावाधावी खेळतों. उन्हाळ्यांत आह्मी नदीवर पोहावयास जातों. एकमेकांना बुडवतों. एकमेकांच्या अंगावर पाणी टाकतों. आरडाओरड करतों. '

' मला ही मौज एकदां पहावयास सांपडेल तर बहार होईल ! '

' शिमग्यांत आह्मी नदी किनाऱ्यावर नानाप्रकारचे खेळ खेळतों. आह्मी तेथें चिखलांत लोळतों. एकमेकांच्या अंगावर चिखल फेकतों. अशा एक कीं दोन हजारों मौजा आह्मी तेथें करतों. '

' तुझी हकीगत ऐकून माझ्या मनाला किती बरें आनंद झाला आहे ! तुझ्यासारख्या चिंध्या अंगावर घालून जर मला मोकळेपणानें चिखलांत खेळतां येईल तर मी आपल्या ह्या राजसुखाचीहि परवा बाळगणार नाहीं. '

' तुमच्याप्रमाणें मला जर पोषाख आणि तोहि फक्त एकदांच करावयास सांपडेल, तर—

'काय ह्मणतोस तुलाहि हें आवडेल ? मग ठीक आहे. तूं आपल्या अंगावरच्या फाटक्या चिंध्या काढून टाक; आणि हा झगझगीत पोषाख घाल. तुला यापासून अल्पकाळ सुख होईल. तुला याचा कंटाळा येण्यापूर्वींच आपण पुन्हां एकदां बदलाबदली करूं.

थोडक्याच वेळांत राजकुमारानें तानूच्या चिंध्या आपल्या अंगावर घातल्या; व तानूच्या अंगावर आपला पोषाख चढविला. दोघेहि खांद्याशींखांदा लावून एका आरशासमोर उभे राहिले. जणूं काय पोषाखाची आदलाबदल केलीच नाहीं असें दोघांनाहि वाटूं लागलें. ते एकमेकांकडे आश्चर्ययुक्त मुद्रेनें पहात, आरशाकडे पहात, व पुन्हां एकमेकांकडे पहात, शेवटीं राजकुमार गाधळून ह्मणाला ? '

'कायरे, याचा अर्थ काय ?'

'महाराज, माझ्यासारख्या रंकानें याचें काय उत्तर द्यावें, '

' तूं सांगत नाहींस तर मी सांगतों, ऐक. तुझे केस, तुझे डोळे, तुझा आवाज तुझी वागण्याची ढब, तुझी उंची, तुझें स्वरूप, सर्व अगदीं हुबेहुब माझ्यासारखें आहे. दोघेहि आपण जर नग्न बाहेर पडलों, तर राजकुमार कोणता हें कोणासहि ओळखतां येणार नाहीं. तुझ्याच पोषाखांत मी जर आतां बाहेर गेलों, तर दारावर रखवालदाराच्या उद्धट वर्तनानें तुझ्या मनाला काय वाटलें असेल याचा मला प्रत्यक्ष अनुभव घ्यावयास सांपडेल. कायरे, तुझ्या हातावर हा वण पडलाना ? '

'होय महाराज. पण याबद्दल आपण शिपायावर रागावूं नये. तो काय हुकुमाचा चाकर आहे. शिवाय मला दुखापतही ह्मणण्यासारखी झाली नाहीं.'

'गप्प बैस. शिपायाचें हें कृत्य निर्लज्जपणाचें व निष्ठुरपणाचें होतें. सरकारला जर ही गोष्ट समजेल— असो. मी येईतोंपर्यंत तूं या जाग्यावरून हालूं नकोस. हा माझा तुला हुकूम आहे, हें ध्यानांत ठेव. '

एका क्षणांत त्यानें आपल्या हातानें तेथें मेजावर असलेली एक महत्वाची वस्तू झुगारून दिली; आणि तो तडाक्यानें बाहेर जावयास निघाला. दरवाज्यापाशीं पोहोंचतांच तो गजास हात घालून दरवाजा उघडूं लागला. आंतून दरवाजाला कोणी हिसके देत आहे असें पाहून

शिपायानें दरवाजा उघडला व अंगावर चिंध्या घातलेल्या या मुलाच्या एक कानशिलांत लगावून तो म्हणाला, "मघाशीं युवराजांकडून बोलणें बसविलेला तूंच ना? घे त्याबद्दल हें बक्षीस."

शिपायानें त्याच्या इतक्या जोरानें तोंडांत लगावली कीं तो गडगडत जवळच्या दारांत जाऊन पडला हें पाहतांच रस्त्यांत जमलेली सर्व मंडळी खदखदां हसूं लागली. राजकुमार चिखलांतून उठून क्रोधानें म्हणाला—

'मी राजकुमार आहें. माझा देह पवित्र आहे. माझ्या अंगावर हात टाकल्याबद्दल तुला फाशी जावें लागेल हें पक्कें ध्यानांत ठेव.'

टर उडविण्याच्या बुद्धीनें आपली बंदुक वर करून शिपाई म्हणाला—

'महाराज, मी आपल्याला मुजरा करतों.'

तो लगेच रागानें म्हणाला—

'हो बाजूला, कोठला आलाय भिकारडा.' सर्व लोक त्याच्या भोंवतीं जमल. त्याला गचांडया देत रस्त्यावर आणून सर्वजण 'हुर्यो' करीत म्हणूं लागले—

'राजाधिराजांना रस्ता सोडा. राजकुमारांची स्वारी आली आहे.

प्रकरण ४ थें.

राजकुमाराच्या साडेसातीस प्रारंभ.

लोकांनीं त्याचा कित्येक वेळपर्यंत पिच्छा पुरविला. राजतेजास साजेशा क्रोधानें तो त्यांस भराभर शिक्षा फर्मावूं लागला. तों तों लोकांनां अधिकच चेव येऊन ते त्याला चिडवून आपली अधिकच करमणूक करून घेऊं लागले. परंतु शेवटीं राजकुमार अगदीं थकून गेला. त्याच्या तोंडांतून शब्दहि निघण्याची पंचाईत पडूं लागली ! असें झाल्यावर त्याचे मागें लागलेले उडाणटप्पु लोक त्याचा नाद सोडून देऊन हळूं हळूं चालते होऊं लागले. युवराजानें आपल्या भोंवतीं चोहोंकडे निरखून पाहिलें, परंतु आपण कोणत्या महाल्यांत आहोत, हें कांहीं त्याच्या ध्यानांत येईना. आपण कांतिपुर शहरांत आहोंत एवढीच कायती त्याला माहिती होती. वाट फुटेल तिकडे तो तसाच पुढें भटकूं लागला. रस्ते ओस दिसूं लागले व घरांचीहि पातळी दिसूं लागली. चालून चालून रक्तबंबाळ झालेले आपले पाय एका हौदांत धुवून त्यानें तेथें थोडीशीं विश्रांतीहि घेतली. थोड्यावेळानें त्यानें आपलें भटकणें पुन्हां सुरूं केलें. भटकतां भटकतां तो एका विस्तीर्ण आवारांत जाऊन दाखल झाला. तेथें एक प्राचीन देवालय होतें. त्या देवालयाचा जीर्णोद्धार असल्यामुळें त्याचें भोंवतीं पायाड लावलेलें असून तेथें शेंकडों कामकरीहि काम करीत असतांना दिसत होते. हें पाहून युवराजास थोडासा धीर आला. आपलें नष्टचर्य संपण्याची वेळ जवळ येत चालली असें त्याच्या मनास वाटूं लागलें. ‘ हें देवालय फार प्राचीन आहे. अनाथ लोकांना राहण्याकरितां ह्या देवळालगत जागा बांधण्यास माझ्या बापानें पुष्कळशी रक्कम देणगीदाखल दिलेली आहे. त्याबद्दल याचें नांवहि ‘ विजयाश्रम ’ ठेवण्यांत आलेलें आहे. ज्याच्या दातृत्वामुळें या संस्थेनें आपलें डोकें वर काढलें, त्याच्या मुलास अशा विपन्नकाळीं येथील लोक मोठ्या आनंदानें सहाय्य करतील, ” असें त्यास निःसंशय वाटूं लागलें.

तो तेथें जातांच त्याच्याभोंवतीं मुलांचे थवेच्याथवे जमले. तेथें कांहीं

मुलें चेंडूफळीचा डाव खेळत होतीं, कांहीं लंगडशाईचा खेळ खेळत होतीं, कांहीं नुसती आरडाओरडच करून मौज मारीत होतीं. त्यांचे सर्वांचे पोषाख एकसारखे होते. मुलें आपापले खेळ सोडून युवराजाभोंवतीं जमलीं. युवराज राजकुलास शोभेल अशा ऐटीनें ह्मणाला ' भल्या मुलांनो, आपल्या धन्याला जाऊन सांगा कीं सुशीलकुमार साहेब तुमच्याशीं बोलूं चहात आहेत. '

हें ऐकून सर्वांनीं एकच ओरडा केला, व त्यांतील एक शिष्टपणानें पुढें येऊन ह्मणाला. ' अहो कंगालेश्वर, आपण राजेसाहेबांचे जासूद आहांत काय ? '

हें ऐकतांच युवराजाचा चेहरा रागानें लाल झाला व त्याचा हात स्वाभाविकच कमरेकडे वळला. सर्व मुलांत एकच हशा उडाला ! त्यांच्या-पैकीं एक मुलगा ह्मणाला ' गंमत ध्यानांत आली कां ? त्याच्या मनांत आपल्या कमरेस तरवारच लटकत आहे ! काय लेकाचा दिमाख ? त्याला वाटतें कीं मी राजकुलांतच जन्मास आलेलों आहे. '

यावर सर्व मुलें पोट धरधरून हसूं लागलीं. युवराज ताठ उभा राहून ह्मणाला ' मी युवराज आहे. ज्याच्या बापाच्या अन्नावर तुह्मी पुष्ट होत आहां, त्यास अशा रीतीनें वागविणें अत्यंत हलकटपणाचें आहे. '

यामुळें तर अधिकच हशा पिकला ! पहिलाच मुलगा आपल्या सोबत्यांकडे वळून पुन्हां ओरडून ह्मणाला ' या युवराजाच्या बापाच्या धर्मादायावर पुष्ट झालेल्या गुलामांनो ! तुमची लाजलज्जा गेली कोठें ? आज साक्षात् युवराज येथें येऊन पातले आहेत. त्यांच्या चरणीं एकदम लोटांगण घाला व आपल्या हातून झालेल्या चुकीची एकदम माफी मागा. '

सर्व मुलें खदखदां हसत राजकुमाराच्या पायां पडलीं, त्याबरोबर संतप्त होऊन कुमारानें एका मुलास जोरानें लाथ मारून ह्मटलें ' सध्यां एवढेंच बक्षीस घे. उद्यां तुझ्यासाठीं एक छानदार सूळ तयार करवितों. '

हें मात्र चेष्टेच्या पलीकडे गेलें. मुलांचा हशा एकदम बंद झाला. त्यांना त्वेष चढून तीं ओरडून ह्मणालीं ' पहातां काय ? याला गचांड्या मारीत

पलीकडच्या तळ्यांत नेऊन बुडवा. आपलीं कुत्रीं कोठें आहेत? त्यांना याच्या अंगावर सोडा.'

शुभधाम देशांत यापूर्वी कधींहि न घडलेला प्रकार यानंतर घडून आला. सामान्य मुलांचे हात युवराजास गचांडया देण्याचें कामीं लागले. रस्त्याच्या कडेनें हिंडणारीं सामान्य कुत्रीं त्याच्या पवित्र देहावर भुंकूं लागलीं.

रात्र संपण्याचे सुमारास युवराज शहरांतील दाट लोकवस्तीच्या एका भागांत भटकत होता. त्याच्या अंगास अनेक ठिकाणीं दुखापती झालेल्या होत्या. त्याच्या अंगावरच्या सर्व चिंध्या चिखलानें भरून गेल्या होत्या. शेवटीं तो इतका थकून गेला कीं त्याच्यानें एक पाऊलहि पुढें टाकवेना. त्यानें विचारपूस करण्याचेंहि सोडून दिलें. कारण, त्या योगानें माहिती मिळण्याचें तर एकाबाजूसच राहून त्याचा पदोंपदीं उपहास मात्र होऊं लागला ' कंगालपुरा-होय. हेंच नांव त्यानें सांगितलें होतें. तें जर मला सांपडेल तर अद्यापहि माझा बचाव होईल. कारण त्याचे लोक मला राजवाडयांत घेऊन जातील आणि तेथें ते सांगतील कीं ' ' हा आमचा कोणी नाहीं, आणि हाच खरा युवराज आहे.'

असे विचार चालत असतां त्याला विजयाश्रमांतल्या मुलांच्या वर्तनाचेंहि मधून मधून स्मरण होई. तेव्हां तो ह्मणे ' जेव्हां मी राजा होईन तेव्हां त्यांना नुसतें अन्नवस्त्रच पुरवून राहणार नाहीं. तर त्यांच्या शिक्षणाचीहि योग्य तरतूद करीन. कारण मनाचा व अंतःकरणाचा उपासमार होऊन केवळ शरीराचें पोषण करणें निरुपयोगी आहे. मुलांच्या वर्तनापासून हा जो मला आज धडा मिळाला आहे तो विसरून मी आपल्या रयतेच्या नुकसानास कधींहि कारण होणार नाहीं. कारण अंगीं शालीनता येऊन अंतःकरणांत मार्दव उत्पन्न होण्यास शिक्षणासारखें दुसरें साधन नाहीं!'

प्रकाश अंधुक होऊं लागला. थोडा पाऊसहि पडूं लागला. सोसाट्याचा वारा वाहूं लागला, व निशा सर्व पृथ्वीस अवगुंठित करूं लागली, शुभधाम देशाच्या सिंहासनाचा भावी अधिपती जो आमचा युवराज तो घरादाराविणें व वस्त्रप्रावरणाविणें यावेळीं गल्लोगल्लीं भटक्या मारीत फिरत होता. इतक्यांत दारूनें मदांध झालेला एक ऐरट त्याचे पुढें अकस्मात् येऊन उभा राहिला व त्यानें त्याच्या कुडत्याच्या गळ्यांस गच्च धरलें. ऐरट ह्मणाला 'इतकी

रात्र झाली तरी अजून बाहेर ! आणि एक कवडीचीही प्राप्ती नाहीं ! थांब तूं काय समजलास ? तुझीं हाडेंसहाडें मऊं करीन तरच मी नांवाचा जानू !

युवराजानें एका हिसड्यासरशीं आपणास मोकळें केलें. तिऱ्हाईत मनुष्याकडे निरखून पाहून तो ह्मणाला " तूंच त्याचा बाप कां ? ईश्वर करो ! आणि असेंच होवो. त्याला तूं परत आणवून मला माझ्या योग्य स्थानीं पोहोंचवशीलच. "

" त्याचा बाप ! तो कोण तें मला माहीत नाहीं. पण मी मात्र तुझा बाप आहे हें खास. तुझीहि पण मी आतां खात्री करतोंच. "

" हें पहा, चेष्टेची ही वेळ नव्हे. मी थकून गेलों आहे. माझ्या अंगास जागोजाग दुखापती झालेल्या आहेत. यापुढें मला हे हाल सोसवत नाहींत. माझ्या बापाकडे ह्मणजे राजाकडे नेऊन पोहोंचीव, ह्मणजे तुझ्या स्वप्नांतहि कधीं आली नसेल इतकी धनदौलत तो तुला देईल. भल्या माणसा माझ्यावर विश्वास ठेव, मी तुला एक अक्षरहि खोटें सांगत नाहीं. मी खरोखरीच युवराज आहे ! "

मुलाकडे निरखून पाहून व मान हलवून जानू ह्मणाला—

" याचें डोकें ठिकाणावर नाहींसें दिसतें. असो. पण ठिकाणावर आणावयास किती उशीर लागतो. आतां घरीं गेल्यावर चौदावेंरत्न दाखविलें कीं डोकें ताळ्यावर येईल. "

हें बोलणें ऐकून युवराज बिचारा अगदीं भांबावून गेला. जानूनें युवराजास मचांड्या देत देत आपल्या घरापर्यंत नेलें. हा तमाशा पहाण्यास वाटेंत शेजाऱ्यापाजाऱ्यांची पुष्कळ गर्दी झाली.

प्रकरण ७ वें.

तानूचें वैभव.

दिवाणखान्यांत तानूला बराच निवांत वेळ मिळाला. त्याचा त्यानें उपयोगहि चांगला करून घेतला. आरशांत पाहून आपल्या झगझगीत पोषाखाचें कौतुक करीत राजकुमाराच्या ऐटीनें तो इकडे तिकडे फिरूं लागला. आपण निरनिराळ्या स्थितींत कसकसें दिसतों हें तो आरशांत निरखून पाहूं लागला. जणूं काय आपण सरदारच आहो, अशा बाण्यानें म्यानांतून वरचेवर तरवार काढून तो तिला वरचेवर प्रणाम करूं लागला. कमरेला लटकत असलेल्या रत्नखचित कटयारीनेंहि तो आपली करमणूक करून घेऊं लागला. खोलींत ज्या अनेक मौल्यवान् वस्तू होत्या त्यांचीहि त्यानें पाहणी चालविली. दिवाणखान्यांतील निरनिराळ्या रत्नखचित आरामासनावर तो एकेकदां पाळीपाळीनें बसला. कंगालपुऱ्यांतील लोक जर मला या थाटांत पाहतील तर त्यांना किती बरें आश्चर्य वाटेल ! तेथें जाऊन मी जर त्यांना आपल्या भाग्योदयाची गोष्ट सांगेन, तर तिच्यावर त्यांचा विश्वास तरी बसेल काय ? किंवा याच्या बुद्धीस खास भ्रम झाला आहे असें निदान ठरवून ते माझा उपहास करण्यास प्रवृत्त होतील. असे एक कीं दोन अनेक विचार त्याच्या मनांत येऊं लागले.

याप्रमाणें सुमारें अर्धा तास गेल्यानंतर अद्याप राजपुत्र कां बरें येत नाहीं ? असें त्यास वाटूं लागलें. कोठें कांहीं जरासें वाजलें कीं राजपुत्र आला असें त्यास वाटून त्यानें त्यादिशेकडे पाहूं लागावें; असा क्रम बराच वेळ चालून दिवाणखान्यांतील नानाविध सुंदर वस्तू त्यास असून नसल्यासारख्या झाल्या. तेथें कोणी येऊन त्यानें आपल्याला राजकुमाराच्या पोषाखांत जर पाहिलें तर आपली अवस्था काय होईल ! आपल्याला ते फांसावर चढवणार नाहींत काय ? आपण कोण, दिवाणखान्यांत कसें आलों याची शहानिशा करून आपल्याला परलोकीं पाठविण्यापूर्वी ते आपली गांवांतून धिंड काढल्याशिवाय कधींहि राहणार नाहींत; अशी त्यास अधिक अधीकच भीति वाटूं लागली. आतां येथें राहणें चांगलें नाहीं.

राजपुत्राचा शोध लावून आपलें संरक्षण करण्याविषयीं त्याचीच विनवणी केल्याशिवाय माझा निभाव लागणार नाहीं; असे विचार त्याच्या मनांत घोळतात तोंच झकपक पोषाख केलेले असे सहा दरकदार व दोन तरुण सेवक तेथें येऊन त्यास अदबीनें मुजरा करूं लागले. हें पाहतांच दचकून मागें सरून त्यानें दरवाजा लावून घेतला. तो ह्मणाला—

" ते माझी थट्टा करीत आहेत. ते राजाकडे जाऊन त्याला माझी हकीगत सांगतील. हाय ! हाय ! मी प्राण द्यावयास येथें आलों तरी कशाला !'

तो दिवाणखान्यांत इकडे तिकडे वेड्यासारखा हिंडूं लागला. एवढेसें कोठें वाजलें कीं त्याच्या छातींत धडकी भरे ! इतक्यांत दरवाजा उघडून रेशमी पोषाख केलेला हुजऱ्या येऊन सांगूं लागला.

" इंदिराबाईसाहेब आपल्या भेटीकरतां आल्या आहेत. "

इंदिरा मोठी सुस्वरूप मुलगी होती. दिवाणखान्यांत प्रवेश करतांच ती राजकुमाराकडे त्वरेनें जाऊं लागली. जवळ जातांच दुःखित स्वरानें ती ह्मणाली—" कुमार तुह्मी असे कां दिसतां ? तुह्माला काय झालें आहे ? "

तान्ूचा श्वास बंद होण्याची वेळ आली. तरी पण मोठ्या मिन्नतवारीनें तो चांचपडत चांचपडत ह्मणाला—माझ्यावर दया करा. खरोखर मी कांहीं राजकुमार नाहीं. मी कंगालपुऱ्यांतला रहिवाशी तानू कामाठी नांवाचा भिकार मुलगा आहे. राजकुमार कोठें आहे तो मला कृपा करून दाखवा, ह्मणजे तो मला आपल्या चिंध्या परत देऊन माझी येथून सुरक्षितपणें सुटका करील. एवढी मझ्यावर दया करा व माझे प्राण वांचवा.

असें ह्मणत तो वरचेवर तिच्या पायां पडूं लागला. तें ऐकून ती लहान मुलगी एकदम घाबरून गेली. ती घाबऱ्या घाबऱ्या ह्मणाली—" आपण ! आणि माझ्या पायां पडतां ! " असें ह्मणत ती भयभीत होऊन तेथून निसटून गेली. तें पाहून तानू निराशेनें पुटपुटला—" आतां ते येथें येऊन मला पकडून नेतील. "

अशा रीतीनें तो भयानें गांगरून गेला; त्यावेळेस राजवाड्यांत एक भयंकर बातमी पसरत चालली होती. सरदार, मानकरी, नोकरचाकर, जो तो युवराजास वेड लागलें आहे असें आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्याच्या कानांत कुचकुचूं लागला. राजवाड्यांतील लोकांना बोलावयास दुसरा विष-

यच नव्हता. सर्वांचे चेहरे उदास दिसत होते. इतक्यांत एक कामगार ओरडत आला ' राजकुमाराला वेड लागलें आहे ही बातमी कोणीहि बोलूं नये, व ती कोणीहि प्रसिद्ध करूं नये. केल्यास त्यास शिक्षा होईल असा महाराजांचा हुकूम आहे. ' हा हुकूम कानीं पडतांच राजवाड्यांतील कुचकुच एकदम बंद पडली.

' तो पहा राजपुत्र आला, ' असें सर्व लोक एकमेकांच्या कानांशीं लागून सांगूं लागले. गरीब बिचारा तानू दुतर्फा उभे राहिलेल्या सरदारांचे मुजरे घेत व त्यांचे मुजरे परत करण्याचा प्रयत्न करीत चालला. आपल्या भोंवतीं इतके लोक जमले हें पाहून तो गोंधळून गेला. त्याच्या चर्येवर औदासिन्याची छाया स्पष्ट दिसत होती. त्याला सावरून धरण्यास त्याच्या दोन्ही बाजूंस दोन मोठे सरदार चालत होते. त्यांच्या खांद्यावर तानूनें हात टेंकले होते. त्याच्या मागोमाग राजवैद्य व इतर नोकरचाकर मोठ्या अदबीनें जात होते.

तानू या सर्व लवाजम्यानिशीं थोड्याच वेळांत एका भव्य दिवाणखान्यांत आला. त्याचे भोंवतीं त्याचे सर्व परिचारक उभे होते. त्यांचे समोर थोड्या अंतरावर एक भला मोठा अगडबंब माणूस कोचास टेकून बसला होता. त्याचें डोकें पांढरें सफेत झालेलें होतें. त्याच्या मिशाही त्याच रंगाच्या होत्या. त्याचा पोषाख चांगला मौल्यवान होता. त्याच्या पायास सूज आल्यामुळें त्याच्यावर फ्लॅनेलचे पट्टे गुंडाळले होते. दिवाणखान्यांत सर्वजण स्तब्ध उभे राहिले होते. सर्वांचीं डोकीं नम्रपणानें खालीं वांकलेलीं दिसत होतीं. हा कोचावर बसलेला माणूस तेवढा निर्धास्तपणानें वर पहात होता. हेच आमचे महाराज विजयध्वज होत. ते दीन मुद्रेनें ह्मणाले—

" कुमारा, माझ्या उतार वयांत तूं हें मजवर काय संकट आणीत आहेस. "

आपणाशीं बोलत आहे तो साक्षात् राजा आहे असें एकंदर रागरंगावरून समजतांच तानूची अगदीं गाळण उडून गेली. तो नम्रपणानें प्रणाम करून ह्मणाला—

' आपण महाराज काय ? मग माझी शंभर वर्षे भरलींच ह्मणावयाचीं '

हें भाषण ऐकून राजाचीं सर्व गात्रें एकदम हतवीर्य होऊन गेलीं. तो

अगदीं गोंधळून जाऊन तेथें जमलेल्या सर्व लोकांकडे शून्य दृष्टीनें पाहूं लागला. पुन्हां मुलाकडे पाहून तो अत्यंत निराश होऊन ह्मणाला—

'मला वाटलें कीं कुमारासंबंधानें उठलेली बातमी निवळ गप्प आहे. परंतु खरोखरच कुमारास कांहींतरी बाधा झाली अशी माझी आतां खात्री झाली आहे.'

दीर्घ निःश्वास सोडून तो हळूंच ह्मणाला "बाळा, तुझी अशी अवस्था कशानें झाली? तूं आपल्या बापाला ओळखीत नाहींस काय?"

यानंतर दोन चार परिचारकांनीं राजकुमारास सावरून धरून त्याला राजाकडे नेलें. तेंव्हां राजानें त्याच्या तोंडावरून प्रेमानें हात फिरवून तो त्याच्याकडे एकसारखा टक लावून पाहूं लागला. इच्छा हीच कीं आपल्याला ओळखून त्यानें थोडें तरी शुद्धींत बोलावें. त्याच्या पाठीवर हात फिरवून तो ह्मणाला—

'बाळा, आपल्या बापाला अखेर तूं ओळखीत नाहींसनां? 'ओळखतों' असें एकदां ह्मण ह्मणजे माझ्या उद्विग्न चित्तास थोडें तरी समाधान होईल.'

'आपण माझे प्रभू आहांत. ईश्वर आपल्याला दीर्घायुषी करो.'

'अगदीं बरोबर बोललास. असा भिऊं नकोस आणखी बोल. येथें तुला कोणीहि इजा करणार नाहीं. येथें असलेल्या सर्व मंडळींचें तुझ्यावर प्रेम आहे. तुझी प्रकृती आतां सुधारत चाललीनां? पहिल्यासारखा आतां तूं गैरशुद्धींत बोलणार नाहींसनां?'

'महाराज, आपण आमचे सर्वांचे प्रभू आहांत. मी कंगालकुलांत जन्मास आलेला एक दरिद्री मुलगा आहे. केवळ एका चुकीमुळें मला हें स्थान प्राप्त झालें आहे. परंतु त्याचा दोष माझ्याकडे नाहीं. माझें वय फार लहान आहे ह्याचा विचार करून आपण मला सुळावर चढवूं नये, अशी माझी आपल्या चरणापाशीं नम्र विनंति आहे. आपल्या एका शब्दानें मला जीवदान मिळणार आहे. तेवढया शब्दाचा आपण उच्चार करा.'

'काय? तुला फांसावर चढवायचें. कुमारा, असें भलतेंच बोलूं नकोस. तुझ्यावर असा प्रसंग कधींहीं येणार नाहीं.'

राजापुढें लोटांगण घालून तानू एकदम ओरडून ह्मणाला—

'महाराज, ही पुण्यभूमी सनाथ करण्यास ईश्वर तुह्मांला दीर्घायुष्य

देवो. ' एकदम आनंदानें उठून व राजाजवळ असलेल्या सरदारांकडे वळून तो ह्मणाला—

' तुह्मी ऐकिलेंत नां ? राजानें मला जीवदान दिलें. राजाचा शब्द कधींहीं अन्यथा होणार नाहीं. ' सर्वांनीं लवून मुजरा केला. परंतु कोणीहि बोललें नाहीं. तो जरा साशंक मुद्रेनें राजाकडे पहून ह्मणाला—

' मला येथून जाण्यास आतां परवानगी आहेना ? '

' तशी तुझी इच्छा असेल तर खुशाल जा. पण जरा थांबेनास कां ? असें तुला काम तरी काय आहे ? '

खालीं बघून नम्रपणानें तानूनें उत्तर दिलें.

' महाराज येथें मला सर्व सुखांची समृद्धि आहे. तरीपण माझ्या मनाला मोकळेपणा वाटत नाहीं. माझ्या घरची स्थिति कष्टमय आहे. तरीपण तेथें माझी आई व माझ्या बहिणी आहेत. ह्मणूनच तें माझें घर आहे अशी माझी भावना असल्याकारणानें त्यावर माझें अस्खलित प्रेम आहे. महाराजांच्या चरणापाशीं माझी अशी नम्र विनंति आहे कीं, महाराजांनीं मला घरीं जाण्यास परवानगी द्यावी. '

महाराजांनीं यावर कांहींहि उत्तर केलें नाहीं. त्यांचा चेहरा खिन्न व चिंताक्रांत दिसूं लागला. इतक्यांत थोडीशी आशा उद्भवल्यासारखें दाखवून ते ह्मणाले—

' कदाचित् त्याचें हें एवढयाच बाबतींत वेड असेल. इतर संबंधांत कांहीं बिघाड झाला नसावा असा माझा तर्क आहे. ईश्वर करो आणि हाच माझा तर्क खरा ठरो. '

नंतर त्यानें तानूस एक प्रश्न अरबी भाषेंत विचारला. त्याचें उत्तरहि तानूनें दिलें. त्याबरोबर राजाच्या तोंडावर आनंदाची छटा पसरलेली दिसूं लागली. दरबारांतील सर्व सरदारांची व राजवैद्यांची मुखकमलें प्रफुल्लित होऊन सर्वजण कुमाराकडे मोठ्या औत्सुक्यानें पाहूं लागले. एका राजवैद्याकडे वळून महाराज ह्मणाले.

' अरबी भाषेंत त्याला चांगलें शिक्षण मिळालें आहे. शिवाय त्याची बुद्धीहि चलाख आहे. त्या दृष्टीनें पाहतां त्याचें हें उत्तर विशेष तारीफ करण्यासारखें नाहीं. तरी त्याच्या बुद्धीस कोणत्याहिप्रकारें असाध्य भ्रम झालेला

दिसत नाहीं. फक्त त्याच्या चित्तास थोडीशी खिन्नता आलेली आहे; येवढेंच यावरून दिसतें. कां असेच कीं नाहीं ? '

राजवैद्य मस्तक खालीं करून ह्मणाले--

' जें महाराजांच्या तोंडून निघालें तेंच माझ्या मनांतहि चाललें होतें. जें बरोबर आहे तेंच महाराज बोललें. '

खुद्द भिषग्वर्यांकडून असा पाठिंबा मिळाल्यामुळें राजाची मर्जी सुप्रसन्न होऊन तो प्रमुदित अंतःकरणानें ह्मणाला—

' आतां पहा, आपण याची आणखी परीक्षा पाहूं. त्यानें युवराजास उर्दू भाषेमध्यें एक प्रश्न केला. सर्व माणसांचे डोळे आपणाकडे लागले आहेत असें पाहून तानू गोंधळून गेला. व क्षणभर स्तब्ध राहून ह्मणाला—

' महाराज, मला ही भाषा अवगत नाहीं. '

हें ऐकतांच राजा कोचावर धाडदिशीं पडला. सर्वजण त्यास सावरून धरण्यास त्वरेनें धावत गेले. त्या सर्वांना बाजूस सारून राजा ह्मणाला--

' मला कटकट करूं नका. मला कांहीं झालें नाहीं. मला फक्त पित्ताचा झटका आल्यासारखें झालें आहे. '

' बाळा, इकडे ये, व तुझें वेडावून गेलेलें मस्तक आपल्या बापाच्या छातीवर ठेव. तुझें मस्तक लवकरच ताळ्यावर येईल. तूं कांहीं भिऊं नकोस. ईश्वराच्या कृपेनें तूं लवकरच चांगला होशील. ' नंतर तो दरबार-कडे वळला. त्याची नेहमींची वृत्ती पार बदलून गेली. त्याचे डोळ्यांत अशुभ-सूचक तेज चमकूं लागलें. तो ह्मणाला—

' मी काय ह्मणतों तें सर्वजण लक्ष देऊन ऐका. हा माझा मुलगा वेडा झाला आहे. परंतु हें कांहीं कायमचें आहे असें मला वाटत नाहीं. अति अभ्यासामुळें व एकांतवासांत आयुष्य घालविल्यामुळें हा परिणाम झाला असावा. त्याचे शिक्षक, त्याचीं पुस्तकें यांना कांहीं दिवस रजा देणें अवश्य आहे. आणि तुह्मी तशीच तजवीज करा. जेणेकरून त्याला या विकाराचा विसर होऊन त्याच्या चित्तास विनोद होईल असें त्याच्याशीं वर्तन ठेवा. ' याबरोबर एकदम उठून राजा पुन्हां ह्मणाला—

' तो वेडा असला तरी तो माझा मुलगा व या गादीचा वारस आहे. आणि ह्मणूनच तो वेडा असला काय किंवा शहाणा असला काय माझ्या

पश्चात् तोच या सिंहासनावर आरूढ झाला पाहिजे. आणखी लक्ष देऊन ऐका आणि तें जाहीर करा. याच्या या वेडाबद्दल जो ह्मणून बाहेर उद्गार काढील तो या राज्याचा शत्रू समजला जाऊन त्यास तात्काल इहलोकची कायमची रजा घ्यावी लागेल. आतां माझ्यानें पुढें बोलवत नाहीं. या दुःखानें मी अगदीं बलहीन होऊन गेलों. माझा आतां घटकेचाहि भरंवसा आहे असें वाटत नाहीं. तेव्हां कुमारास उद्याच्या उद्याच यौवराज्याभिषेक करा.'

एक सरदार पुढें येऊन महाराजास मुजरा करून ह्मणाला--

'महाराज, आपल्या राज्यांतील कुलपरंपरा असलेले सेनानायक हे हल्लीं कांहीं आरोपावरून कारागृहांत आहेत. त्यांची अशा वेळेस मुक्तता होणें अवश्य आहे.'

'त्याचें दुष्ट नांव माझ्यापुढें काढून माझा उपमर्द करूं नको. माझ्या इच्छेविरुद्ध तह्मी मला ही गोष्ट करावयास सांगतां काय? अभिषेकाचे समारंभास एक सेनापती नाहीं ह्मणून तो समारंभ लांबणीवर टाकावा असें तुमचें ह्मणणें आहे काय? नाहीं नाहीं. ती गोष्ट कदापि होणार नाहीं. धीरसिंह सेनापतीचें मस्तक उद्यांची प्रभात उगवण्यापूर्वी धडापासून वेगळें झालेंच पाहिजे; अशी माझ्या प्रधानमंडळास सक्त ताकीद देऊन ठेवा.'

हरिताक्ष सरदार ह्मणाले—

'महाराजांचा हुकूम आह्मास शिरसावंद्य आहे' असें ह्मणून ते आपल्या जाग्यावर जाऊन बसले. राजाच्या मुखावरील क्रोधाची छाया बरीच सौम्य होऊन तो ह्मणाला —

'मुला, इकडे ये. मला आलिंगन दे. तुला कशाची भीति वाटत आहे? मी तुझा पुत्रवत्सल पिता नाहीं काय?'

'आपणं दीनवत्सल आहांत, पण मी आपल्या वात्सल्यास अपात्र आहे. उदईक एका मोठ्या गृहस्थाचा अंत होणार हें ऐकून माझ्या अंतःकरणास अत्यंत दुःख होत आहे.'

'शाबास! शाबास! तूं तसाच प्रेमळ आहेस. तुझ्या मनाला जरी विकृति झाली आहे तरी तुझें अंतःकरण अबाधित आहे हें यावरून उत्कृष्ट सिद्ध होते. परंतु हा सेनापती ह्मणजे तुझ्या मार्गांतील एक मोठा भयंकर

कंटक होय. त्याचें निर्मूलन हें झालेंच पाहिजे. याबद्दल तूं आपल्या मनास त्रास करून घेऊं नकोस. '

' पण माझ्यामुळेंच त्याला हें मरण येत नाहीं काय ? '

' कुमारा त्याच्याबद्दल तूं इतकी फिकीर बाळगूं नकोस. तूं त्यामुळें आपल्या सुखांत यत्किंचितहि व्यत्यय येऊं देऊं नकोस. मी आतां थकलों आहें. मला आतां विश्रांति घेण्यास गेलें पाहिजे. आतां तूंहि आपल्या मातुला बरोबर जा. '

राजा आपल्याला आतां मोकळे सोडून घरी जाऊं देईल अशी जी तानूस प्रथम आशा होती ती या शेवटल्या वाक्यानें अगदींच निष्फळ झाली. ' इकडून यावें कुमार साहेब, इकडून यावें कुमारसाहेब, हे शब्द पुन्हां कानीं येताच त्याची छाती धडधडूं लागली.

त्याचा धीर अधिक अधिकच खचूं लागला. सरदार लोक आपल्याला मुजरा करीत दुतर्फा उभे राहिलेले पाहून त्याची अगदीं गाळण उडून गेली. आतां आपण येथें कायमचे बंदिवान झालों ! आपणांस कोणी गणगोत, आप्तइष्ट, किंवा जिवलग मित्र राहिले नाहीं; असें वाटून आपली मुक्तता करण्याबद्दल तो ईश्वराचा धांवा करूं लागला. त्याच्या मनोमय सृष्टींतील राजलक्ष्मी त्याला जितकी सुखकर वाटली तितकेंच हें मूर्तिमंत राजवैभव त्याला कष्टमय वाटूं लागलें.

प्रकरण ६ वें.

तानूला तालीम मिळते.

सर्व सरदारांनीं तानूला एका भव्य दिवाणखान्यांत नेऊन तेथें एका रत्नखचित सिंहासनावर अधिष्ठित केलें. आपल्या भोंवतीं वयोवृद्ध माणसें पाहून तानू अगदीं गांगरून गेला. तो त्यांना खालीं बसण्याबद्दल आग्रह करूं लागला, परंतु ते त्याचें कांहीं केल्या ऐकेनात. ते प्रत्येक खेपेस खालीं वाकून मुजरा करूं लागले. वरचेवर हे आपल्या कपाळावर कां हात

ठेवतात याबद्दल तो अधिकच अचंब्यांत पडला ! इतक्यांत युवराजांचे मातुल हरिताक्ष त्याच्या कानाशीं लागून ह्मणाले—

'आपण असा आग्रह धरूं नये. आपल्या समोर त्यांनीं खालीं बसणें उचित नव्हे.'

'सरदार हेमकंठ आले आहेत' असें द्वारपालानें सांगितलें. सरदारांनीं आंत येऊन तानूस मुजरा करून म्हटलें—

'मी राजाचा संदेश घेऊन आलों आहे. तो संदेश अगदीं गुप्त रीतीनें आपल्याला कळवावा असा मला हुकूम आहे. सरदार हरिताक्ष यांचे शिवाय सर्व सरदारांना निरोप देण्याविषयीं आज्ञा व्हावी.'

'सरदारांना निरोप द्यावयाचा ह्मणजे काय करावयाचें याचा तानूला उलगडा पडत नाहीं असें पाहतांच सरदार हरिताक्ष त्याच्या कानांत ह्मणाले—

'आपली बोलण्याची इच्छा नसल्यास आपण नुसती हातानें खूण करा.'

तानून तशी खूण करतांच सर्वजण निमूटपणें निघून गेलें. सरदार हेमकंठ ह्मणाले—

महाराजांचा असा हुकम आहे कीं, कांहीं महत्वाच्या राजकारणाकरितां युवराजांनीं शक्य तितक्या रीतीनीं आपल्या बुद्धिभ्रमाचें प्रच्छादन करावें. 'मी राजकुमार नाहीं किंवा गादीचा वारस नाहीं' असें त्यांनीं कोणाजवळहि ह्मणूं नये. त्यांनीं आपल्या इतमामाप्रमाणें वागावें. कोणी मुजरा करूं लागल्यास किंवा इतर रीतीनें आदरप्रदर्शित करूं लागल्यास त्यांनीं कोणत्याहि प्रकारें आपली नापसंती दर्शवूं नये. भोंवतालचे सरदार जे कांहीं उपचार करतील, ते त्यांनीं निमूटपणें करून घ्यावेत. त्यांनीं आपल्यापेक्षां कमी दर्जाच्या माणसाशीं बिलकूल बोलूं नये. आपणांस पूर्वीची स्थिति प्राप्त होऊन पूर्वींच्या चेहऱ्यांची ओळख पटूं लागेल अशाबद्दल त्यांनीं प्रयत्न करावा. ओळखीचें स्मरण न होईल तर त्यांनीं स्वस्थ बसावें. विस्मरणाचीं चिन्हें आपल्या चेहऱ्यावर यत्किंतहि दिसूं देऊं नयेत. राजकारणांत जेव्हां त्यांना सुचेनासें होईल तेव्हां त्यांनीं हरिताक्षांच्या सल्ल्यानें वागावें. ते त्यांच्या जवळ नेहमीं राहतील. महाराजांचा अशाप्रकारचा हुकूम आहे.'

तानूनें उत्तर केलें—

" हा राजाचा हुकूम आहे. हा सर्वांनीं मानलाच पाहिजे. राजाच्या हुकुमाची कोणीही उपेक्षा करतां कामा नये. "

सरदार हरिताक्ष ह्मणाले—

' आपण पुस्तकें वगैरेंची रजा घ्यावी अशी जी महाराजांची आज्ञा आहे ती आपल्या हिताकरतांच आहे. आपल्यावर महाराजांचें विलक्षण प्रकारचें प्रेम आहे, हेंच ह्या आज्ञेवरून व्यक्त होतें. '

सरदार हेमकंठ ह्मणाले—

' आपण आपल्याला असें आश्चर्य वाटूं देऊ नका. महाराजांचा हा कांहीं कायमचा हुकूम नाहीं. आपली प्रकृति ताळ्यावर आली, ह्मणजे आपला पूर्वीचा क्रम पुन्हां सुरू करण्यास कोणतीही हरकत नाहीं. '

याचवेळेस राजकन्या पद्मावती व इंदिरा या दोघीहि राजकुमारास भेटण्यास आल्याचें वृत्त सेवकांनीं सांगितलें. त्याबरोबर दोवेहि सरदार आश्चर्यचकित होऊन एकमेकांकडे पाहूं लागले. सरदार हरिताक्ष उठून दाराकडे गेले व त्यांच्या अंगावरून दोन्ही राजकन्या जात असतां ते त्यांना हळूंच ह्मणाले—

' बाईसाहेब, युवराजांच्या चाळ्यांकडे आपण लक्ष देऊं नये. किंवा त्यांच्या विस्मरणवृत्तीबद्दल यत्किंचित्ही आश्चर्य दर्शवूं नये. '

इकडे सरदार हेमकंठ हे तानूच्या कानाशी लागून ह्मणाले—

' महाराजांचा हुकूम विसरूं नकां-सर्व गोष्टींचें स्मरण ठेवा. निदान स्मरण आहे असें दाखवा. आपल्या वृत्तींत कांहीं पालट झाला आहे असें त्यांना दिसूं देऊं नकां. राजकन्यांचें आपल्यावर प्रेम आहे हें आपण जाणतच आहां. आपलीं स्मरणशक्ति नष्ट झाली आहे हें जर त्यांच्या नजरेस आलें तर त्यांना किती दुःख होईल याचा आपण विचार करावा. आह्मी दोघेजण येथें बसूं कां ? '

तानूनें मान हलवून आपली अनुमती दर्शविली. युवराजाची बतावणी कशी करावयाची याची तालीम त्याला आपोआपच मिळूं लागली. या तालमीप्रमाणें तंतोतंत वागून राजाची मर्जी सुप्रसन्न करून घ्यावयाची असा अंतर्यामीं न जाणतां, त्याचा निश्चयहि झाला !

राजकन्यांशीं संभाषण करण्यांत तानूनें बरीच सावधगिरी ठेवली. परंतु त्यांच्या संभाषणांत कित्येकवेळां बखेडा हा झालाच.

'मी खरा राजपुत्र नाहीं, तुमच्याशीं बोलण्याची माझी योग्यता नाहीं' असें कबूल करण्याच्या बेतांतहि तानू एकदां होता. परंतु राजकन्या पद्मावती हिच्या चाणाक्षपणामुळें तो प्रसंग टळला. राजपुत्राला सावरून धरण्यास त्याच्या दोन्ही बाजूस असलेले दोन सरदाराहि अत्यंत जागरूक होते.

'आज आपण राणीसाहेबांच्या भेटीला गेला होतां काय?' असें पद्मावतीनें विचारलें.

या प्रश्नाचें आतां काय उत्तर द्यावें याबद्दल तानू बुचकळ्यांत पडला. तो गोंधळून इकडे पाहूं लागला. तिकडे कांहींतरी अनमानधपक्यानें तो उत्तर देणार इतक्यांत सरदार हेमकंठ पुढें सरसावले व दरबारांत वागलेल्या माणसास स्वाभाविक असलेल्या प्रसंगावधानानें ते ह्मणाले—

'होय ते भेटावयास गेले होते, आणि राणीसाहेबांनीं त्यांना बराच धीर दिला. कां असेंच ना युवराज?'

तानू तोंडांतल्या तोंडांत कांहींतरी पुटपुटला. हेमकंठांच्या ह्मणण्यास त्यानें रुकार दिला; असेंच यावरून समजण्यांत आलें. आपण अशींच जर उत्तरें देऊं लागलों तर आपलें सोंग बाहेर फुटणार अशी त्याला भीति वाटत असल्याचीं चिन्हें त्याच्या मुद्रेवर स्पष्ट दिसत होतीं. आतां कांहीं दिवसपर्यंत युवराज अभ्यास वगैरे कांहीं करणार नाहींत, अशाबद्दल जेव्हां गोष्ट निघाली तेव्हां धाकटी राजकन्या आश्चर्यानें ह्मणाली—

'अरेरे! ही गोष्ट फार वाईट झाली. युवराजांचा अभ्यास फारच चांगला चालला होता. असो. पण युवराज, आपण याबद्दल आपल्या मनाला वाईट वाटूं देऊं नये. अभ्यासांत मध्यंतरीं हें जें विघ्न आलें आहे तें केवळ आगंतुक आहे. तें कांहीं फार दिवस ठिकणार नाहीं. अजूनहि आपण आपल्या परमपूज्य पित्याप्रमाणें विद्वान होऊन अनेक भाषा आपल्याला उत्तमप्रकारें अवगत होतील.'

सावधगिरीचें अवसान घसरून तानू ओरडून ह्मणाला—

'काय माझा बाप ! त्याला स्वतःची भाषा देखील पुरती बोलतां येण्याची मारामार, शिक्षणाच्या नांवानें तर—'

इतक्यांत हेमकंठ आपल्याकडे डोळे वटारून पाहतात असें दृष्टीस पडतांच तो लाजेनें खालीं मान घालून हळूंच ह्मणाला—

'हाय ! हाय ! माझ्या स्मृतिभ्रमानें माझी पुन्हां पाठ पुरवली. माझें मन पुन्हां भटकूं लागलें. महाराजांच्या बद्दल मी भलतेंच बोललों. त्यांची नामुष्की करण्याची माझी बिलकुल इच्छा नव्हती.'

युवराजाचा हात धरून राजकन्या पद्मावती ह्मणाली—

'आह्मांला तें पक्कें माहित आहे. आपण आपला असा भलता ग्रह होऊं देऊं नये. हा आपला अपराध नव्हे, आपल्याला नवीन जडलेल्या विकृतीचाच हा परिणाम होय हें आह्मांस पक्कें ठाऊक आहे.'

'तूं खरोखरच मोठी सुशील मुलगी आहेस. दुःखिताचें समाधान कसें करावें ही विद्या खरोखरच तुझ्यापासून शिकून जावी. तुझें उतराई होण्यास माझें अंतःकरण कसें उचंबळूं लागलें आहे.'

यावर राजकन्या इंदिरा उर्दू भाषेंत एक वाक्य बोलली. तें समजल्याचें चिन्ह तानूच्या चेहऱ्यावर कांहींच दिसलें नाहीं. हें तंत्र चाणाक्ष पद्मावतीनें तेव्हांच ओळखिलें व तिनें इंदिरेस उर्दूंतच उत्तर देऊन चालू गोष्टींचा कल एकदम फिरवला.

याप्रमाणें तानूचा काळ पूर्वीपेक्षां बराच सुखानें जाऊं लागला. त्याच्या हातून वेळोवेळीं जे प्रमाद होत त्यावर पांघरुण घालून त्यास सहाय्य करणें हें जो तो आपलें कर्तव्य समजूं लागला. तानूचा काळ सुखानें कसा जाईल या विवंचनेनें जो तो त्याच्या तंत्रानें वागूं लागला. हें पाहून त्यासहि एकप्रकारचें कौतुक वाटूं लागलें. आज राजवाड्यांत मोठ्या थोरल्या मेजवानीचा बेत होता. मेजवानीचे वेळीं युवराजाची भूमिका आपल्या हातून कशी काय वठते याबद्दल तानूला अत्यंत काळजी वाटूं लागली होती. परंतु राजकन्या पद्मावती व इंदिरा या आपल्या बरोबर येणार आहेत हें समजतांच तानूचा जीव अमंळ खालीं पडला. कारण मेजवानीस येणाऱ्या सर्व जनसमूहांत एवढयाच काय त्या त्याच्या परिचयाच्या होत्या. राजकन्या व युवराज यांचा हा जो वर संवाद दिला त्या संवादाचें वेळीं तानूच्या संरक्षकांना त्याला

सांवरून धरण्यासाठीं बरीच तसदी घ्यावी लागली. एखाद्या अरुंद सामुद्र-धुनींतून एखादें प्रचंड जहाज हाकून नेणाऱ्या नाविकाप्रमाणेंच त्यांची स्थिति झाली. राजकुमाराच्या वेडाचें प्रच्छादन करणें हें काम कांहीं लहान-सहान नव्हतें. युवराजांच्या या नवीन विकृतीची ज्यांना खबर पोहोंचली नाहीं, अशा माणसांशीं त्यांची भेट जितकी टाळतां येईल तितकें बरें असेंहि त्यास वाटूं लागलें. वरील संवादाची समाप्ति होतांच सरदार विक्रमशील आल्याची बातमी खिसमतगारानें दिली. आतां सर्व तालीम पुन्हां करावी लागणार अशी धास्ती पडल्यामुळें 'युवराजांना भेट घेण्याची सवड नाहीं' असा या सरदारद्वयानें खिसमतगाराकरवीं सरदार विक्रमशील यांस निरोप कळविला. सरदार विक्रमशीलाची अशारीतीनें पाठवणी केलेली पाहून राजकन्या इंदिरा हिला फारच आश्चर्य वाटलेंसें दिसलें.

कांहीं वेळ सर्वजण स्तब्ध राहिले. तानू सरदार हरिताक्षांकडे पाहूं लागला. त्यांनीं त्याला कांहीं संकेत केला, परंतु तो त्याच्या ध्यानांत येईना. राजकन्या पद्मावतीच्या चाणाक्ष डोळ्यांनीं हा संकेत तेव्हांच ताडला. ती लगेंच राजकुमारास ह्मणाली—

"आतां आह्मी युवराजांचा निरोप घ्यावा काय?"

तानू ह्मणाला—

"आपण तोंडांतून शब्द काढण्याचा अवकाश कीं आपली हवी ती इच्छा पुरवीन. तरी पण आपल्याला हा निरोप मला कष्टानें द्यावा लागत आहे." राजपुत्रास साजेसें आपण हें उत्तर दिलें असें वाटून तानूस अंतर्यामीं फारच आनंद झाला. तो आपल्या मनाशीं ह्मणाला—

"आजपर्यंत राजांच्या व युवराजांच्या गोष्टी वाचल्याचें आज चीज झालें. त्या ग्रंथांच्या अवलोकनानें दरबारी भाषेचें जें मला शिक्षण मिळालें तें आज सत्कारणी लागलें."

राजकन्या गेल्यानंतर तानू श्रांतमुद्रेनें आपल्या रक्षकांकडे वळून म्हणाला—

'एखाद्या नित्रस्त जागेंत घटकाभर निवांत बसावेंसें मला वाटत आहे. तेव्हां आपणहि विश्रांति घेण्यास जावें.'

सरदार हरिताक्ष ह्मणाले—

' जशी युवराजांची इच्छा. युवराजांनीं हूकूम करावयाचा व तो आह्मी शिरसावंद्य मानावयाचा. आपल्याला आतां विश्रांति घेणें फार अवश्य आहे, कारण आज आपल्याला शहरांत जावयाचें आहे. '

इतक्यांत एक कामगार येऊन त्यानें तानूस आंतील दिवाणखान्यांत नेलें. आंत जातांच तानूनें पाण्यानें भरलेला एक पेला हातांत घेतला. जवळ एक सेवक उभा होता. त्यानें गडबडीनें येऊन तानूच्या हातचा पेला घेतला व तो मोठ्या अदबीनें त्याच्यापुढें केला. यानंतर आपलें शिरस्त्राण खालीं काढण्यास तानू आपल्या डोक्याजवळ जों हात नेतो तोंच दुसऱ्या एका सेवकानें हळूंच हात लावून तें खालीं काढलें. आपल्याला कोणीच कांहीं करूं देत नाहीं हें पाहून तानू अगदीं गांगरून गेला. आपलें काम स्वतःच करण्याबद्दल त्यानें आणखी दोनदां तीनदां प्रयत्न केला. परंतु सेवकांनीं त्याचें कांहीं चालूं दिलें नाहीं. शेवटीं तो अगदीं विव्हल होऊन ह्मणाला—

' माझ्यासाठीं श्वासोच्छ्वास करण्याचें काम हे करीत नाहींत; हें एक मोठें भाग्यच समजावयाचें. '

सेवकांनीं त्याच्या अंगावर लांबलचक एक रेशमी झगा घातला व तानू निद्रा घेण्याकरितां शय्येवर पडला. ढेकूण, पिसा, चिलटें वगैरे त्याचे जन्माचे सहचर त्याचे सेवेस नसल्यामुळें ह्मणा किंवा त्याच्या डोक्यांत अनेक विचारांचें काहूर उडून गेलें ह्मणून ह्मणा त्यास झोंप कशी ती येईना.

तानू निघून गेल्यानंतर दिवाणखान्यांत त्याचे संरक्षक सरदार दोघेच राहिले. सरदार हेमकंठ ह्मणाले—

' तुमचें या संबंधांत खरोखरच काय मत झालें आहे. '

' खरेंच ह्मणाल, तर मला असें वाटतें कीं महाराजांचा निधनकाळ आतां समीप येत चालला आहे. आमचे भाचे तर माणसांतून उठल्यासारखेच झाले आहेत. त्याच स्थितींत ते सिंहासनावर आरूढ होणार. अशावेळीं आमच्या या शुभधाम देशाचें रक्षण करणार ईश्वरच आहे, दुसरें काय ? '

' खरोखरच मलाहि असें वाटतें. काय हो पण तुह्माला असें नाहीं कां वाटत कीं— '

येथें हेमकंठ जरासें अडखळले व कायमचेंच थांबले. याच्यापुढें स्पष्ट

बोलण्याची त्यांना पंचाईतच पडली. सरदार हरिताक्ष हे त्यांच्याकडे निरखून म्हणाले—

' आपण खुशाल बोला-येथें तिसरें कोणी नाहीं.'

' माझ्या मनांत काय आहे तें स्पष्ट सांगण्यास मला खरोखरच संकोच होत आहे. तरीपण मी सांगतोंच. आपण युवराजांचे अगदीं जवळचे आप्त आहां. युवराजासंबंधानें मी आपणांशीं जें स्पष्टपणें बोलत आहे त्याबद्दल आपणांस राग मात्र येऊं देऊं नका. युवराजांना जे वेड लागलें आहे त्यानें त्यांची नेहमींची बोलण्याचालण्याची वृत्तिहि पार बदलून जावी व त्यांना आपल्या पित्याची सुद्धां ओळख राहूं नये हें आश्चर्यकारक नव्हे काय ? परिचारकांशीं व सेवकांशीं कसें वागावयाचें हेंहि त्यांच्या डोक्यांतून पार निघून जावें, अरबी भाषेचें त्यांना स्मरण रहावें व उर्दूचें निखालस विस्मरण व्हावें हें चमत्कारिक नव्हें काय ? हरिताक्ष, आपल्याला राग येऊं देऊं नका; पण '.मी युवराज नाहीं' असें जें ते ह्मणत आहेत त्यांत कांहीं तरी अर्थ असावा असें तुह्मांस वाटत नाहीं काय ?'

' यापुढें आतां एक अक्षरहि बोलूं नका, कारण आपण हे राजद्रोही शब्द उच्चारीत आहा. राजाचा हुकूम आपण विसरलांत काय ? मी जर आपलें ह्मणणें निमूटपणें ऐकून घेईन तर मीहि गुन्हेगार होईन हेंहि आपण पक्कें लक्षांत ठेवा.'

सरदार हेमकंठ यांचा चेहरा खाडकन् उतरला व ते त्वरेनें ह्मणाले—

" खरोखर माझी ती चूक झाली. मी ती कबूल करितों. आपण हें कोठें बाहेर बोलूं नका. एवढी माझ्यावर कृपा करा, पुन्हां तोंडावाटें याचा उच्चारच काय पण मनांत विचार सुद्धां येऊं देणार नाहीं. आपण जर माझ्यावर कठोर दृष्टि केली तर माझा नाशच होईल.

" ठीक आहे. माझें समाधान झालें. तुह्मी याचा पुन्हां मात्र उच्चार करूं नका. शिवाय याबद्दल तुमच्या मनांत संशय येण्याचेंहि मला कांहीं कारण दिसत नाहीं. तो माझ्या बहिणीचा मुलगा आहे. त्याचा आवाज, त्याचा चेहरा, त्याचा आकार हीं सर्वच त्याच्या बाल्यावस्थेपासूनच माझ्या परिचयाचीं नाहींत काय ? त्याच्या वर्तनांत आपल्याला ज्या चमत्कारिक गोष्टी दिसतात त्या वेडामुळें स्वाभाविकच होणाऱ्या आहेत. वेडयास प्रसंग-

वशात् आपल्या चेहऱ्याचीहि ओळख नाहींशी होते. आपलें डोकें कांचेचें केलेलें आहे अशीहि कांहीं वेडयांची भावना होऊन ते फुटेल या भीतीनें त्यास ते कोणासहि हात लावून देत नाहींत. असेहि प्रकार माझ्या वाचण्यांत आले आहेत. हा राजकुमारच आहे. मला पक्कें माहीत आहे. तो आतां लौकरच राजा होईल. तुह्मी भलतेसलते कुतर्क कधींहि काढीत बसूं नका. "

'माझा सर्व गैरसमज दूर झाला; माझ्या सर्व संशयाची निवृत्ति झाली' असें सरदार हेमकंठ यांनीं हजारों शपथा आणा वाहून सांगितल्यानंतर हरिताक्षांनीं त्यांना निरोप दिला. ते एकटेच विचार करीत व मनाशीं कांहींतरी पुटपुटत इकडे तिकडे हिंडूं लागले.

"छे त कांहीं नाहीं, तो युवराजच असला पाहिजे. सख्खे भाऊ नसून दोन व्यक्तींत इतकें रूपसादृश्य संभवनीय आहे काय ? यदाकदाचित् असेल असें जरी गृहीत धरलें तरी राजवाडयांत दुसऱ्याला प्रवेश कसा मिळेल. छे, ती गोष्टच बोलावयास नको. "

अंमळ विचार करून ते ह्मणाले--

"हा तोतया युवराज जर असतां तर 'मी युवराज आहे' असें त्यानें स्वतःच प्रतिपादन करणें अधिक स्वाभाविक आहे परंतु राजा व दरबारचे सर्व लोक 'हे युवराज, युवराज,' ह्मणत असतां 'मी युवराज नाहीं, मी एका कंगाल मनुष्याचा मुलगा आहे' असें उलटें भांडण कोणीहि तोतया युवराज भांडेल काय ? छे, हाच खरा युवराज आहे ! परंतु त्याला वेड मात्र लागलें आहे एवढेंच. "

प्रकरण ७ वें.

तानूस पहिली मेजवानी.

दुपारीं बारा बाजतां सेवकजन तानूभोंवतीं उभे राहून त्यास पोषाख करूं लागले. तो एखाद्या निर्जीव व निरुपाधी वस्तूप्रमाणें स्वस्थ उभा राहून सेवकजन जे उपचार करतील ते निमुटपणें करून घेऊं लागला. नेपथ्यविधी झाल्यानंतर त्यास एका जवळच्या दिवाणखान्यांत नेण्यांत आलें. षड्रसयुक्त भोजन सुवर्णपात्रांत तयार होतें. त्याचे भोंवतीं कित्येक सरदार लोक सेवेकरितां उभे होते. पाटावर जातांच जेवावयास आरंभ केव्हां करीन असें तानूस होऊन गेलें. कारण भुकेची त्याला कधीं तक्रार नसे. त्याचा जठराग्नि केव्हांहि झालें तरी प्रदीप्त असे. तो जेवावयास प्रारंभ करणार तों एका सरदारानें मागें उभे राहून त्याच्या हनुवटीखालीं एक सुंदर रुमाल धरला. जेवतांना युवराजांच्या अंगावर खरकटें वगैरे पडूं नये याच उद्देशानें हा रुमाल धरण्याची पद्धत असे. भोजनाचे वेळीं अशा रीतीनें हा रुमाल धरण्याचें काम मोठें मानाचें समजलें जात असें. हें काम एका सरदाराच्या घराण्यांत वंशपरंपरा असून त्याबद्दल त्यांना जहागिरहि तोडून देण्यांत आली होती. अन्नांत विषप्रयोग वगैरे केल्याचा संशय आल्यास तें चाखून बघण्याचें कामींहि एक स्वतंत्र सरदार नियुक्त केलेलें असत. या सरदारास राजासाठीं प्रसंगवशात प्राणासहि मुकण्याची पाळी यावयाची ! हा काळ पूर्वीप्रमाणें धामधुमीचा नसल्यामुळें आतां ही नौकरी केवळ औपचारिक झाली होती. तिच्यांत मोठासा धोका राहिला नव्हता. विषप्रयोगाचीच परीक्षा पहावयाची तर त्याकामीं मनुष्य-प्राण्याची योजना करण्याऐवजीं एखाद्या कुत्र्याची योजना करणेंच अधिक श्रेयस्कर झालें असतें ! परंतु राजांच्या गोष्टी सर्वच विलक्षण असतात. ह्याशिवाय मुदपाकावरील अधिकारी, रथखान्यावरील कामगार व कोठी वरील अधिकारी हेहि तेथें हजर होते. कित्येक किरकोळ सेवकही तेथें हजर होते. तानूच्या तैनातीस एकंदर ३८४ सेवक होते. ही गोष्ट अद्याप त्यालाहि माहीत नव्हती !

युवराजानें आपल्या स्मृतीची कांहीं दिवस रजा घेतली आहे ही गोष्ट नोकरचाकरांना आगाऊच कळविण्यांत आली असून युवराजांपुढें कसें वागावयाचें याचीहि त्यांना सप्रयोग तालीम देऊन ठेवली होती. युवराजाचे हातून जर कांहीं चमत्कारिक गोष्ट झाली, तर त्याबद्दल त्यांनीं आश्चर्य किंवा हास्य आपल्या मुखावर यत्किंचितही दाखवूं नये. युवराजांच्या आपत्ती-बद्दल आपल्याला परमावधीचें दुःख झालं आहे असेंच प्रदर्शन त्यांनीं आपल्या चेहऱ्यावर मांडलें पाहिजे, अशी त्यांना सक्त ताकीद होती.

गरीब बिचाऱ्या तानूनें भोजनाचे वेळीं युवराजांस न साजेसे हवे ते वेडेचार केले तरी सेवकांपैकीं कोणीहि आपले दांत दिसूं दिले नाहींत. उत्कृष्ट नकशी काढलेल्या रेशमी रुमालाकडे मोठ्या कौतुकानें पाहून तानू जवळच्या सेवकांना ह्मणाला—

' माझी तुह्मांला एवढी हात जोडून विनंति आहे कीं हा रुमाल बाजूला उचलून ठेवा, नाहींतर माझ्या हातून तो चुकून घाण होईल. '

हें ऐकतांच एका सेवकानें पुढें येऊन व लवून मुजरा करून एक चकार शब्दहि न काढतां तो रुमाल बाजूस उचलून ठेविला.

भोजनोत्तर मुखशुद्धिकरितां सुवर्णपात्रांतून अनेकप्रकारचीं फळें ठेवलेलीं होतीं. अननस, सफरचंद वगैरे तानूच्या मुळींच ओळखीचीं नसलेलीं फळेंही त्यांत कित्येक होतीं. ह्याकडे पाहून ' हे खाण्याचेच पदार्थ आहेत काय ? ' असें तो आपल्या सेवकांना साशंक व आश्चर्यचकित मुद्रेनें विचारूं लागला. त्याबरोबर सर्वांनीं ' होय सरकार ' ह्मणून उत्तर दिलें. फलाहार झाल्यानंतर त्यानें तेथील कांहीं आक्रोड घेऊन आपल्या खिशांत भरले. हें त्याचें कृत्य बहुतेक सर्वांनीं पाहिलें होतें, परंतु आपलें त्याकडे बिलकुल लक्ष नव्हतें अशीच सर्वांनीं बतावणी केली. आपली येथें मोठी जबाबदारी ह्मटली ह्मणजे कोणतेंहि काम आपल्या हातानें करावयाचें नाहीं हीं होय, अशी तानूची पक्की खात्री झाल्यामुळें, आपण आपल्या हातानें उचलून आक्रोड खिशांत घातले हा आपल्या हातून एक मोठा गुन्हा झाला असें वाटून तो इकडे तिकडे चोरासारखा पाहूं लागला. इतक्यांत त्याचें नाकांत वळवळूं लागून त्याचा नाकाचा शेंडा स्वभावतःच खालीं वर होऊं लागला ! नासिकास्थानची ही

उपाधि कांहीं केल्या थांबेना. तो केविलवाण्या मुद्रेनें इकडे तिकडे पाहूं लागला. त्याच्या डोळ्यांतून अश्रूहि वाहूं लागले. त्याबरोबर दहापांच सेवकांनीं गर्दीनें धावत पुढें येऊन ' काय पाहिजे, सरकार ' ह्मणून त्यास मोठ्या अदबीनें विचारलें. तानू मोठ्या दुःखानें ह्मणाला—

' मी सांगतों याची माफी करा, माझ्या नाकांत विलक्षण खाज सुटली आहे. अशा वेळेस काय करण्याची येथें पद्धत व वहिवाट आहे हें मला कृपा करून होईल तितक्या लवकर सांगा. कारण मला अनावर दुःख होत आहे.

शाबास त्या सेवकांची ! त्यांच्या इंद्रियदमनाची जितकी तारीफ करावी तितकी थोडीच आहे. युवराजांच्या या भाषणानें कोणी यत्किंचितहि हंसले नाहीं. सर्वजण गोंधळून जाऊन टक लावून एकमेकांकडे पाहूं लागले. मोठमोठ्या जुन्यापुराण्या नोकरांना सुद्धां यासंबंधाची वहिवाट सांगतां येईना ! मामूलवहिवाटीचा शास्त्रार्थ सांगणारे अधिकारीही यावेळीं हजर नव्हते. आपली मनःकल्पित तोड सांगण्यास कोणाचीहि छाती होईना. न जाणो, आपण आपल्या अकलेनें एखादी तोड सुचविली आणि ती वहिवाटीस अनुसरून नसली तर आपण व्यर्थ गुन्ह्यांत सापडूं, अशी प्रत्येकास धास्ती वाटूं लागली. इकडे तानूचें नाक अधिकच वळवळूं लागलें ! शेवटीं पात्रापात्रतेचा विचार बाजूस ठेवून त्यानें आपलें नाक स्वतःच खाजविलें व सेवकांची चिंता दूर केली.

भोजनोत्तर एक बडे अधिकारी गुलाबपाण्याचें एक सुवर्णपात्र तानूच्या पुढें करून उभे राहिले. त्याच्या जवळच दुसरे एक अधिकारी एक पांढरा सफेत रुमाल आपल्या हातांत तयार ठेवून उभे राहिले होते. या दोघांनाहि उद्देशून तानू ह्मणाला —

' सद्गृहस्थहो याचा वास चांगला आहे पण तो माझ्या नाकाला सहन होत नाहीं. '

युवराजांचा हा नवीनच चाळा पाहून सर्वांना अत्यंत वाईट वाटलें. परंतु त्या योगानें कोणासहि हसूं आलें नाहीं.

शेवटीं सेवकांनीं तानूस एका निवस्त्र दिवाणखान्यांत नेऊन पोहोंचविलें. त्याचे हुकुमावरून सर्व नोकरचाकर तेथून निघून गेले व तो

तेथें एकटाच राहिला. सुवर्णाची वेलबुट्टी काढलेले तेथें एक सुंदर पोलादी चिलखत ठेविलें होतें. त्याकडे तानू निरखून पाहूं लागला. तें अंगांत घालावें अशी त्याला इच्छा झाली. पण कांहीं केल्या त्याला तें साधेना. शेवटीं कोणास हाक मारून तें आपल्या अंगांत घालावें असा त्याच्या मनांत विचार आला, परंतु इतक्यांत त्याला खिशांत ठेवलेल्या आक्रोडाची आठवण झाली. आक्रोड खाण्यास आपल्याला पुन्हां असा निवांत वेळ मिळणें मुष्किलीचें आहे असा विचार करून ताबडतोब तो त्या कामास लागला. दुर्दैवानें युवराज होण्याची पाळी त्याच्यावर आल्यापासून त्याला इतका आराम कधींहि झाला नव्हता. त्याची इच्छा नसतांहि त्याचेपुढें लुडबुड करून त्याची सेवा करण्याची तत्परता दाखविणाऱ्या त्रासदायक सेवकांपैकीं तेथें कोणीहि नव्हता. मनसोक्त आक्रोड खाणें झाल्यानंतर तो पुन्हां कपाटें धुंडाळूं लागला. तों 'दरबारच्या चालीरीति' या नांवाचें एक पुस्तक त्याच्या हातीं आलें. आपल्याला हा एक मोठा अलभ्यलाभच झाला असें वाटून त्यानें अत्यंत हर्षानें तें पुस्तक उघडलें. त्याला वाचावयाला तसाच तथें निवांत सोडून आपण दुसरीकडे काय चाललें आहे हें पाहूं.

प्रकरण ८ वें.

शिक्का मोरतब काय झालें.

विजयध्वज महाराज सकाळीं पांच वाजतां जागे होऊन आपल्याशींच ह्मणतात—

'काय भयंकर स्वप्न हीं ! हें चिन्ह कांहीं मला ठीक दिसत नाहीं. माझा मरणकाल समीप आला असें मला वाटतें. माझ्या नाड्याहि आखडत आल्या. तरी पण त्याला परलोकीं रवाना केल्याखेरीज मी मरणार नाहीं.'

महाराज जागे झालें असें पाहतांच सेवकांनीं त्यांना फडणीस आल्याची वर्दी दिली. महाराज मोठ्या उत्सुकतेनें ह्मणाले—

"जा, त्यांना लवकर आंत घेऊन या" फडणीस आंत येऊन महाराजांच्या बिछान्यावर बसले व ह्मणाले—

' महाराजांच्या हुकुमाप्रमाणें मी सर्व तजवीज केली आहे. धीरसिंह यांची परलोकीं पाठवणी करण्याबद्दल प्रधानांची मंजुरी मिळविली आहे. ' हें ऐकतांच महाराज आनंदानें ह्मणाले–

' असें काय ? ही सुवार्ता ऐकून मला कितीतरी आनंद झाला आहे ! या वारंटावर मी आपल्या हातानें सील करणार. प्रधानसमितीच्या दिवाणखान्यांत मला घेऊन चला. '

त्यांचा आवाज अगदीं खोल गेला, त्यांचा चेहरा अगदीं फिकट आणि निस्तेज दिसूं लागला. सेवकानें त्यांना कांहीं उत्तेजक औषधि देऊन पुन्हां बिछान्यावर निजविलें. इतक्यांत महाराज दुःखानें ह्मणाले—

" हा आल्हादकारक काळ यावा ह्मणून मी कित्येक दिवसांपासून एक सारखी इच्छा करीत होतों. ती सोन्याची वेळ आज आली आहे. हुकुमावर सील स्वतः करावें अशी माझी फार इच्छा होती. परंतु तो योग कांहीं आतां येत नाहीं. असो. उठा त्वरा करा आणि सूर्योदयापूर्वी त्याचें मस्तक मला आणून दाखवा. "

" जशी महाराजांची आज्ञा. हें कार्य त्वरेनें उरकावें ह्मणून सील माझ्या स्वाधीन करण्याचा हुकूम महाराजांनीं द्यावा. '

' काय सील ! तें तर तुमच्या पाशींच असतें. '

' होय ! महाराज. पण तें आपण दोनदिवसांपूर्वी घेतलें होतें. धीरसिं-हांच्या वारंटावर त्याची मुद्रा केल्याशिवाय त्याकडून दुसरें कोणतेंहि काम करून घ्यावयाचें नाहीं असा महाराजांचा निश्चय झाला होता. '

' होय. असें केल्याचें मला आठवतें. अलीकडे माझी स्मृति फार दुर्बल झाली आहे. माझें दुखणें कोणत्या थरावर जातें याचा मला भरंवसा लागत नाहीं. '

यानंतर महाराज तोंडातल्यातोंडांत कायसेंसें पुटपुटले व आपण सील कोठें ठेविलें याबद्दल डोकें खाजवीत विचार करूं लागले. शेवटीं हरिताक्ष अदबीनें ह्मणाले—

" आपण तें सील त्यादिवशीं युवराजांच्या स्वाधीन केल्याचें मला आठवत आहे. "

महाराज ह्मणाले—

" अगदीं बरोबर आहे. जा, तें घेऊन या. "
याबरोबर हरितांक्षानीं तानूकडे धांव घेतली, परंतु, निराशेनें तें हात हालवीतच परत आले व ह्मणाले—

" महाराज ही अशुभवार्ता आपणांस निवेदन करण्यास मला परमावधीचें दुःख होत आहे. सीलबद्दल युवराजांना कांहींच स्मरण होत नाहीं. तेव्हां व्यर्थ कालक्षेप करणें चांगलें नाहीं. असें वाटून मी परत फिरलों. युवराजाच्या दिवाणखान्यांत सील हुडकण्यास कोणातरी सेवकांना आज्ञा व्हावी. "

महाराज दुःखित मुद्रेनें ह्मणाले—" आपण ठीक केलें त्या बिचाऱ्याला व्यर्थ त्रास होऊं देऊं नका. तो सध्यां पापग्रहाच्या फेऱ्यांत सांपडलेला आहे; खरोखरच त्याच्या शोचनीय अवस्थेकडे पाहिलें ह्मणजे माझा जीव सुद्धां मला नकोसा होतो. "

महाराज डोळे मिटून हुश्श करीत स्वस्थ पडले. कांहीं वेळानें पुन्हां डोळे उघडून हरिताक्षाकडे निश्चल दृष्टीनें पहात क्रोधयुक्त मुद्रेनें ते ह्मणाले—

' काय ! अद्याप तुह्मी येथेंच ? त्या बेइमान बदमाषाचा मस्तकच्छेद करण्याच्या कार्यास आपण अद्याप लागला नाहां काय ? आपल्या अधिकाराचा आपल्याला कंटाळा आलेंसें दिसतें. ठीक आहे. त्यांतून आपली लवकरच मुक्तता करतों. '

सरदार हरिताक्ष कांपत कांपत ह्मणाले— " मजवर असा क्रोध होऊं नये. मी सील हातीं येण्याची वाट पहात होतों. "

' तुमची अक्कल नाहींशीं झाली काय ? माझ्या जवळ दुसरें एक धाकटें सील आहे तें तुह्मास माहीत नाहीं काय ? थोरलें सील सांपडत नाहीं. तेव्हां त्याच्यावरच कार्यभाग करून घेण्यास नको काय ? चला, येथून आतांच्या आतां चालते व्हा, व सांगितलेलें काम केल्याशिवाय येथें येऊन पुन्हां आपलें तोंड मला दाखवूं नका. '

महाराजांच्या क्रोधाचा पारा बराच वर चढला आहे असें पाहतांच हरिताक्षानीं मागच्या पायानेंच तेथून पळ काढला ! माहाराजांच्या हुकुमाप्रमाणें अष्टप्रधानांची या कार्यास नामधारी मंजुरी ताबडतोब घेऊन धीरसिंहास परलोकीं पाठविण्याची वेळ मुक्रर करण्यांत आली.

———

प्रकरण ९ वें.

नदी किनाऱ्यावरील अपूर्व उत्सव.

रात्रीं नऊ वाजतां राजवाडयाच्या बाजूचा नदी किनारा दिव्यांच्या लखलखाटानें अत्यंत तेजःपूंज दिसत होता. नदीमध्यें शेंकडों होडया तरंगत होत्या. त्यांच्या दोहोंबाजूस चित्रविचित्र रंगांचे फाणस लावले होते. वसंतवायूंच्या योगानें होडयांना आंदोलन मिळून हे दीपक हलूं लागत, तेव्हां नदीचा देखावा फारच अपूर्व दिसे. नदीकिनाऱ्यावरच्या सोपानपरंपरेवर सुंदर व एकरंगी पोषाख करून सेवकजन चित्राप्रमाणें उभे राहिले होते. जो तो आपापलें काम समाधानकारक रीतीनें पार पाडण्यास कायावाचामनें करून झटत असलेला दिसत असे.

सरकारी होडयावर अत्यंत सुशोभित अशीं निशाणें फडकत होतीं. रेशीम, मखमल, भरजरी, किनखाब अशा अनेकप्रकारचीं हीं निशाणें असून त्यांच्या टोंकास रुप्याचीं घुंगरें लाविलीं होतीं. वाऱ्याच्या झुळकींनीं या निशाणांस संचालन मिळून या घुंगरांचा कर्णमधुर ध्वनि वारंवार कानावर येत असे. सरदार लोक आपापल्या हुद्यांच्या चिन्हांसह उभे असलेले दिसत होते. कांहीं होडयांतून गायनवादनपटु लोक आपापल्या कलेंत अपूर्वकरामत दाखविण्याची शिकस्त करीत होते. मिरवणुकीच्या आघाडीस नगरखाना होता. त्याच्या मागोमाग राजाचे मानकरी होते, व त्याच्या मागून राजकुमार प्रमुख सरदारांसह मंदमंद गतीनें येत होते. त्यांच्या येण्याच्या वाटेवर मखमलीचा रुजामा पसरलेला होता. नगरखाना सुरू झाला, इतक्यांत सुवर्णदंड घेतलेले दोन प्रतीहारी आले, त्यांच्या मागोमाग नगरशेट येत होते. सरदार, दरकदार, न्यायाधीश, फौजकामगार इत्यादि मोठमोठे लोक मागून येत असलेले दिसले. यांच्या मागून परदेशचेहि अनेक वकील चालत होते. या जमावाच्या डाव्या उजव्या बाजूस सुस्वर वाद्यांचा ध्वनि दुमदुमून राहिला होता. या सर्वांच्या मागून हरिताक्ष मामांची स्वारी मोठ्या थाटानें येत होती. त्यांच्या मागून खुद्द राजकुमार येत होते. राजकुमार आल्याची वर्दी जनसमूहास मिळतांच जयशद्बांनीं दशदिशा भरून गेल्या. या सर्वांची रंग-

देवता तानू हा आपल्या मानेस किंचित् हेलकावा देऊन लक्षावधि लोकांचे मुजरे घेत होता. त्यानें भरगच्चीचा पोषाख केलेला होता. त्यास हिरे व मोतीं हीं लावलीं होतीं. त्याच्या अंगावरहि हिऱ्यामाणकांचे अत्यंत मौल्यवान असे दागिने होते. एका भिकार झोपडींत जन्मास आलेल्या तानूचें आज केवढें कौतुक चाललें होतें !

प्रकरण १० वें

राजकुमार पेचांत सांपडला.

जानू कामाठी आपल्या घराजवळ राजकुमारास धरून ओढीत आ व तो तमाशा पहाण्यास त्याच्या भोंवतीं माणसांची गर्दी जमलेली आहे. अशा स्थितींत आपण त्याला सोडलें. त्या सर्व जनसमूहांत एकच मनुष्य कायतो राजकुमाराच्या वतीनें बोलत होता, पण जानू त्याच्याकडे ढुंकूनसुद्धां पाहीना ! राजकुमारही आपली सुटका करून घेण्यासाठीं हवी तितकी धडपड करीत होता. तरी पण त्याचें कांहीं चालेना. शेवटीं जानूची पशुवृत्ति जागृत होऊन त्यानें आपल्या हातांतील काठी राजकुमाराच्या मस्तकावर उगारली. राजकुमाराच्या वतीनें जो मनुष्य आतांपर्यंत विनवणी करीत होता, तो पुढें आला व कुमारास सोडविण्याकरितां मध्यें पडला. त्याबरोबर जानू ह्मणाला–

“ मध्यें तोंड घालतोस कां ? हें घे त्याबद्दल बक्षिस. ”

असें ह्मणून त्यानें त्या मनुष्याच्या डोक्यावर काठीचा जोरानें तडाका दिला. त्याबरोबर तो मनुष्य जमीनदोस्त झाला. त्या बिचाऱ्याकडे कोणीही लक्ष दिलें नाहीं. राजकुमारास गचांडया देऊन त्यास जानूनें आपल्या घरांत नेलें. व आंतून कडी लावून घेतली. घरांत एक दिवा मिणमिण जळत होता. त्याच्या प्रकाशानें त्या घराचा व त्या घरांतील माणसांचा थाट त्याच्या दृष्टीस पडला. जानू आपल्या आईस ह्मणाला—

‘ गडबड करूं नकोस. आज एक अजब तमाशा मी येथें आणला आहे. त्याचा विरस करूं नकोस. आह्मी धरून आणिलेल्या या गृहस्थांची

कणीक मऊ करण्यास हात तयार ठेव. या, असें पुढें या. आपला मघाचा तमाशा पुन्हा करा. आपण कोण आहा, आपलें नांव काय ?'

हे ऐकतांच क्रोधानें लाल होऊन राजकुमार ह्मणाला—

'तुझ्यासारख्या भिकारड्यानें मला हुकूम करणें हें उर्मटपणाचें आहे. पूर्वीप्रमाणेंच तुला मी पुन्हां सांगतों मी सुशीलकुमार राजपुत्र आहें; दुसरा कोणीहि नाहीं.'

हें उत्तर ऐकतांच म्हातारी जागच्याजागींच स्तंभित झाली. ती राजकुमाराकडे आश्चर्ययुक्त मुद्रेनें टक लावून पाहूं लागली. यामुळें जानूस फारच मौज वाटून तो खदखदा हसूं लागला. परंतु तानूची आई व बहिणी यांचेवर याचा निराळाच परिणाम झाला. तानूला खास वेड लागलें, त्याचें डोकें बिघडलें असें वाटून त्याच्याकडे केविलवाण्या मुद्रेनें पाहूं लागल्या. प्रेमानें त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याची आई ह्मणाली–

"वेड्या मुला, भलतीं सलतीं पुस्तकें वाचूनच तुझा मेंदु बिघडून गेला आहे. तरी मी तुला पहिल्यापासून बजावीत होतेच. हा तूं माझ्या गळ्याला एक मोठा फासच घातलास."

राजकुमार तिच्याकडे पाहून हळूंच ह्मणाला—

"बाई, तुझा मुलगा सुखरूप आहे, त्यास वेड वगैरे कांहीं लागलें नाहीं. तूं निर्धास्त ऐस. तो राजवाड्यांत आहे, तेथें मला जाऊं दे, ह्मणजे त्याची ताबडतोब सुटका होऊन तो तुझ्या भेटीला येईल. आमचे वडील विजयध्वज महाराज हे फार दयाळू आहेत."

'काय, या देशचा राजा तुझा बाप ! अरेरे ! असें भलतें बोलूं नकोस. हें तुझें बोलणें कोणी ऐकिलें तर आपली काय अवस्था होईल. आपलें हें स्वप्न सोडून दे. आपल्या पूर्वीच्या स्थितीची नीट आठवण कर, आणि माझ्याकडे पहा. तुला जन्म देणारी व तुझ्यावर ममता करणारी मी तुझी आई नव्हे काय !'

सुशीलकुमार मान हलवून मोठ्या कष्टानें ह्मणाला—

'तुझ्या दुःखास मी कारण व्हावें अशी माझी खरोखर इच्छा नाहीं. तरी पण मी तुला खचित सांगतों कीं यापूर्वी मी तुझा चेहरा कधींहि पाहिला नाहीं.'

याबरोबर ती बिचारी बाई मटकन् जमिनीवर बसली आणि आपल्या डोळ्यावर हात ठेवून ढळढळां रडूं लागली. जानू ह्मणाला—

" चालूं द्या तमाशा. कायग ए, पोरीनों. राजपुत्रा देखत तुह्मी अशा ताठ उभ्या काय राहिला ? त्यांना लवून मुजरा करा "

असें ह्मणून तो पुन्हां खदखदां हसूं लागला. हें ऐकून तानूच्या बहिणींना फारच वाईट वाटलें. एक बहीण ह्मणाली—

" बाबा, त्याला आतां स्वस्थ निजूंद्या. त्याला एकदां स्वस्थ झोंप लागली ह्मणजे त्याचें डोकें आपोआप ताळ्यावर येईल. "

दुसरी बहिण ह्मणाली— " खरेंच, बाबा. तो आज नेहमींपेक्षां थकलेला दिसत आहे. उद्यां तो झटून भिक्षा मागील व आजच्यासारखा हात हलवीत घरीं परत येणार नाहीं. आजच्या दिवस त्याला सोडा. "

जानू ओठ दाबून त्वेषानें ह्मणाला.

' आजच घरधन्यानें घरभाड्याची मागणी केली. त्याला काय तुमचें दांत पाडून द्यावयाचे ? '

राजकुमार ह्मणाला—

' असल्या भलत्याच गोष्टी माझ्या पुढें काढून माझा उपमर्द करूं नकोस. मीं पुन्हां एकवार सांगतों कीं मी राजाचा मुलगा आहें. '

ह्या बरोबर जानूनें त्याच्या खांद्यावर इतक्या जोरानें एक तडाका लगवला कीं तो कोलमडत जाऊन जानूच्या बायकोच्या अंगावर पडला. इकडे जानू एकसारखे गुद्दे लगावीतच होता. जानूच्या बायकोनें मध्यें पडून तो सर्व मार आपल्या अंगावरच सोसला. मुली भयभीत होऊन कोंपऱ्यांत जाऊन बसल्या. इतक्यांत ह्मातारी आपल्या मुलाच्या मदतीस आली. त्याबरोबर जानूच्या बायकोच्या हातांतून एकदम सुटून राजकुमार ह्मणाला—

" बाई तूं कां माझ्यासाठीं हाल सोसतेस ? या पशूंना मला जितकें मारावयाचें आहे तितकें मारूं दे. "

या भाषणानें जानू व त्याची आई यांना इतका त्वेष चढला कीं त्यांनीं या मुलावर लाथाबुक्यांची एकच गर्दी चालविली ! मुलाबद्दल दया दाखविल्याच्या गुन्ह्यामुळें त्या दोघांनीं तानूच्या आईस व बहिणींसहि चांगला खरपूस चोप दिला. शेवटीं जानूनें निजावयास जाण्यास सर्वांना हुकूम

केला. दिवा मालवतांच सर्वजण मुकाट्यानें आपापल्या जागीं जाऊन निजले. संसाराचे मुख्य कर्ते पुरुष घोरूं लागलेले पाहून तानूच्या बहिणी राजकुमाराजवळ गेल्या व त्यास प्रेमानें कुरवाळून त्यांनीं त्याच्या अंगावर पांघरूण घातलें. तानूच्या आईनें आपल्या पोटास चिमटा घेऊन भाकरीचा एक तुकडा जिवापलीकडे जपून ठेविला होता. तो घेऊन ती राजकुमाराकडे गेली, व ' बाळा, तुला फार भूक लागली आहे, तुझ्यासाठीं राखून ठेवलेला हा भाकरीचा तुकडा एवढा खा ' असें त्याच्या कानांत ह्मणाली. तानूला जी कांहीं थोडीबहुत भूक लागली होती ती माराच्या दुःखानें बहुधा नाहींशीं झाली होती. त्यांतून तो बुरसलेला भाकरीचा तुकडा तर त्याच्यानें कधींहि खाववला नसता. तरी त्या बाईच्या कनवाळूपणा-मुळें त्याचा कंठ गहिंवरून आला, ' आतां तूं स्वस्थ नीज, माझ्याबद्दल आज जो तूं कनवाळूपणा दाखविला आहेस, त्याबद्दल माझ्या बापाकडून तुला योग्य बक्षिस मिळाल्यावांचून कधींहि राहणार नाहीं. आपला मुलगा पुन्हां वेडयासारखा बरळूं लागला हें पाहून तिचें हृदय पुन्हां दुःखानें व्याप्त झालें. त्याला पोटाशीं कवटाळून धरून तिनें त्याचें चुंबन घेतलें व ती अश्रु पूर्ण नेत्रांनीं आपल्या बिछान्यावर निजावयास गेली.

तिला कांहीं केल्या झोंप येईना. तिच्या मनांत एकामागून एक अनेक विचारतरंग येऊं लागले. तानूपेक्षां या मुलांत कांहीं निराळे गुण दिसताहेत असें तिचें मन तिला सांगूं लागलें. हे निराळे गुण कोणते होते ह्याची जरी तिला निश्चित कल्पना आली नाहीं तरी हा आपला मुलगा नाहीं असें तिला वाटूं लागलें. ' हा जर माझा मुलगा नसेल, तर माझा मुलगा कोठें गेला असेल ? ' छे, तें कांहीं नाहीं. माझ्या मनांत ह्या कांहीं तरी भलत्याच कल्पना येतात !' अशी ती आपल्या मनाची समजूत करून घेण्याचा प्रयत्न करूं लागली. शेवटीं या मुलास कांहींतरी खुणेच्या गोष्टी दाखवून त्याची कसोटी पाहाण्याचा तिनें विचार ठरविला. ' हाच मार्ग उत्तम आहे ' अशी तिच्या मनाची खात्री झाली. विचार तर यथास्थित जमला, पण तो अमलांत कसा आणावयाचा ही तिच्यापुढें मोठींच अडचण येऊन पडली. त्याची कसोटी कोणत्या-

रीतीनें पहावी याबद्दल तिनें अनेक रीतींनीं विचार केला. पण तिच्या मनाचा कायमचा निकाल कांहींच होईना. आपल्याला कोणतीच चांगली तोड सुचेना हें पाहून तिचें मन निराश झालें. इतक्यांत त्या मुलाचा श्वासोच्छ्वास तिच्या कानीं आला. हा श्वासोच्छ्वास मध्यंतरी तुटक तुटक येत असून मुलाला कांहींतरी स्वप्न पडत आहे असें तिच्या ध्यानांत आलें. इतक्यांत तिला एक तोड सुचली. तिनें ताबडतोब मेणबत्ती लाविली. 'भुईनळयाच्या दारूनें त्याचें तोंड भाजलें, त्या दिवसापासून माझ्या मुलाला तेंच स्वप्न अनेक वेळां पडलेलें आहे. असें स्वप्न पडत असतां तो आपल्या डोळ्यावर हात ठेवीत असल्याचें अनेकवेळां माझ्या दृष्टीस पडलें आहे. हा हात तो पालथा न ठेवतां उताणा ठेवतो हीहि त्यांत एक खुणेची गोष्ट आहे.' असें ह्मणून ती मेणबत्ती घेऊन मुलाजवळ गेली. तिनें जमिनीवर हळूंच दोन टिचक्या वाजविल्या; त्याबरोबर त्या मुलानें डोळे उघडले; परंतु, त्यानें आपला हात यत्किंतुहि हालविला नाहीं.

त्या बिचाऱ्या बाईची निराशा झाली. परंतु, ती तिनें मुलाला दिसूं दिली नाहीं. मुलाच्या अंगावर हात फिरवून ती पुन्हां आपल्या बिछान्यावर गेली. 'डोकें फिरल्यामुळें कदाचित त्याची ही नेहमींची संवय गेली असेल.' असा विचार करून ती आपल्या मनास धीर देऊं लागली. परंतु,तिच्या मनाचें सांतवन होईना. 'छे, त्याचें डोकें फिरलेलें असलें तरी त्याचे हात कांहीं वेडे झालेले नाहींत. त्यांना ज्या गोष्टीचा सराव झाला आहे ती गोष्ट ते कधींहि विसरणार नाहींत.' असें ती आपल्याशीं ह्मणाली. तरी तिला अद्यापहि आशा वाटत होती. पुनः एकदा हा प्रयोग करून पहावा, ह्मणजे आपल्याला खास यश येईल असें वाटून तिनें पुनः दोनतीन वेळां त्याच्याजवळ मेणबत्ती नेली. तितक्या वेळां तो जागाही झाला; परंतु ओळखीचीं व खुणेचीं चिन्हें कांहींच दिसेनात. तव्हां मात्र ती अत्यंत खिन्न होऊन बिछान्यावर पडली. नानातऱ्हेचे विचार तिच्या मनांत एकामागून एक येऊं लागले. शेवटीं "छेः, तें कांहीं नव्हे; हा माझा मुलगाच असला पाहिजे. त्याच्याशीं निदान मी तर निष्ठुरपणानें कधींहि वागणार नाहीं." असें ह्मणून ती झोपीं गेली.

इकडे राजकुमाराचाही बऱ्याचवेळानें डोळा लागला. सुमारें चार पांच तास झाल्यानंतर तो अर्धवट जागा होऊन ह्मणाला—

' हरिताक्ष मामा ! मी काय बोलतों इकडे लक्ष्य आहे काय ? मला फार विलक्षण स्वप्न पडलें आहे. स्वप्नांत मी एका भिकाऱ्याचा मुलगा झालों. दारावर कोणी पहारेकरी नाहीं कां ? ध्यानांत ठेवा. तुह्मां सर्वांना पुढें हें फार जड जाईल. '

' बाळा, तुला काय होत आहे ? तूं कोणाला हाक मारीत आहेस ? '

' मी सरदार हरिताक्षास हाक मारीत आहे. तूं कोण आहेस ? '

' मी ! बाळा, मी तुझी बहिण आहे. अरे, खरेंच मी विसरलें; कालपासून तुला वेड लागलं आहे. तुझें हें बरळणें ऐकायला मी जागी तरी कशाला झालें ? बाबा, भलतें सलतें कांहीं बोलूं नकोस. नाहींतर पुनः सर्वांचेंच पाप ओढवेल. "

हें ऐकतांच राजकुमार बिछान्यावर दचकून उठून बसला. परंतु, त्याच्या अंगावर झालेल्या जखमांची त्याला आठवण होऊन तो पुनः बिछान्यावर पडला. जखमांना फारच ठणका लागला. तो तसाच कण्हत ह्मणाला—
" मग तर तें स्वप्न नव्हे. तें खरेंच आहे. "

निद्रेच्या योगानें त्याला आपल्या दुःखाची कांहीं काळ विस्मृति पडली होती. आतां तें दुःख द्विगुणित त्वेषानें त्याच्यावर झडप घालूं लागलें. आपण राजकुमार नसून आपण खरोखरच कंगाल स्थितींत येऊन पडलों आहों, आपण राजवाड्यांत नसून एका गुरांच्या गोठ्यांत आहों. राजवाड्यांत आपला हुकूम " जी सरकार " ह्मणून मानण्यास शेंकडों दासदासी सदैव तत्पर असत; परंतु येथें एका पशूच्या कह्यांत आपण सांपडलों असून तो सांगेल तसें निमुटपणें वागणें आपल्या नशीबीं आलें आहे. ही वस्तुस्थिति त्याच्या डोळ्यापुढें दत्त ह्मणून उभी राहिली.

राजकुमाराची इकडे अशी स्थिति झाली तों दारावर कोणी ठोठावत आहे असें त्यास ऐकूं आलें. इतक्यांत जानू कामाठी आपल्या गाढ निद्रेंतून जागा होऊन ह्मणाला—' दाराशीं धक्के कोण देत आहे ? '

' काल तूं कोणाला काठी मारलीस हें तुला ठाऊक आहे काय ? '

' नाहीं. मला ठाऊक नाहीं; व तें ठाऊक करून घेण्याचीहि मला परवा नाहीं. '

' अझून शुद्धीवर ये. असा उन्मातल्यासारखा करूं नकोस. ह्याचा

परिणाम फार जड जाईल. ज्यांच्या अंगावर तूं हात टाकलास ते धोंडीबा होत. एक वेळ ते महाराजांच्या अत्यंत कृपेंतले होते. हल्लींसुद्धां महाराजां-कडूनच त्यांना तनखा मिळत आहे. त्यांनीं जर ही गोष्ट महाराजांच्या कानावर घातली तर तुझा जीव सुद्धां वांचण्याचें कठिण आहे. समजलास!"

हें ऐकतांच जानूची तारंबळ उडून जाऊन तो आपल्या माणसांना उद्देशून ह्मणाला ' चला: लवकर उठा: आपल्या जिवाचा तुह्माला कंटाळा आला नसेल तर येथून ताबडतोब आपला पाय काढा. '

पुरतीं पांच मिनिटेंही गेलीं नसतील तों सर्व माणसें रस्त्यावर येऊन उभीं राहिलीं. जानूनें राजकुमारास उठवून दारापाशीं नेलें व ' गाढवा आपली जीभ वळवळूं देऊं नकोस. नाहींतर आह्मा सर्वांना खड्यांत घालशील. मी आपलें नांव आतां बदलणार आहे. खबरदार माझें खरें नांव कोणास कळवशील तर! भलतें सलतें बरळलास कीं जीभच कापून ठेवीन समजलास ? ' असे तो राजकुरास ह्मणाला.

' आपली कोणाची जर चुकामूक होईल तर सर्वांनीं पुलावर जमावयाचें हें लक्षांत ठेवा. पुलावर जो कोणी आधीं जाऊन पोहोंचेल त्यानें बाकीच्या सर्वांची वाट पहात तेथें उभें रहावें. '

असें त्यानें आपल्या कुटुंबांतील माणसास बजावून सांगितलें,

तेथून थोड्याच अंतरावर सहस्त्रावधि लोकांचा जमाव दीपोत्साह व नग-रशृंगार पहाण्यास जमला होता. त्या जमावांत हीं सर्व माणसें जाऊन मिळालीं व एकमेकांना दिसेनाशीं झालीं. नदीच्या दोन्ही थडीस लक्षावधि दिवे लावले होते. त्याचप्रमाणें नदीचे दोन्ही पूलहि उत्तमप्रकारें शृंगारले होते. या सर्वांचें प्रतिबिंब नदींत पडून जळीं काष्ठीं पाषाणीं सर्वत्र दीपकमय दिसत होतें. दारूकामाच्या प्रकाशानें व खडखडाटानें सर्व दिङ्मंडळ सुशोभित व तेजोमय दिसत होतें. या सर्व देखाव्यानें ती रात्रीची वेळ होती यागोष्टीचें लोकांना खरोखरच विस्मरण पडल्यासारखें झालें. कांतिपुरांतील झाडून सारे रहिवासी हा अपूर्व समारंभ पहाण्यास आले होते.

जानूही त्या गर्दींतच होता. आपलीं सर्व माणसें घेऊन आपण गर्दींतून निसटून जावें अशी त्याची फार इच्छा होती व त्या करितां त्यानें बरीच धडपडही केली. परंतु, हा त्याचा प्रयत्न शेवटीं निष्फळ होऊन त्याच्या सर्व

माणसांची पांगापांग झाली. राजकुमारास मात्र त्यानें आपल्या हातून जाऊं दिलें नाहीं. आपली सुटका करून घेण्याची ही छान वेळ आली आहे असें वाटून राजकुमाराचें हृदय आनंदानें भरून गेलें. इतक्यांत एक भला मोठा प्रचंड माणूस दारूच्या निशेंत हेलकावे खात समोरून येत होता; त्यास जानूचा धक्का लागला. त्याबरोबर तो जानूच्या खांद्यावर हात ठेवून ह्मणालाः—

' कां इतक्या गर्दीनें कोठें चाललास ? आज हा अपूर्व समारंभ पहाण्यास शहरांतील लोक उत्सवप्रीयतेनें जमले आहेत. आज तरी आपल्या धंद्यास एक दिवस रजा दे. लोकांचे खिसे कापून किंवा इतर रीतीनें चोऱ्यामाऱ्या करून आजच्या शुभ दिवसास तरी कलंक लावूं नकोस ! '

' माझ्याशीं तुला काय करावयाचें आहे ? आपल्या वाटेनें मुकाट्यानें चालता हो. "

" माझ्या बरोबर गुत्त्यांत दारू प्याल्याशिवाय मी इथून तुला जाऊं देणार नाहीं. आजच्या उत्सवाच्या प्रसंगीं शुद्धीवर रहाणें मोठें पाप आहे. "

' मग मला एक पेला आणून दे आणि मला लवकर जाऊं दे. '

इतक्यांत एका गृहस्थानें त्याला दारूचा पेला आणून दिला. तो घेऊन तो दारू पीत असतां राजकुमारास क्षणभर मोकळीक सापडतांच तो निमिषमात्रांत गर्दींतून नाहींसा झाला. भूमध्यसमुद्रांत पडलेली पावली पुन्हां हातास येणें ज्याप्रमाणें अशक्य त्याचप्रमाणें या प्रचंड जनसमूहांतून एकाद्या माणसास हुडकून काढणें अशक्य होतें. राजकुमारालाही हें पक्कें माहीत होतें, ह्मणूनच जानूच्या हातावर तुरी देऊन निसटून गेल्यानंतर त्यास जानूबद्दल यत्किंचितही भीति वाटली नाहीं. शहरांतील सर्व रहिवाशी आज एका तोतया राजपुत्राचें कौतुक करीत आहेत आणि तो तें जाणूनबुजून करून घेत आहे; हा विचार राजपुत्राचे मनांत येऊन त्यास परमावधीचें दुःख झालें. ज्या मानावर वास्तविक आपला हक्क आहे त्यास आपण मुकून तिसराच एक उपऱ्या लबाडीनें राजपुत्र होऊन बसला आहे हें पाहून त्याला अत्यंत त्वेष चढला. त्याला आता एकच मार्ग मोकळा होता. स्वतः राजवाड्यांत जाऊन आपण कोण आहों याबद्दल तेथील लोकांची खातरी पटवावयाची व आगंतुक राजपुत्रास त्याच्या लबाडीबद्दल योग्य शासन द्यावयाचें.

———

प्रकरण ११ वें.

राजवाड्यांतील नमुना.

नदी किनाऱ्यावर इकडे सर्वत्र आनंदीआनंद चालला आहे. दरबारच्या नौका नदीच्या पृष्ठभागावरून मोठ्या दिमाखानें डुलत चालल्या आहेत. सर्व वातावरण गायनवाद्नांच्या मंगलसूचक ध्वनीनें दुमदुमून गेलें आहे. लांबून पहाणारास सर्व शहर लंकेप्रमाणें दिसत आहे. गगनचुंबित प्रासादांच्या शिखरावर विराजमान झालेले दीपक आपण आकाशांतील तारकच आहोंत असें भूमंडलावरील जनतेस भासवून भूमंडल व दिग्मंडल यांचा जणूकाय संगम झाल्याचा अपूर्व देखावा दाखवीत आहेत. प्रज्वलित दीपकांनीं सुशोभित झालेले दीपवृक्ष अणकोचीदार व टोकाशीं निमुळत्या होणाऱ्या आपल्या आकारानें स्वर्गाकडे धाव घेत आहेत असें पहाणारास वाटे. दरबारच्या नौका नदींतून जात असतां नदीतटाकावर उभे असलेले लोक मोठमोठ्यानें आरोळ्या मारून त्यांचें अभिनंदन करीत होते.

रेशमी गाग्गागिरद्यांत आकंठ निमज्जित झालेल्या तानूस ती सर्व अपूर्व शोभा पाहून आपण नंदनवनांतच आहों कीं काय असें वाटूं लागलें. त्याच्या भोंवतीं असलेल्या राजकन्यांना मात्र या समारंभांत अपूर्व असें कांहीं वाटत नव्हतें. या गोष्टी त्यांच्या नित्य परिपाठांतल्या होत्या.

जलपर्यटण करीत किनाऱ्याच्या मध्यभागावर नौका आल्या व तेथें राजपुत्र व राजघराण्यांतील इतर माणसें खालीं उतरलीं. तेथून मिरवीत मिरवीत सर्व मंडळी राजवाड्यांत गेली. जातांना नगरशेट व शहरचे इतर कामगार यांनीं त्यांचे यथार्थ स्वागत केलें व त्यांचे बरोबर राजवाड्यांत जाऊन तेथें आजच्या समारंभाच्या उद्देशाबद्दल त्यांनीं मोठ्यानें द्वाही फिरवली. तानूच्या दिमतीस व शुश्रूषेस जीं माणसें असावयाचीं तीं आपापल्या योग्य स्थळीं आपपलीं अधिकारचिन्हें धारण करून उभीं होतीं. मोठमोठालें सरदार तानूच्या सिंहासनाच्या अधोभागीं उच्चासनावर बसले होते. त्यांच्या खालीं इतर सामान्य सरदार व सभ्यगृहस्थ

राजकुमाराकडे एकसारखें टक लावून पहात बसले होते. तेथें रीतीप्रमाणें द्वाही फिरविण्यांत येऊन ह्या प्रसंगास अनुरूप असे सर्व संस्कार यथाशास्त्र झाले. ह्यानंतर त्याचठिकाणीं एक जंगी मेजवानी झाली. त्या मेजवानीच्या थाटाचें यथार्थ वर्णन देणेंही अशक्य होय. भोजनाचेवेळीं सुस्वर नृत्य गायन चालूं होतेंच. हा सर्व अपूर्व समारंभ पाहून तानू धन्यता मानून घेत आहे इतक्यांत अंगावर चिंध्या घातलेला परंतु खरा राजपुत्र आपल्या हक्काकरितां व आपल्यावर होत असलेला अन्याय दूर होण्याकरितां दरबारांत प्रवेश व्हावा यासाठीं द्वारपाळाशीं झटपटत होता. द्वारपाळ वरचेवर धक्के मारून त्यास बाहेर घालवीत होते व भोंवतालचे लोकही गम्मत पाहून आपली करमणूक करून घेत होते. तें पाहून युवराजाचे डोळे पाण्यानें भरून आले. करमणूक करून घेणाऱ्या लोकांचा तो मोठ्या त्वेषानें व राजबिंडयास शोभेल अशा दिमाखानें निषेध करीत होता, त्यावर रस्त्यांत जमलेले तमासगीर त्याची अधिकच टर उडवूं लागले. शेवटीं अत्यंत क्षुब्ध होऊन राजपुत्र ह्मणालाः—

'मी तुह्माला बजावून सांगतों कीं मीच खरा राजपुत्र आहें. तुह्मी माझ्याशीं जें हें उर्मटपणाचें वर्तन करीत आहां त्याबद्दल तुह्मास योग्य प्रायश्चित्त भोगावें लागेल. आज माझ्यावर ही शोचनीय स्थिती आली आहे तरी मी आपलें ब्रीद कधींही सोडणार नाहीं. मी ज्या जागेवर उभा आहे त्या जागेवरून मला हालवण्याची कोणाची छाती असल्यास त्यानें पुढें यावें.'

'तूं राजकुमार अस किंवा कोणीही अस तूं पाणीदार मुलगा आहेस हें निःसंशय आहे. तुझा मी सहाय्य करितां आहे. तूं कोणत्याहीप्रकारची भीति बाळगूं नकोस. ह्या धीरेंद्राच्या जिवांतजीव आहे तोंपर्यंत हा तुला कधींही अंतर देणार नाहीं. मी तुझा हितचिंतक आहे हें ध्यानांत ठेवून माझ्या सल्याप्रमाणें वाग. तूं जे आतां आपल्या तोंडून उद्गार काढलेस ते प्रस्तुत प्रसंगीं फारच विपरीत आहेत. तूं आपली स्थिती नीट लक्षांत आण; व आजचा प्रसंग काय आहे हें नीट ध्यानांत ठेव. अविचारानें वागलास तर त्यांत तुलाच त्रास होणार आहे.'

हा बोलणारा मनुष्य दिसण्यांस मोठा धिमा दिसे. त्याची देहयष्टी चांगली उंच असून मजबूत व पिळदार होती. त्याच्या अंगावर किंमतवान

पोषाख होता, तरी तो जीर्ण झालेला दिसत असे. त्याच्या डोक्यावरचें पागोटेंही बरेंच जुनें झालेलें होतें. त्याच्या कमरेस एका लोखंडाच्या म्यानांत एक पल्लेदार जंबीया लटकत होता. त्याचे डोळे धुंद झालेले दिसत होते. त्यावरून हा कोणी दारूबाजांच्या अड्याचा नायक असावा असा लोकांचा तर्क झाला. कांहीं ह्मणोत " हे दुसरे युवराजच दिसतात. " इतक्यांत दुसरा ह्मणाला " स्वारी फार जबरदस्त दिसते आहे. तोंड आटप. " तिसरा ह्मणाला " त्याच्या डोळ्याकडे पहा. तो कसा भयंकर दिसतो आहे. " चवथा ह्मणाला " अरे त्याच्याकडे पहातां काय ? त्याच्या हातांतून तो मुलगा हिसकवा व त्यास तळ्यावर घेऊन चला. "

हे शब्द ऐकतांच एकानें राजकुमाराचे अंगास स्पर्श केला. त्याबरोबर धीरेंद्रानें आपल्या जंबियाच्या म्यानानें त्यांस असा एक तडाका दिला कीं तो जमीनदोस्त झाला. " अरे, या बदमाषाला ठार करा " असें पुष्कळ लोक ओरडूं लागले. व शेंकडो लोक त्याचे भोंवतीं जमले. हा मनुष्य आपली पाठ एका भिंतीशीं लावून आपल्या हातांतील शस्त्र वायुवेगानें फिरवूं लागला. त्याच्या अंगावर तुटून पडण्याच्या हेतूनें पुढे येणारे कित्येक लोक जमीनदोस्त झाले. हे लोक, या मनुष्याला येथून जिवंत सोडीत नाहींत असें सर्वजण आपआपसांत ह्मणूं लागले. इतक्यांत तुतारीचा अवाज होऊन ' राजाच्या जासुदाला वाट सोडा ' असें शब्द कानीं आले. त्याबरोबर पलटणींतले कांहीं शिपाई गर्दी मोडण्याकरितां भरधांव घोडे फेंकीत जमावांत शिरले. त्याबरोबर जो तो आपला जीव घेऊन पळत सुटला. थोडयाच वेळांत चोहोंबाजूस माणसांची पातळी झाली. या गर्दींत तो तरुण मनुष्य राजकुमारास आपल्या हातीं घेऊन तडक आपल्या घराकडे चालता झाला.

इकडे दरबारांत राजदूत येऊन त्यानें, राजवाडयांतील संदेश दरबारास निवेदन केला व संदेशाच्या शेवटीं तो ह्मणाला:—

' महाराज स्वर्गवासी झाले. '

दरबारांतील सर्व लोकांनीं हे शब्द ऐकतांच एकसमयावच्छेदेंकरून आपल्या माना दुःखानें खालीं घातल्या. जिकडे तिकडे अगदीं सामसूम झाली. अशाप्रकारें कांहीं काळ लोटल्या नंतर सर्वांनीं तानूकडे पाहून महा-

राज दीर्घायु होवोत असे उद्गार काढले. त्याचा प्रतिध्वनी सर्व बाजूंनीं उमटला.

बिचारा तानू आश्चर्यचकित होऊन चोहोंकडे टका टका पाहूं लागला. इतक्यांत त्याचें मनांत अकस्मात् एक विचार येऊन तो हरिताक्षाच्या कानांत ह्मणाला:—

तुह्माला देवाची शपथ आहे. अगदीं इमानें इतबारें खरें सांगा, असा माझा तुह्माला हुकूम आहे. तुह्माला हुकूम करण्याचा राजालाच अधिकार आहे. आणि राजाचा हुकूम कोणीही मोडता कामा नये हें तुह्माला माहीत आहेच.

अगदीं बरोबर आहे महाराज! या देशांतील सर्व लोक आपली रयत आहे. आपण या देशाचे प्रभू आहांत. आपला शब्द ह्मणजे कायदा आहे. ज्याला आपल्या जिवाचा कंटाळा आला नाहीं असा कोणीही मनुष्य आपल्या शब्दाविरुद्ध आचरण करण्याचें धाडस करणार नाहीं.'

हें शब्द ऐकून तानू मोठ्या त्वेषानें व निर्धारानें ह्मणाला:—

" आजपासून ह्या देशांत सर्वांना दया दाखवण्यांत आली पाहिजे. रक्तपात कोठेंही होऊं देतां कामा नये. तुह्मी आतांच्या आतां उठा आणि धीरसिंहास जाऊन सांगा कीं तुह्मास जीवदान देण्याविषयीं राजाचा हुकूम झाला आहे."

हें शब्द तानूच्या तोंडून निघाल्याबरोबर हरिताक्ष तावडतोब आपल्या कामगिरीवर गेले.

" आजपासून दयेचें साम्राज्य सुरू झालें. सुशील महाराज दीर्घायुषी होवोत " अशी दरबारांतील लोकांनीं प्रमुदित अंतःकरणानें एकच गर्जना केली.

———

प्रकरण १२ वें

युवराज व त्यांचा उपकर्ता.

धीरेंद्र व युवराज हे दोघेही गर्दीतून मोकळे होतांच त्यांनीं नदीकिनाऱ्याकडे जाण्याचा रस्ता धरला. पुलाजवळ येईतोंपर्यंत त्यांना कोठेंही अडचण पडली नाहीं. परंतु पुलाजवळ गर्दी जमली होती, तेथें मात्र त्यांना गर्दीतून सावकाश चालावें लागलें. धीरेंद्रानें युवराजांचे—नव्हे. महाराजांचे—मनगट आपल्या हातांत गच्च धरलें होतें. महाराजांच्या मरणाची अशुभ वार्ता ह्या मुलासही समजली होती ती ऐकून त्याचें हृदय उद्विग्न होऊन गेलें होतें. विजयध्वज महाराज प्रजेस कसेही कर्दमकाळ असले तरी त्यांचें आपल्या मुलावर पराकाष्ठेचें प्रेम होतें. पित्याच्या मरणाची वार्ता ऐकतांच त्याच्या डोळ्यांत अश्रू येऊन जगांतील सर्व वस्तु त्यास असून नसून सारख्या झाल्या. जगांत आपल्या इतका अभागी कोणीही नसेल या विचारानें त्याचें मन दुःखित होत आहे इतक्यांत " सुशीलकुमार महारजांना ईश्वर चिरायुषी करो " अशी गर्जना त्याचे कानीं आली. त्याबरोबर त्याच्या अंगांत एकप्रकारच्या विलक्षण मनोवृत्तींचा संचार होऊन तो आपल्याशीं ह्मणाला ' मग आतां या देशाचा अधिपति मी आहें. '

ते दोघेही थोडया वेळानें पुलाजवळ जाऊन पोहोंचले. या पुलावर लोकवस्ती फारच दाट असे. इतकी गजबज शहरांतील दुसऱ्या कोणत्याही भागांत नसेल. शहरच्या उद्योगधंद्याचें तें केंद्रस्थान होतें ह्मटलें तरी चालेल. किंबहुना पुलासभोंवतींची वस्ती ह्मणजे एक स्वतंत्र शहरच होतें असेंही ह्मणण्यास हरकत नाहीं. जवळच्या खेड्यापाडयांतून येणारे लोकही रातोरात किंवा एकदोन दिवस येथेंच वस्ती करून रहात. कोणचीही मिरवणूक निघावयाची ह्मणजे ती या रस्त्यानेंच निघत असे. यामुळें इतर भागांतील रहिवाशांहून आपणांस एक विशेषप्रकारचा हक्क आहे; अशीच तेथील लोकांची समजूत झाली होती. तेथें रहाणाऱ्या लोकांना कामकाजानिमित्त परठिकाणीं जाण्याचा प्रसंग आल्यास त्यांना तेथें क्षणभरही करमत नसे. ह्मतारे कोतारे क्षेत्राचें वगैरे ठिकाणीं रहावयास

गेल्यास ते थोडक्याच दिवसांत तेथें कंटाळून परत आपल्या जन्मभूमींत रहावयास येत, अशाप्रकारच्या कित्येक आख्यायिका तेथील कित्येक लोक सांगतात. त्याच पुलावर धीरेंद्राचें बिन्हाड असे. आपल्या छोट्या सोबत्यास हातांत धरून तो आपल्या घराच्या दारांशीं पोहोंचतों न पोहोंचतों तोंच " शेवटीं आपण आह्माला सापडलात. याउप्पर तुमची आमची चुकामूक पुन्हा होणार नाहीं. पुन्हा यदाकदाचित् असें होईलच तर आपलीं हाडें जाग्यावर रहाणार नाहींत. " असें घोगऱ्या स्वरांत ह्मणून तानूनें त्या मुलाला धरण्याकरिता आपला हात पुढें केला.

इतक्यांत धीरेंद्र मध्यें पडून ह्मणाला " मित्रा तूं कोण आहेस ? तूं या मुलावर अशी जबरदस्ती कां करीत आहेस ? या मुलाशीं तुझें कांहीं नातें आहे काय ? "

" होय. तो माझा मुलगा आहे. "

" हें निखालस खोटं आहे. " असें तो छोटा राजा क्रोधानें ह्मणाला.

" शाबास. तूं मोठा निर्भय दिसतोस. आणि ह्मणूनच तुझें बोलणें मला खरें वाटतें. तूं शहाणा अस किंवा वेडा अस त्याची मला परवा नाहीं. हा ऐरट तुझा बाप असो वा नसो त्यांत मला कांहीं भेद दिसत नाहीं. त्याची तुझ्याशीं अशीच जर वागणूक असेल तर मी तुला त्याचे स्वाधीन कधींही करणार नाहीं. तो तुला चोप देण्याच्या धमकावण्या उघडपणें देत आहे. माझ्याजवळ रहाण्याची तुझी जर नाखुषी नसेल तर मी तुला आपल्याजवळ मोठ्या आनंदानें ठेवीन. "

" होय. तुमच्याजवळ मी मोठ्या आनंदानें राहीन. या मनुष्याचा व माझा कांहींही संबंध नाहीं. प्राण गेला तरी बेहेत्तर; परंतु, मी याच्या बरोबर कधींहीं जाणार नाहीं. "

" मग आतां ठरलें तर. आतां अधिक विचक्षणा करण्याचें कांहीं कारण नाहीं. "

" पाहूं आतां आपण काय होतें तें. " असें ह्मणून जानू मुलाच्या अंगावर धावून गेला.

" त्याच्या अंगाला हात लावशील तर तुझें टाळकें फोडीन " असें धीरेंद्र मोठ्या त्वेषानें ह्मणाला. त्या बरोबर जानू दचकून मागें सरला. धीरेंद्र

पुन्हा ह्मणाला:—“ हा मुलगा लोकांच्या हातांत सांपडला होता. त्यांनीं त्यास अनेक रीतीनीं त्रास दिला. किंबहुना मी जर तेथें नसतों तर याच्या जिवासही अपाय झाला असता. मोठ्या आणीबाणीच्या प्रसंगी मीं त्याचें संरक्षण केलें आहे. असें असतां मी त्याला तुझ्या स्वाधीन करीन असें कदापि समजूं नकोस. तूं त्याचा बाप असशील असें मला वाटत नाहीं व असतास तरी अशा सुशील मुलानें असल्या पाषाण हृदयीं बापाच्या हाता-खालीं रहाण्यापेक्षां मरणें बरें असें मला वाटतें. ह्मणून मी तुला पुन्हां एकवार सांगतों कीं तू आल्या रस्त्यानें मुकाट्यानें चालता हो. तुझ्याशीं हुजत घालण्यास मला मळींच फुरसत नाहीं. ’

हें एकतांच जानू दात खात तेथून निघून गेला. इकडे मुलाला घेऊन धीरेंद्र आपल्या माडीवर गेला. ती माडी साधारणच होती. तेथें कांहीं जुनें पुराणें सामान पडलें असून एक फाटका बिछानाही पडलेला होता. बिछाना पसरून राजा त्यावर पडला. त्याला अतिशय कष्ट पडल्यामुळें व क्षुधा लागल्यामुळें तो अगदीं विव्हल होऊन बिछान्यावर पडतां पडतांच धीरेंद्रास ह्मणाला ‘ हें पहा मेहरबानी करून मला थोडेसें खावयास द्या. ’ इतक्यांत पहातां पहातां राजा निद्रावश होऊन घोरूंही लागला.

मुलाची ही चालचलणूक पाहून धीरेंद्रास कौतुक वाटलें. तो आपल्या:-शींच ह्मणाला. ‘ ह्याची तऱ्हा कांहीं विलक्षण दिसते. जणू काय हें याचेंच घर आहे अशा थाटानें हा घरांत शिरला व त्या ऐटीनें बिछाना पसरून त्यावर जाऊन निजला. नुसती उपचारादाखल सुद्धां यानें माझी परवानगी मागितली नाहीं. हा आपल्याला युवराज ह्मणवून घेतो. बेट्याची वर्तणूकही अगदीं युवराजाप्रमाणे दिसतें. निराशेमुळेंच याची अशी स्थिति झालेली असावी. असो. मी मात्र यापुढें याचे हाल होऊं देणार नाहीं. याचा निर्भयपणा पाहून माझेंसुद्धां याचेवर प्रेम बसलें आहे. बोलण्या चालण्यांत याची तडफ कांहीं निराळ्याप्रकारची आहे. चेहरा तरी किती सुबक, मोहक व पाणीदार आहे ! खरोखर मी याला चांगलें शिक्षण देऊन शहाणा करीन. नानातऱ्हेच्या उपचारांनीं याचें वेड घालवीन. पाठच्या भावाप्रमाणें मी याला जपीन. याला यत्किंचितही त्रास

देण्यास कोणी धजावेल तर त्यास योग्य प्रायश्चित्त दिल्याशिवाय मी कधींही राहणार नाहीं. '

तो वाकून त्याच्याकडे पाहूं लागला व त्याचे गालावरून हात फिरवून त्यास कुरवाळूं लागला. केस वारण्याकरितां त्यानें त्याच्या डोक्याला हात लावतांच त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले. धीरेंद्र आपल्याशींच ह्मणाला: —

" ह्याला असाच येथें उघडा पडून द्यावा तर थंडीनें याची प्रकृति बिघडेल व पांघरूण घालावें तर याची झोपमोड होईल. याला झोपेची तर फारच अवश्यकता दिसते. आतां युक्ती कोणची योजावी. "

शेवटीं आपल्या अंगावरचें उपरणें काढून धीरेंद्रानें तें त्याच्या अंगावर घातलें व माडीवरून इकडे तिकडे फिरत तो खालीं लिहिल्याप्रमाणें विचार करूं लागला—

" वेडाच्या भरांत त्याला असें वाटत आहे कीं, मी युवराजच आहे. या देशाला आतां युवराज कोणीही राहिला नाहीं. आजपर्यंत जो युवराज होता तो आतां राजा झाला आहे. बतावणीच करावयाची तर ती युवराजाची न करतां राजाचीच करणें प्रस्तुत प्रसंगीं अधिक युक्त आहे हें या वेड्याच्या कोठून लक्षांत येणार ? ······ ······ मला बापास सोडून आज सातवर्षें झालीं. तेव्हां पासून मी असाच भटकत फिरत आहे. या मुलास घेऊन मी जर घरीं गेलों तर माझा बाप याला खरोखरच प्रेमानें बागवील. माझा वडील भाऊही याच्यावर प्रेम करील. माझ्या दुसऱ्या भावाला कदाचित हें खपणार नाहीं. परंतु, त्याची मला एवढी प्रतिष्ठा नाहीं. तर आतां या मुलाला घेऊन आपण तिकडेच जावें हें बरे. "

इतक्यांत एक नोकर भोजन घेऊन माडीवर आला. त्याच्या पायाच्या आवाजानें मुलगा जागा होऊन ताडकन् उठून बसला. विश्रांति मिळाल्यामुळें त्याचा चेहरा प्रफुल्लित दिसूं लागला. तो दीर्घ श्वास टाकून आपल्याशींच ह्मणाला ' हें कांहीं खरें नव्हे. हें केवळ स्वप्न होतें. ' असें ह्मणून त्यानें धीरेंद्राकडे दृष्टी फेंकली. त्याच्या अंगावर उपरणें नाहीं. आपण झोपेंत असतां त्यानें तें आपल्या अंगावर घातलें हें लक्षांत येतांच तो हळूंच ह्मणाला ' तुह्मी माझ्या फारच उपयोगीं पडलात. हें उपरणें तुह्मी आपल्या अंगावर घ्या. आतां त्याची मला जरूर नाहीं. '

असें ह्मणून तो तोंड धुण्यासाठीं मोरीवर जाऊन बसला. धीरेंद्र त्याला लडीवाळपणानें ह्मणाला, ' आतां आपण दोघेजण भोजन करूं ह्मणजे तूं चांगला ताजातवाना होशील. तूं येथें कोणच्याही गोष्टीसंबंधानें संकोच बाळगूं नकोस. '

यास कांहींएक उत्तर न देतां मुलगा आश्चर्ययुक्त मुद्रेनें धीरेंद्राकडे पाहूं लागला.

" तूं असें काय करतोस ? " असें धीरेंद्रानें त्याला विचारलें.

त्यावर तो ह्मणाला ' भल्या माणसा, मला तोंड धुवायचें आहे. '

' एवढेंच ना ! मग त्याला माझी परवानगी कशाला पाहिजे ! तोंड धुण्याचें सर्व सामान तेथें आहे. तें घेऊन तूं खुशाल तोंड धू '

तरी तो मुलगा कांहीं बोलेना व जागचा हालला नाहीं. तो जमिनीवर रागानें पाय मात्र आपटूं लागला. धीरेंद्रास याचा कांहींच उलगडा पडेना. ' हें आहे तरी काय ! ' असें त्यानें त्यास विचारलें.

तो मुलगा ह्मणाला ' माझ्या हातावर पाणी घालण्याचें सोडून ह्या भाकडकथा काय सांगत बसला आहेस ? '

हें ऐकतांच धीरेंद्रास पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें. मोठ्या मिनतवारीनें तो आपलें हसें दाबून मनांत ह्मणाला " वः यानें तर बहार केली ! " असें ह्मणून पाण्याचा तांब्या घेऊन त्यानें त्याच्या हातावर पाणी घातलें. पाणी घालून तो तसाच जवळ उभा राहिला असे पहातांच मुलगा ह्मणाला ' अरे, तोंड पहात काय उभा राहिला आहेस हात पुसायला रुमाल देशील कीं, नाहीं. '

हा हुकूम होतांच धीरेंद्रानें मोठ्या अदबीनें त्याच्या हातांत रुमाल दिला.

मुलाचें तोंडधुणें झाल्यानंतर धीरेंद्र तोंड धुऊं लागला. इकडे ताट आपल्यापुढें घेऊन मुलानें जेवणासही सुरुवात केली. त्वरेनें तोंड धुणें आवरून धीरेंद्रही त्याच्याजवळ बसून जेऊं लागला. त्याबरोबर मुलगा रागानें ह्मणाला. " तुला समजत नाहीं कायरे ? राजाच्या देखत जेवतोस ! "

मुलाच्या तोंडचे हे उद्गार ऐकून मात्र धीरेंद्र जागच्याजागीं स्तंभित होऊन ह्मणाला " वाः याचें वेड काळानुरूप बदलत चाललें आहे. इकडे युवराजास राज्यपद मिळालें तर इकडे हाही आपणास युवराज ह्मणण्याचें सोडून

देऊन राजा ह्मणूं लागला. आतां याच्याशीं हा ह्मणतो त्याप्रमाणेंच वागलें पाहिजे. नाहींतर हा मला फांशींची शिक्षाही फर्मावील ! '

मुलाच्या या दिमाखानें त्याला मोठी मौज वाटली. ती तशीच कायम ठेवण्यासाठीं किंबहुना त्या मौजेस उत्तेजन देण्यासाठीं तो लोगेच त्याच्यापुढें हात जोडून त्याच्या सेवेस उभा राहिला. इकडे पोटांत दोन घास गेल्यामुळें राजेसाहेबांची मर्जी जरा सुप्रसन्न होऊन ते थोडथोडें बोलूं लागले. ते ह्मणाले

' तुमचें नांव काय ? तुह्मी धीरेन्द्र ह्मणालांत ना ! '

' होय महाराज, ' असें उत्तर देऊन धीरेंद्र आपल्याशींच ह्मणाला ' याच्या वेडाप्रमाणं मलाही आतां तंतोतंत वागलें पाहिजे. तसें जर न करीन तर हें सर्वच तंत्र बिघडून जाईल. हुजूर, महाराज वगैरे प्रभुत्वद्योतक शब्दांनींच त्याला संबोधिलें पाहिजे. '

राजेसाहेब थोडेसें पाणी पिऊन शांत झाल्यावर धीरेंद्रास ह्मणाले—' तूं मोठा थोर मनुष्य दिसतोस. तुह्मी हकीकत ऐकण्याची आमची इच्छा आहे. '

' महाराज, माझा जन्म सरदारकुलांत झाला. माझ्या बापाचें नांव वीरसिंह. तो धनाढ्य असून फार थोर मनाचा आहे. मी लहान असतांच माझी आई निवर्तली. मला दोन भाऊ आहेत. माझा थोरला भाऊ माझ्या बापाप्रमाणेंच उदारमनाचा आहे. धाकटा भाऊ लुब्धक हा मात्र फारच नीच व हलकट आहे. लहानपणापासूनच त्याची अशी वागणूक आहे. याशिवाय माझी एक मामेबहीण माझ्या बापाजवळच रहाते. ती फार सुंदर आहे. मी जेव्हां घर सोडलें तेव्हां ती सोळा वर्षांची होती. तिच्या बापाची फार मोठी दौलत असून त्या दौलतीची तीच एकटी वारस आहे. माझें तिच्यावर प्रेम असे व तिचेंही माझ्यावर असे. परंतु माझ्या वडील भावाशीं तिचा वाङ्निश्चय लहानपणींच झाला असल्यामुळें तिचें माझ्याशीं लग्न होणें शक्य नव्हतें. माझ्या वडील भावाचें दुसऱ्या एका कन्यकेवर प्रेम होतें. " तुमचें उभयतांचें एकमेकांवर असलेलें अस्खलित प्रेम आज नाहीं उद्यां यशस्वी होईल " असा तो आह्मांस वारंवार आशीर्वाद देई. आमच्या लुब्धकांचेंही तिच्यावर प्रेम असे. परंतु, त्याचें खरें कारण तिची जिनगी होती. आपलें तिच्यावर खरोखरच प्रेम आहे असें तो आमच्या वडिलास भासवी. या त्याच्या फसवेगिरीनें आमचे वडील अखेर

फसलेंही. परंतु माझ्या बहिणीस मात्र आमच्या कनिष्ठ बंधूंचें अंतरंग पूर्णपणें समजलें होतें. तो बोलण्यांत मोठा मिठ्ठा असे. त्याप्रमाणेंच खोटें खरें भासवण्याची त्याची विलक्षण हातोटी होती. या त्याच्या गुणामुळें तो सर्वांना अत्यंत प्रिय होई. माझा स्वभाव त्याच्याहून अत्यंत भिन्न होता. लोकांना काय वाटेल याची बिलकूल पर्वा न बाळगतां मी नेहमीं खरें बोलत असें. माझ्या स्वभावास आंत बाहेर.हे कांहीं ठाऊक नव्हतें. या माझ्या वृत्तीनें इतरांस कधींही त्रास पोहोचत नसे व कोणाचें कधीं नुकसान होत नसे. परंतु, त्यायोगानें अखेर माझेंच अपरिमित नुकसान झालें. माझ्या थोरल्या भावाची शरीरप्रकृति सामान्यत: अशक्तच असे. रहाता पैकीं राहिलों आह्मी. तेंही असे तऱ्हेवाईक ! येनकेनप्रकारेण आमची वाट लावून टाकली कीं, सर्व जिनगीवर एकटेच आपण हक्क चालवण्यास मोकळे झालों अशा विचाराने आमच्या कनिष्ठ बंधूंनीं माझ्या संबंधानें आमच्या वडिलांस खोटयानाटया गोष्टी सजवून सांगण्याचा उपक्रम चालविला. आमचे वडील भोळे व एकधोरणी असल्यामुळे कनिष्ठ बंधूचे हे प्रयत्न फलद्रुप होऊं लागले. शेवटीं आपल्याच एका नोकराकडून त्यांनीं माझ्या माडीस शिडी लाववली व रात्रीं घरातील माणसांचा डोळा चुकवून मामेबहिणीस घरांतून पळवून नेण्याचा माझा विचार होता असें त्यांनीं आमच्या वडिलांस भासवलें. वडिलांनीं त्यावर विश्वास ठेवून आह्मांस तीन वर्षे मुदतीपर्यंत घरांतून बाहेर काढलें. तितक्या अवधींत अनुभवानें टक्के टोणपे खाऊन आह्मी शहाणे होऊं व लोकव्यवहार आह्मांस चांगल्या रीतीनें समजूं लागेल असे आमच्या वडिलांनीं उद्गार काढले. घर सोडून आह्मी लष्करांत गेलों. दोन चार लढायांचे प्रसंगीं आह्मी समरांगणावरही हजर होतों. त्याप्रसगीं मी कित्येक पराक्रमाच्या गोष्टी केल्यामुळें सर्व सैन्यांत माझा स्वाभाविकच बडेजाव होऊं लागला. परंतु दुर्दैवानें अखेर एका लढाईत आह्मी शत्रूंच्या हातीं सापडलों. त्यानंतर आह्मांला सात वर्षेपर्यंत अंधार कोठडींत वास करावा लागला. मोठ्या हिकमतीनें व चातुर्यानें तेथून आह्मी आपली मुक्तता करून घेतली. येथें आल्यास मला थोडेच दिवस झाले. गेल्या सात वर्षांत माझ्या घरा काय घडामोडी झाल्या याची मला बिलकुल माहिती नाहीं. याप्रमाणें माझा संक्षिप्त वृत्तांत आहे. '

राजा मोठ्या त्वरेनें ह्मणाला ' खरोखरच तुझ्यावर हा मोठा अनर्थ झाला आहे. तो मी दूर करीन हें पक्कें लक्षांत ठेव. तुला हें साक्षात् राजानें दिलेलें वचन कधींही खोटें होणार नाहीं. '

धीरेंद्राची ही हकीकत ऐकून राजपुत्राला ही आपली हकीकत सांगण्याची उसळी येऊन त्यानें आपले सायंत वृत्त धीरेंद्रास निवेदन केलें. तें ऐकून धीरेंद्रास अत्यंत आश्चर्य वाटलें. राजपुत्राची हकीकत संपली तेव्हां तो आपल्याशींच ह्मणाला— " खरोखरच हा मनुष्य कांहीं सामान्य दिसत नाहीं. याची कल्पनाशक्ति तरी केवढी अजब ही ! तशी ती जर नसती तर त्याला ही गोष्ट इतक्या बेमालूम रीतीनें खचित रचतां आली नसती. बिचाऱ्याचा बुद्धिमत्ता असून नसल्यासारखी होऊं पहात आहे. नानाप्रकारचे उपाय करून मी त्याला ताळ्यावर आणणारच. योग्य काळजी घेतली तर खरोखरच हा मुलगा एके दिवशीं चांगला नांवलौकिकास चढेल अशी मला खतरी वाटते. असा दिवस येईल त्या दिवशीं मी मोठ्या आनंदानें सांगेन कीं, हा मुलगा मला प्रथम सांपडला तेव्हां तो अगदीं निराधार स्थितींत होता. परंतु, माझ्याच आश्रयानें तो उन्नतपदास चढला. "

राजा विचारयुक्त मुद्रेनें ह्मणाला " तूं माझा अप्रतिष्ठेंतून बचाव केलास त्याचप्रमाणें तूं माझा जीवही वांचविलास; अर्थात् मला सिंहासन देण्यास पर्यायानें तूंच कारण झाला आहेस. असल्या अपूर्व कामगिरीस मोठें अपूर्व बक्षीस मिळणें अवश्य आहे. तुझी इच्छा काय आहे ती सांग. ती घडवून आणण्यास मी आपल्या प्रभुसामर्थ्याची पराकाष्ठा करीन. "

धीरेंद्र आपल्या मनाशींच विचार करीत बसला होता. परंतु हे शेवटचे उद्गार ऐकून तो एकदम जागा झाला. " महाराज, आपले मी मनापासून आभार मानतों. माझ्याहातून आपली जी अल्प सेवा झाली असेल ती माझें कर्तव्य ह्मणूनच मीं केली. बक्षिस वगैरेच्या आशेनें केली नाहीं. " असें ह्मणून ही बाबत मिटवण्याचा धीरेंद्राचा प्रथम विचार होता. परंतु मौज करण्याची ही आलेली अमूल्य संधी वाया दवडणें हें चांगलें नाहीं असा विचार करून तो राजपुत्रास ह्मणाला " माझी इच्छा काय आहे तें मी थोडासा विचार करून सागतों. महाराजांनीं मला थोडा वेळ द्यावा. "

अशा वेळीं घाई करणें चांगलें नाहींच. असा त्यावर आपला अभिप्राय देऊन राजानें " ठीक आहे " ह्मणून उत्तर दिलें.

' खरेच, यावेळीं हेंच केलें पाहिजे. मला पुन्हा अशी संधी मिळणार नाहीं. हें लचांड पुढे असेच जर चालवीत बसलें तर तें कधींच संपावयाचें नाहीं; तेव्हां याला आतां मी तें सांगतोंच. खरोखर ही वेळ वायां दवडण्याची मला कुबुद्धी झाली नाहीं हें माझें सुदैवच समजलें पाहिजे. ' असा विचार करून तो मोठ्या अदबीनें राजास ह्मणाला " मी आपली रयत आहे. रयतेचें राजाविषयीं जें कर्तव्य असतें त्यापेक्षां मीं अधीक कांहीं केलें नाहीं. तरीपण आपण सुप्रसन्न होऊन मला वरप्रदान देण्यास तयार झाला यामुळेंच माझी इच्छा काय आहे हें मी आपणांस सांगतों. माझ्या आणि माझ्या वंशजांना महाराजांसमोर बसण्याचा अधिकार असावा. "

राजा ह्मणाला " जा, हा हक्क आह्मीं तुला दिला आहे. आह्मी व आमचे वंशज हा हक्क अबाधित राखतील. त्याबद्दल तूं बिलकुल काळजी बाळगूं नकोस. "

राजाच्या तोंडून हे शब्द ऐकतांच धीरेंद्र खुर्चीवर बसला. तो आपल्या मनाशीं ह्मणाला " मला शक्कल तर खूप सुचली. उभे राहून राहून माझे पाय अगदीं दुखून आले होते. ही वरप्राप्ती आह्मी जर करून घेतली नसती तर या राजेश्रीचें वेड संपेतोपर्यंत आह्माला एकसारखे उभेच रहावें लागलें असतें ! असो खरे नाहीं तरी लटुपटीचे तरी आह्मी सरदार बनलों यावरून एक गोष्ट मात्र सिद्ध होते ती ही कीं, हा मुलगा मोठ्या थोर मनाचा आहे. खरोखरच जर ह्याला वैभव प्राप्त झालें तर हा त्याचा सदुपयोग केल्यावाचून कधींही राहणार नाहीं. असो. येथपर्यंत तर बहार ठीक झाली. परंतु रस्त्यांत चार चौघां देखत जर हे गृहस्थ आह्मांस सरदार या नांवानें संबोधूं लागले तर मात्र सर्व लोक आह्मांला यांच्या पंक्तीला बसवल्या वांचून राहणार नाहींत ! काय होईल तें होवो पण आपण ही गम्मत अशीच चालवणार.

प्रकरण १३ वें.

राजकुमाराचा पत्ता नाहीं !

दोघांचेही डोळ्यांवर झोंप आली. तेव्हां राजा ह्मणाला "माझ्या अंगावरचे कपडे काढ" हें ऐकतांच कांहींएक उत्तर वगैरे न देतां त्यानें त्याच्या अंगावरच्या चिंध्या खालीं उतरल्या. त्याबरोबर राजा ताबडतोब धीरेंद्राच्या बिछान्यावर जाऊन पडला. तें पाहून धीरेंद्र आपल्या मनाशींच ह्मणतो. "अरे, याने तर पुन्हां बहार केली. हा आमच्या बिछान्यावरही जाऊन पडला. आतां आह्मी आपली तजवीज कोठें पहावी ! " धीरेंद्राच्या मनांत कांहीं विचार चालला आहे असे पाहून राजा अर्धवट गुंगींतच ह्मणाला, "तूं त्या दाराजवळ जाऊन नीज व आह्मी उठेतोंपर्यंत तेथच पहारा करीत रहा." असें ह्मणून स्वारी गाढ निद्रेंत अवगाहन करूं लागली. तें पाहून धीरेंद्र आश्चर्यानें ह्मणाला "अरे वा ! हा खरोखरच राजा व्हावयास पाहिजे होता. राजाची ऐट ह्याला कशी बेमालूम साधते. राजाच्या हुकुमाप्रमाणें तो दाराजवळ जाऊन जमिनीवर पडला व ह्मणाला 'भूमीवर निजण्याची मला संवय नाहीं असें नाहीं. सुमारें सातवर्षें मीं याहीपेक्षा वाईट स्थितींत काढलीं आहेत.'

प्रभात होण्याच्या सुमारास त्याचा थोडासा डोळा लागला. सुमारें प्रहर दिवस आला तों जागा होऊन धीरेंद्र राजाजवळ गेला व त्याच्या अंगावरचें पांघरूण काढून त्यानें एका सूत्रानें राजाच्या अंगाचे मेज घेतले.

जागा होऊन राजा ह्मणाला 'अरे, मला थंडी वाजूं लागली ! हे तूं काय करतोस ?'

धीरेंद्र ह्मणाला 'महाराज, बाहेर मला थोडेसें काम आहे. मी इतक्यांत जाऊन आलों. आपण असेंच पडले रहा. आपल्या डोळ्यावर अद्याप झोंप दिसते आहे.' असें ह्मणून तो निघून गेला. इकडे राजास तात्काळ झोंप लागली. सुमारें चाळीस मिनिटांत राजाकरितां कांहीं कपडे घेऊन धीरेंद्र परत आला. हे कपडे वापरलेलेच होते—नवे नव्हते. तरीपण ते जीर्ण झालेले नव्हते. किंवा त्यास भोंक वगैरेही कांहीं नव्हतें. तें

त्याच्या अंगाला अगदीं नीट नेटके येण्यासारखे होते. त्या कपड्याकडे पाहून धीरेंद्र ह्मणाला "हें काम तर ठीक झालें. तूर्त तरी याची कपड्याची ददात मिटली. ह्याला एक दोन ठिकाणीं शिवलें पाहिजे व कांहीं ठिकाणीं बारीक सारीक ठिगळें लावलीं पाहिजेत. चिंध्या वापरण्याचा ज्याला जन्माभ्यास त्याला हे कपडे पाहून खरोखरच आनंद होईल." या नंतर सुई दोरा घेऊन त्यानें त्या कपड्यास ठिगळें लावलीं. ठिगळें लावणें झाल्यानंतर तो आपल्या मनाशीं ह्मणाला "आतां कांहीं कोणाचें देणें राहिलें नाहीं. शिंपी, धोबी, न्हावी, खाणावळवाला, घरवाला वगैरे सर्वांचें देणें देऊन टाकलें आहे. आतां भाड्याचीं दोन घोडीं करून येथून निघण्याची तयारी करावी. बाजारांत जाण्यापूर्वीं महाराजांना एकदां उठवावें व त्यांना एकदां कपडे घालून पहावेत.' असें ह्मणून त्यानें 'महाराज, महाराज,' ह्मणून चार पांच वेळ हाका मारल्या; परंतु महाराज जागे होईनात! शेवटीं त्यांच्याजवळ जाऊन त्यानें अंथरुणावरचीं पांघरुणें हळूंच दूर केलीं. परंतु; पांघरुणाखालीं महाराज नाहींत हें पहातांच त्याची पांचावर धारण बसली. तो इकडे तिकडे कानाकोपऱ्यांत वेड्यासारखा पाहूं लागला. परंतु महाराज कोठहीं दिसेनात व त्यांच्या अंगावरच्या चिंध्याही कोठें दिसेनात. इतक्यांत खाणावळींतला माणूस जेवणाचें ताट घेऊन तेथें आला. क्रोधावेशांत त्यानें त्या माणसाचा जोरानें गळा दाबून धरून 'इथला मुलगा काय झाला?' ह्मणून त्यास दात खाऊन विचारलें. त्या बिचाऱ्याच्या अंगाचा थरकांप झाला. तो कांपत कांपत ह्मणाला 'महाराज, त्या मुलाला मीं आतांच पुलाजवळ पाहिलें. मुलगा तेथें एकटाच उभा होता. त्याच्या जवळ दुसरें कोणीही नव्हतें. त्याच्यापासून सुमारें चार पांच हातावर एक भेसूर दिसणारा माणूस उभा होता. तो त्याच्या अंगावर बराच वेळ ओरडत होता. इतक्यांत तेथें माणसांची बरीच गर्दी जमली. पुढें काय झालें तें मला माहीत नाहीं. कारण त्याचवेळेस माझ्या धन्यानें मला घरांत बोलावलें.' हें ऐकतांच धीरेंद्र तडाक्यानें माडीखालीं उतरला व धावत धावत रस्त्यावर गेला. 'हा मुलगा माझा आहे.' असें त्या दिवशीं ह्मणणाऱ्या मनुष्यानेंच मुलाला नेलें असावें. माझ्या वेड्या धन्या तूं मला आज दुरावलास हें पाहून मला अत्यंत वाईट वाटतें. माझें तुजवर किती प्रेम जडलें होतें ह्मणून सांगूं! नाहीं; पण असा धीर सोडून

उपयोगीं नाहीं. मुला भिऊं नकोस. मी तुला पाताळांतून सुद्धां शोधून काढीन. नशीब बिचाऱ्याचं ! हें जेवण त्याच्या तोंडीं पडावयाचें नव्हतें. असो मीही त्याला आतां स्पर्श करीत नाहीं. " असें ह्मणून त्यानें पुढचा रस्ता धरला.

प्रकरण १४ वं.

तानूचें स्वप्न.

त्याच दिवशीं सकाळीं तानू झोंपेंतून जागा झाला तेव्हां दिवाणखान्यांत जिकडे तिकडे अंधार होता. आपल्या भोंवतीं हा काय प्रकार चालला आहे ह्याचा उलगडा पडावा ह्मणून तानूनें विचाराची अगदीं शिकस्त केली, परंतु त्याचा निश्चित असा कांहींच निकाल लागेना. बऱ्याच वेळानें अकस्मात त्याच्या मनांत एक विचार आला व आपल्याशींच तो आनंदानें ह्मणालाः—

" हं, आतां माझ्या सर्व लक्षांत आलें. हें स्वप्न नसून हा सर्व खरा प्रकार आहे. आनंदा, माझ्या हृदयांत आतां कायमचें वास्तव्य कर. हे चिंते, आजपासून माझ्या हृदयांतून मी तुला हद्दपार केलें आहे. आज माझा वैभव-रवी उदयास आला. ज्याला आजपर्यंत मी स्वप्न समजत होतों तीच अखेर खरी वस्तुस्थिति ठरली. माझ्या भगिनींनों, आजपासून तुमच्या दारिद्र्याचा शेवट झाला असें समजा. लवकरच तुह्मांस एक अपूर्व कथानक ऐकण्यास सांपडेल. "

इतक्यांत एक गृहस्थ उशाशीं येऊन हात जोडून तानूस ह्मणाले महा-राजांचा कांहीं हुकूम असेल तर तो सांगण्याची कृपा व्हावी. '

' काय, हुकूम ? वाः—याचा आवाज तर माझ्या ओळखीचा दिसतो. कायरे, मी कोण आहे ? '

' आपण ? हें काय विचारावें महाराज ! काल सायंकाळपर्यंत आपण युव-राज होता. आज सकाळपासून आपण राजे ह्मणजे या देशाचे प्रभु झालात. '

हें ऐकतांच आपणांस पांघरुणांत गुंडाळून घेऊन तानू मोठ्या आतुरतेनें ह्मणाला " खरोखरच हें स्वप्न नव्हतें. माझा खरोखरच भाग्योदय झाला. जा, तूं विश्रांति घ्यावयास जा. माझें आतां कांहीं काम नाहीं. "

यानंतर तानूस पुन्हां झोंप लागली वसंतऋतूचा समय आला आहे. तानू वसंतोद्यानांत एकटाच विहार करीत आहे. अशा समयी सुमारें एक वीतभर ऊंच वामनमूर्ति माणूस त्याच्या पुढें आला. त्याच्या पाठीस कुबड असून त्याची दाढी ताम्रवर्ण होती. तो तानूस ह्मणाला ' ही कुदळ घे व या जागीं खण. तानूनें त्या जागीं खणतांच तेथें त्याला बारा कोऱ्या करकरीत पुतळ्या सांपडल्या. ' त्या घेऊन तानू त्यांचेकडे आश्चर्ययुक्त मुद्रेने पाहूं लागला. तो वामनमूर्ति त्याला ह्मणाला–अरे एवढ्याने काय झालें आहे ? मी तुला पूर्ण ओळखतो. तूं फार सुस्वभावी आणि भला मुलगा आहेस. तुझ्या सुखाचे दिवस समीप आले आहेत. तुझ्या विपत्तीची आज समाप्ति झाली असे खास समज. या जागेवर तूं प्रत्येक सातवे दिवशीं खणीत जा. ह्मणजे तुला प्रत्येक खेपेस इतकाच ऐवज सांपडत जाईल. ही गोष्ट तूं कोठेंही फोडूं नकोस. असें सांगून तो वामन मूर्ति तेथून अदृश्य झाला. तानूही सांपडलेला ऐवज घेऊन कंगालपुऱ्याकडे निघाला. जातांना तो आपल्याशीं ह्मणाला " वामनमूर्तिनें मला सांगितल्याप्रमाणें मी करीन. व प्रत्येक दिवशीं आपल्या बापाला एकएक पुतळी देत जाईन. ती मी भिक्षा मागूनच आणली आहे असें त्यास वाटून त्याला फार आनंद होईल. मग मला मार बसण्याची कधींही भीति राहणार नाहीं. धोडीनें मला लिहावाचायास शिकविलें आहे; याबद्दल गुरुदक्षिणेदाखल त्यास प्रत्येक आठवड्यास मी एक पुतळी देत जाईन. बाकी राहिलेल्या चार पुतळ्या माझी आई व माझ्या दोन बहिणी यांच्यामध्यें मी वांटून देईन. उपासमार व चिंध्या यांना आजपासून कायमची रजा मिळणार. " असें ह्मणत तो धापा टाकीत घराजवळ जाऊन पोहोंचला. घरीं पोहोंचतांच त्यानें चार पुतळ्या आपल्या आईपुढें टाकून ह्मटलें–या मी कोणा जवळून भिक्षा मागून किंवा चोरून आणल्या नाहींत. त्या मीं प्रामाणिकपणानें मिळविल्या आहेत. घ्या तुह्मी तिघीजणीं आपापसांत वाटून घ्या.

' हें ऐकतांच त्याच्या आईने त्यास पोटाशीं धरलें व ती ह्मणाली–' महाराज, सूर्योदय होऊन बराच वेळ झाला. महाराजांची उठण्याची वेळ झाली. ' हें ऐकतांच तानू एकदम दचकून स्वप्नांतून एकाएकीं जागा झाला.

वर सांगितलेला सर्व प्रकार खरा नसून केवळ स्वप्नसृष्टींतला आहे

अशी त्याची खातरी झाली. त्यानें आपले डोळे उघडले. फरासखान्यावरील कामदार त्याच्या मंचकाजवळ अदबानें बसलेले त्याच्या दृष्टीस पडले. स्वप्नामुळे होत असलेला आनंद पार मावळून गेला. आपण राजे आहोंत. अद्याप आपण बंदिवान् आहोंत. या गोष्टीचा पुन्हा त्यास प्रत्यय आला. सर्व शयनागार सरदारांनीं व दासदासींनीं गच्च भरून गेलें. तानू बिछान्यावर उठून बसून सर्वांकडे आश्चर्ययुक्त मुद्रेने पाहूं लागला.

इतक्यांत एक कामगार पुढें येऊन तानूचें अंगावर प्रभातकाळचा पोषाख चढवूं लागला. पोषाखाचे काम चालूं असतां दुसरा एक कामदार महाराजांना वडिलांच्या निधनानें झालेल्या दुःखाचें शांतवन करूं लागला. आरंभाला एक कपडा एका कामगारानें सुवर्ण पेटिकेंतून काढला. तो एकाच्या हातून दुसऱ्याच्या हातांत असा सुमारें पंधरा कामदारांच्या हातून सोळव्या कामदाराच्या हातांत आला. हा विधी पाहून तानूला आग लागलेल्या घराची आठवण झाली. तेथेंही घराची आग विझवण्याकरितां पाण्याच्या घागरीं दहावीसजणांच्या हातांतून संचार करून शेवटीं मुक्कामास पोहोंचत असलेल्या त्यानें अनेक वेळ पाहिल्या होत्या.

प्रत्येक कपड्याचा इतका संस्कार होत असे. या संस्कारानें तानू अगदीं कटाळून गेला. शेवटीं 'हाच आपला शेवटचा झगा' असें एका चाणाक्ष सेवकानें त्याच्या कानांत हळूंच सांगितलें. तेव्हां त्याला अंमळ धीर आला. पोषाक झाल्यानंतर पोषाकी कामदारांनीं तानूच्या पायांत घालण्यासाठीं पायमोजे काढले. तो पायमोजा एकाच्या हातांतून दुसऱ्याच्या हातांत अशा थाटानें तानूच्या अगदीं जवळ असलेल्या कामदाराच्या हातांत जाऊन पोंहोचला. त्याला एक डाग पडाला आहे असें त्या कामदाराच्या नजरेस येतांच त्यानें तो पुन्हा परत रवाना केला. प्रत्येकानें त्या मोज्याकडे एकदां पाहून आश्चर्य दर्शविलें. बऱ्याच वेळानें हा नेपथ्यविधी होऊन तानू एकदाचा बिछान्यांतून सुखरूप बाहेर पडला. इतक्यांत मुखप्रक्षालनाची तालीम सुरू झाली. एक अधिकारी त्याच्या हातावर पाणी ओतीत होते. दुसरे त्याचें तोंड चोळीत होते व तिसरे रुमालानें तें पुशीत. हें यानंतर केस विंचरण्याचा विधी होऊन तानूनें सर्व लव्याजम्यासह उपहारगृहांत प्रवेश केला. उपहारोत्तर स्वारी दरबारच्या दिवाणखान्यांत गेली. बंदीजनांच्या जयघोषांत महाराज सिंहा-

सनावर अधिष्ठित झाले. महाराजास वेळोवेळीं पोक्त सल्ला देण्याकरितां सरदार हरिताक्ष हे सिंहासनापासून थोडयाच अंतरावर बसले होते. माजी महाराजांचे और्ध्वदेहिक संस्कार यथाविधि करण्याचा ठराव प्रधान मंडळानें महाराजांपुढें आणला. त्या ठरावांतील एक कलम ऐकून तानू अगदीं बुचकळ्यांत पडला. सरदार हरिताक्ष यांचे कानाशीं लागून तो ह्मणाला—महाराजांचा दफनविधी कोणत्या दिवशीं व्हावयाचें ठरलें आहे ?'

'आणखी दोन आठवडयांनीं, महाराज.'

'काय इतके दिवस ते प्रेत राहील काय ?'

बिचाऱ्या तानूला राजघराण्यांतल्या चालीरीती काय माहीत ! कोणी मेलें कीं, त्याला ताबडतोब दोघातिघांनीं उचलून पुरून टाकावयाचें असाच प्रकार कंगालपुऱ्यांत त्याच्या दृष्टीस पडे. तेव्हां महाराजांचें प्रेत दोन आठवडे तसेंच ठेवण्याचा त्यांचा बेत ऐकून त्यांस स्वाभाविकच आश्चर्य वाटलें हरिताक्ष मामांनीं त्याची थोडक्यांत समजूत केली.

“ दफनविधी व उत्तरकार्य यांस मंजुरी मिळाल्यानंतर “ उदईक परदेशाच्या वकीलांची मुलाखत व्हावयाची आहे. ” असें एका कामगारानें दरबारांत जाहीर केलें.

हें ऐकतांच तानून हरिताक्ष मामाकडे दृष्टिक्षेप करितांच मामा तानूच्या कानांत ह्मणाले ' ते वकील आपल्यावर आलेल्या प्रसंगाबद्दल सहानुभूती प्रदर्शित करण्याकरितां आलेले आहेत. तेव्हां त्यांच्या मुलाखतीस आपण अनुमति द्यावी.'

तानूनें सांगितल्याप्रमाणें केलें. त्यानंतर दुसरे एक कामगार येऊन त्यांनीं माजी महाराजांच्या गेल्या सहा महिन्यांच्या खासगी खर्चाचा हिशेब दरबारापुढें ठेवला. महाराजांचा एकंदर खर्च चार लक्ष झाला हें ऐकतांच तानूनें आश्चर्यानें एकदम तोंड उघडलें व तो झपाट्यानें धापा टाकूं लागला. या रकमेपैकीं तीन लक्ष रुपये अद्याप द्यावयाचे आहेत हें ऐकून तर तो अगदीं गर्भगळीत होऊन गेला. माजी महाराजांची तिजोरी रिती असून त्यांच्या बाराशें सेवकांचा कित्येक महिन्यांचा पगार थकला आहे हें ऐकून तानू मोठ्या त्वेषानें ओरडून ह्मणाला:—

'नोकरांचा पगार भागत नाहीं तर त्यांना रजा देणेंच चांगलें नव्हे काय? वास्तविक इतक्या नोकरांचा कांहींएक उपयोग नाहीं. कारण राजे ह्मणजे कांहीं निर्जीव बाहुली नव्हत. त्यांनाही हात पाय आहेत. प्रसंगवशात् त्यांचा उपयोग करण्यास ईश्वरानें त्यांना कांहीं प्रतिबंध केला नाहीं. तेव्हां माझें असें ह्मणणे आहे कीं, निर्वाहापुरते नोकर ठेवून बाकीच्या सगळ्यांचें विसर्जन करावें. मंडई शेजारी एक टुमदार हवेली आहे ती पाहिजे तर भाड्यानें घेऊन—'

इतक्यांत मामांनीं त्याच्या खांद्याला जरा दाबलें; त्या बरोबर तो लाजून थांबला. तानूचें भाषण विपरीत झालें असें आपणांस वाटल्याचें दरबारांतील कोणीही मनुष्यानें आपल्या चर्येवर दिसूं दिलें नाहीं.

ह्याशिवाय माजी महाराजांनीं कित्येकांना पदव्या, देणग्या व जहागिरी देऊं केल्या होत्या त्या त्यांना जाहीररीतीनें देण्यासाठीं दिवस मुक्रर ठरविण्यांत आले. जहागिरी देणग्या वगैरे देण्यापूर्वी प्रथम राजाच्या कर्जाची वाट लावावी अशी सूचना करण्याच्या बेतांत तानू होता; परंतु, मामांनीं पुन्हा त्याच्या खांद्यास दाबल्यानें तो गप्प बसला. व त्यानें मुकाट्यानें याही कामास आपली मंजुरी दिली. तानूला आज मोठा अधिकार प्राप्त झाला होता. लोकांना जहागिरी सरंजाम वगैरे तो भडाभड देत होता. आपल्या आईलाही एक छोटीसी जहागीर द्यावी. असा विचार त्याच्या मनांत आला. परंतु, आपण नांवाला मात्र राजे आहोंत. खरा अधिकार वृद्ध मुत्सद्यांच्या हातांत आहे ही गोष्ट त्याच्या लक्षांत येतांच त्याला पराकाष्ठेचें दुःख झालें. आपल्या आईचें जर आपण दरबारांत नांव काढूं तर वेडाबद्दल पुन्हा आपला उपहास मात्र होऊं लागेल. आपली आई आहे असें जर आपण सांगूं तर त्याच्यावर आधीं कोणाचा विश्वासही बसणार नाहीं. आपण नांवाला मात्र राजे आहोंत. परंतु वस्तुतः आपली स्थिती एकाद्या बंद्या गुलामाप्रमाणें पराधीनतेची आहे, ही सर्व गोष्ट त्याच्या लक्षांत येतांच त्याचें हृदय दुःखानें ग्रस्त होऊन गेलें.

दरबारचें ठराविक काम चालूंच होतें. तेथें कित्येक अर्जांची सुनावणी झाली. कित्येक जाहीरनामे वाचण्यांत आले. कित्येक सनदा देण्यांत आल्या व अनेकप्रकारचे कागदपत्रही दरबारपुढें ठेवण्यांत आले. हा सर्व नीरस

प्रकार पाहून तानू आपल्या मनांत ह्मणाला “ ईश्वराचे येथें असा अपराध मी काय केला आहे कीं त्यानें मला स्वतंत्रतेंतून काढून या खोट्या राजपदावर बसवावें व मला अखंड दुःख भोगावयास लावावें ! ” शेवटीं त्याचें डोकें अगदीं भांबावून गेलें. तो अगदीं निस्तेज दिसूं लागला. दरबारची ही भगभग एकदाची केव्हां संपते असें त्यास होऊन गेलें. त्याला डुकल्याही येऊं लागल्या. तें पाहून प्रधानानें दरबार बरखास्त केला.

तिसरे प्रहरीं तानूच्या भेटीस राजकन्या आल्या होत्या. त्यांच्याशीं त्याचें बराचवेळ संभाषण झालें. त्या गेल्यानंतर त्यास थोडा विश्रान्तवेळ सांपडतो न सांपडतो तोंच त्याच्यापुढें एक बारावर्षांचा मुलगा हजर करण्यांत आला. तो मुलगा भीतभीत त्याचे पुढें आला व खालीं मान घालून धरित्रीकडे पहात स्वस्थ उभा राहिला. कांहीं वेळ त्याच्याकडे अगदीं सूक्ष्मदृष्टीनें पाहून तानू ह्मणाला “ मुला, तूं कोण आहेस ? व तुझें येथें काय काम आहे ? ”

मुलगा मोठया अदबीनें ह्मणाला “ मी आपल्यासाठीं शिक्षा भोगणारा मुलगा आहे. ”

“ काय ? माझ्यासाठीं शिक्षा भोगणारा ? ”

“ होय महाराज तोच मी. माझें नांव मुरलीधर ! ” तानूच्या हा मुलगा ओळखीचा नव्हता. हा आपल्या ओळखीचा आहे अशी बतावणी करावी तर तेंही आपल्या गळयांत येणार. बरें, ओळखीचा नाहीं ह्मणावें तरी तेंही कोणी खरें मानणार नाहीं. असा त्याला मोठा पेंच येऊन पडला. शेवटीं त्याला एक उपाय सुचला. तो आपल्याशीं ह्मणाला, ‘ आतां असें अडून बसलां उपयोगीं नाहीं. आपल्यावर असे वरचेवर प्रसंग येणार. नेहमींच जवळ मनुष्य असेल असें कांहीं नाहीं. आतां कांहीं कामें स्वतःच्या जबाबदारीवर उरकूं लागलें पाहिजे. ’ असा विचार करून तो मुलास ह्मणाला “ हें पहा ! तूं कोण ? याबद्दल आतां मला थोडी आठवण होऊं लागली आहे. माझी स्मरणशक्ती अलीकडे अगदीं बिघडून गेली आहे. ”

हें ऐकून मुलगा ह्मणाला ‘ हुजूर, आपल्यावर हा मोठा खडतर प्रसंग आला आहे. ’

‘ माझ्या स्मरणशक्तीची अशी स्थिती कां व्हावी हें मलाही मोठें गूढ आहे. परंतु तूं त्याची धास्ती बाळगूं नकोस. माझी स्थिती दिवसेंदिवस सुधारत

चालली आहे. थोडासा मला धागा समजला कीं पूर्वापर संबंध तेव्हांच माझ्या लक्षांत येतो. तुझें काय काम आहे हे थोडक्यांत सांग.'

'माझें काम कांहीं मोठें महत्वाचें नाहीं. दोन दिवसांपूर्वी सकाळीं आपले शिक्षक आपल्याला उर्दू शिकवीत असतां आपण तीन वेळ चुकलात. आपल्याला या गोष्टीचे स्मरण आहे काय?'

'होय. ती गोष्ट मला थोडथोडी आठवते. (उर्दू कशाशीं खातात हे सुद्धां मला माहीत नाहीं. पण आतां थापा मारल्याशिवाय चालायचेंच नाहीं.) होय. मला ते आठवतें. बरें पुढें काय झालें?'

'यामुळे आपले शिक्षक आपल्यावर रागावले. व त्याबद्दल मला चाबकानें खरपूस चोप देण्याबद्दल त्यांनीं आश्वासन दिले आहे..'

'काय? माझ्या चुकीबद्दल तुला मार?'

'महाराजांना पुन्हा विस्मृति पडली. जेव्हां जेव्हां आपली चूक होते तेव्हां तेव्हां मलाच शिक्षा होते.'

'हो खरेंच. मला त्याचें विस्मरण झालें होतें. तूंच माझा शिक्षक आहेस. आणि मीं आपल्या धड्यांत चुकी केली ह्मणजे तूं आपलें काम नीट करीत नाहींस असें समजून ते तुला शासन देतात.'

'हे काय महाराज भलतेंच बोलतां! आपले शिक्षक होण्याची माझी योग्यता तरी आहे काय?'

'अरे, मग हें लचांड आहे तरी काय? माझ्या चुकीबद्दल तुला प्रायश्चित्त कां? मला वेड लागलें आहे कीं तुला वेड लागलें आहे? ह्मणावें तरी काय!'

'महाराज, हें कोडें आपणाला वाटतें तितकें अवघड नाहीं. आपण भूपति आहांत तेव्हां आपल्या पाठीला कोणीही स्पर्श करणें युक्त नाहीं. ह्मणूनच जेव्हां जेव्हां आपण चुकी करतां तेव्हां तेव्हां त्याबद्दलचें शासन भोगण्यास माझी योजना झालेली आहे. आणि त्यांत कांहीं गैरही नाहीं. कारण माझा याच्यावरच चरितार्थ चालतो.'

ही सर्व विलक्षण हकीकत हा मुलगा मोठ्या शांतपणानें सांगत आहे हे पाहून तानूस फारच आश्चर्य वाटलें. तो ह्मणा— आहे बुवा. असला धंदा आपण पूर्वी कधीं ऐ...

बद्दल शेंडी विंचरून घेण्यास व पोषाक करण्यासही माणसें कशी नेमण्यांत आलीं नाहींत; याबद्दलही मला आश्चर्य वाटूं लागलें आहे. (मोठ्यानें) कायरे, मग शिक्षकानें आश्वासन दिल्याप्रमाणें तुला चोप मिळाला काय ? '

" नाहीं, महाराज. आज मला शिक्षा मिळावयाची आहे. आज सर्व देशावर जो प्रसंग आला आहे त्याचा विचार करतां माझी शिक्षा कदाचित माफही होण्याचा संभव आहे. माझ्या वतीनें शिक्षकाजवळ रदबदली करण्याचें आपण मला अभिवचन दिलें होतें, त्याची महाराजास आठवण करण्यास मी येथें आलों आहे. "

' तुला शिक्षा माफ व्हावी याबद्दल शिक्षकाजवळ रदबदली करावयाचें मी तुला वचन दिलें होतें असेंच तुझें ह्मणणें ना ? '

' सरकारला बरोबर स्मरण झालें. '

' पाहिलेंस ना ! माझी स्मृती कशी सुधारत चालली आहे ती. ठीक आहे ! तूं निर्धास्त ऐस. तुला मुळींच चोप खावा लागणार नाहीं अशी मी तजवीज करीन. समजलास ! '

' महाराज, मैज गरीबावर आपण जो हा उपकार केलात त्याबद्दल आपले आभार मानावेत तितके थोडेच आहेत. तरीपण महाराजापाशीं मला आणखी एक विनंती करावयाची आहे. महाराजांचा रोष होणार नाहीं—'

मुरलीधर आपल्या मनांतली गोष्ट सांगण्यास कचरतो आहे असें पहातांच तानूनें त्यास धीर दिला, तेव्हां मुलगा पुढें ह्मणाला ' महाराज, आतां मी आपल्या मनांतली गोष्ट उघडपणें सांगतों. महाराज आपण आतां युवराज राहिला नाहीं. आतां आपण सिंहासनारूढ झालात. आपण कराल ती पूर्व दिशा. एवढा अधिकार आपणांस प्राप्त झाला आहे. यापुढें आपण अध्ययनाची दगदग आपल्या मागें ठेवाल असें वाटत नाहीं. राज्याच्या घडामोडींत एकदा आपण शिरला ह्मणजे आपल्याला वेळही सांपडणार नाहीं. मला फार कठीण दिवस आले. कारण, आपण अध्ययन सोडलेत ह्मणजे माझा चरितार्थाचा धंदा नाहींसा होऊन माझ्यावर अवलंबून असलेल्या माझ्या लहान भावंडांचा उपासमार होईल. '

' काय तुझा उपासमार होणार ? तो कसा ? '

' माझ्या पाठीवर माझा चरितार्थ चालतो. तिला जर कांहीं काम रहा-

णार नाहीं तर माझ्या पोटाला कसें मिळणार ? आपण अभ्यास सोडलात ह्मणजे मार खाण्याकरितां मुलगा ठेवण्याचें आपल्याला कांहीं कारण रहाणार नाहीं. माझी महाराजांच्या चरणाजवळ एवढींच विनंती आहे कीं त्यांनीं मला घालवून देऊं नये. '

ही त्याची हकीकत ऐकून तानूचें हृदय द्रवून गेलें. राजास शोभेशा उदारतेनें तो ह्मणालाः—

' याबद्दल तुला यत्किंचित्ही काळजी वाटूं देऊं नकोस. तुझी नोकरी तुझ्या तहहयात कायम राहून ती तुझ्या घराण्यांत वंशपरंपरा निरंतर चालू राहील. तूं असा खिन्न होऊं नकोस. मी आपलें अध्ययन पूर्वीप्रमाणें चालू ठेऊन आपल्या धंद्यांत इतक्या चुका करीत जाईन कीं तुझ्या नोकरीचें कारण पदोपदीं पडून तुझ्या वेतनाचें मान थोडक्याच अवधींत तिपटीवर वाढेल ! '

हें ऐकतांच मुरलीधर कृतज्ञतेनें ह्मणाला " महाराज, आपल्या थोरपणास साजेल असाच आपण मजवर अनुग्रह केलात. आज महाराजांनीं माझ्या व माझ्या वंशजांच्या अन्नाची निरंतरची तरतूद करून ठेवली. "

ह्या मुलास आपण जर हाताशीं धरलें तर याचा आपणांस पदोपदीं उपयोग होईल असें वाटून तानू त्यास बोलण्यास अधिकच प्रोत्साहन देऊं लागला. मुरलीधरासही वाटलें कीं आपल्या सहवासानें महाराजांची स्मरणशक्ती ताळ्यावर येत चालली. कारण महाराजांच्या अध्ययनासंबंधानें तो पूर्वीच्या गोष्टी जेव्हां सांगत सांगे तेव्हां महाराजास त्यांच बरोबर स्मरण होई ! सुमारें तासभर संभाषण झाल्यानंतर या मुलाकडून तानूला दरबारसंबंधानें बरीच माहिती मिळाली. नवीन आयुष्यक्रमांत आपली घडगत लागण्यासाठीं या मुलाला आपण आपले गुरू करावें असा तानूनें संकल्प ठरवून त्या मुलाची गांठ दिवसांतून एकदा तरी पडावी असा घाट त्यानें आपल्या सेवकांकडून प्रत्यहीं घडवून आणला. मुरलीधर महाराजांचा निरोप घेऊन दिवाणखान्याबाहेर पडला असेल नसेल तोंच सरदार हरिताक्षांची स्वारी आली. सरदार हरिताक्ष ह्मणाले:—

' महाराज, आपल्या प्रकृतीस विकार झाल्याची बातमी बरीच फैलावली आहे. तेव्हां प्रधानमंडळानें सर्वानुमतें असें ठरवलें आहे कीं, आपण एकटे

न जेवतां वाड्यांतील सरदार, दरकदार, मानकरी वगैरेंच्या पंक्तीस बसून भोजन करावें. तेथें आपली विकृती कोणाच्याही नजरेस येऊं नये यासाठीं सेवकजन ठेवून योग्य ती तरतूद ठेवण्यांत येईल. '

यानंतर हरिताक्षांनीं दरबारच्या बऱ्याच चालीरीती तानूस समजावून सांगितल्या. यापैकीं फारच थोड्या तानूस नव्या अशा होत्या. कारण मुरलीधरापासून त्यासंबंधानें त्याला बरीच आगाऊ माहिती मिळाली होती. आपल्याला आतां पक्तींत जेवावें लागणार ही गोष्टही त्याला मुरलीधराकडून आगाऊच कळली होती. आपण अर्धें वाक्य बोललों कीं हा त्याचा उत्तरार्ध बरोबर सांगतो असें हरिताक्षांच्या कित्येक वेळा नजरेस आल्यावरून महाराजांची प्रकृती खरोखर सुधारली असें त्यास वाटूं लागले व त्यामुळें त्यांना आनंदही होऊं लागला.

महाराजांची प्रकृती खरोखरच सुधारली आहे कीं काय याबद्दल सरदार हरिताक्ष कित्येक वेळां पडताळाही पहात व बऱ्याच प्रसंगीं प्रकृती खरोखर सुधारत असल्याचीं चिन्हे त्यांच्या कित्येक प्रसंगीं नजरेस आलीं. शेवटीं हे सरदार तानूस मोठ्या आतुरतेनें ह्मणालेः—

' आतां मला उमेद वाटते कीं आपण डोक्यास जरा तसदी घ्याल तर सील कोठें ठेवलें आहे याचेंही आपणांस स्मरण होईल. आतां कांहीं त्या सीलचें विशेषसें महत्व नाहीं.—कारण, आजपासून आपल्या नांवाचें सील अमलांत आलें. '

हें ऐकून तानू गोंधळून गेला. सील ह्मणजे काय ह्याचीच त्याला कल्पना येईना. तो ह्मणालाः—

' कांहो, सील ह्मणजे कशासारखें असतें ? '

' घोडें पुन्हा पूर्वपदावर आलें. छे ! ह्यांना कांहींतरी प्रबळ विकार झाला आहे हें खास ' असे सरदार हरिताक्षांच्या तोंडून स्वाभाविकपणेंच उद्गार निघाले.

———

प्रकरण १५ वें.

तानूचें राज्यपद.

दुसरें दिवशीं परदेशचे वकील तानूच्या भेटीस आले. वकीलांचा थाट व दरबारचा अपूर्व देखावा पाहून तानूस फारच कौतुक वाटलें. परंतु, वकीलांची भाषणें लांब लांब असल्यामुळें मुलाखतीचें चऱ्हाट लवकर संपेना. हें पाहून तानू अगदीं त्रासून गेला. हरिताक्ष शिकवीत त्याप्रमाणें तो बोलत असे. त्याचा चेहरा राजाप्रमाणें होता तरी आपण राजे आहोंत अशी त्याच्या मनाची पक्की भावना न झाल्यामुळे त्याच्या वागणुकींत मधून मधून विलक्षणपणा दिसून येईच. अखेर मुलाखतीचें प्रकरण कसेंबसें शेवटास गेलें.

त्या दिवशींचा बहुतेक वेळ दरबारच्या कामांतच गेला. विहारभूमींत जाऊन सुमारें दोन तासपर्यंत त्यानें विश्रांति घेतली. तो कोठेंही गेला तरी औपचारिकबंधनांचें सुदर्शन त्याच्या मागें एकसारखें लागलें होतेंच. त्यामुळें त्याला मोकळेपणा असा कोठेंच सांपडेना. आणि ह्मणूनच त्याच्या जिवास चैन कसें तें पडेना. मुरलीधराशीं बोलण्यांत जो वेळ जाई तेवढा मात्र त्यास अत्यंत मनोरंजक व बोधप्रद वाटत असे.

याप्रमाणेंच तानूच्या राजेपणाचा तिसरा दिवसही गेला. या दिवसाच्या कार्यक्रमांत ह्मणण्यासारखा फरक झाला नाहीं तरी राजेपणाचा त्यास अधिकाधिक सराव होऊं लागला. चवथे दिवसाची मात्र त्याला भीती वाटली. तो दिवस ह्मणजे आपल्या नष्टचर्याचा प्रारंभ असें त्याच्या मनानें घेतलें होतें. सरदार व दरकदार यांच्या पंक्तीस बसून जेवण्याचा आरंभ त्याच दिवशीं व्हावयाचा होता. परदेशी कारस्थानांचें धोरण कसें ठेवावयाचें हें ठरण्यासाठीं जो दरबार भरावयाचा होता त्या दरबारासही तानूस हजर रहावयाचें होतें. त्याच दिवशीं सरदार हरिताक्षांची महाराजांच्या पालनकर्त्यांच्या जागीं नेमणूक व्हावयाची होती. या सर्व कारणांमुळें राजेपणाचा चवथा दिवस तानूस मोठा भयप्रद वाटे.

या दिवसाबद्दल तानूची कोणतीही भावना असली तरी तो नित्यक्रमा-

प्रमाणें वक्तशीर उगवलाच. त्या दिवशीं तानूचें मन एकसारखें चिंतातूर होतें. कांहीं केल्या त्याच्या मनास करमणूक ह्मणून होईना. दुपारीं तो सरदार हरिताक्षासमवेत दरबारांत गेला. तेथें शेंकडो लोक महाराजांस मुजरा करण्याकरितां येत जात होते. इतक्यांत राजवाड्यापासून कांहीं अंतरावर रस्त्यात गोंगाट झालेला तानूच्या कानावर आला. हा राजाचा पोषाख काढून तात्काळ त्या गलबल्यांत जाऊन मिळावें अशीही तानूस बुद्धी झाली. खिडकीशीं जाऊन तो ह्मणाला ' रस्त्यांत काय चाललें आहे हें मला समजेल तर केवढी मौज होईल ! '

यावर सरदार हरिताक्ष नम्रपणानें ह्मणाले, " महाराज, आपण राजे आहांत. आपण असल्या हलक्यासलक्या गोष्टींची उठाठेव स्वतः करूं नये. तें काम आपण आमच्यासारख्या सेवकावरच सोंपवावें. "

तानू ह्मणाला, " वः; मग तर छान सोय झाली. जाग्यावरून न हालतां बाहेर काय चाललें आहे याची सर्व हकीकत मला जागच्याजागेवर समजेल तर केवढी बहार होईल ! "

यावर रस्त्यांत कशाची गडबड आहे याची चवकशी करून येण्यासाठीं हरिताक्षांनीं एक दूत रवाना केला. थोड्याच वेळानें ता येऊन सांगूं लागला कीं ' एक पुरुष, एक स्त्री व एक मुलगी या तिघांना वधस्तंभाकडे घेऊन जात आहेत. ती मौज पहाण्याकरितां लोकांची ही गर्दी त्यांचे मागें चालली आहे. '

हें ऐकतांच तानूचें हृदय विकल होऊन गेलें. या लोकांनीं कांहीं गुन्हा केला आहे कीं काय, त्यांना देण्यांत आलेली शिक्षा गैरवाजवी आहे कीं काय वगैरे गोष्टींचा विचार त्याच्या मनास शिवलासुद्धां नाहीं. त्याच्या अंतःकरणांत फक्त दयेनेंच आपलें प्राबल्य बसविलें. या दयेच्या भरांत आपण राजे नसून राजाची केवळ छाया आहोंत या वस्तुस्थितीचाही त्यास विसर पडून त्यानें त्या मनुष्यांना घेऊन येण्यासाठीं हुकूम फर्माविला.

अशाप्रकारचा हुकूम करण्यांत आपल्या हातून चूक होत आहे असें त्यास तात्काळ वाटून तो आपला हुकूम परत घेण्याच्याही विचारांत होता. परंतु आपणास विलक्षण वाटणाऱ्या हुकमानें दरबारांतील कोणाही माणसास आश्चर्य वाटल्याचें चिन्ह दिसत नाहीं असें पाहून तो स्तब्ध बसला. तानूनें

असा हुकूम करतांच एक सेवक त्या मनुष्यांना आणण्याकरितां तावडतोब रस्त्यावर धांवत गेला. ते पाहून तानूला आपल्या अधिकाराबद्दल मोठें भूषण वाटलें. तो आपल्याशींच ह्मणाला ' मागें मीं जें बुकांत वाचलें होतें तें आज प्रत्यक्ष माझ्या अनुभवास येत आहे. पुस्तकें वाचून त्यावेळेस मी लटकेच हुकूम सोडीत होतों व ते अक्षरशः पाळण्यांत आले अशीही मी आपल्या मनाची लटकीच समजूत करून घेत होतों. परंतु आतां मात्र केवळ इच्छामात्रेंकरून हवी ती गोष्ट घडवून आणण्याचा अधिकार मला ख़रोखरच प्राप्त झाला आहे. '

इतक्यांत दिवाणखान्याची दोन्हीं दारें उघडलीं. दिवाणखान्यांत प्रवेश करणाऱ्या सरदारांच्या नांवांचा पुकारा होऊं लागला. थोडक्याच वेळांत सुमारें निमा दिवाणखाना माणसांनीं भरून गेला. परंतु, तानूचें याकडे बिलकूल लक्ष नव्हतें. त्याचे मनांत निराळेच विचार चालू होते. तो दिवाणखान्याच्या द्वाराकडे मात्र वरचेवर मोठ्या अधीरपणानें पाही. इकडे दरबारांतील माणसेंही आपापसांत निरनिराळ्या विषयासंबंधानें चर्चा करूं लागली. थोड्याच वेळांत लष्करी शिपायांच्या पावलांचा परिमित ध्वनि ऐकूं येऊं लागला. आणि ते तिघे गुन्हेगार रक्षकांसह राजापुढें येऊन उभे राहिले. या तिघांकडेही त्यानें नीट लक्ष लावून पाहिलें. गुन्हेगार पुरुषाकडे पाहून तो डोकें खाजवीत ह्मणाला " या मनुष्याला पूर्वी कधीं पाहिलें आहे असें वाटतें. कोठें आणि केव्हां हें मात्र आठवत नाहीं. " त्या मनुष्यानेंही एकदा वर पाहिलें व पुन्हां तो पूर्ववत् खालीं पाहूं लागला. त्याचा चेहरा तानूच्या पुन्हा एकदा दृष्टीस पडतांच तो आपल्याशींच ह्मणाला " आतां तर संशयच उरला नाहीं. विठू कामाठी नदींत बुडत असतां त्यास ज्यानें वर काढलें तोच हा गृहस्थ. असें थोर कृत्य करणारा गृहस्थ एवढ्या भयंकर गुन्ह्यांत सांपडावा हें आश्चर्य होय. या गोष्टीचें मला स्मरण रहाण्याचें कारण एवढेंच कीं त्यावेळीं आह्माला घरीं चांगला खरपूस चोप मिळाला होता. "

' स्त्री व मुलगी या दोघींना कांहीं वेळ दिवाणखान्याबाहेर घेऊन जावें. ' असा तानूचा हुकूम आल्यावरून त्यांना बाहेर पोहोंचवण्यांत आलें.

तानूनें नगररक्षकाधिकाऱ्याकडे पाहून ह्मटलें " कायहो, या मनुष्यानें काय गुन्हा केला ? "

कामदारानें नम्रपणानें उत्तर केलें ' महाराज, महाराजांच्या एका रयतेस यानें विषप्रयोग करून ठार मारलें. '

" काय ! यानें एवढा भयंकर गुन्हा केला ! बरें, हा पुराव्यानें शाबीत झाला आहे काय ? "

' पुरावा अगदीं शहाजोग होता; महाराज. '

तानू चिंतातुर मुद्रेनें ह्मणाला ' जा, याला घेऊन जा. यानें आपल्या हातानेंच आपल्यावर मरण ओढून घेतलें आहे. चर्येवरून हा मनुष्य मोठा थोर असावा असें दिसतें. '

यावर कैद्यानें हात जोडून मोठ्यानें ह्मटलें ' महाराज, मज गरीबावर दया करावी. मी अगदीं निरुपद्रवी आहे. माझ्या विरुद्ध पुरावाही अगदीं लंगडा झाला आहे. तरी पण त्याविरुद्ध मी तक्रार करीत नाहीं. माझ्याविरुद्ध जो निकाल झाला आहे तो आतां कदाचित् फिरवतांही येणार नाहीं. तरी पण महाराजांच्या चरणापाशीं मी एक विनंती करतों; ती एवढीच कीं, महाराजांनीं मला फांसावर चढवण्याचा हुकूम द्यावा. '

हें ऐकून तानूस फारच अचंबा वाटला. हा अशाप्रकारची विपरीत विनंती करील हें त्याच्या स्वप्नींही नव्हतें. तो ह्मणाला ' काय. फांसावर-चढवण्याविषयीं हुकूम करावा अशी तूं मला विनंती करतोस ! ती तर शिक्षा तुला झालीच आहे. मग मीं त्यांत नवीन काय करावयाचें आहे ! '

' महाराज, आपण ह्मणतां तशी गोष्ट नाहीं. अधणाच्या पाण्यांत उकळून मला ठार मारावें अशी मला शिक्षा सांगण्यांत आली आहे. '

हें ऐकतांच तानूनें खुर्चीवरून एकदम टाणकन् उडी मारली. तो ह्मणाला " भल्या माणसा, तूं केलेली विनंति मीं मान्य केली आहे. शंभर माणसांना तूं जरी विषप्रयोग केला असतास तरीही तुला इतकी भयंकर शिक्षा देणें योग्य नव्हतें. "

यावर तो गुन्हेगार ह्मणाला " महाराज, मी आपले उपकार जन्मोजन्मी विसरणार नाहीं. "

हरिताक्षाकडे वळून तानू ह्मणाला " कायहो, या गुन्हेगारास अशी भयंकर शिक्षा देण्याचें काय कारण बरें ? "

' महाराज तसा कायदाच आहे. कांहीं देशांत खोटीं नाणीं पाडणारास तेलांत कढवून ठार करतात. व ते देखील गुन्हेगारास तेलांत एकदम सोडण्यांत येत नाहीं. त्याच्या मानेला एक दोरी बांधून त्यावर टांगून प्रथम त्याचे पाय तेलाच्या कढईत सोडण्यांत येतात. मग तंगडया, मग कंबर मग— '

' बस्. पुरें झालें वर्णन. माझ्यानें तें यापुढें ऐकवत नाहीं. दुसऱ्या देशांत पाहिजे त्या अमानुष शिक्षा असोत. परंतु, आपल्या देशांत असे कांहीं असुरी प्रकार असतील तर ते ताबडतोब बंद करून टाका. '

सरदार हरिताक्ष ह्मणाले ' महाराज, आपल्या तोंडून हे शब्द निघालें तेव्हां हे प्रकार याक्षणापासून बंद झालेच असें समजा. महाराज, या दयाळुत्वाबद्दल आपलें नांव इतिहासांत चिरकाळ संस्मरणीय होऊन राहील. '

रक्षकाधिकारी त्या गुन्हेगारास घेऊन जाण्याच्या बेतांत होते. इतक्यांत थांबण्याबद्दल खूण करून तानू त्यास ह्मणाला:—

' थांबा अशी घाई करूं नका. याप्रकरणाची मला आणखीं चवकशी करावयाची आहे. आपल्या विरुद्ध पुरावा कांहीं चांगला नव्हता असें या गुन्हेगाराचें ह्मणणें आहे. त्याबद्दल तुह्माला काय माहिती आहे ? '

' महाराज, एके दिवशीं एका खेड्यांत हा मनुष्य एका अजारी माणसाच्या घरांत शिरला, त्यावेळीं घरांत अजारी मनुष्य एकटाच निजलेला होता. तेथें कांहीं वेळ राहून हा मनुष्य बाहेर आला. व आपल्या रस्त्यानें चालता झाला. हा गेल्यानंतर सुमारें एक तासाचें आंत तो अजारी मनुष्य मयत झाला. त्यास विषप्रयोग केला असावा असें डॉक्टरच्या परिक्षेंत शाबीत झालें. '

' यानें विषप्रयोग केल्याचें कोणी प्रत्यक्ष पाहिलें आहे काय ? '

' नाहीं ! महाराज. '

' मग असल्या भिकार पुराव्यावर या मनुष्यास एवढी भयंकर शिक्षा देण्यास तुह्मी तयार व्हावें, हें खरोखरच अन्यायाचें आहे. '

' महाराज, याला आणखीही कांहीं पुरावा आहे. तो अजारी मनुष्य

विषप्रयोग होऊन मरणार. व तो विषप्रयोग एका तिऱ्हाईत मनुष्याचे हातून होणार आहे असें त्या मनुष्यासंबंधान एका चेटकीकडून अगाऊच भाकीत सांगण्यांत आलें होतें. ज्या तिऱ्हाईत मनुष्याचे हातून विषप्रयोग होणार आहे त्या तिऱ्हाइताचे केस पिंगट असतील असेंही त्या बाईनें सांगितलें होतें. या मनुष्याची चेहरेपट्टी बाईनें दिलेल्या वर्णनाशी तंतोतंत जमते.'

त्या देवभोळेपणाच्या काळांत अशाप्रकारचा पुरावा भक्कम ह्मणून समजण्यांत यावा हें स्वाभाविकच होतें. तानूलाही त्यासंबंधानें असेंच वाटलें. पुराव्यासंबंधानें पहातां आतां कांहीं भानगड राहिली नाहीं अशी तानूचीही खातरी झाली. तरी पण तो गुन्हेगारास ह्मणाला– 'तुला कांहीं सांगावयाचें असेल तर तूं सांग.'

'महाराज, मीं कांहींही सांगितलें तरी त्याचा काय उपयोग होणार? वास्तविक मी निरपराधी आहे. पण त्याबद्दल पुरावा देणें मला अशक्य आहे. मला कोणी स्नेही सोबती असते तर ज्या वेळेस हा गुन्हा घडला त्यावेळेस मी त्या गांवींही नव्हता असा मी पुरावा केला असता. मला कोणी स्नेही सोबती असते तर गुन्हा ज्यावेळीं घडला असें सांगण्यांत येत आहे त्यावेळीं मी नदीकांठावर हिंडत असून माझ्या हातून कोणाचा प्राण घेण्यांत आला नाहीं इतकेंच नव्हे तर त्याचवेळीं मी एका बुडत्या माणसास हात देऊन त्यास जिवदान दिलें.'

'तो दिवस नेमका सांगशील काय?'

'होय महाराज. तो दिवस वर्षप्रतिपदेचा होता. त्यावेळीं सकाळचे दहा वाजले होते.'

'ह्या गुन्हेगारास सोडून द्या. पहातां काय? हा राजाचा हुकूम आहे. असल्या शिळपट पुराव्यावर तुम्ही एका निरपराधी माणसास फांसावर चढवण्यास उद्युक्त व्हावें ही मोठ्या शरमेची गोष्ट आहे.'

महाराजांच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच दरबारांतील सर्व लोक एकमेकांकडे टकटक पाहूं लागले. इतके मार्मिकपणानें बोलणारास व मोठ्या शिताफीनें खरं शोधून काढणारास कोणी तरी वेडा ह्मणेल काय? छे. छे. वेडाचें तर नांवच काढावयास नको. महाराजांच्या मेंदूस कसलाही विकार

झाला असला तरी त्यांची बुद्धिमत्ता यत्किंचितही कमी झालेली नाहीं" असे दरबारांतील सर्व लोकांच्या तोंडून उद्गार निघूं लागले.

दरबारांत आपली प्रशंसा होत आहे हें पाहून तानूला मोठी थोरवी वाटली. त्यानंतर त्यानें दुसऱ्या दोन गुन्हेगारांना दरबारांत बोलावून आणलें. तो ह्मणाला ' यांचा काय गुन्हा आहे ? '

' महाराज, ही बाई व ही मुलगी ह्या दोघींही भुताटकीचा धंदा करीत असतात. यांच्या वरील गुन्हा पुराव्यानें उत्तम प्रकारें सिद्ध झाला आहे. आणि ह्मणूनच त्यांना फाशीची शिक्षा देण्यांत आली आहे. ' हें ऐकतांच तानूच्या अंगावर शहारे आले. चेटक्या बायांचा तो अंतर्यामीं फार द्वेश करी. तरी पण याही कृत्याची शहानिशा केल्यावाचून रहावयाचे नाहीं असा मनाचा संकल्प करून तो ह्मणाला. 'त्यांनीं हा धंदा कोठे केला व केव्हां केला ? '

' फाल्गून महिन्यांत एकेदिवशीं मध्यरात्रीस एका खिंडारांत ह्यांचे भुताखेताशीं बोलणे चाल्लें होतें. '

हे ऐकतांच तानूच्या अंगावर पुन्हा कांटा आला !

' तेथें त्यावेळेस कोण हजर होते ? '

' ह्या दोघीचजणी. '

' यांनीं आपला गुन्हा कबूल केला आहे काय ? '

' नाहीं. महाराज. '

' मग तुह्माला कसें कळले '

' कांहीं लोकांनीं यांना तेथें जातांना पाहिलें. त्यामुळें त्यांना ह्यांच्याबद्दल वहीम आला. आणि पुढे ज्या गोष्टी घडून आल्या त्यानें हाच वहीम खरा ठरला. भुताखेताशीं यांचा संवाद झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं यानीं आपल्या सामर्थ्यानें एक भयंकर वावटळ उत्पन्न केलें. त्यायोगानें कित्येक घरें उध्वस्त झालीं. यांच्याविरुद्ध आणखी दुसरा कोणता पुरावा पाहिजे महाराज ? '

' प्रकरण मोठें विचार करण्यासारख आहे. कायरे, पण ही बाई त्या वावटळींत सांपडली असेल; नाहीं बर. '

' वा:; हा मोठा मार्मिक प्रश्न आहे ' असें दरबारांतील वृद्ध माणसें ह्मणूं

लागलीं. अधिकाऱ्याला मात्र या प्रश्नांत कांहीं विशेषसें वाटलें नाहीं. त्यानें साधेपणानें उत्तर दिलें:—

' होय! हें काय विचारावें महाराज. बावटळीनें तिचेंही घर पडलें. त्यामुळें ती व तिची मुलगी या दोघींही निराश्रित झाल्या आहेत. '

' मला वाटतें ज्या विद्येनें आपलें स्वतःचेंही नुकसान होत आहे अशी विद्या शिकण्याचे भानगडींत कोणी कधींही पडेल असें मला वाटत नाहीं. असें जर कोणी करील तर तो निखालस वेडा असला पाहिजे. आपण व आपली मुलगी या दोघींचेही जीव धोक्यांत घालण्याकरितां जर हिनें भुताखेताची विद्या साध्य करून घेतली असेल तर ही बाई वेडीच समजली पाहिजे. वेड लागलेलीं माणसें जीं कृत्यें करतात त्याजबद्दल त्यांना जबाबदार धरतां येत नाहीं. कारण, बोलून चालूनच ती वेडी झालेली. युक्तायुक्ततेचा किंवा पात्रापात्रतेचा विचार त्यांच्या ठिकाणीं मुळींच नसतो. अर्थात् या बाईवर कोणत्याही दृष्टीनें गुन्हा शाबीत होत नाहीं. '

महाराजांचें हें शहाणपण पाहून दरबारांतील अनुभवी लोक त्यांची फारच तारीफ करूं लागले. महाराजांना वेड लागलें आहे असें ह्मणतात पण त्यांचें वेड कांहीं चमत्कारिक दिसतें. त्यांच्या वेडापासून अनेक शहाण्यांनीं शहाणपण शिकून जावें असेंच तें अपूर्व वेड दिसत आहे. असे उद्गार कित्येकांच्या तोंडून निघाले.

' या मुलीचें वय काय ? ' असें तानूनें विचारलें.

' महाराज तिचें वय नऊ वर्षांचे आहे '

न्यायाधिशाकडे वळून तानू ह्मणाला ' कायहो, अल्पवयी मुलांनीं केलेले देवघेवीचे किंवा करारनाम्याचे व्यवहार या देशांतील कायद्यानें कायदेशीर ठरतातना ?

महाराज, कायद्यानें वयांत न आलेल्या व्यक्तीनें केलेला कोणताही व्यवहार कायदेशीर समजला जात नाहीं. '

' मग ही मुलगीही अर्थात् निरपराधी आहे '.

हे शब्द ऐकतांच त्या दोघीही मोठ्या आशाबद्ध होऊन महाराजांकडे एकसारख्या पाहूं लागल्या. ही वृत्ति तानूच्याही लक्षांत येऊन तो ह्मणाला—

' कायहो, यांनीं बावटळ कशी उत्पन्न केली ? '

'आपल्या पायांतील पाय मोजे एकदम काढून!'

'काय! वावटळ उत्पन्न करण्यास त्यांना एवढाच तोडगा करावा लागतो! ही मोठी मौज आहे बुवा!'

'होय महराज, हा तोडगा करून तोंडानें त्या कसलासा मंत्र ह्मणतात.'

त्या बाईकडे वळून तानू ह्मणाला 'बाई, मग तो चमत्कार तूं आह्मांला येथें करून दाखविनास!'

हें ऐकतांच दरबारांतील सर्व मंडळी घाबरून गेली. त्यांना वाटलें आपली कांहीं आतां धडगत दिसत नाहीं. आतां हा दिवाणखाना आपल्या अंगावर कोसळून आपली गच्छंति होणार असेंच जो तो ह्मणूं लागला.

बाईची गोंधळलेली मुद्रा पाहून तानू ह्मणाला 'बाई, तूं अशी भिऊं नकोस. तुझ्यावर कांहींही दोष येणार नाहीं. तुझी कला यशस्वी होऊन त्यापासून येथें जरी बरावाईट कांहीं परिणाम झाला तरी तुला यत्किंचितही शासन होणार नाहीं.'

'महाराज' मला ती कला मुळींच येत नाहीं. माझ्यावर हें खोटेंच कुभांड रचण्यांत येत आहे.'

'तूं भिऊन गेली आहेस. अशी भिऊं नकोस. धीर धर; येथें तुझ्या केसालाही कोणी धक्का लावणार नाहीं. . भयंकर वावटळच उत्पन्न झाली पाहिजे असें कोणाचे ह्मणणें नाहीं. त्याचा थोडासा मासला दाखीव ह्मणजे झालें. तूं आपल्या मुलीसह येथून सुखरूप जाशील.'

यावर साष्टांग नमस्कार करून व डोळ्यांत आसवें आणून ती बाई ह्मणाली. "महाराज, खरोखर त्यातलें मला कांहीं समजत नाहीं.'

तानूनें तिला पुष्कळ आग्रह केला परंतु शेवटी त्याचें कांहीं चीज होत नाहीं असें पाहून तो ह्मणाला 'मला वाटतें, ही बाई खरें बोलत आहे. बाई, तूं निरपराधी आहेस अशी आमची खातरी झाली आहे. आतां तुला कशाचीही भिती उरली नाहीं. आतां तूं आपल्या पायांतले पायमोजे काढून टाक.'

याबरोबर तिनें मोठया उल्लसित मुद्रेनें झटदिशी पायमोजे काढून टाकले. आतां कांहीं तरी मोठें संकट उद्भवणार अशा बुद्धीनें सर्वजण अगदीं

भयग्रस्त दिसत होते. परंतु, तसा कांहीं प्रकार झाला नाहीं. धरणीकंपही झाला नाहीं किंवा वावटळही सुटली नाहीं. तेव्हां तानू म्हणाला 'गरीब बिचारी, जा, आपल्या घरीं खुशाल जा. भुताटकीची शक्ती तुझ्या अंगांत नाहीं. पूर्वी कधीं असली तर आतां तरी ती नष्ट झाली आहे. यदाकदाचित् तुझ्या विद्येनें जर पुन्हा उलट खाल्ली तर येथें येऊन मला एक वावटळ उत्पन्न करून दाखविण्यास मात्र विसरूं नकोस.

प्रकरण १६ वें.

दरबारची मेजवानी.

भोजनाची वेळ जवळ येत चालली, तरी तानूस कोणत्याहि प्रकारचें भय किंवा धास्ती वाटेना. सकाळीं त्याला जो दरबारचा अनुभव आला होता त्यायोगानें त्याची भीड बरीच चेपल्यासारखी झाली होती. प्रौढ माणसापेक्षां लहान मुलास एखाद्या गोष्टीची संवय तेव्हांच लागते याचें उदाहरण तानूच्या वर्तनावरून चांगलें दिसून आलें. मुलांना गतगोष्टींचा विसरहि लवकरच पडतो. दृष्टी आड कीं सृष्टी आड अशी त्यांची स्थिति असते. चार दिवसांत राजेपणाचा त्याला जो सराव झाला तितका सराव एखाद्या प्रौढ माणसास चार वर्षांत होण्याची देखील मारामार पडली असती.

ज्या दिवाणखान्यांत मेजवानी व्हावयाची होती, तो दिवाणखाना आधींच सुबक व दिमाखदार होता. त्यांतून आज तर मंगलदिन असल्यानें त्या दिवाणखान्यांत विशेष रोषनाई केली होती. राजवाड्यांतील सर्व कामदार नटून सजून आले होते. दरवाजावरचे रखवालदारहि चित्रविचित्र रंगांचा भव्य पोषाख करून मोठ्या ऐटीनें आपलें कर्तव्य बजावीत होते. दरबारच्या दिवाणखान्याच्या सभोंवार असलेल्या दालनांत स्त्रिपुरुषांची एकच खेंच उडून गेली होती. मोठमोठाले नामांकित गवई आपलीं हत्यारें सज्ज ठेवून महाराजांची मार्गप्रतीक्षा करीत बसले होते.

इतक्यांत महाराजांचे तीन शिष्ये हातांत भोजनपात्रें घेऊन दिवाणखान्यांत आले. पात्रे मांडणें झाल्यानंतर सर्व मंडळी आपापल्या

दर्जाप्रमाणें पात्रावर बसली. व अखेर महाराजहि स्वस्थानीं विराजमान झाले. महाराज आल्याबरोबर शिंगें वाजण्याचा सुमारें पांच मिनिटेंपर्यंत कडाका उडून राहिला. त्यांच्या ध्वनींनीं दिवाणखाना दुमदुमून गेला. महाराजांच्या बरोबर मंत्री मंडळीहि आपापल्या पात्रावर बसली. महाराजांच्या दोन्ही बाजूंस सुवर्णखचित समशेरी खांद्यावर टाकून दोन सरदार उभे होते. महाराज आपल्या पात्रावर येऊन बसण्यापूर्वी सर्व मंडळींनीं त्यांना उत्थापन देऊन लवून मुजरा केला. महाराज स्थानापन्न होतात तों इकडे तोफांचा कडकडाट कित्येकवेळपर्यंत सुरू होता.

तानूशिवाय इतरांना या अपूर्व समारंभाच्या योगानें अत्यंत आनंद झाला. प्रथम तानूची स्थिती जरा चमत्कारिक झाली. परंतु थोडयाच वेळांत तो पुन्हां राजाची भूमिका यथार्थ रीतीनें करूं लागला. तानू जरी गरीबाचा मुलगा होता तरी त्याचा चेहरा सुबक असल्यामुळें व आज त्याच्या अंगावरहि मौल्यवान् पोषाख असल्यामुळें त्याच्या तोंडावरहि राजतेज चमकूं लागलें. भपकेदार पोषाख त्यानें आज पहिल्यांदाच घातला नव्हता. त्याचा त्याला आज चार दिवसपर्यंत सरावा झाल्यामुळें त्याचें उठणें, बसणें, बोलणें, पहाणें वगैरे सर्व हुबेहुब गर्भश्रीमंताप्रमाणें होऊं लागलें. त्याच्या वर्तनांतला कृत्रिमपणा बहुधा पार नाहींसा होऊन गेला. तो सर्वांचे मुजरे मान हलवून सहज शिताफीनें घेऊं लागला. सारांश, प्रथम प्रथम त्याच्या चालचर्येंत दिसून येणारा अवजडपणा आतां बहुधा नाहींसा झाला.

त्याच्या भोंवतालची मंडळी सर्व खालीं मान घालून बसली होती. त्या सर्वांत हाच एक ताठ मान करून बसला होता. महाराजांशीं बोलावयाचें तें देखील ताटाकडे पहातच बोलावयाचें— जणूंकाय ताटांतच महाराजांचें प्रतिबिंब असतें— असा दरबारचा रिवाज असल्यामुळें भोजन संपेतोंपर्यंत तानूची व कोणाची दृष्टादृष्ट होण्याचा एकदांहि प्रसंग आला नाहीं. आपल्या तोंडाकडे पाहून कोणी बोललें तर आपला अपमान झाला असेंहि त्यास चार दिवसाच्या वहिवाटीनें वाटूं लागलें!

भोजनाचा पूर्वरंग आटपतो न आटपतो तों इकडे सुस्वर गायनाचा कर्णमधुर ध्वनि ऐकूं येऊं लागला. आज आपण खरोखर स्वर्गसुख अनुभवीत आहोंत असेंच तानूस वाटूं लागलें. जो जो जिन्नस तानूस वाढण्यांत

येई; त्यांत विष वगैरे कालविण्यांत आलें नाहीं अशाबद्दल खात्री पटण्याक-रितां तो जिन्नस आगाऊच चाखून पाहण्यास दोन अधिकारी तानूच्या दोन बाजूस आपली कामगिरी मोठ्या तत्परतेनें बजावीत बसले होते.

अशा थाटानें तानूचें भोजन चाललें होतें. पंक्तीस बसलेले जहागिर-दार, दरकदार, मानकरी वगैरे त्याच्याकडे हळूंच चोरून बघत होते. महा-राजांचें वेड वगैरे पार जाऊन ते चांगलें शुद्धीवर आले हें पाहून सर्वांचीं अंतःकरणें प्रमुदित झालीं. मेजवानीच्या वेळचे कांहीं परिपाठ तानूस अद्यापहि माहीत नव्हते. आपलें अज्ञान कोणास दिसूं नये याकरितां कोणतेंहि कृत्य तो घाईनं करीत नसे. थोडावेळ दम धरला ह्मणजे याबद्दल त्याला आपोआपच माहिती होई. अशा रीतीनें दरबारची मेजवानी तर त्यानें बिनचूक पार पाडली.

भोजनोत्तर तो दिवाणखान्या बाहेर पडत असतां पुन्हां वाद्यें वाजूं लागलीं. त्यांचा ध्वनि ऐकून त्यास जसा आनंद झाला तसें थोडेसें दुःखहि वाटलें. तो ह्मणाला कीं बाकीचें सर्व बस्तान ठीक आहे. परंतु, अमक्यावेळीं अमुकच केलें पाहिजे, तमक्या वेळीं तमुकच केलें पाहिजे हें जें माझ्यामागें बंधन लागलें आहे व जें पडछायेप्रमाणें माझा पिच्छा पुरवीत आहे तें जर नाहींसें होईल तर किती मौज होईल !

प्रकरण १७ वें.

राजाची त्रेधा.

इकडे धीरेंद्र राजपुत्राचा एकसारखा शोध करीत होता. मिरवणुकीत ज्या माणसाची व ह्याची गाठ पडली होती त्या माणसाचा ठावठिकाण लागावा ह्मणून त्यानें आपली पराकाष्ठा केली. रस्त्यांत जो ह्मणून त्याला भेटे त्याजवळ तो एकसारखी विचारपूस करीत चालला होता. शेवटीं त्याचे सर्व प्रयत्न निष्फळ होऊन आतां पुढें काय करावें हें त्यास कांहींच सुचेना. तरी त्यानें तो सर्व दिवस त्याच कामांत घालविला. शेवटीं रात्र पडण्याचे सुमारास त्याचे पाय अगदीं मट्टयास आले, पोटांत

मूकहि फार लागली. तेव्हां जवळच्याच एका भटारखान्यांत त्यानें रातो-रात वस्ती केली. सकाळीं तांबडें फुटतें न फुटतें तोंच पुन्हां तपास सुरूं करावयाचा असा त्यानें आपल्या मनाशीं संकल्प ठरविला. तो आपल्या मनाशीं विचार करूं लागला कीं तो मुलगा त्या ऐरटाबरोबर कांहीं अपखुषीनें जाणार नाहीं. त्याच्या हातून आपली सुटका करून घेण्यास तो आपली पराकाष्ठा करील. त्याला या जगांत दुसरें कोणीहि मित्र नाहीं. तोहि मलाच धुंडाळीत असला पाहिजे. तोहि माझ्याच घराचा पत्ता काढीत असेल. त्याला नेमकें घर सांपडलें नाहीं तरी तो याच रस्त्यावर कोठें तरी आसपास हिंडत असला पाहिजे.

आतां आपण राजाकडे वळूं. धीरेंद्राच्या नोकरानें त्या ऐरटास ज्या पुलावर पाहिलें होतें तेथें राजा त्याला जाऊन मिळाला नव्हता. पण तो त्याच्या अगदीं मागोमाग होता. राजा तेथेंच थांबला व त्यास ह्मणाला, कीं असला उद्दामपणा मला सहन होणार नाहीं. मी येथेंच थांबणार. धीरेंद्रानें माझ्याकडे आले पाहिजे. मी त्याच्याकडे कधींहि जाणार नाहीं. यावर तें ऐरट व त्याच्या बरोबरची मंडळीही राजाकडे वळून ह्मणाली कीं तुझा तरुण मित्र (धीरेंद्र) तिकडे घायाळ होऊन पडला आहे, आणि तूं त्याच्या मदतीस जात नाहींस हें कसें ? यावर राजा ह्मणाला.

' काय ! माझा मित्र जखमी झाला ! आणि त्याच्या अंगाला कोणीं हात लावला ? चला बघूं या मला काय झालें तें; लवकर चला, जरा पाय उचला. त्याला दुखापत करणारा कोणी मोठा सरदार असला तरी त्याचें मीं योग्य पारिपत्य करीन. ' असें ह्मणत राजा पळत पळत गेला.

ते तसेंच चालत चालत गांवाबाहेर एका जंगलांत गेले. तेथें एक पडकें घर होतें. त्या घरांत तुझा मित्र कण्हत पडला आहे अशी मंडळींनीं राजास थाप मारली. त्याबरोबर राजा तडाक्यानें त्या घरांत शिरला. ' माझा मित्र कोठें आहे ' असें त्यानें रागानें विचारलें. त्याबरोबर सर्व मंडळी खदखदा हसूं लागली. त्याबरोबर राजास अधिकच त्वेष चढून त्यानें एक लांकडाची ढलपी उचलली. त्याबरोबर मंडळींतील एक लंगडा बदमाष मनुष्य मोठ्यानें हसूं लागला. त्यास राजानें विचारलें ' तूं कोण आहेस आणि तूं येथें कशाला आला आहेस ? '

तो लंगडा माणूस ह्मणाला– ' आपण जरा शुद्धीवर या. मी कोण आहे हें आपणाला ओळखत नाहीं काय ? मी आपला बाप आहे, समजलात. '

' तूं माझा बाप नाहींस. तुझी माझी ओळख सुद्धां नाहीं. मी राजा आहे. माझा सेवक (धीरेंद्र) जर तूं लपवून ठेवला असशील तर त्यास माझ्या ताब्यांत दे, नाहींतर तुझे फार हाल होतील हे ध्यानांत ठेव. '

जानू ह्मणाला:—

' या स्वारीला वेड लागलें आहे खास. हें पहा आपण आपली जीभ आवरून धरा, नाहींतर आपली चांगली कणीक मऊ होईल. येथें कोणी ऐकायला नाहीं, नाहींतर तुमची व आमची गठडी वळण्यास अवकाश लागणार नाहीं. मी एक खून केला आहे, तेव्हां आतां मला घरीं जाणें सुरक्षित नाहीं. अर्थात् तुलाही घरीं जावयाचे नाहीं. तूं माझ्या-बरोबरच असले पाहिजेस. मी आपलें नांव बदललें आहे व तुझेंहि बदललें आहे, हें लक्ष्यांत ठेव. जर कां माझ्या मूळच्या नावानें हाक मारशील तर मार खाशील. तुझी आई व तुझ्या बहिणी कोठें आहेत ? त्या नेमल्या स्थळीं आल्या नाहींत. त्या कोठ गेल्या आहेत हें तुला माहीत आहे काय !'

राजा मोठ्या खिन्नतेनें ह्मणाला—

' तूं माझा असा छळ कां करीत आहेस ? माझी आई निवर्तल्यास आज पुष्कळ दिवस होऊन गेले; माझ्या बहिणी राजवाड्यांत आहेत. '

हें ऐकतांच जानू शेजारीं उभा असलेला एक तरुण माणूस मोठ्यानें हंसूं लागला. त्याबरोबर राजा त्याच्या अंगावर धावून जाण्याच्या बेतांत होता. परंतु, जानूनं मध्यें पडून त्या तरुण माणसास ह्मटल.

' त्याच्या वाटेस जाऊं नकोस, त्याचें डोकें ताळ्यावर नाहीं. '

जानू व हा तरुण मनुष्य एकमेकाशीं हळूं हळूं बोलत बसले. या माणसाचा आपल्याला उगीच त्रास नको ह्मणून राजा बराच दूर जाऊन बसला. तेथें बरेंच वाळलेलें गवत पडलें होतें. थंडीचें निवारण करण्याकरितां तें आपल्या अंगावर घेऊन तो तेथेंच विचार करीत बसला. राजवाडा सोडल्यापासून त्याचे अनेक रीतींनीं हाल झाले होते. परंतु बापाच्या मरणापुढें हे सर्व हाल गौण ठरून तो बापाच्या मृत्यूविषयींच विचार करूं लागला.

विजयध्वज महाराजांच्या नांवाची स्मृति होतांच, कोणाच्याही अंगांत कापरें भरावें असा त्यांचा रयतेस दरारा असे. परंतु त्यांचें आपल्या मुला-वर अस्खलित प्रेम असल्यामुळें त्यांच्या स्मरणानें सुशील कुमारास अतिशय आनंद होई. महाराजांची मूर्ति त्याच्या मनांत आली म्हणजे मूर्तिमंत प्रेमाचेंच आपल्याला दर्शन झालें कीं काय असें त्यास होऊन जाई. बापाशीं आपण अनेकप्रसंगीं लडिवाळपणानें वागलों याचें त्याला स्मरण होई व त्याच्या डोळ्यांतून एकसारखा अश्रुप्रवाह चालूं लागे. जस-जशी संध्याकाळ पडूं लागली तसतशी त्याला निद्रा येऊं लागली.

अर्धवट झोंप व अर्धवट विचार अशी स्थिति चालूं असतां छपराकर पावसाचे ठिपके पडल्याचा आवाज त्याला ऐकूं येऊं लागला. इतक्यांत खदखदां हसण्याचा गोंगाट त्याचे कानीं येऊन तो निद्रेंतून खडखडित जागा झाला. हा आवाज कोठून आला हें पाहण्यासाठीं तो मागें वळून पाहूं लागला. तों त्याला एक विपरीत देखावा दिसला. छपराच्या दुसऱ्या टोंकास एक शेगडी पेटली आहे व तिचे भोंवतीं भिकार स्त्री पुरुषांचा तांडा बस-लेला त्याच्या दृष्टीस पडला. त्या सर्व माणसांच्या अंगावर फाटकीं तुटकीं वस्त्रें होतीं तरी त्यांचे देह चांगले धट्टेकट्टे दिसत होते. त्यांच्यामध्यें लंगडे, पांगळे, आंधळे, रोगी, जखमा झालेले असे नानाप्रकारचे लोक त्याच्या दृष्टीस पडले. त्यांत जात्याला टाकी लावणार, चाकूकात्र्यास धार लावणारे, घोंगड्या तुणणारे असे कांहीं धंदेवाईक लोकही बसले होते. स्त्रियामध्येंही कांहीं पोरी, कांहीं तरुण स्त्रिया, कांहीं म्हाताऱ्या जख्खड झालेल्या बायका असे अनेकप्रकार होते. एकमेकांस शिव्यागाळी करण्यांत, ग्राम्य भाषा वापरण्यांत,. हलकट शब्द उच्चारण्यांत व ओकसाबोकशीं ओरडण्यांत मात्र सर्वांची एकवाक्यता होती. कपड्यांच्या घाणेरडेपणांतही सर्वांचें सादृश्य होतें. त्या स्त्रीपुरुषांत तीन लहान मुलेंहि होतीं. याशिवाय त्यांच्याजवळ तीन हडकुळीं कुत्रींही होतीं. त्या कुत्र्यांच्या मानेभोंवतीं दोऱ्या होत्या. या दोऱ्या आंधळे आपल्या हातांत धरीत व कुत्रीं चालूं लागलीं म्हणजे त्यांच्या मागोमाग जात. या सर्व तांड्याचें भोजन आटोपतां आटोपतां रात्र पडली. भोजनोत्तर त्यांच्यापैकीं सुस्वर गणलेले इसम अश्लीलगाणीं मोठमोठ्यानें म्हणूं लागले. आंधळे, पांगळे, थोटे, वगैरे सर्वजण मोठमोठ्यानें गाणीं गाऊन तो वनप्रदेश जागृत

ठेवूं लागले. दारूच्या निशेस जसा रंग चढत चालला तसतसा त्यांचा आरडाओरडा विशेषच वाढूं लागला. शेवटीं कोणाचाच घसा चालेना. तेव्हां सर्वांनीं गप्पा मारण्यास सुरवात केली. कोणी कोणी कशा चोऱ्या केल्या, कोणी कशी घरफोडी केली, वगैरे गप्पा तेथें मोठ्या जोरानें सुरू झाल्या. मी खून केला आहे असें जानूनें सांगतांच सर्वांनीं टाळ्यांचा एकच गजर केला! त्याचे जुने दोस्त त्यास कडकडून भेटले, व नव्यांना त्याच्याशीं बोलण्यांत विशेष भूषण वाटूं लागलें. त्या दिवशीं जानूचा सर्वांत वर नंबर लागला. आतां आपल्या तांड्यांत एकंदर किती माणसें झालीं. असें त्यानें अधिकारयुक्त स्वरानें विचारतांच आपल्या कंपूत एकंदर पंचवीस माणसं आहेत असं एकानें उत्तर दिलें. यानंतर त्यानें कित्येक माणसांबद्दल विचारपूस केली. त्यांपैकीं कांहीं तुरुंगांत गेले, कांहीं ठार झाले. ही बातमी समजतांच जानूचा कंठ सद्गदित झाला. त्याचा चेहरा दुःखित झालेला पाहून तांड्यांतील सर्व लोकहि हळहळूं लागलें. कारण, या उलट्या काळजाच्या लोकांतहि दयेचें व कळकळीचें वास्तव्य अद्याप होतेंच. आपल्यांतील आणखी कांहीं दोस्तावर कठीण प्रसंग आला आहे काय? असा जानूनें प्रश्न विचारतांच तांड्याच्या नायकानें उत्तर दिलें 'होय. आपल्या तांड्यांत नवीन येऊन मिळालेल्या लोकांत असे लोक पुष्कळ आहेत. सारा थकला, ह्मणून त्यांच्या जमिनी जप्त झाल्यामुळें त्यांना आपल्या तांड्यांत येऊन रहावें लागलें. कांहीं भीक मागून आपला उदरनिर्वाह चालवीत होते त्यांना भिक्षेच्या कायद्यान्वयें फटके देण्यांत आले. पुन्हां भिक्षा मागितल्यामुळें त्यांना कैदेची शिक्षा झाली. अशीं एक की दोन अनेक उदाहरणें सांगता येतील.'

हा वृत्तांत सांगणें झाल्यानंतर तांड्यांतील कांहीं लोक आपल्या पाठी उघड्या करून पाठीवरील फटक्याचे वण दाखवूं लागले. कांहींनीं आपले कान कापलेल्या जागा दाखविल्या. इतक्यांत एक रोडका मनुष्य पुढें येऊन ह्मणाला—'मी पूर्वी शेतकी करीत होतों. माझें बस्तान चांगलें बसलें होतें. मी आपल्या बायकापोरांच्या सहवासांत सुखानें नांदत होतों. आतां मात्र माझी स्थिति खालावलेली आहे. माझीं बायकापोरें गेलीं. परलोकीं गेलीं किंवा इहलोकींच भटकत फिरत आहेत हें मात्र मला माहीत नाहीं. माझी

आई इस्पितळांत रोग्यांची शुश्रूषा करून आपला चरितार्थ चालवीत होती. एके दिवशीं एक रोगी मेला. तो तिच्याचमुळें मेला असा तिच्यावर आरोप आल्यावरून तिला देहांत शासन मिळालें! आमच्या देशाचा कायदा काय सांगावा! मी आपला चरितार्थ भीक मागून चालवूं लागलों. परंतु, या देशांत भीक मागणें हाहि गुन्हा आहे. त्यामुळें मला व माझ्या मुलीला तीन वेळ फटके खावे लागले. यानंतर पुन्हां मी दोनदां भिक्षा मागितली, त्याबद्दल माझे दोन्हीहि कान कापण्यांत आले. पुढें एका मोठ्या थोरल्या संपत्तिमान मनुष्याचा मी गुलाम झालों. तेथें धन्याचा निष्ठुरपणा मला असह्य झाल्यामुळें तेथून सुटून येऊन मीं तुमच्या तांडयाचा आश्रय केला. माझ्या धन्यानें जर आतां मला शोधून काढलें तर मला सुळावर चढवतील!'

इतक्यांत 'छे, तुझ्या केसासहि धक्का लागणार नाहीं. आजपासून गुलामाचा कायदा रद्द होईल. तूं त्याबद्दल बिलकुल काळजी करूं नकोस.' असा एक आवाज आला. त्याबरोबर सर्वांची दृष्टी छोट्या राजाकडे वळली.

'तूं कोण आहेस, तूं हें काय बोलत आहेस' असें जो तो त्यास विचारूं लागला.

सर्वजणांस अत्यंत आश्चर्य वाटलें; तरी राजा अत्यंत शांतपणानें ह्मणाला—

'मी शुभधाम देशाचा राजा आहे. हें ऐकतांच सर्वजण पोट धरधरून हंसूं लागले! राजालाहि त्यामुळें क्रोध आला व तो ह्मणाला—

'हलकट लोकांनो! हीचकां तुमची चाल रीत? मी तुह्मांला आतां एवढी थोरली देणगी दिली, त्याचें बक्षीस तुह्मी मला अशाप्रकारें देतां काय?'

यांवर त्या तांडयांत जो हंशा पिकला त्यांत राजाचें राहिलेलें भाषण ऐकूं आलें नाहीं. हंसण्याचा भर बराच कमी झाल्यावर जानू ह्मणाला.—

'गडयांनो, हा माझा मुलगा आहे. त्याचें डोकें फिरलें आहे. त्याच्या बोलण्याकडे लक्ष देऊं नका. आपण राजा आहों असें त्याच्या मनानें घेतलें आहे.' यावर राजा जानूस उद्देशून म्हणाला—

'मी राजा आहे कां नाहीं हें तुला लवकरच कळेल. तूं काय समजलास? तूं खून केला असल्याचें आतांच कबूल केलें आहेस.'

'काय? तूं माझा विश्वासघात करणार? सांगतों मी तुला कोण आहे तें'!

जानू त्याच्या अंगावर धावून जाणार. इतक्यांत तांडयाचा नायक मध्यें पडून ह्मणाला—

'काय! राजाबद्दलही तुला आदर वाटत नाहीं! राजा आणि रंक या सर्वांना तूं सारखेंच लेखतोस काय?'

नंतर तो राजाकडे वळून ह्मणाला—

'आपल्या सोबत्यांना अशी धमकी देऊं नकोस. त्यांच्याविषयीं अनिष्ट बोलूं नकोस. तुला राजा व्हावयाचें तर खुशाल हो. परंतु, राजेपणांत दुसऱ्याला इजा करण्याची बुद्धि धरूं नकोस. आपल्याला राजा असें ह्मणवून घेऊं नकोस. तसें करणें राजद्रोह आहे. आह्मी आपला आयुष्यक्रम कितीहि वाईट रीतीनें चालवीत असलों तरी आमच्यापैकीं कोणीहि राजद्रोही नाहीं. राजनिष्ठेंत आह्मी कोणासही हार जाणार नाहीं. हें मी तुला शपथेवर सांगतों.'

यावर 'राजा दीर्घायु होवो' असें सर्वजण ओरडले. त्या प्रचंड ध्वनीनें तें सर्व घर हादरून गेलें. त्यांची ती राजनिष्ठा पाहून राजालाहि अत्यंत समाधान वाटलें व मानेला थोडा हिसका देऊन तो ह्मणाला—

'माझ्या भल्या लोकांनों मी तुमचें अंतःकरणपूर्वक आभार मानतों.' हें ऐकून मंडळींना पराकाष्ठेची गंमत वाटली. तांडयाचा नायक ह्मणाला.

'मुला, तुला मोठीच पदवी पाहिजे असेल, तर दुसरी हवी ती घे. पण आपल्याला राजा ह्मणवून घेऊं नकोस.'

इतक्यांत एक गृहस्थ हंसतां हंसतां ह्मणाला—

'हे माकडाच्या खेळांतले राजे आहेत.'

याबरोबर 'माकडांच्या खेळांतल्या राजांना उदंड आयुष्य येवो' असेंहि कित्येक जण ओरडले!

'त्याला राज्यावर बसवा' असें एक ह्मणाला.

'त्याला पोषाख घाला' असें दुसरा ह्मणाला.

'त्याच्या हातांत राजदंड द्या' असें तिसरा ह्मणाला.

'त्याला सिंहासनावर बसवा' असें चवथा ह्मणाला.

याप्रमाणें शेंकडों आरोळ्या एका मागून एक ऐकूं येऊं लागल्या. त्यांना उत्तर देण्याचा राजा प्रयत्न करतो आहे तोंच त्याला एका पिपावर

बसवून एकानें त्याच्या अंगावर एक घोंगडीचें रकटें टाकलें व त्याच्या डोक्यावर जस्ताचा डबा पालथा घालून त्यास राज्याभिषेक केला ! नंतर सर्वजण गुडघे टेकून त्यास अदबीनें मुजरा करूं लागले.

'राजा, आमच्यावर दया कर'

'आह्मीं यःकश्चित् प्राणी आहोत. आमच्याशीं निष्ठुरपणानें वागूं नकोस.'

'आपल्या गुलामावर दया कर'

"राजा, तुझें तेज सूर्यासारखें आहे. आपल्या किरणांनीं आह्मांस सुखी कर ?'

अशा एक कीं दोन अनेक रीतींनीं त्यांनीं त्याचा उपहास केला. शेवटीं एकजण त्याच्या पायावरहि पडला. राजानें त्याला लाथेनें पलीकडे झुगारून दिलें.

'राजाचा पाय ज्या ठिकाणीं लागला, त्या जागेस हवेचाहि संसर्ग होतां कामा नये, ती कोणाच्या दृष्टीहि पडता कामा नये, असें ह्मणून त्यानें ती जागा एका फडक्यानें बांधली ! 'ज्याला हीं जागा पहावयाची असेल त्याला शंभर रुपये पडतील,' असे तो ह्मणाला. तेव्हां तर मंडळींत एकच हंशा झाला !

आपला असा पदोपदीं उपहास झालेला पाहून राजाला पराकाष्ठेचें दुःख झालें व क्रोधहि आला. तो आपल्या मनाशीं ह्मणाला—'या लोकाची मी कोणत्याहि प्रकारें आगळीक केली नाहीं. इतकेंच नव्हे, तर मी यांच्यावर उपकारच केला आहे. असें असून त्याची फेड ते अशारीतीनें करीत आहेत.'

प्रकरण १८ वें.

चोरांचा संसर्ग.

सकाळीं तो बदमाषांचा तांडा बाहेर फिरावयास निघाला. त्यावेळीं आकाश ढगांनीं व्याप्त झालें होतें व थंडी मनस्वी पडली होती. यामुळें तांड्यांतील बहुतेक लोक मलूल दिसत होते. तांड्याच्या नायकानें राजास एका मनुष्याच्या स्वाधीन केलें व त्यास सांगितलें या मुलाशीं विशेष कडक

रीतीने वागूं नकोस. त्या मुलाच्या वाटेस न जाण्याविषयीं त्याने जानूसही बजावून सांगितलें.

थोड्या वेळानें हवेंत जरा ऊष्मा आला व ढगही नाहींसे होत चालले. तांड्यातील लोक जरा प्रफुल्लित दिसूं लागले. रस्त्यांतून जाणाऱ्या येणाऱ्या माणसांची ते खोडी काढूं लागले. यावरून त्यांची तब्येत आतां नीट ताळ्यावर आली असल्याचें उघड दिसूं लागलें. रस्त्यातील जो तो मनुष्य त्यांना निमुटपणें वाट सोडी. जो तो त्याच्यापासून चार हात दूरच राहण्याची तजवीज करी. यावरून या तांड्याची सामान्य जनसमूहास किती भीति वाटत होती हें सांगावयास नकोच. त्यांनीं कोणत्याहि प्रकारची खोडी काढली तरी ती लोक निमुटपणें सोशीत. कुंपणावर वाळत घातलेले कपडे ते बेलाशक उचलीत. त्यांना कोणीहि बोलत नसे. कपड्या बरोबर कुंपणही त्यानीं उपटून नेलें नाहीं हें आपले मोठें भाग्यच असें लोकांना वाटे.

रस्त्यांतून जातां जातां पुढें ते एका शेतांत शिरलें. तेथें त्यांनीं बरेच धान्यहि लांबविलें! शेतकरी बिचारा भयभीत होऊन आपल्या कोपींत जाऊन बसला होता. याप्रमाणें लग्गा साधून परत जातांना त्यांनीं त्या शेतकऱ्याला बजाविलें कीं ' खबरदार यांतली गोष्ट सरकारास कळली तर आह्मी पुन्हां इकडे दुसरी फेरी आणूं व तुझ्या घरादाराची राखरांगोळी करून टाकूं!'

सुमार दोन प्रहरच्या सुमारास ही टोळी एका खेड्याजवळ जाऊन उतरली. एक तासभर विश्रांति घेऊन सर्वजण निरनिराळ्या मार्गांनीं कांहीं लाग साधावा ह्मणून खेड्यांत शिरलें. राजा टोळीच्या नायकाजवळच होता. कोठेंतरी कांहीं माल लांबवायला सांपडेल म्हणून या नायकानें बरीच खटपट केली. परंतु, त्यादिवशीं त्यास कांहीं यश आलें नाहीं. शेवटीं तो त्रासून राजास म्हणाला—

' आज कांहीं चोरीचा लाभ साधत नाहीं. हें गांव अगदीं भिकार दिसतें. आतां आपल्याला भीकच मागितली पाहिजे.'

' काय आपल्याला! तुला पाहिजे तर तूं माग. तुझा तो धंदाच आहे.'

' काय! तूं भीक मागणार नाहींस? तूं श्रीमंत केव्हांपासून झालास?'

'ह्मणजे ! तूं हें मला काय विचारतोस !'

'विचारतोस ! कांतिपुरांत भीक मागतां मागतां तुझा जन्म नाहीं कां गेला ?'

'कोणाचा ? माझा ! तुला वेडतर नाहींना लागलें ?'

'तुझा जन्म भीक मागण्यांत गेला असें मला तुझ्या बापानेंच सांगितलें आहे. तो खोटें बोलला असेंहि तूं कदाचित् सांगशील.'

'काय ? तूं त्याला माझा बाप ह्मणतोस !'

'पुरे झालें. ही कांहीं गमतीची वेळ नव्हे. तूं काय बोलतोस हें जर मी तुझ्या बापाला सांगितलें तर तो तुझी हाडेंच मोडील.'

'त्याला सांगायची तूं कशाला तसदी घेतोस. मीच सांगेन !'

'तुझ्या अंगचें तेज मोठें वर्णनीय आहे. पण तुझी अक्कल तशी असती तर फार चांगलें झालें असतें. असो. तें कांहीं असलें तरी माझा तुझ्या बापाच्या शब्दावरच अधिक विश्वास आहे. तो खोटें बोलेल. आह्मीहि प्रसंगवशात् खोटें बोलतों. परंतु, सध्यांचा प्रसंग खोटें बोलण्याचा नाहीं. खोटें बोलणें ही एक अजब चीज आहे. त्या चिजेचा निष्कारण उपयोग कोणी कधींहि करणार नाहीं. तूं भिक्षा मागणार नाहीं ह्मणतोस; मग तूं पोट कशानें भरणार ? चोरी करून कीं काय ?'

'बस, बस, हा तुझा वात्रटपणा पुरे कर.'

'तूं मोठा चमत्कारिक प्राणी दिसतोस. भिक्षाहि मागावयाची नाहीं व चोरीहि करावयाची नाहीं, आणि पोट तर भरलें पाहिजे. हें कोडें उकलावयाचें कसें ? आतां तूं असें कर, मी भिक्षा मागत असतां तूं आपल्याला कांहीं मोठें दुःख झाल्याचा बहाणा कर असा रागावूं नकोस.तो पहा एक भला मनुष्य इकडेच येत आहे. हं ! कर रडायला सुरवात. माझा एक भाऊ घरीं उपाशी आहे; आह्माला पोसायला कोणी नाहीं, देवाच्या नांवानें आह्माला एक पैसा द्या असा मोठा ओरडा कर आणि सारखा रडत रहा. त्याच्या हातांतून तुझ्या पदरांत पैसा पडेतोंपर्यंत रडायचा थांबूं नकोस.'

असें ह्मणून तो चोराचा नाईक धाडकन् गटाराच्या कडेला पडला आणि मोठयानें ओरडूं लागला.

त्याच्याकडे पाहून तो भला गृहस्थ ह्मणाला.—

' अरेरे ! काय ही तुझी अवस्था ! '

' महाराज; तो पलीकडे माझा भाऊ आहे, त्याला माझी खरी स्थिति विचारा. अशा वाताच्या लहरी मला वरचेवर येऊन मी जमिनीवर पडतों. '

' एक पैसाच काय; पण मी तुला तीन पैसे देईन. '

असें ह्मणून त्या भल्या गृहस्थानें आपल्या खिशांतून पैसे काढून त्याच्या हातावर टाकले. तो मुलास उद्देशून ह्मणाला—

' मुला, आपल्या भावाला हातांत धरून घरीं घेऊन जा. '

' राजा ह्मणाला ' मी त्याचा भाऊ नाहीं '

' काय ! तूं त्याचा भाऊ नाहींस ? '

चोराचा नाईक ह्मणाला—

' बघा ! महाराज, आपल्या भावाला सुद्धां तो अंतर देत आहे आणि तेंहि अशा हालाच्या प्रसंगीं ! '

' मुला, तूं फार कठोर हृदयाचा दिसतोस. हा तुझा भाऊ नव्हे तर कोण आहे ? '

राजा ह्मणाला—

' तो भिकारी व चोर आहे. त्यानें तुमच्यापासून धर्मादाय पैसे काढले व तुमचा खिसाहि कापला. त्याच्या डोक्यावर काठीचा एक तडाका द्या ह्मणजे तुह्माला त्याचें खरें स्वरूप कळेल. '

परंतु तो चोराचा नाईक यापुढें तेथें क्षणभरहि राहिला नाहीं. त्यानें तेथून तावडतोब धूम ठोकली व तो भला मनुष्यहि त्याच्या मागोमाग ओरडा करीत पळत चालला. हा भला मनुष्य आपली सुटका करण्यास साक्षात् देवच अवतरला असा विचार करून इकडे राजानेंहि आपला रस्ता सुधारला. होतां होईतों जलद पाय उचलून वरचेवर मागें वळून पहात पहात तो कित्येक तासपर्यंत धूम ठोकीत बराच दूर गेला. शेवटीं आतां आपल्याला कशाचीहि भीति उरली नाहीं अशी खात्री झाल्यावर तो एके ठिकाणीं उभा राहिला. त्याला फार भूक लागली होती, ह्मणून तो एका शेतकऱ्याच्या दाराशीं उभा राहिला. त्याचा पोषाख भिकार असल्यामुळें तो भला आहे असें शेतकऱ्यास वाटेना. तेव्हां निरुपाय होऊन तो तसाच पुढें चालला.

जातां जातां शेतकऱ्याचे दोन धक्केहि त्याला खावे लागले! भुकेनें तो अगदीं ग्रासून गेला. त्याच्या अंगच सर्व तेज मावळून गेलें. पुढें तो दुसऱ्या एका शेतकऱ्याच्या दारांत उभा राहिला. तेथें तर त्याची पूर्वीपेक्षां अधिकच त्रेधा झाली. शेतकऱ्यानें त्याला खूप शिवीगाळ केली व 'येथून हलला नाहींस तर तुला पोलिसच्या ताब्यांत देईन' असें त्यानें त्याला निक्षून सांगितलें.

असें होता होतां रात्र पडली. राजाचे पाय ठणकूं लागले, तरी तो तसाच पुढें चालत होता. कारण खालीं बसलें कीं त्याला मनस्वी थंडी वाजत होती. रात्रीं हिंडण्याचा त्याला हा पहिलाच प्रसंग असून अशाप्रकारचे हाल सोसण्याचाहि त्याचा पहिलाच प्रसंग होता. कित्येक वेळां त्याला कांहीं वाजल्याचा आवाज ऐकूं यावा, व तो एकदम बंद व्हावा. असें झाल्यामुळें त्याला फारच भय वाटूं लागलें कित्येक वेळां काहीं उजेड दिसावा व तो एकदम नाहींसा व्हावा. असे नानाप्रकारचे देखावे त्याला दिसूं लागले. कुत्र्याचें भुंकणें, व मेंढयाचें बें बें करणें याचांहि आवाज त्याचे कानीं आला. परंतु, हे आवाज फार लांबून येत. यामुळें आपण वस्तीपासून दूरदूर जात चालला, असें वाटून त्याच्या अंगावर शहारे येत चाललें. मध्यंतरीं वाळलेलीं पानं वाऱ्यानें हाललीं कीं त्याचा कोणी कोणाच्या कानाशीं बोलत असल्या सारखा आवाज होई. सारांश, त्याच्या आसमंतात भागीं जी जी गोष्ट घडून येई ती ती त्याच्या मनांत भय उत्पन्न करण्यास कारणीभूत होई. प्रसंग पडला ह्मणजे सर्वांना धीर येतो. ज्याच्या पुढें दिवसा मशाल असावयाची त्यासहि आज काळोख्यारात्रीं ठेचाळत ठेचाळत भयानें धडधडणाऱ्या छातीनें आपला मार्ग आक्रमिण्याचा प्रसंग आला! शेवटीं एका ठिकाणीं त्याला एका कंदिलाचा उजेड दिसला. त्याबरोबर तो तेथेंच अंधारांत थबकला. हा कंदील कोठला असावा असा विचार करतां करतां हा गुराचा गोठा असावा असा त्याचा तर्क झाला. जवळ जाऊन पाहतों तों तोच तर्क खरा ठरला. जवळ पास कोणी माणूस नाहीं, आपण कोणाच्या दृष्टीं पडलों नाहीं अशी आपली खात्री करून घेऊन तो, तेथें एक मोठें थोरलें पीप पडलें होतें त्या पिपाच्या आड जाऊन निजला. इतक्यांत शेतात काम करणारे दोन मजूर कंदील हातांत घेऊन आंत

आले, व एकमेकांशीं गोष्टी बोलत कामास लागले. त्या दिव्याच्या उजेडांत राजानें मोंवतालचा भाग नीट निरखून पाहून ठेवला. व तेथेंच भिंतीस एक मोठा थोरला कोनाडा होता, त्या कोनाडयांत जाऊन निजण्याचा त्यानें संकल्प ठरविला. तेथें जवळ कांहीं फाटकीं घोंगडीं पडलीं होतीं, तींहि त्यानें पाहून ठेवलीं. थोडयाच वेळानें तीं माणसे आपलें काम संपवून बाहेर पडलीं, व जातांना त्यांनीं दारहि लावून घेतलें. थंडीनें राजाचें अंग थरथर कांपूं लागलें. तशा स्थितींत तो चापचीत चापचीत घोंगडयांचीं पट्टी पडलीं होतीं तेथें गेला. तेथून कोनाडयांत जाऊन एक घोंगडें आंथरून व एक घोंगडें पांघरून तो निजला. घोंगडया जुन्यापुराण्या होत्या, तरी आपत्काळीं राजाला त्यामुळें बराच आराम वाटला. घोडयाच्या अंगावर घालण्याच्या त्या घोंगडया असल्यामुळें त्यांना एकप्रकारचा दर्पहि येत होता. तो दर्प एरव्हीं राजाला दुःसह झाला असता, परंतु त्या वेळीं त्याला त्या दुर्गंधीचें गुमानहि नव्हतें ! थोडयाच वेळांत झोंपेनें त्याचे डोळे मिटूं लागले. इतक्यांत आपल्या अंगाला कोणी स्पर्श करीत आहे असा त्याला भास झाला. त्याबरोबर छातींत धडकी भरून तो अकस्मात् जागा झाला.

तो दम कोंडून घेऊन तेथें तसाच स्तब्ध निजला. जवळपास कांहीं हालचाल ऐकूं येईल ह्मणून तो मोठया सावधान चित्तानें कान देऊन ऐकूं लागला. तरी त्याला कांहींहि ऐकूं आलें नाहीं. असें होतां होतां त्याला पुन्हां झोंप लागली. पुन्हां त्याला कोणी स्पर्श केल्याचा भास झाला. येथें कांहीं तरी भुताटकीचा खेळ आहे असें त्याच्या मनानें घेतलें. आतां पुढें काय करावें हा त्याच्यापुढें मोठा प्रश्न येऊन पडला. महत्प्रयासानें सापडलेली ही आरामाची जागा सोडून आतां बाहेर थंडींत जावें तरी कसें ? बरें जवें तरी कोठें ? शिवाय शेतकऱ्यांनीं दरवाजा लावून घेतलेला. अंधारांत आपल्याला दरवाजा तरी सांपडणार कसा ? आतां भुताच्या संगतींत राहून सबंध रात्र भीतींत घालविण्याशिवाय दुसरें गत्यंतर नाहीं अशी त्याच्या मनाची खात्री झाली.

आपल्याला स्पर्श तरी कोण करतो आहे हें एकदा पहावें असा त्याचा निश्चय ठरला. हा निश्चय करणें जितकें सोपें होतें तितकाच तो अंमलांत

आणणें अत्यंत अवघड होतें. अंधारांत चापचून पहाण्याकरितां तीन वेळ त्यानें आपला हात पुढें केला आणि पुन्हां भयानें मागें घेतला. त्याच्या हाताला कांहींहि लागलें नाहीं! परंतु, कांहीं तरी आतां आपल्या हाताला लागणार अशी त्याच्या मनाची भावना होतांच त्यानें मागें हात घ्यावा असें तीन वेळां झालें. चवथ्या वेळीं त्यानें आपला हात जरा अधिक पुढें केला, तेव्हां त्याच्या हाताला कांहीं मऊ व उबदार वस्तू लागली. त्याबरोबर ता अगदीं गारठून गेला. नुकतांच प्राण निघून गेलेलें हें एकादें प्रेत असावें, याला स्पर्श करण्यापेक्षां मरण आलेलें पुरवलें असें त्यास होऊन गेलें! चौकसबुद्धि ही भयापेक्षां सुद्धां प्रबळ असते, व अखेर भयावरहि ती आपला पगडा चालविते हें त्याला माहीत नव्हतें! थोड्याच वेळानें तो पुन्हां चापचूं लागला. तेव्हां त्याच्या हातास केसाचा एक झुपका लागला. त्याबरोबर त्याच्या मनाची काय स्थिती झाली याचें यथार्थ वर्णन देणें अशक्य होय! मोठें धाडस करून त्यानें आपला हात तसाच लांबविला. तो ही दोरी असावी असें त्यास वाटलें. त्यानें आणखी पुढें हात केला तों त्याच्या हातास वासराची पाठ लागली. त्याबरोबर आतांपर्यंत ज्याला आपण दोरी समजत होतो ती दोरी नसून वासराची शेपटी होय असा त्याच्या मनांत एकदम उजेड पडला.

एका यःकश्चित वासरानें आपल्याला इतकें भेवडावलें याबद्दल राजा मनांतल्या मनांत अत्यंत लज्जित झाला. परंतु, वास्तविक पाहतां त्यास लज्जित होण्याचें कांहींच कारण नव्हतें. कारण, ज्याची त्यास भीति वाटली तें वांसरू नसून त्याच्याच कल्पनेनें निर्माण केलेली एक दुसरीच वस्तू होती. त्याच्या जागीं दुसरें कोणी असतें तरी त्याचीहि अशीच स्थिती झाली असती.

आतांपर्यंत आपण अगदीं एकलकोंडे होतों. आतां आपणास निदान वासराची तरी संगत आहे, याबद्दल राजाला आनंदच वाटला. आतांपर्यंत त्याला स्वजातीयांकडून वेगवेगळ्या प्रकारें त्रासच पोहोंचला होता. माणसासारखे उदात्तगुण नसले तरी सौम्य, मृदु व निरुपद्रवी अंतःकरणाच्या एका प्राण्याच्या संन्निध आपण आहोंत असा विचार येऊन त्याचें मनास बराच आल्हाद वाटला. उच्चनीच भाव वगैरे सर्व विसरून जाऊन

तो वासराच्या पाठीवर हात टाकून निजला. त्यानें वासरासहि आपल्या पांघरुणांत घेतलें, तेव्हां आपण राजवाड्यांतील पराच्या गादीवरच पडलों आहों असें त्यास वाटूं लागलें.

त्याच्या मनांत आल्हादकारक विचार येऊं लागले. चोरांच्या संगतींतून व पशुवृत्ति माणसांच्या तावडीतून आपण सुटलों. आपली आंथरुण पांघरुणाची नीट सोय लागली हें पाहून त्याच्या मनास बराच आराम वाटला. रात्रीचा वारा सोंसाट्यानें वाहूं लागला. त्या योगानें मधून मधून तें छप्पर गदगद हलूंहि लागलें ! गुबगुबीत अंथरूण पांघरूण मिळालें असल्यामुळें राजाला त्या वाऱ्याची विशेषशी परवा वाटली नाहीं. जसजसा वारा अधिक जोरानें वाहूं लागला तसतसा तो वासरास अधिक अधिकच कवटाळून धरूं लागला व थोडक्याच काळांत त्यास शांत व गाढ निद्रा लागली. लांब अंतरावर कुत्र्यांचें भुंकणें चाललें होतें, गाई गुरें गारठ्यामुळें हंबरडा फोडीत होतीं, मध्यंतरीं पावसाच्या सरी आल्यामुळें छपराच्या पावगळ्या गळूं लागल्या, तरी शुभधाम देशचा राजा अविच्छिन्न निद्रासुख अनुभवीत होता ! त्याच्या शेजारीं वासरूहि खुशाल घोरत पडलें होतें. आपल्या अंगावर हात टाकून राजा निजला आहे. याबद्दल त्याला बिलकूल संकोच वाटला नाहीं !

प्रकरण १९ वें.

राजाची शेतकऱ्याशीं गांठ.

राजा दुसरे दिवशीं सकाळीं लवकरच उठला. उठून पाहतो तों आपल्या पांघरुणांत एक उंदीर निजलेला त्याच्या दृष्टीस पडला. जरा हालचाल झाल्याबरोबर तो पळून गेला. राजा त्याकडे पाहून हंसून ह्मणाला—

" वेड्या, असा भितोस कां ? तुझ्यासारखाच मी आहे. तुलाहि कोणी जिव्हाळ्याचें नाहीं व मलाहि कोणी जिव्हाळ्याचें नाहीं. अशा प्रसंगींहि मी तुला इजा करण्यास प्रवृत्त होणें ह्मणजे माझ्या शहाणपणाची कमालच झाली ह्मणावयाची ! शिवाय तूं माझ्याजवळ येऊन निजणें ह्मणजे मी एक

शुभ शकूनच समजतो. कारण राजाच्या बिछान्यांत उंदीर खेळूं लागतात, तेव्हां राजाची पूर्ण अधोगति झाली असें समजावें. माझ्या देवाचें चक्र आतां पुन्हां वर उचल खाणार यांत मला बिलकुल शंका वाटत नाहीं. '

तो उठून गोठयाच्या बाहेर येतो तोंच त्यास मुलांचा आवाज ऐकूं येऊं लागला. इतक्यात गोठ्याचें दार उघडलें व दोन लहान मुलींनीं आंत प्रवेश केला. त्याला पाहतांच त्या दोघींचें बोलणें चालणें एकदम बंद पडलें व त्याच्याकडे टक लावून पहात त्या जागच्याजागीं स्तब्ध उभ्या राहिल्या. अशा स्थितींतच कांहीं काळ लोटल्यानंतर त्यांतील एक मुलगी दुसरीस ह्मणाली—

' त्याचा चेहरा सुंदर दिसतो आहे. '

दुसरी ह्मणाली—

' त्याचे केस तरी किती छानदार आहेत. '

' परंतु त्याचे कपडे मात्र चांगले नाहींत. '

' तो भुकेनें व्याकुळ झालेला दिसतो ! '

असें ह्मणत ह्मणत त्या त्याच्या जवळ गेल्या व जणूं काय तो एखादा अजब विजातीय प्राणी आहे अशा रीतीनें त्या त्यास नखशिखांत न्याहाळून पाहूं लागल्या. तो आपल्याला चावेलबिवेल कीं काय अशीहि त्यांना भीति वाटत असलेशी दिसली. शेवटीं त्यांतील एकीनें त्यास मोठ्या धैर्यानें विचारलें.

' मुला तूं कोण आहेस ? '

' मी राजा आहे. '

त्याबरोबर त्या मुलीस मोठा अचंबा वाटला. शेवटीं त्या दोघींहि आश्चर्ययुक्त मुद्रेनें ह्मणाल्या—

' काय ! राजा ! कोठला राजा ? '

' शुभग्राम देशाचा '

त्या मुली त्याच्याकडे व एकमेकींकडे गोंधळून पाहूं लागल्या, व एक ह्मणाली—

' मालती, पाहिलेसना तो काय ह्मणतो तें ? तें खरें असेल कां गे ? '

' हें काय विचारतेस ? तो खोटें सांगेल कां ? तो जर खोटें सांगत

असेल तर तें खरें नाहीं. कारण ज्या गोष्टी खऱ्या नसतात त्या खोट्याच असतात.'

या मुलीचा हा कोटिक्रम किती भक्कम होता बरें! त्यांत सुईच्या अग्राएवढीहि फट राहिली नव्हती. परंतु त्यामुळें दुसऱ्या मुलीचें कोणत्याहिप्रकारें समाधान मात्र झालें नाहीं.

ती राजास उद्देशून ह्मणाली—

'आपण जर खरोखर राजे असाल, तर मी आपला शब्द खरा मानतें.'

'मी खरोखरच राजा आहे.'

या उत्तरानें सर्वच वाद मिटला. हा राजाच आहे अशीच त्या दोन्ही मुलींची खात्री झाली. 'आपण राजे आहांत तर आपण येथें कसे आलां. आपल्याला कोठें जावयाचें आहे व आपल्या अंगावर हीं फाटकीं वस्त्रें कां?' इत्यादि प्रश्न विचारून त्यांनीं त्याची विचारपूस केली. आपला उपहास होणार नाहीं, व आपला शब्द खोटा मानणार नाहींत अशा ठिकाणीं आपलें दुःख निवेदन करण्याची संधि मिळाली याबद्दल राजाला समाधान वाटलें. राजाची हकीगत ऐकून त्या मुलींना फारच हळहळ वाटली. त्याला अन्नाशिवाय बराच काळ कंठावा लागला असें त्या मुलींना समजतांच त्याचा वृत्तांत तेथेंच थांबवून त्यास तात्काळ स्वयंपाकघरांत नेलें. राजा संतुष्ट होऊन मनांतल्या मनांत ह्मणाला —

"जेव्हां माझें राज्य मला पुन्हां मिळेल तेव्हां या मुलींनीं मला ममताळूपणानें वागविल्याची आठवण ठेवून मी लहान मुलांचा नेहमीं परामर्ष घेत जाईन."

मुलींच्या आईनेंहि राजाबद्दल मोठ्या ममताळूपणानें विचारपूस केली! कारण त्याची ती शोचनीय स्थिति व ती भ्रमिष्ट झालेली बुद्धि पाहून तिच्या हृदयाला द्रव आला. ती स्त्री विधवा होती व तिची स्थितीहि साधारण गरीबीच होती. तिनेंहि बरेंच दिवस हाल्यांत काढलें होते. तेव्हां गोरगरिबांचें दुःख पाहून तिच्या मनाला खरोखरच हळहळ वाटे. हा मुलगा वाट चुकून भलतीकडे आला असावा, असा तिचा तर्क झाल्यामुळें तो कोठून आला, त्याचे आईबाप कोठें राहतात, वगैरे संबंधानें तिनें बरीच विचारपूस केली. तिनें आसपासच्या बराचशा गांवांचीं नांवें घेतलीं. परंतु, कशासहि

त्याचे ' हो ' असें उत्तर येईना. तो वरचेवर दरबारच्या गोष्टी बोलूं लागला व मृत महाराजांचे नांव निघतांच त्याचा कंठ वरचेवर दाटून येऊं लागला. सामान्य गोष्टी निघाल्या ह्मणजे मात्र तो स्तब्ध बसे. तो ज काय सांगे तें अगदी अंतःकरणापासून सांगे. यामुळें तो खोटें बोलत असेल असा कोणासहि संशय घेण्यास सोय नव्हती.

त्या बाईचा अगदीं गोंधळ उडून गेला. तरी तिनें विचारपूस चालविलीच होती. स्वयंपाक करतां करतां तिनें नानाप्रकारच्या गोष्टी काढल्या. उद्देश हाच कीं या मुलाचें खरें वर्म कळावें. तिनें गुराढोराविषयीं गोष्टी काढल्या, मेंढ्यांविषयीं गोष्टी काढल्या, गिरण्या, विणकरी, व्यापारी, लोहार, सुतार, तांबट वगैरे सर्वांचा तिनें क्रमाक्रमानें उल्लेख केला. तरी त्या मुलाच्या चेहऱ्यावर कांहींच फरक दिसेना. शेवटीं तिनें स्वयंपाकाच्या गोष्टी बोलण्यास सुरवात केली; तेव्हां मात्र राजाच्या तोंडावर जरा तजेला दिसूं लागला. बाईस वाटलें कीं आपलें काम फत्ते झालें. स्वतःच्या धूर्तपणाची व शिताफीची ती मनांतल्यामनांत प्रशंसाहि करूं लागली.

यापुढें तिच्या जिभेला विश्रांति मिळाली. कारण राजानें भोजनाच्या पदार्थांची लांबलचक यादी सांगण्यास सुरवात केली. ती ह्मणाली—

' खरोखर हा कोठें स्वयंपाक्याच्या हाताखालीं नोकरी असला पाहिजे. एरवीं याला स्वयंपाकाच्या पदार्थांची बिनचूक माहिती सांगतां येणार नाहीं. हा जेव्हां मोठमोठाल्या पक्वान्नांची वर्णन देत आहे; तेव्हां हा कोठें तरी श्रीमंताच्या घरीं नोकरी असावा. कदाचित् राजवाड्यांत खुद्द राजाच्या मुदपाकांत यानें कांहीं दिवस उमेदवारी केली असावी. याचा हा असा बुद्धिभ्रंश झाल्यानंतर याला नोकरीवरून कमी करण्यांत आलें असावें;' असा तिचा ठाम तर्क झाला.

याची कसोटी पाहण्याकरितां हे एवढें राहिलेले पदार्थ कर असें राजास सांगून ती आपलीं मुलें घेऊन बाहेर गेली. राजा मनाशीं ह्मणाला—

' राजाला चुलीपुढें बसण्याचा हा पहिलाच प्रसंग नाहीं. पूर्वी भीमासहि जल्लवाचार्य बनावें लागलें होतें. ' स्वारी इकडे असा विचार करते आहे तों चुलीवरील सर्व पदार्थ करपून गेले. करपल्याचा वास येतांच ती बाई

तात्काळ घरांत परत आली. तिनें राजाला खूप शिव्या हसडल्या. परंतु, त्या योगानें राजाचा चेहरा खिन्न झालेला पाहून ती त्याच्याशीं पुन्हां ममतेनें बोलूं लागली.

राजाचें जेवण मोठ्या मजेंत झालें. जेवणामुळे त्याच्या अंतःकरणास चांगला आराम वाटला. पंक्तींत कोणत्याहि प्रकारें उच्चनीच भाव नव्हता. हें पाहून तर राजास विलक्षणप्रकारचें कौतुक वाटलें. या मुलास एकदम ठाव वाढून त्यास कोठेंतरी बाहेर जावयास सांगावें असा त्या बाईचा प्रथम बेत होता. परंतु, ती त्याला बरीच रागें भरली होती. त्यामुळें त्याला झालेलें दुःख दूर करण्यासाठींच कीं काय तिनें त्यास आपल्या पंक्तींतच बसूं दिलें. भोजन करतांना मुलींना आपली शुश्रूषा करावयास लावावी असा राजाचा प्रथम बेत होता. परंतु, आपल्या हातून स्वयंपाकांतील कांहीं पदार्थ करपलें या अपराधाचें क्षालन करण्याकरितांच कीं काय आपला दर्जा बाजूस ठेवून तो त्यांच्यांतच मिळून मिसळून बसला. एका चुकलेल्या निराश्रित मुलास आपण भोजन घातलें हीं मोठी चांगली गोष्ट झाली; याबद्दल ती धन्यता मानून घेऊं लागली. आपण राजे असूनहि एका शेतकऱ्याच्या बाईस आपण आपल्या पंक्तीचा लाभ बरोबरीच्या नात्यानें घेऊं दिला याबद्दल इकडे राजासही मोठें भूषण वाटलें.

भोजन झाल्यानंतर बाईनें राजास भांडीं घासावयास सांगितलें. त्याबरोबर क्रोधानें राजाचे डोळे लाल होऊन गेले. परतु पूर्वीच्या राजांवरहि असे प्रसंग आल्याची त्याला आठवण होऊन तो भांडीं घासूं लागला. शेवटीं मोठ्या मिनतवारीनें तें काम त्यानें कसेंबसें केलें. बाईचा निरोप घेऊन बाहेर जाण्यास तो अगदीं अधीर झाला होता. परंतु, बाईनें त्याला एकामागून एक इतकीं कामें सांगितली कीं तीं न करतां बाईचा निरोप घेऊन अकस्मात् निघून जाणें राजासहि प्रशस्त वाटलें नाहीं. शेवटीं दोनप्रहरच्या वेळेस तो बाईचा निरोप घेण्याच्या अगदीं बेतांत होता. इतक्यांत जानू व तांड्याचा नायक असे दोघेजण फाटकापाशीं येऊन दाखल झालेले त्यानें पाहिलें. त्वतः त्यांना न दिसतां तो कांहीं एक शब्द न बोलतांच त्यानें पिछाडीच्यानें दरवाजानें आपला रस्ता सुधारला.

———

प्रकरण २० वें.

राजा व साधू.

त्या घराच्या पिछाडीस बरीच झाडी होती. त्या झाडींतून राजा घूम ठोकीत चालला. झाडी ओलांडून जाईंतोपर्यंत त्यानें एकदा सुद्धां मागें वळून पाहिलें नाहीं. बरेंच दूर गेल्यानंतर त्यानें मागें पाहिलें तों त्याला दूर अंतरावर दोन मूर्ति दिसल्या. ही माणसें कोण होतीं हें लक्ष्यपूर्वक पाहण्याकरितां थांबण्याच्या भानगडींत न पडतां त्यानें पुनः एकदा गाडी दामटली. कांहीं वेळानें त्यानें पुनः मागें फिरून पाहिलें. त्याला माणसें कांहीं दिसेनात; तेव्हां आतां आपण सुरक्षित आहांत अशी खात्री झाल्यावर तो विश्रांति घेण्याकरितां एका झाडा खालीं बसला. त्या निर्जन प्रदेशांत सर्वत्र अगदीं सामसूम होतें. मधून मधून त्याच्या कानीं कांहीं अस्पष्ट ध्वनि पडत. हे कोणाचे असावेत याबद्दलहि त्याला कांहीं तर्क करतां येईना. असले चमत्कारिक आवाज ऐकूं येण्यापेक्षां अत्यंत स्तब्धता असलेलीच बरी असें त्याच्या मनास वाटूं लागलें.

आतां या स्थळींच राहिलेला दिवस काढावा असें त्यास वाटू लागलें. परंतु, घामावर वारें लागूं लागल्यामुळें त्याला अधिकच थंडी वाजूं लागली. तेव्हां अंगांत ऊब आणण्याकरितां तो पुनः झपाट्यानें चालू लागला. अरण्यांतून असेंच समोर जातां जातां आपल्याला एखादा रस्ता लागेल अशी त्यास फार आशा वाटत होती. परंतु, शेवटीं ती निष्फळ झाली. जसजसा तो पुढें जात चालला तसतशी अरण्यांतील झाडी अधिकच गर्द व दाट होत गेली. असें होतां होतां रात्र पडत चालली. रात्रीचा अंधार पडल्यानंतर आतां आपल्याला रस्ता तरी कसा दिसणार ! या धास्तीनें तो अधिकच जलद चालूं लागला. परंतु, रस्ता नीट दिसत नसल्यामुळें त्याचा हाही प्रयत्न निष्फळ होऊं लागला. त्याचे पाय वरचेवर झुडपांत अडकूं लागले व तो जागोजाग झाडांच्या मुळास ठेंचाळूं लागला. शेवटीं बऱ्याच वेळानें त्यास एक मंद प्रकाश दिसूं लागला. तेव्हां त्याच्या थोडा जीवांत-जीव आला. त्या प्रकाशाच्या धोरणानें जात जात तो त्याच्या अगदीं

जवळ जाऊन थडकला. तेव्हां त्यास माणसाचीहि चाहूल ऐकूं येऊं लागली. तेव्हां डोकावून त्या झोपडींत कोण आहे हें तो निरखून पाहूं लागला. ती झोंपडी लहान होती. तिची जमीन वगैरे कांहीं केलेली नव्हती. ती तशीच राबत्यानें व वर्दळीनें कठीण झाली होती. एका कोपऱ्यांत एक पथारी पडलेली होती व त्या पथारीजवळच जीर्ण झालेली एक घोंगडी पडलेली दिसली. कांहीं स्वयंपाकाचीं भांडीं, एक लहानसे बाक, एक घडवंची व एक शेगडी इतक्या वस्तु तेंथ त्याला दिसल्या. शेगडींत थोडासा विस्तवही होता. तेंथ कोनाड्यांत देवाची एक मूर्ति ठेवलेली होती. त्या मूर्तीपुढें हात जोडून व डोळे झांकून एक माणूस तोंडानें काहींतरी पुटपुटत होता. हा मनुष्य बराच वयातीत दिसत होता. त्याच्याजवळ एक चोपडी पडली होती व त्या चोपडीवर मनुष्याच्या डोक्याची एक कवचीही होती. या मनुष्याची काठी चांगली उंच असून त्याचे केस चांगल सडक होते व त्यांत काळा केस अपवादादाखलच दिसत असे. त्याच्या अंगावर मेंढयाच्या कातडयाची एक कफनी होती.

“ हा कोणीतरी साधु दिसतो. वः फार चांगली गोष्ट झाली. येथें आतां मला खचित आसरा मिळेल ” असे राजा मोठया आनंदानें ह्मणाला.

राजानें झोपडीच्या दारावर थाप मारली. त्याबरोबर “ कोण आहे ” असें त्या म्हाताऱ्यानें घोगऱ्या स्वरात विचारलें.

‘ ये आंत. पण आपलें पाप मात्र दारावाहेरच ठेवून ये ’ असें त्या म्हाताऱ्यानें राजास सांगितलें.

आंत प्रवेश करून राजा त्याच्यापुढें जाऊन स्तब्ध उभा राहिला. तो साधू त्याच्याकडे बराच वेळ निरखून पाहून ह्मणाला—

‘ तूं कोण आहेस ? ’

‘ मी राजा आहे ’ असें त्या मुलाकडून अगदीं साधेपणानें उत्तर आलें. ‘ राजा तुझें कल्याण असो ’ असें तो साधू मोठ्या आतुरतेनें ह्मणाला. राजास बसण्याकरितां त्यानें बाक साफसुफ केलें. व राजाला शेकण्यासाठीं शेगडींत थोडे कोळसे घालून तीहि त्यानें पेटविली. यानंतर साधू ह्मणाला--

‘ आजपर्यंत येथें पुष्कळ लोक येऊन गेले. परंतु, ते या पवित्र स्थळीं राहण्यास कुचकामाचे ठरल्यामुळें त्यांना येथून घालवून देण्यांत आलें. आज

तूं आपल्या सिंहासनावर व राजवैभवावर लाथ मारून या विरक्त स्थळीं आलास. सर्वसंगपरित्याग करून वानप्रस्थ आश्रम धारण करण्याचें अगदीं अल्पवयांत तुझ्या मनांत आलें. यावरून तुझी योग्यता फार मोठी आहे हें उत्कृष्ठ सिद्ध होतें.

आपली खरी हकीगत सांगावी ह्मणून मध्यें बोलण्यास राजानें अनेक वेळां प्रयत्न केला. परंतु, साधूनें आपल्या बोलण्यांत एक क्षणभरहि खंड न पाडतां राजाची महती गाणें तसेंच सुरू ठेवलें. तो ह्मणाला—

' तुला येथें अढळ शांततेचा उपभोग घेण्यास सांपडेल. ज्या नश्वर जगताचा त्याग करून तूं येथें आलास त्यांतील आशाबद्धांच्या याचनांपासून तुला यत्किंचितहि त्रास पोहोंचणार नाहीं. तुझा येथें ईश्वर-स्तवनांत काळ जाईल. धर्मशास्त्रांच्या अध्ययनांत आपल्या आयुष्याचा सदु-पयोग करण्यांत तुला येथें यत्किंचितहि प्रत्यवाय होणार नाहीं. या जगाची माया व त्यांतील प्राण्यांचें मौर्ख्य यावर तुला येथें हवा तितका विचार करावयास सांपडेल. स्वर्गसुखांत काय मौज आहे याचाहि तुला या आयुष्य-क्रमांत अंदाज करतां येईल. कंदमूळ खाऊन आपल्या शरीराची शुद्धी होण्यासाठीं तुला येथें नानाप्रकारचे हटयोग करावे लागतील. तुला आपल्या अंगावर कृष्णाजिन धारण केलें पाहिजे. जलाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि प्रकारचें पेय तूं घेतां कामा नयेस. येथें तुझ्या शोधाला कोणीहि आलें तरी त्यास तूं सांपडणार नाहींस. सारांश, तुझ्या शांतींत येथें कोणत्याहि प्रकारें व्यत्यय येणार नाहीं. '

तो वृद्ध माणूस इकडे तिकडे येरझारा घालींत यापुढेंहि आपल्या मनाशीं कांहीं पुटपुटत होता. त्याचें मोठ्यानें बोलणें बंद झालें ही संधि पाहून राजानें त्यास आपली सर्व खरी हकीगत सांगितली. त्या वृद्ध माणसाचें या हकीगतीकडे लक्ष्य होतें असें दिसलें नाहीं. शेवटीं तो वृद्ध माणूस राजापुढें उभा राहून त्यास पुन्हां ह्मणाला—

' मी तुला एक गुह्य सांगणार आहे. '

' आपलें कोणी ऐकत नाहींना ' याबद्दल आपली खात्री करून घेण्या-करितां त्यानें दाराच्या बाजूस आपला कान लाविला. पाय न वाजवितां

दरवाजापर्यंत जाऊन त्यानें बाहेर सभोंवार डोकावून पाहिलें. व पुन्हां पाय न वाजवितां राजा बसला होता तेथें परत येऊन तो ह्मणाला—

' मी देवदूत आहे. '

हें त्याच्या तोंडचें वाक्य ऐकतांच राजाच्या अंगावर एकदम शहारे आले. तो आपल्याशींच ह्मणाला—

' चोरांची संगतहि पुरवली. परंतु, येथें या वेडया माणसाशीं माझी गाठ पडली आतां माझी स्थिती काय होणार ? '

त्याचा चेहरा बदलेला पाहून ह्मातारा ह्मणाला—

' या स्थळाचा व येथील परिस्थितीचा तुझ्यावर परिणाम झाला असें तुझ्या चेहऱ्यावरून दिसत आहे. या प्रदेशाचा महिमाच असा आहे कीं, येथें. कोणीहि आले कीं त्याला प्रथम चकित झाल्यासारखें होत. '

येथें सर्वत्र देवदूतांचें वास्तव्य आहे. त्यामुळें हा सर्व भूप्रदेश दिव्य तेजानें प्रकाशित झालेला आहे. ज्याची अंतःशुद्धी झाली नाहीं त्यास हें तेज स्वाभाविकपणेंच असह्य होतें. योगसामर्थ्यानें मी एका निमिषांत स्वर्गांत जाऊन परत येतों. पांच वर्षांपूर्वीं मला सर्व देवदूतांचा अधिपती होण्याचा मान मिळाला. सर्व देवदूत माझ्यापुढें साष्टांग प्रणिपात करतात. माझ्या हातास स्पर्श कर. असा भिऊ नकोस. या हाताचा महिमा सामान्य नाहीं. मोठमोठ्या देवादिकांसहि या हस्तानें वरप्रदानाचा लाभ झालेला आहे. इंद्राचा दरबार, नंदनवन, वगैरे ठिकाणीं जाण्यासहि मला पूर्ण मुभा असते. होय. मी खरोखरच मुख्य देवदूत आहे याबद्दल तूं बिलकूल शंका बाळगूं नकोस. या सर्व जगांत माझ्याइतका मोठा कोणी नाहीं, असा खुद्द देवाचा मला दृष्टांत झाला आहे. '

याप्रमाणें सुमारें एकतासपर्यंत त्याचें व्याख्यान चालूं होतेंच. इतक्यांत त्याचा सर्व त्वेष पार निघून जाऊन तो अगदीं सौम्य झालासा दिसला. एका क्षणांत तो इतक्या मृदुतेनें बोलूं लागला कीं, राजालाहि त्याच्याबद्दल एकप्रकारचें प्रेम व आदरभाव वाटूं लागला. राजा शेगडीपाशीं बसून शेकूं लागला. त्याच्या अंगावर कित्येक ठिकाणीं खरचटल्यामुळें त्याला जखमा झाल्या होत्या. त्यास त्या ह्मातान्यानें आपल्या हातानें औषध लाविलें त्यानंतर त्याचा स्वयंपाक सुरू झाला. स्वयंपाक चालूं असतां

त्याचें बोलणें एकसारखें चालूं होतेंच. बोलतां बोलतां कित्येक वेळां त्यानें राजाचे गालगुचे घेतले व त्याची पाठ थोपटली. राजाला प्रथम प्रथम त्याची जी भीति वाटत होती ती यावेळेस बहुधा नाहींशी झाली. दोघांचें जेवणहि एकत्र झालें. भोजनोत्तर ईशस्तुति झाल्यानंतर त्यानें त्या मुलास आंतल्या खोलींत नेऊन निजविलें. आईसुद्धां आपल्या मुलाला जपणार नाहीं इतकें त्या म्हाताऱ्यानें राजाबद्दल प्रेम दर्शविलें. राजास झोंप लागत चालली असें पाहून म्हाताऱ्यानें त्याचें चुंबन घेतलें. तो पुन्हां शेगडीजवळ येऊन बसला. बराच काळ गेल्यानंतर राजा जागा झाल्याची चाहूल लागतांच तो म्हातारा आत गेला व म्हणालाः--

'तूं राजा आहेस ?'

'होय'

'कुठला राजा ?

'शुभधाम देशाचा'.

'काय ? शुभधाम देशाचा ?'

'मग विजयध्वज महाराज निवर्तले तर ?'

'होय, मी त्याचाच मुलगा.'

हें ऐकतांच म्हाताऱ्याच्या कपाळास आठी पडली व जणूं काय सूड घेण्याच्या बुद्धीनें त्यानें आपल्या मुठी वळल्या. मोठमोठ्यानें श्वास टाकीत तो तसाच काहीं वेळ स्तब्ध उभा राहिला व म्हणाला—

'तुला माहीत आहे काय ? तुझ्या बापानें आम्हा साधू लोकांचा किती छळ केला आहे तें ?'

इतक्यांत राजाला पुन्हां झोंप लागली. त्याच्या कडून कांहींच उत्तर मिळत नाहीं असें पाहून म्हातारा म्हणाला—

'पोराला पुन्हां गाढ झोंप लागली !'

त्याच्या कपाळावरच्या आठ्या नाहींशा झाल्या व कांहीं तरी मोठा कार्यभाग झाल्याबद्दल आनंद वाटत असल्याचीं चिन्हें त्याच्या तोंडावर दिसूं लागलीं. मुलाच्या तोंडावरहि झोंपेंतच स्मित विलसूं लागलें. तें पाहून तो म्हातारा आपल्या मनाशींच म्हणाला—

'या मुलाचें अंतःकरण निष्पाप दिसतें.'

असें ह्मणून तो म्हातारा कांहीं वस्तू पाहण्याकरितां झोपडींतून इकडून तिकडे फिरूं लागला.

शेवटीं त्याला एक वस्तारा सांपडला. तो घेऊन तो त्यास शिळेवर धार लावूं लागला. त्या वेळेस रात्र बरीच झाली होती. वाराहि सोंसाट्याचा वाहूं लागला होता. उंदीर व घुशी आपापल्या बिळांतून त्या म्हाताऱ्याकडे शंकित दृष्टीनें पाहूं लागल्या. इकडे हा आपल्या कामांत अगदीं गर्क होऊन गेला होता. वस्ताऱ्यास चांगली धार लागत चालली आहे असें पाहून त्याचा चेहरा प्रफुल्लित दिसूं लागला. धार लावतां लावतांच तो आपल्या मनाशीं ह्मणाला—

'याच्या बापानें आमच्या लोकांचा अत्यंत छळ केला. तो आतां खरोखर नर्कवास भोगीत असेल. मृत्युलोकीं केलेल्या अघोर पातकाबद्दल त्याला आतां मरणोत्तर शिक्षाहि अघोर भोगावी लागत असेल यांत शंका नाहीं.'

राजा चळवळ करूं लागला, हें पाहतांच तो जंगली पुरुष आपला वस्तारा पाजळून राजाच्या बिछान्याजवळ गेला, व तो त्याच्या गळ्यावर ठेवण्याकरितां तो त्याच्या बिछान्यावर वांकला.

राजानें पुन्हां चळवळ केली. त्यानें आपले डोळेहि उघडले. परतु त्यावर जागृतावस्थेचीं चिन्हें दिसेनात. दुसऱ्याच क्षणीं राजा पुन्हां घोरूं लागला. म्हातारा त्याच्या तोंडाशीं कान लावून तसाच वाकलेला होता. इतक्यांत "आतां मध्यरात्रीची वेळ आहे. हा जर कदाचित् ओरडला तर याच्या आवाजानें रस्त्यांतून कोणी जाणारेंयेणारें माणूस आंत येईल' या धास्तीनें तो म्हातारा पुन्हां आपल्या जाग्यावर परतला. खोलींतल्या सर्व दोऱ्या गोळा करून त्यानें राजाचें हातपाय बांधून टाकलें. त्याच्या हनुवटी खालून एक फडकेंहि त्यानें डोक्याला गच्च बांधून टाकलें. हें सर्व कृत्य त्यानें इतक्या शिताफीनें केलें कीं त्यामुळें राजाचा यत्किंचितहि निद्राभंग झाला नाहीं.

———

प्रकरण २१ वें.

धीरेंद्राच्या हातून सुटका.

त्या मुलाच्या बिछान्याजवळ एक तिवई ठेऊन त्यावर तो म्हातारा आपला वस्तारा परजीत बसला. त्याची खुनशीदृष्टी एक सारखी मुलाकडे लागून राहिली होती. मनांतल्या मनांत तो त्वेषानें कांहीं तरी पुटपुटत होता. अशा स्थितींत बराच वेळ गेल्यानंतर मुलाचे डोळे एकदम उघडून ते आपल्याकडेंच लागलेले आहेत असें त्याच्या दृष्टीस पडलें. म्हाताऱ्याच्या हातांत तीक्ष्ण धारेंचे हत्यार पाहून व त्या हत्याराचा रोंख आपल्यावरच आहे असें ध्यानांत येतांच राजाच्या मनाची स्थिती काय झाली असेल याचें वर्णन करण्यापेक्षां कल्पनाच करणें बरें!

वस्तारा पाजळीत तो म्हातारा राजास म्हणाला—

'आतां विलंब लाऊं नकोस. देवाचें नांव घे.'

ज्या दोऱ्यांनीं राजाचे हातपाय जखडून टाकण्यांत आले होते त्या तोंडण्यास त्यानें हवी तितकी झटपट केली, परंतु ती सर्व व्यर्थ गेली. दोऱ्यांशीं ओढाताण करतांना राजाची सहज मान हालली ते त्यानें आपल्या प्रश्नास 'होय' म्हणून उत्तर दिलें अशी समजूत होऊन तो म्हातारा पुन्हां म्हणाला—

'आणखी एकदां देवाचें नांव घे.'

इकडे बंधनातून सुटण्याचे राजाचे प्रयत्न चालू होतेच. राजाचे सर्व प्रयत्न निष्फळ होत आहेत हें पाहून तो म्हातारा असुरी आनंदानें म्हणाला—

'आतां जिवाची आशा सोड आणि मरणास तयार हो.' आतां कितीहि धडपड केली तरी आपलें मरण चुकत नाहीं अशी मनाची खात्री झाल्यामुळें राजा खिन्न मुद्रा करून निश्चळ पडला. त्याची ती खिन्नता पाहून या पाषाणहृदयी, जरठ, जंगली माणसाच्या हृदयास यत्किंचितहि द्रव आला नाहीं.

असें होतां होतां प्रभात होण्याची वेळ आली. तेव्हां आतां विलंब करून उपयोगी नाहीं असा विचार करून तो वनवासी म्हणाला— 'चल आटप, रात्र संपत आली. तुझी इहलोकाहून रवानगी करण्यास आतां एका पळाचाहि अवकाश राहिला नाहीं.'

असें ह्मणून त्या मुलाच्या छातीवर गुडघे टेकून तो मुलाच्या मानेवर हत्यार ठेवण्यास उद्युक्त झाला.

' अरे, पण हा पावलांचा आवाज कोणाचा ऐकूं येत आहे ! ' असें तो जंगली मनुष्य ह्मणतो तोंच त्याच्या हातांतून हत्यार खालीं गळून पडलें. त्या मुलाच्या अंगावर मेंढीचें कातडें टाकून तो भयानें कांपत कांपत उभा राहिला. पावलांचा आवाज अधिक अधिकच वृद्धिंगत होऊं लागला. कोणी कोणाशीं बाचाबाच करीत असल्याचाही त्यास भास होऊं लागला. कोणी-कोणास ठोसे मारीत आहे व कोणी रक्षणार्थ दुसऱ्यास बोलावीत आहे; अशा प्रकारच्या त्याच्या कानास नानाप्रकारच्या भावना होऊं लागल्या. इतक्यांत ' दार उघड, चल, लवकर चल. ' असें ह्मणत कोणी दार ठोठावत असल्याचें त्यास स्पष्ट ऐकूं येऊं लागलें. त्याबरोबर त्याची मनस्वी त्रेधा उडून गेली.

हा आवाज ऐकून राजास मात्र परमावधीचा हर्ष वाटला. त्याच्या शरीरांतील स्नायु आनंदानें टाण टाण उडूं लागले. त्याच्या दृष्टींत विलक्षण तेज चमकूं लागलें. कारण दारावर थाप मारणारा दुसरा कोणी नसून आपला उपकारकर्ता धीरद्रच होय अशी त्याच्या मनाची पक्की खात्री झाली.

तो वनवासी आतल्या आंत दात खाऊं लागला. दरवाजा उघडून तो एकदम बाहेर पडला व बाहेर पडतांच आपल्या मागून त्यानें दरवाजा तात्काळ लावून घेतला. इतक्यांत धीरद्र बाहेरूनच ओरडला--' महाराज, मी आपल्याला प्रणिपात करतों. ' त्या मनुष्याकडे वळून तो ह्मणाला--' मुलगा कोठें आहे ! माझा मुलगा कोठें आहे '

' कोणता मुलगा ? '

' असल्या लबाड्या माझ्या पुढें चालावयाच्या नाहींत. मूर्खा साधूचा वेष घेतलास आणि धडधडित खोटें बोलण्यास तुझ्या मनास लाज कशी वाटत नाहीं ? येथें येण्यापूर्वी आताच मला बदमाष लोक भेटले होते. त्यांच्याच हातीं तो लागला असावा असा मला संशय वाटल्यावरून मीं त्यांजपाशीं मुलाबद्दल विचारपूस केली. त्यांनीं मला सांगितलें कीं, मुलगा आमच्या हातीं लागला होता परंतु, तो आमच्या हातावर तुरी देऊन निसटून गेला. ते त्याचा शोध काढीत

तुझ्या दारापर्यंत आले होते. परंतु, मींच त्यांना हुसकवून दिलें. त्यांनी मला त्या मुलाच्या पावलांचे वणहि या रस्त्यावर पडलेले दाखविले. आतां हे तुझें असले लपंडाव चालणार नाहींत. मुलगा कोठें आहे तें बोल लवकर; नाहींतर फुकट गोत्यांत पडशील!'

"तो फाटक्या चिंध्या पांघरलेला मुलगा आपण ह्मणतां वाटतें! तो कालरात्रीं येथें वस्तीला होता. त्याला मी येथें जवळच कांहीं कामाला पाठविलें आहे; तो आतां परत येईल."

'किती वेळांत येईल? बोल लवकर. वेळ घालवूं नकोस. मला त्याला गाठतां येईल काय?'

'आपण कशाला तसदी घेतां! तो आतां परत येईल.'

'येऊंदे तर. मी येथेंच त्याची वाट पहात बसतों. पण थांब. तूं काय ह्मणालास तो कांहीं कामाला गेला आहे ह्मणून का! छेः ती गोष्ट कालत्रयीं घडणार नाहीं. तो कधींहि कोणाचें काम ऐकणार नाहीं. तूं जर त्याला एखादें काम सांगितलें असतेंस तर तुझ्या उद्दामपणाबद्दल तुझी दाढीहि उपटण्यास त्यानें कमी केलें नसतें! तूं खास खोटें बोललास. तो कोणाहि माणसास मोजून राहणारा नाहीं.'

'माणसास मोजून राहणारा नसेल पण मी माणूस आहे कां?'

'मग तूं माणूस नाहींस तर कोण आहेस?'

'ती गुह्य गोष्ट आहे. ती कोणाला सांगूं नकोस. मी यक्ष किन्नरांपैकीं एक आहे.'

'असें कां? तरीच त्यानें तुझें ऐकलें बरें कां? कधीं कोणाचें बोलणें मान्य करावयाचा नाहीं, असें असून त्यानें तुझें कसें ऐकिलें? कायरे, पण, हें कण्हणें कोणाचें ऐकूं येतें?'

इतका वेळपर्यंत आंतल्या खोलींत राजा एकसारखा कण्हत होता. आर्थात आपलें कण्हणें धीरेंद्रास ऐकूं जाऊन तो आंत येईल, अशी त्यास फार आशा वाटत होती. पण आतांपर्यंत ती निष्फळ झाली. शेवटीं अत्यंत दुःखित होऊन त्यानें आपलें होतें नव्हतें तेवढें सामर्थ्य खर्च करून मोठ्यानें आरोळी मारली. ती त्यास ऐकूं गेल्याचीं चिन्हें त्याच्या बोलण्यावरून समजतांच त्यास आपल्या सुटकेची पुन्हां आशा वाटूं लागली.

तो जंगली मनुष्य ह्मणाला—

' हा वाऱ्याचा आवाज आहे; येथें कोणी माणूस बिणुस नाहीं ? '

' असेल कदाचित. मघापासून तो मला एकसारखा ऐकूं येत आहे. हा पाहिला आतां पुन्हां आला. हा आवाज कांहीं चमत्कारिक भासतो आहे. आपण पाहूं तरी काय आहे तें. '

हें ऐकतांच राजाचा आनंद त्याच्या पोटांत मावेनासा झाला. त्यानें मोठ्यानें ओरडण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्याचा जबडा बांधलेला असल्या-मुळें त्याचा इलाज चालेना. त्या जंगली मनुष्याचें पुढील भाषण ऐकून तर तो अगदींच निराश झाला.

तो मनुष्य ह्मणाला—

' मला वाटतें तो आवाज त्या झुडुपांतून येत आहे. चला, मी तुह्माला तेथपर्यंत नेऊन दाखवितों. '

ते दोघे बोलत बाहेर जातांना राजानें ऐकिलें. त्यांच्या पावलाचाहि आवाज ऐकूं येईनासा झाला. तेव्हां तर त्याच्या जीवानें त्याच्या अंतःकरणाचा ठाव सोडला. त्यांच्या पावलांचा आवाज पुन्हां ऐकूं येईतोंपर्यंत मध्यंतरी एक कल्प लोटलें असें त्यास वाटलें. यावेळेस नुसतां माणसांचाच नव्हे, तर खुरांचाहि आवाज त्यास ऐकूं आला.

' असो. येथें अधिक वेळ थांबण्यास मला आतां वेळ नाहीं. त्याचा रस्ता चुकून तो कोणीकडे भलतीकडे गेला असावा असें दिसतें. काय हो, पण तो कोणत्या दिशेनें गेला तें मला दाखवाल काय ? '

' तो मुलगा होय ? पण दम धरा मीच तुमच्या बरोबर येतों. '

' वा ! मग तुमचे माझ्यावर फार उपकार होतील. हे पहा, तुमचा चेहरा जितका उग्र दिसतो तितकेंच तुमचें हृदय कनवाळू आहे अशी माझी खात्री होते. हें मी बरोबर खेंचर आणिलेलें आहे, त्याच्यावर आपण बसतां काय ? तें मी मुलासाठीं आणिलें होतें. आपले पवित्र पाय याला लागले, ह्मणजे या वारूचें भाग्यच उदयास आलें ह्मणावयाचें. या वारूचे पैसे पाण्यांत गेले असें मला वाटतें. ही ब्याद माझ्या गळ्यांतून कशी जाते असें मला झालें आहे. '

' वारूवर आपणच बसा. मी आपल्या पायांनेंच चालत येतों. '

' तर मग आपण हे शिंगरू एवढें हातांत धरा, म्हणजे मी या वारूवर स्वार होतो आणि मग आपण दोघेहि जाऊं.'

धीरेंद्र वारूवर चढूं लागला तों त्यानें आपले मागचे व पुढचे दोन पाय आळीपाळीने हवेंत तरंगून धरले. असे बरेंच वेळ चालून धीरेंद्राचा जीव अगदीं रंजीस आला. शेवटीं काठीनें दोन तडाके त्याच्या पार्श्वभागावर ओढल्याबरोबर त्या वारूच्या मनांतील सर्व कुतर्कांची निवृत्ति होऊन तो जागच्या जागीं स्तब्ध उभा राहिला.

इकडे राजा आपल्या जखडलेल्या स्थितींत विव्हल होऊन दुःखानें कण्हत पडला होता. त्याची सुटकेची सर्व आशा नष्ट होऊन गेली. "या सर्व जगांत माझा एकुलता एक मित्र आणि त्याचीहि या जरठ, नीच माणसाच्या हातून अशी फसवणूक व्हावी ना! आतां तो थेरडा परत येईल आणि मला— "

या पुढें राजाच्यानें बोलवेना. तो आपले बंधन तोडण्याकरितां पराकाष्ठेची धडपड करूं लागला. इतक्यांत कोणी दरवाजा उघडला. आतां आपली शंभर वर्षें भरलीं असें वाटून त्याच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले. भयानें त्याचे डोळे मिटले. पुन्हा ते भयानेंच उघडले आणि पुढें पाहतो तो जानू कामाठी व त्या चोरांच्या तांड्याचा नायक ही दुकल पुढें उभी असलेली त्याला दिसली.

त्याचा जबडा मोकळा असतां तर त्यानें या स्थितींतहि देवाचे आभार मानिले असते. कारण आतां चोरांची संगत पुन्हां नशिबीं आली तरी तूर्तचा मृत्यु टळला असं त्यास वाटलं.

लवकरचं तो बंधमुक्त झाला आणि या दुकलीपैकीं प्रत्येकानें त्यास एकेकदां गच्च कवटाळून धरले व ते तिघेहि झोपडी सोडून रस्त्याला लागले.

प्रकरण २२ वें.

विश्वासघात.

राजा पुन्हां एकदां तांड्याच्या तावडींत सांपडला. तांड्याचा नायक व जानू यांच्याशिवाय कोणासहि तो इतका अप्रिय नसे. इतकेंच नव्हे तर त्यांना राजाच्या बोलण्याचालण्यापासून विलक्षण करमणूकहि होत असे. त्याची तडफ व धैर्य याबद्दल सर्वांना कौतुक वाटत असे. जानू व त्या बदमाषांचा नायक हे दोघेजण मात्र त्यास होतां होईतों एकसारखा त्रासच देत असत. राजा निजलेला असला ह्मणजे ते त्याच्या अंगावर, जणूं काय चुकूनच झालें, अशारीतीनें पाय देत. तो बसला असतां त्यास चिमटे घेत. अशा अनेक रीतींनीं ते त्याची छळणूक करीत. राजाचें मन स्वाभाविकपणेंच दिलदार असल्यामुळें तो या बारीकसारीक गोष्टींकडे दुर्लक्ष करीत असे. परंतु एके दिवशीं या हलकटांच्या चाळ्यांचा त्यास अत्यंत राग येऊन त्यानें त्या बदमाषांच्या नायकास दाणदिशीं जमिनीवर पाडलें. त्याबरोबर भोंवतालची सर्व मंडळी खदखदां हंसूं लागली. तांड्याच्या नायकानें चवताळून जाऊन हातांत काठी घेतली आणि दोघांचा पट्याचा खेळ सुरू झाला. त्यांच्या भोंवतालीं सर्व मंडळींनीं गराडा घातला व त्या फडांत दोघांची दांडपट्याची चढाओढ सुरू झाली चोराचा नायक मोठा अट्टल खेळणारा ह्मणून गणलेला असे. परंतु, दूरदूर देशाहून आणलेल्या व कसलेल्या जवानांच्या कडून शिक्षण मिळालेल्या राजापुढें त्याचें कांहींएक चालेना. दांडपटा खेळण्यांत राजाचें अनुपम कौशल्य पाहून भोंवतालची मंडळी आनंदानें टाळ्या वाजवूं लागलीं. या योगानें तर चोरांचा नायक अत्यंत खिन्न होऊन गेला; त्यास वर डोकें काढण्याची सोय राहिली नाहीं; इतक्या सपाट्यानें व सफाईनें राजा त्याच्या डोक्यावर काठीचे तडाके लगावूं लागला. एका पंधरा मिनिटांच्या अवधींतच तांड्याचा नायक अगदीं हैराण होऊन गेला; त्याच्या अंगावर जागोजाग जखमा झाल्या; कांहीं ठिकाणीं तर रक्तच वाहूं लागलें. या शारीरिक क्लेशांत प्रतिस्पर्ध्याच्या होत असलेल्या प्रशंसेची भर पडून त्याच्या चित्तास अत्यंत विषाद वाटला. त्यानें खालीं मान घालून फडांतून आपला पाय

काढतां घेतला. राजाला मात्र कोठें यत्किंचितही लागलें नव्हतें. त्याला दोघांचौघांनीं मोठ्या आनंदानें खांद्यावर घेऊन मुक्कामावर मिरवीत नेलें, व फड जिंकल्याबद्दल तेथें त्याचा अपूर्व सन्मानहि केला. त्यावेळेपासून त्याला ते सर्वजण खरोखरच राजा ह्मणूं लागले. कोणी जर त्यास राजाशिवाय इतर नावानें हाक मारली तर ते त्याची चांगलीच खरडपट्टी काढीत.

चोरी, घरफोडी वगैरे कामांत याचा आपणास चांगला उपयोग होईल असें वाटून कांहीं इसमांनीं त्याच्या जवळ ती गोष्ट काढली. परंतु, तो त्यांचें बोलणें क्षणभरहि ऐकेना. ते कधींकधीं चोरी करण्याचें कामींहि त्याची योजना करीत. परंतु, तो एखादे वेळेस हात हालवीत बाहेर येई तर दुसऱ्या वेळेस घरावर छापा आल्याची घरांतल्या माणसांस वर्दी देई. त्याचा सर्व प्रयत्न तांड्यांतून सुटून जाण्याचाच असे. वाईट काम करण्याची त्याच्यावर जर कोणी सक्ति करूं लागला तर तो त्यास यथेच्छ चोप देई. किंवा मोठमोठ्यानें ओरडून त्याची चांगली खरडपट्टी काढी. एका ह्मातारी बरोबर त्याला एकेदिवशीं भिक्षेस पाठवूनहि त्यांनीं पाहिलें. परंतु, त्याचा उपयोग कांहीं न होता ह्मातारीला उलट-त्याची अडचण मात्र झाली. लोकांनीं भिक्षा घालावी ह्मणून स्वतः बत-वणी करण्याचें तर बाजूसच राहिले, पण कोणी बतावणी केलीच तर तो ती उघडकीस मात्र आणी. तांड्यांतील लोकांस या मुलामुळें 'भीक नको पण कुत्रें आटप' असें होऊन जाई.

याप्रमाणें कित्येक दिवस गेले. त्या आयुष्यक्रमाचे क्लेश त्यास असह्य होऊं लागले, तें इतके कीं त्या साधूच्या अथवा भोंदूच्या हत्यारानें आपणांस मरण आलें असतें तरी पुरवलं. परंतु, ही भगभग नको.

रात्रीं मात्र त्याला आरामाच्या जात. दिवसा भोगलेल्या सर्व आपत्तींची त्यास विस्मृति होऊन जाई. आपण सिंहासनावर बसून राज्य चालवीत आहों असे स्वप्नामध्यें त्यास दृष्टांत होत. परंतु, या सर्व गोष्टी तो पुन्हां जागा झाला ह्मणजे त्यास द्विगुणित दुःख देण्यास मात्र कारणीभूत होत.

तांड्याच्या नायकाची राजाबरोबर झटापट होऊन त्या झटापटींत राजा विजयी झाल्याच्या दुसरे दिवशीं राजाचा कांहींतरी सूड घ्यावा असा नाय-काच्या मनांत विचार आला. एकतर त्याचा कोणत्यानाकोणत्या तरी

उपायानें पराकाष्ठेचा उपमर्द करावा किंवा एखादें गुन्ह्याचें नसतेंच कुभांड त्याच्यावर रचून त्याला एकदां तुरुंगांत रेटावे असा त्यानें विचार केला.

पहिला विचार अमलांत आणण्यासाठीं त्याने एक बिब्बा घेऊन तो ठेचून तो राजा निजलेला असतां त्याच्या पायावर खूप सारवला. बिब्बा उतून राजाच्या पोटरीचें सालटें निघालें ह्मणजे त्यास रहदारीचे जागेवर बसवावे व त्याची ती जखम लोकांना दाखवून त्याचे कडून पैसे उखळावे असा त्याचा बेत होता. बिब्बा सारवणें संपतें न संपतें तोंच राजा जागा झाला. ' मी राजा झालों, ह्मणजे तुमची या दुष्कृत्याबद्दल मी चांगलीच खोड मोडीन असें तो मोठ्या त्वेषानें ह्मणाला. नायकाच्या दुर्दैवानें इतक्यांत तो बिब्याचा डाग दुसऱ्या एका इसमाच्या दृष्टीस पडला. राजा आधींच त्या सर्वांना प्रिय झाला होता. त्याच्या मांडीवर बिब्बा फासलेला पाहून त्या इसमास फारच वाईट वाटलें. त्यानें तावडतोब थोडेसें तेल घेऊन तें त्याच्यावर चोळलें; त्यामुळें राजाच्या पायावर बिब्याचा व्हावा तसा परिणाम झाला नाहीं. त्या इसमाच्या हातांतळी काठी घेऊन हें अमानुष कृत्य करणारास यथास्थित बडवावें असा विचार राजाच्या मनांत आला. त्याकरितां त्यानें त्या इसमाच्या हातांतील काठी घेतली. परंतु, असें केल्यास त्याचापरिणाम फार वाईट होईल. आतांच असा अविचार करूं नकोस; असा त्या इसमानें त्याला हिताचा सल्ला दिल्यावरून राजानें तो विचार सोडून दिला. त्या दिवशीं रात्रीं नायकानें आपल्या तांड्याची सभा भरवून राजास कोणाबरोबर तरी चोरी करण्यास गावांत रवाना करावें असें ठरविलें व सर्वानुमतें राजाची त्या कामावर योजना झाली. राजाला कोणीकडून तरी चोरीवर पाठवून त्याच्यावर खोटीनाटी चोरीची तोहमत आणावी हाच त्या नायकाचा डाव होता. राजा तांड्यांतील सर्व लोकांस प्रिय झाल्यामुळें त्याच्याबद्दल आपला हा असा हेतू होता हें त्यानें कोणासहि कळूं दिलें नाहीं. दुसरेदिवशीं राजास बरोबर घेऊन तांड्याचा नायक चोरी करण्याकरितां जवळच्या खेड्यांत गेला. वाटेनें ते हळूं हळूं पाय न वाजवितां चालले होते. मुलाला खोड्यांत कसें घालतां येईल या विचारांत एकजण होता, व या दुष्ट लोकांच्या सहवासांतून आपण मोकळे कसे होऊं या विचारांत तो मुलगा होता. दोघेहि आपापल्या दृष्टीनें अगदीं सावध होते. उत्कृष्ट संधि

सापडली कीं आपलें काम फत्ते करावयाचें असा विचार दोघांच्याहि मनांत चालला होता. परंतु, चोरांच्या नायकासच पहिली संधि आली. जातांजातां एक बाई कांहीं फळांची पाटी डोक्यावर घेऊन जातांना त्यांना दिसली. त्याबरोबर नायकानें विचार केला कीं मुलाच्या गळ्यांत घोंगडें अडकविण्यास ही संधि फार चांगली आली आहे.

'मी आतां परत येतों, तूं येथें उभा रहा,' असें राजास सांगून तो नायक त्या बाईच्या मागें पाय न वाजवीत गेला.

राजानें मनांत विचार केला हा आतां जितका लांब जाईल तितकें चांगलें. याच्या हातांतून निसटून जाण्याची ही चांगली संधि आली आहे.

परंतु त्याचें दैव इतकें थोर नव्हतें. नायकानें तिच्या पाटींतली फळें हळूच घेऊन, ती एका फडक्यांत गुंडाळली व काखेंत घालून तेथून धूम ठोकली. पाटींतलें ओझें हलकें झालें हें पाहतांच त्या बाईनें मोठा ओरडा केला. फळें कोणी नेली हें मात्र तिला दिसलें नाहीं. इकडे नायकानें तें फळें गुंडाळलेलें फडकें राजाच्या काखेंत दिलें व तो त्यास ह्मणाला—

'आतां पळण्यास सुरवात कर, माझ्या मागें एकसारखा पळत ये, आणि बाकींच्या लोकांसारखा 'चोर पकडा, चोर पकडा' असा एकच ओरडा कर. परंतु, होतां होईतों त्यांना भलत्याच रस्त्यानें ने, माझ्या मागें आणूं नकोस.

असें ह्मणून तो तत्क्षणींच या गल्लींतून त्या गल्लींत त्या गल्लींतून या गल्लींत असा वेडा वाकडा पळाला व पुढें काय गंमत होते हें पाहण्याकरितां एका कंदिलाच्या खांबाच्या आड उभा राहिला.

नायक दिसनासा झाला असें पाहतांच राजानें तें आपल्या काखेंतलें गाठोडें रागानें जमिनीवर आदळलें, इतक्यांत त्या जागीं ती बाई आली. बाईबरोबर शेंकडों माणसांचा जमाव होता. तिनें राजाचें ताबडतोब मनगट धरलें. व दुसऱ्या हातानें रस्त्यावर पडलेलें फळांचें गाठोडें उचललें.

ती त्यास लक्षावधि शिव्या मोजूं लागली. तिच्या हातून सुटण्याकरितां राजानें हवी तितकी खटपट केली. परंतु तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं. मुद्देमाल त्याच्या जवळ सापडल्यामुळें जमावापैकीं त्यास कोणीहि मदत करण्यास धजावेना.

नायक हा सर्व प्रकार खांबा आडून पहात होता. कायद्याच्या कचाट्यांत हा पक्का सापडला, आतां त्यांतून त्याची सुटका कांहीं केल्या होणार नाहीं. अशी खात्री वाटून तो मोठ्या आनंदानें आपल्या तांड्याकडे परत निघाला. मुलगा नाहींसा झाल्याबद्दल तांड्याला कोणती थाप मारावी हेंहि त्यानें मनाशीं ठरवून ठेविलें.

इकडे राजाची व त्या बाईची झटापट चालूंच होती. ' चल, बाजूला हो, मूर्ख कुठली ? फळें घेतलीं एकानें आणि आपण दुसऱ्याच्याच अंगाला हात लाविते आहे. '

राजाच्या तोंडचें हें भाषण ऐकतांच मुलाचा शिरजोरपणा पाहून जमलेल्या मंडळीसहि अत्यंत आश्चर्य वाटलें. एक भला गलेलठ्ठ लोहार त्या जमावांतून पुढें आला व ' दम धर तुला काय इंगा आहे तो दाखवितों ' असें ह्मणून अस्तन्या सारून तो राजाच्या अंगावर धावला. इतक्यांत आपली तरवार हवेंत परजीत एक मनुष्य पुढें आला व ' खबरदार त्या मुलाच्या अंगाला हात लावाल तर ? ' असें सर्वांस दरडावून सांगूं लागला.

बाबानो, असा अविचार करू नका. उगीच भलत्याच माणसास व्यर्थ शिव्या देऊं नका. कायदा कांहीं तुमच्या घरचा नाहीं. बाई, त्या मुलाला सोड. आपण या मुलास न्यायाधिशाकडे नेऊं. तेथें त्याचा योग्य न्याय होऊन तो गुन्हेगार असल्यास तेथें त्याचें योग्य पारिपत्य होईल. या माणसाचे हे शब्द ऐकतांच तो लोहार मुकाट्यानें मागें सरकला. बाईनें मुलाचा हात सोडला. सर्व माणसांनीं आपल्या जिव्हा आवरून धरल्या व जो तो त्या मनुष्याकडे आश्चर्यचकित मुद्रेनें पाहूं लागला.

राजा ह्मणाला—' धीरद्रा, तूं इतका वेळ, कोठें होतास ? माझें काय हाल झाले ह्मणून सांगूं ? या लोकांना चांगला ठोक दे. '

———

प्रकरण २३ वें.

राजा कैदी झाला.

धीरेंद्र हळूच राजाच्या कानांत ह्मणाला—' महाराज, आपण आपली जीभ जरा आवरून धरा. पुढें काय व्यवस्था करावयाची ती सर्व मी करतों. '

पुढें तो आपल्याशीं ह्मणाला—अरे खरेच कीं ! मी आतांपर्यंत विसरलों होतों. महाराजांनीं पूर्वींच आह्माला सरदारी दिली आहे. काय मौज आहे पहा ! आपण राजे आहों हें वेड कांहीं याच्या डोक्यांतलें अद्याप गेलें नाहीं. चेहऱ्यावरचा व एकंदर चालचर्येचा दिमाखहि अगदीं हुबेहुब राजासारखा ! यांचा राजेपणा जसा पोकळ तशी आमची सरदारीही पोकळ ! तरी पण त्या सरदारीमुळें मला एकप्रकारचें भूषण वाटतें. ही सरदारी मी आपल्या कर्तबगारीनें मिळविली आहे. महाराजांची मी कांहीं कामगिरी केली ह्मणूनच त्यांनीं संतुष्ट होऊन आह्मास ही सरदारी दिली आहे. या मृत्युलोकच्या खरोखरीच्या राज्यांतील कामगिरी शिवाय मोठ्या पदास चढलेल्या खुशालचंद सरदारापेक्षां माझी योग्यता किती तरी मोठी आहे ! '

गर्दी एकीकडे करून एक पोलीसचे शिपाई राजाजवळ आले. ते त्याच्या अंगावर हात टाकणार तों धीरेंद्र ह्मणाला— " भल्या गृहस्था, त्याच्या अंगाला हात लावण्याचें कांहीं कारण नाहीं. तूं सांगशील तशी सर्व व्यवस्था होईल. त्याबद्दल मी जबाबदार आहे. संतोषानें जें होत आहे त्याला सक्ती कशाला पाहिजे ? तूं पुढें चालूं लाग. आह्मी तुझ्या मागोमाग येतों. "

बाईस घेऊन व तो मुद्देमाल बरोबर घेऊन तो पोलीस रस्त्यानें चालूं लागला व त्याच मागोमाग धीरेंद्र व राजा हेहि दोघेजण जाऊं लागले. त्यांच्या मागें तमासगीरांचीहि गर्दी चालली होती. दंगामस्ती करण्याचा राजाचा विचार होता. परंतु, धीरेंद्र त्याला हळूंच ह्मणाला— " महाराज, आपण विचार करा; आपण केलेल्या कायद्यानेंच ही सर्व व्यवस्था चालली आहे. या कायद्या विरुद्ध आपण वर्तन करणें ह्मणजे स्वतःचाच द्रोह करण्याप्रमाणें आहे. ज्या ठिकाणाहून कायद्याचा उगम झाला त्याच

ते मोडण्यास प्रवृत्त व्हावें हे चांगलें नाहीं. कायदे पाळण्याबद्दलच्या स्वतःच्या उदाहरणानें लोकांना कित्ता घालून देण्याचा हा सुप्रसंग आपण वायां जाऊं देणार नाहीं तरच खरा उपयोग होईल. आपणास पुनः राज्यपदाची प्राप्ती होईल त्यावेळेस या प्रसंगाची आठवण होऊन आपल्याला एकप्रकारचें भूषणच वाटेल. आपला राजेपणा बाजूस ठेवून एखाद्या सामान्य नागरिका-प्रमाणें आपण कायद्याचा मान राखलांत, त्या बाबतींत कोणत्याहि प्रकारचा वृथा अभिमान धरला नाहींत याबद्दल लोक तुमचे गुणच गातील.'

'तूं अगदीं रास्त बोललास. कायद्याचा योग्य प्रतिपाळ कर-ण्यासाठीं रयतेस ज्या अडचणी व गैरसोई सोसाव्या लागतात, त्या रयत होण्याचा आमच्यावर प्रसंग आला असतां आह्मीहि सोसण्यास तयार आहों; हें आह्मीं आपल्या वर्तनानें लोकांच्या पूर्णपणें निदर्शनास आणूं. त्याबद्दल तूं बिलकुल धास्ती बाळगूं नकोस.'

हा सर्व लबाजमा कोर्टांत येऊन दाखल झाला. "या मुलानेंच माझ्या पाटींतील फळें उचलून नेलीं" असें त्या बाईनें कोर्टापुढें शपथेवर सांगितलें. राजाच्या बाजूस विरुद्ध पुरावा कोणत्याहीप्रकारचा नव्हता. तेव्हां त्यास कोर्टानें दोषी ठरविलें. पोलिसनें तें फळाचें गाठोडें कोर्टांत उलगडलें. त्यांत फळें दिसतांच कोर्टाचा चेहरा रुष्ट दिसला. धीरेंद्राचा चेहराहि एकदम बदलून गेला. राजाचा चेहरा मात्र यत्किंचितसुद्धां बदलला नाहीं. कारण, आपण कोणत्याहि प्रकारचा गुन्हा केला नाहीं. अशी त्याच्या मनाची पक्की खात्री होती. थोडा वेळ थांबून न्यायाधीश बाईकडे वळून ह्मणाले —

"या फळांची किंमत काय?"

न्यायाधिशांना रामराम करून बाई ह्मणाली—

"या फळांची किंमत पांच रुपये आहे महाराज."

"खरें सांग"

'यांतला एक शब्द सुद्धां खोटा नाहीं.'

'या लोकांना बाहेर घालवा आणि कोर्टाचें दार लावा'

असें न्यायाधीशांनीं त्रासून शिपायास सांगितलें.

लोकांना तावडतोब बाहेर घालविण्यांत आलें. फिर्यादी, आरोपी व धीरेंद्र

याशिवाय कोर्टांत कोणीहि राहिलें नाहीं. धीरेंद्राचा चेहरा अगदीं खिन्न झाला होता. त्याच्या कपाळावर घामाचे बारीक बारीक बिंदुहि चमकूं लागले.

न्यायाधीश बाईकडे वळून ह्मणाले—

यंदाच्यासालीं दुष्काळ आहे. गोरगरीबांना पोटभर अन्नहि मिळण्याची मारामार आहे. हा मुलगा अगदीं लहान आहे. बिचाऱ्याला भूकबीक लागली असेल आणि त्यानें घेतली असतील कांहीं फळें. चेहऱ्यावरून तो कांहीं चोरटा दिसत नाहीं. भुकेमुळेंच त्याचे हातून हें कृत्य झालें असावें. दोन रुपये किमतीच्या वर माल चोरणारास या राज्यांत फाशी देतात; हें तुला माहीत आहेच. तेव्हां तुझ्या फळांची खरी किंमत काय आहे तें सांग.

न्यायाधीशाच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच राजा एकदम दचकला. तरी पण आपलें सर्व आश्चर्य व दुःख त्यानें बिलकुल बाहेर दिसूं दिलें नाहीं. परंतु, इकडे बाईची स्थिति काय झाली तें सांगतां पुरवत नाहीं. ती भयानें ओरडून ह्मणाली—

माझ्या हातून आज केवढें भयंकर पातक झालें. मुलगा कितीतरी गोजिरवाणा दिसत आहे. अशा मुलाच्या प्राणहानीस मी कारण झालें ! आतां मी काय करूं ? महाराज, मला या पापातून सोडवा. मी आतां काय करूं !

न्यायाधीश शांतपणानें ह्मणाले—

" मघाशी तूं जी किंमत सांगितलीस ती मी अद्याप लिहून घेतली नाहीं, तुला पाहिजे असल्यास पुनः सांग. "

' वः मग तर फारच चांगलें झालें ! माझ्या फळांची किंमत आठ आणे आहे महाराज ! '

बाईच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच धीरेंद्रास पराकाष्ठेचा आनंद झाला. आपण कोण, आपण आहांत कोठें इत्यादि सर्व गोष्टींचें आनंदातिशयांत त्यास विस्मरण पडून त्यानें राजास पोटाशीं घट्ट आवळून धरलें. बाईहि न्यायाधिशाचा निरोप घेऊन आनंदानें निघून गेली. एक पोलीसहि तिच्या मागोमाग गेला.

पोलीसांचे हे चाळे धीरेंद्रास पक्के माहीत होते. पाय न वाजवितां तो हळूंच दाराच्या फटीशीं जाऊन उभा राहिला. पोलीस त्या बाईशीं काय बोलतो हेंच त्याला ऐकावयाचें होतें.

पोलीस त्या बाईस ह्मणाला—

' या फळाचे मी आठ आणे देतों तेवढीं मला देईनास. '

' बाबा, त्याची किंमत खरोखरच पांच रुपये आहे. मुलाचा जीव वांचतो ह्मणूनच त्याची किंमत कमी सांगितली. उगीच भलतेंच बोलूं नकोस. इतकीं फळें कोणी आठ आण्यास दिलीं आहेत काय ? जा, आपल्या उद्योगाला जा. '

' तुला चेष्टा वाटल्या वाटतें ! कोर्टांत शपथेवर दोन किंमती सांगतेस नाहीं ! तुला कायदा माहीत आहे का ? आतां तुला कोर्टांत नेऊन हजर करतों ह्मणजे समजेल काय आहे तमाशा तो. खोटी शपथ वहातेस नाहीं ? आणि पुनः मलाच ह्मणते जा आपल्या उद्योगाला ह्मणून ! '

" बाबा, मी गरीब आहे, असें भलतेसलतें कांहीं करूं नकोस. हीं घे फळें आणि दे मला आठ आणे ! आज कोणाचें तोंड पाहिलें होतें ह्मणून हें नुकसान नशीबाला आलें. "

पोलीसानें तीं फळें आपल्या पदरांत घेतलीं. व इकडे बाई डोळे चोळींत आपल्या रस्त्यानें चालती झाली. हा सर्व प्रकार धीरेंद्रानें आडून ऐकला. शिपाई आपली मिळकत एका कोपऱ्यांत ठेऊन कोर्टांत परत आला. इतक्या वेळांत मॅजिस्ट्रेटचे निकाल लिहिणें संपलें. राजास थोडया दिवसांची कैद व कैद भोगल्यानंतर सार्वजनिक जागेंत फटके अशी शिक्षा न्यायाधीशांनीं सुनवली.

ही शिक्षा ऐकून राजास फारच आश्चर्य वाटलें. न्यायाधीशास जागच्याजागीं फासावर चढविण्याची शिक्षा सांगण्यास त्याचे ओठ हालण्याच्या बेतांत होते. परंतु, तोंडांतून शब्दोच्चार निघण्यास प्रारंभ होण्यापूर्वी धीरेंद्रानें त्यास डोळ्यानें दाबलें. न्यायाधीशास नमस्कार करून धीरेंद्रानें राजाचें बोट धरलें व ते दोघेहि पोलिसच्या मागें कैदखान्याकडे चालले.

रस्त्यांत पोहोंचतांच धीरेंद्राच्या हातास हिसडा देऊन व आपलें बोट सोडवून राजा मोठ्या त्वेषानें ह्मणाला—

' तुला वेड तर नाहींना लागलें ! जे तुरुंग रयतेसाठीं बांधले आहेत त्यांत मी प्राण गेला तरी जाईन असें तुला वाटतें का ? '

खालीं लवून मुजरा करून धीरेंद्र ह्मणाला—

' माझ्यावर आपला भरंवसा आहे ना ? आपण जर आतां बोलाल तर आपल्यावर याहीपेक्षां अधिक खडतर प्रसंग मात्र ओढवेल हें लक्ष्यांत ठेवा. ईश्वराची इच्छा असते तशा सर्व गोष्टी घडतातच. आपल्याला त्या कधींहि बदलतां येणार नाहींत. भोक्तृत्व संपलें ह्मणजे सर्व गोष्टी आपल्या मनाप्रमाणें घडून येतील. मात्र आपण असा उतावीळपणा करतां कामा नये.

प्रकरण २४ वें.

तुरुंगांतून सुटका.

हिंवाळ्याचा लहान दिवस बहुधा सर्व अस्तमानास गेला. रस्त्यांतील रहदारी पातळ होऊं लागली. कांहीं थोडे लोक रस्त्यांतून जात होते तेही घराच्या ओढीनें आपले पाय झर झर उचलीत होते. ज्यांचीं कांहीं कामें राहिलीं होतीं ते तीं लगबगीनें संपविण्याच्या धांदलींत असलेले दिसत होते. निवारा व्हावा ह्मणून घरोघरीं माणसें दार, खिडक्या वगैरे लावूं लागलीं होतीं. जो तो आपल्या मुलांबाळांची गांठ केव्हां पडेल या इच्छेनें मोठ्या आतुरतेनें घराकडे चालला होता. आपल्या डावी उजवीकडे काय चाललें आहे, हेहि पाहण्याची कोणी तसदी घेत नव्हते. रस्त्यांत कांहीं गलबला चालो किंवा कशाचीहि गडबड उडो, तेथें थांबून काय आहे याबद्दलची चौकशी करण्याची एरव्हींप्रमाणें यावेळीं कोणाचीच प्रवृत्ति दिसत नव्हती. अशा वेळीं शुभधाम देशाचा राजा चतुर्भुज होऊन कारागृहाकडे चालला होता. त्यास यावेळींच कारागृहांत घेऊन जात होते, हें त्याचें सुदैवच समजावयाचें. नाहींतर दुपार तिपारचा वेळ असती तर रस्त्यांतील लोकांनीं त्याच्याकडे टक लावून पाहून, तुरुंगास पुरवला, परंतु लोकांची ही दृष्टि नको असें राजास होऊन गेलें असतें. यावेळेस राजाच्या मनांत मात्र वेगळाच विचार आला. तो आपल्या मनाशीं ह्मणाला—

" एरव्हीं कोठें मला ठेंच लागल्यासारखें झालें, कीं शेंकडो दास-दासी घाबरून जाऊन माझ्याभोंवतीं जमावयाच्या, व माझी सेवा करण्यास

पुढें पुढें करावयाच्या त्या मला आज भर रस्त्यांतून कारागृहांत घेऊन जात असतांहि कोणी विचारपूस सुद्धां करीत नाहीं. काय हा कालाचा महिमा !"

राजाच्या मनांत अशाप्रकारचे विचार चालूं आहेत तों ते तुरुंगाजवळ जाऊन पोहोंचले. तोंच धीरेंद्राने शिपायाच्या खांद्यावर हात टाकून म्हटलें— :

" आतां येथें कोणी आपल्याला ऐकावला नाहीं. मला तुझ्यापाशीं एक गोष्ट सांगावयाची आहे. "

" भल्या माणसा, तुझी गोष्ट होईल; पण माझ्या गळ्याला तात लागेल. बऱ्या विचारानं बाजूला हो. ही पहा रात्र पडत चालली. अंधार पडण्यापूर्वी मला तुरुंगांत गेलें पाहिजे. "

" हें पहा, ह्या गप्पा मला सांगूं नकोस. तूं भलत्याच धुंदींत आहेस, पण खूप समज कीं तूंहि माझ्या तावडींत सांपडला आहेस. हें पहा मी सांगतों तें एक, त्यांत तुझेंहि कल्याण आहे. जरा कानाडोळा कर आणि या मुलाला जाऊं दे. "

' तूं शुद्धीवर आहेस काय ! तूं हें कोणाशीं बोलत आहेस ! हें पहा मी तुलाहि—'

' काय ! मला पकडतोस ? तुझ्यासारखे असे पकडणारे पुष्कळ पाहिले आहेत. तूं मला ओळखिलें नाहींस वाटते ? त्या बाईला आडवून तिच्यापासून तीं फळें आठ आण्यास घेतलेला तूंच नां ? आणि वर कायद्याच्या गोष्टी मला सांगतोस ? '

हे खुणेचे शब्द कानीं पडतांच बिचाऱ्या शिपायाची अंगदीं गाळण उडून गेली. त्याच्या तोंडून एक शब्दहि निघेना, तरी तो आंतल्या आंत धुसफुसून धीरेंद्रास धमकविण्याचा प्रयत्न करीतच होता. त्याची ती धुसफुस आपोआप बंद झाल्यावर धीरेंद्र म्हणाला—-

" हें पहा, यांत कांहीं अर्थ होणार नाहीं ! फुकट नोकरीला मुकून बिनभाड्याच्या घरांत जाऊन पडशील. तुझें गरीबाचें उगीच नुकसान करण्याची माझी इच्छा नाहीं. तुझें आणि त्या बाईचें काय बोलणें झालें तें मी सर्व ऐकिलें आहे. तुझ्याविरुद्ध मला हवातसा पुरावा करितां येईल. असें म्हणून त्यानें शिपायाचें बाईशीं झालेलें भाषण साद्यंत सांगितलें, व तो शिपायास म्हणाला.—

' कां ? आहे नां बरोबर ! हेंच जर मी न्यायाधिशाला जाऊन सांगि-तलें तर तुझी काय दशा होईल ? '

हें त्याच्या तोंडचे शब्द ऐकून बिचारा शिपाई अगदीं गभगाळत होऊन गेला. थोडा वेळ स्तब्ध राहून तो ह्मणाला—

" वा ! तुह्मी तर खूप दिसतां ! भलतीच गोष्ट माझ्या अंगीं लावतां ! मी आपली बाईची उगीच गंमत केली. "

" आणि तिचीं फळेंहि पण गमतीनेंच घेतलीस ना ? "

" कोणी फळें घेतलीं ? मी तिची उगीच थट्टा केली. "

" केली असशील बुवा ! तुझ्या समयसूचकतेबद्दल तुला बक्षिस दिलें पाहिजे. परंतु त्या थट्टेबद्दल मात्र तुला कैदेंत घालावें कीं फांसावर चढवावें हा शास्त्रार्थ मी न्यायाधिशाला विचारून येतों. कारण, ते असल्या थट्टांचाच रोज निकाल करीत असतात ? "

असें ह्मणत तो चार पावलें चालूनहि गेला. आतां कांहीं आपली धड-गत नाहीं असें पाहून शिपाई काकुळतीनें ह्मणाला—

" थांबा, महाराज, थांबा. न्यायाधिशाला ती थट्टा खरी वाटणार नाहीं. तुह्मी इकडे तर या. त्या थट्टेचा हा असा परिणाम होईल असें मला त्यावे-ळींच कळतें, तर त्या बाईशीं एक अक्षरहि बोलण्याच्या भानगडींत मी पडलों नसतों. माझ्या पदरीं चार माणसें आहेत. मी त्यांचा पोशिंदा आहे. त्याचा विचार करा. मी आपल्यासाठीं काय करावें अशी आपली इच्छा आहे ? "

" दुसरें काय करावयाचें आहे. तूं मुका आहेस, लंगडा आहेस, आंधळा आहेस असें समजून न बोलतां, न चालतां क्षणभर डोळे मीट, ह्मणजे झालें. यापेक्षां तुला मी कांहीं अधिक सांगत नाहीं. "

शिपाई निराशेनें ह्मणाला—" बाबा, तूं सांगतोस त्याप्रमाणें जर मीं केलें तर माझें किती नुकसान होईल ह्मणून सांगूं ! वास्तविक मी त्या बाईची उगीच गंमत केली. ती गंमत नाहीं तो अपराध आहे असें जरी मानलें तरी तो अगदीं क्षुल्लक आहे. त्याबद्दल होणारी शिक्षा इतकी जबर खास नसली पाहिजे, कीं तुला भिऊन मीं तूं सांगतोस तसें वागावें. "

" अरे वा! तूं तर न्यायाधिशासारखाच गप्पा मारायला लागलास! एवढें शहाणपण जाडया भरडया काळ्या डगल्याखालीं झाकलें जावें हें पाहून मला खरोखरच तुझी कींव येते. आपण आम्हाला कायदा शिकवितां कां? पण आपण खूप लक्षांत ठेवा कीं आपण सरकारी नोकर आहां आणि म्हणूनच त्या गुन्ह्याबद्दल आपल्याला निदान सहा महिनेपर्यंत तरी तुरुंगांत रखडावें लागेल. एका बाईला अडचणींत गाठून तिचा माल बहुधां फुकटच तूं लांबविलास याबद्दल शिक्षा काय आहे याचा तुला अनुभव पाहावयाचा आहे कां?"

" महाराज, माझ्यावर दया करा, मला यांतून वांचवा, मी मुक्यासारखा, लंगडयासारखा, आंधळ्यासारखा—"

" बस्स. माझें काम झालें."

" फार काय, हा दरवाजा मोडकळीला आलेला आहे तोसुद्धां मी सकाळच्या आंत फोडून ठेवितों. कोणी विचारिलेंच, तर मी त्याना सांगेन कीं, माझा काय इलाज आहे? हा दरवाजाच दुरुस्त नव्हता, त्यामुळें कद्यास कोणी पळवून नेलें."

" असेंच कर. तितक्यातून तुझ्यावर आलेंच तर माझ्यावर विश्वास ठेव. मी तुझ्या केसासहि धक्का लागूं देणार नाहीं. आणि शिवाय त्या न्यायाधिशाचें मुलाबद्दल किती प्रेम होतें हें तूं पाहिलें नाहींस कां? मुलगा सुटून गेला हे न्यायाधिशास समजलें तर त्यास एकप्रकारें बरेंच वाटेल."

प्रकरण २५ वें.

धीरेंद्राची जन्मभूमि.

धीरेंद्र व राजा हे जरा दूर गेले. शिपाई दिसेनासा होताच धीरेंद्र राजास म्हणाला—

" आपण शहरा बाहेरच्या वेशींत जाऊन उभे रहा. येथें कांहींजणांचा हिशेब चुकता करावयाचा राहिला आहे तेवढा करून मी आपल्या मागोमाग येतों."

सुमारें अर्ध्या तासानंतर हे दोघे मित्र शहराच्या पूर्वरस्त्यास लागले. धीरेंद्रानें दोन तट्टें खरेदी केलीं होतीं. त्यावरच ते दोघेहि बसले होते. राजानें आपल्या अंगावरच्या चिंध्या फेंकून देऊन धीरेंद्रानें त्याच्यासाठीं आणिलेला पोषाखहि त्यानें घातला.

मुलाला दगदग होऊं नये याकरितां धीरेंद्र फारच सावधगिरी बाळगीत असे. रात्रीचें जागरण, सर्व दिवसरात्र वणवण हिंडणें, केव्हां तरी आणि कांहीं तरी खाणें, यामुळेंच धीरेंद्राची प्रकृति बिघडून त्याचें डोकें फिरलें असावें, आतां त्याला स्वस्थ विश्रांति मिळाली, खायला, प्यायला वेळच्या वेळेस मिळालें, थंडीवाऱ्यापासून त्याचें योग्य निवारण झालें, सारांश, त्याची योग्य काळजी घेण्यांत आली तर त्याचें वेड आपोआप कमी होत जाईल अशी धीरेंद्रास फार आशा वाटत होती. ह्मणून तो रस्त्यानें दर-कूच दरमजल करीत सावकासच चालला होता. ज्या घराचें दर्शन घेतल्यास आज कित्येक वर्षें लोटलीं होतीं त्या आपल्या जन्मभूमींतील घराकडे तो चालला होता. अर्थात् घोडे जलद हाकून आपण एकदांचें घरीं केव्हां पोहोंचतों असें त्यास होऊन गेले होते; परंतु राजाबद्दल असलेल्या प्रेमाचा या मानुष-तासुलभ मनोवृत्तिवरहि पगडा बसून तो अगदीं मंदमंद गतीनेंच चालूं लागला. सुमारें पांच कोस चालून गेल्यानंतर त्यांनीं एका मोठ्या खेड्यांत रातोरात मुक्काम केला. पुन्हां पहिलेंचें नाटक सुरू झालें. राजानें आरामा-सनावर बसून भोजन करावें व धीरेंद्रानें शागीर्दाप्रमाणें त्याच्यामागें उभें रहावें. राजाची निजण्याची वेळ झाली ह्मणजे धीरेंद्रानें फरास व्हावें, राजाचें अंथरूण साफसूफ करावें, व राजानें खरोखरीच्या राजाप्रमाणें त्याच्यावर पडून विश्रांतिसुख अनुभवावें. इकडे बिचाऱ्या धीरेंद्रानें एक घोंगडीचें रकटें अंगावर घेऊन दारापाशीं पडावें.

दुसऱ्या व तिसऱ्या दिवशीं गेल्या दोनचार दिवसांत घडलेल्या गोष्टी एक-मेकांस सांगत ते हळूं हळूं आपला मार्ग आक्रमित चालले. राजाचा शोध करीत आपण सर्व शहर कसें पालथें घातलें, व त्या जंगली माणसानें थाप देऊन आपणास कसें फसविलें इत्यादि सर्व हकीगत धीरेंद्रानें त्यास सांगि-तली. आपण परत यालं ह्मणून त्या बिचाऱ्या वृद्ध माणसानें पुष्कळ वाट पाहिली. परंतु अखेर बिलकूल आशा न राहिल्यामुळें त्या बिचाऱ्यानें वीट

तोंड करून मोठ्या कष्टानें मला रजा दिली.

धीरेंद्राच्या तोंडचें हें शेवटचें वाक्य ऐकतांच राजा आश्चर्यानें म्हणाला—'काय ? मी परत आलों नाहीं म्हणून त्याला दुःख झालें ?'

यानंतर राजानें त्या लबाड हातान्याची सर्व करणी धीरेंद्रास सांगितली. ती ऐकून त्या नीच थेरड्याची आणि तेथल्यातेथेंच गठडी कां वळली नाहीं, याबद्दल धीरेंद्रास फार पश्चात्ताप झाला.

स्वारीच्या शेवटच्या दिवशीं धीरेंद्र मोठा खुषींत होता. त्याची जीभ सारखी चालली होती. आपला बाप मोठा थोर होता, आपला भाऊहि फार उदार अंतःकरणाचा होता, याबद्दल त्यानें आपल्या तारुण्यांत घडलेल्या अनेक गोष्टी सांगून राजाची खात्री केली. आपल्या मामेबहिणीवर आपलें कसें निस्सीम प्रेम आहे हें सांगतांना तर तो फारच रंगांत आला. आपल्या वाड्यांत गेल्यावर आपलें तेथें अपूर्व स्वागत होईल. फार दिवसांनीं मी आज घरीं जाणार, तेव्हां आमच्यासाठीं काम करूं आणि काय न करूं अशी घरांतील माणसांची स्थिति होऊन जाईल. मला तेथें अकस्मात् पाहिल्यावर सर्वांना मोठा अचंबा वाटेल.

हें त्याचें रसभरित वर्णन चालूं असतां राजाच्याहि चित्तास कांहीं वेळ करमणूक झाली. तो प्रदेश रमणीय असून आकाशहि निरभ्र होतें. प्रदेशांत जागोजाग चढण उतरण असलेली पाहून समुद्रांतील लाटांच्या उंच नीच आंदोलनाची आठवण होई. एखाद्या उंचवट्यावर चढून लांबूनच राजास आपलें घर दाखवितां यावें म्हणून त्यानें अनेकवेळां प्रयत्नहि केले व शेवटीं ते यशस्वीहि झाले. घराच्या आवाराचा भाग दृष्टीस पडतांच तो राजास ओरडून म्हणाला—'महाराज, तें पाहिलें कां येथून खूप लांब झुडपा एवढें एक लहानसें खेडें दिसतें आहे. त्याच ठिकाणीं आमचा मोठा वाडा आहे. तुम्हाला आमच्या वाड्याचे वरचे मजले व गच्ची येथून दिसतील. वाड्याच्या पिछाडीस जी जमीन आहे तीच आमच्या वडिलांची जमीन. त्या जमिनीचें सौंदर्य किती अप्रतिम दिसतें आहे ! वाड्याच्या आसमंतांत आपल्या स्वागतार्थ हिरव्या रंगाचा गालिचाच अंथरल्याचा भास होत आहे. माझ्या वाड्यांत एकंदर सत्तर दालनें आहेत. वाड्याची व्यवस्था ठेवण्यास आमच्या दिमतीस सत्तावीस नोकर आहेत. आमच्या

मानानें हें मोठेंच वैभव समजलें पाहिजे नाहीं, महाराज ? चला, आतां पाऊल उचला. माझ्यानें आतां दम धरवत नाहीं. केव्हां एकदां घरीं जाऊन पोहोंचेन असें मला झालें आहे. ''

त्याच्या जिव्हेच्या गतीनें घोड्यांना चालतां आलें असतें तर फार बहार झाली असती ! त्याच्या मनाप्रमाणें तो अगदीं अल्पावधींत आपल्या घरीं जाऊन दाखल झाला असता. परंतु घोडीं पडलीं भाड्याचीं ! त्यांना घर ना दार—कशाचीच ओळख नाहीं. आपल्या पृष्ठावर आरूढ झालेल्या धीरेंद्राची त्यांना थोडीशीं जरी कल्पना झाली असती तरी त्यांनीं थोडीशीं त्वरा केली असती. परंतु जन्मभूमि या अक्षर चतुष्टयांत केवढा मोठा अर्थ संकलित झालेला आहे याची त्या पशूंस कोठून कल्पना होणार ? घोडीं आपल्या पूर्वीच्याच गतीनें चालूं होतीं. घर जसजसें जवळ येत चाललें तसतशी धीरेंद्राची जिव्हा मात्र अधिक अधिक त्वरेनें लवूं लागली. गांव बरेंच जवळ आल्यावर तो राजास म्हणाला—' तें पाहिलें कां मंदिर ? अगदीं जसेंच्या तसें आहे. त्यांत तिळप्राय फेरबदल झालेला नाहीं. त्याच्या त्या शिखराचें हस्तिदंती काम इतकें सुबक आहे कीं, तें पहावयास दूरदूरचीं माणसें येथें येतात. कुशल कारागीर नमून्याकरितां त्या शिखराचा नकाशा काढून नेतात. ' याप्रमाणें धीरेंद्राचें बोलणें चालूं असतां ते अगदीं गांवालगत येऊन ठेपले. ज्या वाड्याचें वर्णन धीरेंद्रानें थोड्याच वेळापूर्वी दिलें होतें त्या भव्य इमारतीपुढें ते दोघेहि उभे राहिले.

तथ धीरेंद्र राजास म्हणाला— ' महाराज, आजचा हा अपूर्व योग माझ्या चरित्रांत सुवर्णाच्या अक्षरांनीं लिहून ठेविला पाहिजे. खरोखरच आज मी धन्य झालों. माझा बाप, माझा भाऊ, माझी बहीण, हीं तिघेंही आनंदानें वेडावून जातील. मला येथें पाहतांच त्यांचे डोळे एकसारखे माझ्याकडेच लागून राहतील. ते सर्वजण एकसारखे माझ्याशींच बोलत राहतील. हें पाहून आपला अपमान झाला, आपलें योग्य स्वागत झालें नाहीं असा मात्र आपला गैरसमज होऊं देऊं नका. कारण आनंदातिरेकाची पहिली उबळ शांत झाली म्हणजे हें सर्व मन्वंतर पालटून जाऊन सर्वजण आपल्याच सेवेंत दक्ष राहतील. माझें आपल्यावर किती प्रेम आहे, व आपलें संरक्षण

करण्यासाठीं मीं कोणतीं कोणतीं साहसे केलीं हे त्यांना समजलें म्हणजे ते आपल्याला जीव की प्राण मानूं लागतील याबद्दल मला मुळींच संशय नाहीं.'

वाड्याच्या दाराशीं धीरेंद्र घोड्यावरून खालीं उतरला, व राजासहि मोठ्या आदबीनें हात देऊन त्यानें खालीं उतरविलें. थोडीं पावलें टाकतांच ते एका भव्य दिवाणखान्यांत येऊन दाखल झाले. तेथें एक तरुण मनुष्य कांहीं कागद पत्र चाळीत होता. त्याकडे पाहून धीरेंद्र म्हणाला— ' इतक्या वर्षांनीं तुझी माझी भेट झाली याबद्दल मला किती आनंद झाला म्हणून सांगू. तुलाहि पण तसाच झाला असेलना ? बरें, बाबा कोठें आहेत तें मला आधीं दाखीव. कारण त्यांचें दर्शन होईपर्यंत मी आपल्या घरीं आलों आहे असें मला वाटणार नाहीं.

धीरेंद्रास तेथें पाहतांच त्या तरुण मनुष्यास क्षणैक मोठा आचंबा वाटला परंतु, तो धीरेंद्राकडे आनंदयुक्त मुद्रेनें न पाहतां खुनशी दृष्टीनें पाहूं लागला. धीरेंद्र तेथें आला हें कांहीं चांगलें झालं नाहीं असें त्यास वाटलें असावें. तरी तो धीरेंद्राकडे पाहून हळूं स्वरांत म्हणाला—

" भल्या माणसा, तुझें माथं फिरलेलें दिसतें. जगांत तुझ्यावर अनेक वाईट प्रसंग येऊन तूं वैतागला आहेस असें तुझ्या चेहऱ्यावरून व पोषाखावरून स्पष्ट दिसतें. तूं मला कोण समजतोस ? "

" काय ! मी तुला कोण समजतों ? तूं आहेस तोच मी तुला समजतों तूं माझा भाऊ लुब्धक नव्हेस काय ? "

तो तरुण मनुष्य पुन्हां म्हणाला—

" आणि तूं कोण आहेस अशी तुझी कल्पना आहे ? "

" कल्पनेचें येथें कांहीं काम नाहीं. मी तुझा भाऊ धीरेंद्र तुला खरोखरच ओळखत नाहीं काय ? "

यावर लुब्धक मुद्रा पालटून म्हणाला— " काय ! तूं थट्टा चालविली आहेस काय ? मेलेलीं माणसें कोठें जीवंत होतात ? तसें होईल तर मोठी बहार होईल ! मग माझा मृत भाऊ मला इतक्या वर्षांनंतरहि येऊन भेटेल. या मृत्युलोकांत तशी गोष्ट घडून येणें केवळ अशक्य होय. म्हणून मी तुला पुन्हां एकवार सांगतो कीं, कृपाकर, आणि पुन्हां असें बोलूं नकोस. असा उजेडांत ये. मला तुला नीट पाहूं दे. "

असें ह्मणून लुब्धकानें धीरेंद्राचा हात धरून त्यास खिडकीशीं ओढिलें व एखादी वस्तु उलथी पालथी करून जशी तपासून पहावी त्याप्रमाणें त्यानें धीरेंद्राच्या चोहोंबाजूंस पाहिलें. धीरेंद्रास बिचाऱ्यास यांतलें वर्म कांहींच उमगेना. त्याला वाटलें कीं फार दिवसांनीं गांठ पडली आहे. तेव्हां आपला भाऊ आपल्याशीं विनोद करीत आहे. शेवटीं तो ह्मणाला—

" लुब्धका, पहा मला नीट पहा; चोहोंकडून पहा. नखशिखांत प्रत्येक अवयवागणित तुझी अशी खात्री होईल कीं मी धीरेंद्रच आहे, दुसरा कोणी नाहीं. मी तुझा गमावलेला भाऊ धीरेंद्रच होय. आज हा सोन्याचा दिवस उगवला. आपली भेट ह्मणजे आज या घरांत अमृताचा वर्षावच झाला असें मी समजतों.

असें ह्मणून तो आपल्या भावाच्या अंगावर पडण्याच्या बेतांत होता, परंतु लुब्धकानें पुढें हात करून तुसडेपणानें त्यास दूर सारिलें. धीरेंद्रास हें पाहून अत्यंत आश्चर्य वाटलें. त्याच्या तोंडून एक शब्दही निघेना. शेवटीं तो ह्मणाला—' काय ? मी तुझा भाऊ नाहीं काय ? '

' तसें असतें तर फार बरें झालें असतें. दुसऱ्यानें तुला कोणी ओळखिलें, तरीहि फार चांगलें होईल. परंतु माझ्या भावाचें सादृश्य तुझ्या ठिकाणीं यत्किंचित्‌ही दिसत नाहीं. अखेर तें पत्र खरेंच ठरणार नां ! '

' कोणतें पत्र ? '

' आज सात वर्षांपूर्वीं आलें तें. माझा भाऊ युद्धांत मरण पावला असें त्यांत लिहिलें होतें. '

' तें खोटें होतें. आपले बाबा कोठें आहेत. त्यांना हाका मार, ह्मणजे ते मला ओळखितील. '

' बाबांना आतां कोठून बोलावून आणूं ? '

' काय ? बाबाहि परलोकवासी झाले ? हाय ! हाय ! माझें इहलोकींचें निम्में अधिक सुख मावळून गेलें. बरें. माझा थोरला भाऊ तरी हयात आहे काय ? त्याला तरी बोलाव. ह्मणजे तो मला ओळखून माझें समाधान करील. '

' तोहि बाबांच्या मागोमाग गेला. '

' मग तर आमचा सर्वच ग्रंथ आटपला ! ते दोघेहि गेले आणि माझ्या-

सारखा हतभागी जीवंत राहिला ! असो ईश्वराची इच्छा. माझी बहीण कुमुदती ही तरी येथें आहे काय ? कां तीहि—'

' निवर्तली ! छे. ती जीवंत आहे. '

' वा ! ईश्वराची माझ्यावर ही मोठी कृपाच झाली ह्मणावयाची. या बातमीनें पुन्हां माझ्या हृदयांत आशेचा उद्भव झाला. आणि तिला तरी आण. ती मला ओळखणार नाहीं काय ! छे. असें कधीं होणार नाहीं. ती मला खास ओळखील. त्याप्रमाणेंच येथील जुने नोकरचाकरहि मला ओळखतील.'

' जुने नोकरचाकर जीवंत आहेत कोठें ? त्यांतील फक्त पांचच आज हयात आहेत. त्यांचीं नावें सांगून लुब्धक खोलींतून निघून गेला. धीरेंद्र खोलींतून इकडून तिकडे हिंडत मनात विचार करूं लागला, ' बावीस नोकरांपैकीं पांच लबाड नोकरच कायते जीवंत रहावेत हें लक्षण कांहीं ठीक दिसत नाहीं.

याप्रमाणें त्याचा बराच वेळ विचार चालूं होता. या नादांत राजाचाहि त्याला विसर पडला. इकडे राजाहि बराच वेळ स्तब्ध बसला होता. धीरेंद्र सचिंत बसला आहे. असे पाहून तो ह्मणाला '.भल्या माणसा, तुझ्यावर हा प्रसंग आला ह्मणून इतका खिन्न होऊं नकोस. तुझ्यासारखीं दुसरीहि माणसें आहेत कीं ज्यांना त्यांचे आश्रितहि ओळखेनासे झाले आहेत. त्याच्या हक्काचा लोक उपहास करूं लागले आहेत. तुझ्या दुःखांत तुझ्यापेक्षां अधिक अधिकाराचे लोकहि समभागी आहेत असा विचार करून समाधान मानण्यास तुला जागा आहे. '

राजानें आपल्याला हा टोमणा दिला असे वाटून धीरेंद्र चपापला. तो ह्मणाला— ' महाराज, माझा असा उपहास करूं नका. मी ह्मणतों त्यांतील एक अक्षरहि खोटें नाहीं अशी तुमची थोडक्याच वेळांत खात्री होईल. मी तो नाहीं. मी खरोखरच येथील जिनगीचा मालक आहे, ही गोष्ट एका लावण्यलतिकेच्या तोंडून तुह्मास ऐकावयास सांपडेल. मला तोतया कोण ह्मणेल ! हा दिवाणखाना, माझ्या पूर्वजांच्या या तसबिरी, येथील या सर्व वस्तू, माझ्या अगदीं परिचयाच्या आहेत. महाराज, याच वास्तूंत माझा जन्म होऊन माझें संगोपनहि येथेंच झालें. मी तुह्मांस खरी

गोष्ट सांगत आहें. मी तुमच्याशीं कधींहि खोटें बोलणार नाहीं. इतर कोणी-हि माझें बोलणें खरें मानलें नाहीं तरी आपण त्याबद्दल गैरभरंवसा धरूं नये. कारण माझ्याबद्दल आपलाहि गैरविश्वास झालेला पाहणें मला कधींहि सहन होणार नाहीं.'

राजा अगदीं निष्कपट बुद्धीनें ह्मणाला—'तुझ्या खरेपणाबद्दल मला बिल-कुल संशय नाहीं.'

'महाराज, याबद्दल मी आपला खरोखरच ऋणी आहे.'

'मी तुझा अविश्वास धरीन असें तुला खरोखरच वाटलें काय?'

हें ऐकतांच धीरेंद्र अगदीं गोंधळून गेला. खोलीचें दार उघडून इत-क्यांत लुब्धक आंत आला हें त्याच्या पथ्यावर पडलें. नाहींतर राजास काय उत्तर द्यावें हा त्याला मोठा पेंच पडला. लुब्धकाच्या मागोमाग एक सुंदर स्त्री दिवाणखान्यांत आली. तिच्या मागून कित्येक नोकरचाकरहि आले. ती स्त्री खालीं भूमीकडे पहात मदगतीनें दिवाणखान्यांत आली. तिच्या मुद्रेवर औदासिन्याचीं चिन्हें स्पष्ट दिसत होतीं. ती आंत येतांच धीरेंद्र चटकन् उठून ओरडून ह्मणाला—'कुमुद, माझी प्रियकरणी,—'

परंतु इतक्यात लुब्धक मध्यें येऊन त्यानें त्यास मागें सारिलें व तो त्या स्त्रीस ह्मणाला—

'या गृहस्थाकडे एकदां पहा. तूं त्याला ओळखतेस काय?'

धीरेंद्राचा आवाज ऐकतांच त्या स्त्रीच्या चेहऱ्यांत एकदम फरक झालेला दिसत होता. आतां तर तिच्या शरीरास किंचित् कंपहि सुटला होता. तिनें आपलें मस्तक वर करून धीरेंद्राकडे घाबऱ्याघाबऱ्या एकदां पाहिलें. तिच्या स्वरूपाचें तेज हळूं हळूं अस्तंगत होत जाऊन शेवटीं तें अगदीं निस्तेज दिसूं लागलें. तिच्या तोंडावर प्रेतकळा दिसूं लागली. त्याचप्रमाणें तिचा स्वरहि अगदीं खोल गेला. अखेर ती ह्मणाली—'मी त्याला ओळखत नाहीं.'

हे शब्द तोंडावाटें काढतांना तिचा श्वासोच्छ्वासाहि जोरानें चालू झाला होता व तिला एक हुंदकाहि आला. ती तशीच सावकास सावकास दिवाणखान्यांतून बाहेर आली.

इकडे धीरेंद्र एका खुर्चीवर धाडदिशीं पडला व त्यानें आपलें तोंड

आपल्या हातांनीं झांकून घेतलें. थोड्यावेळानें त्याचा भाऊ नोकरांकडे वळून ह्मणाला—' तुह्मी या गृहस्थाला आतां पाहिलें. तुह्मी याला ओळखता काय ? '

त्यांनींहि मान हालवून ' नाहीं ह्मणन सांगितलें. त्यावर लुब्धक धीरेंद्राकडे दृष्टि करून ह्मणाला—' काय बुवा, आता काय तुमचें ह्मणणें आहे ? तुह्माला येथे कोणींहि ओळखीत नाहीं. तुमची कांहीं तरी चूकभूल झाली आहे असें वाटतें. माझ्या बायकोनेंहि तुह्माला ओळखलें नाहीं. '

' काय ? तुझी बायको ? '

असें ह्मणून धीरेंद्रानें त्याचा गळा धरून त्यास भिंतींत खेचलें व ' हरामखोरा, मला समजत नाहीं असें तूं समजतोस काय ? तें खोटें पत्र तूंच लिहिलेस. जिच्यावर माझा हक्क ती माझी प्राणसुंदरी व ही सर्व दौलत हिरावून घेण्यासाठीं तूच हीं अनन्वित कृत्यें केलींस. येथून आताच्या आतां काळें केलें नाहींस तर तुझी येथल्या येथें प्राणाहुति पडेल हें पक्कें समज. माझ्यासारख्या सत्त्वशील सैनिकाचे हात तुझ्यासारख्या क्षुद्र व नीच मनुष्याच्या प्राणापहारानें दोषित होऊं देऊं नकोस. ' असें धीरेंद्र दांत ओठ खाऊन मोठ्या त्वेषानें ह्मणाला.

लुब्धक कोलमडत कोलमडत एका खुर्चीशीं जाऊन पडला. ' या हरामखोरास पकडून याला येथच्या येथें जखडून टाका असा त्यानें आपल्या सेवकांस हुकूम केला. सेवक प्रथम कचरूं लागले. अखेर त्यांपैकीं एक ह्मणाला ' त्याच्या जवळ शस्त्र आहे. आह्मी सर्व निःशस्त्र आहोंत.'

' असे नामर्दपणाचे उद्गार काढण्यास तुह्माला शरम वाटत नाहीं काय ? तुह्मी पांचजण असून एका माणसाची तुह्माला भीति वाटते कां ? '

धीरेंद्र ह्मणाला— ' बेइमान नोकरांनो, खबरदार एक पाऊल पुढें टाकाल तर. माझा राग कसा आहे, याची तुह्माला पूर्वीपासून माहिती आहेच. माझ्या स्वभावांत यत्किंचितहि फेर बदल झालेला नाहीं. इतक्या उपर छाती असेल तर जाग्यावरून हाला आणि पहा तुमची काय स्थिती होते ती. '

नोकरांचा पुढे होण्यास कांहीं धीर होईना. ते पुढें होण्यास एकमेकांस कोपरखळ्या देऊं लागले. शेवटीं लुब्धक क्रोधानें ह्मणाला— ' हरामखोरांनो, मी सांगतों त्याप्रमाणें करण्यास तुमची छाती होत नाहीं तर येथून

चालते व्हा, दरवाजाशीं पहाऱ्यावर बसा, व तेथील हत्यारबंद पहारेवाल्यांना इकडे ताबडतोब पाठवून द्या.

उंबरठ्यापर्यंत जाऊन धीरेंद्राकडे वळून लुब्धक ह्मणाला—' आतांपर्यंत ठीक झालें पण आतां येथून आपली सुटका करून घेण्याच्या प्रयत्नास मात्र आपण लागूं नका. ते प्रयत्न निष्फळ होतील एवढेंच नाहीं, पण वेळेनुसार आपल्या जीवावरहि बेतेल हें, लक्षांत ठेवा.

' बचाव ! कोण बचाव करून घेणार ? मी ? तो काय ह्मणून ! त्याची आपल्याला इतकी धास्ती वाटून देऊं नका व मला उपदेश करण्याचीहि आपण तसदी घेऊं नका. हा धीरेंद्र येथील सर्व वस्तूंचा धनी आहे, हें आपणांस ठाऊक असेलच. आपण खूप याद राखून ठेवा कीं हा येथेंच राहणार. आपल्या बचावाचा जर कोणास प्रयत्न करावयाचा असेल तर तो माझ्या व्यतिरिक्त दुसऱ्याच माणसाला करावा लागेल, समजलांत. !

प्रकरण २६ वें.

कोणीहि ओळखेना.

राजा कांहीं वेळपर्यंत विचार करीत बसला. वर दृष्टी लावून तो ह्मणाला--

" हें चमत्कारिक आहे. फारच चमत्कारिक आहे. असें कां व्हावें याबद्दल माझी कल्पनाच चालत नाहीं. "

" नाहीं महाराज. आपल्याला वाटतें तसें तें चमत्कारिक नाहीं. त्याला मी पहिल्यापासून ओळखितों. तो असा वागला नसता तरच मला आश्चर्य वाटलें असतें. तो लहानपणापासूनच बदमाष आहे. "

" धीरेंद्रा, मी त्याच्याविषयीं बोलत नाहीं. "

" त्याच्याविषयीं नाहीं ? मग कोणाविषयीं ? आपण चमत्कारिक असें कोणाला उद्देशून ह्मणाला ! "

" राजाबद्दल कांहीं बोभाटा होऊं नये हेंच मला चमत्कारिक वाटतें. "

" आपण काय ह्मणतां तें मला समजत नाहीं. राजा कोण आणि बोभाटा कसचा ? "

" मग कमालच झाली ह्मणावयाची. या देशाचा हा राजा सर्व गांवभर धायधाय करीत हिंडतो आहे. त्याच्याबद्दल जिकडे तिकडे हाहाकार उडून त्याच्या चौकशीसाठीं सर्व बाजूस अद्याप जासूद कसे रवाना होत नाहींत ? राजा ह्मणजे देशाचें मस्तक होय. तें मस्तकच नाहींसे झालें तरी देशांत खळबळ उडूं नये हें आश्चर्य नव्हे काय ? मी नाहींसा झालों हें पाहून राजवाड्यांत, राजधानींत व सर्व देशांत लोकांची तारांबळ उडून जावयास नको होती काय ? "

" हो ! खरंच. महाराज मला माफी असावी. मी आपल्या घरच्या नादांत गुंतलों असल्यामुळें मला आपल्या पदवीचा विसर पडला. "

असें ह्मणून धीरेंद्रानें निश्वास टाकला व आपल्या मनाशींच ह्मटलें—

' काय चमत्कार आहे पहा ! गरीब बिचारा ! बुद्धिभ्रंश झाल्यामुळें याला आपण राजा आहों या गोष्टीशिवाय दुसरें कांहींहि सुचेनासें झालें आहे. त्याच्या मनांत तीच कल्पना रात्रंदिवस खेळत आहे. '

' परंतु मला एक युक्ति सुचली आहे. तुझें आणि माझें दोघांचेंहि तिनें हित होणार आहे. मी तीन ओळींत एक पत्र लिहितो तें तूं सकाळीं उठून राजधानींत घेऊन जा. माझ्या मामाशिवाय तें दुसऱ्या कोणाच्या हातीं देऊं नकोस. त्याला माझें हस्ताक्षर तेव्हांच ओळखेल. व तो मला तावडतोब बोलावणें पाठवील. '

" महाराज, आपली युक्ति सर्वोत्कृष्ट आहे परंतु, मला वाटतें कीं, माझा येथें हक्क शाबीत होऊन माझी जिनगी माझ्या ताब्यांत येईतोपर्यंत आपण येथेंच थांबावें. कारण तसें केल्यानें मला आपलें अधीक उपयोगी—"

राजा आवेशानें मध्येंच ह्मणाला—

' चुप बैस. तुझी ही भिकार जिनगी आणि तुझे हे क्षुद्र हक्क यांची अखिल राष्ट्राच्या हितापुढें व खुद्द सिंहासनाच्या स्थैर्यापुढें कांहींतरी किंमत आहे काय ! हं, असा भिऊं नकोस. मी सांगतो तसें कर. तुझें सर्व बस्तान मी नीट बसवून देईन. त्याची तुला काळजी नको. इतकेंच नव्हे तर या कामगिरीबद्दल मी आपल्या दर्जाप्रमाणें तुला योग्य बक्षिसहि देईन. '

असें ह्मणून राजा कलम घेऊन लिहूंहि लागला. त्याचें लिहिणें चालूं असतां त्याजकडे प्रेमयुक्त नजरेनें पाहून धीरेंद्र आपल्याशींच ह्मणाला—

" खरोखरच आतां अंधार असतां आणि खरोखरच राजा माझ्याशीं बोलत आहे, अशी जर माझी भावना झाली असती तर किती बरें मौज झाली असती. राजेपणाचा झटका जेव्हां त्याच्यावर येतो तेव्हां त्याची तडफ कांहीं विलक्षण असते. आतां हा अगदीं खऱ्या राजाप्रमाणें रागावला. ही शकल याला कोठून लाभली असावी बरें? पहा लिहितो आहे तरी कसा अगदीं शांतपणानें, आतां तोंड काय योजावी? नाहींतर या राजश्रींची मनधरणी करण्याकरितां उदईक आम्हास खरोखरच रवाना व्हावें लागणार. "

असा विचार करतां करतां माईलेंद्राचें लक्ष पुन्हा घराकडे वळलें. त्या विचारांत तो इतका गुंग झाला कीं, राजानें तें पत्र जेव्हां त्याच्या हातीं दिलें तेव्हां त्याचें त्यास भानहि नव्हतें. त्यानें तें न कळत आपल्या हातांत घेतलें. तो मनांत विचार करीत होता कीं किती विलक्षण आहे पहा. एकदा वाटतें तिनें मला ओळखिलें. एकदां वाटतें कीं, तिला खरोखरच माझी ओळख पटली नाहीं. जसजसा विचार करावा तसतसा मनाचा अधिकच गोंधळ होतो. या दोन्ही परस्पर विरुद्ध मतांचा मिलाफ कसा करावयाचा? याठिकाणीं आपली कांहीं अक्कल चालत नाहीं. या बाबतीचें खरें विवरण करावयाचें ह्मणजे तें असें आहे– तिनें माझा चेहरा, माझी आकृति, माझा आवाज, हीं सर्व ओळखलीं असलीं पाहिजेत. कारण ती ओळखणार नाहीं असें कसें होईल! तरी ती ह्मणाली-' मी यांना ओळखत नाहीं. ' तेंहि खरें धरलें पाहिजे. कारण ती खोटें बोलेल अशी माझी मनोदेवता मला सांगत नाहीं. पण थांबा. ही गोष्ट माझ्या लक्षांत येत चालली आहे. कदाचित् त्यानेंच तिला आंतून पढवून ठेविली असेल, तिच्यावर सक्ति केली असेल व तिला खोटें बोलावयाला लावलें असेल. बस्स. हाच निकाल कायम. हें कोडें आतां उकललें. ती भयभीत दिसत होती, याचें कारण त्यानें तिच्यावर सक्ति केली हेंच होय. मी तिला आतां शोधून काढतो, तिची गांठ घेतों, तो घरांत नाहीं, तेव्हां ती माझ्याशीं कांहीं खोटें बोलणार नाहीं. लहान असतांना आम्ही एकमेकांशीं खेळत होतों या गोष्टीची आठवण होऊन तिचें मन खचित द्रवेल आणि ह्मणूनच ती मला खास दगा देणार नाहीं, ती खरें बोलेल. ती विश्वासघातकी खास नाहीं. ती मोठी कुलीन व राहणी

आहे. आम्ही लहान होतों तेव्हां तिचें माझ्यावर मोठें प्रेम असे. ज्याच्यावर आपली एकदा प्रीति असते, त्यास आपण दगा देत नाहीं. '

असा विचार करीत तो मोठया आतुरतेनें दाराकडे टक लावून पाहूं लागला. त्याबरोबर दार उघडून कुमुद्वतीनें आंत प्रवेश केला. तिच्या चेहऱ्यावर पांढुरकी आली होती. तरी पण तिचें पाऊल जोरानें पडत होतें. तिची एकंदर चर्या प्रतिष्ठित व सुंदर दिसत होती. तिचा चेहरा मात्र पूर्वीप्रमाणेंच उदास दिसत होता.

ती आत येताच धीरेंद्र मोठया आशेनें तिला भेटण्याकरिता गेला. परंतु तिनें मोठ्या शिताफीनें असा कांहीं आविर्भाव केला कीं त्यामुळें धीरेंद्राचे जागचे पाय हालेनातच. ती खालीं बसली. व ' आपण खालीं बसा ?' असें त्यासहि तिनें सांगितलें. सारांश, हिला आपल्या पूर्व परिचयाचें स्मरण होऊन ही आपल्याशीं प्रेमभावानें वर्तन करील अशी जी धीरेंद्रास आशा वाटत होती ती तत्काळ निष्फळ झाली. एखाद्या परक्या मनुष्याचें केवळ शिष्टाचारपूर्वक जसें स्वागत करावें तसेंच तिनेंहि त्याचें केलें. तिच्या दृष्टीनें तो त्या घरातील अतिथीच होता, परिचित नव्हता. हा सर्व अनपेक्षित प्रकार पाहून त्यास फारच बावरल्यासारखें झालें. शेवटीं ती त्यास म्हणाली--

" मी तुम्हाला मुद्दाम ताकीद देण्याकरिता आलें आहे. वेड्या माणसाच्या डोक्यांतील खूळ कांहीं काढून टाकितां येत नाहीं. परंतु, अमुक एक मार्गानें गेलें म्हणजे संकट ओढवणार आहे असें सांगितल्यास तो मार्ग सोडून द्यावा हें वेड्यासहि समजतें. तुझ्या डोक्यांत जें वेड बसलें आहे त्याच्या मुळाशीं लबाडी दिसत नाहीं. तुमचें वेड प्रामाणिकपणाचेंच असेल. परंतु तें खूळ पोटाशीं बाळगून तुम्ही येथें क्षणभरहि थांबूं नये. कारण हें स्थान असल्या खुळास खास सुरक्षित नाहीं. "

धीरेंद्राकडे क्षणभर लक्षपूर्वक पाहून ती म्हणाली—" आमचे धीरेंद्र येथून कांहीं वर्षां पूर्वी गेले ते आजमितीस जसे दिसले असते तसे तुम्ही दिसतां ही गोष्ट तुमच्या नाशास खचित कारण होईल. तुमच्या बाबतींत हीच गोष्ट विशेष भयंकर आहे. "

" बाई, तोच मी आहे. "

" तशी तुमची भावना आहे ही माझी खात्री आहे. तुमच्या प्रामाणिक-

पणाबद्दल मला बिलकूल संशय नाहीं. ते सर्व प्रदेशाचे धनी आहेत. त्यांच्या सत्तेनें येथें काय हवें तें होईल. त्यांच्या एका शब्दानें हवी ती क्रांति होऊं शकते. या खुळाशिवाय तुमचें इतर कोणतेंहि खूळ असतें तरी त्याबद्दल त्यांनीं इतकी परवा बाळगली नसती. परंतु, मी खास सांगतें. माझा तुह्मी भरंवसा धरा. त्यांची मला पक्की माहिती आहे. ते आतां काय करितील ते मी तुह्मांला सांगते. येथें आसपास ते अशी बातमी प्रसिद्ध करितील कीं ' तुह्मी वेडे आहां, आणि सर्व लोक त्याची बातमी खरी मानतील ! '

तिनें पुन्हां एकदां धीरेंद्राकडे पाहिलें व ती ह्मणाली—"तुह्मी धीरेंद्र असला आणि अशी त्यांची व सर्व लोकांची खात्री झाली, तरी— मी काय सांगतें तें नीट लक्षांत ठेवा. त्याचा नीट विचार करा—तुमच्यावर संकट हें ओढवल्यावांचून राहणार नाहीं. तुह्मी तेच आहांत हें ते कधींहि कबूल करणार नाहींत, आणि एकदां त्यांनीं तुमचा अव्हेर केला ह्मणजे आसपासच्या प्रदेशांत तुह्मास आश्रय देण्याची कोणाचीहि छाती होणार नाहीं."

धीरेंद्र क्रोधानें ह्मणाला—" तूं ह्मणतेस ह्या सर्व गोष्टी खऱ्या आहेत. त्याची सत्ता खरोखरच अपूर्व आहे. आपला बाल्यावस्थेतील जिवलग मित्रहि त्याच्या हुकमावरून एका क्षणांत झिडकारून दिला यावरून त्याचें सामर्थ्य अगाध नाहीं असें कोण ह्मणेल ? ज्याचें पोट त्याच्या कृपाकटाक्षावर अवलंबून आहे, ते त्याचा शब्द झेलतील यांत नवल तें काय ?"

धीरेंद्राच्या तोंडून हे शब्द बाहेर निघतांच त्या स्त्रीचा एकदम चेहरा बदलला. आपली दृष्टी एकदम खालीं करून ती ह्मणाली—" तें कांहींही असो, मी तुला एकदां ताकीद दिली आहे. आणखीहि एकवार मी तुला निक्षून सांगतें कीं, तूं येथून निघून जा. तूं येथें राहिलास तर या घराचा धनी तुझा सर्वस्वीं घात करून टाकील. तो मोठा निष्ठुर आहे. त्याच्या हृदयाला दया माया कधींहि शिवत नाहीं. मी त्याच्याच गुलामगिरींत आहे. ह्मणून मला त्याचा सर्व अनुभव आहे. माझे श्वशूर व माझा थोरला दीर या दोघांची या कर्दम काळाच्या हातून कायमची सुटका झाली. येथें याच्या कचाट्यांत सांपडण्यापेक्षां तुह्मीहि तशीच वागलात लागली असती तरी त्या बद्दलहि मला इतकें वाईट वाटलें नसतें. तूं जो आज हक्क मागत आहेस तो शाबीद झाल्यास

त्यास या सर्व जिनगीस व घरादारास एकदम पारखें होऊन फकीर बनावें लागेल. त्याच्याच घरांत तूं त्याच्यावर हल्ला केलास. यापुढें तूं येथें राहशील तर तुझी शंभर वर्षें भरलींच ह्मणून समज. जा. येथून लवकर जा. तुजजवळ पैसा नसेल तर ही थैली घे. नोकराचाकरांना लांच दे आणि आपली येथून सुटका करून घे. संधि आहे तों तिचा उपयोग करून घे व आपली सुटका करून घे. नाहींतर विनाकारण पेचांत पडशील."

धीरेंद्रांनीं ती थैली घेण्याचें नाकारलें व तो तिच्यापुढें उभा राहून ह्मणाला—"माझी एकच गोष्ट ऐक. एकदां माझ्याकडे नीट निरखून पहा, आणि मी धीरेंद्रच आहे नां एवढें मला सांग."

"मी तुला ओळखत नाहीं."

"शपथेवर ?"

"होय. शपथेवर!" असें ती हळूंच पण स्पष्ट ह्मणाली.

"खरोखर या गोष्टीवर माझा विश्वास सुद्धां बसत नाहीं. हें मी काय ऐकतों आहे ?"

"तूं येथून काढतां पाय घे. ही अमोलिक संधि दवडूं नकोस. आपला प्राण वांचीव." इतक्यांत सरकारी अधिकारी आंत घुसून धीरेंद्राची व त्यांची झटापट सुरू झाली. अखेर धीरेंद्र जमीनदोस्त होऊन त्यांनीं त्याच्या मुसक्या बांधल्या व राजास व त्यास कारागृहांत नेलें.

प्रकरण २७ वें.

कारागृहांत

कारागृहांत सर्वत्र गर्दी होऊन गेली होती. बारिकसारिक आरोपावरून ज्या लोकांना शिक्षा झाल्या होत्या त्या कोठडींत यांची स्थापना करण्यांत आली. या कोठडींत हातकड्या घातलेले सुमारें वीस कैदी होते. त्यांत कांहीं स्त्रियाहि होत्या. आपली अशी भयंकर अवहेलना झालेली पाहून राजा मनांतल्यामनांत जळफळूं लागला. मोवतालच्या हलकट लोकांचे ग्राम्य संवाद ऐकून तर त्याचें पित्त अगदीं खवळून जाई. धीरेंद्र मात्र तोंडांतून

अत्राक्षरहि काढीत नसे. तो अत्यंत उदास झाला होता. त्याच्या मनाचा अगदीं गोंधळ उडून गेला होता. आपण घरीं परत गेलों ह्मणजे अमुक तऱ्हेनें आपलें स्वागत होईल, तमक्या तऱ्हेनें आपले कोड पुरविले जातील अशा अनेक मनोरथाची त्यानें उभारणी केली होती. आपल्या प्रवेशानें आपलें घर आनंदमय होऊन जाईल अशी त्यास फार आशा वाटत होती. परंतु, ती सर्व आशा नष्ट होऊन अखेर परिणाम विपरीत झालेला पाहून त्याच्या मनास पराकाष्ठेचा उद्वेग वाटावा हें अगदीं स्वाभाविक होतें. आपल्या मनोरथाचें पर्यवसान अशा शोकप्रद स्थितींत होईल हें त्याच्या स्वप्नींहि नव्हतें. इंद्रधनुष्याचे चित्रविचित्र रंग पाहून त्याच्या सौंदर्याचा आस्वाद घेत हर्षनिर्भरचित्तानें नृत्य करूं लागावें. इतक्यांत आकाशांतील विद्युत् अकस्मात् खालीं पडून कपाळमोक्ष व्हावा अशीच त्याची अवस्था झाली.

कालावधीनें संतापातिरेकाचा पहिला आवेश किंचित् स्थिरावून त्याच्या मनाची स्थिति विचार करण्याइतपत निश्चित झाली. तेव्हां तो कुमुद्वतीच्या वर्तनासंबधानें विचार करूं लागला. तिच्या वर्तनाचें त्यानें अनेक दृष्टींनीं पर्यालोचन केलें. परंतु त्यास समाधानकारक असा निर्णय करतां येईना. तिनें आपल्याला ओळखलें किंवा ओळखलें नाहीं हा प्रश्न अझूनहि जागच्या जागींच होता. तिनें आपल्याला खास ओळखलें, परंतु प्रेमबुद्धि व सत्यप्रियता यांवर स्वार्थाचें दडपण बसून तिच्या हातून नीच-पणाचें वर्तन झालें असाच त्याच्या मनोदेवतेनें अखेर निर्णय ठरविला. तिला शिव्याशाप द्यावेत अशीहि एकदां त्याच्या मनांत इच्छा उत्पन्न झाली परंतु जिचें नांव आपण पवित्र समजत होतों त्याच नांवावर आतां शिव्या शापांचा भार ठेऊन आपली जिव्हा दूषित करावी हें त्याच्या मनास पटलें नाहीं.

एका फाटक्या तुटक्या व घामट घोंगडींत त्या दोघांनींहि आपल्याला गुंडाळून घेऊन ती रात्र कशीबशी घालविली. त्याच दिवशीं कांहीं लांच लुचपत घेऊन तुरुंगावरील अधिकाऱ्यांनीं कांहीं कैद्यांना दारू आणून दिली होती. त्यामुळें ते बीभत्स लावण्या ह्मणूं लागले, एकमेकांच्या अंगावर ओरडूं लागले, मारामारी करूं लागले, शेवटीं मध्यरात्र उलटल्यानंतर एका कैद्यानें एका स्त्रीच्या मस्तकावर आपल्या हातकड्याचा असा एक तडाका दिला कीं त्याबरोबर ती मूर्च्छित पडली. ती बिचारी स्त्री मस्तकांत होणाऱ्या

वेदनांनीं रात्रभर कण्हत पडली होती. तरी निढावलेले आणि ह्मणूनच पाषाणहृदय बनलेले कैदी खुशाल घोरूं लागले.

याप्रमाणें एक आठवडा गेला. रोजचा ठराविक क्रम एकसारखा चालूंच होता. धीरेंद्राच्या ओळखीचीं अनेक माणसे तेथें येत. परंतु जो तो त्यास परकीय अपरिचित समजून त्याचा उपमर्द करण्यास प्रवृत्त होई शेवटीं एकेदिवशीं तुरुंगावरील अधिकाऱ्यानें एका ह्मातान्या मनुष्यास बंदिखान्यांत आणले. व तो त्यास ह्मणाला-' या खोलींत नवीनच एक बदमाष मनुष्य आणून ठेविला आहे. त्यास तूं ओळखतोस कां पाहूं ' !

हे शब्द कानीं पडतांच धीरेंद्रानें वर डोळे करून पाहिले. व बंदीखान्यांत पडल्यापासून ज्या सुखवृत्तीचा त्यास कधींहि संसर्ग घडला नाहीं ती त्याच्या मनास आज आल्हाद देऊं लागली. तो आपल्या मनाशींच ह्मणाला-' माझ्या बापाचा हा इमानी नोकर खरोखरच मोठा प्रामाणिक व भला माणूस आहे. निदान पूर्वी तरी होता. कारण आतां काय भरंवसा सांगावा. सगळेच जेव्हां खोटें बोलायला लागले तेव्हां याची तरी कशी खात्री द्यावी. हा मला ओळखील खास. परंतु, तो ती गोष्ट कबूल मात्र करणार नाहीं. आजपर्यंत सर्वांनीं हाच नमुना केला आहे ? '

खोलींत चोहोंकडे नीट न्याहाळून पाहून तो ह्मातारा ह्मणाला—' येथें तर माझ्या ओळखीचें कोणी दिसत नाहीं. आपण ह्मणतां तो कोण ? '

यावर बंदीखान्याचा अधिकारी हंसून ह्मणाला—' तो पहा मोठ्या प्रचंड अस्वलासारखा जमीनीवर लोळत पडला आहे त्याला तूं ओळखतोस काय ? '

बराच वेळपर्यंत धीरेंद्राकडे टक लावून पाहून ह्मातारा ह्मणाला— ' छे बुवा. हा कांहीं धीरेंद्र दिसत नाहीं. धीरेंद्र असा नव्हता. '

' शाबास. इतका ह्मातारा झालास तरी तुझी दृष्टि कशी अगदीं तरण्यासारखी शाबूत आहे. आज जर तुझा धनी हयात असतां तर त्यानें या बदमाषास चांगले लंबे केलें असतें. '

' त्यांचें नांव कशाला घेतां ? त्यांचा आत्मा अक्षय्य सुखशांतींत नांदो. या बदमाषाच्या नांवाबरोबर त्यांचा नामोच्चार करून त्यांना कलंक लावूं नका. '

'बरें तें असो. याची चांगली खरडपट्टी तर काढशील. येथें गांवांतील कोणी मनुष्य आला, तरी तो याला दहापांच शिव्या हसडल्याशिवाय कधींहि परत जात नाहीं. आह्मींहि पण रोजची अशी वहिवाट ठेविली आहे. सकाळपासून सायंकाळपर्यंत त्याला हजार पांचशें शिव्या देवविल्याशिवाय आह्मी बहुतेक दिवस सुना जाऊं देत नाहीं!'

असें ह्मणून तो अधिकारी कोठडी बाहेर निघून गेला.

तो दिसेनासा झाला असें पाहून ह्मातारा धीरेंद्राच्या जवळ गेला व ह्मणाला—'ईश्वराचे माझ्यावर अनंत उपकार झाले. माझ्या धन्याचें आज मला पुन्हां दर्शन घडलें. येथून जाऊन तुह्मांला आज सात वर्षें झालीं. तुह्मी हयात असाल अशी आमची कल्पनाहि नव्हती. मी तुम्हाला पाहतांक्षणींच ओळखलें. त्या वेळला तुह्माला मी मुळींच ओळखलें नाहीं असा आविर्भाव करण्यास मला मनाशीं किती त्रास पडला हें एका ईश्वरासच माहीत. मी वृद्ध झालों आहें, व माझ्या घरीं दारिद्र्य ह्मणजे मी मी ह्मणत आहे. तरी आज्ञा होऊं द्या कीं, सर्व गांवांत जाऊन मी जाहीर रीतीनें सांगतों कीं अन्यायानें बंदीखान्यात टाकलेले गृहस्थच दौलतीचे खरे मालक आहेत. त्याबद्दल मला प्राणास मुकावें लागलें तरी त्याची मला पर्वा नाहीं.'

धीरेंद्र ह्मणाला—'नको, नको, तूं असें साहस करूं नकोस. त्या योगानें तुझा सर्वस्वीं नाश होईल. तरी पण माझ्या कामांत तुजकडून अल्पस्वल्प मदत ही झालीच पाहिजे. यच्चयावत सर्व मानवजाति नीच आहेत असा येथील अनुभवानें जो माझा ग्रह झाला होता तो ग्रह अंशतः तरी शिथील होण्यास तुझेंच वर्तन कारणीभूत झालें याबद्दल मी तुझे मनःपूर्वक आभार मानतों.'

धीरेंद्र व राजा यांना त्या वृद्ध नोकराची फारच चांगली मदत झाली, कारण तो दिवसांतून अनेक वेळां बंदीखान्यांत येई व वरकरणी त्यांना शिव्या शाप देऊन त्यांना तो रुचकर पदार्थ आणून पोहोंचवी. तुरुंगांतल्या कदान्नानें त्यांच्या प्रकृतीवर होणाऱ्या वाईट परिणामांचें या योगानें कांहींसें परिमार्जन होत असे. धीरेंद्र या रुचकर पदार्थांपैकीं बराचसा भाग राजाकरितां राखून ठेवी. कारण मिष्टान्नावरच राजाचा पिंड वाढला

असून तुरुंगांतील अन्न त्याच्या तोंडांतहि जात नसे. अधिकाऱ्यांना कदाचित् आपला वहीम येईल या भीतीनें तो वृद्ध नोकर बंदीखान्यांत वेतानेंच येत असे. परंतु जेवढी सवड सापडे तेवढ्यांत तो कोणासहि नकळत त्यांना अनेक प्रकारच्या महत्वाच्या बातम्या देत असे. बातम्या हलू स्वरांत सांगव्या, व कोणी आपणांस पहात आहे असें दृष्टी पडतांच स्वर बदलून धीरेंद्रास मोठ्यानें शिव्या देऊं लागावें अशा शिताफीनें तो धीरेंद्राचे व सभोंवार असलेल्या लोकांचे कान एकाचवेळीं तृप्त करीत असे.

अशा रीतीनें क्रमाक्रमानें धीरेंद्रास आपल्या घरची सर्व हकीकत समजली. धीरेंद्राच्या थोरल्या भावास मरून सहा वर्षे लोटलीं. पुत्रशोक, व धीरेंद्राचीहि कांहीं बातमी नाहीं या दोन कारणांनीं त्याच्या बापाची प्रकृति अगदीं खचत चालली. कुमुद्वती व लुब्धक यांचा विवाह आपल्या डोळ्यांदेखत एकदां लावून टाकावा असें त्यास वारंवार वाटूं लागलें. परंतु धीरेंद्र परत येईल या आशेनें कुमुद्वतीनें हा प्रसंग होतां होईतों लांबणीवर टाकण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न केला. यावर एके दिवशीं धीरेंद्र वारल्याचें पत्र आलें. म्हाताऱ्याच्या छातीत फार मोठा धक्का बसला. आतां आपण कांहीं फार दिवस वांचत नाहीं. असें त्याच्या मनानें पक्कें घेतलें, व तो व लुब्धक हे विवाह आटपून घेण्याच्या उद्योगास लागले. ते दोवेहि यास कुमुद्वतीची अनुमति मिळविण्यासाठीं पराकाष्ठेनें प्रयत्न करूं लागले. कुमुद्वतीनें वरचेवर एक महिन्याची मुदत मागावी. अशा रीतीनें तीन महिने लोटले. शेवटीं वीरसिंह आसन्नमरण असतां लुब्धक व कुमुद्वती यांचा विवाह झाला. त्या लग्नापासून कुमुद्वतीला यत्किंचितहि सुख झालें नाहीं. धीरेंद्राच्या मृत्यूची वार्ता देणाऱ्या पत्राचे निरनिराळ्या आशयाचे अनेक मसुदे तिला आपल्या नवऱ्याच्या कागदपत्रांत सापडले. तेव्हां हें पत्र, लग्नसोहळा लवकर उरकून घेण्याच्या उद्देशानें, लुब्धकानेंच बनावट तयार केलें होतें अशी तिच्या मनाची खात्री होऊन तिला रात्रंदिवस चैन पडेनासें झालें. अशाबद्दलही गावांत सर्वतोमुखीं चर्चा होऊं लागली. लग्न व वीरसिंहाचा मृत्यू हे दोन्हीहि शुभाशुभ प्रसंग एकाच मांडवाखालीं उरकून घेण्याचें अपूर्व कृत्य त्या पत्रानेंच किंवा पर्यायानें लुब्धकाच्या नीचपणामुळें घडलें. अशाबद्दल कुमुद्वतीच्या मनांत बिलकूल संशय राहिला नाहीं. लुब्धक कुमुद्वतीस नीट रीतीनें वागवीत नाहीं, तिचा तो अनेक रीतींनीं

छळ करतो, बापाच्या हयातींत लुब्धकानें आपल्या नीच उद्देशांचें प्रच्छादन करण्याकरितां वरकरणीं जें सौम्य स्वरूप धारण केलें होतें त्यास बापाच्या निधनाबरोबरच रजा देऊन तो आतां राजरोस रीतीनें आपल्या सहधर्मिणीवर व हाताखालील माणसावर आपला करडा अंमल चालवूं लागला. इत्यादि सर्व मजकूर त्या वृद्ध नोकराच्या तोंडून धीरेंद्रास समजला.

त्या वृद्ध नोकरानें एक हकीगत सांगितली. ती राजास विशेष मनोरंजक वाटली. इकडच्या तिकडच्या गोष्टी सांगत असतां एके दिवशीं म्हातारा सांगूं लागला—' गांवांत लोक बोलतात कीं, राजाचें मस्तक भ्रमलें आहे. मी तुम्हाला ही गोष्ट सांगितली, असें कोणास सांगू नका हो. कारण असें बोलणारास देहांत शासन ठरलेलें आहे असेंहि लोकांच्या सांगण्यांत आहे. '

हें ऐकतांच राजा म्हाताऱ्याकडे टक लावून म्हणाला—' भल्या माणसा, राजाचें मस्तक भ्रमलें आहे ही जी हूल उठली आहे ती साफ खोटी आहे. असल्या राजद्रोही गोष्टी तोंडावाटेंहि काढूं नकोस. त्यापेक्षां एखादा स्वहिताचा धंदा कर. '

' हा मुलगा अशा रीतीनें लहान तोंडीं मोठा घास घेईल ही म्हाताऱ्याला कल्पनाहि नसल्याकारणानें तो आश्चर्यानें म्हणाला—

हा मुलगा कोठला ? आणि कारण नसतां हा मला शास्त्र शिकवूं लागला याचें कारण काय ? '

धीरेंद्रानें त्याला डोळ्यानें खुणावतांच त्या म्हाताऱ्यानें ती गोष्ट एकदम बदलून आपली हकीकत पुढें सांगण्यास सुरवात केली. तो म्हणाला—' मुख्य स्मशानांत एक दोन दिवसांत महाराजाच्या अंत्यविधीनिमित्त सर्व लोक जमून दुःखप्रदर्शन करण्यांत येणार आहे व त्याच्या दुसरेच दिवशीं युवराजास राज्याभिषेक करण्यांत येणार आहे. '

' मला त्यांना पहिल्यांदा शोधून काढलेंच पाहिजे. त्याशिवाय ते अभिषेक कोणास करणार ?' असें राजा आपल्याशींच पुटपुटला व पुन्हां म्हाताऱ्याकडे पाहून म्हणाला—' मी येथें असतांना राज्याभिषेक कसा होतो तो पहातों ? '

म्हातारा यास उत्तर देण्याच्या अगदीं बेतांत होता. परंतु धीरेंद्रानें अव-

त्याबरोबर त्यानें आपली हकीकत पुढें चालूं केली. ' कुम्भकहि समारंभास जाणार आहेत. अभिषेकोत्सवानिमित्त आपल्याला एक मोठी थोरली पदवी मिळेल अशी त्यांस फार आशा वाटत आहे. सरदार हरिताक्षाची त्यांच्यावर फार मर्जी आहे. '

' सरदार हरिताक्ष कोण ? '

" युवराजांचे पालनकर्ते. त्यांना परवां नुकतीच ' राजेबहादर ' अशी पदवी देण्यांत आली आहे. "

' काय पदवी दिली ? कोणी दिली ? '

' राजाच्या सहाय्यानें मंत्रीसभेनें दिली. '

राजानें आश्चर्यानें विचारलें-' कोणत्या राजाच्या सहाय्यानें ? '

' कोणता राजा ? ' (आपल्याशींच) या मुलाचें मस्तक खात्रीनेंच भ्रमलें आहे. (मोठ्यानें) ' राजे काय दहा पांच आहेत कां काय ? युवराज सुशीलकुमार हेच एक आमचे राजे आहेत. कुमारांचा स्वभाव किती थोर आहे ह्मणून सांगावें ? अगदीं त्यांच्या नांवाप्रमाणें. अलीकडे त्यांच्या बुद्धीला थोडा भ्रम झाला आहे. पण त्यांची प्रकृति रोजरोज सुधारत आहे असे समजतें. आज सर्वतोमुखी त्यांच्या थोरपणाची स्तुतीच ऐकूं येत आहे. त्यांची प्रकृति नीट सुधारून ते या देशावर राज्य करण्यास चिरायु होवोत अशी सर्व प्रजेची जगन्नियंत्याजवळ प्रार्थना आहे. राज्यावर येण्यापूर्वीच त्यांनीं धीरसिंह सेनापतीचे प्राण वांचविले. लोकांना जाचक असलेले कायदे रद्द करण्याचाहि त्याचा विचार ठरला आहे. असा थोर राजा या देशास लाभणार हें या देशाचें भाग्यच होय ! '

ही हकीगत ऐकून तर राजास फारच अचंबा वाटला. हे सर्व प्रकरण असावें तरी काय याबद्दल त्याच्या मनांत अनेक प्रकारचे तर्क वितर्क येऊं लागले. ' ज्या भिकाऱ्याच्या पोराला वाड्यांत सोडून मी बाहेर पडलों त्याचें तर हें चरित्र नसेल नां ? छे. तशी गोष्ट होणार नाहीं. राजाचें नुसतें सोंग साधायला सुद्धां कुलीनच घराण्यांत जन्म होणें अगत्याचें आहे. तो कसा झाला तरी भिकाऱ्याचा पोर. तो राजाचा आव घालण्याचा प्रयत्न करील तर त्याचें मूळचें स्वरूप बाहेर फुटल्याशिवाय कधींही राहणार नाहीं. मग हा ह्मातारा कोणाविषयीं बोलत होता ? दरबारनें दुसरा एक

तोतया राजा तर उभा केला नाहींना ! छे. पण असेहि होणें शक्य दिसत नाहीं. कारण आमचे मामा साक्षात् जमदग्नीचे अवतार आहेत. ते अशा प्रकारची लबाडी कधींहि फलद्रुप होऊं देणार नाहींत !'

अशाप्रकारें त्याच्या मनामध्यें अनेक प्रकारचे विचारतरंग उद्भवले. तरी त्याचें समाधान ह्मणून होईना. या संबंधानें तो जों जों अधिक विचार करूं लागला ता तों त्याचा अधिक अधिकच गोंधळ उडून गेला. कांतिपुरास जाण्यास त्याचें मन अत्यंत आतुर झालें. व बंदीखान्यांतील आपला वास त्यास असह्य होऊं लागला.

धीरद्रानें त्याची समजूत करण्याचा हवा तितका प्रयत्न केला, परंतु त्याचें समाधान ह्मणून होईना. त्याच कोठडींत दोन स्त्रिया होत्या. त्यांच्या बोलण्याचालण्यानें मात्र राजाच्या मनावर कांहींसा परिणाम होऊन त्यास आपल्या दुःखाचा अंमळ विसर पडूं लागला. 'कैदखान्यांत तुह्मी कां आला ' असा राजानें त्यांना प्रश्न केला.

' आह्मी रात्रीं आठाच्या पुढें राजवाड्यावरून गेलों ह्मणून आह्मांस येथें पाठविण्यांत आलें. '

' वाः ! मग तर तुह्मी मोठाच गुन्हा केलांत. तुह्मी खिन्न दिसतां. तुह्मी धास्ती बाळगूं नका. तुमच्या दुःखाचें निरसन लवकरच होईल. एवढेंच काय परंतु असल्या सामान्य गोष्टीबद्दल कोणास शासन होऊं नये असाहि बंदोबस्त होईल. '

असें त्याचें बोलणें चालूं असतां राजाचा डोळा लागला. दुसरे दिवशीं त्या स्त्रिया कोठडींत नाहींत असें पाहतांच राजा आनंदानें ह्मणाला-' त्यांची सुटका झाली वाटतें ! अरे. पण आतां माझें समाधान करायला येथें कोणी राहिलें नाहीं. त्या स्त्रियांनीं येथें दोन बंद ठेविले आहेत. ते त्यांच्या स्मरणार्थ मी जपून ठेवीन. येथून माझी सुटका झाली ह्मणजे त्यांचा शोध काढीन व त्यांना आश्रय देईन. '

इतक्यांत कैदखान्यावरील मुख्य अधिकारी तेथें येऊन त्यानें या कैद्यांना तुरुंगाच्या आवारांत नेण्याचा आपल्या हाताखालील कामगारांना हुकूम केला. आज आपल्याला उघड्यावर जावयाची संधि मिळणार हें पाहून राजास फार आनंद झाला. नीलवर्ण आकाशानें दर्शन होऊन आज

आपल्याला मोकळी हवा घ्यावयास सापडेल याबद्दल राजास समाधान वाटूं लागलें. अधिकारी कैद्यांना पाळीपाळीनें बाहेर घेऊन जात होते. आपली पाळी येऊन आपली एकदां कधीं सुटका होतें असें राजास होऊन गेलें होतें. अखेर त्याची पाळी आल्यावर त्यास व धीरेंद्रास मोकळ्या चौकांत नेण्यांत आलें.

चौकास सगळीकडे दगडाची फरशी केली होती. एका कमानदार दरवाजांतून सर्व कैदी बाहेर आले. तेव्हां त्यांना भिंतीशीं रांकेनें उभे करण्यांत आलें. त्यांच्या समोर एक दोर लावला होता. त्या दोराच्या आंत सर्व कैदी व बाहेर सर्व पहारेवाले असा तो सर्व सरंजाम होता. त्या सकाळीं थंडी बरीच पडली होती. दहिंवरानें फरशी ओली झाली होती. मधून मधून गार वाराही येत होता.

चौकाच्या मध्यभागीं दोन स्त्रिया उभ्या होत्या. त्यांना खांबाशीं जखडलेलें होतें. त्यांच्याकडे पाहतांच रात्रीं ज्यांच्याशीं आपला संवाद झाला त्याच या स्त्रिया असें राजानें तात्डतोब ओळखलें. त्यांच्या त्या एकंदर थाटावरून त्यांना आतां फटके मारण्याचा समारंभ होणार हें राजानें तेव्हांच ताडलें. राजा आपल्या मनाशीं म्हणाला—' माझ्या देशांत निरुपद्रवी माणसांना या अशा शिक्षा दिल्या जाव्यात व त्या माझ्या डोळ्यापुढें देण्यांत येत असताहि मी त्या निमूटपणें पहाव्यात ही केवढ्या खेदाची गोष्ट होय ! ज्या स्त्रियांनीं माझा समाचार घेऊन माझें समाधान केलें त्या स्त्रियांवर असा खडतर प्रसंग आला असतां त्याचा प्रतिकार करण्याचें साधन माझ्या हातीं नसावें हें केवढें दुर्दैव होय ! या देशांतील सामर्थ्य—सर्वस्वाचा मी धनी असूनही माझी अशी हेटाळणी व्हावी याहून अधिक नष्टचर्य ते कोणतें ! आतां या स्त्रियांना फटके खावे लागतील. परंतु, त्यांना ही शिक्षा फरमावणाऱ्या लोकांनीं पक्कें ध्यानांत ठेवावें कीं, माझ्या या अज्ञातवासाची समाप्ति झाल्यानंतर त्यांना मी एका फटक्यास शंभर फटके देईन ! '

इतक्यांत एक मोठा थोरला दरवाजा उघडला व कित्येक नागरिकांनीं आंत प्रवेश केला. त्यांनीं त्या स्त्रियांभोंवतीं गराडा घातला. राजास त्या स्त्रिया दिसेनाशा झाल्या. कित्येक अधिकारी बाहेरून आंत व आंतून बाहेर

येत जात होते. त्यांचीं एकमेकाशीं कित्येक प्रश्नोत्तरेंहि झालीं. परंतु त्यांतील एक अक्षर देखील राजास ऐकूं आलें नाहीं. अधिकाऱ्यांनीं लोकांची गर्दी बाजूस केल्यावर राजास त्या स्त्रिया व त्या स्तंभास लाविलेला फांस हीं दृष्टीं पडलीं. तेव्हां त्याचा जीव थरारून गेला.

अधिकाऱ्यांनीं स्त्रियांच्या गळ्यांला फांस घालून स्तंभ वर ओढण्यास हुकुम केला. त्या बरोबर त्या स्त्रिया हवेंत लटकत राहिल्या. त्यांचा प्राण गेल्यावर त्या दोघींनाहि पुन्हां खालीं सोडण्यांत आलें. हा असुरी प्रकार पाहून राजाच्या डोळ्यापुढें चक्कर आलें. आपल्या डोळ्यावर हात धरून तो भिंतीकडे तोंड करून उभा राहिला. तो आपल्या मनाशीं ह्मणाला.—' जो राक्षसी देखावा आज माझ्या डोळ्यास दिसला, तो माझ्या अंतःकरणांतून कधींहि जाणार नाहीं. प्राणहत्येपर्यंत त्याचें तेथें कायमचें वास्तव्य राहणार. ध्यानीं, मनीं, स्वप्नीं त्याशिवाय मला कांहींहि दिसणार नाहीं. यापेक्षां मी आंधळा असतों तरी बरें झालें असतें ! सरदार व बडे लोक याच्यासाठीं राखून ठेविलेल्या रस्त्यावरून या स्त्रियांनीं मार्गक्रमण केलें याबद्दल त्यांस एवढी कडक शिक्षा ! कोण हा जुलूम ! '

धीरेंद्र राजावर एकसारखा टेहळणी करीत होता. राजाची भयभीत मनोवृत्ति पाहून तो आत्मगत ह्मणाला—' स्वारींचा भ्रम दूर झालासें वाटतें. त्यांच्या वृत्तींतला कडकपणा बराच कमी झालासें दिसतें. नाहींतर एव्हांना त्यांनीं येथील अधिकाऱ्यांच्या कुळ्या केव्हांच उखडून टाकल्या असत्या. ' या स्त्रियांना एकदम सोडून द्या. ' असा त्यांनीं हुकूम सोडण्यासहि कमी केलें नसतें. आपण राजे आहोत हा या बिचाऱ्याचा भ्रम निघून जाऊन आतां तरी तो ताळ्यावर येवो ह्मणजे झालें. '

तेथें कित्येक कैदी रातोरात ठेवण्याकरितां आणले होते. दुसरे दिवशीं त्यांना निरनिराळ्या ठिकाणीं रवाना करण्यांत येणार होतें. कांहींना हद्दपारीच्याहि शिक्षा झाल्या होत्या. आपण राजे असल्यामुळें रयतेची स्थिती आपणांस प्रत्यक्ष समजून घेण्याची अशी सुसंधि आपणांस पुन्हां केव्हांहि मिळणार नाहीं, असा विचार करून राजा बहुधा प्रत्येक कैद्यास त्याच्या गुन्ह्याबद्दल व पूर्व वृत्ताबद्दल विचारपूस केल्याशिवाय सोडीत नसे. त्यांची दुःखाची कहाणी ऐकून राजाचें मनहि

उद्विग्न होत असे. त्या कैद्यांपैकीं एकजण एक भोळसर दिसणारी अशी स्त्री होती. तिनें एका कोष्ट्याच्या येथील दोन हात कापड चोरलें होतें. त्याबद्दल तिला एक वर्ष सक्तमजुरीची शिक्षा मिळाली होती. दुसऱ्या एका माणसावर घोडा चोरल्याच्या आरोपावरून खटला झाला होता. त्या खटल्यात अधिकाऱ्यांच्या बाजूचा पुरावा फसला ह्मणून त्यांनीं दुसरें कांहीं निमित्त काढून त्याच्यावर खटला केला होता. त्यास पांच वर्षांची शिक्षा ठोठावली. दुसऱ्या एकानें रस्त्यावर सांपडलेला एक राघु घरीं नेला. तो त्यानें चोरून नेला असा राघूच्या मालकानें पुरावा दिल्यावरून त्यासहि जबर शिक्षा देण्यांत आली होती.

हा सर्व अमानुष प्रकार पाहून राजाच्या अंगाचा तिळपापड होऊन गेला. धीरेंद्र व आपण तो तुरुंग फोडून तहत राजवाड्याकडे जावें व सिंहासनावर आरूढ होऊन आपण या सर्व कैद्यांना सरसहा माफी द्यावी असाहि त्याच्या मनांत विचार आला. व तो त्यानें धीरेंद्राजवळ व्यक्तहि केला. तें ऐकून धीरेंद्र ह्मणाला—' अरेरे ! गरीब बिचारा पोर ! येथील हृदयद्रावक हकीकती ऐकून याच्या वेडानें पुन्हां उलट खाल्लीशीं दिसते.

या कैद्यांमध्यें एक वृद्ध वकीलहि होते. त्यांची देहयष्टि चांगली भक्कम असून त्यांचा चेहराहि भव्य होता. भारदस्तपणा व बुद्धिमत्ता यांचीं चिन्हें त्यांच्यावर स्पष्ट दिसत होतीं. त्यांच्या डोळयाच्या तेजावरून ते गृहस्थ मोठे निस्पृह व निर्भय असावेत अशी कोणाचीहि खात्री होई. सरकारच्या मुख्य फडणिसा संबंधानें कांहीं प्रतिकूल मजकूर घालून त्यांनीं एक पत्रक लिहिलें, या गुन्ह्याबद्दल त्यांची वकिलीची सनद रद्द करण्यांत येऊन त्यांना दहा हजार रुपये दंड करण्यांत आला होता. त्यांच्या हातून तशाच प्रकारचा गुन्हा पुन्हां झाल्यामुळें त्यास जन्मठेपेची शिक्षा देण्यांत आली.

त्यांचें हें वृत्त ऐकून राजाच्या संतापास अधिकच भरतें येऊन तो ह्मणाला— ' मी बोलतों हें कोणासहि खरें वाटत नाहीं व तुझाहि त्याच्यावर विश्वास बसणार नाहीं हें मी जाणून आहे, परंतु त्याची मला पर्वा नाहीं. मी तुला निक्षून सांगतों कीं आजपासून एक महिन्याच्या आंत तुझी खास मुक्तता होईल. इतकेंच नव्हें, तर मानवजातीस लाज आणणारे असे जे हे कायदे आज येथें अस्तित्वांत आहेत त्या सर्वांचा

निर्मूलन केले जाईल. राजांच्या मनास रयतेबद्दल दया वाटण्यास देशांतील प्रचलित कायद्यांचा त्यांना अपरोक्ष अनुभव मिळाला पाहिजे. असा अनुभव ह्मणजे दयेची व ज्ञानाची पाठशाळाच होय. अशी माझी स्वानुभवावरून पक्की खात्री झाली आहे.

प्रकरण २८ वें.

स्वार्थत्याग.

तुरुंगांतील कोठडींत स्वस्थ हात जोडून बसण्याचा धीरेंद्रास फारच कंटाळा येत चालला. त्याच्या खटल्याची तारीख जसजशी जवळ येऊं लागली तसतसें त्याला एकप्रकारें समाधानच होऊं लागलें. कैदेशिवाय कोणतीहि शिक्षा आपल्याला झाली तरी त्याबद्दल आपल्याला इतकी फिकीर वाटणार नाहीं असें धीरेंद्रास वाटत होतें. परंतु या संबंधांत त्याची चुकीची कल्पना झाली. आपल्या भावावर आपण हल्ला केला याबद्दल फार तर आपल्याला दंडाची शिक्षा होईल असेंच त्यास वाटत होतें. परंतु फिर्यादीचे आपण भाऊ आहोंत व आज ज्या जिनगीचा उपभोग लुब्धक घेत आहे त्या जिनगीचे आपण खरे हक्कदार आहोंत हें या संबंधांत आधींच शाबीत होणें जरूर होतें. या गोष्टीचें त्यास भानहि राहिलें नाहीं. तो एकसारखा मनांतल्यामनांत धुमफुसूं लागला, अधिकाऱ्यांशीं उद्दामपणानें वागूं लागला, परंतु यामुळें त्यास व्यर्थ धपके मात्र खावे लागत असत. त्यांना तेथून दुसऱ्या तुरुंगांत घेऊन जात असतां त्यांच्या मागें लोकांचा घोळका जाऊं लागला. या घोळक्यांत राजा बराच मागें राहिला. अखेर त्यांची दृष्टादृष्टहि होईनाशी झाली. अखेर ही सर्व मंडळी कोर्टांत जाऊन पोहोंचली. तेथें न्यायाधिशानें चौकशीचा तोडगा करून त्यास शिक्षाहि ठोठावली. राजाच्या वयाचा विचार करून कोर्टानें फक्त त्यास ताकीद दिली. व त्यास सोडून दिलें.

धीरेंद्रास दोन तासपर्यंत कोलदांडा घालून टांगून ठेवावे अशी शिक्षा दिल्याचें

वृत्त त्याला समजतांच राजाच्या क्रोधास पारावार उरला नाहीं. राजाच्या मर्जीतल्या नोकरास एका सामान्य न्यायाधिशानें अशी अपमानास्पद शिक्षा द्यावी हें पाहून त्याचे डोळे संतापानें लाल झालें. धीरेंद्राम टांगलेला पाहून राजा मोठ्यानं ओरडून ह्मणाला– ' त्यास सोडून द्या. तो माझा नोकर आहे. मी या देशाचा—'

धीरेंद्र ह्मणाला—' बाबा, आता तरी गप्प बैस. असें भलभलतें बोलून आपला नाश मात्र करून घेशील. रावसाहेब, त्याच्याकडे आपण लक्ष देऊं नका. त्याचें माथें भ्रमल आहे. '

रावसाहेब ह्मणाले—आह्मास त सागण्याची आपण तसदी घेऊ नका. त्याच्याकडे लक्ष देण्यास आह्मास फुरसत आहे कोठें ?

तो एका नोकराकडे वळून ह्मणाला— ' या गाढवाला फटके लगाव. ह्मणजे त्याला थोडीशी चालरीत लागेल. ' ' त्याला सहा फटके मारा. ' असें त्याच वेळेस घोड्यावरून जात असता लुब्धक ह्मणाला.

शिपायानें राजाला ताबडतोब पकडलं. आपल्या पवित्र देहावर एवढा थोरला अत्याचार होणार हें पाहून राजाचें मन इतकं बेफाम होऊन गेले कीं तो जागच्याजागीं निश्चल उभा राहिला. शिपायानें त्याला पकडून नेलं. तेव्हा त्यानें यत्किंचित्‌हि धडपड केली नाही. निमुटपणे फटके खावयाचे किंवा फटके माफ होण्याबद्दल तोंड वगाडावयाचें एवढ दोनच मार्ग राजास मोकळे होते.

हे दोन्हीही मोठे खडतर होते. राजाला फटके खातां येतील. परंतु, याचना करणं हें राजाचें शील नव्हे. असाच राजानें विचार ठरवला. परतु, मध्यंतरीं धीरेंद्र ह्मणाला—' हे पाषाणहृदयी शिपायांनो, तुह्माला दिसत नाहीं का तो किती नाजुक मुलगा आहे तो. त्याला सोडा. त्याच्याबद्दल मी फटके खाईन. '

लुब्धक जवळच होता. तो आनंदानें ह्मणाला ' वा ! मग तर चांगलेंच काम झालें. त्या पोरटयाला सोडून द्या आणि या धटिंगणाला धरून चांगला यथास्थित बडवा. ' यावर राजा काही उत्तर देण्याच्या बेतांत होता. परंतु, लुब्धकानें त्यास निक्षून सांगितलें-' खबरदार तोंडातून एक अक्षर

काढशील तर. एका अक्षरागणित या इसमास सहसहा फटके खावे लागतील. '

धीरेंद्राचा कोलदांडा त्यांनीं काढला, व त्याची पाठ उघडी करून त्यास स्तंभाशीं जखडून टाकिलें. फटके मारण्याचा विधी सुरू होतांच एकीकडे तोंड करून राजा ढळढळा अश्रु गाळूं लागला--तो ह्मणाला--' या मनुष्याचें अंतःकरण किती थोर आहे ! याची ही राजनिष्ठा माझ्या स्मरणांतून कधींहि जावयाची नाहीं. माझें पूर्वपद मला प्राप्त झालें ह्मणजे या थोर माणसाचा निष्कारण छळ करणाऱ्या या चांडाळांना योग्य प्रायश्चित्त दिल्यावांचून मी कधींहि राहणार नाहीं. '

धीरेंद्रानें हें जें आत्मत्यागाचें कृत्य केलें त्याबद्दल राजाच्या मनांत पराकाष्ठेची कृतज्ञताबुद्धि व आदरभाव वाटूं लागला. पुन्हां तो आपल्या मनाशीं ह्मणाला---' जो आपल्या राजाचा क्लेशापासून बचाव करितो व त्यास जीवदानहि देतो--आणि हेंच यानें माझ्याकरितां केलें---तो श्रेष्ठप्रतीचें कर्तव्य बजावतो यांत संशय नाहीं. परंतु आपल्या राजाचें अवहेलनेपासून व अप्रतिष्ठेपासून जो संरक्षण करतो त्याच्या कृतीस तर मोलच नाहीं. '

धीरेंद्रानें सर्व फटके हूं कां चूं न करतां सहन केले. त्याचें तें धैर्य पाहून त्या पाषाणहृदयी शिपायांना सुद्धां कौतुक वाटलें. एका मुलाकरितां त्यानें ही शिक्षा आपणावर घेतली हें पाहून तेथें जमलेले लोकहि आश्चर्यानें थक्क होऊन गेले. आतांपर्यंत लोकांचा आरडा ओरडा चालू होता. तो एकदम स्थिर झाला. सर्वजण एकमेकांच्या तोंडाकडे पाहून आपणास वाटणारें आश्चर्य आपल्या चर्येवरून व्यक्त करूं लागले. फटके मारणें झाल्यानंतर शिपायानें धीरेंद्रास पुन्हां कोलदांडा घातला.

'राजेलोकांनाहि ज्या कामगिरीबद्दल योग्य बक्षिस देतां येणें अशक्य आहे अशी तूं आज मोठी कामगिरी बजाविली आहेस. तिचें खरें चीज ईश्वराच्या दरबारांतच होणें शक्य आहे. तरीपण सर्वांत मोठी सरदारी देणें एवढेंच काय तें माझ्या हातीं आहे. ती मी तुला देतों. ' असें ह्मणून राजानें त्याच्या मस्तकास हात लाविला व ' या देशचे राजे सुशील महाराज यांनीं आजपासून येथील सरदारांच्या मालिकेंत तुझ्या नांवाची अग्रस्थानीं योजना केली आहे ' असें मोठ्या गंभीरतेनें उद्गार काढले.

धीरेंद्र इतक्या क्लेशांत होता तरी या मुलाची कृतज्ञता पाहून त्याचें हृदय द्रवून गेलें. शारीरिक क्लेशामुळें तो रंजीस आल्यामुळें त्याला आपल्या आनंदमय मनोवृत्तीचें यथायोग्य आविष्करण करतां येईना. तरी पण कोलदांड्यांतून सुटून एकदम सरदारीवर चढण्याची कल्पना त्याच्या मनांत येतांच त्याच्या उद्विग्न मुद्रेवरहि आनंदाची छटा दृश्यमान झाली. तो आपल्या मनांत ह्मणाला–' सरदारीच्या पदवीस आह्मी यापूर्वींच चढलों आहोत. परंतु आज तिच्या शिरोभागीचा आह्मास मान मिळाला आहे. यापुढें आह्मास किती सन्मान, पदव्या मिळणार आहेत याची कल्पनाहि करवत नाहीं. या पदव्यांचा हिशेब अगदीं साधा आहे. त्यापासून देणाराचेंहि कांहीं नुकसान नाहीं व घेणाराचाहि कांहीं फायदा नाहीं. हा सर्व अदृश्य सृष्टीचा खेळ आहे. तरी पण खऱ्या पदव्यांपेक्षां त्याची मला शतपटीनें अधिक किंमत वाटत आहे. कारण खऱ्या पदव्यामध्यें दृग्गोचर होत नसलेल्या अस्खलित प्रेमाचें या पदव्यांशीं साहचर्य आहे. प्रेमाच्या योगानें या पदव्यांस जशी अपूर्व किंमत आलेली आहे त्याप्रमाणेंच त्या करतां मला खटपट करावी लागली नाहीं किंवा हांजी हांजी करावी लागली नाहीं. दात्यानें त्या निष्कपट मनानें व निर्मळ अंतःकरणानें मला देऊं केल्या आहेत. गुलामगिरीनें खरेदी केलेल्या व सामर्थ्याभिलाषी स्वार्थपर सत्ताधाऱ्यांनीं केवळ शिष्टाचारानें दिलेल्या औपचारिक खऱ्या पदव्यापेक्षां या प्रेमळ पदव्याची महती सहस्रपट अधिक आहे ही गोष्ट कोण नाकबूल करील ? '

सर्वांना ज्यांचा मोठा दरारा त्या लुब्धकांनीं आपला घोडा वळविला. तेव्हां तेथें जमलेल्या सजीव माणसाचा अभेद्य तट निमिषार्धांत दुभंगला व त्यांचा घोडा निघून गेल्यानंतर तो पुन्हां पहिल्याप्रमाणें सांधून राहिला. धीरेंद्राची उघडपणें प्रशंसा करण्याची कोणाची छाती झाली नाहीं. परंतु दुसऱ्याच्या आपत्प्रसंगीं ओरडा आरडा करून आपला हीन प्रतीचा उल्हास दर्शविण्यांतच ज्यांचें कुलव्रत ते तेथें गपचीप उभे होते. हें त्यांनीं धीरेंद्रास निःशब्द मानपत्रच दिलें असें ह्मणावयास हरकत नाहीं. त्या जमावांत या वेळेस एक नौखेच गृहस्थ आले. आतांपर्यंत येथें घडलेला मजकूर त्यांच्या कानावर गेला नव्हता. नेहमींच्या रिवाजाप्रमाणें ते धीरेंद्राकडे पाहून त्याचा उपहास कर-

ण्याच्या हेतूनें त्याच्या अंगावर एक कुत्रें फेंकण्याच्या बेतांत होते. इतक्यांत या पुण्यपुरुषास आसपासच्या लोकांनीं दहापांच ठोसे लगावून ताबडतोब ताळ्यावर आणले व निमिषार्धांत पुन्हां पूर्वीचें शांततेचें साम्राज्य स्थापित झालें.

प्रकरण २९ वें.

कांतिपुरास.

जेव्हां धीरेंद्राच्या शिक्षेची मुदत संपली तेव्हां त्यास सोडून देण्यांत येऊन त्या हद्दीच्या बाहेर जाण्यास त्यास हुकूम झाला. त्याची तरवार त्यास देण्यांत आली व त्याचीं घोडींहि अधिकाऱ्यांनीं त्याच्या स्वाधीन केलीं. राजास घेऊन तो घोड्यानिशीं निघाला. तेव्हां रस्त्यांत जमलेल्या लोकांनीं त्यास मोठ्या आदरबुद्धीनें वाट सोडली. व ते निघून गेल्यानंतर रस्त्यांत उभे राहण्याचें कारणच संपल्यामुळें लोक आपापल्या घरीं निघून गेले.

आता पुढें काय करावें, कोठें जावें, हा विचार धीरेंद्रापुढें दत्त ह्मणून उभा राहिला. आतांपर्यंत इतके क्लेश सोसले पण आतां पुढें आपला जन्म कसा घालवावयाचा, आपला वारसहक्क शाबीत करून घेण्याकरिता कोणाची मदत मागावयाची, किंवा त्यावर उदक सोडून हरिहरि ह्मणत बसावयाचें, मदत मागून आपला हक्क शाबीत करून घेण्याची खटपट करावयाची असा जरी संकल्प ठरला तरी आपल्याला मदत कोण करणार? हा त्याच्यापुढें मोठा अवघड प्रश्न येऊन पडला. त्यानें पुष्कळ वेळ विचार करून पाहिला, पण त्यास उपाय ह्मणून सुचेना. 'राजा फार दयाळू आहे तो गरीबांचा फार कनवाळू आहे, दुर्बळांचा परामर्ष घेण्यास तो सदैव तत्पर असतो' या त्या वृद्ध नोकरानें सांगितलेल्या हकिगतीचें त्यास स्मरण झालें. राजाची गांठ घेऊन एकदां आपल्या नशिबाची परिक्षा कां करून घेऊं नये असें त्यास वाटूं लागलें. याबद्दल त्यास मोठी खात्रिलायक आशा वाटत होती, आशातला भाग नाहीं. परंतु कांहींच आधार राहिला नाहीं तेव्हां

एकदां या उपायाचा तरी प्रयोग करून बघावा याच विचारानें राजाची मुलाखत घेण्याचा त्यानें संकल्प ठरविला.

राजाची मुलाखत घेणें ह्मणजे कांहीं सामान्य गोष्ट नाहीं. आपल्यासारख्या कंगाल, अप्रसिद्ध व निराधार माणसाची राजाशीं मुलाखत कशी घडावी याबद्दल त्याच्या मनात अनेक प्रकारच्या शंका आल्या. शेवटीं काय होईल ते होवो; मनाचा धीर करून एकदा राजापुढें जाऊन उभें रहावयाचें. प्रथम राजधानींत जाऊन राजवाडयापर्यंत पोहोचल्यानंतर मग राजाची गांठ कशी घ्यावी हा प्रश्न सोडविण्याची वेळ येणार तोपर्यंत त्याबद्दल मनास वृथा तसदी कां द्या. राजाचे खासगी कारभारी आपल्या बापाचे परिचित आहेत, तेव्हां कदाचित् त्यांच्याकडे आपण गेलो तर आपला राजवाडयांत प्रवेश होईल. हा विचार मनांत येऊन त्यास थोडासा धीर आला. आतांपर्यंत तो अगदींच अंतराळीं लोंबत होता तो त्यास आतां कांहीं तरी आधार लागला. डोळयापुढें कोणता निश्चित उद्देश ठेवून अमुक एक कार्यक्रम स्वीकारला पाहिजे हें ठरविण्यास आतां पहिल्यापेक्षा त्यास पुष्कळ सवड सांपडली. आतापर्यंत झालेल्या उपद्व्यापामुळें त्याच्या मनास जी एकप्रकारची खिन्नता व औदासिन्य आलें होतें त्याचा हळूं हळूं निरास होऊन त्याच्या हृदयांत नवीन उत्साहाची किंचित् प्रेरणा होऊं लागली. विचार करण्याच्या नादांत आपण किती लांब आलों हें पाहून त्यास आश्चर्य तर वाटलेंच. परंतु जेथें आपल्याला क्लेश सोसावे लागले तें स्थान आपण फार दूर सोडून आपल्या संकल्पित स्थानाच्या आपण जवळ जवळ जात चाललो हा विचार मनांत येऊन त्यास बरीच हुषारी वाटली. त्याच्या मागोमाग राजाहि घोडयावर बसून चालला होता. दोघांच्याहि मागें एकप्रकारचेंच लचांड लागलें होतें. दोघांनाहि आपले हक्क शाबीत करून घ्यावयाचे होते. अवहेलना, अवमान, तिरस्कार, उपहास, उपमर्द वगैरे पासून होणाऱ्या आपत्ति दोघांनाहि सारख्याच भोगाव्या लागल्या. मात्र त्या दोघांनाहि परस्परांच्या आपत्तींची यथार्थ कल्पना नव्हती. हा मुलगा आपण राजा आहों असें केवळ भ्रमानें ह्मणत आहे असें धीरेंद्रास वाटे. इकडे राजा आपल्या मनांत ह्मणे कीं हा इतका आपल्या हक्कासाठीं कां तळमळतो आहे? साक्षात् राजाची अमूल्य कामगिरी यानें

अनेक वेळां केलेली आहे तेव्हां आतां याला कमी काय आहे ? राजाची प्रसन्नता संपादण्यापेक्षां दुसरें उच्चतर उद्दिष्ट कोणतें आहे. धीरेंद्रासंबंधानें अशाप्रकारें विचार केल्यानंतर राजाहि आतां पुढें काय करावें व कोठें जावें या विचारांतच निमग्न झाला. आपलें सर्व ठीक जमलें. आपण राजधानींत जाऊं पण या मुलाचें कसें होणार ? त्या शहरांत याला अत्यंत हाल सोसावे लागले. तेव्हां तेथें तो परत जाण्यास कधींहि तयार होणार नाहीं. बरें, आतां याला विचारावें तरी कसें ? हा धीरेंद्रापुढें मोठा प्रश्न येऊन पडला. शेवटीं त्यानें राजास प्रश्न केला— ' महाराज, आतांपर्यंत मी आपल्याला विचारावयास विसरलों होतों, आतां आपण दोघे कोठें जाणार ? ' राजा ह्मणाला— ' कांतिपुरास ! धीरेंद्र ह्मणाला— वाः ! वाः ! मोठी छान गोष्ट झाली. आपलें आयतेंच काम झालें. ' राजा कांतिपुरास जाण्यास पुन्हां कसा तयार झाला याचें मात्र ह्याला आश्चर्य वाटलें.

याप्रमाणें ते दोघेहि कांतिपुरच्या रस्त्यानेंच चालले. वाटेंत सांगण्यासारखी अशी कोणतीच गोष्ट घडली नाहीं. शेवटीं ते पुलावर येऊन दाखल झाले. रात्रीचा सुमारें दहा वाजण्याची वेळ होती पुलावर लोकांची बरीच गर्दी जमली होती. मशालींचा प्रकाश सर्वत्र दिसत होता. इतक्यांत पूर्वीं एका मोठ्या हुद्यावर असलेले एक लठ्ठ गृहस्थ रस्त्यांत ठेंचाळून पडले त्यांचा धक्का धीरेंद्र आपल्या हातांत घोडे धेऊन चालला होता, त्यास लागला. आपला धक्का दुसऱ्यास लागला हें पाहतांच ते लठ्ठ हुद्देदार चटकन् उठून गर्दीतून नाहींसे झाले, असें धीरेंद्रास वाटलें. परंतु गर्दीतील लोकांच्या पायांनीं त्यास वरचेवर चळून मिळून अखेर ते लठ्ठ गृहस्थ गतप्राण होईतोंपर्यंत तसेच पुढें ढकलत ढकलत चालले होते. शेवटीं ते एका जागीं स्थिर झाल्यानंतर त्यांच्या लठ्ठ देहयष्टीवर प्रत्येक जण धडपडून पडूं लागला. कोणाचा हेतू नसतां मागला पुढच्यास आपल्या डोक्याची ढुशी देऊं लागला. आतां खास मारामारी जुंपणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. दुसरे दिवशींच अभिषेकोत्सवाचा दिवस होता. तेव्हां अशा महत्वाच्या प्रसंगीं एखाद दुसरा सुद्धां दंगा होऊं नये मग त्यांत काय शोभा राहिली असें वाटूनच कीं काय सर्वांनीं मारामारीस प्रारंभ केला. या रेटारेटींत आपल्या मागचाच मनुष्य मख्य गुन्हेगार आहे. अशी सर्वांचीच भावना होऊन

जो तो आपल्या मागून येणाऱ्या माणसावर लाल डोळे करूं लागला. थोडक्याच वेळांत दंगा वणव्याप्रमाणें हां हां ह्मणतां सर्वत्र पसरला. या ओरडया आरडयांत व मारामारींत धीरेंद्र व राजा यांची चुकामूक झाली. त्यांना येथें असेंच ठेवून आपण आतां राजवाडयांतील धामधुमीकडे वळूं.

प्रकरण ३० वें.

तानूची हवाल.

खरा राजा गांवांत भटकत हिंडत होता. त्याच्या अंगावर पुरतें वस्त्रहि नव्हतें. जो तो त्याला धसफन करीत होता. आतां त्याला चोरांनीं आपल्या तांडयांत न्यावें, मग खुनी माणसांच्या संगतींत असल्याबद्दल कारागृहवास भोगावा लागावा, व सर्वांनीं त्यास सदासर्वदां भ्रमिष्ट व तोतया ह्मणावें अशी खऱ्या राजाची परवड होऊं लागली. व इकडे तानूची सर्व प्रकारें बडेजाव राजेपणांत खरोखरच कांहीं उपभोग आहे अशी त्याची नुक्ती कोठे समजूत होऊं लागली. अशा स्थितींत त्याचा आपण निरोप घेतला होता थोडयाच दिवसांत राजेपणाच्या सुखांत तो अगदीं गर्क होऊन गेला प्रथम प्रथम त्यास वाटणारी धास्ति नाहींशीं झाली. त्याच्या मनांत आरंभीं आरंभीं जे कुतर्क येत होते ते येईनासे झाले. पहिल्यासारखा तो गोंधळेनासा झाला. जणूं काय तो खरा राजा होता अशाप्रकारें त्याचें वर्तन अगदीं निर्भय व सहजवृत्ती दिसूं लागलें. राजाच्या चुकीबद्दल फटके खाणाऱ्या मुलाच्या माहितीचा त्यास फारच उत्कृष्ट फायदा झाला. त्याला जेव्हां बोलायची किंवा खेळायची इच्छा होत असे तेव्हां तो इंदिरा व पद्मावती यांना तो बोलावणं पाठवीत असें. व बोलण्याचालण्याचें किंवा खेळण्याचें काम झालें ह्मणजे त्यांना रजा देत असे. ज्या कुळांतील राजकन्या त्या कुळांतीलच आपण आहों याबद्दल त्यास संदेह वाटे. रात्रीं मोठमोठे मौल्यवान पोषाख घालून निजण्याची त्याला संवय झाली. सकाळीं पोषखास पांचपन्नास अधिकाऱ्यांचे हात लागल्यानंतर तो अंगावर घालून घेण्यांत कांहीं विपरीत आहे असें त्यास वाटत होतें. हत्यारबंद पहारेकरी बरोबर घेऊन व मोठमोठया सरदा-

रांच्या पुरस्सरणानें भोजनास जाण्यास त्यास आतां कोणत्याहिप्रकारचा संकोच वाटत नसे. इतकेच नव्हें तर त्यानें आपल्या खिसमतगारांची संख्या दुपटीवर ह्मणजे शंभरापर्यंत वाढविली. ' इकडून यावें महाराज, इकडून यावे महाराज ' असें खिसमतगारांनीं ह्मणावें. तितके वेळां ह्मटलें नाहीं तर त्यास चुकल्यासारखें वाटूं लागलें.

सिंहासनारूढ झाल्यानंतर सरदार हरिताक्ष यांच्या तंत्रानें वागणारे केवळ नामधारी राजे आपण नसून आपणाला खरोखरच हवें तें करण्याचा अधिकार आहे अशी त्याच्या मनाची समजूत झाली. दूरदूर देशांहून आलेल्या मोठमोठ्या वकिलांची मुलाखत घेण्याची त्याला हौस वाटूं लागली व त्यास दूरदूर देशच्या राजांनीं ' प्रिय बंधु ' अशा रीतीनें संबोधिलेले संदेश ऐकण्यांत त्यास मौज वाटूं लागली. वाहवा रे तानू ! काय तुझा हा भाग्योदय !

त्याला तासातासास नवीन नवीन कपडे घालण्याची संवय लागली. प्रथम ज्या कपड्यांचा ढीग त्याला चमत्कारिक वाटे तेच कपडे आतां पुरेनासें झाले. नवीन कपडे करण्याबद्दल तो प्रत्यहीं हुकुम सोडूं लागला. त्याच्या दिमतीस असलेले चारशें नोकर त्याला कमी वाटूं लागले. लवून मुजरा करणाऱ्या सरदारांचें खुशामतीचें बोलणें त्यास कर्णमधुर वाटूं लागलें. तरी तो सर्वांशीं कनवाळुपणानें व सौम्यपणानेंच वागे. कोणावरहि जुलूम झाला तरी त्याचें निराकरण करण्यास तो अगदीं एका पायावर तयार असे. अन्यायी कायद्यावर त्याची एकसारखी मोहिम सुरू असे. तरी दरबारांत कोणांकडूनहि आपला यत्किंचित उपमर्द झाला असें त्यास वाटल्यास तो डोळे लाल करी. त्याची ती उग्र मुद्रा पाहून मोठमोठे सरदारसुद्धां थरथरा कांपूं लागले. एकदां ' त्याची बहीण ' त्याला ह्मणाली—' ज्यांना कैद होणेंच रास्त आहे किंवा जे फांसांवर चढविण्याच्या किंवा जीवंत जाळण्याच्या योग्यतेचे गुन्हेगार आहेत; त्यांना तुह्मी भराभर माफी देतां हें कांहीं चांगलें नव्हे. आपल्या बाबांच्या वेळेस कारागृहांत बहुधां खेच उडून गेली असे. कधीं कधीं तेथें साठसाठ हजारांपर्यंत कैदी खेचलेले असत. त्यांच्या संस्मरणीय कारकिर्दीत त्यांनीं बहात्तर हजार चोरांना व लुटारू लोकांना सुळावर चढवून परलोकीं पाठविलें ! बहिणीचें हें भाषण ऐकतांच तानूचें उदार अंतःकरण क्षुब्ध

होऊन गेलें, व तो तिला ह्मणाला-' जा, आपल्या खोलींत जाऊन बैस, आणि ईश्वरास अनन्यभावें प्रार्थना कर कीं, माझें पाषाणहृदय दयाळू कर.'

राज्याचा जो खरा वारस व ज्यानें आपल्याला अत्यंत ममताळूपणानें वागविलें, पहारेकऱ्यानें आपल्याला उर्मटपणानें वागविलें तेव्हां जो त्याच्या अंगावर एकदम चालून गेला त्या सुशीलकुमाराबद्दल त्याच्या मनांत कधीं कांहींच विचार आला नाहीं काय ? होय प्रथम प्रथम या विचारानें तो रात्री-च्या रात्री जागून काढी. सिंहासनाचा खरा मालक परत येऊन तो येथून आपली सुटका केव्हां करतो असें त्यास अंतःकरणपूर्वक वाटत होते. परंतु बरेच दिवस झाले तरी राजकुमार कांहीं परत येईना. तेव्हां-तानूस त्याजबद्दलची स्वाभाविकपणेंच विस्मृति पडून तो आपल्या नूतन आयु-ष्यक्रमांत गर्क होऊन गेला व अखेर राजकुमाराचा विचार त्याचे चित्तांत कधींहि येईनासा झाला. चुकून कधीं आलाच तर तो त्यास नकोसा होई. कारण न्यायानें जें आपलें नव्हे, त्याचा आपण लबाडीनें उपभोग घेत आहों ही भावना त्याचे मनास फारच जाचक होत असे. त्याच्या विचारक्षेत्रांतून ज्या मार्गानें राजकुमार हद्दपार झाला त्याच मार्गानें त्याची आई व त्याच्या बहिणी यांनींहि आपलें मार्गक्रमण केलें. त्यांचे स्मरण झालें ह्मणजे प्रथम प्रथम त्याच्या मनास परमावधीचा उद्वेग वाटे. त्यांची आपली केव्हां गांठ पडते असें त्यास होऊन जाई. परंतु पढें पुढें ती सात्विक वृत्ति लुप्तप्राय होऊन आपलीं माणसें आपल्याला न भेटतील तर बरें. कारण त्यांचा फाटून चिंध्या झालेला घामट पोषाख व त्यांची कंगाल रहाणी हीं आपणास आपल्या उन्नत पदावरून तत्क्षणींच खालीं ओढतील अशी त्याला भीति वाटूं लागली. आपली आई व बहिण या दोघींहि चार लोकांदेखत आपली गांठ घ्यावयास येतील तर आपलें खरें स्वरूप लोकांच्या निदर्शनास येऊन आपण सिंहास-नावरून तात्काळ दारिद्र्यकूपांत पडून पुन्हां आपणांस क्लेश सोसावे लाग-तील. या विचारानें आई व बहिण यांची आपली गांठ पडत नाहीं हें एक-परीं चांगलेंच आहे असें त्याच्या मनास खरोखरच वाटूं लागलें. एखादेवेळेस त्याला त्यांचे स्मरण झालेंच तर आपल्या नवीन पदवीस तें उपमर्दकारक आहे असें समजून तो त्यांचा अंतर्यामीं हेवा करूं लागला.

एके दिवशीं मध्यरात्रीचा सुमार होता. पराच्या गाद्यांवर तानू शयन करीत होता. उशापायथ्याशीं मोठमोठ्या दर्जाचे खिसमतगार आपल्या सेवेची त्यास जरूर लागते केव्हां आणि ती आपण तात्काळ पार पाडतो केव्हां अशा तत्परतेनें उभे होते. त्याच्या सभोंवार राजलक्ष्मीचें तेज सर्वत्र विलसत होतें. दुसऱ्याच दिवशीं त्यास शुभधाम देशाच्या सिंहासनावर राज्याभिषेक होणार होता. अशा वेळेस राज्याचा खरा हक्कदार, परलोकवासी महाराजांचा औरस पुत्र हा क्षुधा व तृषा या आंवळ्याजावळ्या आपत्तींनीं ग्रस्त होऊन गल्लोगल्लीं भटकत फिरत होता. त्याच्या अंगावर फाटक्या तुटक्या चिंध्या होत्या. आपण अशा स्थितींत असतांहि सहस्रावधि लोक राजवाड्यांतून बाहेर व बाहेरून राजवाड्यांत एकसारख्या खेपा घालीत, कोणाच्या राज्याभिषेकाची तयारी करीत आहेत ? याबद्दल आश्चर्य करीत बसला होता.

प्रकरण ३१ वें.

राज्याभिषेकाचा पूर्व संस्कार.

तानू दुसरे दिवशीं झोंपेंतून जागा झाला. तेव्हां सर्व वातावरण त्यास गजबजून गेलेलें दिसलें. राज्याभिषेक होण्याच्यापूर्वीं आज युवराज सर्व शहरांतून मिरवीत जाणार. तेव्हां त्यांच्या दर्शनसुखाचा लाभ आपणांस व्हावा या प्रीत्यर्थ सर्व नागरिक आपलीं नित्य कर्तव्यें बाजूस ठेवून तत्परतेनें उभे होते. आजची मिरवणूक किल्ल्यांतून निघून पुलावरून जाणार होती. तानू किल्ल्यांत येऊन दाखल झाला. तो तेथें सर्वत्र मुंग्यासारखीं माणसें पसरलेलीं आहेत. बंदुकांचा, तोफांचा एकसारखा कडकडाट चालूं आहे, त्या कडकडाटानें धरित्री, कंपायमानच होत आहे कीं काय असा भास होऊं लागला.

बंदुका व तोफा यांच्या धूम्रपुंजांत तो सर्व किल्ला अवगुंठित होऊन गेला. ज्याप्रमाणे एखादा विस्तीर्ण पर्वत ढगांनीं व्याप्त होऊन त्याचें शिखर तेवढें

वर डोकावीत असलेलें दिसावें त्याचप्रमाणें त्या किल्लयांतील सर्वांत उंच मनोरा व त्यावरील चित्रविचित्र रंगांचीं निशाणें मात्र दिसत होतीं.

तानू एका उत्कृष्ट व सुंदर अश्वावर आरूढ झाला होता. घोडयाच्या पृष्ठभागावरील भरगच्चीचे अलंकार भूमिपर्यंत लोळत होते. ' त्याचा मामा ' घोडयावर बसून त्याच्या मागोमाग चालत होता. त्याच्या दोन्ही बाजूस चिलखत घातलेले रक्षक सैन्य मोठया थाटानें चाललें होतें. आपापल्या इतमामाप्रमाणें सर्व सरदार लोक आपापल्या लव्याजम्यानिशीं चालले होते. कांतिपुर शहराची खरी कांति या मिरवणुकींत दृग्गोचर होऊं लागली होती. सारांश तो समारंभ फारच अपूर्व होता. मिरवणुकींत सर्वत्र महाराजांच्या नांवाचा एकसारखा जयजयकार होत होता. महाराजांचा नगरप्रवेश झाला त्यावेळेस आपली राजनिष्ठा व्यक्त करण्यांत सर्व नागरिकांत एक प्रकारची स्पर्धाच लागून गेलेली दिसत होती. किंचित् स्मित करून व थोडीशी मान हलवून राजा सर्वांचे मुजरे घेत चालला होता. राजाचा हा आपल्यावर मोठा कृपाप्रसादच झाला असें वाटून ' राजा दीर्घायुषी होवो ' ' ईश्वर राजास सुरक्षित ठेवो ' अशी ते एकच गर्जना करीत होते. भोंवतालीं एवढी गडबड चाललेली होती. तरी तानू यत्किंचितहि भांबावला नाहीं किंवा त्यांत त्यास कांहीं विलक्षण वाटलें नाहीं. केवळ थोडया दिवसाच्या अभ्यासानें त्याच्या मनोवृत्तींत केवढा पालट झाला हें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

रस्त्यांतून लोक नानाप्रकारचीं अभिनंदनपर पद्यें ह्मणत चालले होते. लक्षावधि लोकांचा समुदाय आपल्या एकट्याकरितां तेथें जमलेला पाहून तानूस पराकाष्ठेचें कौतुक वाटलें. जन्मास यावें तर राजा व्हावें असें त्यास होऊन गेलें ! इतक्यांत बऱ्याच दूर अंतरावर त्याला त्याच्या पूर्वाश्रमांतले दोन सोबती दिसले. लहानपणींच्या खेळांत हा जेव्हां राजा होत असे तेव्हां ते त्याचे मुख्य मंत्री होत असत. याना वाटलें कीं आज हा घोडयावर बसून लक्षावधिलोकांच्या जयजयकारांत थाटानें चाललेला मुलगा आपला खेळगडीच होय. खेळांतील लटुपटीचें राज्य चालवितां चालवितां अखेर त्यास खरेंच राज्यपद प्राप्त झालें असें जर त्यांना समजून येईल तर किती बरें मौज होईल ! ज्याचा आपण ' राजसाहेब,

राजेसाहेब ' ह्मणून उपहास करीत होतों तोच आज खराखुरा राजा होऊन त्यास मोठमोठे सरदार, दरकदार लवून मुजरा करीत आहेत. त्याचा दृष्टिक्षेप होतांच आपल्यावर मोठा प्रसाद झाला असे मोठमोठे प्रतापशाली सेनानायक मानीत आहेत. हें जर यांना कोणी जाऊन सांगेल तर तें त्यास खरें तरी वाटेल काय ? आज सर्व राष्ट्र माझ्या पायाशीं लोटांगण घेत आहे. असें भाग्य आपोआप प्राप्त झालें असतां मुद्दाम त्या घामट मुलांकडे पहा कशाला ? असा विचार करून आपलें तोंड त्यानें दुसऱ्या दिशेस वळविलें.

' महाराज दीर्घायुषी होवोत, महाराज दीर्घायुषी होवोत ' या ध्वनीनें सर्व वातावरण दुमदुमून गेलें. इकडे तानू मुठींच्या मुठी रुप्याचीं नाणीं फेकून त्यांची खैरात करीत होता व गरीब लोक कोणी अधांत्रीं तर कोणी जमिनीवरून तो पैसा उचलण्यांत गुंतले होते !

अभिषेकोत्सवाच्या सन्मानार्थ रस्त्यांतून जागजागीं कमानी उभारल्या होत्या. दिल्ली दरवाजे तयार केले होते व सर्व घरें शृंगारलेलीं होतीं. राजघराण्यांतील माणसांच्या मोठमोठ्या तसबिरी शहरांतील मुख्यमुख्य भागीं टांगल्या होत्या. ज्याला आज राज्याभिषेक व्हावयाचा होता त्याच्याहि सुबक तसबिरी ठिकठिकाणीं दिसत होत्या. तसबिरीशीं आपलें हुबेहुब सादृश्य पाहून आपण आपल्या उच्च पदवीवर कायमचे अधिष्ठित झालों अशी भावना त्याच्या मनांत उत्पन्न होऊन त्याच्या चेहऱ्यावर खरोखर राजतेज झळकूं लागलें ! तसबिरींतील व तानूच्या चेहऱ्यांतील सादृश्य पाहून लोकांहि आनंदानें टाळ्या वाजवूं लागले. त्या टाळ्यांच्या गजरानें व लोकांच्या गडबडीनें मिरवणुकीबरोबर चाललेल्या सुस्वर वाद्याचा ध्वनीहि तानूस ऐकूं येईनासा झाला. एरव्हीं ज्या गोंगाटानें त्याचें कदाचित् डोकेंहि उठलें असतें तोच त्याच्या अंतरात्म्यास आज अत्यंत आल्हादप्रद असा वाटला ! रस्त्यांत ज्या भागांतून तानूचा घोडा जावयाचा तेथें मखमलीचे रुजामे पसरले होते. रस्त्याच्या दुतर्फा भरगच्चीचे पडदे लावले होते. शहरांतील सर्व रस्ते याप्रमाणें लक्ष्मीच्या विलासानें शोभायमान दिसत होते. गेल्या शेंपन्नास वर्षांत कांतिपूर शहराची कांति इतकी उज्ज्वल व दैदीप्यमान पूर्वी कधींहि दृग्गोचर झाली नाहीं असें या दिवसाचें, इतिहासांत मोठें हृदयंगमवर्णन दिलेलें आहे.

तानूचें मन आनंदातिरेकानें ठिकाणावर नव्हतें ह्मटलें तरी चालेल. खैरात करण्यासाठीं तो आपला हात वर करतो आहे इतक्यांत त्याची दृष्टि एका फिक्कट व कृश झालेल्या मध्यमवयी स्त्रीकडे गेली. त्याबरोबर त्याचा चेहरा निस्तेज होऊन गेला ! कारण ती स्त्री दुसरी कोणी नसून त्याची जन्मदात्रीच होय ! तिचा चेहरा दृष्टीं पडतांच त्यानें आपला हात डोळ्यापुढें धरला. ही त्याची लहानपणापासून लवक होती. कांहीं भिण्यासारखी गोष्ट घडली ह्मणजे तो नेहमीं असेंच करीत असे. त्याच्या आईनें तेव्हांच ताडलें कीं हा आपलाच मुलगा होय ! तिनें गर्दी एकीकडे सारून मोठ्या मिनतवारीनें आपला रस्ता काढला व अगदीं थोड्या वेळांत ती तानूजवळ येऊन दाखल झाली. ती त्याचा पाय धरून तो प्रेमानें गद-गद हलवूं लागली. आपली प्रफुल्लित मुद्रा वर करून ती ह्मणाली—' माझ्या लाडक्या, '—इतक्यांत राजाच्या रक्षकांपैकीं एक तेथें आला व त्यानें तिला गचांडी मारून घालवून दिलें ! ' बाई, तुला मी ओळखत नाहीं ' असे शब्द तानूच्या तोंडावाटें बाहेर पडतांच त्या स्त्रीचें हृदय फुटून गेलें ! तिनें पुन्हां एकदां आपल्या मुलाकडे वळून पाहिलें. तिची केविलवाणी मुद्रा पाहून तानूची मुद्राहि निमिषार्धांत पार पालटून गेली. त्याचा चेहरा खाडकन् उतरला. आतांपर्यंत त्यास वाटत असलेला अभिमान अस्तास गेला. त्याचें राजतेज मावळलें. त्याचें सर्व वैभव लयास गेलें.

मिरवणूक पुढें चालूंच होती. तिची शोभा उत्तरोत्तर अधिकच वर्धमान होत चालली. परंतु, तानूच्या उल्हासास मात्र भयंकर ओहोटी लागली ! त्याला डोळ्यानें कांहीं दिसेना व कानानें ऐकूं येईना ! राजवैभवाचें सर्व स्वारस्य हरपून गेलें ! तेथील सर्व थाटमाट त्यास विषतुल्य वाटूं लागला ! अनुतापानें त्याचें हृदय करपून गेलें ! ईश्वर या बंदीवासांतून माझी लवकर मुक्तता करील तर फार चांगलें होईल. वैभवाच्या भरीं पडून आपण आपल्या जन्मदात्रीस दगा दिला, या विचारानें त्यास मरणप्राय दुःख होऊं लागलें. ज्या राजवैभवानें त्यास इतकें बेईमान केलें त्याचा त्यास मनापासून वीट आला. नसती राजपदवी प्राप्त झाल्यानंतर प्रथम प्रथम तो जशी भाषा वापरीत असे तशींच अजाणत तो आतांहि वापरूं लागला. शहरांतील नागमोडीच्या रस्त्यानें ती मिरवणूक

सर्पासारख्या कुटिल गतीनें चालली होती. आतांपर्यंतची सर्व स्थिती विपरीत झाली. आपण स्वर्गसुख अनुभवित आहों, आपण सामान्य मनुष्यकोटींतले नसून त्यापेक्षां श्रेष्ठ योनींतले आहोंत असें त्यास आतांपर्यंत वाटत होतें. गगनाच्या आकारास ज्याप्रमाणें उपमा नाहीं, समुद्राचें गांभीर्य दर्शविण्यास दुसरी वस्तू उपलब्ध नाहीं, त्याचप्रमाणें आपल्या नीचपणासहि दुसरी कोठें तोड सांपडणार नाहीं अशी त्याच्या मनाची दृढ भावना झाली. आतांपर्यंत तानू ज्या दिशेस पाही त्या बाजूचे लोक अदबीनें माना खालीं घालीत असत. परंतु आतां लोक तानूकडे आतुरतेनें पहात व तो लाजेनें खालीं मान घाली असा उलट क्रम सुरू झाला ! ' राजा चिरायु होवो, राजा चिरायु होवो ' अशा आरोळ्या मेघाच्या गडगडाटाप्रमाणें सर्व दिग्मंडळ व्यापून टाकूं लागल्या होत्या. तरी त्यापासून समाधान झाल्याचें राजाच्या म्लानमुखावर लवमात्रहि तेज दिसेना ? सर्वप्रकारचे जयशब्द त्याच्या बधिर कर्णेंद्रियास मुळींच ऐकूं येईनासे झाले त्याच्या हृदयांत दुसरीच एक मोठी आरोळी एकसारखी चालू होती. तिचें शल्य त्याच्या हृदयास आंतून एकसारखें टोंचीत होतें. ' बाई, मी तुला ओळखत नाहीं ' हेच ते शब्द होत ! एखाद्या जिवलग स्नेह्याच्या मृत्यूची वार्ता ऐकून दुसऱ्यास मृतस्नेह्याशीं गुप्तपणानें दगलबाजी केल्याचें स्मरण व्हावें व त्याच्या अंतस्तपानें त्याचें हृदय होरपळून जावें अशीच तानूची स्थिती झाली !

रस्त्यांत नवीन नवीन शोभा दिसूं लागली, नवीन नवीन चमत्कारिक वस्तू दृष्टोत्पत्तीस येऊं लागल्या, मोठमोठाले चमत्कृतिपर देखावे आविष्कृत होऊं लागले, सुस्वर गायनवादनाचे मंजुळ ध्वनी पूर्वीपेक्षांहि अधिक माधुर्यानें वाद्यांतून बाहेर पडूं लागले; परंतु राजास हें सर्व असून नसल्यासारखें झालें. त्याच्या निर्विण्णहृदयांत त्यास दोष लावणारा ध्वनि एकसारखा गोंगाट करीत होता. त्या गोंगाटापुढें त्यास दुसरा कशाचाही आवाज ऐकूं येईना.

तानूच्या या विपरीत स्थितीचें प्रतिबिंब जनतेवरहि पडूं लागलें. राजाच्या चित्तवृत्तींत कांहीं तरी अनवस्था झाली आहे ही गोष्ट कांहीं कालानें त्यांच्याहि ध्यानांत आली. राजाबद्दल सर्वांना धास्ती वाटूं लागून जनसमूहाचें आनंदप्रदर्शन बरेंच क्षीण होत चाललें. सरदार हरिताक्ष यांच्याही ही गोष्ट तात्काळ नज-

रस आली. अशी स्थिती होण्याचें खरें कारण समजण्यासहि त्यांच्या कुशाग्रबुद्धीस विशेष अवधि लागली नाहीं. त्यांनीं आपला घोडा तात्काळ राजाजवळ नेला व ते खालीं वाकून राजास ऐकू येईल एवढयाच मोठ्या स्वरांत ह्मणाले-' महाराज, भलते विचार मनांत आणून उदास होण्याची ही वेळ नव्हे. आपली मुद्रा खिन्न झाली असून आपण तोंड खालीं घालीत आहां ही गोष्ट लोकांच्या नजरेस येत आहे. असल्या मंगल प्रसंगीं हा अपशकुन आहे असें ते समजतात. विचार करा, उद्वेगमेघांनीं व्याप्त झालेला आपला राजवैभवरवि लोकांच्या निदर्शनास आणा, त्याची प्रभा सर्व जनतेवर फाकूं द्या व लोकांच्या मनोवृत्तींवर अंधःकाराचें आवरण पडलेलें आहे त्याचा निरास करा. एकदां स्मित करून वर पहा, कीं पुन्हां पूर्वीप्रमाणेंच सर्व व्यवस्थित होईल. '

असें ह्मणून सरदारानीं राजाच्या डाव्या उजव्या बाजूस कांहीं नाणीं फेंकलीं व ते आपल्या जाग्यावर जाऊन उभे राहिले. इकडे राजानें मामांनीं तालिम दिल्याप्रमाणें सस्मित वर पाहिलें. पण ज्या क्रियेस अंतःकरणाचें साहचर्य नाहीं त्या क्रियेनें लोकांवर परिणाम तरी कसा व्हावा ? तरीपण त्याच्यापासून बऱ्याच अंतरावर असणाऱ्या लोकांना राजा पुन्हां खरोखरच खुषींत आला असें वाटलें. त्यांतून लोकांना शिताफीनें मुजरे करणें, व एकंदर चालचर्येंत सहज रीतीनें फरक करणें, हें तानूस रोज रोज मिळणाऱ्या तालमीनें अगदीं सुसाध्य होऊन गेलें होतें. तेव्हां याहि प्रसंगीं भोळ्याभाबडया लोकांस त्यास सहज चकवितां आलें यांत कांहीं आश्चर्य नाहीं. असो. लोकांची धास्ती तूर्तातूर्त तरी नाहींशी झाली. मिरवणुकीची जुजबी पुन्हां पूर्ववत् लागली, व लोकांच्या जयशब्दांच्या आरोळ्या पुन्हां द्विगुणित उत्साहानें गगनमंडळ भेदूं लागल्या.

थोडया वेळानें सरदार हरिताक्ष पुन्हां राजाजवळ जाऊन ह्मणाले-'महाराज, ही विगलित वृत्ति टाकून द्या. आज सर्व राष्ट्राचे डोळे आपणाकडे लागून राहिले आहेत. ' पुन्हां ते किंचित् त्रासून ह्मणाले— ' ती 'भिकारडी' मध्ये आली कशाला कोणाला ठाऊक ! तिनें हें सगळें बस्तान बिघडाविलें. '

राजानें आपली निस्तेज दृष्टि सरदाराकडे करून आपली शेवटची

इच्छा खोल स्वरानें सांगणाऱ्या आसन्नमरण मनुष्याप्रमाणें मामास म्हटलें ' ती माझी आई होती. '

' काय ! पुन्हां पूर्वपदावर आलें ! मघाशीं मी म्हटलें कीं अपशकून झाला. अखेर तेंच खरें ठरलें. यांच्या बुद्धीला पुन्हां भ्रम झाला ! '

प्रकरण ३२ वें.

राज्याभिषेक

ज्या दिवशीं राज्याभिषेक व्हावयाचा त्या दिवशीं पहाटे चार वाजतां राजवाड्याच्या गच्चीवर आपण बसलों आहों अशी कल्पना करूं. इतक्या पहाटेसुद्धां तेथें आपल्या कोणी सोबतीला नाहीं अशी आपली स्थिति होणार नाहीं. कारण राज्याभिषेकास अद्याप दोन तीन प्रहर अवकाश होता. तरी राजवाड्यांतील अधिकाऱ्यांचें आतेष्ट व त्यांच्या वशिल्याचीं इतर माणसें हीं तेथें त्यावेळेपासूनच जागा धरून ठेवण्यांत गुंतली होती. राज्याभिषेकासारखे प्रसंग वरचेवर येत नसतात, जन्मांतून एकदां, फार झालें तर दोनदां अशी संधि सांपडावयाची ! एक दिवस थोडा त्रास झाला, आठ दहा तास तिष्ठत बसावें लागलें म्हणून काय झालें या विचारानें दिवस उजाडण्यापूर्वी साधारण माणसाला माणूसही दिसत नव्हतें, अशा वेळेसच तेथें लोकांची रहदारी चालू झाली. कोणीकडून तरी वशिला लावून किंवा कशीबशी तरी ओळख काढून लोक एकसारखे सज्जावरून बसूं लागले.

या लोकांना वेळ मोठा कंटाळवाणा जाऊं लागला. आतांपर्यंत माणसांची तरी हालचाल होती, कोणी ' माझी जागा तूं धरलीस कां ! ' म्हणून भांडत आहे. तर कोणी धटिंगण तेथें बसलेल्या माणसास दूर सारून मध्येंच जबरदस्तीनें बसत आहेत. भोंवतालचीं माणसें त्यास दुरूनच न्यायाच्या गोष्टी सांगत आहेत. कोणी तिऱ्हाईतपणाचा आव घालून भांडण तोडण्याकरितां पुढें येत आहेत व सर्वांच्या डोळ्यांत धूळ टाकून याच मिषानें तेथें स्वतःस जागा मिळविण्याचें बस्तान बसवीत आहे. कोणी पुष्कळ वेळ मार्गप्रतीक्षा

केल्यानंतर आलेल्या आपल्या स्नेह्यास अधीरतेनें बोलावीत आहेत; कोणी जागा गेली ह्मणून ' आतां बसा रडत, आधीं यायला काय झालें होतें ? ' अशारीतीनें आपल्या परिचितांची खरडपट्टी काढीत आहेत, अशाप्रकारें तेथें बराच वेळपर्यंत एकसारखी गडबड चालली होती. परंतु आतां तीहि स्थिरावली. कारण आतां सर्व सज्जे व गच्या माणसांनीं गच्च भरून गेल्या. मुंगी शिरकण्यास देखील जागा राहिली नाहीं. त्या बाजूस कोणी फिरकेनासें झालें व कोणी कोणाला बोलावीनासें झालें. जो तो कपाळाला हात लावून निमुटपणें परत जाऊं लागला. राजवाड्याच्या उत्तर भागाचा सज्जा मात्र अद्याप रिकामा होता. कारण तेथें राजवाड्यांतील सनदी नोकर बसावयाचे होते. त्यांच्यासाठींच ही जागा मुद्दाम राखून ठेविली होती. ज्या दिवाणखान्यांत सिंहासन होतें तेथें किनखाबी गालिचे पसरलेले होते. सिंहासनाकरतां दिवाणखान्याच्या मध्यभागीं मोठाथोरला चौरंग ठेवला होता. त्या चौरंगावर चढून जाण्याकरतां चार पायऱ्यांची सोपान परंपरा केली होती. सिंहासनाची बैठकस्फटिकाची केलेली होती. ती फार प्राचीन असून तिच्यावर शेंकडों राजांना अभिषेक झाला होता, यामुळेंच लोक त्या बैठकीस अत्यंत पवित्र मानीत !

यावेळेस सगळीकडे अगदीं सामसूम झालें. मशालीहि अगदीं जायच्या बेतांत आल्या होत्या. हा मधला वेळ लवकर कसा जातो असें लोकांना होऊन गेलें होतें. शेवटीं सूर्योदय झाला. सूर्य आपल्या वेळेवरच उगवला परंतु लोकांना वाटलें कीं आपणाला त्रास देण्याकरितां यानें आज जाणून बुजून उशीर केला ! कित्येकांनीं त्यास शिव्याशाप देण्यासहि सोडलें नाहीं ! मशाली मालविण्यांत आल्या व बालरवीचीं नूतन किरणें राजवाड्यांत विलसूं लागलीं. इतक्यांत लोकांच्या क्षणैक झालेल्या आनंदावर औदासिन्याची छाया पसरण्याकरितांच कीं काय, सूर्य ढगांनीं व्याप्त झाला !

सात वाजतां वेळ जो अगदीं कंटाळवाणा चालला होता त्यांत थोडासा बदल झाला. कारण त्यावेळेस कित्येक सरदारांच्या बायकांनीं राजवाड्यांत प्रवेश केला. कामदारांनीं त्यांच्या बसावयाच्या जागा त्यांना दाखविल्या. सरदारणींच्या तैनातींत असलेल्या दासदासींस उभे राहण्यास त्यांचे सन्निधच जागा राखून ठेवली होती. ते पाहून एक दिवसपर्यंत आपणासहि एखाद्या सरदारणीच्या कब्याजम्यांत नोकरी मिळाल्यास निदान समारंभ तरी मोकळ्या

मनानें पहावयास सांपडेल अशीही कित्येकांच्या मनांत इच्छा उत्पन्न झाली. सरदारांच्या बायकांचे दालनहि थोडक्याच वेळांत भरत आलें. त्यांची व्यवस्था करण्यांत झगझगीत पोषाख केलेले कित्येक अधिकारी गर्क होऊन गेले होते. आतां तेथील देखावा फारच प्रेक्षणीय दिसूं लागला होता. जिकडे तिकडे चित्रविचित्र रंगांचे पोषाख व हिऱ्या मोत्यांचे दागदागिने यांचा प्रकाश फांकून गेला होता. सर्व स्त्रियांना जागच्या जागीं बसविणें झाल्यानंतर अधिकाऱ्यांचें इकडून तिकडून जाणें येणें बंद झालें व पुन्हां सर्वत्र सामसूम होऊन गेली. स्त्रीसमूहांत युवति, मध्यमवयाच्या व वृद्ध स्त्रिया होत्या. सरदारांच्या स्त्रियांची लहान लहान मुलेंहि त्यांच्या बरोबर होतीं. राष्ट्राच्या इतिहासांत आज केवढी घडामोड व्हावयाची होती यांची त्यांना कल्पनाहि नव्हती. येथे आज कांहींतरी अपूर्व समारंभ आहे, घरच्यासारखी येथे गडबड वगैरे कांहीं करतां कामा नये येवढें मात्र उपजत अंगस्वभावानें त्यांना ज्ञान झालें होतें. आणि तीं चित्रासारखीं तटस्थ बसलीं होतीं.

स्त्रियांच्या दागदागिन्यांत हिरेमाणकांची एकच गर्दी उडून गेली होती. नऊ वाजण्याच्या सुमारास मेघांचा निरास होऊन सूर्यनारायणाचीं किरणें राजवाड्यांत चोहोंकडे शोभायमान दिसूं लागलीं. सरदारांच्या स्त्रियांच्या अंगावरील हिऱ्यांच्या तेजाची वार्ता त्यांस लागतांच त्यांच्या तेजास फिक्कें पाडण्याकरितांच भगवान सहस्ररश्मि मेघावरणांतून बाहेर आला असें वाटलें. सूर्यप्रकाशाचें हिऱ्यांवर परावर्तन होऊन त्यांतून ज्वालाच निघूं लागल्या आहेत कीं काय असा भास होऊं लागला! तो नयन मनोहर देखावा पाहून प्रेक्षकांचीं मनें अत्यंत तल्लीन होऊन गेलीं. इतक्यांत परदेशच्या वकिलांचा समूह आपल्या लव्याजम्यानिशीं आपल्या नियुक्तस्थानीं येऊन दाखल झाला. तो दिवसच असा होता कीं त्यादिवशीं प्रत्येकास आपल्या वैभवाचें परमावधीचें प्रदर्शन करणें अगत्य वाटलें. आपल्या दौलतींत जी कांहीं निवडक व अमूल्य चीज होती ती अंगावर घालण्यास कोणीं यत्किंचितहि कसूर केली नाहीं. अभिषेकोत्सवासारख्या मंगल व शतकांतून फार तर चार दोन वेळां येणाऱ्या समारंभास हजर राहणाऱ्या स्त्रीपुरुषांनीं आपापल्या अभिरुचीप्रमाणें आपल्या थाटमाटांत यत्किंचितहि वैगुण्य राहूं दिलें नाहीं. परदेशच्या वकिलांच्या अंगावर इतरांपेक्षाहि अधिक

अलंकार होते. कारण त्यांच्या इतमामावरून त्यांच्या धन्यांच्या दौलतीची परीक्षा होणार होती ! त्यांनीं आपल्या देहांवर हिरे, माणीक, मोत्यें वगैरेंची इतकी गर्दी करून दिली होती कीं, त्याचे देह सर्व तेजोमय बनून गेले होते ! ते पहात असतां कोणी तेजोमय दिव्य देहधारी पुरुषच आहे असें वाटे !

याप्रमाणें आणखी सुमारें प्रहर लोटला. प्रहरानें तोफांची एकसारखी सरबत्ती होऊं लागली. तेव्हां आजच्या समारंभाचे अधिष्ठान दैवत आपल्या आगमनानें समारंभास शोभा आणणार हें सर्व लोकांना तेव्हांच समजलें. इतका वेळ तिष्ठत बसल्याचें चीज होण्याची आतां वेळ आली असें वाटून सर्वांच्या चेहऱ्यांवर आनंदाचीं चिन्हें स्पष्टपणें व्यक्त होऊं लागलीं. राजास अभिषेकाचा पोषाखच घालण्याची काय ती बाकी होती. राजा येण्यापूर्वी मोठमोठाले सरदार व मुत्सद्दी आपापल्या जागीं जाऊन बसले. सर्वजण सरदारांकडे डोकावून पाहूं लागले. सरदारांची तोंडओळख असलेलीं माणसें इतर अपरिचित लोकांना त्यांचीं नांवें हळूच सांगूं लागले. अडाणी लोक सरदारांकडे बोटें दाखवून ' हेच का ते अमुक ' म्हणूं लागले. तेव्हां श्रीमंतांच्या येथील चालरीत माहीत असलेले लोक त्यांना ' अशीं बोटें दाखवूं नयेत ' असें शिकवूं लागले. पांचपाचशें सहासहाशें किंबहुना एक सहस्र वर्षें ज्या घराण्यांचीं नांवें इतिहासप्रसिद्ध होतीं, त्यातील अशीं मोठमोठालीं धेंडें आपापल्या जागीं जाऊन दाखल झाल्यावर आतां फक्त खुद्द महाराजच येण्याचें राहिलें. असें सर्वांना वाटून सर्वजण अगदीं निश्चल मुद्रेनें व स्तंभित मनोवृत्तीनें महाराज येणार होते त्या दिशेकडे एकसारखें टक लावून पाहूं लागले. इतक्यांत मामासाहेब, त्यांच्या दिमतीतील अधिकारी, व महाराजाचे खास नोकर तेथें आले. आतां मात्र महाराज खास येणार याबद्दल कोणाच्याही मनांत संशय उरला नाहीं. भालदारचोपदारांनीं पुकारल्याबरोबर उत्तम तऱ्हेचा पोषाख केलेला व रत्नखचित अलंकार अंगावर घातलेला तानू कामाठी प्रवेश द्वारातून उच्चासनावर आरूढ झाला. सर्व लोकांनीं त्याला उत्थापन दिलें, व मोठमोठाले सरदार, दरकदार, मानकरी सिंहासनाजवळ जाऊन महाराजास लवून मुजरा करूं लागले. राज्याभिषेकाचे पूर्व संस्कार सुरू झाले. त्यांची जसजशी पूर्तता होऊं लागली

तसतसा तानूचा चेहरा निस्तेज होऊं लागला. त्याच्या मुद्रेवर, आदासिन्य, निराशा व उद्वेग यांची दाट छाया पडलेली दिसली ! आतां अगदीं शेवटचा विधी राहिला. मुख्य पुरोहित हातांत राजमुकुट घेऊन त्याच्याजवळ गेले. त्यांनीं तो मुकुट त्याच्या मस्तकावर धरला; सर्व लोक स्तब्ध राहिले. मुकुट मस्तकावर ठेवण्यांत येऊन राज्यारोहणाचा संस्कार पूर्णतेस जाणार, इतक्यांत विद्युद्वेगानें एक मुलगा दरबारच्या मध्यभागीं येऊन अकस्मात् उभा राहिला ! राज्यारोहण समारंभ पाहण्यांत जो तो गर्क झाला असल्याकारणानें तो मुलगा तहत सिंहासनाजवळ पोहोंचेतोंपर्यंत त्याकडे कोणाचेंहि लक्ष गेलें नाहीं. त्या मुलाच्या डोक्याला कांहीं नव्हतें; पायांत जोडा नव्हता, अंगावर भिकार वस्त्रें होतीं. असल्या मंगल प्रसंगीं हा कंगाल मुलगा येथें कशाला आला, याला येथें प्रवेश कसा मिळाला, असें जो तो आपल्या मनांत आश्चर्य करीत आहे; इतक्यांत नवीन आलेला मुलगा हातवर करून ह्मणाला, ‘ खबरदार तो मुकुट त्याच्या मस्तकावर ठेवाल तर. तो उपऱ्या राजवाड्यांत शिरला आहे. या राज्याचा खरा वारसदार मी आहें ! ’

हे त्याच्या तोंडचे शब्द ऐकतांच कित्येक लोक त्याच्या अंगावर धांवत गेले व त्याला हातकड्या घालून ते त्याची रवानगी करणार इतक्यांत तानू आपल्या अभिषेकनेपथ्यासह चटकन् पुढें येऊन खणखणीत आवाजांत ओरडून ह्मणाला— ‘ त्याच्या अंगावर हात टाकूं नका. त्याला मोकळे सोडा, तोच खरा राजा आहे ! ’

हा प्रकार पाहून दरबारांतील सर्व लोकांना अत्यंत आश्चर्य वाटलें. कांहीं जण तर आश्चर्यचकित होऊन स्थानभ्रष्ट झाले ! आपण हें काय पहात आहोंत, आपण स्वप्नांत आहों, कीं झोपेंत आहों, कीं शुद्धीवर आहों याबद्दल देखील त्यांचा त्यांना भरंवसा पटेना ! सर्वजण एकमेकांकडे व त्या नवीन आलेल्या मुलाकडे पाहूं लागले. सरदार हरिताक्षांनाहि इतरांप्रमाणेंच अचंबा वाटला परंतु, त्यांनीं आपल्या चेहऱ्यावर तशा प्रकारचा कांहींहि आविर्भाव न दाखवितां ते मोठ्यानें ह्मणाले—‘ महाराजांच्या बोलण्याकडे लक्ष देऊं नका. त्यांच्या बुद्धिभ्रंशानें पुन्हां उलट खाल्ली असें दिसतें. या उनाड मुलास पकडा, पहातां काय ? ’

त्यांची ही आज्ञा लोकांनीं मान्य केली असती; परंतु सोंग घेतलेले राजे

पाय आपटून ह्मणाले---' त्याच्या अंगावर हात टाकाल तर तुमची कांहीं धडगत लागणार नाहीं. कारण तोच खरा राजा आहे. ' हें ऐकतांच सर्व माणसें एकदम मागें सरकलीं ! त्या सर्व रंगभूमीवर भुताटकीचा अंमल बसल्यासारखा झाला ! कोणीहि हलेना, किंवा कोणीहि बोलेना ! या आणीबाणीच्या प्रसंगीं काय बोलावें आणि काय करावें हें कोणासच सुचेना ! सर्व माणसें अशा रीतीनें गोंधळांत पडलीं ! तरी हा नवीन आलेला मुलगा निर्भय रीतीनें व मोठ्या दिमाखानें पुढेंच चालला होता ! एकदां तो जो दरबारांत शिरला, तो मध्यंतरीं मुळींच थांबला नाहीं. आतां पुढें काय करावें ? या विचारांत मंत्रिमंडळ निमग्न झालें, तों हा मुलगा उच्चासनावरहि चढून गेला ! आमचे बनावट राजे मोठ्या उल्हसित वृत्तीनें त्यास भेटावयास गेले, व त्यास साष्टांगप्रणिपात करून ह्मणाले ' महाराज, मी गरीब तानू कामाठी आपली राजनिष्ठ रयत आहे. कांहीं वेळ आपलें पद आपणास पारखें झालें होतें. त्यावर पुन्हां आपण अधिष्ठित आणि सिंहासनास शोभायमान करा. '

सरदार हरिताक्ष या नवीन आलेल्या मुलाकडे संक्रुद्ध मुद्रेनें पाहूं लागले. मुलाचें समग्र स्वरूप दृष्टीं पडल्यानंतर मात्र त्यांच्या मुद्रेंतला कडकपणा एकदम नाहींसा झाला. हीच तऱ्हा सर्व अधिकाऱ्यांची झाली. ते सर्वजण एकमेकांकडे आश्चर्ययुक्त मुद्रेनें पाहूं लागले व स्वभावतःच एकेक पाऊल मागें सरकूं लागले. ' किती विलक्षण सादृश्य हें ! ' असेंच जो तो आपल्या मनाशीं ह्मणूं लागला. क्षण दोन क्षण विचार करून सरदार हरिताक्ष ह्मणाले— ' आपल्या मर्जीनुरूप मला आपणांस एकदोन प्रश्न करावयाचे आहेत. त्यांचीं

' मी उत्तरें देईन. '

यावर मामांनीं दरबारासंबंधानें, माजी महाराजासंबंधानें, राजकुमारासंबंधानें, व राजकन्यांसंबंधानें त्या मुलास अनेक प्रश्न विचारले. मुलानेंहि त्यांचीं बिनधोक बिनचूक उत्तरें दिलीं. त्यानें राजवाड्यांतील सर्व खाणाखुणा अगदीं बरोबर सांगितल्या. माजी महाराज कोठें निजत होते, राजकुमाराचा निजावयाचा दिवाणखाना कोणता हेंहि त्यानें बरोबर सांगितलें. त्याचीं ही उत्तरें ऐकतांच सर्व लोक

थक्क होऊन गेले. हें गूढ काय आहे याच्या बद्दल कोणासहि उलगडा पडेना. आतां आपली येथून सुटका होणार ह्मणून तानूस फार आशा वाटूं लागली. इतक्यांत सरदार हरिताक्ष ह्मणाले—' यांनीं इतक्या खाणाखुणा सांगाव्यांत हें आश्चर्यकारक तर खरेंच. परंतु यांत कांहीं मला मोठें आश्चर्य वाटत नाहीं. कारण आमचे महाराजहि या गोष्टी सांगूं शकतील ' ! आपणांस उद्देशून " महाराज " या शब्दाचा पुन्हां उपयोग केलेला पाहून तानूची पुन्हां निराशा झाली. त्याला वाटलें कीं, आपली येथून मुक्तता होण्याचा चांगला बेत आला होता. पण आतां सर्व बस्तान पुन्हां बिघडायला करतें आहे.

' हा कांहीं पुरावा नाहीं ' असें सरदार हरिताक्ष ह्मणाले.

याप्रमाणें साशंक स्थितींत कांहीं वेळ लोटला. न्यायाधीश खटल्याचा निकाल सांगावयाच्या बेतांत आले ह्मणजे आरोपीची जी स्थिती होते तीच तानूची यावेळेस झाली. आरोपीस आपण निर्दोषी ठरावें अशी अपेक्षा असते परंतु, तानूची स्थिती त्याच्या उलट होती. आपण बनावट राजे आहों हें पुराव्यानिशीं सिद्ध होऊन राज्यपदाच्या भानगडींतून आपण मोकळें कसें होतों असें त्यास होऊन गेलें होतें. सरदार हरिताक्ष बराच वेळ आपल्याशींच विचार करीत बसले होते. शेवटीं मानेस हिसका देऊन ते स्वगत ह्मणाले—' आपणच असें गोंधळांत पडणें हें सर्वांस व राज्यासहि धोक्याचें आहे. यामुळें राष्ट्रांत दोन तट माजून सर्वच बेबंदशाई होऊन जाईल. तेव्हां आपणच आतां मनाचा निर्धार केला पाहिजे. ' असें ह्मणून ते मोठ्यानें ह्मणाले ' कायरे पहातां काय ! याला पकडून कैद करा—पण थाबा.

त्यांच्या चेहऱ्यावर जराशी उल्हासाची झुळूक दिसूं लागली. सिंहासनाकरितां हा जो उमेदवार उपस्थित झाला होता, त्याचेपुढें उभे राहून ते ह्मणाले—" राजाचें शिक्केमोरतब कोठें आहे ? याचें उत्तर बरोबर द्या कीं, सर्व कोडें उलगडलें. याचें उत्तर जो बरोबर देईल तोच राज्याचा खरा वारसदार होईल. मग माझ्या मनांत बिलकूल संदेह राहणार नाहीं. " काय चमत्कार आहे पहा ! सिंहासन व राजकुल या संबंधाचा खरेंपणाहि अगदीं क्षुल्लक गोष्टींवरून ठरवून घेण्याचा कधीं कधीं प्रसंग येतो !

हरिताक्षांना हा खरोखरच फार नामी विचार सुचला. दरबारांतील सर्व

लोकांनाहि हा विचार पसंत वाटला हें बुबळें फिरवून ते एकमेकाकडे पसंति-दर्शक मुद्रेनें पाहूं लागले यावरून उघड दिसूं लागलें. राजाचें शिक्कमोरतब आज कित्येक दिवसांपासून नाहींसें झालें आहे त्याचा कोणासहि पत्ता लागत नाहीं. हा मुलगा इतर सर्व गोष्टींची कदाचित् संधा घेऊन आला असेल. येथें मात्र त्याच्या संधेचा बिलकुल उपयोग होणार नाहीं. येथें माहितीचाच प्रश्न येतो. ज्यानें त्याला पढविलें असेल त्या त्याच्या गुरूलासुद्धां ही गोष्ट माहीत असणें अशक्य होय. मामांनीं ही फार चांगली युक्ति काढली! केवढें हें लचांड उपस्थित झालें होतें? पण या शकलीनें त्याचा आतां कायमचा निकाल लागणार! असा मनांतल्या मनांत विचार करून जो तो आपल्या मनांत खूष होऊन गेलासा दिसला. आतां हे राजश्री गोंधळून जाऊन आपली लबाडी कबूल करणार म्हणून सर्वजण अगदीं आतुरतेनें त्याच्याकडे टक लावून पाहूं लागले. परंतु या नवीन आलेल्या मुलाच्या मुद्रेवर तशाप्रकारची कांहींहि भावना न दिसतां तो सहजावृत्ति म्हणाला—' मग यांत इतकें तुम्हाला अवघड काय वाटतें? हें तर मी सहज सांगेन.' त्या मुलाची ती बोलण्याची सहज सफाई पाहून सर्वांना फारच कौतुक वाटलें! दरबारांत मोठमोठ्या मुत्सद्यांशीं बोलणें ही गोष्ट आपल्या जन्माभ्यासाची आहे अशा स्वाभाविक वृत्तीनें तो म्हणाला—सरदार हेमकंठ, राजवाड्यांत माझ्या बसावयाच्या खोलींत जा. तुम्हीच जा. कारण, तुमच्याशिवाय त्या जागेच्या खाणाखुणा कोणालाच माहीत नाहींत. तेथें डाव्या हातच्या कोपऱ्याशीं दार आहे. त्या दाराच्या पाठीमागें भिंतीबरोबर एक फडताळ आहे. त्या फडताळाचें कळसूत्र एक मला किंवा माझ्या सांगण्यावरून ज्यानें तें तयार केलें त्या सुताराला एवढ्या दोघांनाच माहिती आहे. त्या फडताळाची खीळ दाबून तें उघडा. तें उघडतांच तुम्हाला तेथें शिक्कमोरतब दिसेल. तें घेऊन इकडे या." हेमकंठासारख्या सरदारास एखाद्या सामान्य नोकराप्रमाणें लेखून अधिकारयुक्त मुद्रेनें त्यानें त्यांना हुकूम केला. यावरून हाच खरा राजा असला पाहिजे अशी सर्वांची अधिकाधिक खात्री होऊन गेली! सर्व सरदारांस वगळून त्यानें हेमकंठासच नेमकी हाक मारून कोणत्याहि तऱ्हेचा किंतु मनांत न बाळगतां त्यास तेथून राजवाड्यांत जावयास सांगितलें यावरून हेमकंठाच्या

व त्याचा जन्माचा परिचय असावा याबद्दल सर्वांच्या चित्तांत एकदम प्रकाश पडला. बरें, इकडे हेमकंठासहि त्यामुळें आपला उपमर्द झाला असें न वाटून ते त्या मुलाच्या आज्ञेप्रमाणें तेथून तावडतोब राजवाडयाकडे चालूं लागले! आपण हें काय करतों, एका कंगाल मुलाच्या शब्दावरून आपल्यासारख्या मोठया सरदारानें जाग्यावरून हलणें चांगलें नाहीं असें वाटून लाजेनें ते आपल्या जाग्यावर जाऊन बसले. तानू त्यांस आवेशानें ह्मणाला—' कां अशी काचकूच कां करितां ? आतां तुह्मास साक्षात् राजाची आज्ञा झाली हें तुह्मास समजत नाहीं काय ? जा. खुद्द आपल्या राजाच्या आज्ञेची अशी पायमल्ली करूं नका. '

सरदार हेमकंठांनीं लवून मुजरा केला. हल्लीं तेथें दोन राजे होते. त्यापैकीं मुजरा कोणास करावा याबद्दल त्यांना स्वाभाविकपणेंच मोठा पेंच आला. तेव्हां त्यांनीं हा उपचार अशा शिताफीनें केला कीं तो तूर्त समाईकींतच रहावा! त्या मुजऱ्यावर कोणाचा हक्क होता याचा निकाल आतांच लागावयाचा होता. तो निकाल लवकर लागणें किंवा लांबणीवर पडणें हें आतां आपल्या त्वरेवरच अवलंबून आहे असा विचार करून सरदार हेमकंठ तेथून निघाले. मनाच्या भावनेचा खेळ कांहीं चमत्कारिक आहे. परलोकवासी महाराजांच्या औरसपुत्राचा हुकूम मानावा कीं न मानावा याबद्दल हेमकंठाचें मन साशंक झालें? कारण ज्यानें आपल्याला हुकूम केला, तो तोतया नसेल कशावरून ? या संशयपिशाचिकेनें त्याचें मन ग्रस्त करून टाकलें होतें. ज्याला ते खरा-खुरा राजा समजत होते, परंतु जो खरोखर तोतया होता, त्यानें नवीन आलेल्या मुलाच्या आज्ञेस पुष्टीकरण दिल्यानंतरच त्या आज्ञेस एकप्रकारचा अधिकार आला ! उपाधि भेदामुळें राजाचा रंक आणि रंकाचा राव कसा होतो याचें प्रत्यंतर त्या वेळेस उत्तम दिसून आलें ! ' सर्व मन एव ' हा सिद्धांत त्या वेळेस उत्कृष्ट निदर्शनास आला. असो. अखेर तानूची अधिकार-युक्त आज्ञा शिरसावंद्य मानून सरदार हेमकंठ राजवाड्यांत जावयास दरबा-रच्या बाहेर पडले.

यावेळेस तेथील सर्व जनसमूहांत एकप्रकारची नवीनच हालचाल सुरू झाली. वरवर पहाणारास ती दिसण्यासारखी नव्हती. तरीपण तिचा क्रम एकसारखा चालूं होता. आतांपर्यंत मोठमोठ्या सरदारांचा जमाव तानूच्या

भोवतीच-जमला होता. परंतु सूर्योदय झाल्यानंतर चंद्रमा जसा तेजोहीन दिसूं लागतो त्याचप्रमाणें आतां तानूची स्थिती झाली. त्याच्या भाग्योदयाच्या समाप्तीची वेळ अगदीं सन्निध येऊन ठेपली. एकप्रकारची अदृश्य विद्युच्छक्ति लोकांना तानूच्या सान्निध्यापासून नवीन आलेल्या मुलाकडे जोरानें ओढूं लागली ! या शक्तीचा पगडा बहुधा सर्वांवर बसला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आपत्प्रसंगीं आप्तेष्ट आपला काढता पाय घेतात, त्याचप्रमाणें ज्याला सर्व लोक आतांपर्यंत 'महाराज, महाराज' ह्मणून संबोधित होते त्यांनाच आतां त्याच्याजवळ उभे राहण्याचा सुद्धां वीट येऊन गेला! थोडक्याच वेळांत तानूस तेथें एकटेंच उभे रहावें लागले. आतांपर्यंत कांहीं लोक त्याच्याजवळ उभे होते, त्यांचा नवीन मुलाजवळ जाण्यास धीर होईना, ह्मणूनच ते उभे होते. शेवटीं बरेच लोक तेथून आतां निघून गेले. कदाचित् येथून हलण्यांत आपला प्रमादच झाला तर त्यांत मोठेमोठे लोक आपले सहकारी आहेत असा पोक्त विचार करून तेहि त्याला सोडून गेले. सर्व जगांत आपल्याला आतां कोणी स्नेही उरलें नाहीं, 'इदंचनास्ति परंच न लभ्यते' बरापरीं घर गेलें, व राज्य ज्याचें होतें त्यास जाणार, पुन्हां आमचे आह्मीच जाग्यावर राहिलों, राज्यमदाच्या धुंदींत आपण आपल्या जन्मदात्रीसही झिडकारून टाकून कृतघ्नपणाचा कळस केला त्याचेंच हें आपणास फळ भोगावें लागत आहे ! आपल्या अंगावरील रत्नखचित अलंकार आपणास शोभा देण्याऐवजीं अधिकच शरम आणीत आहेत ! भूमी दुभंगून आपल्या उदरांत आपणास आश्रय देईल तर फार चांगलें होईल अशा विचारानें तानूचें हृदय निर्विण्ण होऊन गेलें.

सरदार हेमकंठ हे दरबारच्या दाराशीं आल्याची वर्दी आली. ही बातमी कळतांच दरबारांतील कुजबुज एकदम बंद झाली. जिकडे तिकडे अगदीं सामसूम होऊन गेल्यामुळे एकट्या हेमकंठाच्या पावलांचाच आवाज स्पष्ट ऐकूं येऊं लागला. ते दरबारांतून स्वस्थानाकडे जात असतां सर्व लोक त्यांच्याकडे आशापूर्ण दृष्टीनें पहात होते. आतां हे काय सांगतात याकडे सर्व लोकांचें चित्त लागून राहिलें. ते औरंगाजवळ जाऊन थोडावेळ तेथेंच उभे राहिले. आपण आणलेला निरोप आतां कोणास सांगावा याबद्दल त्यांच्या मनाचा निश्चय होण्यास बराच वेळ लागला. शेवटीं तानूकामाठयाच्या पुढें

उभे राहून त्यास प्रणाम करून ते ह्मणाले— ' महाराज, मोरतब त्या जागीं नाहीं. '

प्लेगानें पछाडलेल्या रोग्याजवळ एक क्षणभरहि उभे राहण्याची कोणाची सोय नसते. रोगी प्लेगचा आहे असं समजतांच जो तो आपला मार्ग काढूं लागतो; त्याचप्रमाणें सर्व लोक राज्यावर हक्क सांगावयास आलेल्या त्या धामट मुलाजवळून एकदम बाजूला झाले. एका क्षणांत त्याच्या भोंवतालची सर्व गर्दी नाहींशी झाली! लोकांच्या तिरस्कारयुक्त मुद्रेचं तो केंद्रस्थान झाला. हरिताक्ष मोठ्यानें ओरडून ह्मणाले—' त्या भिकारड्याला गचांड्या देऊन रस्त्यांत घालवून द्या. फटके मारीत त्याला सर्व शहरातून फिरवा. हरामखोर त्याच गुणाचा आहे! '

त्याच्या तोंडून हे शब्द बाहेर निघतांच लष्करी लोक त्यास धक्के देऊन बाहेर घालविण्यासाठीं पुढें सरसावले. हें पाहतांच तानू मोठ्यानें ओरडून ह्मणाला —' खबरदार त्याच्या अंगाला हात लावाल तर. '

हरिताक्षांची आतां मात्र फार तारांबळ उडाली. हें कोडें आतां सोडवावें तरी कसं? महाराज आपला आग्रह सोडीत नाहींत. या मुलाचाहि कांहीं पुरावा सांपडत नाहीं. शेवटीं ते हेमकंठाकडे वळून ह्मणाले ' आपण नीट शोधलें काय? हें वास्तविक आपल्याला विचारावयाची कांहीं जरूर नाहीं. कारण ती कांहीं लहान वस्तू नाहीं ह्मणून ती लपून राहील. हा मोठा चमत्कार ह्मणावयाचा. एखादी क्षुल्लक वस्तू आपल्या हातून हरवली तर त्याबद्दल आपल्याला फारसें वाटत नाहीं. पण महाराजांची सुवर्णमुद्रा नाहींशी व्हावी व ती कोणास दिसूं नये हें आश्चर्य नव्हे काय? '

हरिताक्षांनीं दिलेलें मोरतबाचें हें वर्णन ऐकून तानू एकदम पुढें आला, व ह्मणाला—' बस्स, आतां काम झालें. तें वर्तुळाकार आणि जाड होतें काय? त्याच्यावर कांहीं अक्षरें आणि चिन्हें खोदलीं होतीं काय? '

सरदारांनीं उत्तर दिलें ' होय. '

'हां! आतां समजलें. आज इतके दिवस ज्याच्याबद्दल इतकी ओरड चालली आहे तें तेंच काय? त्याचें हें असें वर्णन जर तुह्मी मला पूर्वीच दिलें असतें, तर तें मी तुह्मांस तेव्हांच काढून दिलें असतें. तें आतां कोठें

आहे हें मला बरोबर माहीत आहे. परंतु तेथें तें मी मात्र ठेविलें नाहीं.'

हरिताक्ष ह्मणाले—'मग कोणी ठेवलें, महाराज ?'

'ते तेथें उभे आहेत ते शुभधाम देशाचे खरे नृपति. त्यांनींच तें तेथें ठेवलें. त्यांना विचारा पाहिजे तर. त्यांच्या तोंडूनच तें तुह्मी ऐका ह्मणजे तुह्मास विश्वास पटेल. महाराज, आपण नीट आठवण करा. राजवाड्यांतून जाण्यापूर्वी आपण जें अगदीं शेवटीं कृत्य केलें तें हेंच होय. एका रखवालदारानें मला हिडिसफिडिस केलें, त्याबद्दल त्याचें पारिपत्य करण्याकरितां माझ्या अंगावरच्या चिंध्या आपल्या अंगावर घालून आपण राजवाड्यांतून गेला, त्या दिवसाचें आपणास स्मरण नाहीं काय ?'

पुन्हां एकदां सर्व दरबार स्तब्ध झाला. कोठें यत्किंचित्‌हि आवाज ऐकूं येईनासा झाला. नवीन आलेला मुलगा खालीं बघून आपल्याशींच विचार करूं लागला. दुसऱ्या कित्येक फालतु गोष्टी त्याच्या स्मरणापुढें दत्त ह्मणून उभ्या राहिल्या. पण ती गोष्ट त्याला आठवेना ! त्याची राज्यपद प्राप्ति या एका गोष्टीच्या स्मरणावरच अवलंबून होती. पळामागें पळ निघून गेलें. पण मुलाच्या मुद्रेवर स्मरणाचीं चिन्हें कांहीं दिसेनात. शेवटीं त्यानें एक दीर्घ निःश्वास टाकला व आठवण झाल्यासारखें करून तो ह्मणाला—'हो, त्या दिवशींचा सर्व देखावा मी आपल्या नजरपुढें आणला. पण अद्याप शिक्के मोर्तबाचा कांहीं सुगावा लागत नाहीं.'

असें ह्मणून तो बराचवेळ थांबला. वर पाहून पुन्हां डोकें खाजवूं लागला. शेवटीं निरुपाय होऊन तो ह्मणाला—'सरदार व सभ्यगृहस्थ हो, या एवढ्याच पुराव्यावर जर तुमची सारी भिस्त असेल, हा एवढाच मला देतां आला नाहीं तर, माझा राज्यावरचा हक्क बुडविण्याची तुमची जर तयारी असेल तर त्यास माझा काय उपाय आहे. माझें ह्मणणें तुह्मास कबूल करावयास लावण्यास माझ्याहातीं, आज कांहींहि सामर्थ्य उरलें नाहीं. परंतु—'

मध्यंतरींच तानु ओरडून ह्मणाला—"महाराज, आपल्याला वेड लागलें आहे का ? अंमळ विचार करा ! असा धीर सोडूं नका ! आपलें कार्य मुळींच फसलें नाहीं व तें फसणारही नाहीं ! मी काय सांगतो तें नीट लक्ष्य लावून ऐका. त्यांतला एक शब्दही जाऊं देऊं नका ! त्यादिवशींचा सकाळचा देखावा मी आपल्यापुढें समग्र उभा करणार आहे.

त्यांतील एकही गोष्ट वगळणार नाहीं. त्याविषयीं आपलें बोलणेंचालणें झालें. प्रथम मी आपल्या बहिणीविषयीं हकीकत सांगितली. —होय तुह्माला तें आठवतें ! अशीच आणखी आठवण करा ह्मणजे सर्व आठवेल. आणि मग मी आपल्या आजीसंबंधानें आपल्याला हकीकत सांगितली. आह्मी कंगालपुऱ्यांत कोणकोणते खेळ खेळत होतों याचेंही मीं आपल्याला वर्णन दिलें.—हेंही तुह्माला आठवतें. ठीक आहे. असेंच आणखी ध्यान ठेवा ह्मणजे सर्व गोष्टींचें तुह्मास स्मरण होईल. तुह्मीं मला खावयास दिलें व पाणीही प्यावयास दिलें. नोकरांचाकरादेखत मला बुजल्यासारखें होऊं नये ह्मणून आपण त्यांना तेथून कांहीं तरी सबब काढून रवाना करून दिलें. शाबास, येथपर्यंत तर सर्व गोष्टी तुह्माला पटल्या ! '

तानू हकीकत सांगत होता; व त्या पटल्या असें सुशीलकुमार मान हालवून दर्शवीत होता. हा क्रम पहून तेथें बसलेल्या सर्व लोकांना फारच अचंबा वाटला. सर्व अधिकारी लोक त्या दोघांकडे आश्चर्यचकित मुद्रेनें एकसारखें पाहूं लागले. ही सर्व हकीकत खरोखरीच घडली आहे अशी प्रत्येकास खात्री वाटूं लागली. तरी पण भिकाऱ्याचा पोरगा व राजपुत्र यांचा हा गंगाजमनी संगम होण्याचा योग कसा आला याबद्दल जो तो आपल्या मनाशीं आश्चर्य करूं लागला ! या दोघांचा पूर्व परिचय असणें ही गोष्ट केवळ अशक्य होय. उभ्या जन्मांत ज्यांची दृष्टादृष्टही होणें मुष्किलीच आहे त्यांची इतका संवाद होण्यासारखी गाठ तरी पडली कशी ? आधीं या कंगालास राजवड्यांत प्रवेश तरी कसा मिळाला ? असे सर्व लोक आपापल्या ठिकाणीं आश्चर्य करीत आहेत तोंच तानू ह्मणाला— " मग आपण थट्टेनें एकमेकांचे पोषाख बदलले. आपण दोघेंही प्रथम पाळीनें व नंतर खांद्याशीं खांदा लावून आरशाशीं उभे राहिलों. जणुकाय आपण एकमेकांनीं पोषाख व बदलला नाहीं इतकें आपल्या दोघामध्यें विलक्षण साम्य दिसतांच आपणादोघांसही अत्यंत आश्चर्य वाटलें ! शिपायानें माझ्या हातास जखम केली होती तिच्याकडे मग आपलें लक्ष्य गेलें. ही पहा येथें त्या जखमेची खूण अद्यापही आहे ! या हातानें मला अद्याप लिहितांही येत नाहीं.— लिहावयास लागलें कीं बोटें ताठल्यासारखीं होतात. हातास जखम झालेली पहातांच आपण ताडकन् उठला. शिपायास चांगलें प्रायश्चित्त देईन तेव्हां

राहीन असें ह्मणून आपण तेथून लगबगीनें चालते झालांत ! जातां जातां आपण दरवाज्याशीं थांबला. दरवाजाजवळ एक टेबल होतें. त्या टेबलाजवळ हें काय शिक्के मोर्तब ह्मणतात तें होतें. तुह्मी तें चटकन् उचलून घेतलें व जणु काय तें लपवून ठेवण्यासाठींच चोहोंकडे पाहूं लागला. मग आपल्या नजरेस एकदम—"

"बस, पुरे कर, ईश्वराने मोठी खैर केली ह्मणवयाची ! " असें अंगावर लखलखणाऱ्या पांघरलेला राज्याचा हक्कदार मोठ्यानें ओरडून ह्मणाला. "सरदार हेमकंठ, चला, पुनः एकदां हेलपाटा घ्या. माझ्या दिवाणखान्यांत एका खुंटीवर माझे अंगांत घालावयाचें चिलखत ठेवलेलें आहे त्याचे खालींच त्या दिवशीं मीं मोर्तब ठेवलें आहे "

तानू ह्मणाला—" बरोबर सांगितलें महाराज ! अगदीं बरोबर ! आतां, या देशाच्या राजदंडाचे स्वामी आपण झाला. आतां आपल्याला कोण हरकत करतो तें पाहूं. सरदार हेमकंठ ! पहातां काय ? वायुवेगानें येथून राजवाड्यांत जा व तें मोर्तब घेऊन या. "

तानूच्या तोंडची ही आज्ञा ऐकतांच सर्व लोक एकदम उठून उभे राहिले. आपण हें काय ऐकतो ? हें खरें असेल काय ? खरें ठरलें तर आज इतके दिवस आपण सर्वजण गाढव ठरलों होतो असेंच होणार नाहीं काय ? भलत्यालाच आपण राजा समजून त्याचें आपण देव्हारे माजविले ! असा विचार मनांत येऊन सर्वजण कांहीं वेळ शरमिंदे होऊन गेले. सर्व-जण एकमेकांच्या कानांत कुजबुजूं लागले. अशारीतीनें किती वेळ गेला याचें कोणासही भान राहिलें नाहीं. इतक्यांत पुनः सर्वत्र स्थिरस्थावर झालें. सरदार हेमकंठ रंगभूमीवर येऊन दाखल झाले, व त्यांनीं तो शिक्का सगळ्यांना दिसेल अशारीतीने उंच धरला. 'खऱ्या राजास दीर्घायुष्य प्राप्त होवो ' अशी सर्वांनीं एकच आरोळी ठोकली !

सुमारे एक घटकाभर सर्व वातावरण अभिनंदनपर गर्जनांनीं व राजाच्या नांवाच्या जयजयकारांनीं दुमदुमून गेलें. वाद्यांचा मंगलध्वनि सर्व दशदिशा व्यापून टाकूं लागला. शुभधाम देशाचे सौंदर्य सर्वस्व व सौभाग्याचें अधिष्ठान फाटक्या चिंध्या अंगांत घालून दरबारच्या मध्यभागीं मोठ्या दिमाखांत सभोंवर आपली दृष्टि फेकीत उभे होते. दरबारांतले सर्व सरदार, मानकरी

बिनीतमुखंहोत्साते त्याच्या भोंवतीं जमा झाले, त्या गर्दीतून पुढें होऊन सर्वांना ऐकूं जाईल अशा स्वरानें तानू ह्मणाला— 'राजा, हीं आपलीं वस्त्रें परत घे. मी गरीब तानू तुझा दासानुदास आहें! या वस्त्रांकडे पाहण्याचीसुद्धां माझी किंमत नाहीं! हीं फाटकीं वस्त्रें माझीं मला परत दे.'

सरदार हरिताक्ष ह्मणाले–' या बदमाश पोरास येथून खेंचून न्या व किल्ल्यांत कैदेंत ठेवा.

परंतु, राजा त्यास थांबवून ह्मणाला " असे मुळींच करूं नका. राज्यपद माझें खरें, परंतु आज तें त्याच्यामुळेंच मला प्राप्त झालें आहे. त्या दिवसाची त्यानें जर मला आठवण दिली नसती तर तुह्मी सर्व लोकांनीं अर्धचंद्र देऊन माझी येथून खास रवानगी केली असती! अटकेंत पडण्याची जर कोणाची खरी लायकी असेल तर ती तुह्मां सर्व लोकांचीच होय. मामा, आपण माझ्याहून वडील आहांत, वयोमानानें आपला अधिकार मोठा आहे. आपल्या उपमर्द होण्यासारखे शब्द माझ्या तोंडांतून कधींहि निघूं नयेत अशी माझी इच्छा आहे पण आजचें हें वर्तन पाहून माझा निरुपाय होतो. कृतज्ञतेची कल्पना आपल्या मनांत चांगली वाणली आहे असें दिसतें! यानें तुह्माला सरदारी दिली असें ऐकतों. त्याची तुह्मी अशा रीतीनें फेड करूं पाहतां काय? तो खरा राजा नव्हता व नाहीं हें आतां सिद्ध झालेंच अर्थात् तुह्मांस त्यानें दिलेली पदवी कायदेशीर नाहीं हें उघड आहे. तुमच्याबद्दल त्याच्या मार्फत जर मला शिफारस येईल तरच तुह्मांस या पदवीचा उपभोग घेण्यास सांपडेल हें पक्कें लक्ष्यांत ठेवा."

राजाकडून अशी संभावना होतांच हरिताक्ष थोडेसें मागें हटले. तेव्हां राजा ताकडे वळून ह्मणाला—' मित्रा, शिक्का कोठें ठेवला होता याची माझी मला सुद्धां आठवण राहिली नाहीं; मग ती तुला कशी राहिली!'

' महाराज, त्यांत कांहीं मोठेसें अवघड नव्हतें. कारण मी स्वतः त्याचा अनेकवेळां उपयोग केला.'

' काय ह्मणतोस, उपयोग केला! आणि तुला तें कोठे आहे हें मी येण्यापूर्वीं सांगतां येईना.'

' त्यांना तेंच पाहिजे होतें हें मला तरी काय माहीत! त्यांनीं कांहीं

त्याचें वर्णन मला कधीं दिलें नव्हतें, आणि त्याला काय ह्मणतात हें मला माहीत नव्हतें. '

' मग त्याचा तूं उपयोग कसा केलास ?'

हा प्रश्न होतांच तानू लाजेनें खालीं पाहूं लागला. त्याची मुद्रा अगदीं कावरीबावरी झाली.

' बोल, बोल. काय बोलावयाचें असेल तें स्पष्ट बोल. भिऊं नकोस. त्याचा तूं केव्हां उपयोग करीत होतास ?'

' आक्रोड फोडायला !'

हें त्याच्या तोंडचे शब्द बाहेर येतांच सर्व दरबारांत हंसण्याचा एकच धडाका उडाला. त्या योगानें सर्व मंडप उडून जातो कीं काय असें वाटूं लागलें. तानू खरा राजा नव्हता याबद्दल आतां दुसरा पुरावा कांहीं जरूर नव्हता ! या उत्तरानें सर्वांची खात्री होऊन गेली.

हा वेळपर्यंत तानूच्या अंगावरील सर्व कपडे काढण्यांत येऊन ते राजाच्या अंगावर घालण्यांत आले. राजाच्या सर्व चिंध्या झांकून गेल्या. अभिषेकाचा क्रम मागील अंकावरून पुढें चालूं झाला. एक पात्र रंगभूमी-वरून निष्क्रांत झालें व दुसऱ्यानें प्रवेश केला. खऱ्या राजास अभिषेक झाला. त्याच्या मस्तकावर राजमुकुट ठेवण्यांत आला व तोफांच्या सरबत्तीनें ही शुभ वार्ता सर्व नगरीस निवेदन करण्यांत आली.

प्रकरण ३३ वें.

सुशील महाराज.

पुलावर दंगा झाला, तेथेंच आपण धीरेंद्रास सोडून दिलें होतें. दंग्यांत सामील होण्यापूर्वी धीरेंद्राची स्थिती आधींच चमत्कारिक झाली होती व दंग्यांतून बाहेर पडतांना तर ती पहिल्याहून विलक्षण झाली. दंग्यांतून प्रवेश करतांना त्याच्या जवळ थोडीच पुंजी होती. त्यानें दंग्याचा निरोप घेण्यापूर्वीच त्या पुंजीनें त्याचा निरोप घेतला होता. दंग्यांतून तो अगदीं कोराकरकरीत बाहेर पडला ! त्याच्याजवळ जें काय होतें नव्हतें तें खिसे-कापू लोकांनीं गर्दींत लांबविलें. धीरेंद्रास या सर्व आपत्तींची एवढी प्रतिष्ठा

वाटली नाहीं. आपला मुलगा आपणास सांपडला ह्मणजे झालें. बाकीच्या गोष्टींची आपल्याला कांहीं किंमत नाहीं असेच तो समजत होता. मुलाला आतां शोधावें कोठें हा त्याच्या पुढें एक मोठा प्रश्न उपस्थित झाला. एखादा रायवळ माणूस असता तर तो मुलाच्या शोधार्थ शहरांत उगीच हवा तिकडे भटकत फिरला असता. परंतु, आमचा धीरेंद्र खरा सैनिक होता. मुलाच्या शोधाची मोहीम अगदीं लष्करी शिस्तीनें कशी चालवावी याबद्दल तो मनांत विचार करूं लागला.

मी मुलास दिसेनासा झालों ह्मणजे तो स्वाभाविकपणेंच काय करील बरें ? तो स्वभावतःच कोठें जाईल ? तो आपल्या पूर्वीच्या ठिकाणीं जाईल, कारण ज्यांचें डोकें ठिकाणावर नसतें त्यांची अशीच स्थिती होते. ज्या ठिकाणीं त्यांनीं कांहीं दिवस काढलेले असतात तेथें ते अगदीं हटकून जावयाचेच तेथें त्यांना कितीहि त्रास झालेला असला तरी त्यांचे मन तिकडेच जाण्यास धाव घ्यावयाचें ! किंबहुना भ्रमिष्ट माणसास त्रास होईल अशा ठिकाणींच जाणें विशेष आवडत असावें एरव्हीं त्यांच्या भ्रमिष्टपणाचें बीज कसें होणार ? तो त्या दिवशीं बिघडा पांवरलेला ऐरट भेटला होता त्याच्या तिकडे तर तो फिरून गेला नसेल ना ? तो ह्मणत होता ' मी या मुलाचा बाप आहे. '

असा विचार करून शेवटीं धीरेंद्र ह्मणाला— ' छे. तो ऐरट तरी त्यास नेमका सांपडणार आहे थोडाच. स्वारी कोठें तरी गर्दींत रमली असेल खास. त्याचा शोध करावयाचा ह्मणजे गर्दीचीं ठिकाणें आपल्याला आधीं सोधलीं पाहिजेत. गर्दीशिवाय त्याच्या मनाला करमणूक होणार नाहीं. आह्मी राजे असतांना लोक आमचा उपमर्द करतात असें हे राजश्री ह्मणत असतील आणि लोक त्यांचा उपहास करीत असतील. टोळभैरवांना एकादा भ्रमिष्ट लागतोच, आणि भ्रमिष्टालाहि आपल्या भ्रमिष्टपणाचें प्रदर्शन करण्यास टोळभैरवाशिवाय गत्यंतर नसतें ! आतां कोठें तरी हीच मौज झालली असेल. एकादा माणूस त्याला त्रास देतांना माझ्या तावडींत सांपडला पाहिजे. त्याला अशी तंबी देईन कीं याद रखे ! मुलाची व माझी आतां एकदां जर गाठ पडेल तर त्याला मी कधीं विसरणार नाहीं. त्याला एकसारखा नजरेसमोर ठेवीन. '

येणेंप्रमाणें विचार झाल्यानंतर धीरेंद्र शोधार्थ निघाला. शहरांत जितक्या ह्मणून गल्ल्या कुच्या होत्या तितक्या बहुधां सर्व त्यानें धुंडाळल्या. जेथें जेथें ह्मणून गर्दी दिसेल तेथें तेथें त्यानें मुलाबद्दल शोध करावा परंतु मुलाचा ह्मणून पत्ता लागेना. असे कित्येक तास गेले. मुलगा गेला असावा तरी कोठें या बद्दल त्याला फार आश्चर्य वाटूं लागलें. तरी मुलास धुंडाळून काढण्याचा त्याचा निश्चय रतिमात्रही कमी झाला नाहीं. मुलाच्या जाण्या-संबंधानें प्रथम आपण जी आंखणी केली होती तिच्या योगानें थोडक्याच अवधींत आपणास त्याचा हमखास तपास लागेल ही त्याची आशा सफल झाली नाहीं. एखादे वेळेस असें होतें कीं, आपल्याला हवी ती वस्तु ज्या ठि-काणीं नसते तीच ठिकाणें आपण प्रथम नेमकीं पाहतो ! अशांतलाच हा प्रकार झाला असेल असें समाधान मानून धीरेंद्रानें आपला तपास तसाच निर्धारानें पुढें चालूं ठेवला.

सकाळ उजाडली; धीरेंद्र कित्येक मैल चालून गेला असेल, किती तरी जमाव त्यानें धुंडाळले असतील तरी त्याच्या प्रयत्नास यत्किंचि-तहि यश आलें नाहीं. तो अतिशय थकला व त्यास भूकहि फार लागली. झांपेनें त्याचे डोळे मिटूं लागले. कांहीं खाव-यास मिळून पोटांत थोडेसें पाणी गेलें तर फार चांगलें होईल. परंतु, तें कसें मिळावें हा त्याच्यापुढें मोठा प्रश्न येऊन पडला. भीक मागून तें मिळ-विण्याची त्याच्या मनांत कल्पनाहि आली नाहीं. गहाण ठेवण्यासारखी त्याच्या जवळ वस्तू ह्मटली ह्मणजे तरवार राहिली होती. प्रसंगीं त्यानें आपले प्राणहि दिले असते परंतु, आपल्या तरवारीचा वियोग कधींहि होऊं दिला नसता ! त्याच्याजवळ कांहीं कपडेहि होते. जाणूनबुजून रोग जसा कोणी पदरांत घेणार नाहीं त्याप्रमाणेंच ते कपडे ठेवून पैसे देण्याइतका मूर्ख सबंद दुनियेंतहि सांपडेल किंवा नाहीं याबद्दल शंकाच होती !

दोन प्रहरची वेळ झाली. त्या वेळेस अभिषेकोत्सवाच्या मिरवणुकींत सहस्रावधि लोक चालले होते, त्यांतच तो जाऊन मिळाला. आपले महाराज एवढा जमाव टाकून बहुधां दुसरीकडे राहणार नाहींत असें त्यास खास वाटलें— जमाव जसजसा उजव्या डाव्या बाजूला वळे तसतसा तो पिछाडी-पासून अघाडीपर्यंत एकसारखा हेलपाटे घालूं लागला. जमावांत कोठेंहि माण-

सांची गर्दी जमलेली असली कीं त्यांत शिरून त्याचें समग्र संशोधन करावें असा त्याचा एकसारखा क्रम चालूं राहिला. शेवटीं त्याचीं गात्रं अगदीं थकून जाऊन त्याच्यानें एक पाऊलहि टाकवेना. तेव्हां आपल्या मोहिमेचा पहिला संकल्प आतां बदलला पाहिजे असें त्यास वाटूं लागलें. सर्व शहर मागें टाकून आपण पुढें आलों व सूर्यहि आतां खालीं खालीं जात चालला, आतां यापुढ भटकत फिरणें चांगलें नाहीं असा विचार करून नदीकांठीं वृक्षाच्या छायेखालीं सुंदर हिरवेंगार कुरण होतें, त्याच्यावर जाऊन तो विश्रांतिकरितां पडला. एका क्षणांत त्याचा डोळा लागून तो घोरूंहि लागला. इतक्यांत तोफांचा कडकडाट त्यास ऐकूं आला; त्या बरोबर राजास अभिषेक झाला त्याचीच ही सलामी असावी असें ह्मणून तो पुन्हां झोंपीं गेला. दुसरें दिवशीं सकाळ होऊन सूर्य बराच वर आला; तोंपर्यंत तो निजलाच होता!

तो जागा झाला, तेव्हां त्याचे पाय ठणकत होते. त्याला एक पाऊल टाकण्याची शक्ति राहिली नव्हती. भुकेनें तो अगदीं व्याकुळ होऊन गेला होता. स्नान केल्यानें कांहीं बरें वाटेल असें वाटून तो नदींत उतरला व स्नान करून थोडेसें पाणीहि प्याला. त्यामुळें त्यास अंमळ हुषारी येऊन त्यानें राजवाड्याचा पुन्हां रस्ता धरला. पोटांत अतिशय भूक लागल्यामुळें त्यास एक नवीन उपाय सुचला. आपल्या वडिलांचे स्नेही येथें शहरांत आहेत, त्यांचेकडे जाऊन त्यांचेकडून कांहीं रक्कम कर्जाऊ घ्यावी व तूर्तची आपली गरज भागवावी असा त्याचा संकल्प ठरला. या विचाराची अंमलबजावणी कशी होईल याच्या भानगडींत न पडतां, फक्त आपल्याला हा विचार सुचला ह्मणूनच तो आनंद मानूं लागला. सुमारें अकरा वाजण्याच्या सुमारास तो राजवाड्याजवळ जाऊन पोंहोंचला. राजवाड्याकडे शेंकडों माणसें चाललीं होतीं. तरी त्यांतून धीरेंद्र हा स्पष्ट ओळखूं येत होता. कारण त्याचा पोषाखच असा गमतीचा होता! राजवाड्याकडे जाणाऱ्या सर्व लोकांचे चेहरे तो नीट न्याहाळून पहात होता. यांतूनच कोणी आपल्याला मदत करील किंवा राजवाड्यांत असलेल्या आपल्या वडिलांच्या स्नेह्याची गांठ घालून देईल असें त्यास वाटत होतें. स्वतः आपल्याला राजवाड्यांत प्रवेश मिळेल अशी त्यास आशाहि वाटली नाहीं. किंबहुना त्याच्या मनांत अशी कल्पनाहि आली नाहीं. इतक्यांत राजांच्या करितां शिक्षा

भोगणारा मुलगा त्या वाटेनें चालला होता. त्याच्याकडे निरखून पाहून धीरेंद्र आपल्या मनाशींच ह्मणाला– ' यांच्या बद्दलच महाराज आमचे जवळ अनेक-वेळां बोललेले आहेत. ह्यांनीं त्याचें दिलेलें वर्णन या मुलाशीं हुबेहुब जमतें. कांहीं तरी निमित्त काढून याच्याशीं बोलण्यास सुरवात केली पाहिजे. याच्यापासून आपल्याला कांहीं सुगावा लागण्याचा संभव आहे. ' परंतु, धीरेंद्रास त्याचे जवळ जाऊन बोलण्याची तसदी घ्यावी लागली नाहीं. कारण धीरेंद्रास पाहून तो मुलगाहि आपल्या मनाशीं ह्मणालाः— ' महाराजांनीं ज्यांच्या शोधाकरितां आह्मास पाठविलें आहे तेच हे गृहस्थ दिसतात. आपलें आयतेंच काम झालें. '

मुलाकडे वळून धीरेंद्र ह्मणाला— ' आपण आतांच राजवाड्यांतून आला असे वाटतें. आपण नेहमीं राजवाड्यांतच असतां काय ? '

" होय. मी नेहमीं राजवाड्यांतच असतों. "

" राजवाड्यांत हंबीरराव ह्मणून एक अधिकारी आहेत ते आपल्या माहितीचे आहेत काय ? "

हें ऐकतांच तो मुलगा दचकून स्वगत ह्मणाला— " काय, हा माझ्या बापासंबंधानेंच विचारपूस करीत आहे ! " मुलगा धीरेंद्रास ह्मणाला— होय. ' माझ्या ते पक्के माहितीचे आहेत. '

" वा:, मग फार चांगलें झालें ! ते आतां आंत असतील काय ? "

" होय; ते आंत आहेत. " (आपल्याशीं) होय. ते आपल्या थडग्यांत सुरक्षित आहेत !

" मला त्यांची गाठ घेऊन त्यांच्याशीं कांहीं बोलावयाचें आहे. मी आल्याची त्यांना आपण वर्दी द्याल काय ? "

" होय. मी त्यांना आतांच्या आतां जाऊन कळवितों. "

" त्यांना सांगा धीरेन्द्र ह्मणून कोणी गृहस्थ तुमच्याकडे आले आहेत. "

हें ऐकतांच मुलाची थोडी निराशा झाल्यासारखी झाली. " महाराजांनीं याचें हें नांव घेतलें नव्हतें ! बरें असो. त्याची चौकशी आपण कशाला करा ? कदाचित् हा त्याचा आवळा जावळा भाऊ असेल. आपल्याला काय ? महाराजांच्या वर्णनाप्रमाणें हुबेहुब चेहऱ्याचा मनुष्य त्यांच्यापुढें नेऊन उभा

केला ह्मणजे आपलें काम झालें ! " तो धीरेन्द्राकडे वळून ह्मणाला-' आपण आंत येऊन येथें बसा. मी आपल्याला परत निरोप येऊन कळवितों. '

यावर धीरेंद्र सांगितल्याजागीं मुलाची वाट पहात एका बाकावर बसला. पाऊस पडूं लागला तर पहारेवाल्यांना बसण्याकरितां ती जागा केलेली होती. तो आपल्या जागेवर बसतो न बसतो तोंच एक अधिकारी कांहीं शिपाई बरोबर घेऊन तेथें आले. त्यांनीं धीरेन्द्रास बाहेर बोलावलें. व या वेळीं राजवाड्याजवळ गुटमळणारा हा इसम कोणी तरी भामट्या किंवा खिसेकापू असावा असें समजून त्यांनीं त्यास पकडलें. धीरेन्द्रास हा एक मोठाच अपशकुन झाला. आपण कोण आहों, तेथें कशाला आलों, आपल्याला त्या जागीं बसावयास कोणी सांगितलें वगैरे सर्व खुलासा त्या अधिकाऱ्यास सांगण्याचा धीरेन्द्रानें प्रयत्न केला. परंतु, तो अधिकारी त्याचा एक शब्दही ऐकून घेईना ! त्याची झडती घेऊन त्याचें हत्यार काढून घेण्याबद्दल त्यांनीं सेवकांना हुकूम दिला.

झडतींत त्यांना दुसरें कांहीं एक सांपडलें नाहीं. फक्त एक कागद मात्र सांपडला. धीरेन्द्राची व त्याच्या भावाची बाचाबाच झाल्या-नंतर सुशीलकुमारानें एक पत्र लिहून ते धीरेन्द्राजवळ दिलें होतें ते त्यास राजवाड्यांत घेऊन जाण्यास सांगितलें होतें तेंच हें पत्र होय. हें पाहतांच धीरेन्द्र मनांतल्या मनांत हसूं लागला. तें वाचून अधिकारी आश्चर्यानें ह्मणाला—" अरे, ही फार मौज आहे बुवा ! राज्यावर हक्क सांगणारांची पर्वणीच आली आहे ह्मणावयाची ! ठीक आहे. याला आतांच्या आतां कोटडींत नेऊन बसवा. मी हा कागद आंत जाऊन महाराजांना दाखवितों. "

असें ह्मणून त्यानें धीरेंद्रास शिपायांच्या ताब्यांत दिलें व तो झटकन् आंत निघून गेला.

धीरेंद्र आपल्याशींच ह्मणाला:-' माझ्या नष्टचर्याची आतां खास समाप्ति होणार. कारण, तें पत्र राजाच्या दृष्टीं पडलें ह्मणजे तो राजद्रोहाबद्दल मला फांसावर चढविण्याचा हुकूम दिल्याशिवाय कधींहि राहणार नाहीं. माझी आपत्ति अशा रीतीनें कायमची टळेल. परंतु माझ्या मुलाचें काय होईल ? या जगांत कनवाळूपणा दाखविणारें त्याला कोणी तरी भेटेल काय ? '

त्याच्या मनांत असे उद्वेगकारक विचार चालू आहेत तोंच तो अधिकारी मोठ्या त्वरेनें आंतून आलेला धीरेंद्रास दिसला. त्याबरोबर आपल्या मनांत चालू असलेल्या सर्व विचारास एकदम रजा देऊन त्यानें निर्भय मुद्रा धारण केली व तो अधिकाऱ्याकडे बेपर्वाईनें पाहूं लागला. "कैद्यास मोकळा सोडा, त्याची तरवार त्याला परत द्या." असा सेवकांना हुकूम करून अधिकारी धीरेंद्रास लवून मुजरा करून ह्मणालाः—'महाराज, आपण असें माझ्या मागून यावें.'

हा अनपेक्षित प्रकार पाहतांच धीरेंद्र मोठ्या बुचकळ्यांत पडला. दिवा जातांना मोठा होतो त्याचप्रमाणें आमचीहि बरदास्त होणार कीं काय? खरोखरच हा जर माझा उपहासानें आदर करीत असेल किंवा माझी टर उडविण्याची याची बुद्धि असेल तर त्याला ह्मणावें— 'तूं खूप लक्षांत ठेव कीं मरणापूर्वी तुझा खरपूस समाचार घेतल्याशिवाय मी कधींहि राहणार नाहीं!'

ते दोघेहि मोकळ्या आवारांतून राजवाड्याच्या दारांत जाऊन पोहोंचले. तेथें श्रीमंती पोषाख केलेला एक मोठा अधिकारी उभा होता. त्याकडे बोट दाखवून धीरेंद्राबरोबर आलेला अधिकारी त्यास मोठ्या आदबीनें ह्मणालाः— 'आपण यांच्याबरोबर जावें. हे आपणास राजवाड्यांत घेऊन जातील.'

या नवीन अधिकाऱ्यानेंहि त्यास मोठ्या आदरशीलतेनें एका दिवाणखान्यांत नेलें. त्या दिवाणखान्याच्या दुतर्फा कित्येक दुसरे बारीक सारीक अधिकारी होते; त्यांनीं धीरेंद्रावर मुजऱ्यांचा एकसारखा वर्षाव चालविला! परंतु धीरेंद्राचा अवतार पाहून त्याची पाठ फिरतांच ते तोंडास पदर लावून खदखदां हसूं लागले! तेथून धीरेंद्र दुसऱ्या मजल्यावर गेला. तेथें असलेल्या अधिकाऱ्यांनीहि त्यास लवून मुजरा केला. तेथून अखेर त्यास दरबारच्या दिवाणखान्यांत नेण्यांत आलें. तेथें शुभग्राम देशाचे सर्व इसाल सरदार जमले होते. हें सोंग दरबारांत आलेलें पाहून कित्येकांच्या कपाळास आंठ्या चढल्या, कित्येकांची करमणूक होऊन ते मनांतल्या मनांत हसूं लागले; कित्येक चाणाक्ष होते ते त्या मनुष्यास दरबारांत प्रवेश मिळाला आहे तेव्हा एक तर हा कोणी मोठा माणूस असला पाहिजे किंवा यानें देशाची कांहीं मोठी कामगिरी तरी केली असली पाहिजे अशी धीरेंद्राविषयीं मनांत अटकळ बांधूं लागले.

धीरेंद्र मात्र अगदीं गांगरून गेला. त्यास नीट उभेहि राहतां येईना. समोर राजा सिंहासनावर विराजमान झाला होता. तो त्याच्यापासून सुमारें पांचच पावलें दूर होता. त्यानें आपलें मस्तक खालीं घातलें होतं. तो धीरेंद्राकडे न पाहतां एकीकडे पहात होता. तो जवळ बसलेल्या सरदाराशीं कांहीं कुजबुजत होता. धीरेंद्रास वाटलें कीं आतां ऐन उमेदींत आपल्याला राजा परलोकीं रवाना करणार. पूर्वसंचित कांहीं विलक्षण आहे! मी या जन्मीं कोणाचा घातपात केला नसतांहि माझ्यावर असा प्रसंग यावा हें पूर्वसंचिताचेंच फळ नव्हे तर काय? दरबारांतील लोकांना माझें दर्शनहि नकोसें झालें आहे. तेव्हां आतां आह्मास शिक्षा सुनावून येथून आमची पाठवणी लवकर होईल तर फार चांगलें! असा धीरेंद्र मनांत विचार करीत आहे तोंच राजानें आपलें मस्तक किंचित वर केलें व धीरेंद्रास त्याचा चेहरा दिसला. राजाची त्याची दृष्टादृष्ट होताच त्याचें देहभान नाहींसें झालें! तो एकाद्या पाषाणाच्या पुतळ्याप्रमाणें जागच्याजागीं निश्चल होत्साता आश्चर्यानें ह्मणाला–' अरे! हें मी काय पहात आहे. हे आमचे दोस्त आपणास महाराज ह्मणवून घेणारे, आह्मास सरदारीची पदवी देणारे, आज कित्येक दिवसपर्यंत लोकांनीं एकसारखा ज्यांस त्रास दिला तेच सिंहासनावर आरूढ होऊन आज खरोखरच ' महाराज ' पदवीस पोहोंचले!'

असें ह्मणून तो आश्चर्ययुक्त मुद्रेनें राजाकडे अनिमिष दृष्टीनें पाहूं लागला. आपल्या डोळ्यासच आज कांहीं विपरीत भावना झाली आहे, माझ्या ध्यानीं मनीं तो मुलगा आहे ह्मणून तर त्याची प्रतिमा मला येथें सिंहासनावर आरूढ झालेली दिसत नसेल नां? हा माझ्या मनाचाच खेळ असून वस्तुतः ही दृश्य वस्तू वेगळीच आहे असा तर प्रकार नसेल नां? छे, तसें कांहीं दिसत नाहीं. कारण, याच्या भोंवतीं उभे राहिलेले हे सरदार लोक, याच्या आसंमताद्भागीं दृश्यमान होणारीं छत्रचामरादि राज चिन्हें, हीं तर खास खरीं आहेत. कारण यांचा माझ्या मनाशीं जन्यजनकत्वाचा खास संबंध नाहीं. अशा रीतीनें त्याच्या मनाचें किंचित समाधान होतें न होतें तोंच पुन्हां त्याचें मन संशयानें ग्रस्त झालें. " कंगालपुऱ्यातला अनाथ व अशरण, ज्याचें मीं अनेक वेळां संरक्षण केलें, ज्याच्यावर माझें स्वभावतःच अपत्यनिर्विशेष प्रेम बसलें, तो हा मुलगा आहे किंवा हा खरोखरच शुभधाम देशाचा राजा आहे या गोष्टीचा कोणास तरी निर्णय लावतां येईल काय?"

इतक्यांत मनांत एक अपूर्व कल्पना उद्भवली असें दाखवून तो झपाट्यानें कांहीं पावलें चालत गेला व पूर्वी उभा होता त्या जागीं एक खुर्ची ठेवून तिच्यावर तो बसला.

दरबारचा हा यानें एक मोठा उपमर्द केला असें सर्वांना वाटतें न वाटतें तोंच एका जबरदस्त शिपायानें त्याच्या मानेवर आपला हात ठेवून त्यास म्हटलें— ' कायरे ए धटिंगण ! तुला कांहीं लाजलज्जा आहे किंवा नाहीं ? राजाच्या देखत खालीं बसतोस ?! '

ही गडबड राजाच्या कानावर जातांच तो आपला हात पुढें करून मोठ्यानें म्हणालाः—' राजाच्या देखत खालीं बसण्याचा त्याला यापूर्वीच हक्क देण्यांत आला आहे ! '

राजाच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच धीरेंद्राच्या सर्व संशयाचें निरसन झालें ! आपल्या दृष्टीस कांहीं विभ्रम झालेला नाहीं, ज्यास आपण अशरण व अनाथ समजत होतों तो खरोखरच अनाथ नसून या शुभधाम देशास सनाथ करणारा या देशाचा भूपति आहे अशी त्यास खात्री पटली. ती कल्पनातीत गोष्ट अखेर खरी ठरलेली पाहून त्यास केवढा अचंबा वाटला असेल याचें वर्णन देणें केवळ अशक्य होय !

हा प्रकार पाहून दरबारांतील लोकांची मात्र तारांबळ उडून गेली. ते मनांतल्या मनांत खजील होऊन गेले. आजच्या दिवशीं या दरबारांत आणखी कोण काणते चमत्कार घडतात याबद्दल ते मनांत आश्चर्य करतात तोंच राजा म्हणाला—" सरदार, दरकदार वगैरे गृहस्थांनो, आज तुम्हां सर्वांस मी हें विदित करतों कीं, आमच्यासमोर बसलेले हे गृहस्थ मोठे कुलीन व थोर अंतःकरणाचे आहेत. हे आमचे परमप्रिय दोस्त आहेत. यांचें नांव धीरेंद्र होय. यांनीं आपल्या समशेरीनें आमचें अनेक वेळां संरक्षण केलें आहे. जेव्हां आमची सर्व रयत आमचा छळ करण्यास प्रवृत्त झाली, आमच्याच देशांत पाय ठेवण्याचीहि आम्हास सोय राहिली नाहीं तेव्हां या गृहस्थांनीं आमच्याशीं इमानें इतबारें वर्तन करून आमची चांगली बरदास्त ठेविली. एकदांतर आमच्या प्राणावरहि येऊन बेतली होती परंतु, या बहादुरानें आपल्या प्राणाचीहि परवा न करतां आमच्या सहाय्यार्थ येऊन आमचें संरक्षण केलें ! आम्ही राज्यावर असतांना

आह्मास सर्वजण प्राणांपलीकडे मानतील यांत कांहीं आश्चर्य नाहीं. परंतु आमच्या आपत्तीच्या दिवसांत आमच्या खऱ्या स्थितीबद्दल व पदवीबद्दल निश्चित ज्ञान नसतां ज्यानें केवळ भूतदयेनें प्रेरित होऊन आह्मांस अनुग्रहीत केलें त्याची किंमत फार मोठी समजली पाहिजे हें तुह्मांपैकीं कोणी नाकबूल करील असें आह्मांस वाटत नाहीं. आमच्या नष्टचर्याच्या काळांत एकदां आह्मास फटके खाण्याची शिक्षाहि देण्यांत आली होती; परंतु या थोर पुरुषानें आमचे फटके आपल्या पाठीवर घेऊन आमची अप्रतिष्ठा चुकविली ! समृद्ध स्थितींत कोणीहि पुढें पुढें करील, परतु आपत्तीच्या दिवसांत कोणत्याहि लाभाची अपेक्षा धरण्याचें कारण नसतां जो तत्परतेनें सहाय्य करतो तोच खरा कसोटीला उतरलेला बावन्नकशी मित्र होय. आमच्यासमोर बसण्याचा हक्क आह्मी यास कां दिला याचें कारण तुह्मांस यावरून कळून येईलच. त्याच हक्कानुसार हे गृहस्थ आतां खालीं बसले. हा हक्क यांच्या कुळांत पिढीनपिढी ठेवण्यांत आला आहे. जोंपर्यंत हें सिंहासन हयात राहणार तोंपर्यंत हा हक्कहि यांच्या कुळांत राहणार असें आह्मी फर्मावितों. शिवाय यांस आह्मीं यापूर्वींच सरदारीहि दिली आहे. त्या सरदारीच्या इतमामानुरूप यास आजरोजीं सरंजामहि देण्यांत येणार आहे. यांची जो कोणी अगंळीक करील किंवा जो काणी यांना कोणत्याहि प्रकारची उपाधि लावील तो या राज्याचा शत्रु आहे असें समजलें जाईल.'

दरबारांत जमलेल्या जनसमूहांत दोन मनुष्यें नुकतींच येऊन दाखल झालीं होतीं. राजाच्या तोंडचे हे शब्द ऐकून तीं दोघेहि अगदीं गर्भगळित होऊन गेलीं. जणुं काय आपल्याला देहांत शिक्षा सांगितली आहे अशा केविलवाण्या मुद्रेनें व शून्य तीं दृष्टीनें एकदां राजाकडे व एकदां धीरेंद्राकडे अशी वरवरचे पाहूं लागलीं. हीं दोन माणसें ह्मणजे दुसरीं कोणी नसून लुब्धक व त्याची पत्नी कुमुदिनी हींच होत. आपल्या दुष्टपणाचा घडा भरला त्याचें प्रायश्चित्त मिळण्याची वेळ अगदीं समीप येऊन ठेपली असें लुब्धकास वाटून त्याचा चेहरा निस्तेज दिसूं लागला. धीरेंद्रानें अद्याप त्यांच्याकडे पाहिलें नव्हतें. तो अद्याप राजाकडेच एकसारखा पहात होता. त्याला आपली दृष्टि राजावरून काढवेनाच! तो पुन्हां स्वगत ह्मणालाः—“ काय अनर्थ आहे पहा ! हाच माझा कंगाल दोस्त आं !

ज्याचें डोकें भ्रमलेलें आहे असें मी समजत होतों तोच हा वेडा पीर! यालाच आह्मी आपल्या घरचें वैभव दाखविण्यास नेलें होतें! आमच्या वाड्याचीं सत्तर दालनें, सत्तावीस नोकर, आमचे बागबगीचे, आमचीं शेतें यांची बडेजाव यांनाच आह्मी सांगत होतों. यालाच तो कंगालपुऱ्यांतील ऐरट आपला मुलगा ह्मणत होता! याचीच त्यानें लाथाबुक्यांनीं संभावना केली. यालाच आपण आपला पुत्र समजून चांगल्या पदवीस चढवूं असे आमचे मनोरथ चालले होते! यांना आतां तोंड दाखवायला तरी आह्माला जागा आहे का? यांनीं आह्माला आश्वासनें दिलीं, सरदारी दिली, अनेक सनदांचा आमच्यावर वर्षाव केला, तीं सर्व आह्माला त्यावेळेस चेष्टा वाटत होती. या सर्व गोष्टींचा प्रसव त्याच्या विकृत मनापासूनच होत आहे असें आम्ही समजत होतों. परंतु त्याच्या तोंडांतून निघणारें प्रत्येक अक्षर विधिवाक्याप्रमाणें भूतार्थानें भरलेलें होतें; जर कोणाचें विकृत मन असेल तर तें त्याचें नसून त्याच्या बोलण्याचा अविश्वास धरणाऱ्या लोकांचेंच होतें; या गोष्टीचा एके दिवशीं प्रत्यय येणार आहे अशी कोणास कल्पना तरी होती काय? यांना आतां मी आपलें तोंड कसें दाखवूं? मी बोलतों यांतील एक अक्षर खोटें नाहीं असें ते मला बजावून सांगत होते; पण त्याच्या बाह्य स्वरूपावरून त्यांच्या शद्बावर माझा तरी कसा विश्वास बसावा? असो. झालें तें झालें. जाणून बुजून त्यांचा उपमर्द होईल अशी कोणतीहि गोष्ट करण्याची ईश्वरानें आपणास बुद्धि दिली नाहीं हें आपलें एकपरीं भाग्यच समजलें पाहिजे. यांच्या शद्बावर अविश्वास ठेवण्यांत जरी इतर सर्व लोकांशीं आपलें साम्य होतें तरी यांना सतावून सोडण्याची लोकांनीं जी मोहीम सुरूं केली होती तिचा पाडाव करण्याचेच शक्य ते आपल्या हातून प्रयत्न झाले ही एक त्यांतल्यात्यांत समाधानाची गोष्ट होय!"

यानंतर त्यानें राजास लवून मुजरा केला; व "या दासानुदासाच्या अल्प सेवेचा स्वीकार करून महाराजांनीं पदव्या, जमीनजुमला, सरंजाम यांनीं त्यास उपकृत केलें याबद्दल महाराजांचा हा सदैव ऋणी राहील." असें ह्मणून तो अदबीनें एका बाजूस जाऊन उभा राहिला. दरबारांतील सर्व लोक त्याच्याकडे मोठ्या कौतुकानें पाहूं लागले. कित्येकांना त्याच्याबद्दल मत्सरहि वाटूं लागला.

इतक्यांत राजाची नजर लुब्धकाकडे गेली. त्याबरोबर संक्रुद्ध दृष्टीनें सर्व दरबाराकडे पाहून राजा ह्मणाला—" हा नीच मनुष्य दुसऱ्याचीच जिनगी बळकावून तिचा उपभोग घेत आहे. या हरामखोरास येथच्या येथें कैद करा. याच्या अगावरचे सर्व कपडे व दागदागिने उतरून यास माझा पुन्हां हुकूम होईतोंपर्यंत अंधारकोठडींत कोंडून ठेवा."

लुब्धकास पकडून नेतांच दरबारांतील लोकांत एकच चळवळ उडून गेली. इतक्यांत मौल्यवान पोषाख केलेल्या तानूकामाठयानें दरबारांत प्रवेश केला. धीरेन्द्रास त्याच्या कामगिरीबद्दल बक्षिस देणें व लुब्धकास चतुर्भुज करण्यांत येऊन त्याची कारागृहांत रवानगी होणें या दोन गोष्टींचा परस्पराशीं काय संबंध आहे याचा विचार करण्यास दरबारांतील लोकांना फुरसच मिळाली नाहीं. लुब्धकाचा आजपर्यंत सर्व प्रांतावर मोठा दरारा होता. त्यानें कोणाच्या जिनगीचा अपहार केला याबद्दल कोणाचाच कांहीं तर्क होईना. आज आणखी कोणकोणते चमत्कार उघडकीस येतात कोण जाणें असे मनांतल्यामनांत उद्गार काढून सर्वजण एकमेकांकडे अर्थपूर्ण दृष्टीनें पाहूं लागले. तोंच तानूनें दरबारांत प्रवेश करून राजापुढें लोटांगण घातलें.

भूमीकडे दृष्टि लावून तो ह्मणाला—' महाराज, मी सर्वस्वी अपराधी आहे. महाराजांची मी गरीब रयत असून आपल्या स्पर्शानें महाराजांचें सिंहासन भ्रष्ट केलें याबद्दल मला कोणतेंही शासन दिलें तरी तें कमीच होणार आहे. तरी महाराजांनीं मजवर दया करावी अशी या दासाची महाराजांचे चरणाजवळ नम्र विनंति आहे.'

यावर महाराज ह्मणाले—' तानू, ऊठ. यांत तुझा कांहीं अपराध नाहीं. आपण सामान्य रयत आहों, राज्यावर आपला कोणत्याही प्रकारचा हक्क नाहीं याबद्दल सर्वांची खात्री करण्यासाठीं तूं आपली शिकस्त केलीस परंतु, तुझ्या माझ्यांत विलक्षण प्रकारचें रूपसादृश्य असल्यामुळें माझ्या सरदारांना तुझें ह्मणणें खरें वाटलें नाहीं. असो. झाली ही गोष्ट एक प्रकारें बरीच झाली. तूं जर माझ्या जागीं सिंहासनावर विराजमान होण्यास येथें हजार नसतास तर माझ्या सरदारांनीं माझ्या शोधार्थ चोहोंकडे दूत पाठवून मला तावडतोब परत आणण्याची खटपट केली असती व त्या खटपटीस सहज यशही आलें असतें.तसें झालें असतें तर रयतेच्या खऱ्या स्थितीसंबंधानें

मला जो प्रत्यक्ष अनुभव मिळाला तो मिळाला नसता. सरदारहो, या प्रत्यक्ष अनुभवाची केवढी मोठी किंमत आहे याची कल्पना तुझांला कदाचित् होणार नाहीं. राजनीति किंवा शासनशास्त्र यांच्या संबंधानें सहस्रावधि ग्रंथांची जरी मीं पारायणें केलीं असतीं तरी त्यापासून केवळ ज्ञानाचा भारवाहक होण्यापलीकडे माझी किंमत यत्किंचत्ही वाढली नसती. भौतिकशास्त्रांचें प्रत्यक्ष प्रयोगाशिवाय केवळ पुस्तकी ज्ञान जसें निष्फळ होतें त्याप्रमाणेंच शासनशास्त्राची स्थिति आहे. शासनशास्त्र हें नुसतें शास्त्र नसून ती एक कलाही आहे. ही कला हस्तगत होण्यास प्रयोगशाळेंतच कांहीं दिवस घालविणें आवश्यक आहे हें मला स्वानुभवावरून कळलें. राजकुलांत जन्म झाल्यानें मनुष्यास सिंहासनावर आरूढ होता येत असेल. परंतु, अशा राजांत आणि तो ज्या सिंहासनावर बसतो त्यांत वस्तुतः कांहींच अंतर नाहीं. दोन्हींहा सारखींच निर्जीव होत. राजास सजीवपणा येण्यास व ' रजयति इति राजा ' या व्याख्येस अन्वर्थकता येण्यास राजानें कांहीं काळपर्यंत तरी आपल्या प्रजेची स्थिति प्रत्यक्ष अवलोकन केली पाहिजे. राजांना कोणत्याही प्रकारच्या सुखाची कमतरता नसते. त्यामुळें दुःख ह्मणजे काय याची त्यांना कल्पनाहि होणें दुर्घट असतें. आपल्याप्रमाणें आपली रयतही सुखांत असली पाहिजे असा प्रजेच्या स्थितिसंबंधानें त्याचा खोटा ग्रह होतो. परंतु, माझ्याप्रमाणें रयतेच्या आपत्तींचा अपरोक्ष अनुभव घेण्याची सुसंधि प्रत्येक शास्त्यास मिळेल तर मला वाटतें राजाची केवळ दुर्लक्ष्यामुळें व अज्ञानजन्य भ्रामक कल्पनामुळेंच अस्तित्वांत असलेलीं मनुष्यजातीचीं अर्धीं अधिक दुःखें तात्काळ नाहींशीं होतील. असो. हा लाभ मला तुझ्यामुळें झाला. तेव्हां एकाअर्थी तूं माझा उपकर्ताच आहेस. तुझ्या आईची, तुझ्या बहिणींची व तुझी गांठ पडली कां ? पडलीना, ठीक झालें. त्यांची यापुढें योग्य बरदास्त ठेवली जाईल. त्याची तूं काळजी करूं नकोस. अरे, पण तुझ्या घरच्या माणसांचें नांव निघतांच तुझा चेहरा असा उतरलेला कसा दिसतो ? ”

“ महाराज, माझ्या आईच्या संबंधांत माझ्या हातून एक अक्षम्य गुन्हा घडला आहे ! तो सांगण्याचीही मला लाज वाटत आहे. ”

“ बोल, आतां कांहींही लपवून ठेवूं नकोस. ”

" महाराज अभिषेकोत्सवानिमित्त शहरांतून जी मोठी प्रचंड मिरवणूक निघाली होती त्यावेळीं उत्तम प्रकारचा पोषाख करून व अनेकप्रकारचे रत्नखचित अलंकार अंगावर घालून सरदारांच्या मध्यभागीं मी घोड्यावरून मोठ्या थाटानें मिरवीत व लक्षावधि लोकांच्या मुजऱ्यांचा व जयशद्बांचा मस्तक हालवून स्वीकार करीत चाललों होतों. आज सर्व शहर ज्याचें अभीष्ट चिंतन करीत आहे व ज्याचें केवळ दर्शन घडलें कीं, आपण पुनीत झालों, आपल्यावर मोठा अपूर्व अनुग्रह झाला असे सर्व नागरिक धन्यता मानीत आहेत तो दुसरा कोणी नसून आपलाच मुलगा आहे असें पाहून माझी जन्मदात्री हर्षनिर्भर चित्तानें धावत धावत माझ्याकडे आली. तिलाहि मीं ओळखलें. परंतु मी असा कृतघ्न झालों कीं " बाई, मी तुला ओळखीत नाहीं " असें मीं तिला स्पष्ट सांगितलें. माझ्या तोंडचे हे शद्ब ऐकतांच त्या माउलीच्या मनाची काय स्थिति झाली असेल याची, महाराज, आपणच कल्पना करा. "

" अरेरे ! ही तुझ्या हातून फार वाईट गोष्ट झाली. रयतेंत मिसळून वागण्याचा प्रसंग आल्यानें शास्यास कोणकोणते फायदे होतात ह्याचा मला जसा प्रत्यय आला त्या प्रमाणेंच राजवैभवमदिरेनें मनुष्य धुंद होऊन जाऊन आपल्या आप्तइष्टांस प्रत्यक्ष आपल्या जन्मदात्रीसही अंतर देण्यास कसा प्रवृत्त होतो याचाही तुला प्रत्यय आला. प्रत्यक्ष अनुभवाशिवाय खरें ज्ञान प्राप्त होत नाहीं. माझ्या राज्यांतील लोकांच्या आपत्ति एरव्हीं जर माझ्या कानावर कोणीं घातल्या असत्या, तर त्या खऱ्याही वाटण्याची मला पंचाईत पडली असती. परंतु, आतां राज्याच्या अबादानीचें स्तोत्र जर माझ्यापुढें कोणी गाईल तर त्याच्यावर माझा किमपि विश्वास बसणार नाहीं. रयतेचें ह्मणणें प्रत्यक्ष ऐकून घेतल्याशिवाय किंवा त्याबद्दलची नीट विचारपूस केल्याशिवाय कोणतेंही निदान काढणें नेहमींच वस्तुस्थितीस धरून असतें असें नाहीं, अशी माझी आतां खात्री झाली. राज्यलक्ष्मी मनुष्याची विवेकबुद्धि कशी नष्ट करून टाकते याचा मासला तुझ्या वर्तनावरून चांगला निदर्शनास आला. तुझ्या हातून घडलेलें हें वर्तन नीचपणाचें तर खरेंच. परंतु, त्याचा दोष सर्वस्वी तुझ्यावर टाकतां येत नाहीं. राज्यलक्ष्मीचा अंमल तुझ्या डोळ्यावर होता त्या अमलानें ही

गोष्ट तुझ्या हातून घडवून आणली. तुझी अक्कलहुषारी या मदाच्या किंवा कैफाच्या योगानें जर नष्ट झाली नसती तर स्वभावधर्मानें असलें किळसवाणें कृत्य तुझ्या हातून कधींही होतें ना, अशी माझी खात्री आहे. तुझी दृष्टि फार दयाई आहे, तुझें अंतःकरण थोर आहे हे तुझ्या अल्पकालच्या शिस्तीवरून पूर्णपणें दृष्टोत्पत्तीस आलें. कित्येकांवर तूं दया केलीस, कित्येकांच्या आपत्ति तूं दूर केल्यास, कित्येक जुलमी कायदे बंद करण्याचा तूं संकल्प ठरविलास या सर्व गोष्टी दरबारांतील लोकांनीं आमच्या कानावर घातल्या. त्या ऐकून आह्मांस फार संतोष झाला. तुझा जन्म जरी हलक्या कुलांत झाला असला, तरी तुझें अंतःकरण फार थोर असून तुझा स्वभाव परोपकारी आहे. मनुष्याचें शील केवळ कुलावरच अवलंबून नाहीं याची सत्यता तुझ्या वर्तनावरून दिसून आली. असो. सरदार, दरकदार, व मुत्सद्दीहो, ज्यांना तुह्मां सर्वांकडून महाराज ह्मणवून घेण्याचा कांहीं दिवस योग आला त्यांना आजपासून आमच्या राज्यांतील देवस्थानांचे मुख्य अधिकारी नेमण्यांत आले आहे. या जबाबदारीच्या जागेबद्दल यांच्या अंगांत लायकी आहे किंवा नाहीं याबद्दल आमचेकडून शिफारस होण्याची कांहीं अवश्यकता आहे असें आह्मांस वाटत नाहीं. तुह्मां सर्वांना चकविण्यांत यांचें आमचें रूपसादृश्य बऱ्याच अंशांनीं कारणीभूत झालें असलें तरी यांच्या थोर स्वभावाची या सादृश्यास जोड नसती तर यांचा जन्म खरोखरच राजकुलांत झाला आहे अशी तुमच्या मनाची कधींही दृढभावना झाली नसती. (तानूस उद्देशून)—मित्रा, तुझ्या आईस व बहिणीस कोणत्याही सुखाची उणीव राहूं नये अशी तजवीज केली जाईल हें तुला आह्मीं पूर्वींच सांगितलें आहे. तुझ्या बापासंबंधानें मात्र काय तजवीज करावयाची ही तुझी तूंच ठरीव. त्याला शिक्षा करावी असें जर तुझ्या मनांत असेल तर तसें सांग. आमच्या देशाच्या कायद्यानें त्याच्यावर जर एखादा गुन्हा शाबीत होईल तर त्यास कारागृहांत टाकण्यासही दिरंगाई होणार नाहीं.

(सरदारास)—यांनीं कांहीं दिवस तरी राज्यपदाचा उपभोग घेतला असून तुह्मीं सर्वजण त्यांच्याशीं त्या दृष्टीनें वागत आलां आहां. या सर्व गोष्टींचा विचार करून आह्मी असें फर्मावतों कीं, यांचा दर्जा इतर सर्व सरदारांपेक्षां किंवा अधिकाऱ्यांपेक्षां अधिक रहावा. यासाठीं यांना अधिकार-

प्रदानाबद्दल एका विशिष्ट रंगाचीं व पद्धतीचीं वस्त्रें देण्यांत येऊन तशा रंगाचीं व तशा पद्धतीचीं वस्त्रें दुसऱ्या कोणींहि अंगावर घालूं नयेत. इतर सर्व अधिकाऱ्यांपासून हे ओळखूं येण्यास हाच विचार श्रेयस्कर होय असें आह्मांस वाटतें. देवस्थानाच्या अधिकारावर यांची तहाहयात नेमणूक करण्यांत आली आहे. एके वेळीं हे राज्यपदावर आरूढ झाले होते हें लोकांना चटदिशीं समजावें ह्मणून आह्मी यांच्यासाठीं अगदीं वेगळ्या तऱ्हेचें एक शिरस्त्राण तयार करवितों. यांच्यावर कोणतीहि आपत्ति आली तरी तिचें निरसन करण्याचा भार प्रत्यक्ष आमच्यावर आहे असें आह्मी समजतों. यांचा जाणूनबुजून जर कोणी उपमर्द करील, तर त्यास शासन करणें हें आह्मी आपलें सदैव कर्तव्य समजत जाऊं. "

राजाचें हें भाषण ऐकून तानूकामाठयास केवढा अपूर्व आनंद झाला असेल याचें वर्णन देण्यापेक्षां कल्पनाच करणें बरें! तात्काळ उठून तो महाराजांचे पादग्रहण करून ह्मणाला—" महाराज, मला गरीबास आपण उन्नतपदावर चढविलें आहे त्याबद्दल आपले कोणत्या शब्दांनीं आभार मानावयाचे हेंच मला समजत नाहीं. मला प्राप्त झालेली उच्च पदवी माझ्या अंगीं कांहीं तसेच गुण आहेत ह्मणून मला लाभली नसून महाराजांच्या परोपकारामुळेंच तें स्थान मला उपलब्ध झालें हें सांगण्याची मी परवानगी घेतों. "

असें ह्मणून तो तेथें एक पळभरहि न गमतां आपल्या आईस व बहिणीस ही शुभ वार्ता निवेदन करण्यास गेला.

प्रकरण ३४ वें.

आनंद पर्यवसान.

गेल्या आठवडया दोन आठवडयांच्या अनुभवांत अनेक प्रकारच्या व्यक्ति व परिस्थिती राजास पहावयास सांपडल्या. परंतु लुब्धकाप्रमाणें नीच माणूस त्याच्या कोठेंहि दृष्टीस पडला नाहीं. लुब्धकासंबंधानें ह्मातान्यानें धीरेंद्रास

कारागृहांत जी हकीगत सांगितली होती ती राजाच्या स्मरणांत होतीच. लुब्धकाची बायको कुमुदिनी इला दरबारांत बोलावून राजानें त्या हकीगतीचा पडताळा पाहिला. ता ह्यातान्यानें सांगितलेली हकिगत अक्षरशः खरी आहे असें त्यास समजलें. " धीरेंद्रास मी ओळखत नाहीं असें जर न ह्मणशील तर तुला ठार करीन. " अशी लुब्धकानें कुमुदिनीस भीति घातली. तरी " मी तसें सांगणार नाहीं. " असें तिनें साफ उत्तर दिलें. " माझा प्राण आपण खुशाल घ्या; त्याची मला मुळींच प्रतिष्ठा वाटत नाहीं; पण असलें नीच काम मी कधींहि करणार नाहीं " असा तिनें त्यास रोकडा जबाब दिला. तेव्हां तो ह्मणाला—" तूं कांहींहि केलेंस, तरी मी तुला कांहीं ठार मारणार नाहीं, परंतु त्याचा मात्र मारेकऱ्यांकडून खास वध करवीन. " हा त्याचा संकल्प ऐकून तिनें मनांत विचार केला कीं, " आपलें नष्टचर्य कांहीं संपत नाहीं. कांहींहि झालें तरी या चांडाळाच्या हाताखालीं आपल्याला जन्म काढावयाचा. आपण कांहींहि केलें तरी हा धीरेंद्रास जीवंत ठेवणार नाहीं. " असा तिनें विचार करून लुब्धक सांगत होता त्या प्रमाणेंच बोलण्याचा निश्चय ठरविला, वगैरे हकीगत तिच्याजवळून राजास समजली.

आपल्या भावाची जिनगी बळकावून त्याचा प्राण घेण्याचाहि प्रयत्न केल्याबद्दल लुब्धकावर खटला करून त्यास भयंकर शासन द्यावें असेंहि राजाच्या मनांत आलें. व हा आपला विचार त्यानें धीरेंद्रास कळविला. त्यावर धीरेंद्र हात जोडून ह्मणाला—' महाराज, आपण या विचारांत पडूं नये. तो कसाहि असला तरी तो माझा सोदर आहे. एकाच मातेच्या दुधावर आह्मी वाढलों आहों. व आह्मी दोघेहि एकाच जनकाचे पुत्र आहों. त्यानें माझी केवढीहि मोठी अगळिक कलली असली तरी तिचा सूड उगविण्या-करितां त्याच्याविरुद्ध पुरावा देऊन त्यास जन्मांतून उठविण्याचा नीचपणा माझ्या हातून कधींहि होणार नाहीं. जो करील तो भरील. ज्याचें कर्म त्याच्याबरोबर. भावाविरुद्ध हव्या त्या खोट्या बातम्या उठवून तो पितृघातास कारण झाला; बापानें जी वधू माझ्यासाठीं नेमस्त केली होती तिच्याशीं आपण जबरदस्तीनें विवाह लावून त्यानें माझ्या जिनगीचा अपहार केला. व मी आपला हक्क शाबीत करण्याकरितां गेलों असतां त्यानें माझी परोपरीनें

अवहेलना केली. आपल्या सामर्थ्याचा मला कारागृहांत लोटण्याच्या कामीं त्यानें उपयोग केला. ह्या गोष्टी आपल्याला कांहीं नवीन नाहींत. कारण या सर्व दुःखांत आपणहि माझे समभागी होताच. त्याच्या पातकांबद्दल त्याला प्रायश्चित्त मिळाल्याखेरीज कधींहि राहणार नाहीं. असें आहे तर त्याच्या हत्येचें पातक आपण आपल्या माथीं कशाला घ्या !

कुमुद्वतीसहि हा विचार पसंत पडला. ती ह्मणाली—" त्याला स्वाभाविक रीतीनेंच शिक्षा होत आहे ती कांहीं कमी नाहीं. ज्या ठिकाणीं तो पालखींतून मिरवला त्याच ठिकाणीं त्याला आतां पालखीचा दांडा धरण्याची वेळ येणार ही काय लहानसहान शिक्षा आहे ! "

येणेप्रमाणें संवाद झाल्यानंतर तीं दोघेंहि आपल्या इनामाच्या गांवावर गेलीं. ज्या नोकरांनीं आपणांस अगदीं ऐनवेळेस दगा दिला त्यांना धीरोदात्तानें आपल्या स्वाभाविक थोरपणानें क्षमा केली. त्याचें तेथें प्रयाण झालें तेव्हां जर कोणास सर्वांत पराकाष्ठेचा आनंद झाला असेल तर तो त्या ज्ञातान्यासच होय.

कांतिपूर शहरांतून भटकतांना राजावर जे अनेक प्रकारचे प्रसंग आले, त्यांचें त्यानें राजवाड्यांत येऊन स्थिरस्थावर झाल्यानंतर नित्रस्तपणानें एक टांचण केलें. त्या टांचणाप्रमाणें प्रथम त्यानें तानूच्या बापाचा शोध करविला; परंतु, त्याचा कोठेंहि शोध लागेना. तेव्हां त्यानें त्या तांड्यांतील लोकांना बोलाविलें. प्रत्येकास त्यानें वेगवेगळा वृत्तांत विचारला. कांहीं ह्मणाले— " चोरी, दरवडा, किंवा घरफोडी हे आमच्या बापजाद्यांपासून आमचे धंदे आहेत. परंतु, आमच्या आमच्यांतहि निरनिराळ्या जाति आहेत. दिवसा चोरी करणारे, रात्रीं चोरी करणारे, खिसे कापणारे, घरफोडी करणारे, दरवडा घालणारे अशा निरनिराळ्या आमच्यांमध्यें ज्ञाति आहेत. एकाचा धंदा दुसरा करीत नाहीं. व वर सांगितलेल्या निरनिराळ्या जातींत एकमेकांची सोयरीकहि होत नाहीं. दरवडेखोराच्या मुलीला दरवडेखोराचाच मुलगा नवरा पहावा लागतो. "

हें ऐकून राजा आश्चर्यानें ह्मणाला— ' अरे ! वाः ! तुमच्यांतहि पद्धतशीर समाजघटना आहेच ! इतकी व्यवस्थित समाजघटना जर तुह्मांला

राखितां येते तर प्रयत्न केल्यास तुह्मांला सन्मार्गावरहि आणतां येईल असें मला वाटतें.'

दुसरे कांहीं लोक ह्मणाले कीं 'आमचे वाडवडील प्रामाणिकपणानें आपला चरितार्थ चालवून अब्रूनें दिवस काढीत होते. चोरी, लबाडीच्या धंद्यास आमच्याच हयातींत सुरुवात झाली. या धंद्याकडे आमची स्वाभाविक प्रवृत्ति आहे असें नसून पोटाला मिळविण्यास आह्मास नीट धंदा मिळत नाहीं ह्मणूनच आह्मी चोऱ्या करून पोट भरूं लागलों. आमच्या मुलांबाळांनीं हा धंदा आमच्या पश्चात् चालवावा असा आमचा विचार नाहीं.'

ह्यावर राजा ह्मणाला—'पहिल्या वर्गापेक्षां तुमची मजल फार अलिकडची आहे. तुह्मांस अल्पश्रमानें ताळ्यावर आणतां येईल!'

त्या तांड्यांतील बाकी राहिलेल्या लोकांस राजानें विचारलें—'तुमची काय हकीगत आहे. तुह्मी हा धंदा कां करूं लागला?'

ते ह्मणाले—"महाराज, आह्मी चांगल्या कुळांतले आहों. उद्योगधंदा करून आह्मी कित्येक वर्षेंपर्यंत आपला चरितार्थ बिनबोभाट चालवीत होतों. परंतु, आमच्या कामावर जाण्याच्या वाटेंत जागोजाग दारूचे गुत्ते असल्यामुळें एकाचें पाहून दुसरा, दुसऱ्याचें पाहून तिसरा अशा रीतीनें आह्मी सर्वजण दारू पिऊं लागलों. मिळेल तो पैसा दारूंत जाऊं लागल्यामुळें आमच्या बायकांपोरांस पोटभर अन्न मिळण्याचीहि भ्रांत पडूं लागली. कांहीं दिवसांनीं आमच्या वेतनांत दारूहि भागेनाशी झाली. तेव्हां आह्मी चोरीच्या फंदांत पडूं लागलों!"

ह्यावर राजा ह्मणाला—"खरोखर पाहतां यांत तुमचा दोष फार थोडा दिसतो."

यानंतर तुरुंगांत ज्या वकिलांची यांची गांठ पडली होती, त्यांना त्यानीं दरबारांत बोलावून ह्मटलें 'तुमची हकीगत आह्मास तुरुंगांतच समजली आहे. या क्षणापासून आह्मी तुमची मुक्तता केली आहे.'

याप्रमाणें सर्वांना बोलावून राजानें त्यांची हकीगत विचारून घेतली. व ताबडतोब दरबार भरवून त्यानें कित्येक उपयुक्त योजनांचा राज्यपद्धतींत समावेश केला. दरबारांतील लोकांस दरबारच्या आरंभीं तो ह्मणाला—'हे सर्व सरदार व मुत्सद्दीहो, तसाच कांहीं योग येऊन आह्मांस आमच्या

रयतेची स्थिती प्रत्यक्ष अवलोकन करण्याची संधि मिळाली; त्यायोगानें आह्मांस एक प्रकारची दिव्यदृष्टीच लाभली असें आह्मी समजतों. पात्रें रंगभूमीवर आल्यानंतर त्यांचें जें नयनमनोहर स्वरूप असतें त्यापेक्षां पडद्याचे माग त्यांचें स्वरूप भिन्नप्रकारचें असतें, ही गोष्ट सर्व विश्रुतच आहे. रंगभूमिवरील त्यांचें स्वरूप किंचित कालपर्यंतच टिकणारें असतें. त्यावरून त्यांच्या नित्यक्रमाचें अनुमान काढणें कधींहि समंजसपणाचें होणार नाहीं. त्यांच्या खऱ्या स्थितीचें निरीक्षण करण्यास पडद्याच्या आंतच डोकावलें पाहिजे. तशीच स्थिती रयत आणि राजा यांच्यामधील आहे. राजे लोक ज्या रस्त्यानें जावयाचे ते रस्ते साफसूफ झाडून ठेवतात. तेथें घाणीचा यत्किंचित्हि संसर्ग राहूं देत नाहींत; त्या रस्त्यानें भिकाऱ्यांस हिंडूं देत नाहींत. मळकट कपडे घातलेल्या किंवा लकतऱ्या पांघरलेल्या स्त्रीपुरुषांचा त्या रस्त्यास विटाळहि होऊं देत नाहींत ! आपल्या सर्व शहराची स्वच्छता, नीटनेटकेपणा, आपण जातों त्या रस्त्यावर दिसल्याप्रमाणेंच आहे अशी राजेलोकांची कल्पना झाल्यास त्यांत नवल तें काय ! आपल्या राज्यांत सर्वत्र अबादानी आहे. कोणांस कशाचीहि उणीव नाहीं. सर्वत्र सुखसमृद्धीची रेलचेल आहे असा राजांचा स्वाभाविकच समज होतो. कारण, वस्तुस्थिती दृष्टीस पडण्याचा त्यांना कधीं प्रसंगच येत नाहीं. आपल्या रयतेची खरी स्थिति समजण्यास राजांनीं पडद्याआड पाहिलें पाहिजे. शहरांत ज्या ठिकाणीं घाण असेल, ज्या ठिकाणीं अन्न अन्न करीत धाय धाय करणारे भिकारी जमत असतील, शिळोप्याच्या वेळीं सुखदुःखाच्या गोष्टी सांगण्याचे ज्या ठिकाणीं अड्डे असतात त्याच ठिकाणीं राजांनीं मुद्दाम जाऊन पाहिलें पाहिजे. न्यायाच्या कोर्टांची काय स्थिती आहे; कोतवाल लोक आपलें काम कसें करितात; लोकांच्या मालमत्तेचें कशाप्रकारें संरक्षण होतें इत्यादि गोष्टी त्यांनीं जागरूकतेनें पाहिल्या पाहिजेत. राजास शास्त्रकारांनीं प्रजेचा पिता ह्मटलेलें आहे. तें अभिधान यथार्थाक्षर करण्यास पिता ज्याप्रमाणें आपल्या आप्तांची क्षणोक्षणीं विचारपूस करून त्यांचें संगोपन व संवर्धन करतो, त्याचप्रमाणें राजांनीं सर्वत्र प्रजेच्या हिताबद्दल तत्पर राहणें त्यांचें कर्तव्य आहे. त्यांच्या हातून हें कर्तव्य चोख रीतीनें बजाविलें जाण्यास राजांनीं प्रजेच्या परिस्थितीचें योग्य परिज्ञान करून घेतलें पाहिजे.

अल्प गुन्ह्याबद्दल कोणासहि भयंकर शिक्षा देण्यांत येऊं नये. एखाद्यानें केवळ पोटाकरितां चोरी केल्यास त्याच्यावर कायद्याची कडक अंमलबजावणी करणें होतां होईल तों टाळावें. अमुक एक विशिष्ट धर्मपंथाचा अनुयायी आहे एवढ्याच कारणावरून त्याचा छळ होऊं नये, अव्यंग माणसानें भिक्षा मागूं नये, याबद्दल बंदोबस्त ठेवणें यथायोग्य आहे; परंतु अशा माणसास तुरुंगांत टाकून किंवा फटक्याची शिक्षा देऊन उद्दिष्ट कार्य उरकं पाहणें अत्यंत निष्ठुरपणाचें आहे. दारोदार भीक मागणाऱ्या माणसास उद्योगधंदा पुरवून त्यांना भीक मागण्याचा प्रसंगच येऊं नये असे उपाय योजणें सृष्टिक्रमास व स्वभावधर्मास अनुरूप आहे. त्याचप्रमाणें तरुण गुन्हेगारांना निरढावलेल्या गुन्हेगारांत मिसळूं न देतां त्यांची शिक्षणाची वगैरे योग्य तजवीज ठेवून नीतितत्त्वांच्या सामर्थ्यानें गुन्ह्यांपासून व दुर्गुणांपासून त्यांची निवृत्ति होईल असा उपक्रम केला पाहिजे. यच्चावत् सर्व जातींच्या मुलांना शिक्षण मिळावें अशी सक्तीची तजवीज झाली पाहिजे. मनुष्यप्राण्यास शिक्षणाशिवाय ठेवावयाचें ह्मणजे त्यांच्यांत आणि पशूंत काय अंतर आहे? शिक्षण मिळून मन संस्कृत होणें, हा मनुष्याचा निसर्गसिद्ध हक्क आहे. तदनुरूप शिक्षणप्राप्तीस त्यांना योग्य अवसर न ठेवणें ह्मणजे शास्त्यांनीं आपल्या एका मोठ्या पवित्र कर्तव्यास चुकण्यासारखें आहे. ज्यांची स्थिती फारच निर्धन असेल त्यांना बिनखर्ची शिक्षण मिळण्याची योजना अमलांत येणें अवश्य आहे. यामुळें आरंभीं जरा अधिक खर्च होईल; परंतु, कालावधीनें लोक जसजसे सुशिक्षित होऊन त्यांचे अंगीं पापभीरुत्वाचा उद्भव होईल तसतसा इतर अनवश्यक खात्यांचाहि खर्च झालेल्या जादा पैशाची आपोआपच भरपाई होइल. यदाकदाचित् तसें न झालेंच तरी शिक्षणासारख्या महत्त्वाच्या बाबतींत थोडा अधिक उणा खर्च झाला तरी त्यापासून कदापि नुकसान होणार नाहीं. प्रामाणिक माणसांच्या मिळकतींतूनच तुरुंगाचा खर्च चालतो ही विपरीत स्थिति नव्हे काय? प्रामाणिकपणाबद्दल हा त्यांच्यावर करच नव्हे काय? प्रामाणिक माणसांनीं निढळाच्या घामानें मिळविलेल्या पैशाचा उपयोग गुन्हेगार माणसांना पोसण्याकडे होऊं नये, गुन्हेगारांना पकडून, त्यांचा मुद्देमाल शोधून काढणें, वगैरे कामाकरितां कोतवालांचा उत्साह खर्च होऊन नेहमीं गुन्हेगारांशीं संगत घडल्यानें त्यांचीं हृदयें अदय

होऊं नयेत, गुन्हेगारांची चवकशी करण्याकरितां गल्लोगल्लीं न्यायमंदिरें स्थापण्याचा प्रसंग येऊं नये अशी जर इच्छा असेल तर मीं वर सांगितलेल्या योजना अवश्य अस्तित्त्वांत आल्या पाहिजेत.

शहाजोग रीतीनें चोरी करणें हें कांहीं लहानसहान काम नाहीं. त्यासहि एकप्रकारचें कौशल्य व विलक्षण सफाई लागते. गुन्हेगारांच्या अंगच्या या सद्गुणांचा सत्कर्मी ह्मणजे— एखाद्या उत्पादक कार्यांत उपयोग करून घेतां येईल तर राष्ट्राच्या संपत्तींत किती तरी भर पडणार आहे! ग्रंथकर्ता आपल्या ग्रंथांत जागोजाग अर्थगांभीर्य व पदलालित्य उत्कृष्टप्रकारें साधून आपल्या सहस्त्रावधि वाचकांचीं मनें तल्लीन करून सोडतो; एखादा चितारी सुबक चित्र काढून त्याकडे जनतेचीं मनें आकर्षित करून घेतो; एखादा कारागीर उत्तम वस्तु निर्माण करून सर्व लोकांच्या प्रशंसेस पात्र होतो; एखादा चोर दिवसाढवळ्या चावडीवर दरवडा घालून तेथील मालमत्ता बिनबोभाट पळवून नेतो. ग्रंथकार असो, चितारी असो, कारागिर असो किंवा चोर असो आपापल्या कामांत प्रत्येकजण जें विलक्षण प्रकारचें नैपुण्य दाखवितो त्यास प्रेरकशक्ति एकच होय. या शक्तीचा जसा सत्कारणीं किंवा असत्कारणीं उपयोग होईल त्याप्रमाणें त्यांच्या हातून प्रशस्त किंवा गर्ह्य कार्य घडून येईल. राष्ट्रांतील जनतेच्या मानसिक शक्तींचा सत्कारणीं उपयोग होऊन मानवी जातीची प्रगति व्हावी, जनतेच्या एकंदर आयुष्यक्रमाची सामान्य इयत्ता उच्चप्रकारची व्हावी एतदर्थ जर कोणता उपाय असेल तर तो नैतिक पायावर उभारलेल्या शिक्षणाचा प्रसार हाच होय. ज्या राष्ट्रांत शिक्षणाप्रीत्यर्थ कोणत्याहि प्रकारें काटकसर केली जात नाहीं, त्यास कोट्यावधि रुपये खर्च करून लष्कर ठेवण्याची जरूर रहात नाहीं. दंगेधोपे व फंदफितुरी यांचा लष्कराच्या योगानें कांहीं काळपर्यंत प्रतीकार करतां येईल, परंतु त्यांचें निर्मूलन करणें, किंबहुना त्यांच्या समुद्भवाचा संभवच नाहींसा करणें हें शिक्षणानें होणारें कार्य आहे. शिक्षणाचा प्रसार झाला ह्मणजे आज ज्याठिकाणीं मोठमोठाले कैदखाने आपलीं भेसूर मस्तकें वर काढून नगरास लाज आणीत आहेत, त्यांच्या जागीं उद्योगधंद्यांचे मोठ मोठे कारखाने अहर्निश आपलें काम एकनिष्ठतेनें चालवीत असलेले दिसतील. आज रस्त्यांतून भिकाऱ्यांचे तांडे, निरुद्योगी

लोकांचे कंपू निश्चिंत रीतीनें वावरत असलेले दिसत आहेत, त्याच जागीं देशाचे खरे उपकर्ते उद्योगव्यापृत लोक हे त्वरेनें संचरत असलेले दिसतील.

शहरांत जागोंजागीं दारूचे गुत्ते आहेत, त्यामुळें आमच्या मनास मोह पडून आमचे पाय घुटमळूं लागतात व अखेर दिव्यावरील पतंगाप्रमाणें आह्मी या पानगृहरूप अग्निकुंडांत दिवसां काबाडकष्ट करून संपादिलेल्या द्रव्याचें हवन करतों. व त्या बरोबरच आमच्या प्रपंचाचा, ऐहिक सुखाचा, इभ्रतीचा, माणुसकीचा स्वाहाकार करितों; असें कित्येक लोकांनीं मजपाशीं मला सांगितलें अशी स्थिती असणें सर्वथैव अनिष्ट होय. याबद्दल विशेष विस्तृत विवेचन करण्याचें कारण दिसत नाहीं. सुरापानाच्या योगानें शरीराची, नीतिमत्तेची व तेजस्वितेची एकदम हानि होते. यास्तव कांहीं विशिष्ट मुदतींत या व्यसनाचा नायनाट होईल असे उपाय योजणें अवश्य आहे. दारू पिणें हा मनुष्याचा हक्क आहे असेंहि एक तत्त्व कांहीं देशांत प्रतिपादिल्याचें माझ्या ऐकिवांत आहे. खरोखरच तो जर तसा हक्क असेल तर त्याची पायमल्ली जितकी लवकर होईल तितकें तें श्रेयस्कर होय; याबद्दल समंजस माणसांत दोन मतें असूं शकतील असें मला वाटत नाहीं.

याप्रमाणें अनुभवरूप दिव्य दृष्टीनें प्राप्त झालेल्या आपल्या ज्ञानाचा सदुपयोग करून महाराजांनीं राज्यांत अनेकप्रकारच्या सुधारणा करून आपली कारकीर्द इतिहासांत अजरामर करून ठेवली. कोणीहि आपल्या जिव्हाळ्याचे भेटले कीं, राजा आपल्या आयुष्यांतील ही महत्त्वाची गोष्ट त्यास मोठ्या कौतुकानें सांगत असे. रखवालदारानें गचांड्या मारून राजवाड्यांतून बाहेर काढल्यावेळेपासून तों राजवाड्यांत पुन्हां प्रवेश होईतोंपर्यंत घडलेल्या सर्व गोष्टी तो साद्यंत सांगत असे. या अल्पकाळांत मिळालेल्या मोठ्या शिक्षणाच्या योगानें आपल्या हातून केवढी लोकोपयोगी कामें झालीं याचेंहि तो मोठ्या अभिमानानें वर्णन देत असे. प्रजेबद्दल आपल्या मनांत उत्पन्न झालेली दयाशीलता केवळ अल्पजीवी न व्हावी यासाठींच कीं काय, शहरांतून भटकत फिरत असतां आपणास भोगाव्या लागलेल्या आपत्तींचें स्मरण तो नेहमीं ताजें ठेवी. धीरेंद्र व तानू हे त्याचे मोठे दोस्त झाले. राज्यकारभारांतील कोणतीहि मोठी गोष्ट त्यांचा सल्ला

घेतल्याशिवाय तो क्वचितूच करी. राजासमक्ष बसण्याचा हक्क धीरेंद्राच्या वंशांत अद्यापहि चालूं आहे.

तानूनें आपला आयुष्यक्रम अगदीं ह्यातारपणापर्यंत मोठया उत्कृष्ट रीतीनें चालविला. एकवेळ शुभधाम देशाच्या राज्यपदवीवर तो आरूढ झाला होता, या गोष्टीचें त्याच्या विशिष्ट पोषाखावरूनें व शिरस्त्राणावरून सर्व लोकांना तात्काल स्मरण होत असे. तो रस्त्यानें चालला ह्मणजे लोक त्यास मोठया अदबीनें मुजरा करून त्यानें सस्मित त्यांचा स्वीकार केला ह्मणजे मोठी धन्यता मानून घेत.

एखादा कायदा सौम्य करावयाचा असला किंवा रयतेस एखादा नवीन हक्क द्यावयाचा असला ह्मणजे मुत्सद्दीलोक सत्ताभिलाषानें प्रेरित होऊन त्याचें मन त्यापासून पराङ्मुख करण्याचा प्रयत्न करीत; परंतु तो त्यांना एकप्रकारच्या अधिकारयुक्त मुद्रेनें बजावून सांगत असे कीं, " या बाबतींत आपण आह्माला शहाणपणा शिकवूं नका. कारण रयतेच्या सुखदुःखांची मला पूर्ण माहिती आहे. "

समाप्त.